# ''आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास''

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

**मराठी विभाग**

**कला आणि ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंध**

**संशोधक**

**मच्छिंद्र रामचंद्र गोंटे**

**मार्गदर्शक**

**डॉ. राजेंद्र ठाकरे**

**ऑगस्ट - २०१७**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला आणि ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी **मच्छिंद्र रामचंद्र गोंटे** यांनी **''आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास''** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधाचे काम पूर्णपणे वस्तुस्थितीवर आधारित असून, या विषयातील त्यांचे हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भनिर्देश केले आहेत. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१७

**मार्गदर्शक**

**डॉ. राजेंद्र ठाकरे**

**मराठी विभाग प्रमुख,**

**महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय,**

**श्रीगोंदा**

# प्रतिज्ञापत्र

मी **मच्छिंद्र रामचंद्र गोंटे** या प्रतिज्ञापत्राद्वारे घोषित करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी **''आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास''** या विषयावर माझा शोधप्रबंध सादर करीत आहे.

सदर शोधप्रबंध मी **डॉ. राजेंद्र ठाकरे** यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून, असे घोषित करतो की, सदरच्या शोधप्रबंधात नमूद असलेली माहिती सत्य असून ती आजवर कोठेही प्रकाशित केलेली नाही. तसेच कोणत्याही विद्यापीठाला पदवीसाठी सादर केलेली नाही.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१७

**संशोधक**

**मच्छिंद्र रामचंद्र गोंटे**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला आणि ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी **'आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास'** हा शोधप्रबंध सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. प्रस्तुत शोधप्रबंध लिहिण्याकरता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने बहुमोल अशी संधी प्राप्त करुन दिली, त्याबद्दल मी विद्यापीठाचा सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. राजेंद्र ठाकरे, मराठी विभाग प्रमुख, महाराजा जिवाजीराव शिंदे, महाविद्यालय, श्रीगोंदा यांनी संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी सतत प्रेरणा देऊन अनमोल असे मार्गदर्शन केले याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत कला व ललितकला अभ्यास मंडळाचे विभागप्रमुख डॉ. श्रीपाद भट यांनी संशोधन कार्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत वेळोवेळी मार्गदर्शन केले याबद्दल मी ऋण व्यक्त करतो.

सदर शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी व आवश्यक साधनसामग्री संकलित करण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रंथालय, नागपूर, जयकर ग्रंथालय, पुणे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव, सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा, सी. टी. बोरा कॉलेज, शिरुर, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, ग्रंथालय यांनी ग्रंथ व साहित्य संशोधन कार्यासाठी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी आजपर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात अचूक मार्गदर्शन करुन प्रेरणा देणारे सावित्रीबाई कला महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ.देविदास शेटे,प्राचार्य डॉ.शांतीलाल घेगडे,डॉ.रघुराज कुरुमकर,

डॉ.रवींद्र शिर्के, श्री. दत्तकृपा शैक्षणिक व कृषी ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष. दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष. बाळासाहेब साळुंके, सचिव सौ. अर्चनाताई पानसरे. यांनी संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश राठोड व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार.

प्रस्तुत संशोधन कार्यात सतत मार्गदर्शन करणारे धन्वंतरी कला,विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रघुनाथ शेळके व मेंगावडे मॅडम यांनी वेळोवेळी अनमोल असे मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे. तसेच वेळोवेळी आत्मीयतेने मदत करणारे माझे सहकारी मित्र बापुराव देवकाते, अजय कोळगे, विकास इथापे, नंदकुमार पवार, अक्षय ढगे, शरद बारगुजे, कल्याण शिंदे, प्रमोद लगड, दिलीप पानसरे, राजेंद्र गोंटे, संतोष गावडे, अरुण गावडे, सचिन निंभोरे, बाळासाहेब देविकर, नंदकुमार उदार, भांबरे मॅडम, केदार मॅडम, भोसले मॅडम, कुरुमकर मॅडम, भंगाळे मॅडम यांनी मला संशोधन कार्यात प्रेरणा व सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही मनापासून आभारी आहे.

माझ्या संशोधनाच्या आणि अभ्यासाच्या काळात मोलाचा पाठिंबा व आशीर्वाद लाभला ते माझे तीर्थरुप आई-वडील, बंधू गोरक्ष व नीता वहिणी, विद्या वहिनी यांचा मी शतशः ऋणी आहे. तसेच संशोधन कार्यात सदैव खंबीरपणे उभी असणारी सतत कोणत्या ना कोणत्या कार्यात मदत करणारी सौ. कीर्ती गोंटे यांचाही सहभाग अनमोल आहे. तसेच वेळोवेळी मदत करणारे संग्राम, दिग्विजय, विक्रम, विराज व अनुष्का यांचेही मनापासून आभार.

शोधप्रबंधाचे टंकलेखन सुबकरीत्या करुन देणारे अभिनव टाईपरायटिंग इन्स्टिट्युटचे प्राचार्य बुनगे सर यांना मनापासून धन्यवाद! याशिवाय संशोधनात सतत मदत करणारे संगणकतज्ज्ञ शिवाजी वाजे यांचेही मनापासून आभार.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : / /२०१७**

**संशोधक**

**मच्छिंद्र रामचंद्र गोंटे**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | I |
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | ऋणनिर्देश | III |
| | अनुक्रमणिका | |
| **प्रकरण १ ले** | **कथा कादंबरीकार आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन कार्य** | **०१-५५** |
| १.१ | प्रस्तावना | |
| १.२ | संशोधन विषयाची गरज व महत्त्व | |
| १.३ | संशोधनाची उद्दिष्टे | |
| १.४ | संशोधन पध्दती | |
| १.५ | संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन | |
| १.६ | आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व | |
| १.७ | आशा बगे यांचे साहित्य लेखन | |
| १.८ | आशा बगे यांच्या लेखनामागील प्रेरणा | |
| १.९ | आशा बगे यांना प्राप्त झालेले पुरस्कार | |
| १.१० | आशा बगे यांचे वाङ्मय कथासंग्रह | |
| १.१०.१ | मारवा | |
| १.१०.२ | अत्तर | |
| १.१०.३ | पूजा | |
| १.१०.४ | मांडव | |
| १.१०.५ | चंदन | |
| १.१०.६ | अनंत | |
| १.१०.७ | दर्पण | |

| | | |
|---|---|---|
| १.१०.८ | निसटलेले | |
| १.१०.९ | ऋतुवेगळे | |
| १.१०.१० | माझी कथा माझी निवड | |
| १.१०.११ | पाऊलवाटेवरले गाव | |
| १.१०.१२ | प्रतिद्वंदी | |
| १.११ | आशा बगे यांचे कादंबरी लेखन | |
| १.११.१ | मनस्विनी | |
| १.११.२ | झुंबर | |
| १.११.३ | त्रिदल | |
| १.११.४ | धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे | |
| १.११.५ | आकाश | |
| १.११.६ | सेतू | |
| १.११.८ | भूमी | |
| १.११.९ | मुद्रा | |
| १.११.१० | भूमिका आणि उत्सव | |
| १.१२ | समारोप | |
| १.१३ | निष्कर्ष | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |
| **प्रकरण २ रे** | **आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कथानक व जीवनदर्शन** | **५६-११०** |
| २.१ | प्रस्तावना | |
| २.२ | मराठी कादंबरीचे स्वरुप | |
| २.३ | कादंबरीची व्याख्या | |
| २.४ | कादंबरीचे घटक | |
| २.४.१ | कादंबरीचे कथानक | |

| | | |
|---|---|---|
| २.४.२ | कादंबरीमधील कथानकाचे स्वरुप | |
| २.४.३ | कादंबरीतील स्वभाव रेखाटन | |
| २.४.४ | कादंबरीतील वातावरण | |
| २.४.५ | कादंबरीची भाषाशैली | |
| २.४.६ | कादंबरीतील मनोविश्लेषण | |
| २.५ | भूमी कादंबरीचे कथानक | |
| २.६ | मनस्विनी कादंबरीचे कथानक | |
| २.७ | झुंबर कादंबरीचे कथानक | |
| २.८ | त्रिदल कादंबरीचे कथानक | |
| २.९ | सेतू कादंबरीचे कथानक | |
| २.१० | भूमिका आणि उत्सव | |
| २.११ | धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे | |
| २.१२ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील समाजदर्शन | |
| २.१३ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील जीवनसृष्टी | |
| २.१४ | समारोप | |
| २.१५ | निष्कर्ष | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |
| **प्रकरण ३ रे** | **आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे स्त्री दर्शन** | **१११-१८२** |
| ३.१ | प्रस्तावना | |
| ३.२ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री चित्रण | |
| ३.३ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाचा सामाजिक आढावा | |
| ३.४ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाचे बदलते वास्तव | |

| | | |
|---|---|---|
| ३.५ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवन | |
| ३.६ | स्त्री साहित्यकार म्हणून कादंबरी क्षेत्रातील आशा बगे यांचे स्थान | |
| ३.७ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील आधुनिक स्त्रीचे वर्तमान वास्तवातील चित्रण | |
| ३.८ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील जुने व नवे विचार | |
| ३.९ | समारोप | |
| ३.१० | निष्कर्ष | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |
| **प्रकरण ४ थे** | **आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा** | **१८३-२३६** |
| ४.१ | प्रस्तावना | |
| ४.२ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा | |
| ४.३ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमधील मूल्यात्मकता व संस्कृतीचे दर्शन | |
| ४.४ | समारोप | |
| ४.५ | निष्कर्ष | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |
| **प्रकरण ५ वे** | **आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास** | **२३७-२९५** |
| ५.१ | प्रस्तावना | |
| ५.२ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील भाषाशैली | |
| ५.३ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील आशय सूत्र | |
| ५.४ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निवेदन पध्दती | |
| ५.५ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नातेसंबंध | |

| | | |
|---|---|---|
| ५.६ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निसर्गातील प्रतिमा आणि प्रतीके | |
| ५.७ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्थल वर्णन | |
| ५.८ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निसर्ग वर्णन | |
| ५.९ | समारोप | |
| ५.१० | निष्कर्ष | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |
| **प्रकरण ६ वे** | **उपसंहार** | **२९६-३२१** |
| | परिशिष्ट | |
| ६.१ | प्रास्ताविक व निष्कर्ष | |
| ६.२ | आशा बगे यांचा परिचय व छायाचित्र | |
| ६.३ | आशा बगे यांच्या साहित्यकृतीची मुखपृष्ठे | |
| ६.४ | संदर्भ ग्रंथ सूची | |
| ६.५ | आधारभूत ग्रंथ सूची | |
| ६.६ | नियतकालिके व वर्तमानपत्रे | |
| ६.७ | व्यक्तिनाम सूची | |
| ६.८ | ग्रंथनाम सूची | |

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण १ ले | कथा कादंबरीकार आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन कार्य | ०१-५५ |
| प्रकरण २ रे | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कथानक व जीवनदर्शन | ५६-११० |
| प्रकरण ३ रे | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे स्त्री दर्शन | १११-१८२ |
| प्रकरण ४ थे | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा | १८३-२३६ |
| प्रकरण ५ वे | आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास | २३७-२९५ |
| प्रकरण ६ वे | उपसंहार | २९६-३२१ |

## अनुक्रमणिका

### प्रकरण पहिले

### कथा कादंबरीकार आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन कार्य


१.१ प्रास्ताविक

१.२ संशोधन विषयाची गरज व महत्त्व

१.३ संशोधनाची उद्दिष्टे

१.४ संशोधन पध्दती

१. ५ संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

१.६ आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व

१.७ आशा बगे यांचे साहित्य लेखन

१.८ आशा बगे यांच्या लेखनामागील प्रेरणा

१.९ आशा बगे यांना प्राप्त झालेले पुरस्कार

१.१० आशा बगे यांचे वाङ्मय कथासंग्रह

१.१०.१ मारवा

१.१०.२ अत्तर

१.१०.३ पूजा

१.१०.४ मांडव

१.१०.५ चंदन

१.१०.६ अनंत

१.१०.७ दर्पण

१.१०.८ निसटलेले

१.१०.९ ऋतुवेगळे

१.१०.१० माझी कथा माझी निवड

१.१०.११ पाऊलवाटेवरले गाव

१.१०.१२ प्रतिद्वंदी

१.११ आशा बगे यांचे कादंबरी लेखन
१.११.१ मनस्विनी
१.११.२ झुंबर
१.११.३ त्रिदल
१.११.४ धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे
१.११.५ आकाश
१.११.६ सेतू
१.११.८ भूमी
१.११.९ मुद्रा
१.११.१० भूमिका आणि उत्सव
१.१२ समारोप
१.१३ निष्कर्ष
संदर्भ ग्रंथ सूची

## प्रकरण पहिले

## कथा कादंबरीकार आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखनकार्य

### १.१ प्रस्तावना -

१९६० नंतरच्या कालखंडामध्ये कादंबऱ्यांचे युग सुरु झाले. प्रत्येक जण आपला जीवनानुभव लोकांच्या समोर मांडणे आणि सामाजिक वास्तवतेला जसेच्या तसे समोर आणणे हे अनेक लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडलेले दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्री जीवनात अनेक परिवर्तने घडून आली. ती म्हणजे स्त्री मुक्ती चळवळ, दलित चळवळ होय. या सर्वांचा परिणाम स्त्री जीवनावर झालेला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी घुसमट स्त्रियांच्या लक्षात आली व तिने आपल्या स्वतःच्या अधिकारासाठी संघर्ष करण्यास सुरुवात केली. भारतीय संस्कृतीच्या समाजाची चौकट पार करताना त्या अपयशी ठरल्या. आजही तिचा हा संघर्ष सुरुच आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न निरंतर सुरुच आहे. आशा बगे यांनी याच विषयावर मुख्यत्वे लिखाण केलेले दिसते.

मराठी साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्रे, प्रवास वर्णने इत्यादी प्रवाह आहेत. प्रत्येक प्रवाह आपले स्वतंत्र अस्तित्व व महत्त्व टिकवून आहे. मराठी साहित्यात कादंबरीचा प्रवाह स्वतंत्र मानला जातो. १९७० च्या दशकात सातत्याने व दर्जेदार कादंबऱ्या लिहिणाऱ्या आशा बगे या एक आघाडीच्या लेखिका आहेत. या दशकात आधुनिक स्त्रियांची विविध रुपे रेखाटणाऱ्या व स्त्रीजीवन दर्शन घडविणाऱ्या अनेक लेखिका आहेत. त्यात कमल देसाई, जोत्स्ना देवधर, निर्मला देशपांडे, गौरी देशपांडे, तारा वनारसे, भरत ससाणे, रोहिणी कुलकर्णी, अंबिका सरकार, शांता गोखले, सानिया, कविता महाजन, ताराबाई शास्त्री व गीता साने इत्यादी महत्त्वाच्या लेखिका आहेत. माणसाच्या मनाचा तळ शोधणाऱ्या आणि वाचकांची उच्च अभिरुची गृहित धरुन तरल संवेदनाच्या एका वेगळ्याच उंचीवर वाचकाला घेऊन

जाणाऱ्या आशा बगेंची ओळख आहे. मानवी मनाच्या तळाशी असणाऱ्या भावभावनांची वर्तुळे आशा बगे यांच्या लेखनातून दिसून येतात. तसेच आशा बगे यांच्या साहित्यात संयमित शैली, कौटुंबिक प्रतिमाविश्व आणि अनुभवांची उत्कटता ही त्यांच्या कथांची वैशिष्टये आहेत. चिंतनशीतला, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा हे त्यांच्या लेखणीचे बळ आहे. व्यक्ति स्वातंत्र्याच्या नावाखाली आपल्या कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवल्याची त्यांना चीड आहे, असे दिसून येते.

आजच्या आधुनिक जगात स्त्री ही स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येत आहे. स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या लेखनात जाणवतो. त्यांच्या साहित्यातील स्त्रीत्वाच्या मर्यादा न ओलांडणाऱ्या आहेत. परंतु दुबळ्या नाहीत. आत्मभान असलेल्या, आपल्या मूल्यांवर ठाम आहेत. आशा बगे यांच्या कथांमधून वा भाषेचे प्रयोग केले नाहीत. तरीही त्यांची शैली अर्थपूर्ण, चित्रमय आहे आणि व्यापक जीवन दर्शनासाठी कादंबरीची निवड केली. भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन होऊन कसे येते याची प्रचिती त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

आशा बगे यांच्या साहित्यातील 'स्त्री  जीवन' हे वेगळे आहे. सद्‌भावनेचा व सत्प्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यावर आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत, वैकल्ये, संगीत, नृत्य कीर्तन, संस्कार व आचार विचार यांच्याशी जवळचे नाते असलेले दिसून येते. मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या आयुष्याच्या शेवटी मूल्यांना जपणे किती महत्त्वाचे आहे हेच दर्शवितात व हे सर्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमुळे, त्यांच्यावर झालेल्या संस्कारामुळेच घडते, असे दिसून येते.

### १.२ संशोधन विषयाची गरज व महत्त्व -

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शनाचा अभ्यास करीत असताना त्यांच्या कादंबऱ्यांत स्त्रियांचे वेगळेपण,कादंबऱ्यांतील स्त्रियांचे योगदान व

प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत स्वतःचे जीवन आणि कुटुंब उभे करणाऱ्या स्त्रिया मांडलेल्या आहेत, तसेच स्त्रियांच्या अंगी प्रचंड उर्जा शक्ती कशी असते, ती प्रतिकूल परिस्थितीतही तिच्यातून बाहेर कशी पडते, हे मांडलेले आहे.

आशा बगे यांच्या लेखनामध्ये नवे विचार, समाजनिष्ठा, मूल्यनिष्ठा, अभिव्यक्ती, समाज जीवनातील वास्तव चित्रण कसे उभे केलेले आहे, त्याची ओळख करुन दिलेली आहे. माणसाच्या मनाचा तळ शोधणाऱ्या आणि वाचकांची अभिरुची गृहित धरुन तरल संवेदनाच्या एका वेगळ्या उंचीवर वाचकाला कशा घेऊन जातात ते अभ्यासले. कोणत्याही अभिनिवेशाने प्रेरित न होता त्यांच्या लेखनातील सौम्य व शांत अशा मध्यवर्गीय जीवनाचा भावनांचा कोणता पट त्यांनी विनला आहे, त्याची समाजाला ओळख करुन देणे गरजेचे आहे. लेखिकेने वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती,अनेक घटना, प्रसंग, भावनिक गुंतागुंत व आंतरिक संघर्ष मांडलेले आहेत.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री पात्रांच्या माध्यमातून आजच्या जगात वावरताना स्त्रियांच्या वाटयाला येणाऱ्या दुःखाच्या विविध तऱ्हा, पुरुष प्रधान संस्कृती, तिची होणारी कुचंबणा, सौम्य स्वरुपातील परंपरेविरुध्दतेची त्यांची बंडखोरी व त्यांचे जागृत असणारे आत्मभान या सर्वांचे चित्रण केलेले आहे. आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्रिया या स्त्रीत्वाची मर्यादा न ओलांडता, जातिभेदाच्या जोखडातून स्वतःला मुक्त करुन घेऊन, संकुचित दृष्टिकोनातून बाहेर पडून आपल्या मूल्यांवर ठाम असणारे, तसेच सुसंस्कृत स्त्रिया भविष्याचा नवा मार्ग दाखवणाऱ्या स्त्रियांचे समाजातील स्थान काय आहे, हे सांगून ती काय करु शकते. आजच्या समाजाशी संबंधित असलेले प्रश्न, समाज जीवनाचे चित्रण व स्त्री दर्शन इ. अशा विविध अंगांनी त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरुप स्पष्ट होण्यासाठी आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास होणे आवश्यक वाटल्यामुळे मी हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

आशा बगे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'भूमी' या कादंबरीचा यापूर्वी अभ्यास झालेला आहे. मात्र आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन या विषयावर स्वतंत्ररित्या अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यामुळेच, 'आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास'. या विषयाचा स्वतंत्रपणे शोध घेतलेला आहे. सदर विषय पूर्णतः नवीन असून स्त्रियांचा सामाजिकतेच्या अंगाने आढावा घेतलेला आहे.

**१.३ संशोधनाची उद्दिष्टे -**

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास करताना खालील उद्दिष्टे -

१) आशा बगे यांच्या जीवनचरित्रांचा अभ्यास करणे.

२) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा वाङ्मयदृष्टीने अभ्यास करणे.

३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा आशयनिष्ठ अभ्यास करताना व्यक्तिरेखा, प्रसंग चित्रणे, निवेदने, संवाद व वातावरण या घटकानुसार स्पष्ट करणे.

४)कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले स्त्रीजीवनाचे भावविश्‍व, नातेसंबंध व स्त्रियांची मानसिकता यांचा शोध घेणे.

५) आशा बगे यांच्या साहित्य लेखनातून कोण-कोणते मूल्य व जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत यांचा अभ्यास करणे.

६) आशा बगे यांच्या साहित्यातून येणारे आत्मभान, विचारसरणी, अभिव्यक्ती, लेखन व भाषाशैली यांचे वेगळेपण स्पष्ट करता येईल.

७) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून सिध्द होणाऱ्या समाज संस्कृतीचे दर्शन कसे घडते यांचा अभ्यास करणे.

८) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील सामाजिक जीवनाचे चित्रण अभ्यासणे.

९) आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील जीवननिष्ठा, स्त्रीदर्शन व स्त्री लेखनाचे स्वरुप स्पष्ट करणे.

१०) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील सामाजिक स्थिती आशय सूत्राच्या आधारे समजावून घेणे.

**१.४ संशोधन पध्दती -**

सदर संशोधनासाठी चरित्रात्मक, समाजशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय, संदर्भान्वयी व मानसशास्त्रीय पध्दतीचाही वेळोवेळी उपयोग केलेला आहे. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

**१.५ संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन-**

१) 'समकालीन कथा प्रवाहातील आशा बगे आणि सानिया यांच्या साहित्य विश्वाचा समकालिनतेच्या संदर्भात अभ्यास.' प्रा.मनिषा रंगरावजी नागपुरे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, २००५. (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर.

२) 'मालती जोशी और आशा बगे की कहानीयों का तुलनात्मक अध्ययन.' तोडकरी अनुघा डी.,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ,२००६. (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर.

३) 'अलका सरावगी और आशा बगे का कथा साहित्य : तुलनात्मक अध्ययन.'प्रा.काटे हेमलता विजय,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर , २०१०. (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर.

**१.६ आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व -**

आशा बगे यांचा जन्म २८ जुलै १९३९ रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण 'न्यू इग्लिश स्कूल नागपूर' येथे पूर्ण झाले. 'हिस्लॉप' या महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. ही पदवी मिळवली. पुढे त्यांनी नागपूर विद्यापीठात एम.ए. मराठी व छत्तीसगड राज्यातील खैरागड विद्यापीठात संगीत विषयात एम.ए. ही पदवी मिळविली. एकत्र कुटुंब पध्दती, संगीताचे

वातावरण, सरंजामशाही थाटाचे नोकर चाकर असलेल्या घराण्यात त्यांचे बालपण गेले. गावचे देशमुख म्हणून नावाजलेला मोठा वाडा, ब्राह्मणी पध्दतीचे राहणीमान, सुशिक्षित असे कुटुंब,त्यामुळे त्यांचे बालपण खेळीमेळीचे, आनंदाचे व एकूणच सुसंस्कृत अशा घराण्यामध्येच गेलेले दिसून येते. मोठया घराण्यामुळे अनेक माणसे त्यांना अनुभवयास मिळाली. त्यांचे स्वभाव, आचार-विचार त्यांनी जवळून पाहिलेली दिसून येतात.

आशा बगे यांची जडण-घडण कीर्तन, संगीत व साहित्य इत्यादी घटकांमध्ये झालेली दिसते. तर त्यांचे राहणीमान अकोला, हिंगणघाट अशा गावांमधून घडत गेलेले आहे. त्यांची निष्ठा कला, साहित्य व अध्यात्म अशा त्रिवेणी संगमातून घडलेली दिसते. पण त्यांचे युग मात्र संपूर्ण बदलाच्या आधुनिकतेच्या उंबरठयावर उभे असलेले दिसते. म्हणूनच कदाचित त्यांचे मन हे 'स्वकेंद्री' न राहता समूहकेंद्रित असलेले दिसते. या प्रखर बदलामुळे वाटयाला आलेले अनुभवांचे अनेक पदरीकरण पेलतापेलता गावातील समूह मनाची जोड मिळवून असलेल्या आत्मभानाला जोपासताना संस्कृती सापेक्षतेला एका नव्या क्षितिजापाशी घेऊन जाण्याचे बल अंगीकारणारे असे आहे. म्हणूनच त्यांची प्रतिमा चढत्या क्रमाने कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी व कादंबरी अशा दीर्घ प्रवासात नवनव्या क्षितिजांचे भान राखू शकली आहे. जीवन समजून घेतानाच त्यांचे लेखन, चिंतन व काव्यात्मकता साहित्यातून दिसून येते. त्यांच्या साहित्यामध्ये भोवतालची माणसे रेखाटताना अत्याधुनिक कुशलतेने स्वतःच्या आंतरिक वास्तवाचे चित्रणही त्यांनी रेखाटलेले आहे.

मानवी जीवनातील वैविध्य आणि विशिष्ट व्यक्ती म्हणून विशेष अशा दोन्ही टोकांचा समन्वय त्यांच्या लेखनामध्ये असतो. त्यात विविध प्रतिमा लोक व्यवहार, अस्सल मराठी संस्कृती व विदर्भाच्या संस्कृतीचा, रंगही असतो. परंपरेनुसार समकालिनतेचा बाणा घेऊन नवीन संस्कृतीची निर्मिती झालेली दिसते. त्यात संगीतातील रागरागी त्यांच्या प्रतिमांची मिसळण दिसते.

व्हायोलीनसारखी वाद्ये तिथे पात्र बनून वापरतात ती अपुरी नसतात तर कलाकृतीच्या आशयाशी एकजीव झालेली दिसतात.

### १.७ आशा बगे यांचे साहित्य लेखन -

आशा बगे यांनी मराठी साहित्यात कथा, कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार लेखन करुन स्वतंत्र वाट चोखाळली आहे. त्यांच्या लेखनामध्ये संयमित शैली, कौटुंबिक प्रतिमाविश्व आणि अनुभवाची उत्कृष्टता ही त्यांच्या कथांची वैशिष्टये आहेत. तसेच चिंतनशीलता, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा हे त्यांच्या लेखनीचे बळ आहे. १९७२ मध्ये 'मारवा' ही त्यांची पहिली कथा नागपूर येथील 'तरुण भारत' च्या दिवाळी अंकातून प्रसिध्द झाली. तेंव्हापासून ते आजपर्यंतचे साहित्य पुढीलप्रमाणे :-

**कथासंग्रह -**

१) 'मारवा', मौज प्रकाशन, मुंबई, १९८४.
२) 'अत्तर', पिसारा प्रकाशन, अकोला, १९८३.
३) 'पूजा', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९.
४) 'मांडव', सन्स पब्लिकेशस हाऊस, पुणे, १९९३.
५) 'चंदन', ज्ञानदा पब्लिकेशन, पुणे, १९९४.
६) 'अनंत', ज्ञानदा पब्लिकेशन, पुणे, १९९४.
७) 'दर्पण', मौज प्रकाशन, मुंबई, १९९७.
८) 'निसटलेले', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९९९.
९) 'ऋतुवेगळे', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९९९.
१०) 'माझी कथा माझी निवड', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००१.
११) 'श्रावण सरी', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २००२.
१२) 'पाणी', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २००३.
१३) 'प्रतिद्वंदी', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००५.
१४) 'पाऊलवाटेवरले गाव', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००५.

**कादंबरी -**

१) 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे, १९७८.

२) 'झुंबर', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९९४.

३) 'त्रिदल', मौज प्रकाशन, मुंबई, १९९४.

४)'कुरक्षेत्रे' व 'धर्मक्षेत्रे', विजय प्रकाशन, नागपूर, १९९६.

५) 'सेतू', मौज प्रकाशन, मुंबई, २००२.

६) 'भूमी', मौज प्रकाशन, मुंबई, २००६.

७) 'भूमिका', आणि 'उत्सव', मौज प्रकाशन, मुंबई, २०११.

८) 'मुद्रा' मौज प्रकाशन, मुंबई, २०१५.

## १.८ आशा बगे यांच्या लेखनामागील प्रेरणा -

१९६० नंतरच्या मराठी कथेचा विचार करायचा झाला तर गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा.भावे, माडगूळकर, शांताराम मोकाशी यांच्या कथेच्या पुढच्या कथाकारांचा विचार करावा लागेल. विजया राजाध्यक्ष यांची कथा स्त्रीच्या समस्यांकडे, तिच्या दुःखाकडे खूप मोकळेपणाने बघते. स्त्रियांची अशी खास अनुभवसंपदा विजयाबाईंनी प्रभावीपणे व्यक्त केली आहे. एक बुध्दिमान व्यक्ती म्हणून स्त्रीला समजून घेतले. स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या सर्व त्रासांचे अत्यंत समर्पक व कलापूर्ण भान विजयाबाईंनी आपल्या कथेतून व्यक्त केलेले आहे. तारा वनारसे आत्मकेंद्रित स्वभावाच्या पात्रांची चित्रणे सातत्याने मांडतात. आपल्याच व्यथा पिंजत बसणाऱ्या प्रक्रियेतून वनारसे यांची कथा जन्म घेते. पद्मिनी बिनीवाले, कौटुंबिक जीवनातील घटनांचा तपशील अतिशय तरलपणे व्यक्त करतात, गौरी देशपांडे यांच्या कथेत आजच्या नव्या स्त्रियांची कथा आहे. भारतीय स्त्रियांना दुर्लभ असा वृत्तीचा मोकळेपणा, सांकेतिक संवेदना, विश्वाच्या विरुध्द सतत विद्रोह, मिस्किलपणा, खटयाळपणा, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्रपणा जपण्याचा सहजपणा इत्यादी त्यांच्या लेखनाची वैशिष्टये आहेत.

गौरी देशपांडे  यांच्या बरोबरीनेच लेखन करणाऱ्या या दशकातील सानिया हे नावही महत्त्वाचे आहे. सानिया यांनीही मानवी मनाचे परिस्थितीनिरपेक्ष असे एक स्वतंत्र जग मानले आहे व त्याचा शोध वेगवेगळ्या अंगांनी घेण्याचा त्या प्रयत्न करतात. एकटेपणामुळे प्रथम एक सूक्ष्म सॅडीझम त्यांच्या कथेतील पात्रात निर्माण होतात. त्यानंतर सानियाच्या कथांनी एक वेगळे वळण घेतलेले दिसते. आपल्या कथांतून त्या नव्या स्त्रीच्या व्यक्तित्त्व घडणीचा शोध समर्थपणे घेत आहेत. हा शोध त्यांनी अतिशय परखडपणे घेतलेला आहे.

१९७५ नंतरचा मराठी कथेचा काळ हा निरनिराळ्या प्रवाहांचा आहे. स्त्री मुक्ती वर्ष, दलित साहित्य चळवळ, ग्रामीण व शहरी प्रवाह इत्यादी अनेक प्रवाहातून कथेचा प्रवास सुरु झाला होता. या प्रवाहातील आशा बगे यांची कथा नवकथेचा साज घेऊन पण स्वतःच्या अशा मुखाची कथा घेऊन आलेली होती. नवकथाकार पु.भा. भावे यांच्या कथेचा प्रभाव आशा बगे यांच्या कथांवर स्वाभाविकपणे पडलेला आहे. मानवी मूल्यांवर अधिष्ठित अशी चिरंतन मूल्ये घेऊन आलेली भाव्यांची कथा बगेंच्या कथेजवळ जपणेही अपिरिहार्यच होते. पण बगे यांची पिढी ही भाव्यांच्या फार पुढची म्हणून तिच्यातील आधुनिकताही तितकीच नवी; पण 'मारवा' या कथा संग्रहात मारव्यात आलेल्या कथा या मानवी मूल्यांच्याच पण प्रत्येकाच्या आतल्या सूक्ष्म नात्यांची, आतल्या आत असलेल्या रक्ताच्या ओढीची आणि माणसांच्या एकमेकांत गुंतलेल्या अतूट बंधनाची बंदीषी घेऊन आलेल्या आहेत. भावात्मकतेने माणसाचे मन आपल्यापुढे उलगडत, जुन्या परंपरेशी नाते सांगत, शुचिर्भूत आणि मांगल्याला जपणाऱ्या, स्त्रीच्या मूल्यांविषयांवर प्रकाश टाकणाऱ्या कथा आहेत.

आशा बगे या आपल्या जीवनानुभवांना आपल्या कथालेखनाची प्रेरणा मानतात. त्या म्हणतात की, "माझ्या आजवरच्या जीवनाचा परिपाक म्हणजे माझं लेखन होय. आपल्या कथा विषयात लेखक स्वतःचा अविभाज्य अशा जीवन दृष्टीने गुंतलेला दिसतो. ज्या तऱ्हेने माझे आयुष्य प्रवाहित होत गेले तसे

नसते, तर माझे कथानुभव वेगळे असते व कदाचित त्या अनुभवांकडे बघण्याची दृष्टीही वेगळी राहते"[१] आशा बगे यांच्या कथेत विदर्भातील सरंजामशाही वातावरणाचे चिंतन दिसून येते. तसेच भारतीय पारंपरिकतेची जपवणूक करणाऱ्या कुटुंबाचा एक घटक असल्याकारणाने माहेरची माणसे, नोकर-चाकर व घराण्याची कीर्तन परंपरा यांमधून त्यांना मिळालेले अनुभव व त्यांना असणारी संगीताची जाण, या सर्वांभोवती त्यांच्या कथा फिरताना दिसतात.

"संगीताप्रमाणेच उत्तमोत्तम पुस्तकांच्या वाचनाने ही लेखनाची प्रेरणा मिळाली व रवींद्रनाथ टागोर, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखनाचा फार मोठा परिणाम आपल्या जीवनावर झाला."[२] असे आशा बगे म्हणतात. आशा बगे यांच्या कथांचे वैशिष्टय असे की कथा संपली तरी ती वाचकांच्या मनात सुरुच राहते. त्यांच्या कथांमधून स्वरझंकार सतत निनादत राहतो. कधी तो निरनिराळ्या पदांमधून, भुपाळयांमधून भेटेल, कधी दाट डहाळ्या डहाळ्या बाजूला करुन स्वरांनी निषाद गाठण्याच्या बुवंडच्या एरियात भेटेल. ही सुरांची सोबत अखंड असते. त्यामुळे कथांचा प्रवास मनोमय आणि अंतर्मुख करण्यास मदत होते.

मराठीतील गंगाधर गाडगीळ, विजया राजाध्यक्ष, दि.बा. मोकाशी आणि शरदचंद्र चिरमुले यांनी सूक्ष्मतला सूक्ष्मभाव कथांतून व्यक्त केला आणि त्यांचे संस्कार माझ्या वाचानावर झाले आहे. असे त्या नमूद करताना आशा बगे म्हणतात, ‘‘गाडगीळ-गोखल्यांच्या कथांतील अनुभवांची क्षमता आणि लहानशा अनुभवावर आकाश तोलून धरुन माणसाच्या मनाचा तळ शोधण्याचे लक्ष हे माझ्यात कायम राहिले. एवढयापुरती मी त्यांची वाट स्वीकारली. पूर्णपणे माझा मार्ग स्वतंत्र नाही. या नवकथांनीच मला वाट दिलेली आहे’’[३] अशा प्रकारच्या अनेक प्रेरणा असल्याचे लेखिका सांगतात.

## १.९ आशा बगे यांना प्राप्त झालेले पुरस्कार -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १९८८ | - | 'मारवा' कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, तसेच मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा दि.बा. मोकाशी पुरस्कार. |
| २. | १९९१ | - | मराठी कथेच्या शतकोत्सवानिमित्त आयोजित विदर्भ लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद. |
| ३. | १९९२ | - | दिल्लीच्या कथा संस्थेचा 'तुफान' कथेस पुरस्कार आणि १९९६ 'पंख' या कथेस पुरस्कार. |
| ४. | १९९४ | - | 'त्रिदल' कादंबरीस विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार. |
| ५. | १९९७ | - | 'पत्र' कथेस शांताराम कथा पुरस्कार. |
| ६. | २००० | - | 'दर्पण' संग्रहास महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड यांचा सु.ल.गद्रे मातोश्री पुरस्कार आणि कोणवळे पुरस्कार. |
| ७. | २००० | - | 'सेतू' कादंबरीस मृण्मयी पुरस्कार आणि आपटे वाचन मंदिर इचलकरंजी यांचा पुरस्कार. |
| ८. | २००१ | - | साहित्यातील योगदानासाठी मेहता पब्लिकेशन हाऊस तर्फे कमलाबाई ओगले पुरस्कार. |
| ९. | २००६ | - | 'भूमी' कादंबरीस साहित्य अकादमी पुरस्कार. |

## १.१० आशा बगे यांचे वाङ्मय कथासंग्रह -

सन १९६० नंतरच्या काळात सामाजिक वास्तवाचे भान जागे झाले. नवनवीन नीतीकल्पना पुढे आल्या. भाषिक प्रयोग झाले. नवसाहित्य जन्माला आले. लेखिकेच्या लेखनातही या गोष्टींचे प्रतिबिंब जाणवू लागले. ज्या नवीन प्रवृत्ती साहित्यक्षेत्रात डोकावू लागल्या, त्याकडेही या कालखंडातील लेखकांनी आपले लक्ष वेधले. १९७५ साली झालेली स्त्री मुक्ती चळवळ व त्यानंतर निर्माण झालेली स्त्रीवादी साहित्याचा आढावा आशा बगे यांच्या कथा-कादंबऱ्यातून आसपासच्या व्यक्ती तत्त्वानुरुप केलेले चित्रण सामर्थ्य व विविध अनुभूतींची वैशिष्टय आपल्या लेखनातून उभे केलेले आहे. स्त्री साहित्याचा

विचार करताना केवळ 'स्त्री संस्कृती निष्ठा विचार' याबद्दल मंगला वरखेडे म्हणतात, "आजपर्यंत इतिहासलेखनात व इतिहासाचा अभ्यास हा बहुतांशी पुरुष इतिहासकारांकडून झालेला असल्याने पुरुषप्रधान दृष्टिकोनातूनच संस्कृतीचा इतिहास मांडण्यात आला आहे. स्वतंत्रपणे स्त्रीच्या सांस्कृतिक विश्वाचा इतिहास पाहण्याचा प्रयत्न कधीच झालेला नाही. यामुळे 'स्त्री संस्कृती' या शब्दांचा अर्थ अजूनही लावला गेलेला नाही. स्त्रीवादी समीक्षेपुढे हे एक मोठे आव्हान क्षेत्र उभे आहे."[४]

आशा बगे यांच्या कथांमधील परिस्थितीशरण स्त्रियांची नोंद घेऊन सुलभा हेर्लेकर म्हणतात की, "काळ बदलला किंवा परिस्थिती बदलली तरी स्त्रीयांच्या दुःखाला पर्याय नाही. असाचा भाव त्यांच्या कथांमधून व्यक्त होत राहतो. स्त्री मनाचा कोंडमारा चित्रित करताना परिस्थितीनुरुप 'सवय करणे', सवय होणे असा एक मध्यमवर्गीय स्त्री जीवनाचा आलेख आशा बगे मांडताना दिसतात."[५] सवयीने सारे जमणे, तडजोड स्वीकारणे, असा वारंवार उल्लेख त्यांच्या कथांमधून येतो. असे असले तरी आधुनिक जीवन जाणिवांचा स्पर्श होत असतानाच बदलत्या समाज वास्तवातील कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भाव व बदलत्या मूल्यांची जाणीवही त्यांच्या 'स्त्री' पात्रांजवळ दिसून येते. ही जाणीव जपण्यासाठी, आपले अस्तित्व जगण्यासाठी त्या बंडखोरी जरी करीत नाहीत तरी रुढ नीति नियमांच्या विरोधात जाण्याची एका सीमेपर्यंत त्यांची तयारी असते.

कथा हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय आहे. अगदी जुन्या काळापासून पाहिले तर कथा हा सर्वात प्राचीन प्रकार मानला गेला आहे. वेगवेगळ्या काळी वाङ्मयाच्या या प्रकाराने वेगवेगळे रुप घेतले, वेगवेगळे मंत्र जोपासले पण त्यांचा गाभा मात्र तोच राहिला, कथेच्या घटकांनी वेगवेगळे रुप घेतले. पण कथन हा आशयाचा आणि तंत्राचाही मुख्य भाग कायम राहिला आणि मानवी जीवनाशी या ना त्या प्रकारे नाते सांगणारी कथा फुलत राहिली. कधी तिचा

विकास झाला, तिचे रुप प्रगल्भ झाले, तर तिचा प्रवाह थबकला. तिच्या रुपात, प्रगटनात एक प्रकारची कोंडी निर्माण झाली; पण या साऱ्यातूनही 'कथा' जिवंत व समृध्द होत राहिली.

कथेचे वैशिष्टय म्हणजे कोणत्याही विषयावर कथा लिहिता येते. ती पात्रहीन, संवादहीन असू शकते. केवळ व्यक्तिचित्रणात्मक व केवळ संवादात्मकही असू शकते. एकही घटना नसलेली वा वेगवान घटनांनी खच्चून भरलेली अशीही कथा असते. त्यामुळे कथेला विशिष्ट शब्दांत बांधणे किंवा तिची व्याख्या करणे सोपे नाही.

१) जॉन हॅडफील्डच्या मते, "फार दीर्घ नसलेली गोष्ट म्हणजे कथा."[६] (A Story is no too long)
२) एच.जी. वेल्स यांच्या मते, "अर्ध्या तासात वाचून संपेल असे कसलेही गद्य साहित्य म्हणजे कथा होय."[७]
३) चेकॉव्हच्या मते, "कथेला सुरुवात व शेवट नसावा आणि एकही अनावश्यक गोष्ट कथेत येता कामा नये. कथेच्या सुरुवातीला तर भिंतीवर लटकत असलेल्या बंदुकीचे वर्णन लेखकाने केले असेल, तर कथेत ती बंदूक चालविली गेलीच पाहिजे."[८]
४) पो. यांच्या मते, "कथेत वापरली जाणारी सर्व साधने व योजिलेल्या क्लृप्त्या वाचकांच्या कानावर एकच परिणाम करणाऱ्या असाव्यात म्हणजेच कथेत वापरला जाणारा एकही शब्द असा नसावा, की ज्यामुळे या पूर्वनिर्धारित संस्काराला बाधा येईल."[९] यावरुन असे लक्षात येते की अनेक वर्ष उलटली असली तरी नेमकी व्याख्या करणे शक्य झालेली नाही.काही अभ्यासकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला तरी त्या निर्णायक किंवा परिपूर्ण ठरलेल्या नाही कथेच्या विषयाला मर्यादा नाही. पूर्णता भावनाविरहित आणि वस्तुनिष्ठ अशा सामाजिक मनाचे चित्रण करणा-या कथा होय.

सामाजिक व्यवस्था आणि स्त्रीच्या व्यक्तित्त्वाच्या समस्या यातील संघर्ष स्त्री लेखिका घडवतात. स्त्रीवादी भूमिका घेऊन या लेखिका लिहीत नसल्या

तरी स्त्री मुक्तीच्या चळवळीमुळे स्त्रियांची कथा समाजाभिमुख होऊ लागली आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार आधुनिक असला तरी त्याचा उगम हा कथेतून झाला आहे. जीवनातील अद्‌भुत गोष्टींचे आकर्षण आणि आदर्शाचे मानवी मनाला असणारे वेड यातूनच कादंबरीची वाटचाल झालेली आहे. सुरुवातीला निसर्गविषयक आलेले आश्चर्यकारक अनुभव सांगण्यासाठी कथेचा जन्म झाला आणि पुढे यातूनच कादंबरी जन्माला आली. भारतीय कथांविषयी बोलताना कुसुमावती देशपांडे म्हणतात, "भारतीय कथा एका लोक समूहापासून दुसऱ्या लोक समूहाकडे इतक्या लवकर भटकत गेल्या, की आपणाला युरोप आणि आशिया खंडातील बहुतेक सर्व प्रदेशांतून इतकेच नव्हेतर आफ्रिकन लोकांनाही त्या अंशरुपाने आढळतात."[१०] यातून अनेक कथांचे प्रवाह निर्माण झालेले दिसतात.

### १.१०.१ 'मारवा' (१९८४)-

आशा बगे यांचा पहिला कथासंग्रह 'मारवा' (१९८४) साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील अनेक कथांमधून लेखिका आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविते. वास्तविक, लेखिका ज्या वैदर्भीय संस्कृतीत वाढलेली आहे, त्या संस्कृतीचे संस्कार लेखिकेवर झालेले असल्यामुळे त्या संस्कृतीविषयी एक ओढ लेखिकेच्या मनातून प्रगट होताना दिसते. कुठल्याही साहित्यकृतीचा अभ्यास करताना त्या साहित्यकृतीच्या निर्मात्याचे लौकिक व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लक्षात घेणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. कारण वाङ्मयकृतीच्या निर्मितीप्रक्रियेत कलावंताच्या व्यक्तित्वाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. कलावंतांचे जीवनानुभव आणि कलावंताचे व्यक्तिमत्त्व यांच्या द्वंद्वात्मक संबंधातून कलाकृतीची निर्मिती होत असते. यासंदर्भात स.त्र्यं.कुल्ली म्हणतात, "लौकिकामधून बाहेर पडताना बिनरंगी असलेले सूर्यकिरण रंगीबेरंगी होऊन बाहेर पडतात. त्याप्रमाणे लौकिक आयुष्यातील जीवनानुभवांचे किरण कलावंताच्या व्यक्तित्वाच्या प्रीझममधून बाहेर पडताना कलात्मकतेचे रंग घेऊन

बाहेर पडतात. "[११] आशा बगे यांनी विदर्भाच्या मातीतच आपले जास्तीत जास्त जीवन व्यतीत केलेले आहे. विदर्भातच या लेखिकेची स्थूल-सूक्ष्म जडणघडण झाली आहे. त्यामुळे त्या विशिष्ट भागाचा प्रभाव त्यांच्या लेखनावर जाणवतो.

आशा बगे आपल्या कथांमधून परंपरेशी जोडून असलेल्या माणसांच्या मनाचा शोध घेतात. परंपरेवर, संस्कृतीवर असलेली गाढ श्रध्दाच त्यातून दिसते. मध्यमवर्गीय कुटुंबाच्या संस्कृतीतील सण-उत्सव, व्रत-वैकल्ये यांच्याशी त्यांचे जवळचे नाते असणारे हे त्यांचे कथाविश्व आहे. आशा बगे यांच्या कथाविषयी बोलताना अविनाश सहस्त्रबुध्दे म्हणतात, "बगेंच्या कथेतील बहुतेक स्त्रियांची जडणघडण ही जुन्या व आज लोप पावत चाललेल्या संस्कृतीच्या, सद्‌भावनेच्या, नैतिक मूल्यांच्या स्पर्शातून आलेली आहे."[१२] परंपरेचा धागा जोडून त्यातून घडलेला माणूस त्यांच्या मनातले, भावनांचे, वेगवेगळे स्तर त्या दाखवितात.

'पूजा' कथासंग्रहाच्या शीर्षकालाच एक ब्राह्मणी संस्कृतीचा, वृत्तीचा स्पर्श चिकटलेला आहे. पारंपरिक ब्राह्मणाला सांभाळत, हळूवारपणे त्याचे एकेक पदर उलगडणाऱ्या या कथा वरपांगी ब्राह्मणी थाटाच्या वाटत असल्या तरी माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीशी जे अनाकलनीय नाते या ब्राह्मण्यांशी जडले आहे ते आणि ही प्रवृत्ती सर्वकालीन, सर्वठायी आहे. जुन्या अवशेषांना धरुन नवीन जाणिवा निर्माण करण्याचे एक तंत्र आशा बगे यांच्या कथेतून जाणवते. कथेतील काही स्त्रिया या संस्कृतीला धरुन चालणाऱ्या आहेत. तर काही ठिकाणी या परंपरा मोडीत काढून नव्याचा स्वीकार करतानाही त्यांची पात्रे दिसतात. उदा. या संदर्भात रुक्मिणी' या कथेत समृध्द आणि पारंपरिक सांस्कृतिक मूल्य जतन करणाऱ्या इनामदार ब्राह्मण घरात आश्रित म्हणून राहिलेल्या कीर्तनकाराची आई वेगळी, मुलगी रेणू हिच्या मनात कृष्ण-रुक्मिणीच्या कीर्तनाख्या ते एक वेगळेच घर निर्माण करतात. या व्याख्यानातून तिला जीवनाचा एक नवीन अर्थ मांडायचा आहे. आशा बगे यांनी कृष्ण-

रुक्मिणीच्या मिथकातून संस्कृतीचे जतन करत असतांनाच एका नवीन सांस्कृतिक मूल्याची उभारणीही केली आहे. परंपरेतून एक प्रकारची आधुनिकता शोधण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. "सासरी काही बोलू नये. मुलींना नाहीतर रुजता येत नाही."[१३] आजीच्या या वाक्यातून भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब या ठिकाणी उमटविले आहे. पण अशाच प्रश्नांचा शोध आशा बगेंनी कथेतून मांडलेला आहे.

'मारवा' या कथासंग्रहात एकूण तेरा कथा आहेत. 'मारवा' व रंग' या दोन कथा संगीत विषय व त्या दरम्यान सांभाळत गेलेले नातेसंबंध यांच्याविषयी आहेत. यामध्ये नव्या व जुन्या पिढीतील सूक्ष्म संघर्ष रघुनाथ व आबा यांच्या पत्राद्वारे आपल्यासमोर येतो. पण तो संगीत व कीर्तनाच्या माध्यमातून वाचकांपुढे साकार होतो. किंवा अपघातात सापडलेल्यांची तडफड व त्यांची सर्व सेवा सतत करत असणाऱ्या पत्नीचे दु:ख हे 'रंग' सारख्या कथेतून दाखविले आहे. येथेही पार्श्वभूमीला संगीत हाच विषय आहे. त्यामुळे लेखिकेचे संगीतविषयक ज्ञान हे देखील त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

आशा बगे कथाकर म्हणून समोर आल्या त्या 'मारवा' या कथासंग्रहामुळे विशेषतः त्यातील 'रुक्मिणी' या कथेमुळे! प्रसिध्द समीक्षक धों.वि.देशपांडे एका खाजगी बैठकीत कथेवर बोलताना म्हणाले होते की, "आशा बगे यांनी 'रुक्मिणी' ही एकच कथा लिहिली असली तरी त्यांचे नाव कथा वाङ्मयात अमर झाले असते."[१४] 'रुक्मिणी' ही कथा नायिकाप्रधान आहे. या कथेत भटजीची मुलगी (रेणू) तिला आपण सतत आश्रित आहोत ही भावना डाचत असते व ही भावना घेऊनच तिची वाढ होत राहील. 'रुक्मिणी' या कथेत अनेक पदरी आशय आणि त्याची अतिशय कलात्मक अभिव्यक्ती ही या कथेची वैशिष्टये आहेत. वेगवेगळ्या व्यक्तिरेखा आणि त्यांची परस्पर गुंतागुंत हा कथेचा कणा आहे. स्त्रीला स्वतःच्या परिसराची आणि 'स्व' ची होऊ पाहणारी जाण व या प्रक्रियेत उमटत जाणारे तिचे व्यक्त व अव्यक्त पैलू हा या कथेचा

गाभा आहे. जणू हे या कथेतले मध्यवर्ती पात्र! 'गोपींनी श्रीकृष्णाभोवती फेर धरावा' त्याप्रमाणे इतर पात्रांची रेणूभोवती फेर घातला आहे. शिवाय श्रीकृष्ण हे प्रतीकही या कथेत आहे.

मनाचे सूक्ष्मातिसूक्ष्म व्यापार लेखिकेच्या मनाला स्वरांच्या लयीसारखे मोहवीत असतात. माणसा माणसांमध्ये गुंतागुंतीचे नाते एवढेच नव्हे, तर माणसाचे स्वतःचेच स्वतःशी असलेले अनेकपदरी, अनेक स्तरीय नाते लेखिका आपल्या कथेतून व्यक्त करते. अलीकडच्या काही लेखकांच्या कथातून मानवी मनाचे परस्पर नाते विचित्रपणे फक्त संदर्भावरच रचलेले दिसते. ते प्रश्नांकित? घेऊन उलगडण्याची प्रक्रिया आशा बगे यांची कथा करते. प्रसंग, घटना, कथात्मक यापलीकडे जाऊन या सर्वात सापडलेले विचित्र मनच त्यांना खुलावत राहते म्हणून त्यांची कथा ही फार पारदर्शक होते. उदा. 'मारव्या'तील 'रंग' स्वीकारलेली ही अंतर्गत सौंदर्याची वेगळी वाट सामान्य वाचकांपर्यंत पोहचूही शकणार नाही. बगे यांनी मैफिलीतल्या सुरांचे सौंदर्य जसे उलगडून दाखविले तसे आभाळ, झाडावरील पक्षांचा थवा, समुद्र या निसर्ग प्रसिध्दीनेही आकृष्ट केले. माणसातला माणूस जिथे सुरु होतो तिथे ही कथा वेगवान होताना दिसते.

'घरटं', 'बेईमान', 'जन्म', 'डोळे', 'नात' या कथांची जात ही वेगळीच आहे. त्यांच्या या कथांमध्ये घटनांवर भर नाही. घटनांपेक्षा त्या घटनांमुळे अंदोलित झालेली मनेच त्यांच्या कथेमुळे प्रकट होताना दिसतात. उदा. 'नातं' या कथेत, "दर्शनाची बायको जळणे, एवढीच काय ती घटना पण तिने निर्माण केलेली अर्धाची वर्तळे अनेक 'माणूस काल असतो आज नसतो. तरी मधल्या तपशिलात केवढा गुंततो."[१५] या जगण्या-मरण्याच्या सीमारेषेत गुरफटलेली ही कथा मनानेच सूक्ष्म पापुद्रे सोलून दाखवते. तर 'डोळे' यात डोळयांच्या डोळयांच्या विविध तऱ्हात गुरफटलेली 'ती' मुलांच्या जन्मापर्यंत त्या डोळयांच्या बुबुळातच तरंगत जाते नि त्याच्या जन्मानंतरच श्वास सोडते.

'बेईमान'मध्ये झुळझुळत्या पाण्यामध्ये गेलेला एका स्त्रीचा देह तर 'पांगळी'मध्ये गुरुशिष्याच्या नात्याला दिलेली वेगळी कलाटणी. 'मैत्रिणी'मधील शेजारणीचे नाते, 'कोवळी उन्हं'मधील तान्हया मुलाचे जन्मतः जाणे, असे कितीतरी विषय आशा बगे यांनी चित्रित केलेले आहे.

'घरटं' ही कथा एका स्त्रीची आहे. चिमणीच्या घरटे घालण्याच्या क्रियेने अंडी घालण्याने ती हळवी होते. खरे तर घरात फार केर होतो म्हणून ती जे घरटे काढून टाकणार होती, पण त्यात अंडी आहेत म्हटल्यावर मात्र ती गलबलून जाते. पुन्हा एक स्त्री दुसऱ्या स्त्रीजातीची काळजी घेते. मग ती चिमणी का असेना तिला तिच्याबद्दल सहानुभूती, कणव वाटू लागते व हाच विषय तिला पुरतो. परंतु तिच्या नवऱ्याला मात्र तिच्या या वागण्याचा अर्थ लागत नाही. या घटनेच्या बरोबरच नायकाच्या मित्राच्या आयुष्याबद्दलही लेखिका भाष्य करते. त्याने लग्न केलेले नव्हते पण आता चाळिशीनंतर चार भिंती, नाती, एक घरटे असावेच असे त्यालाही वाटू लागते. 'वर्तुळ' या कथेत जर उद्योग अधिकारी आणि त्यांचे आक्रमण होते, तेंव्हा स्त्रीच्या मनाची व्यथा, कोमल व संवेदनशील मनाची उलघाल लेखिका हळूहळू विकसित करताना दिसत आहे.

कसदार विषय, कसदार प्रसंग, अर्थगर्भ प्रतीकात्मक भाषा आणि विरोधालय अशी सारी सामग्री घेऊन त्यांच्या अनेक कथा साध्या विषयाला स्पर्श करुन जातात. उदा. "एरव्ही त्या सावळ्या विठोबाला डोळ्यांत साठवताच आबांची मंत्रपुष्पांजली चढायची पण आज रस निघून गेलेल्या उसासारखे ते चिपाड झालेख."[१६] किंवा "वाळवंट जिथे स्वतःच्या कर्माची पावलं उमटत नाहीत, असं निर्विकरुप ठिकाण."[१७] किंवा "मरणाच असलं सावळ सुंदर रुप कुठल्यातरी निर्णायक क्षणी माणूस जपत असेलही."[१८] अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

'मारवा' हा पहिलाच कथासंग्रह मानाचा तुरा घेऊन पुढे आलेला आहे. आशा बगे यांनी स्वतःच्या ठोस अस्तित्वानुसार साकार केल्या तर

मनोविश्लेषणात्मक अनेकपदरी अनुभवांची जाण असलेली कथा मानवी मूल्यानेच पण प्रत्येकाच्या आतल्या सूक्ष्म नात्यांची, रक्ताच्या नात्यांची, ओढीची आणि माणसाच्या मनामध्ये गुंतलेल्या अतुट बंधनाची बंदी होऊन अनेक कथा आलेल्या आहेत. व्यक्ती जीवनाच्या तळाशी आलेल्या दुःख सागराला आवाक्यात घेण्याचा प्रयत्न आशा बगे यांनी आपल्या कथांत केलेला आहे.

### १.१०.२ 'अत्तर' (१९८५) -

आशा बगे यांचा 'अत्तर' हा दुसरा कथासंग्रह आहे. यात एकूण सात दीर्घ कथा आहेत. 'अत्तर' कथा संग्रहातील कथा या अनुभवाच्या रंग, रस, गंध, कला स्वीकारणाऱ्या कथा आहेत. अन्य भारतीय भाषेमध्ये अनुवाद करण्यासाठी ज्ञानपिठाने निवडलेली आहे याच संग्रहातील 'महावस्त्र' ही कथा आहे. त्यातील नायिका लेखिकेने स्वतः अनुभवलेल्या आहेत. 'महावस्त्र' या कथेत वेगळीच घरंदाज श्रीमंत देशपांडे कुटुंब पंचवीस माणसांना पोसणारे असे असते. काळाबरोबर तो वाडा पांगतो, मुले पांगतात व काही आपापले बंगले बांधतात, नवी पिढी येते. पण त्या वाड्याशी सुख-दुःख बांधलेला, स्वतःचा संसार न करणारा त्यातच म्हातारा होणारा स्वयंपाकी-मोरेश्वर अय्यांचे आयुष्यही रिकामं होऊन जातं. आता आमचे काय उरले? देवघरात ठेव खुंटीवर ठेवलेली धापली नि आम्ही सारखेच हे त्यांच्या शब्दापासून जाणवते. छोट्या छोट्या गोष्टीतून हा मोरेश्वर आपल्या मनात मानवी संबंधाचं वस्त्र विणत जातो.

‘बंदिशाळा’ मधील अनूचे जगणे सद्यःस्थितीत जगणाऱ्या 'स्त्री'च्या मनाचे, तिच्यातल्या माणसाचे मन लेखिकेने उलगडून दाखविले आहे. परिस्थितीमुळे स्त्रीला कसे अगतीक होऊन शरण जावे लागते हे यातून दिसते. 'अत्तर' सारख्या कथेमधून गावातील प्रस्थ असलेल्या रावसाहेबांचे वर्चस्व व त्यांचा हळूहळू होत जाणारा ऱ्हास जाणवत राहतो. 'नर्सिंग होम' या कथेमधून बालहत्येचा प्रश्न आलेला दिसतो. 'निवडुंग' या कथेत गायत्रीच्या व्यक्ति

चित्रणातून एका गरीब पण धैर्यवान स्त्रीचे रुप साकार केलेले आहे. 'महावस्त्र' या कथेतून म्हातारा स्वयंपाकी मोरेश्वर भैय्याची शोकांतिका मांडलेली दिसते. 'झोपाळ्यावर अभंग कातर'मधील अप्पा घरातल्या बारीकसारीक गोष्टींची काळजी करताना दिसतात. पद्माला त्यांच्या सुनेला अडसर वाटतो. पण ते चार दिवस मोठया मुलाकडे जातात. तिला अप्पांच्या अस्तित्त्वाचे, त्यांच्या सोबतीचे महत्त्व लक्षात येते.

'बंदिशाळा' मधील अनूच्या घरासमोरील शिल्पा आणि अनूची बालविद्या आत्या, वेणू या तिघीही भिन्न परिस्थितीतल्या आहेत; पण त्यांचा कोंडमारा एका जातीचा आहे. तो 'स्त्री' असण्याचा शेवटी परिस्थितीनुरुप सवय करणे, परिस्थितीला शरण जाणे, तसेच काळ बदलत असूनही स्त्रीच्या दुःखाला पर्याय नाही हेच 'बंदिशाळा'तून जाणवत राहते. वास्तविक, शेवटी एकटी राहण्याचे, हिंमतीचे सर्व पैलू असतानाही माहेरचे, सभोवतीचे जग तिला तिच्या बंडखोरीचा निर्णय घेऊ देत नाही. तिच्या मनाला पांगळेपणा आणण्यात सासर इतकेच माहेरचे लोकही जबाबदार असतात. उदा. "कधी वेणू आत्या अगदी भरल्या गर्दीत माणूस एकटा असतो, पण अगदी एकटेपणातही मात्र स्वतःचीच सोबत सापडून जात नाही."[१९] अनूचे हे उद्‌गार त्याला जाणत असलेले दुःख व्यक्त करतात, तर "अग बाई, माणूस का असा कधी एकटा स्वतंत्र थोडा असेल. माणूस पुरता सगळ्या बाजूंनी बांधला असतो अनू."[२०] हे आईचे उद्‌गार अनूच्या मनाविरुध्द तिला येऊन भिडतात आणि तिच्या निर्णयाचेच पीठ होऊन जाते. शेवटी बंदिशाळेचाच विजय होतो.

'नर्सिंग होम'मध्ये विज्ञानाच्या संदर्भात स्त्रीच्या दुःखाला वेगळे रुप प्राप्त झालेले आहे. मुलगा की मुलगी हे वैद्यकीय परीक्षणामुळे आधीच माहिती झाल्यावर मुलगी असेल तर ती नकोच. पुढे तिच्या माथी येणारा छळ नको, असा हा दुःखाचा धागा आहे. लेखिकेने अतिशय हळूवारपणे हा धागा कथेतून विणत नेला आहे. सेवाभावी निष्णात डॉक्टर ही आपल्या पेशंटमध्ये गुंतलेली

असते. राघवचे तिच्यावर प्रेम; पण तिला लग्नात बांधून घ्यावेसे वाटत नाही. ती म्हणते, "लग्न झाल्यावर आपलं हक्कांच आयुष्य नसतं. ते आपलं आपल्यालाच परकं अनोळखी होऊन जात."[२१] डॉ. राघवला नकार देत शेवटी त्याची होणं हेच खरे आपल्यासमोर उत्तर आहे हे कळून यायला अनेक अनुभवातून जावे लागेल.आशा बगे यांच्या कथेतील नायिका सौम्य प्रकृतीच्या,नवीन जाणिवेच्या व आत्मभान असलेल्या पण त्याची मुक्तीच्या अवास्तव कल्पनांनी प्रभावित  झालेल्या नसतात.

'निवडुंग' या कथेत गायत्रीच्या रुपाने एक धैर्यवान स्त्री, तिच्या दुःखाच्या पारंपरिक छटा आणि त्या दुःखांचही एक लोभसवाने रुप लेखिकेने उभे केले आहे. "बायकांची जातच निवडुंगाची. कुठेही, कशीही रुतून जाते."[२२] असा गायत्रीच्या जगण्याचे रोप या कथेत आलेले आहे. गायत्री निराधार आहे. वाऱ्यावर पडलेली म्हणून गावच्या जहागिरदाराकडे आणून टाकलेली ती परिस्थितीशरण आहे पण मानी आहे.

'अत्तर' या कथासंग्रहामध्ये पारंपरिकतेवर श्रध्दा ठेऊन लिहिलेल्या कथा आहेत. भारतीय परंपरेचे एक ताजे, स्वच्छ, निखल रुप त्यांच्या कथात सामावले आहे. मारव्याच्या पुढचा टप्पा म्हणून या दीर्घकथा एका प्रगतीच्या वळणावर अधिक अंतर्मुख झाल्या आहेत.

### १.१०.३ 'पूजा' (१९८९) -

'पूजा' हा दीर्घ कथासंग्रह आहे. यातील दीर्घकथेमध्ये धर्म आणि आविष्कार एकच आहे. स्त्रीच्या दुःखाच्या व्यथेच्या परिणामाभोवतीच्या स्त्रीला केंद्रित मानून तिचे अनेकांशी असलेल्या अनेकपदरी  नात्याच्या हया कथा आहेत. सुरांच्या, रंगांच्या माध्यमातून आलेल्या या कथा मानवी मनाच्या सूक्ष्मतर पातळीला स्पर्श करणाऱ्या आहेत. 'पूजा' कथेमध्ये ब्राह्मण कुटुंबातील रीतिरिवाज, नातीगोती  दर्शविणाऱ्या मानवी स्वभावाच्या एका निरनिराळयाच परिणामाला छेदून जाणाऱ्या कथा आहेत. दादासाहेब जुन्या पिढीतले तर

ललिता नवीन पिढीतली. वयामुळे पूजा होईनाशी झाल्यावर ब्राह्मण ठेवणे प्राप्तच होते, "सध्याच्या धावपळीच्या आत्ममग्न दिवसात देवाला स्वतंत्र खोली आणि सेवेला स्वतंत्र माणूस हेच खूप झाले."[२३] असं त्यांना वाटायंच, कधीतरी पूजा करण्याची वेळ आलीच तर देवाला अंघोळ घालताना त्यांना वाटायचं, देवाची अंघोळ झालेल्या या पाण्यासारखं तरी आपलं आयुष्य असावं एकदम स्फटिकासारखं निर्मळ पण ते आपल्या वाटयाला येणार नाही, ही तडजोडीची वृत्ती भूमिका लेखिकेने मांडलेली आहे.

'अत्तर' या संग्रहातील  कथेचे वातावरण पूर्णपणे सरंजामशाही आहे. असे वातावरण त्यांच्या अनेक कथांतून येते. 'अत्तर' मधील रावसाहेब हे जणू आज्ञा करण्यासाठीच जन्माला आले आहेत, असे वाटते. अगदी पडत्या काळातही रंगनाथकडे मोठी रक्कम मागतानाही त्यांच्यातला उपजत रावसाहेब ताठ असतो. 'निवडुंग'मध्येही अशाच एका खानदानी कुटुंबात अनाथ गायत्री आश्रित म्हणून येते. तर 'महावस्त्र' या कथेत स्वयंपाकी मोरेश्वरही जन्मभर ज्या कुटुंबाच्या आश्रयाने राहतो. ते कुटुंबही सुखवस्तू आहे 'दर्पण'मधील सरुबाई 'स्वामी' मधील सुभान, 'पूजा' मधील बाळकृष्ण पुजारी हे सर्व श्रीमंत कुटुंबात आश्रित म्हणूनच जीवन जगतात.

आशा बगे यांच्या कथेतील या सरंजामशाही वातावरणाबद्दल बोलतांना तारा भवाळकर म्हणतात, "आशा बगे यांच्या कथेत जमीनदारी वातावरणातील चित्रणे वैशिष्टयपूर्ण ठरतात. या वातावरणातील वेगळे सामर्थ्य टिपण्याचा त्या प्रयत्न करतात. घरातील 'कर्त्या' माणसांचा करारीपणा, त्यांची जबाबदारीची जाणीव, आत ओलावा असला तरी बाहेरुन कोरडेपणा दाखवण्यातच असलेली प्रतिष्ठा हे सगळे एकीकडे आहे. दुसरीकडे त्या कुटुंबातील अन्य घटकांचे अस्तित्व गृहीत धरलेले असते. अन्य व्यक्तींना स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व असे फारसे नसते."[२४]

'अपूर्ण' ही एका कलावंत स्त्रीच्या मनाची उलघाल, तडफड व्यक्त करणारी कथा आहे. अंगणात चाफ्याच्या झाडाला फूल लागत नाही, पानसुध्दा वर अगदी टोकाला, अशा या ओक्या बोक्या झाडाकडे पाहून नायिकेला पूर्वीच्या बहरलेला चाफा आठवतो. ते चित्र तिला तिच्या पेंटिंगमध्ये आणता यायला हवं आहे. जे मनात आहे ते या रंगातून, ब्रशाच्या रेषांतून आपण दुसऱ्यापर्यंत पोहचू शकत नाही ही तिची खंत आहे. या अपूर्ण कथेत लेखिकेने जगण्याची मूल्ये मांडलेली आहेत.

'चित्तारओळ' या कथेतही अवती भोवती चाललेल्या लौकिक जगातले व्यवहार अलौकिक असलेल्या जगाला पहावेसे वाटत असूनही सदाशिवला वंशपरंपरेने चालत आलेला मूर्ती बनविण्याचाच व्यवसाय पत्करावा लागतो. हे सत्य अचूकपणे टिपले गेले आहे. 'सायंकाळ' या कथेमध्ये शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणींना कशा प्रकारे तोंड द्यावे लागते व ते करीत असताना काय सोसावे लागते याचे चित्रण या कथेतून आलेले आहे.

'पूर' आणि 'खडक' या कथा वेगवेगळ्याच भावविश्वातल्या आहेत. 'खडक' ही कथा तर सध्याच्या 'टयुशन क्लासेस' वर बनलेली कथा आहे. विद्यार्थ्यांच्या अहंकारामुळे गोखले सरांची जी मनाची होरपळ होते, ती तो अहंकाराचा खडक पाझरल्यावरच समजते. सहज जगण्याच्या प्रक्रियेतली आणि स्पर्धेच्या युगातली ही कथा आहे.'पूर' कथेमध्येही दोन मनांची स्पंदने चित्रित केलेली दिसून येतात. 'पूजा' हा कथासंग्रह पूर्णपणे सनातनी, ब्राह्मणी वास असलेल्या कथांचा संग्रह असूनही, त्यातही ग्रामीण, दलित कथेच्या वास्तव चित्रणाच्या प्रवाही कथांचा काळ असूनही तंत्र आणि मानवी मनाच्या संदर्भावर आधारलेल्या आहेत.

### १.१०.४ 'मांडव' (१९९३) -

'मांडव' या कथासंग्रहामध्ये लेखिकेने स्त्रीची वैवाहिक जीवनातील दुरवस्था मांडलेली आहे. पुरुषप्रधान पध्दतीमध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे

चित्र 'मांडव' या कथेत येते. लग्नात स्त्रियांच्या जीवनाची होणारी होरपळ संसाराच्या चक्रात तिचे गुरफटून जाणे, स्वतःच्या मनाने भाजीसुध्दा घेण्याचा अधिकार नसणे, अशा अनेक गोष्टींतून लेखिकेने स्त्रियांच्या पराधीनतेचे आणि वैवाहिक दुरवस्थेचे चित्रण केले आहे. लग्नानंतर पतीच्या अधिकार पदाला साजेल असे राहणे, ढीगभर दागिने घालून मिरविणे, केवळ एक शोभेची बाहुली बनून राहणे यातून स्त्रीची असहाय्यता व्यक्त होते, असे ही कथा सांगते.

### १.१०.५ 'चंदन' (१९९३) -

'चंदन' या दीर्घकथेचा नायक हा तत्त्वज्ञानी प्राध्यापक. वडील आणि मुकुंद यांच्यातले द्वंद्व हे या कथेतील मध्यवर्ती केंद्र आहे. तरुण मुलांपेक्षाही स्मार्ट वाटणारे देखणे, यशस्वी असे फौजदारी वकील असून, यशाच्या उज्ज्वल रंगानं त्यांना सतेज बनवलेले दिसून येते. प्राध्यापक सोमणांची मुकुंद नेहमी वडिलांबरोबर तुलना करतो. या कथेत नात्याचे विविधरंगी पदर गुंफलेले आहेत. निर्मला ही निर्मळ तरुणी मुकुंदाची बायको म्हणून आणि वकीलसाहेबांची सून म्हणून सहजपणे संसार सांभाळणारी, तर मुकुंदा वडिलांच्या विरुध्द वागून दांभिकतेवर सूड उगवणारा आणि अतिशय निर्व्याज मनाचा तरुण, अशा अनेक व्यक्तिरेखांमधून कणखर आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण असलेल्या व्यक्तीचे दर्शन घडते. लेखिकेला व्यवहारी जगात जी माणसे दिसतात तीच माणसे कथांमधून साकार झालेली आहेत. या कथांमधील व्यक्ती डॉक्टर, प्राध्यापक, वकील अशा मध्यमवर्गीय कुटुंबातील असतात, तर जयसारखा सायकीक मुलगाही असतो. एकेक व्यक्तिमत्त्व म्हणजे समाजाच्या आरशातील चेहरेच होत. त्यांच्या कथेत स्त्रियांपेक्षा पुरुषांच्याच मनाचे चित्रण अधिक केलेले दिसते. 'मांडव' व 'चंदन'मधील कथाही दीर्घकथा असून त्यातही माणसाच्या अखेरच्या क्षणापर्यंत गुंतलेल्या नातेसंबंधाचे चित्रण लेखिकेच्या लिखाणातून दिसून येते.

'मांडव', 'चंदन' आणि 'अनंत' या कथा संग्रहातील कथांकडे पाहिले की, कथेच्या अंतर्गत प्रवाहाकडे मंथनातून, चिंतनातून आशा बगे यांची कथा वेगवेगळ्या स्वयंपूर्ण मार्गाने वाटचाल करताना दिसते. सौंदर्यावर प्रेम करुन सौंदर्याच्या तळाशी असलेले अथांग दु:ख व विसंगत जीवन यांचा अर्थ लावण्याची, त्याच्या अस्तित्वाची मूलानुभावांशी, त्याच्या दु:खाशी भिडण्याची, त्याचं रहस्य शोधण्याची धडपडी वृत्ती त्यांच्या या कथांतून दिसून येते.

### १.१०.६ 'अनंत' (१९९४) -

'अनंत' या कथासंग्रहाचा प्रवाह हेतुपूर्वक न बदलताही या कथा पूर्वीच्या कथांहून वेगवेगळ्या असलेल्या जाणवतात. अनुभवाचा स्तर आणि अस्तर यांच्यामधील विशिष्ट मनोवृत्तीच्या तसेच स्त्री-पुरुषमधील ताण तणावाच्या कथा आहेत. या कथा नातेसंबंधावर लक्ष केंद्रित करताना दिसून येतात. 'मोसम' या कथेत पात्रांची निर्मिती माणसा माणसांतील कलह, द्वेष, प्रेम, जिद्द, मृत्यु यांच्या संगमातून निर्माण झालेली आहे. 'मोसम'मधील पात्रे सामाजिक, वैयक्तिक प्रश्नांशी झगडा करताना स्वत:चे 'मी' पण जपता यावे, याकरता धडपडणारी पात्रे पाहिली की, स्त्रीपेक्षाही पुरुषपात्रांचा अभ्यास लेखिकेने सूक्ष्मपणे मांडलेला दिसून येतो. अनेक मोसमांपैकी नाटक बसवण्याचा एक मोसम असतो. हौशी कलाकारात बँकेतला जगदीश आहे. तसा, एम.एस.ई.बी मधील इंजिनियर अपराजित आहे, खेडकर लेक्चरर तर वैद्य वकील आहेत. उन्हाळा संपून थंडावा आला की सगळे एकत्र येऊन तालमींना सुरुवात व्हायची अशाच एका नाटक बसविण्यापासून तो ते पुरे करेपर्यंतचा, नाटकाचे तपशील, त्यातील पात्रे, अनिभय, संगीत, वादविवाद यांनी भारलेला भरगच्च असा मोसमी प्रवास या कथेत आढळतो.

'तुफान' मध्येही परंपरेच्या चाकोरीतून चालणाऱ्या प्रौढ बाई (मिसेस सारंगपाणी) अखेर स्वत:पुरते तरी एक बंड पुकारतात. त्या विद्रोह करतात. आणि नवीन पिढी व जुनी पिढी यातील अंतर स्पष्ट करतात. खर तर स्त्री

मुक्तीच्या दिशेने उचललेले हे त्यांचे नवे पाऊलच वाटते. अनिता, अजय, गणेश, रश्मी, सुदेश, घोडे वैद्यबाई, प्रशांत, ही पात्रे एका वेगवेगळ्याच दृष्टिकोनातून आजची आत्मकेंद्री तरुण पिढी आणि कुटुंबाचा एक घटक म्हणून जगताना, सत्व गमावून बसलेली मध्यमवयीन प्रौढ स्त्री यांना लेखिकेने समोरासमोर आणून त्यांना कृतिशील केलेले आहे.

'घरचा रस्ता' या कथेत लहान मुलगा व गाणे शिकविणारी आई यांच्यातील प्रसंग उभ राहतो. मुलाशी असलेले मोठयांचे भावनिक बंध आणि लहान मुलांचे मानसिक विश्व, यातील द्वंद्व यातून उलगडत गेलेले दिसते. मृत्युच्या भयापेक्षा ही मानसिक विश्व कसे कोलमडते, हेच या कथेतून मांडलेले दिसते.

'अनंत' ही कथा नवजात बालकाच्या गंभीर आजारपणाच्या घटनेतून एक उन्नत आणि कलात्मक पातळीवर पोहचलेला मानसिक प्रवास करणाऱ्या आजीची आहे. बाळाच्या हार्टमध्येच डिफेक्ट आहे हे समजल्यावर कुटुंबातील प्रत्येकाला बाळाचा मृत्यु दिसू लागतो. आजी मात्र कासावीस होते. यात कथानकापेक्षा जीवनात येणाऱ्या लहानमोठया अनुभवांकडे लेखिका जिव्हाळयाने व आत्मविश्वासाने बघते व तटस्थपणे ते अनुभव वाचकांपर्यंत पोहचविते. त्यांच्या या कथांतून संबंधात परस्पर व मानवी जीवनात उत्पन्न होणारे सरळसरळ नातेसंबंध समोर आणतात. यातूनच काही नातेसंबंध रुजलेले दिसतात, तर काही वरवरचे वाटतात. मृत्युविषयी व निवृत्तीकडे खेचून नेणाऱ्या विषयाला स्पर्श करत मानवी संबंधाकडे जे जग आहे, त्या जगाचे सच्चेपण त्यांना कळले आहे व तेच त्यांनी कथांतून मांडलेले आहे.

व्यक्ती विषयाभोवती व्यक्ती त्याचे मोसम गुंफलेले असतात. त्यात पाऊस तर नेहमी असतो, वाफाळलेला चहा असतो, ढग भरुन आलेले असतात आणि आभाळ सारे त्यांचेच असते. 'मांडव' व 'चंदन' मधील कथा वाचताना त्या गूढतेकडे, चिंतनाकडे झुकत नाहीत, तर त्या सामान्य माणसांच्या

वास्तवातल्या जगण्यातल्या कथांकडे झुकतात,हे कळते पण 'अनंत'मधील कथांना एक चिंतनाचे वलय लाभले आहे, हे त्यांच्या कथांमध्ये आलेले आहे.

**१.१०.७ 'दर्पण' (१९९७) -**

'दर्पण' या कथा संग्रहामध्ये सात दीर्घकथा आहेत. या कथा वेगवेगळ्या घाटाच्या, संपन्न अनुभव देणाऱ्या कथा आहेत. या कथांमधून लेखिकेने मानवी मनाचा तळ शोधलेला दिसतो. कथांमधील चित्रणे ही संगीतवेडी अशी दिसतात. व यामधूनच एक एक कथा उलगडत जाताना दिसते. 'स्वामी' या कथेत मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण केलेले आहे. व्यावहारिक अर्थाने समाधानी अशा सेवलकर कुटुंबात एका रंग मारणाऱ्या सुभानचे आगमन होते. आणि हे कुटुंब जणू त्या भावविश्वाशी समरस होते. मानवी परस्परसंबंधाचा शोध घेणारी ही अप्रतिम अशी कथा आहे. माणसांच्या नात्यांमध्ये सुरुवातीला एक कोवळीक असते. 'एका पावसाळी संध्याकाळी' या कथेमध्ये गुणवंतशी सुमित्राचे लग्न होऊ शकत नाही. कारण त्याच्या घरच्यांना ती फार साधी वाटते. त्याच्या बुध्दिमत्तेला साजेशी वाटत नाही. पुढे त्याचा मुलगा डिप्रेशनने ग्रस्त होऊन त्यांना आवरेनासा होतो, जेंव्हा गुणवंत सुमित्रेला त्या मुलाला सांभाळायची विनंती करतो आणि आपल्याला वापरलं जातयं हे लक्षात येऊनही ती विनंती मान्य करते. तिचा अहंकार गेल्यावरच ती त्या मुलाच्या मनाला स्पर्श करु शकते.तत्कालीन उमाळ्यांच्या उद्रेकांच्या पलीकडची ही भावना लेखिकेने मांडलेली आहे.

'पाऊस' कथेत पाऊस हा प्रतीक रुपानेच आलेला आहे. तो पाऊस म्हणजे माणसाच्या आतले झरे आहेत. माणूस या झऱ्यांमध्ये कोरडा होत जातो. 'पाऊस' या कथेत दमयंती व सुदर्शन पाऊस पडत असताना भेटतात. चिंब होतात पण त्याचे कोरडे होत जाणं व्यवहाराला धरुन जाणं ही त्यांच्यातला कोरडेपणा बाजूला करुन समोरचे झरे शोधण्याचा सतत प्रयत्न करते. 'पाऊस'

या कथेत दोघांचे प्रेमसंबंध दर्शविले आहेत. परंतु ते दोघांच्या लग्नानंतरही तसेच राहिलेले दिसतात.

'नाटक' या कथेमधून नाटयवेड्या अशा व्यक्तीचे नाटकाचे व्यसन कसे वाढत जाते, ते दाखविले आहे. 'देणं' या कथेमधून गुरु आणि शिष्य यातील संबंध हे संगीतामुळे किती जवळीक निर्माण करतात, हे दिसून येते. 'नाटक' आणि 'देण' मध्येही कलावंत, त्यांची संवेदनशीलता, त्यांची तगमग व त्यांना समजून न घेणारे जग व त्यांचा संघर्ष मांडलेला आहे. कोणत्याही एका पात्राचा दुसरा एका पात्राशी झगडा नसून त्यांचा हा त्यांच्या आयुष्याशी, त्यांच्या स्वतःशी असलेला झगडा आहे. 'दर्पण' या कथा संग्रहातील कथा या मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करतात. यातून संगीत, प्रियकर प्रियसीच्या प्रेमाचे संबंध तसेच मध्यमवर्गीय समाजातील स्त्रिया व मुले इत्यादी विषय येतात. या सर्वामागे माणसाच्या जीवनाला नियंत्रित करणारी एक सूक्ष्म शक्ती कुठेतरी असल्याचा भास या कथांमधून होतो.

'दर्पण'मधील 'स्वामी' या कथेत रंगाची ओढ ही एक अतर्भ्य कल्पना जीवनातील अनाकलनीयता, अचूक आकलन दर्शविते. 'स्वामी' ही कथा सामान्य माणसांची आहे. जसा 'स्वामी'मधला छोटा मुलगा सुभान सगळ्या गोष्टींशी तो तडजोड करेल. मात्र, त्याचा रंग, रंगाचा दर, क्वालिटी याबाबत तो तडजोड नाही करणार. पण शेवटी हीच तडजोड त्याला करावी लागते. मग शेवटी एका कागदी नावेवर तो रागाने दगड मारतो. तेवढंच तो करु शकतो, असे अनुभवाचं सुलभीकरण लेखिकेने केलेले आहे.

### **१.१०.८ 'निसटलेले' (१९९९) -**

'निसटलेले' या कथा संग्रहामध्ये एकूण सात दीर्घकथा आहेत. जीवन जगत असताना स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधातील विविध नाती व आयुष्याला वळण देणाऱ्या नात्यांबद्दल मनात असलेले व जे राहून गेलेले क्षण असतात,

असे क्षणच या कथांमधून उलगडत जाताना दिसतात. स्त्री-पुरुषांमधील नातेसंबंध कसे वाढत जातात, हे 'मैत्र'मधील मधुरा, उदयन,आणि भास्कर तसेच 'हिवाळा' या कथेमध्ये ऋषिकेश, अरुणा व निर्मला या कथेमधील राधा व श्रीधर, केशवभैय्या व मालतीबाई, उत्तरा व अविनाश, जया व ललिता इत्यादींच्या कौटुंबिक आशयाचे जीवनचित्रण दिसते. 'हिवाळा' या कथेत निसर्गातील बदल व नातेसंबंध व जिव्हाळा यांचा संबंध मांडलेला आहे. "लवकर मोठा हो ऋषिकेश, एकेक थंडी संपते आणि तू लहान असतोस. मला फार घाई आहे तुझ्या लवकर मोठं होण्याची."[२५] वैजयंती त्यालाच म्हणायची हरीशला नाही. तो तर आधीच मोठा झालेला होता. आईची कालगणना नेहमी हिवाळा हिवाळा अशी होते. लेखिकेने कथेत पात्र व निसर्ग यांचा सहसंबंध स्पष्टपणे मांडलेला आहे.

'निसटलेले' या कथा संग्रहात स्त्री- पुरुषातील संबंधाचा शोध घेता घेता मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'शुध्द' या कथेत नायक नायिकेच्या मानसिकतेच्या, ती बदलण्याचा अतिशय हळूवारपणे प्रवास चित्रित केलेला आहे.

स्त्री-पुरुष संबंधातील शोध हा न संपणारा आहे. माणसाचे मन हा विषयच कधीही तळ न सापडणारा असा त्यात स्त्री-पुरुष नाते हे कितीतरी वेगवेगळ्या पातळीवर असणारे, या नात्यांना समजून घेऊन त्याप्रमाणे वागताना, मनात असलेले खूप काही क्षण निसटून जातात. हे निसटलेले क्षण मनाच्या तळात सुस्पष्ट असतात. असे निसटलेले क्षण माणसाला अनुभवता येतात. पण सर्जनशील कलाकाराला अचूक मार्मिक शब्दात साकारताही येतात. आशा बगेंनी हे निसटलेले क्षण कथासंग्रहात मांडलेले आहे. या सर्व कथांमध्ये आशा बगेंची एक खास भाषाशैली आहे. गुंतागुंत, उकल, निराकरण अशा पायऱ्या किंवा सनसनीत घटना या सगळ्याच पायऱ्या ओलांडून या कथा एका

उंचीवर पोहचताना दिसतात. या कथा संग्रहातील कथा नात्यांना समजावून घेताना जीवनाचे सूत्र मांडणाऱ्या कथा आहेत.

### १.१०.९ 'ऋतुवेगळे' (१९९९) -

'ऋतुवेगळे' या कथासंग्रहात पाच दीर्घकथा आहेत. 'पंख' या कथेत सोनू, दीपू, मिनू, नंदू या पात्रांतून दिवाळी व उन्हाळयाच्या सुट्टीत ताईकडे, मामाकडे जाणे, लग्न व त्यासाठी जमलेला गोतावळा लेखिकेने चित्रित केलेला आहे. 'पत्र'मधील सुभी, 'शिल्प'मधील 'निमा, चिक्कू व 'येरझरा'मधील अनुमाई अशी या कथांमधील स्त्री पात्रे सुशिक्षित आहेत, तरीही स्वतःचे निर्णय त्या स्वतः घेऊ शकत नाहीत, असे दिसते. कारण आई-वडिलांचा व समाजाचा त्यांच्यावर दबाव आहे. यामुळे त्या बंड करु शकत नाही असे दिसते.

'मल्हार' या कथेत देसाई मास्तर, त्यांची मुलगी, निरु देसाई, सागरचे मित्र पेंढारकर व श्रीखंडे ही पात्रे विविध भूमिकेतून चित्रित झालेली दिसतात. या कथेतील 'नीरु' ही नायिका मात्र सर्व कोडी सोडताना दिसते. आई-वडिलांच्या, समाजाच्या विरोधाला न जुमानता ती बंड करते व अस्तित्व सिध्द करते. मध्यमवर्गीय समाजाला शिक्षणासाठी व लग्नासाठी कशा प्रकारच्या अडचणी येतात हेच यातून दाखविले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील एका प्रातिनिधिक वर्गाचे चित्रण आलेले आहे. या कथासंग्रहातून स्त्री मुक्ती किंवा स्त्रीवादी दृष्टिकोनातून आयुष्याकडे पहात नाही, तर स्त्री म्हणून समाजात जगत असताना येणाऱ्या अनुभवांचे चित्रण ती मोठया ताकदीने करताना दिसते. या शतकातील जगणे हे जरी आधुनिक आणि भौतिक स्वरुपाचे असले तरी माणसाच्या मनातील सनातन संघर्ष मात्र तसाच जुन्या स्वरुपाचा राहिलेला दिसतो याचे चित्रण या कथासंग्रहातून येते. 'मल्हार' या कथेत पावसाचा आणि लग्नाचा, निरुच्या लग्नाचा संबंध त्यांना फार जवळचा वाटला. इतका जवळचा जितका मल्हारातल्या निषाद गांधाराचा पावसाशी अल्प आलेल्या, गरजणाऱ्या, गरजून बरसणाऱ्या आभाळाशी होता. त्या डवरलेल्या मेघांना मल्हाराइतकं

जवळच कुणी नव्हतं, असा माणसाच्या मनातील संघर्ष लेखिकेने मांडलेला आहे.

### १.१०.१० 'माझी कथा माझी निवड' (२००१) -

'माझी कथा माझी निवड' या कथा संग्रहामध्ये लेखिकेने आवडत्या दीर्घकथा निवडलेल्या दिसतात. यामध्ये 'रंग', 'अत्तर', 'मारवा' व 'मल्हार' या कथा आहेत. लेखिका या कथासंदर्भात स्वतःच सांगते की, 'संगीत ही माझी भूमी आहे. या भूमीतील अनुभव मला नित्यनूतनच वाटत असतो. या भूमीने मला कितीतरी अनुभव दिले. याचे प्रत्यंतर 'रंग' सारख्या काही कथांमधून या कथेचे पोतच संगीताचे होते. तर 'मारवा' या कथेत स्वतःच्या घरचीच पार्श्वभूमी असल्याचे लेखिका नमूद करते. या कथेमधून संध्याकळाच्या सूर्य मावळतानाचे मोहक वर्णन केलेले दिसते. सूर्याची किरणे पाण्यावर पडल्यावर त्यांच्या केशरी रंगाचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

मनाच्या खोलवरच्या अतीव उत्कृष्ट इच्छांची अपूर्णता माणसाच्या साध्यासुध्या जगण्याला गूढतेची अस्तर लावते. 'मल्हार' या कथेमध्ये फक्त अनुभव महत्त्वाचा वाटतो. यामध्ये माणसाचे वेगळेपण, अनुभव मांडलेले आहेत. सुशिक्षित मुलींना लग्नाच्या बाजारात उभे राहावे लागते. या अनुभवावर ही कथा लिहिली आहे. 'मारवा' या कथेत नव्या-जुन्या पिढीतील सूक्ष्म संघर्ष रघुनाथ व आबा देशपांडे या पात्राद्वारे आपल्यासमोर येतो, पण संगीताच्या माध्यमातून! देशपांडे हे मारव्याचे पारंपरिक रुप व मुलगा रघुनाथ ही त्यातली प्रयोगशीलता उत्सवातून दिसून आलेले आहे.

'रंग' या कथेत येणारी सूचकता ही देवेंद्रच्या सतारीतल्या लयास गेलेल्या सुरांची असते आणि मानसी व देवेंद्र यांच्या भावी जीवनाचीही असते हे लयाला जाणे लेखिकेने अतिशय संवेदनक्षमतेने चित्रित केले आहे. रंगाच्या आणि सुरांच्या माध्यमातून लेखिकेने दोन मनाची जवळीक, त्याच्यातील दूरता, त्यांची एकता हे सारेच वेगळेपण मोठया ताकदीने हाताळलेले आहेत.

'अत्तर' या कथेत अनेक पदरी आशय आणि त्यातील कलात्मक अभिव्यक्ती एका साध्याच विषयातून मांडलेली आहे. गावातील रावसाहेब हे एक बडे प्रस्थ आणि त्यांच्या हुकुमतीत वावरणारे इतर व रंगनाथ हे त्यातले प्रमुख पात्र. नाटकाच्या वेडापायी सारेच झपाटलेले एका क्षुल्लक कारणासाठी रावसाहेबांनी प्राध्यापक असलेल्या रंगनाथांना पानावरुन उठवून बोलावून घ्यावं आणि रंगनाथांनीही तो हुकूम पाळावा! दिसायला ही क्षुल्लक घटना, पण रावसाहेब खरे कळतात ते इथेच. त्यांची जरब, त्यातली सहजता वगैरे या एकाच प्रसंगातून रावसाहेब संगीतशौकीन असतात. रावसाहेब दानशूर पण त्यांची संगीत नाटकं आता कुणी करीत नाही, ही खंत आणि नव्या पिढीशी सामना, असं हे व्यक्ति चित्रण नेमकेपणाने आशा बगेंनी मांडलेले आहे.

### १.१०.११ 'पाऊलवाटेवरले गाव' (२००५) -

'पाऊलवाटेवरले गाव' या कथा संग्रहामध्ये सात दीर्घकथा आहेत. या कथा संग्रहामधून मानवी नात्यांतील संबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्याचबरोबर मानवी मनाचा तळ शोधून मानवी मन हे किती भावनिक आहे याचे चित्रण या कथांमधून येते. मानवी नात्यांचा शोध घेता घेता, प्रेमसंबंध कसे जुळत जातात व त्यांचे रुपांतर लग्नबंधनात कसे होते यांचे प्रत्यंतर 'लग्न' या कथेमध्ये येते. रेणू व चंद्रकांत यांचा झालेला विवाह, रेणूने पळून जाऊन खालच्या जातीच्या मुलाशी लग्न केल्यामुळे घरातील माणसांना कशा वेदना झाल्यात, मती कुंठित झाली. आता कीर्तनाला उभं राहताना पायाखालची जमीन सरकेल, टाळ हातात धरताना हात कापतील, कीर्तनकाराचे घर समाजाभिमुख असायला हवे, दादासाहेब आणि रेणू यांच्यातील वेगळाच संघर्ष, वेगळाच प्रवाह होत गेला. मी पाणी विसरले, प्रवाह विसरले. आजूबाजूचे किनारे जणू हरवून टाकले. तरी मला यश मिळाले. पण मी समृध्द नाही झाले. दोन भिन्न प्रवाहांनी समृध्द करत करत वाहायचे असते, ते माझ्या वाटयाला आले नाही, चंद्रकांतच्याही नाही.

एखादी रिकामी होडी किनाऱ्याला संथ पाण्यावरुन पक्षी या तीरावरुन त्या तीराकडे उडतात. दुपार कलते. थोडी थंड हवा सुटते. कदाचित पाऊस येईलही हे तिच्या मनात राहून गेलेले गाव, तिलाही आता इतक्या काळानंतर जसंच्या तसं सापडणार नाही,  हे तिला कळलं. आता हे पाणी संथ होतं; पण अशाही वेळा असतातच ना, की जेंव्हा हे बेभान होऊन आपले तट सोडून सैरावैरा धावतं. त्या पाण्याला मग कुणीही कळत नाही. त्या वेळी ते पाणी नसतं प्रलय असतो. 'गाव' या कथेमधून गावाकडील निसर्गाचे म्हणजे नदी, नाले, तेथील सरंजामशाही, पध्दतीचा वाडा, त्यांच्या बाजूचा परिसर यांचे चित्रण 'गाव' कथेतून येते. 'केवडा'मधील कीर्ती, 'गाव'मधील ताराबाई सदाफळ ही पात्रे मृत्युला स्पर्श करुन गेलेली दिसतात. "अनूला काळाचा एक सुप्त प्रवाह जाणवतो. त्या गावापासून तिच्यापर्यंत त्या सगळ्या माणसांपासून तिच्यापर्यंत मूलबाळ नसलेल्या त्या स्त्रीपासून तिच्यापर्यंत त्या स्त्रीला स्वतःच नाव नाही, स्वतःचा म्हणून चेहरा नाही. तिच्या मूल नसण्याचं हे सगळं गिळून टाकले आहे. तिची मग दुसरी कुठली ओळख उरली नाही. तिची तिनेच ती ठेवली नाही."[२६] यातून लेखिकेने स्त्री जीवनाचे सूत्र आशयातून मांडलेले आहे.

'पाऊसवाटेवरले गाव' या कथासंग्रहामध्ये मानवी मन, आचार-विचार, संस्कृती, रुढी परंपरा, निसर्ग, पाऊस, प्रवास, नदी-नाले व परिसर या सर्वांचे सुंदर चित्रण आलेले आहे. आशा बगे यांच्या लेखनात मानवी नात्यांचा मनोमन आविष्कार हा त्यांच्या लेखनाचा खास विषय आहे. त्यांनी वेगवेगळ्या वयोगटातील आणि मध्यम व कनिष्ठवर्गीय स्तरातील अनेक स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा त्यांच्या कथांतून उभ्या राहतात. त्यांचे कथाविश्व महाराष्ट्रातील ब्राह्मणी कुटुंब संस्कृतीशी, सण, उत्सव, कुळाचार, व्रतवैकल्ये, नवरात्रोत्सव व कीर्तन इत्यादी परंपरेशी जोडलेले आहे. या संस्कृतीतील धार्मिक वातावरण, आपापल्या जाणिवेनुसार, श्रध्देनुसार व मूल्यभावनानुसार जगणारी माणसे आणि त्यांचे परस्परसंबंध त्यांच्या कथांतून दिसून येतात.

### १.१०.१२ 'प्रतिद्वंदी' (२००५) -

'प्रतिद्वंदी' कथा संग्रहामध्ये चार कथा आहेत. 'दुसरा', 'कितीदूर', 'निर्मोही', आणि 'सखी' या दीर्घकथा आहेत. या कथा संग्रहातील कथांमध्ये घटना फारशा नाहीत. त्यात प्रामुख्याने माणसांतला, नातेसंबंधातला शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. नात्यातला तोल राखताना आणि तो राखत स्वतःला सावरताना माणसाच्या मनात उठणारी वादळं वा तरंग यांची विविध रुपं कथामधून जागोजागी भेटत राहतात. अपघातामुळे अंथरुणाला खिळलेला आणि त्यातून सावरत असलेला कार्तिक, फिजिओथेरपिस्ट अनू यांच्यातला नातेसंबंधाचा धुसरसा पट उभा राहतो, तो संमिश्र भावभावनांच्या पार्श्वपटलावर. माणसाच्या सावरण्याच्या क्रियेवर आधारित 'दुसरी' ही कथा भाष्य करुन जाते. या कथेत अनू आणि कार्तिक यांच्यातील संवाद व नातेसंबंध जपलेले आहेत. उदा. कार्तिकला अनूची तीव्र अशी आठवण आली. तो लवकरच पूर्ण बरा होत होता आणि आता तिची तशी गरज राहणार नव्हती. पण तिची ही आठवण त्या गरजेपलीकडचीच होती, हे त्याला आतून समजले. तिची आठवण तिच्या त्याला वाटणाऱ्या स्पर्शाच्या ओढीचीही नव्हती. त्याही पलीकडची होती. त्याची वरची खोली, छत, भिंती, खिडकी, बाजूची गच्ची, ती बाई, तिचा व्यायाम, ते मूल, ती सळसळणारी झाडे आणि अनू, तिची चार वाजताची येण्याची वेळ, तिचा नि त्याचा घडलेला, न घडलेला संवाद हे सगळे एकच चित्र दिसून येते.

'किती दूर' या कथेत डॉ.ललिता व मनोहर त्यांचा मुलगा सुजय व घरकाम करणारी मनुताई यांच्यातील नातेसंबंध उलगडण्याचा प्रयत्न आशा बगे यांनी केलेला आहे. लौकिकार्थाने वाया गेलेला आणि मनाला असंख्य अठीचे पीळ पडलेला मुलगा व त्याची आई यांच्यातल्या संबंधाचा आलेख समोर येतो, तो 'किती दूर' मधून. ही आई स्वतः निष्णात डॉक्टर, तिच्या हातून रोज अनेक जन्म घडतात. पोटचा पोरगा मात्र तिच्यासाठी एखादया शापासारखा.

त्याच्यातल्या संबंधाच्या आलेखात संघर्षाचे बिंदूच अनेक. या आलेखाचा शेवट मात्र काहीसा वेगळा मांडलेला आहे. एकूण आयुष्याचे सखोल भान देणारी कथा 'निर्मोही'. सुखवस्तू आणि समृध्द घरातल्या अनुराधाबाई आणि त्यांच्या मदतीसाठी वृध्दाश्रमातून आणलेली सामान्य स्त्री कृष्णा, या दोघींची व्यक्तिमत्त्व पूर्णतः वेगळी व निराळी आहेत. त्यांच्यातल्या संबंधाच्या निमित्ताने आशा बगे यांनी एक व्यापक अर्थाचे भान मांडलेले आहे. 'सखी' या कथेत एका कुटुंबातल्या व्यक्तीच्या परस्परसंबंधाचे चित्रण आहे. परस्परांना समजून घेता घेता स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्न करणारी ही माणसं आहेत.

'निवडुंग' या कथेत गायत्रीच्या रुपाने एक धैर्यवान स्त्री व तिच्या जीवनाच्या पारंपरिक छटा लेखिकेने चित्रित केल्या आहे. सुखवस्तू देऊस्करांच्या वाड्यात आणून सोडलेल्या खेडेगावातल्या एका अशक्त, कुरुप, परित्यक्ता गायत्रीची कथा आहे. विलक्षण मनस्वी आणि संवेदनशील गायत्री देऊस्करांच्या वाड्यात येते, लांबसडक केसांची आणि गाईसारख्या डोळ्यांची असे तिचे वर्णन लेखिका करते. देऊस्करांच्या घरात ती निवडुंगासारखी वाढत राहते. आपल्या केसांना ती निवडुंगाच्या जातीचे म्हणजे तर बायकांची जातच निवडुंगाची, कुठेही कशीही रुजून जाते, असा स्वतःचा उल्लेख ती करते. विवाहित विश्वास तिच्यावर लोभवतो. हे पाहून ती आपल्या गावी परत जाण्याचा निर्णय घेते. पण तत्पूर्वी, "तुम्ही टाकलेल्या तुकड्यावर आम्हाला राग कसा येऊ शकतो?"[२७] असे ठामपणे बजावते. पण त्या स्वतःचे स्थान ती ओळखून जगते. शेवटी स्वतःलाच प्रश्न करते, "खरं वाटलं होतं की, हे सारं खूप कठीण जाईल. पण तस काही नव्हतं. अखेर या भावना तशाच तर उगवतात निवडुंगासारख्या"[२८] "अखेर प्रश्न फक्त सवयीचाच तर असतो. फक्त सवयीचा आपल्याच घरावरलं आभाळं आपल्या कसं खूप ओळखीचं असतं. ओळखीचं की सवयीच?"[२९] आश्रित स्त्रीच्या मनाचा एक कप्पाच लेखिका या ठिकाणी उघडा करते.

गायत्रीच्या रुपाने लेखिकेला स्त्रीच्या जीवनाला इतरांनी आकार देताना

वाटयाला येणारी आगतिकता सांगण्यापेक्षा डोळसपणे स्वीकारलेला दु:खाचा दाह सोसणे, आनंदाचे वाटते. म्हणूनच तर गायत्री ही परस्वाधीन असूनही तिने आपले सत्त्व, आपला कस जपला आहे. एका असहय क्षणी ती या पराधीन अवस्थेतून बाहेर पडली आहे. तिचे आयुष्य अनेक वेदनांनी भरलेले आहे. पण तरीही ती दु:खी नाही. आलेल्या परिस्थितीला डोळसपणे सामोरे जाण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे. सुलभा हेर्लेकर या कथेविषयी म्हणतात की, "आशा बगे यांच्या 'अत्तर' या कथा संग्रहातील सर्व कथांचा विचार करताना त्याच्या इतर नायिकांच्या तुलनेत गायत्री हीच अशी आहे की, जी परिस्थितीवर मात करुन त्यातून बाहेर पडते."[३०] यातील नायिका एका विशिष्ट चौकटीतच जीवन कसे जगते व या सर्व गोष्टींचा तिच्यावर होणारा परिणाम व त्यातून स्वत:ची वाट काढणारी ही आधुनिक स्त्री समाजात आपले स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करते.

## १.११ आशा बगे यांचे कादंबरी लेखन -

कादंबरी या साहित्यप्रकारचा कथात्म साहित्यात अंतर्भाव होतो. एक दीर्घ कथात्म गद्य साहित्यप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहिले जाते. कादंबरी हा साहित्य प्रकारच्या तुलनेत खूप लोकप्रिय झालेला साहित्य प्रकार आहे. वाङ्मय प्रकाराची स्वत:ची अशी एक बदलत आलेली संकेत व्यवस्था आहे. ही संकेत व्यवस्था, घटना, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषाशैली, वातावरण, लेखकांचा दृष्टिकोन व प्रस्तुतीकरणाच्या पध्दती इत्यादी विविध अंगांनी मिळून बनलेली आहे. कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे निराळेपण त्यांच्या या व्यवस्थेतच असते. म्हणून कादंबरीच्या या संकेत व्यवस्थेचा नेटकेपणाने अभ्यास केला की, या वाङ्मयप्रकाराचे नेमके आकलन होऊ शकते.

कादंबरी हा आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकार आहे. संपूर्ण जीवनाला समजून घेण्याची शक्ती या वाङ्मयप्रकारात आहे. जीवनाची खोली, जीवनाची उंची, जीवनाचा विस्तार व जीवनातील सूक्ष्म चिंतन यासाठी कादंबरी हा वाङ्मय

प्रकार प्रसिध्द आहे. कादंबरीत जीवनाचा विशाल पट मांडण्यात येतो, ज्यावर कादंबरीचे अधिराज्य चालू असते. त्यामुळे कादंबरी हा सामाजिक दस्तावेज आहे असे म्हटले जाते. तसेच कादंबरीकाराचा स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कलाकृतीचा असूनही कादंबरीच्या आकलनात जीवन निष्ठांचा संदर्भ अनमोल असतो आणि तो समजून घेऊनच त्याच्या आस्थेचे रुप ओळखावे लागते.

आशा बगे यांनी मराठी साहित्यात कथा, कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार लेखन करुन स्वतंत्र वाट चोखाळली आहे. 'मनस्विनी', 'झुंबर', 'त्रिदल', 'धर्मक्षेत्रे', 'कुरुक्षेत्रे', 'सेतू', 'भूमी', 'भूमिका', 'उत्सव', 'मुद्रा' या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांच्या स्वरुपाविषयी थोडक्यात माहिती खालील प्रमाणे -

### १.११.१ 'मनस्विनी' (१९७८) -

'मनस्विनी' ही आशा बगे यांची पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीत सौदामिनी ही नायिका आहे. ती आईविना वाढलेली अत्यंत हुशार आणि संवेदनक्षम मनाची मनस्विनी आहे. 'मनस्विनी' या कादंबरीमधील नायिकेची बहीण मात्र विलक्षण सामर्थ्यवान आणि शांत, सौदामिनीच्या उलट, "काही माणसंच अशी की त्यांचा कुठलाच अट्टाहास नसतो. पाण्यांन मिसळून दुसऱ्या कोणाचाही रंग चटकन घ्यावा तसे समोर वाढवून येईल त्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे घेत राहतात, तरीही ती माणसं वगळली जाऊ शकत नाही. आपला तोल पुन्हा पहिल्यापासून पहायला लावतात ही माणसं अशी ही दमयंती."[३१] खरं म्हणजे आपला प्रवृत्ती धर्म आणि जीवनानुभव यांच्या अनुषंगाने लेखन केलेले दिसते.

'मनस्विनी' या कादंबरीत नायिकेचे शारीरिक पातळीवरील परमोच्च बिंदूचे आकर्षण असणाऱ्या, मिटता मिटताच फुलणाऱ्या आणि फुलता फुलताच मिटणाऱ्या नायिकेचे मनोविश्व भावनिक आणि तार्किक पध्दतीने

मांडलेले आहे. या कादंबरीत कलात्मकता व संवेदना इथे सौदामिनी व यशोधनाच्या रुपाने व्यक्त झाली आहे. तिची बहीण दमयंती व भाई यांच्याशी रक्ताचे नाते आहे. भाईच्या गाण्याच्या विश्वातही सौदामिनी गुंतते. परंतु सारख्या देखण्या नोकरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी सौदामिनीचा विवाह होतो; परंतु एकटेपणा भोगता भोगता संगीताच्या आवडीने यशोधन तिच्या जीवनात येतो व त्याच्याशी तिची मैत्री होते. परंतु तिचे मन हे प्रेमात गुंफलेले असते. त्याच्यातून तिला सुटायचे असते. यासाठी ती दमयंतीची मदत घेते व यातच कादंबरीचा शेवट होतो. यामुळे ही कादंबरी वाचकांना विचार करण्यास भाग पाडते. मनस्वीनी या कादंबरीत प्रतिमांची, संगीताची बंदिशी, त्याची भाषा अलगद साधून घेते. "पहिले विहाग, विहाग हा रागच गोड, हळूवार, त्याच्या प्रत्येक सुरावटीत काही वेगळं चित्र उभं करण्याचं अलौकिक सामर्थ्य आहे. मिटलेली पाकळी न पाकळी कुणी हळुवार उलगडावी असे ते सूर, हे सारे आपल्याच भावनांचे आपण त्या सुरावर केलेले आरोप. तरी ते खंर करुन दाखवण्याचे कसब त्या सुरातच होते. सतारीवर यशोधन विहाग वाजवत होते आणि सौदामिनी आठवून गेली जसराजची ती चीज विहागातली, लट उलझी सुलझरे बालमा हातोमें मेंदी लगी."[३२] या कादंबरीत संगीतकलेवर प्रेम करणाऱ्या नायिकेचे मन व मैफिलीतल्या क्षणांचे सौंदर्य उलगडून दाखविलेले आहे.

'मनस्विनी' या कादंबरीमध्ये संगीत विशारद व रागदारीचेही वर्णन आलेले आहे. या संगीतातूनच जणू कादंबरीचे कथानक पुढे पुढे सरकत जाते. यातील संगीताच्या मैफिलीमधूनच प्रेमाचे ऋणानुबंध जोडले जातात. तर कधी ते तोडले जातानाही दिसतात. यातून स्त्री मनाची होणारी भावअवस्था येथे व्यक्त झालेली दिसते. स्त्री मन हेच केंद्रस्थानी ठेवलेले दिसते. एका एका प्रसंगामधून कादंबरीचे पात्र उलगडताना दिसत आहे.

### १.११.२ 'झुंबर' (१९८४) -

'झुंबर' ही कादंबरी स्त्री भोवती फिरणारी, अंतर्मनाचा शोध घेणारी असून

दोन पुरुषांच्या सहवासात आलेल्या अनुभवांचे चित्रण या कादंबरीत आले आहे. 'झुंबर' या कादंबरीतील हॉस्पिटलचा परिसर, वातावरण निर्मिती, ऑपरेशन्स या सर्वांचा जवळून अनुभव घेतलेली, स्वभाव रेखनातील हेलकावे लेखिकेने बारकाईने टिपलेले दिसतात. डॉ. ऋषिकेश अधिकारी हे स्थानिक वैद्यकीय महाविद्यालयाचे एक निष्णात स्त्री रोगतज्ज्ञ असतात. ते लंडनला जाऊन सर्जरीचा विशेष अभ्यास करुन आलेले हाडाचे प्राध्यापक असतात. असामान्य बुध्दीचे व अविवाहित राहण्याचा निर्धार केलेले, कुणाशीही आपले जुळवून न घेण्याचे ठरविलेले, विद्यार्थ्यांना प्रिय असलेले डॉ. अधिकारी हे विद्यार्थिनी 'वसुमती' हिच्याशी मनाने हळूहळू बांधले जाताना दिसतात. 'ज्यासाठी आपण आयुष्यभर धडपडतो, जो हा साडेतीन हाताचा देह म्हणजे खरचं काय असतं? ते मला यावेळी कळलं. दोन मिस्टर पंडित मृत्युच्या अगदी जवळ जाऊन मागे फिरले, मला वाटतं मानवी प्रयत्न जिथे संपतात तिथे एक वेगळीच सरहद्द लागते. तिथे फक्त आपली श्रध्दा, निष्ठाच आपल्याला बळ देऊन जाते. सगळयाच गोष्टी तर्काच्या हद्दीत बसत नाहीत. तर्काने गोठलेली शेवटची पायरी इथे माणसाला सोडावी लागते. आधी झालेल्या प्रवासातला अहंकार अजिबात जमेस धरता येत नाही. अशी ही चमत्कारिक वेळ.

आपल्या घरात एका क्षणी ऑपरेशन अयशस्वी झाले म्हणून मनाला लावून घेणारे डॉ. ऋषिकेश एका हालक्या व दुबळया क्षणी वसुमतीला सापडतात आणि डॉ. अधिकारींशी लग्न करण्याचा वसुमतीचा निश्चय पक्का होतो. त्यांचे लग्न पक्के होताच डॉ. राघवही दूर निघून जातो. डॉ. अधिकारींचे वडील हे या दोन समांतर पात्रांना जोडणारे पात्र आहे. सुनेला व मुलाला न बोलता केवळ कृतीतून सांभाळून घेणारे असे ते आहेत. "स्वतःच्या बंगल्यातच हॉस्पिटल उघडून संसार चांगला कुठे चालू होतो, तर डॉ. अधिकारी आजारी पडतात. वसुमतीला त्यांच्या सहवासातून आनंदही मिळत नसे. यातूनच ज्या क्षणी ऋषिकेशने जवळ केले असते, त्याच क्षणी त्यांनी तिच्यापासून दूर राहण्याचाही निर्णयही घेतलेला असतो. यातूनच पुढे हे जीवन जगता जगता

वसुमतीला दुसऱ्या लग्नाचा आदेशही सूचकतेने ते देतात. डॉ. राघवचे तिच्याविषयीचे प्रेम जाणून, त्याच्याशी बोलून डॉ. अधिकारी व वसुमती या दुसऱ्या जीवनाची ओढ असते. कारण तिला पूर्वायुष्यात गमावलेले सुख मिळणार असते."[३३] जीवनातील लहान मोठे प्रसंग लेखिकेने मार्मिक पणे मांडलेले आहेत.

डॉ. ऋषिकेश अधिकारींच्या इच्छेखातर ती डॉ. राघवशी लग्न करते. परंतु डॉ. अधिकारी जिवंत असतानाच आपण दुसरे लग्न करत आहोत, या कल्पनेतच ती खचते. त्यातच डॉ. अधिकारींच्या मृत्युवरील अग्रलेखात तिचा उल्लेखही नसतो. पत्नी म्हणून ती कासावीस होते. हीच खंत तिच्या मनाला शेवटपर्यंत बोचत राहते. अखेर एखाद्या लखलखत्या झुंबराचा अनुभवच तिचा होऊन जातो. झुंबर विझायचे असते हे जाणून डॉ. अधिकरी व राघव या दोघांबरोबरचा तो अनुभव असतो.

'झुंबर'मध्ये डॉ. अधिकारी हे डॉ. वसुमतीचे गुरु, पती, सर्वच असतात. पण हा माणूस आपला प्रियकर होऊ शकत नाही, हे तिला जाणवतं. एक लखलखतं झुंबर माथ्यावर असतं तेंव्हा त्या तेजोमयी प्रकाशात इतर काही दिसू नये, तसं तिला वाटतं म्हणून डॉ. अधिकारी आजारी असतानाही डॉ. राघवशी तिचं लग्न होणं म्हणजे स्वतःला शरण जाऊन ती वास्तवाचा स्वीकार करते. स्वतःतलं सामान्यपण तिला कळून येते. या कादंबरीतील आशय वाचकांना पारंपरिकतेला छेद देणारा आहे. आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते असलेली असली तरी बदलत्या समाजवास्तवातील, कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान, मध्यमवर्गीय बदलत्या मूल्यांची जाणीवही त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

### १.११.३ 'त्रिदल' (१९९४) -

'त्रिदल' ही आशा बगे यांची दोन मैत्रिणींमधील नातेसंबंधाचा शोध घेणारी कादंबरी आहे. या कादंबरीत लेखिकेने 'मंजू' आणि 'शारदा' या होस्टेलमध्ये

राहणाऱ्या दोन मैत्रिणींच्या मार्फत जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंजूचा भाऊ श्रीनिवास यांच्याबरोबर शारदेची कॉलेजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने ओळख होते. पुढे त्यांचा विवाह होतो. आणि मग दोन मैत्रिणीचे नाते नणंद-भावजय या नातेसंबंधात बदलते. परंपरेचा धागा न सोडता सनातन नात्यातील नवेपण शोधणे हे या कादंबरीचे वैशिष्टय आहे. कृष्णा नायर या पात्रांच्या रुपाने अध्यापन करण्याच्या शिक्षकाचे वर्णन लेखिकेने केलेले आहे. समाजातील चालीरीती, रुढी, परंपरा व अंधश्रध्दा यांचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे. अविनाश व मंजू यांचा विवाह होतो. मंगळागौरीच्या निमित्ताने सण उत्सवाची परंपरा दिसून येते.

'त्रिदल' या कादंबरीत सुखमय जीवनात काटयासारखे रुतणारे प्रसंग साकार करण्यात आशा बगे यांना सिध्दहस्तता प्राप्त झाली आहे. त्यातील वेदना ही शुध्द सोन्यासारखी खरी आहे. निर्माण होऊन क्षीण होत जाणारे व लुप्त होणारे स्नेहबंध सूक्ष्मतेने चित्रण केलेले आहे. सहृदयता त्यांचे अहंमन्य, पुरुषी व्यक्तिमत्त्व, त्यांच्यातील सोशिकता, त्यांच्यातील संगीत, नाटक व कलातील गूढ चातुर्य या साऱ्या अंगाने स्त्रीबरोबरच पुरुषाच्या अंतर्यामीचा शोध आशा बगे यांनी घेतलेला आहे.

परंपरेने एका विशिष्ट उंबरठयावर आणून ठेवलेले स्त्रीविश्व, सद्यकालीन पार्श्वभूमीवर पुरुषाच्या निखळ मैत्रीतून निर्माण झालेले स्त्रीचे एक अनोखे विश्व, त्यातूनच निर्माण झालेले ताणतणाव आणि गुंतागुंत, एका नव्याच अस्तित्ववेदनेने भारावून जाते. या कादंबरीत मानवी स्वभावाचे भान आहे. अनुभवात गुंतणे आणि अनुभव घेता येणे असे एक 'त्रिदल' आहे. माणसामाणसांची विशिष्टता, त्यांचे परस्पर स्वभावधर्म आणि त्यांचे एकटेपण यांची विलक्षण निराळेपण लेखिकेने टिपलेले आहे.

### १.११.४ 'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे' (१९९६) -

'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे' ही कादंबरी द्रोणाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा

महाभारताच्या आधारे पण वेगवेगळ्या दृष्टिकोनातून वेध घेणारी पौराणिक कादंबरी आहे. 'ब्राह्मण व क्षत्रिय वर्णाखेरीज इतर वर्गांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही, हीन कुलोत्पन्नांना विद्या देऊन समाज रसातळाला नेऊ नकोस, अशी आज्ञा द्रोणाचार्यांनी त्यांचे गुरु परशुराम यांनी केलेली आहे. या संदर्भातला आत्मसंघर्ष आणि गुरुचरण आज्ञेचे ओझे, यासह द्रोण-द्रोणाचार्य असा त्यांचा जीवनप्रवास सुरु होतो. गुरुकुलातून बाहेर पडल्यापासून द्रोणाचार्यांच्या गुरुकुलाची समाप्ती होते. तिथवरचा द्रोणाचा हा प्रवास महाभारतकालीन विचारधारणांचे दर्शन घडविण्याचा व त्यातील संगती शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे' या कादंबरीत 'कर्ण' हा हीन कुळातील आणि अर्जुन ब्राह्मण कुळातील असल्यामुळे अर्जुनाला प्रतिस्पर्धी नको म्हणून द्रोण कर्णाला शिष्य म्हणून नाकारतात. हीच गोष्ट, हाच अन्याय, एकलव्याच्या बाबतीत घडून येतो. कादंबरीच्या अखेरीस विद्येची सांगता आहे. व्यासमुनी आशीर्वाद देण्यासाठी येतात. कर्णावर व एकलव्यावर अन्याय केल्याची समज द्रोणाचार्यांना देतात. माणसाच्या कर्तृत्वाला जन्माचे कुंपण घालून तुम्ही विषवृक्षाचे बीजारोपण केले, तर त्याला विषारी फळे लागल्यावाचून राहणार नाहीत. गुरुकुलात भविष्यकाळाचे शिल्पकार तयार करायचे सोडून तुम्ही वर्णद्वेषाचे बाळकडू पाजले व सामर्थ्याला नकार दिलात. पुढे धर्मक्षेत्रे व विद्याक्षेत्रात युध्द होईल. तरुणांना वैफल्य येईल. ते निराशेने ग्रासले जातील. आध्यात्मिक पातळीवरील असणारी वास्तवता यांचा सहज सुंदर मिलाप त्यांच्या लेखनातून दिसून येतो.

या कादंबरीत महर्षी व्यासांचा अंतिम उपदेश आणि त्यांनी केलेले विश्लेषण तत्कालीन मूल्ये आणि धारणा यांच्यातली विसंगती, त्यातील चुकांमुळे झालेले दुष्परिणाम दाखवून देणारे आहे. आत्मचिंतन, भाष्य, दोन भूमिकामधील संघर्ष, प्रतिवाद, संवाद असे या कादंबरीचे काहीसे स्वरुप आहे.

महाभारतातील अर्जुन, कर्ण, परशुराम, अश्वत्थामा, एकलव्य ही पात्रे कादंबरीच्या पटांवर येतात. 'कुरुक्षेत्रे-धर्मक्षेत्रे' या कादंबरीच्या शीर्षकातून मनात चाललेले द्वंद्वही लेखिकेने स्पष्ट केलेले दिसते. या कादंबरीचे लेखन हे कलात्मक आहे. या कादंबरीत व्यक्तिरेखेचे अत्यंत सूक्ष्मतेने केलेले मनोविश्लेषण हा लेखनशैलीचा विशेष म्हणावा लागेल. महाभारताच्या संदर्भाने एका मानवी मनाची होणारी घुसमट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीतील पौराणिक कादंबऱ्या मुख्यतः व्यक्ति प्रधान आहेत. नवीन प्रवाहाचा हा नवाच आविष्कार आहे. स्त्रियांनी लिहिलेल्या पौराणिक कादंबरीत देखील ही व्यक्ती प्रधानता आहेच. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात हा जो पौराणिकतेचा मार्ग स्वीकारला गेला, त्यामध्ये आशा बगे यांच्या लेखनाचा उल्लेख केला जातो.

### १.११.५ 'आकाश' (१९९६) -

'आकाश' या कादंबरीत नाटकाच्या तालमीत काम करणाऱ्या व्यक्तींची पात्रे आहेत. महेश, अशोक हे मित्र उर्मिला, अंजली या त्यांच्या बायका आहेत. ही कादंबरी उर्मिले भोवती विणलेली आहे. ती स्वाभिमानी, जगण्याला सरळ तोंड देणारी, तर नवरा महेश थोडासा अहंकाराखाली स्वतःचा दुबळेपणा झाकणारा. या दोघा पति-पत्नीमध्ये ताण आहेत, ते जीवनाच्या विरुध्द धोरणांमुळे त्यांना मूल आहे. अभिजित अशोक अंजलीला ते नाही. साधारण पाच-सहा पात्रांच्या बदलत गेलेल्या आयुष्याची कहाणी या कादंबरीत गुंफलेली आहे.

### १.११.६ 'सेतू' (२०००) -

'सेतू' ही कादंबरी अंतर्मुख करणारी आहे. कादंबरीतील नायिका 'सुचरिता' ही संपूर्ण कादंबरीमध्ये कोठेही आक्रमक बंडखोर भूमिका घेताना दिसत नाही. 'सेतू' कादंबरीचे कथानक गुंतागुंतीचे तर आहेच पण त्यात रहस्यही आहे. राघवेंन्द्रची आई घरातून निघून गेलेली असते आणि तिचा नृत्यकलेचा अभ्यास असतो, असा उल्लेख येतो; पण त्याचा विस्तार फारसा नाही. सुचरिता

ही बबी मावशीची मुलगी असते हे रहस्य अगदी शेवटी दादांकडून तिला कळते. दादा, आई, बबीमावशी यांची नातीही स्पष्ट केलेली आहे.

'सेतू' कादंबरीमध्ये स्त्री-पुरुष नातेसंबंधातील ताणतणाव लेखिकेने फार सूक्ष्मपणे रेखाटले आहेत. स्त्रियांच्या व्यथा व दुःखांना समजून घेतानाच पुरुष व्यक्तिरेखाच्या वाटयाला येणारे दुःख व एकटेपणाही लेखिकेने समतोलपणे रेखाटलेले आहे. उदा. ब्रिजमोहन या पात्राच्या रुपाने लेखिकेने आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी तरुण, मुले, त्यांचे दिशाहीन जगणे हे लेखिकेने 'सेतू' कादंबरीतील सुमंगलच्या रुपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'सेतू' या कादंबरीत माणसांमधील नात्याचा सूक्ष्म वेध घेत लहान-मोठया व्यक्तिरेखांचा पट यात मांडलेला आहे. पती-पत्नी, नणंद-भावजय, आई-मुलगा, वडील-मुलगी, मावशी, आजी असे विविध नातेसंबंध मनात जणू घरच करतात. जीवनाचे क्षेत्र अमर्याद झाले असताना कलावंताचे सामर्थ्य न प्रकटण्याच्या आजच्या काळात, मध्यमवर्गीय बदलत्या वास्तवाला सामोरे जाणाऱ्या, क्रांती घडवू शकणाऱ्या व सर्व बाजू भरडल्या जाणाऱ्या या काळात लेखिका काही मानवी निष्ठा व मर्मदृष्टीला गवसणारी मूल्ये यांची एक पुर्नःवर्धी तपासणीच नायिकांच्या रुपाने मांडत आहे, आणि नव्या स्त्रीवादाची उभारणी करीत आहे, असे दिसते. 'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी आहे. आपल्या बनारस जवळच्या गंगेच्या काठावर असणाऱ्या खेड्यात राहणारे बाबूजी, माँ, बहिणी, भाऊ, पुतण्या यांच्यात 'सेतू'तला ब्रिजमोहन आतड्याने गुंतलेला आहे. सुचरिता त्याच्याशी लग्न करते पण त्याच्या माणसांशी तिचे नाते जुळूच शकत नाही. आपल्या मायेच्या माणसांपासून स्वतःचे दूर जाणे ब्रिजमोहनला सहन होऊ शकत नाही. त्याचे मानसिक संतुलन ढळत जाते. सुचरिताने कुंठित, हाताश व्हावे अशी परिस्थिती निर्माण होते. याचे चित्रण आशा बगेंनी अचूकपणे मांडलेले आहे.

### १.११.८ 'भूमी' (२००४) -

'भूमी' ही आशा बगे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी आहे. ही नायिका प्रधान कादंबरी आहे. मैथिली ही नायिका कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मद्रासजवळच्या एका खेड्यातील ही पोरकी पोर म्हणजे आई बापाविना वाढलेली, आईचे छत्र लवकरच हरपलेली, अशी ही मैथिली आहे. मैथिलीचे वडील डॉक्टर असतात; पण ते मैथिलीच्या बालपणीच मरण पावतात. वडील हिंदू व आई तमिळ ख्रिश्चन असते. आई हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करत असते. पण ती सुध्दा आजारी पडून काही दिवसांतच मरण पावते. त्यामुळे आई-वडिलांविना पोरक्या झालेल्या मैथिलीला तिची आत्या मुंबईला घेऊन जाते; परंतु तिचे बालपण मद्रासच्या समुद्र किनाऱ्यावर गेल्यामुळे तिला मुंबईमध्ये बंदिस्त वातावरणात करमत नाही. हळूहळू ती शाळेत व कॉलेजमध्ये जाते. तेथे मित्र-मैत्रिणी जमतात. त्यांच्यात ती रमून जाते. मिलिंद, चेतन, कीर्ती यांच्या सोबत ती नाटकातही काम करते. तसेच ती आत्याच्या मुलींच्या (बीना) ओळखीने छोटयाशा ग्रंथालयात नोकरी करते व नंतर देवस्थळीकडे घरकामासाठी जाते. या कादंबरीत मैथिलीच्या मार्फत लेखिकेने स्त्रियांना करावा लागणारा संघर्षच मांडलेला आहे.

'भूमी' कादंबरीमध्ये जीवनाचे क्षेत्र अमर्यादित झाले असताना कलावंताचे सामर्थ्य न प्रकटणाऱ्या आजच्या या काळात मध्यमवर्गीय, बदलत्या वास्तवाला सामोरे जाणाऱ्या, क्रांती घडवू न शकणाऱ्या, तरीही सर्व बाजूनी भरडल्या जाणाऱ्या या काळात आशा बगे यांनी मानवीनिष्ठा, मर्मदृष्टीला गवसणारी मूल्ये यांची एक तपासणीच नायिकांच्या रुपाने मांडलेली आहे. 'भूमी' कादंबरीत आशा बगे यांनी आधुनिक स्त्रिची मनोभूमिका मांडलेली आहे. 'भूमी'ची नायिका मैथिली अनाथ अवस्थेत आत्या घरी राहते. आयुष्य तिला वेगवेगळ्या वाटा दाखवतं, तिचा धर्म कोणता, असे प्रश्न उभे करते. मग तिला विचार करताना वाटतं, माणसं धर्माबद्दल बोलतात की माणसाबद्दल अनुभवतात. धर्म कुठे

असतो? आयुष्य ही तर माणसांची गोष्ट असते. मैथिली माणसांमध्येच जगत राहते, नवे बंध शोधते.तिचा मुलगा अंशुमन तिला पत्र लिहितो. त्याची कविता पाठवतो. त्यात शब्द असतात, मला नाही कुठला वंश, माझं गोत्र सांगणारा, खोलवर गेलेली नाहीत माझी मुलं माझ्या चेतनचे स्त्रोतच येतात, अनिकेत घेऊन अंशुमन जणु त्यांच्या डोळयांनी आईचं जगणंच न्याहाळलं आहे. रक्त, वंश, गोत्र यांचा अर्थ जणु मैथिली, अंशुमन यांच्या रुपाने लेखिकेने मांडलेला आहे.

मैथिली जगता जगता एका सुशिक्षित, सुसंस्कृत आत्मसामर्थ्य कमावलेल्या स्त्रीमध्ये परावर्तित होत गेलेली, आपल्या मनाची चाहूल घेत मैथिली घरी परतते, पण असहाय्य म्हणून नव्हे, तर परिपूर्ण स्त्री म्हणून शेवटी पायाखालची 'भूमी' पक्की असेल तर भय कसलं? श्रध्दा, निष्ठ, मानवी संबंध जगता जगता स्वभावाने उजळलेली मैथिलीची वाट आशा बगे यांनी सहज रेखाटलेली आहे. 'भूमी' या कादंबरीच्या रुपानं भूतकाळ खांदयावर वाहत जगणाऱ्या सुसंस्कृत स्त्रीला स्वबळावर भविष्याकडे मार्गाकडे नवे पाऊलच टाकता आले. सृजनशीलतेतून जन्माला आलेली नवी मैथिली पुराणातील नाही. तिला भूमीनं पोटात घ्यावं, असे वाटत नाही, तर लोक आपली भूमी तयार करुन त्यावर निश्चयानं पाऊल रोवू शकते.

### १.११.९'मुद्रा' (२०१५) -

'मुद्रा'मधील नीरुचे आई-बाबा यांचे घरच्यांना पसंत नसलेले लग्न, यांच्यात असणाऱ्या वर्गीय अंतरामुळे निर्माण झालेले ताण, हे त्यांच्या पूर्वायुष्याचा भाग म्हणून येतात. नीरुचे बाबा तिच्या आईपासून दूर का होऊ लागतात, याची मुळे तेथपासूनच आहेत. परंतु देवाशीषच्या आईचे घरातून निघून जाणे, परत येणे, त्यानंतर देवाशीषच्या जन्माचे रहस्य, नंतरचे त्याच्या आईचे जीवन, संगीतसाधना, तिचे गुरु हे सर्व प्रकरण रहस्यमयच आहे.

'मुद्रा' ही संपूर्ण कादंबरी नीरुची संगीत क्षेत्रातील तपस्या आणि तिचे समर्पण यांचे चित्रण करणारी आहे. अनेक राग, त्यांचे स्वर, त्यांच्या गायनाच्या वेळा आणि त्याचे परिणाम यांचे अस्सल वर्णन आणि त्या क्षेत्रातील व्यक्तींची त्या कलेवरची निष्ठा यांचे प्रभावी चित्रण या कादंबरीत केले आहे. संगीत क्षेत्रातील गुरु शिष्य परंपरेची महतीही या कादंबरीच्या गाभ्यात गुंफली गेली आहे. नीरुचे बाबा, त्याची आई, तिचे गुरु, नीरुच्या गुरु ललिताजी, शास्त्रीजी, गुरुबंधू राजशेखर, नचिकेत आणि शेवटी नीरुकडून ही कला घेणारी मन्नूची मुलगी अशी गुरुशिष्य परंपरा, त्यांच्या साधनेतील कडवेपणा, घराण्यांच्या गायकीतील साम्य या गोष्टीचे जाणकारीने केलेले वर्णन 'मुद्रा' या कादंबरीत आहे.

'मुद्रा' मध्ये दिल्ली शहर व तेथील घटनांचे वर्णन लेखिकेने अचूकपणे टिपलेले आहे. यात लहान मुलांची शाळेची बस पळवून नेल्याची घटना, तसेच नीरुच्या घरात चोरी होणे, ललिता पाराशरांच्या संगीत विद्यालयाला समाज कंटकांनी आग लावून देणे, अशा घटनाही आलेल्या आहेत.

### १.११.१० 'भूमिका' आणि 'उत्सव' (२०११) -

'भूमिका' आणि 'उत्सव' या कादंबऱ्यात नव्या-जुन्या पिढयांतील माणसांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व मानवी नातेसंबंधाची उत्कृष्ट रुपे चित्रित केलेली आहेत. 'भूमिका' मध्ये आजी-आजोबांबद्दल, सोहनबद्दल, शशीबद्दल बोलत राहतात किंवा आजी-आजोबांच्या एकमेकांशी बोलण्यातून त्यांचे स्वभाव कळून येतात. 'भूमिका'मधील मोर्चात भाग घेणारा, अभाव ग्रस्तांबद्दल आपुलकी असणारा समाजमनस्क आणि शिक्षण, नोकरी, लग्न अशी चाकोरी नाकारणाऱ्या सोहनच्या रुपाने आशा बगे यांनी तरुण पिढीच्या वागण्या-बोलण्यातून, क्रिया-प्रतिक्रियांमधून समकालीन जगातील बदलांचा, वातावरणातील अशांततेचा, तरुण पिढीच्या अस्वस्थतेचा, जुन्या नव्यांमधील संस्कृती, विचार यातील अंतराचा स्पर्श या कादंबरीतून आलेला दिसतो.

'भूमिका' मध्ये आजी-आजोबा आपल्या मुलीच्या मृत्युनंतर नातवाचा (सोहन) सांभाळ करतात. जावयाचा त्यात हस्तक्षेप नसतो, ते जुनी पिढी आणि नवी पिढी यांच्यातल्या विचार करण्यातल्या फरकामुळे; पण शेवटी ही आतड्यांची नाती ती तुटणारी नसतातच, असे चित्रण आशा बगे यांनी केलेले आहे.

'उत्सव' या कादंबरीत डॉक्टर सरस्वती आणि तिची बालपणापासूनची मैत्रीण माधवी या दोघींची ही कथा आहे. दोघींची व्यक्तिमत्त्वे निरनिराळी; परंतु सौदार्ह, प्रेम, माया, स्निग्धता हे या मैत्रीचे मूलद्रव्य शेवटपर्यंत कायम राहते. दोघींची आयुष्य समांतर आहेत. दोघींच्या जीवनातले पुरुष त्यांच्याशी वेगवेगळ्या नात्यांनी बांधलेले आहेत. एका अर्थी ते त्यांच्या आयुष्याला परिपूर्णही करतात. सरुच्या आईने तिचे आयुष्य पदराखाली दिव्याची ज्योत सांभाळावी तसे जपले आहे. लग्नानंतर अपघाताने मातृत्वाची आशा कायमची नष्ट झाल्यामुळे सरु स्वतःहून काही दिवसांनी पतीपासून वेगळी होते. एकाकी आयुष्य पत्करते. तिचे एकलेपण तिची आई पोरक्या मुलासारखे जपते. स्वतःचे जगणे सरुत गुंतवते. विजयशी असणारे तिचे बंध, जुन्या पिढीची असूनही आई समजून घेते. सरु विजयचे नाते विजयची पत्नी नंदिनी हिनेही समजून घेतले आहे. तुमच्यापासून मला धोका नाही हे न कळण्याइतकी मी अडाणी नव्हते. ती सरुजवळ एकदा अशी कबुली देते. नंदिनीला सारे मिळाले आहे. हुशार यशस्वी नवरा, मुले, वैभव, प्रतिष्ठा पण सरुला तिचा हेवा वाटत नाही. विजयकडून तिला जो स्नेह मिळतो, तो तिला पुरेसा आहे. ही नाती कडवट होत नाहीत. अपवाद विजय-नंदिनीच्या मुलाचा (समीरचा) एवढेच नाही, तर ज्या निर्मलच्या पत्नीला सरु वाचवू शकत नाही, त्यामुळे सरुला हॉस्पिटल सोडावे लागते तो निर्मलही ती घटना मागे सारतो, तिच्या नव्या हॉस्पिटलच्या रिसेप्शनला नव्या पत्नी-मुलासह हजर राहतो. यासाठी माणसांमध्ये स्वीकारशील वृत्ती, परिपक्वता, प्रगल्भ जीवन जाणीव लागते, या साऱ्यांचे चित्रण आशा बगे यांनी केलेले दिसते.

'उत्सव' या कादंबरीत प्रसूतितज्ञ सरु आणि संसारी पण संवेदनशील मनाची माधवी या दोघींच्या वाटयाला आलेल्या एकटेपणाचे रंग वेगळे; पण दोघींच्या मैत्रीतला धागा माणसांना दुभंगून टाकणाऱ्या याच एकटेपणाचा व मानवी जीवनाचे नातेसंबंध चित्रण आशा बगे यांनी केलेले आहे.

**१.१२ समारोप -**

आशा बगे यांनी कथा-कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार लेखन करुन स्वतंत्र वाट चोखाळली आहे. आशा बगे यांच्या साहित्यात सुखमय जीवनात काव्यासारखे रुतणारे प्रसंग साकार करण्यात आलेले आहे. कथा-कादंबरीमध्ये परंपरेतील आणि वर्तमान काळातील आधुनिकता व त्यांचा निर्मळ मनाने केलेला स्वीकार यांचा आंतरिक मिलाप त्यांच्या लेखणीत कायम आहे. पुरुषाच्या मनातील सहृदयता, त्यांचे अहंमन्य पुरुषी व्यक्तिमत्व, त्यांच्यातील सोशिकता, त्यांच्यातील संगीत, नाटकादी कलातील गूढ चातुर्य या साऱ्या अंगांने स्त्रीबरोबरच अंतर्यामीचा शोध बगे यांची कथा घेते. परंपरेने एका विशिष्ट उंबरठयावर आणून ठेवलेले स्त्रीविश्व, सद्यकालीन पार्श्वभूमीवर पुरुषाच्या निखळ मैत्रीतून निर्माण झालेले स्त्रीचे एक अनोखे विश्व, त्यातूनच निर्माण झालेले ताणतणाव आणि गुंतागुंत एका नव्याच अस्तित्ववेदनेने भारावून जाऊन त्यांची कथा नवीन नात्यांचा शोध घेतात.

'त्रिदल' व 'उत्सव' सारख्या कादंबरीतून मुलीच्या वात्सल्यातून विस्तारित गेलेले एक अभिनव मातृत्त्वाचे विश्व त्या नेमकेपणाने टिपताना दिसतात. आणि स्त्री-पुरुष संबंधातील एकाच नावेतून निर्माण झालेल्या बंध अनुबंधांचा नवीनतेने शोध घेतात. माणसाच्या मनाचा तळ शोधणाऱ्या आणि वाचकांची उच्च अभिरुची गृहीत धरुन तटस्थ संवेदनांच्या एका वेगवेगळयाच उंचीवर वाचकाला घेऊन जाणारी लेखिका म्हणून आशा बगेंची ओळख आहे.कोणत्याही अभिनिवेशाने प्रेरित न होता सातत्याने कादंबरीचे लेखन करुन एका सौम्य, शांत अशा मध्यमवर्गीय जीवनाच्या, भावनांचा जो पट त्यांनी

विणला आहे. त्यांच्या एकूणच लेखनात त्यांनी विशिष्ट मानवी मूल्यांचे महत्त्व वाचकांच्या मनावर ठसविलेले आहे. या काळात आपल्या भोवतालात, निसर्गात, पर्यावरणात, मानवी नातेसंबधात, संस्कृतीत प्रचंड बदल झाले होते. या सगळयात आशा बगे यांचे लेखन एखादया स्थिर, आश्वासक ज्योतीसारखं तेवत राहील असे आहे. 'मारवा', 'दर्पण', 'पूजा', 'मांडव', 'चंदन', 'निसटलेले' आणि 'ऋतूवेगळे' पर्यंत अनेक कथासंग्रह, 'सेतू', 'त्रिदल', 'मनस्विनी', 'भूमी', 'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे', 'मुद्रा', 'झुंबर', 'भूमिका आणि उत्सव' अशा कादंबऱ्यांमधून पारंपरिक विचार, संस्कारांशी नाळ ठेवून आधुनिक विचारधारणेला एका प्रगल्भ समजुतीनं सामोरे जाणारं त्यांचे लेखन वाचकांना अंतर्मुख करत गेले व भरभरुन आनंद देत गेलेले आहे.

मानवी मनाच्या तळाशी असणाऱ्या भावभावनांची वर्तुळे आशा बगे यांच्या लेखनातून दिसून येतात. तसेच आशा बगें यांच्या साहित्यात संयमित शैली, कौटुंबिक प्रतिमाविश्व आणि अनुभवांची उत्कटता ही त्यांच्या कथांची वैशिष्टये आहेत. चिंतनशीतला, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा हे त्यांच्या लेखणीचे बळ आहे.

आजच्या आधुनिक जगात स्त्री ही स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येत आहे. स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या लेखनात जाणवतो. त्यांच्या साहित्यातील स्त्रीत्वाच्या मर्यादा न ओलांडणाऱ्या आहेत. परंतु दुबळया नाहीत. आत्मभान असलेल्या, आपल्या मूल्यांवर ठाम आहेत. आशा बगे यांच्या कथांमधून वा भाषेचे प्रयोग केले नाहीत. तरीही त्यांची शैली अर्थपूर्ण, चित्रमय आहे आणि व्यापक जीवनदर्शनासाठी कादंबरीची निवड केली भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन होऊन कसे येते. याची प्रचिती त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

### १.१३ निष्कर्ष -

१) एखादी सूक्ष्म घटना, त्यातील माणसाचं अडकणं किंवा बाहेर निघणं, सुटणं किंवा गुंतून पडणं किंवा दोन्ही गोष्टींच मिश्रण आशा बगे यांच्या कथा-कादंबऱ्यांतून आलेले आहे.

२) आशा बगे यांच्या कथा-कादंबऱ्यांतून परंपरेची बंधने व आधुनिकतेचा स्वीकार यात माणसाची जी फरफट होते त्याचा शोध घेतलेला आहे.

३) आजच्या जगात वावरताना स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या दुःखाच्या विविध तऱ्हा, पुरुषप्रधान संस्कृतीत तिची होणारी कुचंबणा, सौम्य स्वरुपातील परंपरेविरुध्दची तिची बंडखोरी, तिचे जागृत होणारे आत्मभान या सर्वांचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

४) आशा बगे एक स्त्री असूनही पुरुषांची संवेदनशीलता, त्यांची विचारसरणी व अनुभव आपलीशी करुन त्यातून नवे अनुभवविश्व साकार करण्याचे लेखिकेचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

५) आशा बगे यांच्या लेखनामधून भारतीय जीवनातील कर्मकांड, व्रतवैकल्ये, सण, उत्सव, रुढी, परंपरा,कीर्तन व संगीत इत्यादी विषयाचे ज्ञान आहे.

६) आशा बगे यांच्या लेखनामधून माणसाच्या अंतरंगाचा शोध, त्यांच्या मनातील पारदर्शक नजर शोधून तळ गाठण्याचा व माणसाच्या गूढ स्वभावाचे दर्शन आलेले आहे.

७) आशा बगे यांच्या लेखनात वास्तव जीवनाचे एक साधन म्हणून त्यांनी सातत्याने लेखन केले, त्यांच्या लेखनातून चिंतनशीलता, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा व्यक्त झालेली आहे.

८) आशा बगे यांच्या कथांत प्रत्येकाच्या वाटयाला येणारा अपरिहार्य एकटेपणा, परंपरा, संस्कार यातून जीवनाला आलेला अनेकपदरीपणा, गुंतागुंत आणि तरीही मनाला खुणावणारे संस्कार यांची अनेकपदरी रस्सीखेच आपल्यासमोर साकार केलेली आहे.

## संदर्भ सूची

१) बगे आशा, 'माझे कथालेखन', ललित कथा विशेष अंक', जुलै १९८८, पृष्ठ - ३५.

२) तत्रैव, पृष्ठ - ३५.

३) अवसरीकर स्नेहा, 'आशा बगे यांची मुलाखत', आशय दिवाळी अंक, मुद्रा प्रकाशन, सोलापूर, २००८, पृष्ठ - ७५.

४) वरखेडे मंगला, 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलास राणा प्रकाशन ,नाशिक, १९९६, पृष्ठ - २१.

५) हेर्लेकर सुलभा, अनुभवाच्या रंग, रस, गंध कला स्वीकारणाऱ्या कथांचा संग्रह, 'अत्तर', तरुण भारत, नागपूर, २ जून १९८६.

६) शेवडे इंदुमती, 'मराठी कथा उगम आणि विकास', सोमय्या पब्लिकेशन, मुंबई, १९७३, पृष्ठ - ४८-५१.

७) तत्रैव, पृष्ठ - ४८-५१.

८) तत्रैव, पृष्ठ - ४८-५१.

९) तत्रैव, पृष्ठ - ४८-५१.

१०) कुसुमावती देशपांडे, 'मराठी कादंबरी पहिले शतक,१८५०-१९५०,मौज प्रकाशन, दुसरी आवृत्ती, मुंबई, १९७५, पृष्ठ - १३.

११) कुल्ली स.त्र्यं., 'जी.ए. जीवनदृष्टी आणि प्रतिमा सृष्टी', विजय प्रकाशन, नागपूर, १९९४, पृष्ठ - १.

१२) सहस्त्रबुध्दे अविनाश, 'दशकातील साहित्यिक', ललित अंक' , सप्टेंबर, १९८९.

१३) बगे आशा, 'मारवा', कथासंग्रह, 'रुक्मिणी' मौज प्रकाशन, मुंबई, १९८४, पृष्ठ - १८२.

१४) सिरास श्रीनिवास रामचंद्र, 'आशा बगे एक नवे अस्तित्त्व', युगवाणी, नोव्हेंबर १९८९, पृष्ठ - ६४.

१५) बगे आशा, 'मारवा', 'नात', उनि., पृष्ठ - २०.

१६) बगे आशा, 'मारवा', 'रुक्मिणी', उनि., पृष्ठ - २०.

१७) तत्रैव, पृष्ठ - ६२

१८) बगे आशा, 'मारवा', 'रंग', उनि., पृष्ठ - ९०.

१९) बगे आशा,'अत्तर','बंदिशाळा', पिसारा प्रकाशन, अकोला,१९८३,पृष्ठ १.

२०) तत्रैव , पृष्ठ -३३.

२१) तत्रैव, पृष्ठ - ९५.

२२) तत्रैव, पृष्ठ - ७६.

२३) बगे आशा,'पूजा',मॅजेस्टिक प्रकाशन,गिरगाव,मुंबई, १९८९, पृष्ठ - १८९.

२४) भवाळकर तारा, तिसऱ्या बिंदूच्या शोधात आशा बगे यांची कथा, सूगावा प्रकाशन, पुणे, २००१, पृष्ठ- १०७

२५) बगे आशा, 'निसटलेले' हिवाळा, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे,२०१२, पृष्ठ - ४९.

२६) बगे आशा, 'पाऊल वाटेवरले गाव', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००७, पृष्ठ - ३९.

२७) बगे आशा,'अत्तर',निवडुंग, पिसारा प्रकाशन,अकोला,१९८३,पृष्ठ - ८०.

२८) तत्रैव, पृष्ठ - ७६

२९) तत्रैव, पृष्ठ - ८२.

३०) हेर्लेकर सुलभा , 'आशा बगे एक नवे अस्तित्व, उनि., पृष्ठ - ४८.

३१) बगे आशा, 'मनस्विनी' मेनका प्रकाशन, पुणे, १९७८, पृष्ठ - १०६.

३२) तत्रैव, पृष्ठ - ९२.

३३) बगे आशा, 'झुंबर', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई १९९४, पृष्ठ - ६८.

## प्रकरण दुसरे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कथानक व जीवनदर्शन

२.१ प्रस्तावना

२.२ मराठी कादंबरीचे स्वरुप

२.३ कादंबरीची व्याख्या

२.४ कादंबरीचे घटक

२.४.१ कादंबरीचे कथानक

२.४.२ कादंबरीमधील कथानकाचे स्वरुप

२.४.३ कादंबरीतील स्वभाव रेखाटन

२.४.४ कादंबरीतील वातावरण

२.४.५ कादंबरीची भाषाशैली

२.४.६ कादंबरीतील मनोविश्लेषण

२.५ 'भूमी' कादंबरीचे कथानक

२.६ 'मनस्विनी' कादंबरीचे कथानक

२.७ 'झुंबर' कादंबरीचे कथानक

२.८ 'त्रिदल' कादंबरीचे कथानक

२.९ 'सेतू' कादंबरीचे कथानक

२.१० 'भूमिका' आणि 'उत्सव'

२.११ 'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे'

२.१२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील समाजदर्शन

२.१३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील जीवनसृष्टी

२.१४ समारोप

२.१५ निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

**प्रकरण दुसरे**

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कथानक व जीवनदर्शन

### २.१ प्रस्तावना -

कादंबरी हा एक गद्य वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराची सुध्दा स्वतःची अशी एक बदलणारी संकेत व्यवस्था आहे. कोणत्याही वाङ्मय प्रकाराचे निराळेपण त्यांच्या व्यवस्थेत असते म्हणूनच व्यवस्थेचा नेटकेपणाने अभ्यास केला की, त्या त्या वाङ्मय प्रकाराचे नेमके आकलन होऊन रसास्वाद घेता येतो. कालमानानुसार कादंबरीच्या विविध घटकात झालेला बदल, कथानक, पात्रचित्रण, प्रस्तुतिकरण पध्दती, भाषा इत्यादी. घटकांच्या तंत्रात्मक बदलामुळे कादंबरीच्या रचनेत झालेला बदल, अनुभवाच्या जातीनुसार कादंबरीचे होणारे उपप्रकार, कादंबरीच्या वाटचालीत एकाच प्रकारच्या उपप्रकारात झालेले बदल, नवकादंबरीचा उदय व तिचे स्वरुप इत्यादी. थोडक्यात, कादंबरीची जडणघडण व कादंबरीची स्थित्यंतरे यांचे यथायोग्य आकलन करता येते. कादंबरी हा जीवन प्रवाहाबरोबर चालणारा, वाढणारा व बदलत जाणारा असा साहित्य प्रकार आहे. घटना, कथानक, पात्रे, निवेदनशैली, भाषा इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते.

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा भरपूर मजकूर असतो. या मजकुराला आपण कथानक असे म्हणतो. कथानक नसलेल्या कादंबऱ्यांतदेखील असा निवेदनयोग्य मजकुर असतो. या मजकुराचा घटना, प्रसंग, पात्रे, प्रस्तुतिकरण पध्दती या सर्वांचा कथानकात समावेश होतो. कथानकात हे सारे घटक एकजिणसीपणाने येत असल्यामुळे कथानक एकात्म होते. कथानकात अनेक घटना व पात्रे असतात. त्यांच्या परस्परसंबंधातून विविध क्रिया घडत जाऊन कथानक पुढे सरकत जाते. कथानकाचा अत्यंत लहान घटक म्हणजे घटना, अशा घटनांची कथानकात संख्या भरपूर असते. या घटना नैसर्गिक व मानसिक स्वरुपाच्या असतात. या घटना आयत्या किंवा

तयार नसतात. त्या कादंबरीतील पात्रांकडून विशिष्ट प्रसंगी, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट काळी घडत असतात.

## २.२ मराठी कादंबरीचे स्वरुप -

मराठी कादंबरी १९२०-४७ या काळात स्वतःविषयी अधिक जागरुकपणे विचार करु लागलेली दिसते. मराठी कादंबरीच्या उद्‌गमापासून १९२० पर्यंत कादंबरीकारांनी कादंबरी या वाङ्‌मय प्रकाराविषयी विशेष आत्मीयता बाळगणाऱ्या समीक्षकांनी कादंबरीच्या स्वरुपासंबंधी फारसा विचार केलेला दिसत नाही. का.ब. मराठे यांचा लेख व नाटक हया-विषयी निबंध (१९७२), वि.का. राजवाडे यांचा 'कादंबरी' हा निबंध (१९०२), हरिभाऊ आपटे यांच्या 'विदग्ध वाङ्‌मय' या निबंधात साहित्याच्या स्वरुपाविषयी थोडी चर्चा इतकाच विचार कादंबरीविषयी केलेला दिसतो. वि.का. राजवाडे यांनी कादंबरीचे केलेले दोन वर्ग अद्‌भुत (रोमॅण्टिक) व वास्तविक (रिॲलिस्टिक) व त्यांची मीमांसा आजही महत्त्वाची वाटते. विशेषतः शुध्द अद्‌भुत किंवा शुध्द वास्तविक याविषयी त्यांनी केलेला विचार, अधिक ध्यानात घेण्यासारखा आहे. रागिणी व तिची भावंडे (१९१८) सारख्या कादंबरी वाङ्‌मय प्रकाराचे स्वरुप लक्षात घेऊन लिहिलेल्या समीक्षात्मक लेखही अपवादात्मक आहे.

'यमुना पर्यटन' (१८५७) सारखी मराठीतील आद्य वास्तववादी कादंबरी बाबा पद्मनजी व पुढे ह.ना. आपटे यांनी (१८९५) पासूनच्या सामाजिक वास्तववादी कादंबऱ्या एका बाजूला व मुक्तामाला मंजुघोषादी कल्पित अद्‌भुतरम्य चमत्कारिक गोष्टी दुसऱ्या बाजूला, यांच्या समांतर प्रवाहामुळे कादंबरीविषयी विचार करताना रोमॅण्टिक व वास्तववादी या संकल्पनांचा विचार व्हावा हे स्वाभाविक होते. कादंबरीच्या स्वरुपाचे वर्णन करताना व्यवच्छेदक लक्षण म्हणून निर्णयात्मकरीत्या काही सांगणे कठीण आहे. त्याचप्रमाणे रोमॅण्टिक व वास्तविक किंवा वास्तववादी यांच्या सीमारेषा कादंबरी वाङ्‌मय प्रकाराच्या संदर्भात एकमेकांत मिसळून गेलेल्या दिसतात.

कादंबरी हा वाङ्मय प्रकारा इतकाच सर्वसमावेशक आहे की, त्याला व्याख्येच्या चौकटीत पकडणे किंवा कादंबरी या नामाभिधाने अंगुलिनिर्देश करण्यात आलेल्या सर्व कादंबऱ्यांचे व्यवच्छेदक करणे आजही कठीण होऊन बसले आहे. १९२० च्या मराठे प्रभृती टीकाकारांचा भाबडेपणा स्पष्ट करताना वा.ल. कुलकर्णी यांनी वाङ्मयप्रकाराची जी दोन लक्षणे सांगितली आहेत, त्याचा इथेच थोडासा विचार करायला हरकत नाही. वा.ल. कुलकर्णी म्हणतात, घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्या आधारे गुंफले जाणारे 'कल्पित गोष्टी'तील कथासूत्र आणि कादंबरीतील कथासूत्र यांच्यात महत्त्वाचा कोणता भेद आहे ते पडताळून पाहण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही.

कथा वाङ्मयाची मानवाला जन्मापासून आवड असलेली दिसते. करमणूक ज्ञानप्राप्ती, जीवनाची जाणीव यासाठी कादंबरी, कथा, नाटक या वाङ्मय प्रकाराचा उपयोग केला जात आहे. पण सर्वच साहित्य प्रकारात कादंबरी जास्तीत जास्त लोकांच्या पसंतीत उतरलेली दिसते. कादंबरीची आस्थायता, काव्यापेक्षा तिची थोडी सैल व मर्यादित बंधने, वाचकप्रियता या बाबीमुळे कादंबरी हा वाङ्मय प्रकार, भरभराटिला आला. कादंबरी या शब्दाचा अर्थ 'कल्पित कथा' असा असला तरी त्याचा शाब्दिक अर्थ 'कदंबफुलापासून तयार केलेले मद्य किंवा आसव' असा आहे. मदिरेचे प्राशन करताच मनुष्याला ज्याप्रमाणे इहलोकाचा विसर पडतो व कल्पनेच्या सुखद संसारात विहार करु लागतो. त्याप्रमाणे 'कादंबरी वाचत असताना वाचक त्यात इतका तन्मय होतो की, त्यास सभोवतालच्या विश्वाचा विसर पडतो व तो कल्पनेतल्या जगाचा आस्वाद होतो. त्यात रममाण होताना त्याला जो अनिर्वचनीय आनंद होतो. हेच कादंबरी वाङ्मयाचे वैशिष्टय होय.

मराठी साहित्यात 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार तसा नवीन व परकीय असला तरी 'कादंबरी' हे नाव मात्र आपलेच कथा कादंबरी, तिची नायिका 'कादंबरी' असून ती सर्वांच्या परिचयाची आहे. ही नायिका मराठी साहित्यात

एक वाङ्मयीन प्रकार घेऊन अवतरली, त्यामुळे मूल अर्थाच्या संगतीने तिचे 'कादंबरी' हे विशेषनाम सामान्यनाम झाले ते त्यातील विशेष गुणांमुळेच.'नॉवेल' या इंग्रजी शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून प्रथमावस्थेत 'नवलकथा' हे नाव दिले गेले खरे. पण ते नाव कोणालाच कळले नाही. इतकी त्यात उत्स्फूर्तता होती, असेच म्हणावे लागेल. कादंबरी हे नाव १८३० च्या पूर्वीच पडले असावे. कारण १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र भाषेच्या कोषात 'कादंबरी' हा शब्द आढळतो.

## २.३ कादंबरीची व्याख्या -

कादंबरी म्हणजे समाज व निसर्ग याविरुध्द व्यक्तीच्या चाललेल्या संघर्षाचे महाकाव्य होय. कादंबरीचा जीवनपट मोठा असल्याने जीवनाचे वैचित्र्य त्यात येते. आधुनिक मानवाच्या आशा, आकांक्षांचे चित्रण, त्यांच्या वादळी जीवनाचे दर्शन हे सर्वच विषय यात हाताळले जातात. अर्नेस्ट बेकर यांच्या मते, "ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय."[१]

कॅथरीन लिव्हर यांच्या मते, "कादंबरी म्हणजे मर्यादित लांबीचा गद्य वृत्तांत असलेला 'घाट' होय. ज्यात लेखकाने निर्माण केलेल्या काल्पनिक वास्तव जगतात वाचकाला गुंतवलेले असते."[२]

प्रा.श्री.मा.कुलकर्णी यांच्या मते, "कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी होय."[३]

प्रा. बापट व गोडबोले यांच्या मते, "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करुन काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अशी तदवलंबित जीवित घटना यांचे गोष्टीरुपाने वर्णन करुन व कलानदाची प्राप्ती करुन जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग

म्हणजे कादंबरी होय."[४] वेब्स्टरने आपल्या शब्दकोशात कादंबरीच्या विविध अंगावर प्रकाश टाकताना जी व्याख्या केली, ती कशी "विशिष्ट पध्दतीने मानवी समूहाचे कल्पनेने जाणलेले अनुभव शृंखलाबध्द घटनांद्वारे व्यक्त करणारी, मुद्दाम शोधून लिहिलेली विस्तृत आणि गुंतागुंतीची अशी कल्पित गद्य कथा म्हणजे कादंबरी होय."[५]

जे.बी. प्रिस्टले यांच्या मते, "कादंबरी म्हणजे मानवी जीवनाचा आरसा होय."[६] कादंबरी म्हणजे व्यक्तित्वाचे दर्शन घडविणारी, त्याच्या जीवनाविषयक दृष्टिकोन व्यक्त करणारी ललित गद्य कथा होय. अशा प्रकारे अनेक विद्वानांनी आपापल्या परीने कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरुन कादंबरी म्हणजे, 'मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी एक ललित गद्यकथा आहे.' तिचा विषय कोणताही असो, पण त्यातून मानवी जीवनाचे चित्रण होणे आवश्यक आहे. कालमानाप्रमाणे जीवनात बदल घडतो. त्याप्रमाणे कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या जीवनदर्शनातही बदल होतो. मानवी जीवन, मूल्ये, विचार, परंपरा, जीवनाची साधने सर्व बदलले तरी मानवी स्वभाव बदलत नाही. कालचा स्वार्थी मनुष्य व आजचा स्थार्थी माणूस यात काहीही फरक झाला नाही. कादंबरीचा विषय मानव आणि मानवी जीवन हाच असल्याने ती सामाजिकच असते.

आधुनिक युग हे व्यक्तिवादी युग आहे. या युगाचे चित्रण करणारी कादंबरी व्यक्तिवैशिष्टयाचे विविध दृष्टिकोन आपल्यासमोर उघड करीत असल्याचे तिच्या अंतरंगात विविधता व वैचित्रता येत आहे. त्याचबरोबर तिच्या अंतरंगाचा विकासही होत आहे. धार्मिक व पौराणिक युगात व्यक्तीला व त्याच्या विचारांना समाजबाहय असे स्थान नव्हते. त्यामुळे रामायण, महाभारत यांसारख्या महाकाव्यातून मानवी जीवनाचे विशाल चित्र असूनही लेखकाचे स्वानुभव त्यात व्यक्त केलेले आढळत नाहीत. स्वानुभव अभिव्यक्तीला साहित्यात त्याकाळी स्थान नव्हते. साहित्यातून व्यक्तिवादी दृष्टिकोन व्यक्त

करण्याचे श्रेय औद्योगिक क्रांतीला दिले पाहिजे. काही काळ कादंबरीत व्यक्तीपेक्षा घटनांना जास्त महत्त्व प्राप्त झाले होते. परंतु लवकरच तिने आपले ध्येय, व्यक्तिजीवन निवडले व आज कादंबरी व्यक्तीवादी बनली आहे. कादंबरीत मनुष्याच्या जीवनाचे विविधांगांनी केलेले चित्रण आणि त्यांच्या चरित्र्याचा विविध परिस्थितीत दाखविलेला विकास या दोन गोष्टी कादंबरीशिवाय इतर साहित्य प्रकारात पहावयास मिळत नाही. त्यामुळेच 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार अतिशय लोकप्रिय झाला.

कादंबरी या वाङ्मय प्रकारात माणूस स्वभावतःच गोष्टी वेल्हाळ आहे. मग त्या गोष्टी काल्पनिक अथवा सत्यावर आधरित असतात. दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनातील घडामोडी समजून घेण्याची त्याला उत्सुकता असते. त्या घटनांची आपल्या जीवनातील अनुभवांशी तुलना करुन त्यांची वास्तव संगती माणूस लावत असतो. माणसाच्या या स्वभावाची सत्यता आपणाला पटते, ती त्यांच्या कथा व कादंबऱ्यांमधून लक्षात येते. कादंबऱ्यांमध्ये वेगवेगळ्या घटकांनी कथात्मक कसे गुंफत जाते व त्यातून एखादा आशय किती सलोख मांडला जातो व त्याचा वाचकांवर किती परिणामकारक ठरतो व त्या कलाकृतीला किती वाङ्मयीन मूल्ये मिळवून देतो, या सर्वांचा विचार यात करावयाचा आहे.

## २.४ कादंबरीचे घटक -

कादंबरी हा जीवन प्रवाह बरोबर वाहत, वाढत व बदलत जाणारा एक प्रवाही साहित्य प्रकार आहे. घटना, कथानक पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषाशैली इत्यादी घटकांनी कादंबरीचा रुपबंध बनलेला आहे. मानवी जीवनात काही ना काही घटना सतत घडत असतात. अशा घटनांनीच त्यांचे जीवन समृध्द होत असते. ह्या घटनांचा मानवी स्वभावावर परिणाम होत असतो. कादंबरीकार या घटनांची गुंफण लेखक करत असतात. घटना व व्यक्ती यांच्या आधारावरच कादंबरीची उभारणी तो करतो. त्यामुळेच घटना व व्यक्ती ही

कादंबरी निर्मितीची प्रमुख साधने आहेत. या साधनांच्या आधाराने जो विषय रंगवला जातो, त्यास कादंबरीचे कथानक असे म्हणतात. कथानकास कादंबरीचा प्रमुख घटक समजले जाते. लेखक जे सांगतो त्यास कथानक असे म्हणतात. ज्यांच्याबद्दल सांगतो त्या मानवी व्यक्तीनाही त्यात तितकेच महत्त्व असल्यामुळे व्यक्तिचित्रण हा कादंबरीचा दुसरा प्रमुख घटक म्हणता येईल. या शिवाय विषय, वातावरण, शैली, उद्देश, संवाद, मनोविश्लेषण हे कादंबरीचे इतर घटक आहेत. कादंबरीत कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, भाषा हे चार प्रमुख घटक असून व्यक्तिरेखेतच मनोविश्लेषणाचाही समावेश होतो.

### २.४.१ कादंबरीचे कथानक -

कथानक हा एक प्रकारे कादंबरीचा गाभाच आहे. कथानकात अनेक प्रसंगाची साखळी असते. पण केवळ कालानुक्रमे या प्रसंगाची माहिती दिली, तर ती कथानक या संज्ञेला पात्र होत नाही. तिला संगीतवार हकीगतीचे स्वरुप येईल. कथानकात केवळ कालानुक्रमे प्रसंगाने वर्णन किंवा कथन नसून त्यामागील कार्यकारणभावाचा दुवा स्पष्ट वा सूचित केलेला असतो. कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता कारणमीमांसा व कुतूहल निर्मिती हे गुण आवश्यक आहेत. पण कथानकाला पुढे कशी गती मिळणार, याविषयी वाचकाच्या मनात कुतूहल निर्माण होते. कादंबरीचा मुख्य कथानकातील रहस्य खुलविण्यासाठी उपकथानकाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. उपकथानकातच कुशलतेने वापर केला, तर कथानक सरस ठरते. पण उपकथानकाची जुळणी नीट झाली नाही, तर त्यामुळे कथानकाचा तोल सुटण्याचा जास्त संभव असतो. म्हणूनच उपकथानके मुख्य कथानकाशी एकजीव झालेली किंवा साम्यविरोधाने मुख्य कथानकावर प्रकाश टकणारी असायला हवीत.

कादंबरीच्या रचनेचा जेंव्हा आपण विचार करतो, तेंव्हा त्यात कथानक, पात्रनिर्मिती, भाषा, संवाद, वातावरणनिर्मिती घटनाक्रम अशा सर्व घटकांचा

विचार करण्यात येतो. आपण घेतलेला अनुभव इतरांना सांगून आनंद मिळविणे हा मानवी स्वभाव आहे. यातूनच गोष्ट सांगणे, कथन करणे, यातच त्याचा जन्म झाला. अतर्क्य मानवी जीवन आणि निसर्ग यांच्या कुतूहलातून कथा जन्माला आली. मग संगतवार, क्रमवार सांगितलेल्या घटनांना, प्रसंगांना कथानक म्हणून संबोधले जाते.

### २.४.२ कादंबऱ्यांमधील कथानकाचे स्वरुप -

कादंबऱ्यांच्या कथानकातून मानवी जीवनाचा विविधरंगी पट उलगडला जातो. मानवी जीवनाचे व्यापक दर्शन त्यात घडते. मानवी जीवनातील घटना, प्रसंग, भावना, संवेदना, जीवनसंघर्ष हया सर्वांनी मिळवून कादंबरीचे कथानक तयार होते. तसेच कादंबरीतील घटनांची जुळणी कालतत्त्व आणि कार्यकारणभाव याबरोबरच तिची कलात्मकता लक्षात घेऊनच कादंबरीकार लेखन करत असतात. या तत्त्वांनी कादंबरीच्या कथानकास अर्थ आणि आकार प्राप्त होतो. सामान्यतः कादंबरी आपण वाचतो ती तिच्या प्रदीर्घ कथानकाच्या मोहाने, मानवी जीवनाचे व्यापक दर्शन कादंबरीकार घडवू शकतो, हे इंग्रजीमधील काही कादंबऱ्यांमधून दिसून येतो.

मराठी साहित्यामध्ये इतर वाङ्मय प्रकारापेक्षा व्यापक, गुंतागुंतीचे विशाल दर्शन घडविण्यास कादंबरीकाराला अधिक वाव असतो.अनेकविध पात्रे, प्रसंग, घटना उक्ती-कृती, वृत्ती-प्रवृत्ती, खच्चून भरलेले तपशील यांना कादंबरीत भरपूर जागा असते. कादंबरीच्या कथानकासंदर्भात, बापट व गोडबोले म्हणतात की, "कादंबरी म्हणजे एका किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील विविध प्रसंगाची चतुराईची गुंफण होय."[७] त्यासाठी त्यांनी टिपऱ्यांचे खेळाचे उदाहरण दिले. टिपऱ्याच्या खेळात गोफ विणत असताना मुले निरनिराळ्या रंगाचे दोर घेतात. दोर जितक्या जास्त रंगाचे असतील तितका गोफ दिसावयास जास्त चांगला असतो. त्याचप्रमाणे कुशल लेखकही कथानकात अनेक धागे विणून त्यांच्यात आलटापालट करतो. तो एका

घटनेकडून दुसऱ्या घटनेकडे वाचकांचे लक्ष नेऊन त्यांची उत्कंठा जागृत करुन ती कायम ठेवण्याचा प्रयत्न करतो.

कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना, मनोवस्था, व्यक्तिरेखाटन किंवा घटना पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रसंगाची निवड करणे आणि मुख्य प्रसंगांना उठाव मिळेल, अशा प्रकारे त्यांची मांडणी करणे हे कथानकाच्या रचनेचे सूत्र होय. कार्यकारणमीमांसा व कुतूहल निर्मिती हे कथानकाचे दोन प्रमुख विशेष असतात. उत्कंठा निर्माण करणे सोपे असले तरी ती टिकविणे कठीण असते. घटनांना संभाव्य पण अपेक्षित वळण देताना स्वभाव रेखांशी लेखकाने इमान राखले पाहिजे. अन्यथा ते कथानक कृत्रिम बनेल. म्हणून सहजता व संभवनीयता ही कुतूहल निर्मितीची पहिली अट आहे. त्यासाठी पात्र प्रसंगाच्या क्रिया-प्रतिक्रिया, स्वभाव व घटना यात लेखकाला संवाद व संबंध राखावा लागतो.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप स्पष्ट करताना ज्येष्ठ समीक्षक भालचंद्र नेमाडे लिहितात की, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली, अशी साहित्यकृती असते. कादंबरीस या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकारल्याने मांडता येते. कादंबरीचा सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह मांडलेला असतो. एखाद्या पोटसमूहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी असतात."[८] कथा,कादंबरी व नाटक या प्रमुख वाङ्यम प्रकारांत एके काळी कथानक हा अत्यंत आवश्यक घटक मानला जात असे. तथापि, आज मात्र कथानकाकडे पाहण्याची लेखकांची दृष्टी

बदलत चालली आहे, असे दिसते. पूर्वी ती फडके, खांडेकर वळणाची परंपरा होती. परंतु नवलेखकांनी ही पारंपरिक कल्पना झुगारुन दिलेली दिसते.

कथानकाच्या चौकटीत अनुभवांना न कोंबता अनुभवाच्या आकारानुसार ते कथानकाची रचना करीत आहेत. तर काही अनुभव हे मनोविश्लेषणाच्या आधारेही ते मांडतात. त्यामुळे आज निरनिराळ्या वाङ्मय प्रकारांतून कथानकाचे महत्त्व कमी होत गेलेले दिसते. विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण', भालचंद्र नेमाडेंच्या 'कोसला' व इतर काही लेखकांच्या साहित्यातून दिसून येते. अशा साहित्यकृती अभ्यासल्या म्हणजे कथानकाच्या संकल्पनेत कसा बदल झाला ते कळते. जीवनात पदोपदी अनुभवास येणाऱ्या अर्थपूर्ण अनुभवांचे चित्रण, त्यातील तरल संवेदनांचे चित्रण कथानकाच्या साच्यातून न मांडता मुक्तपणे मांडलेले दिसते. डॉ. सुलभा हेर्लेकर या आशा बगे यांच्या साहित्याविषयक म्हणतात की, "कथागन विषयाची सुसूत्र व ओघवती मांडणी, त्यामुळे कादंबरी वाचून होताच वाचक भारावून जातो. कादंबरीचा तोल गेल्यासारखा वाटतो. तर अर्ध्यापर्यंत ही कादंबरी आत्यंतिक वेगाने आपणाला खेचून नेते. तिचा शेवट गुंडाळल्या सारखा वाटतो. पहिल्या जोमाने पुढे जाणे तिला जमले नाही. पण एवढे मात्र खरे की स्त्री लेखिकांच्या संदर्भात नव्याने प्रकाशात येणाऱ्या, वेगळी वाट व वेगळा प्रयोग घेऊन आलेली ही कादंबरी महत्त्वाची वाटते."[९] कादंबरीच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत कथानकाची व्याप्ती असते त्यामुळे थोडक्यात कथानक सांगणे कठीन जाते ढोबळ घटना सांगता येतात. घटनांची अनुक्रमाणे सांखळी जोडत गोष्ट सांगता येते. अशा विविध प्रकारचे अनुभव व मानवी जीवनासंबंधीचे परीपूर्ण आकलन कादंबरीत होताना दिसते.

### २.४.३ कादंबरीतील स्वभाव रेखाटन -

मनुष्याच्या सर्व जिज्ञासेचा अती आवडता विषय मनुष्यच होय. कारण मनुष्य स्वभावातील निरनिराळ्या गुणधर्माशी तो पुष्कळदा स्वतःच्या स्वभावाची

तुलना करीत असतो. जगातील कितीतरी व्यवहार मानवी कृतीच्या परस्पर क्रिया-प्रतिक्रियारुप असतात. तेंव्हा या क्रिया-प्रतिक्रियांच्या मागे कोणत्या मनोवृत्ती, भावनासंमती वा विचारपरंपरा प्रेरक होत असतात. हे जाणण्याचे त्याला अगत्य असते. मनुष्य स्वभावाचे कोडे काल्पनिक उदाहरण देऊन का होईना कोणी उलगडून देईल, तर लोक त्याला धन्यवादच देतील. स्वतःच्या स्वभावाची व प्रवृत्तीची जेथे पुष्कळास पारख नसते, तिथे केवळ बाहय स्वरुपावरुन सभोवताली नित्य वावरणाऱ्या लोकांची परीक्षा ती काय घेणार? बाह्य सृष्टीतील विविध दर्शनापेक्षा मानवी अंतःकरणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्याचे दर्शन वाचकास घडले, तर त्यास अधिक आल्हाद होते. कथानकाच्या चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शन ज्या कादंबऱ्यांतून घडत असेल ती कादंबरी श्रेष्ठ होय.

कादंबरीत मानवी स्वभावाचे विविध पैलू आपणास पहावयास मिळतात. यालाच व्यक्तिचित्रण म्हणतात. हे व्यक्तिचित्रण जेवढे स्वाभाविक असेल तितकी कादंबरी वाचकाला आवडेल. एखादया प्रसंगी अमुक एक व्यक्ती अशी का वागली, त्यामागची कारणमीमांसा कादंबरीकार  करतो. कादंबरीतील पात्रे जिवंत आणि वास्तव वाटावीत म्हणून त्यांच्या अंतरंगाचे व बर्हिरंगाचे सूक्ष्म स्वाभाविक आणि मार्मिक चित्रण करावे. पात्राच्या वर्तनामागील हेतू, त्यांच्या मनातील क्रिया-प्रतिक्रियांचे अचूक वर्णन करणे यालाच मनोविश्लेषण म्हणतात. आधुनिक लेखकांना मनोविश्लेषणाचे हे साधन अतिशय उपयोगी आहे. लेखकाने कल्पना व वास्तवता यांचा मेळ घालून स्वतःचे असे एखादे वैशिष्टय घालावे म्हणजे व्यक्तिदर्शन सजीव, वास्तव स्वाभाविक होईल.

विशाल अशा सृष्टीतून आपल्या कथानुरुप पात्रांची निवड करुन त्यांचे दर्शन कादंबरीत करणे यातच व्यक्तिचित्रणाचे वैशिष्टय आहे. देश, काल, परिस्थिती, लिंगादी भेद व्यक्ति चित्रणात दाखवले नाहीत, तर ते उचित ठरणार

नाही. समुद्रकाठावरची माणसं धाडसी असतात पुरुष जात्याच शूरवीर धाडसी असतात, तर स्त्रिया भावनाकूल व हलक्या प्रकृतीच्या असतात.

कादंबरीतील व्यक्तीच्या जीवनाशी, त्यांच्या भावभावनांशी, विचारांशी समरस होण्याचा गुण असला पाहिजे. ही समरसता कल्पनेनेच आणावी लागते. कादंबरीकार ज्या मानाने व्यक्तीच्या भावनांशी एकरुप होईल त्या मानाने त्यांचे व्यक्तिचित्रण जिवंत सरस व स्वाभाविक होईल. समरसता हा व्यक्तिचित्रणाचा प्राण आहे. पुष्कळदा कादंबरीकाराच्या काल्पनिक व्यक्ती म्हणजे परिचित व्यक्तीतच थोडा बहूत फेरबदल घडविलेले नवीन नमुने असतात. अशा वेळेस तो प्रतिभाशक्तीने परिचित व्यक्तीच्या सांगाड्यात आकृती विशेष व गुणविशेष आणखी नवीन व्यक्ती निर्माण करतो.

## २.४.४ कादंबरीतील वातावरण -

कादंबरीकार आपल्या भोवतालच्या जगातून आपले अनुभव गोळा करीत असतो. कादंबरीचा पट विस्तीर्ण असल्याने कादंबरीतील व्यक्तीच्या आजूबाजूचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी तो भरपूर तपशील पुरवू शकतो. त्यामुळेच कादंबरीतील पात्रांच्या जीवन दर्शनाला वास्तवता येते. व्यक्तिरेखा कोणत्या काळातील आहे हे कळण्यासाठी लेखकाला कालसंदर्भ पुरवावा लागतो. त्यासोबत समाजचित्रण, व्यक्तिरेखाचे पोशाख, त्यांच्या मुख्य कल्पना, समाजातील चालीरीती, सांस्कृतिक संदर्भ अशा अनेक गोष्टीतून कालचित्र लेखक तयार करतो. या काल वैशिष्टयांमुळे कादंबरीतला अनुभव नेमकेपणाने व्यक्त करता येतो. स्थलवैशिष्टय ही वातावरण निर्मितीच्या संदर्भात महत्त्वाचे असते.

चित्रकलेत पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे कार्य आहे. चित्रातील पार्श्वभूमीने त्या चित्रातील देखाव्यात जमाइतकेच नव्हे, तर त्या चित्रातील विशिष्ट प्रसंगाचे खरे मर्म कळण्यास जशी मदत होते, तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास

फार उपकारक होते. सृष्टीतील एखादया सुंदर देखाव्याचे चित्र करीत असता, त्या देखाव्याची निसर्गातील पार्श्वभूमी ही त्या चित्राचाच विषय होऊन चित्रामध्ये पृष्ठभूमीच्या ठिकाणी यावी, त्याप्रमाणे ऐतिहासिक किंवा कित्येकदा सामाजिक कादंबऱ्यात अशा वातावरणाला साहजिकच कथानकाइतकेच महत्त्व प्राप्त ते निव्वळ पूरक घटक न राहता कथानक किंवा व्यक्तिदर्शन याप्रमाणेच कादंबरीचे मुख्य घटक होते. कादंबरीत योग्य ते वातावरण निर्माण करण्यात जर ग्रंथकारास यश लाभले, तर कथानकातील विविध प्रसंग आणि घटना यामधील कार्यकारणभावाची संगती सहज प्रकट होऊन व्यक्तिदर्शनाचे खरे मर्मही वाचकास सुलभ रीतीने प्रतीत होते. स्थलकाल वैशिष्टयाचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच वातावरण होय.

वातावरणाचा आपण तंत्रदृष्टया विचार करु लागले की, प्रथम आपली दृष्टी स्थलविषयक किंवा भौगोलिक वातावरणाकडे वळते. याचा सर्वात परिचित प्रकार म्हणजे कादंबरीतील प्राकृतिक वर्णने हा होय. मानवी भावनांची द्वंद्वे चालली असतात. संवादी किंवा विसंवादी पार्श्वभूमी म्हणून निसर्गाची वर्णने देण्याचा ग्रंथकाराचा प्रभाव असतो. यामुळे त्या मानवी भावभावनांच्या चित्रणाला फार चांगला उठाव मिळतो. प्रसंगानुरुप, प्राकृतिक वर्णन करुन कथानकातील घटनांना किंवा भावनांना, खळबळीला साम्यविरोधी उठाव आणणे हा भौगोलिक स्थलविषयक महात्म्याचा अगदी सामान्य प्रकार झाला याचा पुढचा प्रकार म्हणजे एखाद्या विवक्षित रापूनच आपल्या कथानकाची उभारणी करावयाचे व त्या प्रदेशातील स्थलाचे असे हुबेहूब त्या प्रदेशाचा नकाशा वाचकांच्या डोळ्यांपुढे उभा राहतो. अशा तऱ्हेने भौगोलिक वातावरण निर्माण करणे हे वाचकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

### **२.४.५ कादंबरीची भाषाशैली -**

कादंबरी हा निवेदन प्रधान, कथात्म असा वाङ्मय प्रकार आहे. त्यात अनुभव, विविध अंगांनी प्रकट होतो. जीवनाच्या विविध अंगांना तो स्पर्श

करतो. कादंबरीला आकार देणाऱ्या व्यक्तिरेखा, त्यांचे परस्परसबंध त्यांच्या कृती, कादंबरीतील घटना, प्रसंग या सर्वांची मांडणी करण्यासाठी कादंबरीकारा जवळ निवेदन हे साधन असते. निवेदने, वर्णन व संवाद या घटकांनी कादंबरीची भाषा तयार होते. त्यामुळे ही भाषा जितकी नेहमीच्या सरावातील व स्वाभाविक असेल तितकी चांगली. सहज सुंदरता व स्वाभाविकता हे दोन्ही गुण चांगल्या कादंबरीच्या भाषाशैली संदर्भात येतात. प्राचीन परंपरेप्रमाणेच कादंबरीच्या भाषेलाही नटवून ती वापरली जाते. पुढे वर्णनात्मक हा भाषाशैलीचा विशेष मानला जाई. आता मात्र त्यात संवादात्मकताही आली आहे. 'भाषेला मिळालेले विशिष्ट वळण म्हणजे भाषाशैली होय. कथानकात वातावरणाच्या निर्मितीमुळे वास्तवता येते.

वातावरणामुळे व्यक्ती व घटना यांच्या चित्रणाला उठाव मिळतो. "भाषाशैली म्हणजे विचार व भावना शब्दांच्या द्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य; पण शैली या शब्दाने भाषेला मिळालेले विशिष्ट वळण, असा अर्थ सूचित होतो. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देशकाल परिस्थितीचा जसा प्रभाव पडतो तद्वत प्रत्येकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तित्वाचा प्रभावही पडतो, म्हणूनच शैलीवरुन लेखकाच्या व्यक्तित्त्वाची कल्पना येते."[१०] व्यक्तीकडून वापरल्या जाणाऱ्या भाषेत जे वैयक्तिक विशेष प्रकट होतात त्याचा परिणाम नामांकित लेखकांच्या ठिकाणी विशेषच दिसतो. पण भाषेत लेखकाचे व्यक्तित्व प्रतिबिंबित झालेले असते. याचा अर्थ लेखकाच्या मनाचे संपूर्ण दर्शन त्याच्या भाषाशैलीत घडते असे नाही. "माणसाची भाषा व त्याची कृती यांच्याद्वारे त्या माणसाच्या व्यक्तित्वाची जी कल्पना आपल्याला मिळते तिला मर्यादा आहे."[११] कादंबरीत निवेदनाला फार महत्त्व असते. त्यानुरुप भाषा लिहिता यायला हवी. त्यासाठी व्यक्तिरेखेशी समरस होणे आवश्यक असते. तरच अनुभवाच्या अनेक बाजू समर्थ, भाषाशैलीतून प्रकट होतात.

### २.४.६ कादंबरीचे मनोविश्लेषण -

ललित वाङ्मयात ज्या व्यक्तीचे दर्शन घडविलेले असते, त्या जिवंत वाटल्या म्हणजे प्रत्ययकारक ठरतात. ग्रंथमालांच्या कित्येक कादंबऱ्यांमधून उत्तम स्वभाव लेखनासाठी मनोविश्लेषणाचा उपयोग आढळतो. "मनाचे अगदी सूक्ष्मांतले सूक्ष्मतंतू कसे हलत असतात, स्वाभिमान, प्रेम, स्वार्थ इत्यादी विकारांची आंदोलने या मानस सरोवरात कशी चालू असतात, त्याचे यथार्थ वर्णन म्हणजे मनोविश्लेषण होय."[१२] म्हणजे मानसशास्त्राच्या ज्ञानाबरोबर मनुष्य स्वभावाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. कोणताही मनुष्य सर्वगुण संपन्न नसतो. किंवा दुर्जन नसतो. यामुळे लेखकाची व्यक्तिदर्शन करण्याची जबाबदारी वाढते. मानसशास्त्रांतील संशोधनाने मनोविश्लेषणावर दिलेला भर व पात्रांच्या हृदयाचे पडदे न् पडदे उकलून दाखविण्याच्या प्रयत्न, एका दृष्टीने कादंबरीचा विकासच होय.

आशा बगे यांच्या कादंबरीत अनेक पात्रे, अनेक प्रसंगाची गुंफण आहे. अनेक उपकथानके मुख्य कथानकाशी जोडलेली आहेत. पात्रे व प्रसंग यांच्यामुळे कथानक बहुविध व आकर्षक बनते. कादंबऱ्यांतून सर्व कथानकांच्या अर्थपूर्ण उलगडा होत जातो. यातील सर्व पात्रे विविध मनोवृत्तीची, स्वभावाची व्यक्तिमत्त्वाची असतात. त्यांच्या वर्तनामुळे प्रसंगाची एक दीर्घ मालिका तयार होते. त्यातून मानवी स्वभावाचे दर्शन घडते. त्यातील प्रसंग मनाची पकड घेतात.

### २.५ भूमी कादंबरीचे कथानक -

आजच्या आधुनिक जगात स्त्री बुध्दीच्या, जिद्दीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर ती यशाची शिखरे गाठत जाते. सगळ्या मुळे तिच्याकडे असामान्य कर्तृत्व असणारी स्त्री म्हणून कुटुंबातले सर्वजण तिच्याकडे पाहतात. तिच्या मनाची एकाकी अवस्था होते. 'भूमी' या कादंबरीत एका पोरक्या पण मनाची आणि जीवनाच्या प्रवासात स्वयंसिध्द ठरलेल्या मुलीची कहाणी आहे. या

कादंबरीला खऱ्या अर्थाने चमकदार कथानक नाही. ते एका आत्ममग्न स्त्रीचे, तिच्यापरीने तिच्या अस्तित्वासाठी संघर्षरहीत असणारे एक जीवनयान आहे, असे डॉ. अरुंधती वैद्य यांनी घेतलेल्या एका मुलाखतीत लेखिका म्हणते, "मद्रासजवळच्या गावात समुद्रकिनाऱ्यावर गुडघ्यात मान घालून बसलेल्या एका मुलीची ही कथा आहे."[१३] या पोरक्या मुलीच्या आयुष्याचा आणि तिच्या जडणघडणीचा वेध घेणे, ही या कादंबरीची प्रेरणा आहे. तिच्या आयुष्याचा शोध घेताना लेखिकेच्या वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती यामध्ये येत गेल्या आणि त्यांच्यामध्ये घडणाऱ्या अनेक घटना प्रसंगामधून, भावनिक गुंतागुंतीतून, आंतरिक संघर्षातून कथानक आकारत गेले आहे.

मैथिलीच्या जीवन प्रवासाची ही कथा आहे. मैथिलीचे वडील हिंदू आणि आई तमिळ ख्रिश्चन होती. दोघांचे धर्म वेगळे होते. ती कळती होण्यापूर्वीच तिच्या वडिलांचा मृत्यु होतो. तिचे बालपण आईच्या सहवासात कडलूर गावात जाते. तेथील संस्कार आयुष्यभर कोरल्यासारखे तिच्या मनावर राहतात. तिच्या आईच्या मृत्यूनंतर मात्र तिची आत्या तिला मुंबईला शिक्षणासाठी घेऊन जाते. तिच्या पुढच्या शिक्षणाची सर्व जबाबादारी आपल्या खांद्यावर घेते. मैथिलीला मुंबईमध्ये सुरुवातीला एकटे एकटे वाटते. मुंबईसारखे सतत माणसांनी गजबजलेले शहर ती प्रथम पाहात असते. तिला आईची आठवण सतत येत राहते. सुरुवातीला शिक्षणात तिचे लक्ष लागत नाही.

मैथिलीची आत्या तिच्यातील स्वत्व जागे करते. तुझ्यामध्ये विश्रामची बुध्दी आहे, तुला शिक्षणासाठी येथे आणले आहे, असे तिची आत्या सतत तिला म्हणते. मैथिली मन लावून अभ्यास करते. तेंव्हा तिला अपेक्षेपेक्षा अधिक गुण पडतात. तिला स्वतःच्या बुध्दीची झेप समजते. गोपाळरावांच्या पहिल्या बायकोचा मुलगा उदय तिच्यावर भुरळ घालण्याचा प्रयत्न करतो. तिला हॉटेलमध्ये नेऊन चांगले खायला घालतो नवीन ड्रेस घेऊन देतो. मैथिलीचा गोंधळ उडतो. लग्नाची मागणी घालतो. मात्र, त्यावेळी तिची आत्या त्याला ठाम

विरोध करते. तिचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तिच्या लग्नाचा विचार होईल. तोही तिच्या मनावर पूर्ण अवलंबून असेल. तोपर्यंत वाट पाहायची तुझी तयारी आहे का? ते पाहा. त्यानंतर उदय मैथिलीचा नाद सोडून देतो.

एक दिवस संजू मैथिलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. त्याला ती ठाम विरोध करते. दहावीच्या परीक्षेत ती जेंव्हा नापास होते, तेंव्हा तिला तो अपमान वाटतो. मन लावून अभ्यास करते. बीनाच्या ओळखीने लायब्ररीत दोन महिने कामाला जाते. तिला इंग्रजी, मराठी ग्रंथ वाचनाचा नाद लागतो. त्या ग्रंथालयात प्रा. देवस्थळींनी दिलेली पुस्तके असतात. पुस्तके ती व्यवस्थित लावते. ती मन लावून वाचून काढते. तिला दहावीला ऐंशी टक्के मार्क्स पडतात. बारावीचे वर्ष असतानासुध्दा मैथिली देवस्थळी बाईंकडे दोन दिवसातून एकदा पुस्तके लावायला जाते. चहा, नाष्टा करुन देते. त्याचबरोबर अभ्यास करते.

बारावीला मैथिलीला अठ्ठ्याऐंशी टक्के मार्क्स पडतात. त्यानंतर ती आर्ट्सकडे इंग्रजी विषय घेते. ती कीर्ती कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये शेक्सपिअरच्या नाटकातील इंग्रजी प्रवेश सादर करते. सर्वांकडून मैथिलीचे कौतुक होते. चेतन, मिलिंद, कीर्ती यांचा नाटकाचा ग्रुप तयार होतो. चेतन नाटक बसविण्यात पुढाकर घेतो. त्यांचा एकमेकांशी चांगला संवाद होतो. मिलिंद आणि मैथिली, एकमेकांकडे आकर्षित होतात. त्यांचे स्वतंत्र फिरणे, एकमेकांशी गप्पा मारणे, हॉटेलात चहा घेणे यामधून जवळीक अधिक वाढते. मैथिली मिलिंदवर प्रेम करते, तोही तिच्यावर प्रेम करतो. मिलिंदची आई ही मैथिलीची आई ख्रिश्चन होती. या कारणाने त्याच्या लग्नाला विरोध करते. मिलिंद अमेरिकेला जातो. मैथिली काही काळ अस्वस्थ होऊन जाते. मात्र, त्यानंतर ती स्वतःचा विचार वास्तवाच्या अंगाने करते.

शंतनूचे स्थळ मैथिलीसाठी आल्यावर त्याबद्दलचा विचार ती सकारात्मक करते. जीवनात तडजोड केल्याशिवाय पर्याय नाही. म्हणून ती शंतनूशी लग्न

करण्याचा निर्णय घेते. मित्रा सरांच्या मार्गदर्शनाखाली तिने इंग्रजी विषयात एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेले असते. मद्रासला शंतनूबरोबर गेल्यावर मद्रास विद्यापीठात पीएच.डी. चे काम करते. लेखन चालूच ठेवते. मद्रास विद्यापीठात नोकरीला लागते. तिच्याभोवती तिचे स्वतःचे वलय तयार होते. शंतनू आणि तिच्यामध्ये अंतर पडत जाते. अंशुमन हा मुलगा होतो. शंतनू त्याच्याकडे ओढला जातो. मैथिली आणि शंतनू यांच्यातील संवाद कमी होत जातो. ती बेंगलोर विद्यापीठात नोकरीला जाते. त्याठिकाणी स्वतंत्र घर भाड्याने घेऊन एकटीच राहते. तिथेही ती स्वतःचे वलय तयार करते. अंशुमनचे लग्न झाल्यावर ती पुन्हा मद्रासला येते.

मैथिलीच्या जीवनाचा प्रवास आशा बगे यांनी 'भूमी' या कादंबरीत मांडला आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येणाऱ्या मैथिलीच्या जीवनात तिच्या वाटयाला कुटुंबात दुःखच दुःख आलेले असूनही ते दुःख पचवून ती नव्या उमेदीने जगते. आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी स्वतःच्या भावनांचा त्याग करते. परंपरेने चालत आलेली कुटुंब व्यवस्था सांभाळते. नैसर्गिक दृष्टया कुठेही स्वतःचा तोल ढळू देत नाही. तरीही स्वतःचे जीवन स्वतंत्र जगण्याचा प्रयत्न करते. त्यामध्ये तिच्या वाटयाला येणारे दुःखच व्यक्त होते. तिच्या भावनांची झालेली घुसमट प्रभावी रीतीने आशा बगे यांनी 'भूमी' या कादंबरीत मांडलेली आहे.

### २.६ 'मनस्विनी' कादंबरीचे कथानक -

आशा बगे यांच्या कादंबरीतील कथानकही घट्ट विणीचे आहेत. मात्र, ते एकदम वेगवान गतीने पुढे जात नाही, तर एकदम संथही नाही. त्या हळूवारपणे व कुशलतेने आपल्या पात्रांच्या मनोविश्वाचा वेध घेतात. पात्रांच्या मनोविश्वातील गुंतागुंत त्या सहजपणे मांडतात. एका मनस्वी मनाच्या स्पर्श कोवळीकीतून उमटलेले भावविश्व उलगडून दाखविणारी त्यांची पहिलीच कादंबरी, 'मनस्विनी'. या कादंबरीत त्यांनी आपली तंत्रावरील पकड कुठेही सुटू

दिली नाही. संगीत कलेवर प्रेम करणाऱ्या या नायिकेचे मन लेखिकेने मांडलेले आहे. त्यामुळेच मैफिलीतल्या क्षणांचे सौंदर्य त्यांना उलगडून दाखविता आले आहे. आभाळ, समुद्र, पाणी, संध्याकाळ ही सारी सृष्टी त्यांच्या कादंबरीत मांडलेली आहे.

'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनी या नायिकेच्या रुपाने आत्मभानाचा प्रवास मांडलेला आहे. ती आईविना वाढलेली आणि संवेदनक्षम मनाची मनस्विनी आहे. या कादंबरीत कलात्मकता व संवेदना इथे सौदामिनी व यथोधनाच्या रुपाने व्यक्त केलेली आहे. तिची बहीण दमयंती व भाई यांच्याशी रक्ताचे नाते आहे. भाईच्या गाण्याच्या विश्वातही सौदामिनी गुंतते, परंतु अमरेंद्र सारख्या देखण्या, नोकरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी सौदामिनीचा विवाह होतो. संगीताचा ध्यास असणारी रसिक सौदामिनी लग्नानंतर पदोपदी नाराज होते. तिच्या संवेदनक्षम मनाला नवऱ्याचे वागणे खटकते. यशोधन, त्याचे सतारवादन, त्याचे हळूवार वागणे. तिच्या मनाला स्पर्श करते, त्याचे व्यक्तित्त्व तिला झपाटून टाकते.

'मनस्विनी' कादंबरीत सौदामिनीच्या मनाची आंदोलने सतत दाखवली आहेत. परंतु एकटेपणा भोगता-भोगता संगीताच्या आवडीने यशोधन तिच्या जीवनात येतो व त्याच्याशी तिची मैत्री होते. या कादंबरीत सौदामिनी प्रत्येक अनुभव पारखू बघते. तिला कलात्मक संगीतमय संवाद हवा आहे. म्हणूनच ती संगीत वेड्या यशोधनशी संवाद साधते. त्याच्याशी होणारा संवाद तिला हलवून सोडतो व तिला अनेक प्रश्नांच्या आवर्तात घेऊन जातो. आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतो, "असलं काही समजून घेण्याची ही अमरची ताकद नाही. यश आपल्या जातीचा आहे, पण आपल्याला अमर वाटयाला यावेत आणि यशला त्याच्या पांगळ्या मुलीत बुडालेली त्याची पत्नी आणि भाईसारख्या कलाकाराला दमयंती! अस का व्हावं? आपल्याच जातीची संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाहीत? का?"[१४] आत्मशोधाच्या या प्रक्रियेत असा प्रश्न तिला पडतो.

अमरेंद्रशी ती लग्नगाठेने बांधल्या गेली आहे. पण तिच्या मनाच्या तळात व शरीरात संवादचे साधन नाही.दोघांमध्ये प्रचंड दरी असल्याचे तिला जाणवते. काही किनारे जवळ आल्यासारखे तिला वाटतात पण जुळत नाहीत. यशोधनपर्यंत संगीताच्या आकर्षणाने ती पोहचते. पण पारंपरिक व संस्कारबध्द मन यशोधनशी अधिक संबंध ठेवायला तयार होत नाही. अशा या वाटेवर तिला अनेक प्रश्न छळतात. ती स्वतःला विचारत राहते, यशोधनाच्या प्रेमाने आपण गुंतलो खरे, पण हे सुखद क्षण आपल्याला काय मागणार? कोणती आहुती मागणार? आणि मग ती त्या सगळ्या क्षणांना नकार देण्याचे ठरविते. तिच्या मनाची होणारी ही उलथापालथ आणि स्त्री म्हणून परपुरुषाशी संबंध हे सौदामिनीच्या रुपाने मांडलेले आहे.

ज्या बिंदूपासून सौदामिनीचा प्रवास सुरु होतो, त्याच बिंदूकडे ती पुन्हा वळते. आपले दुबळेपण तिने स्वीकारले आहे. यशोधनला वगळून जगणे तिला शक्य नाही; पण समाजाच्या चौकटीही तिला तोडायच्या नाहीत म्हणून तिची धडपड, तगमग, आवेग या सर्वांचा आलेख, या कादंबरीच्या कथानकातून पुढेपुढे जाताना दिसतो. 'मनस्विनी' कादंबरीतील सौदामिनीची बहीण ही विलक्षण, सामर्थ्यवान आणि शांत आहे. तिचे वर्णन, "काही माणसंच अशी असतात की, त्यांचा कुठलाच अट्टहास नसतो. मागणं नसत. पाण्यानं मिसळून दुसऱ्याचाही रंग चटकन घ्यावा, तसे समोर वाटून येईल. त्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे घेत राहतो. तरीही ती माणसं वगळली जाऊ शकत नाहीत. आपला तोल पुनः पहिल्यापासून तपासून पाहायला लावतात ही माणसं, अशी ही दमयंती."[१५] दमयंती ही सौदामिनीची मोठी बहीण, पण ती साधी सरळ व व्यवहारी बाई आहे. सौदामिनीच्या अगदी तिच्या उलट; पण दमयंतीत असलेले वेगळेच अबोल मूक सामर्थ्यही या ठिकाणी महत्त्वाचे वाटते.

सौदामिनीचा हा प्रवास तिला खोल गर्तेत फेकून देतो. तिचे बाहय मन पुन्हा पुन्हा यशोधनला नकार देत राहते व मन स्वाधीन नसले तरी शरीर

आपणहून अमरच्या स्वाधीन करीत राहते. पण तिला साक्षात्कार होतो व ती दमयंतीला सारे सांगायचे ठरविते. पण त्याक्षणीही तिला अनेक प्रश्न पडतात. "दमयंतीला काय सांगायचं? अमर आवडत नाहीत हे? असं, कुठयं? पण कधी त्यांची मिठी गोठवून टाकते हे सांगायचं दमयंतीला? अमर खूप सामान्य वाटतात. एका सुसज्ज फ्रेममधला संसार, पण निर्जीव त्याचे काठ काचतात आपल्याला हे सांगायच?"[१६]

दमयंतीचे सहज जगणे आणि सौदामिनीचे प्रत्येक ठिकाणी मन पिंजत जगणे, दोघीही स्त्रियाच, पण त्या दोर्घींचीही जीवन जगण्याची पध्दती निराळी. दमयंतीप्रमाणे आपल्याला अमरेंद्रची वाट पाहणे जमतच नाही, हे तिला माहिती आहे. भाई यायचे असले तर रात्री बरोबर पावसाचे थेंब मोजतच ती खिडकीत उभी राहते. हलतसुध्दा नाही असे स्वतःला विसरणे, स्वतःचं अस्तित्व कोमेजून टाकणे, आपल्याला अमरेंद्रच्या बाबतीत का जमले नाही? या प्रश्नाचा ती स्वतः शोध घेते. आपल्या पतीच्या बाबतीत सौदामिनीला पडलेले हे प्रश्न हे निश्चितच नवीन पिढीतल्या विचारसरणीतून आलेले आहे. नवऱ्याशी न जुळणारे हजारो संसार चालतात. पण सौदामिनीला मात्र असे जुळणे मनातून हवे आहे. नुसत्या शरीराचे मिलन नव्हे, तर मनाचेही मिलन तिला या संबंधात महत्त्वाचे वाटतात. तिचे हे धागे यशोधनशी जुळतात, पण शेवटी संस्कार आडवे येतात व ती परत संस्कारबध्द चौकटीतच स्वतःला बांधून घेते. पारंपरिकतेशी सौदामिनीचे बळ ओसरत नाही. संगीताच्या माध्यमातून तिला एक नवीन शेवटचे बळ प्राप्त होते. पण, तिची तडफड संपली नाही व संपणारही नाही. 'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनीच्या मनाचा प्रवास मांडलेला आहे व त्यामुळेच ती अंतर्मुख होत जाऊन एक प्रकारची प्रगल्भता तिच्यामध्ये आली आहे. मनाला पेलणारे सामर्थ्य तिच्यात निर्माण झाले आहे; पण तिला निश्चितच काही काळ घालवावा लागला.

## २.७ 'झुंबर' कादंबरीचे कथानक -

'झुंबर' कादंबरीची नायिका वसुमती तिचे पती ऋषिकेश त्यांचाच विद्यार्थी वसुमतीचा मित्र राघव हे तिघेही व्यवसायाने डॉक्टर. त्यामुळे कादंबरीचा कथाविषय हा तिघांच्या समोर एकमेकांच्या संबंधामुळे निर्माण होणाऱ्या भावनिक अडचणींचा आहे. 'झुंबर' ही कादंबरी स्त्रीभोवतीच फिरणारी तरीही सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांच्या सहवासात आलेले अनुभव याचं चित्रण या कादंबरीच्या कथानकातून दिसून येते. 'झुंबर' ची नायिका वसुमती धाडसी आहे. पण संस्कृतीचे पालन करणाऱ्या विचारातच गुरफटलेली आहे. स्वतंत्र वृत्तीची वसुमती आततायी स्वभावामुळे डॉ. अधिकारींशी लग्न करते. डॉ. राघव निरंजन हाही डॉ. अधिकारींचा विद्यार्थी, त्यानेही वसुमतीला मागणी घातलेली असते. पण वसुमती मात्र डॉ. अधिकारींशीच लग्न करण्याचे ठरविते. 'झुंबर' मध्ये या तिघांच्याही नाते संबंधाची गुंतागुंत आहे.

डॉ. ऋषिकेश अधिकारी हे स्थानिक मेडिकल कॉलेजचे एक निष्णात गायनाकॉलॉजिस्ट. लंडनला जाऊन सर्जरीचा विशेष अभ्यास करुन आलेले हाडाचे प्रोफेसर. एक असामान्य बुध्दीचे देणे लाभलेले, अविवाहित राहण्याचा निर्धार केलेले, मुद्दाम नाही तरी वागणूक अशी की, कुठे कुणाशी आपले धागे जुळू द्यायचे नाहीत, हे ठरवूनच विद्यार्थ्यांना प्रिय असलेले हे डॉ. अधिकारी वसुमतीच्या मैत्रिणींला हवेहवेसे वाटले. पण स्त्री सुलभ संकोचामुळे जे व्यक्त न करताच लग्न करुन मोकळी झालेली वसुमतीची मैत्रीण जेंव्हा डॉ. अधिकारींचे गोडवे गाते, तेंव्हा एक सूक्ष्म अढीच वसुमतीच्या मनाला घेरुन टाकते. पण प्रत्यक्ष डॉ. अधिकारींशी बोलताना मात्र त्यांच्या कलावंत बोटापासून ती विचार करु लागते. तीक्ष्ण नजरेच्या पुढचे काहीच न बघणारे स्वतः रमलेले रंगून गेलेले डॉ. अधिकारी नकळत वसुमतीला त्यांच्या दिशेने खेचून नेतात. त्यांच्या अस्ताव्यस्त घरात एका क्षणी ऑपरेशन अयशस्वी झाले म्हणून मनाला लावून घेणारे ऋषिकेश एका हळव्या, दुबळ्या स्वतःच्या हरवल्या

क्षणी वसुमतीला सापडतात. आणि डॉ. अधिकारींशी लग्न करण्याचा तिचा निश्चय पक्का होतो. स्वतःहून निर्णय घेणारी, स्वतःचं अनुनय करणारी वसुमती ही इथे एका धीट स्त्रीचे प्रतिनिधित्व करते. लग्न होताच डॉ. राघवही दूर निघून जातो. पुढे डॉ. अधिकारींचा पीळ या लग्नामुळे कदाचित उलगडेल ही आशाही वसुमतीच्या संदर्भात फोल ठरते.

डॉ. अधिकारींचे वडील दादा हे या दोन समांतर पात्रांना जोडणारे पात्र सुनेला व मुलाला न बोलता केवळ कृतीतून संभाळून घेणारे, डॉ. ऋषिकेश यांचे व्यक्तिमत्त्व निराळेच आहे. त्यांना लग्न, संसार या गोष्टीत बिलकूल रस नसतो. त्यांचे विश्वच वेगळे आहे. पण लग्नानंतर वसुमती मात्र कधीच सखा- प्रियकर जवळचा मित्र म्हणून त्याच्या जवळ जाऊ शकत नाही. मग तिला प्रश्न पडतात."रात्रीच्या एकांतातले ऋषिकेशचे स्पर्श कुठल्या नात्याने होतात. फक्त पती म्हणून? की अटल शारीरिक गरज म्हणून?"[१७] आत्मशोधामधली ही प्रश्नात्मकता तिला अत्यंत एकाकीपणाकडे घेऊन जाते, तिचा आत्मशोध सुरु होतो. ती डॉ. अधिकारींसोबत असूनही त्यांच्यात मिसळू शकत नाही.

स्वतःच्या बंगल्यात हॉस्पिटल उघडून आता हा संसार सुखाचा होईल, असे निर्धास्तपण वाचकांना येताक्षणीच डॉ. अधिकारी आजारी पडतात. छोटयामोठया देण्याघेण्याचा आनंदही वसुमतीला ऋषिकेशच्या सहवासात मिळत नाही. तेंव्हा तिला वाटतं, दोघांमध्ये एक अस्पष्ट रेषा आहे आणि तिच्या दोन्ही बाजूला दोघे उभे आहेत. तिच्याबाहेर जाणं दोघांनाही जमत नाही पण हे बाहेरच्या वर्तुळात जाणे ऋषिकेशच्या तीव्र आजारपणाने साध्य होतं. ज्या क्षणी ऋषिकेशने वसुमतीला जवळ केलं असतं, त्याच क्षणावर त्यांनी तिच्यापासून दूर राहण्याचा निर्णयही घेतलेला असतो. बंगल्यातून वसुमती, दादा, आदित्यापासून दूर पुनःमेडिकल कॉलेज क्वार्टरवर राहायला जातात आणि भूतकाळातल्या एकटेपणात रममाण होताना, ते जीवन जगता जगताच वसुमतीला दुसऱ्या लग्नाचा आदेशही सूचकतेने देतात.

शेवटी तर डॉ. अधिकारी तिला म्हणतात, "वसु माणसाला कठीण जातं, ते स्वतःलाच सामोर जाणं . बाकी सगळं फार सोपं असतंस्वतःचं वेगळं जग उभं कर .माझ्याशिवाय . मी नसलेलं . वसुमती तू लग्न कर. एरवी हे तुला फार कठीण जाईल."[१८] डॉ.राघवविषयीचे प्रेम जाणून त्याच्याशी बोलून डॉ. अधिकारी वसुमतीला पूर्णपणे मोकळे करतात. हा मोकळेपणा, हे स्वातंत्र्य तिला देतात. ते भावनावेगात गुरफटत नाहीत. वसुमतीला या दुसऱ्या जीवनाची ओढ असते. तशी ती धीट वगैरे असूनही सामान्य सुखाच्याच तिच्या कल्पना असतातही. पूर्वायुष्यात गमावलेले सुख तिला मिळणार असते पण तिच्यातही संस्काररेषा हे स्वीकारायला तयार नसते. डॉ. अधिकारींच्या इच्छेखातर ती डॉ. राघवशी लग्न करतेही, पण तिचे तिला कळत नाही की डॉ. अधिकारी असताना आपण डॉ. राघवशी का लग्न करतो?

सुरुवातीपासून जरा जिद्दीने वेगळी वाट स्वीकारणारी ही वसुमती एकदमच दुबळी वाटते, पराभूत होते. तरीही एक सुरेल कवितेचे जीवन आता जगता येईल ही जाणीव ती घेऊन जाते. पण जेंव्हा डॉ. अधिकारी मृत्युवरील अग्रलेखात तिचा उल्लेखही नसतो, तेंव्हा पत्नी म्हणून ती कासावीस होते. आणि इथेच तिच्या मनस्वी स्वतंत्र वृत्तीचा पराभव झालेला असतो. वास्तविक, अधिकारीशी तिचा संबंध राहिलेला नसताना केवळ नावासाठी तिने मनाला लावून घ्यावे हे पटण्यासारखे वाटत नाहीच. पण डॉ. राघवच्या आधी ती या असामान्य डॉ. अधिकारींची पत्नी असते आणि डॉ. राघवची बायको म्हणून नावाजण्यापेक्षा डॉ. अधिकारींची मी पत्नी होते, हा सार्थ अभिमान त्या क्षणी तिला वाटून गेला असणार. शेवटी एखादया लखलखत्या झुंबराचा अनुभवच तिला होऊन जातो. झुंबर असतं हे जाणून डॉ. अधिकारी व डॉ. राघव या दोघांबरोबरचा तिचा प्रवासही यशोधन व अमरेंद्रसारखा समांतरच असतो.

'झुंबर' ही कादंबरीही तशी रुढ अर्थाने प्रेमाच्या त्रिकोणाचीच कादंबरी. पण इथे प्रत्येक कोन एकेकटा नाही. तो सापेक्ष आहे. यातही तिघांच्या

नातेसंबंधाची गुंतागुंत आहे. या कादंबरीत महत्त्व आहे ते व्यक्तींच्या आंतरिक वास्तवाला, परस्परसंबंधाला. समकालीन वातावरण फक्त आवरणापुरते उरते. महत्त्व उरते माणसे, त्याचे परस्परसंबंध आणि भावबंध यातुन कथानक पुढे पुढे जाताना दिसते.

## २.८ 'त्रिदल' कादंबरीचे कथानक -

'त्रिदल' या कादंबरीमध्ये  मंजू आणि शारदाची मैत्री, नंतर मंजूचा भाऊ श्रीनिवास आणि शारदा यांच्यात निर्माण झालेले प्रेम, त्यामुळे मंजू-शारदा-श्रीनिवास यांच्या भावसंबंधाचे बदलत जाणारे सूक्ष्म रंगतरंग यांना या कादंबरीत महत्त्व आहे. कादंबरीला रुढ अर्थाने नायिका नाही. पण कादंबरीतील मंजू हे पात्र तेवढेच महत्त्वाचे आहे. तेंव्हा ही कादंबरी मंजूच्या बाजूने साकारते.

'त्रिदल' या कादंबरीमध्ये दोन मैत्रिणींमधील नातेसंबंधाचा शोध मांडलेला आहे. मंजू आणि शारदा या दोघी होस्टेलमध्ये राहणाऱ्या मैत्रिणी. मंजूचा भाऊ श्रीनिवास याच्याबरोबर विवाह होतो व मग दोन मैत्रिणीचे नाते नणंद-भावजय या नात्यात रुपांतरित होते. मैत्रीच्या नात्यातला मोकळेपणा संपतो आणि नातेसंबंध बदलत जातात. विमेन्स कॉलेजच्या गॅदरिंगसाठी मंजूच्या नाटकाला श्रीनिवास अचानक येतो. मंजूची मैत्रीण शारदा हिच्याबरोबर श्रीनिवास यांची ओळख होते. मग श्रीनिवास तिला तिच्या घराबद्दल, घरच्या माणसांबद्दल विचारतो. सगळ्यांबद्दल ती सांगायला लागली. तसं सांगता सांगता ती नर्मदेच्या तीराशी आली. "मघा तुम्ही 'निवांत' म्हणाला नं, आमच्या नर्मदेच्या काठी कुठल्याही वेळी तसं वाटतं. गर्दीतही एकान्त असतो. आणि तरीही आपण एकटं असं नसतो. नर्मदेची सोबत असते. पण ती आपल्याला एकटंही सोडते आणि सोबतही करते. तुम्ही पाहिली आमची नर्मदा?"[१९] या पात्रांच्या संवादातून निसर्गातील छोट्या छोट्या वर्णनातून कथानक पुढे पुढे सरकताना दिसते.

शारदेला घेऊन मंजू बैतुलला आली तेंव्हा दादा स्वतः स्टेशनवर गाडी घेऊन आलेले होते. मंजू घरी पोहचल्यावर मंजूची आई साळुबाई या सर्वांची ओळख करुन देतात. संध्याकाळी सगळी आमराईकडे फिरायला जातात. दिनूमामा, श्रीनिवास चालताना एकमेकांना प्रश्न व कोडी विचारतात. कादंबरीमध्ये भोवतालच्या इतर पात्रांबरोबर नर्मदाही महत्त्वाची आहे. ही नर्मदा शारदेला तिच्या सुखदुःखात सतत सोबत करते. शारदा आणि नर्मदा यांची रुपे वेगळी असूनही त्या एकत्र येतात. नर्मदेचे खळाळतेपण, भोवतालच्या परिसराला आपल्यात सामावून घेण्याची तिची धडपड शारदेत नाही. पण हट्टीपणाने धडका देऊन तट फोडायला निघालेल्या बेफाम, बेलगाम नर्मदेशी तिचे साम्य आहे. खरे तर जीवनदायी नर्मदेतच असलेले जीवघेणेपण आणि बेलगाम नर्मदेत असणारे नितळपण, तसेच माणसांमध्येही अशी परस्परविरोधी टोके दिसतात.

मानवी जीवन हे किती गुंतागुंतीचे आहे यांचे चित्रण पात्रांच्या जीवनातून उलगडत जाताना दिसतात. मंजू आणि शारदा या दोघींचा स्वभाव वेगवेगळा आहे. घरातील वातावरणही वेगवेगळे आहे. शारदा एकत्र कुटुंबातील पण तिला आई नाही. कुणी भाऊ-बहीण नाही. तिची फक्त समोर वाहणारी नर्मदा आणि होस्टेलमधली मिस ल्यूक, शारदेचे एकटेपण तिला समूहापासून दूर नेत राहते. तर मंजू मात्र आधुनिक, मैत्रिणीच्या घोळक्यात वावरणारी, कॉलेजच्या गँदरींगपासून सगळ्यात रस घेणारी, तर शारदेला आईच्या आठवणीतून जपलेली परंपरेची वाट ठाऊक आहे. नर्मदास्तोत्र म्हणणारी ही नायिका मोठे कुंकू लावते. कारण तिची आईही तसेच कुंकू लावायची. पिक्चरला जाणे, हॉटेलमध्ये खाणे, मुक्त हिंडणे-फिरणे तिला आवडत नाही. मंजू ही शारदेच्या अगदी उलट स्वभावाची तरी शारदा मंजूसोबत मैत्री करते व एकमेकांच्या सानिध्यात त्यांची मैत्री फुलून येते व प्रेमाचे विश्व आकाराला येते. मंजूच्या माध्यमातून श्रीच्या जवळ जाणारी शारदा एक दिवस विवाहबध्द होते. पण मंजूला मात्र शारदा व श्री यांची जोडी आवडत नाही. कारण शारदेला मंजू

ओळखून आहे. श्रीला प्रेमात करकचून बांधून घेणारी शारदा तिला पटत नाही.

एक मैत्रीण म्हणून ती तिचा स्वीकार करते; पण भावजय म्हणून ती शारदेचा स्वीकार करु शकत नाही. शारदेला स्वयंपाकघरात काम करणे आवडते. एक सून म्हणून ती त्या घरासाठी सतत कष्ट घेण्याच्या तयारीत असते. आपल्याला एक आदर्शवादी सून म्हणून या कुटुंबातील लोकांनी आपले कौतुक करावे, अशी सर्वसामान्य शारदा आहे. शारदेला फक्त नर्मदाच सोबत आहे. तिच्या मनातील नर्मदा तिला कधीच सोडत नाही. तीच तिची जिवलग आहे. लग्नानंतरही ही नर्मदा सतत सोबत करते. लग्नानंतर प्रत्येक गोष्टीसाठी हट्टाला पेटणारी शारदा सतत श्रीशी वाद घालते. आईविना वाढलेल्या शारदेला श्रीनिवासचे प्रेम, त्याच्या आईचा जिव्हाळा कळू शकत नाही, तर श्रीनिवासला ती आपल्याच कोषात ओढण्याचा सतत प्रयत्न करते. श्री फक्त आपलाच आहे व तो आपलाच राहिला पाहिजे, हा तिचा अट्टाहास. कधी कधी मधूनच तिचे मन तिला धास्तावते. तिला वाटते आपण श्रीनिवासला शोभत नाही. त्यांच्या माणसांमध्ये आपण सामावत नाही, ही सल तिला सतत बोचत राहते. कारण ती ज्या वातावरणातून आलेली असते, ते वातावरण श्रीच्या घरातील वातावरणापेक्षा फार निराळे असते व म्हणून ही उणीव तिच्या मनात सतत घर करुन राहते. त्यांच्या घरातील माणसांना ती आपले मानूच शकत नाही. यामुळे कुटुंबात एक प्रकारचा ताण जाणवतो. मंजूला मात्र शारदेचे असे वागणे फार दुखावते व दोघांच्या मैत्रीचे नाते संपुष्टात येते.

शारदेच्या स्वभावातले दुहेरीपण मंजूला कळत नाही व एकमेकींना समजून घ्यायचे मार्ग बंद झाल्यासारखे मंजूला वाटते. लग्नानंतर काही वर्षानी शारदेला ब्रेस्ट कॅन्सर होतो. त्यावेळेस तो भाग काढून टाकण्यात येतो. ते दुखणे तिला पेलावत नाही. श्रीनिवास, त्याची आई, मंजू तिच्या दु:खात सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. तिला मदत करु इच्छितात पण तिच्या मनात वेगळेच काहीतरी चाललेले असते. कुणाची सहानुभूती, मदत तिला नकोच वाटते. मंजू-अविनाश त्यांचा मुलगा शशी ही पात्रे मधून मधून कथानकात पुढे पुढे

सरकताना दिसतात. शारदेची ब्रेस्ट काढून टाकल्यावर आता शारदेची प्रकृती सुधारत चालली होती. मंजूची आई आता परत बैतुलला जाण्याची गोष्ट काढू लागली होती. दादा आधीच तिकडे गेले होते. बाबासाहेबही एकदोन दिवसांत मंडल्याला जायचं म्हणत होते. मंजू भुसावळहून येणार होती. श्रीनिवास पुन्हा तिच्याजवळ बसला. थोडा वेळ कोणी काही बोललं नाही. मग श्रीनिवास हळूहळू बोलू लागला, "हे बघ शारदा, प्रयत्न केलास तर या सगळ्या गोष्टीकडे तू वेगवेगळ्या तऱ्हेने बघू शकतेस."[२०] जीवनातील नातेसंबंध उलगडत जाताना दिसतात.

मंजूच्या डोळ्यांतून पाण्याचा पूर लोटला. वाटलं शारदेला आणखी एक संधी मिळावी. आयुष्यच थोडं मागं सरकाव. संबंध मैफलभर न लागलेला सूर भैरवीला सापडावा तसं होतं आहे हे ! त्या दोघांच्या या एकान्ताला कदाचित आपलीच दृष्ट लागेल म्हणून मंजू मागं वळली. पावलांच आवाजही तिनं होऊ दिला नाही. श्रीनिवास अगदी शांतपणे म्हणाला, "मंजू शारदा आता या सर्वांपासून फार दूर गेली आहे जगण्याची तिची जिद्द आतून संपली आहे. ती आता आयुष्य नाकारतेच आहे."[२१] या सगळया गोष्टींना सामोरं जाण्याचं शारदेचं आंतरिक बळ आपल्याला ती तिची आयुष्याबद्दलची समरसताच वाढली. श्रीला तोच आयुष्याबद्दलचा नकार वाटतो आहे की, शारदा म्हणाली होती, तसंच आहे? ज्या भांड्यात पाणी घालावं, त्याचा आकार पाण्याला येतो? त्याप्रमाणे शारदेच जीवन दिसून येते. 'त्रिदल' या कादंबरीत मंजू, शारदा, श्रीनिवास या पात्राबरोबर नर्मदा ही सुध्दा या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे. कादंबरीत या नर्मदा नदीने वातावरणनिर्मिती करुन जणू काही तो परिसरच आपल्या डोळ्यांसमोर उभा केला आहे. 'त्रिदल' मध्ये नायिकेचा संघर्ष हा तिच्या मनाशी तिच्या आयुष्याशीच आहे.

### २.९ 'सेतू' कादंबरीचे कथानक -

'सेतू' मध्ये लेखिका माणसामाणसांमधल्या नात्यांचा सूक्ष्म वेध घेते. पती-पत्नी, सासू-सून,नणंद-भावजय, आई-मुलगा,वडील-मुलगी,मावशी-भाची असे

विविध नातेसंबंध 'सेतू' या कादंबरीतून आलेले आहेत. तसेच सामाजिक जीवनातील आधुनिकता व पारंपरिक मूल्यांच्या संघर्षात घुसमटलेली पात्रे आढळतात. अशाच पात्रांच्या विस्तृत जीवनपटांतून कथानक गुंतागुंतीचे बनत गेलेले दिसते. त्या आत्मशोधी वाटांवरचे मानवी मनाच्या गरगरत्या भोवऱ्याचे काळेभोर केंद्र तिथे जाणवते आहे. या कादंबरीची नायिका सुचरिता ही प्रगल्भ विचारसरणीची शिकलेली असूनही गंगेचे वाहतेपण तिला पत्करता येत नाही. एकप्रकारचा साचलेपणा तिच्या विचारात दिसून येतो.

'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी आहे. आपल्या बनारसजवळच्या गंगेच्या काठावर असणाऱ्या खेड्यात राहणारे बाबूजी, मॉ, बहीण, अर्पिता, भाऊ नंद-किशोर आणि भाभी, पुतण्या सुमंगल यांच्यात 'सेतू' तला ब्रिजमोहन आतड्याने गुंतलेला आहे. ब्रिजमोहन हे कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. सुचरिता त्याच्याशी विवाह करते. सुचरिता ही लहान गावात वाढलेली असून, तिला ब्रिजमोहनचे लहानसे गाव आवडत नाही. सुचरिताला खेड्यातील माणसांना समजून घेता येत नाही. त्यांना भेटल्यापासूनच तिने त्यांना मनात शिरुच दिलेले नाही आणि ब्रिजमोहन त्यानांच काय, त्या घराला, त्या गंगेला विसरु शकत नाही.

ब्रिजमोहनचा आपल्या कुटुंबाशी असलेला जिव्हाळाही दिसून येतो. "ब्रिजमोहन दादांच्या पायाशी वाकला. दादांनी त्याला जवळ घेतलं. तो मग अर्पिताजवळ आला. एका हातानं अर्पिताला आणि एका हातानं सुमंगलला त्यानं जवळ घेतलं, घट्ट अगदी जवळ. त्याचा अगदी निकट स्पर्श जणू पिऊन घेतला. गंगेचं पात्र समोर आणि तिच्या पाण्याचा स्पर्श पावलांना झालासा वाटला. ओंजळीतून ते पाणी पापण्यांना लागलसं वाटलं."[२२] ब्रिजमोहन व सुचिता परदेशात जात असताना घरातील लोकांनी दिलेला निरोप त्याबरोबर कथानक पुढे पुढे जाताना दिसते.

अकरा वर्षांनी ब्रिजमोहन सुचिताबरोबर पालम विमानतळावर उतरत

होता. तो आता परत न जाण्याकरता, गेल्यानंतर पाच वर्षांनी तो एकदा येऊन गेला. सुचरिताही येऊन गेली. त्या वेळी वाटलं की परतीची वाट बंद झाली आहे. आता परत येणं नाही. एका श्रीमंत पिंजऱ्यात आपण कायमचे अडकलो, पण ते खोटं ठरवून आज तो सुचरिता व उदितला घेऊन परत आलेला आहे. तिथे आल्यावर ब्रिजमोहन आणि सुचिता जेनेसी नदीच्या काठी बऱ्याच दिवसानंतर फिरायला जातात. ब्रिजमोहनचे गंगेशी असलेले नाते या ठिकाणी स्पष्ट होते. गंगेशी अगदी चूपचाप निमूटपणा, मुकाटयानं संथ वाहत चालली होती. दोन्ही काठांवरच्या हिरव्या झाडांनी तिचं पात्र शेवाळी होऊन गेलेलं बाजूचा रॉचेस्टर युनिव्हर्सिटीचा शांत परिसर. इथं आपण इतकी वर्ष घालवली. तिला भरुन येत होतं. ती काठावरच्या गवताळी चढवावर बसली. ती बसली म्हणून तोही बसला. त्यावेळी सुचिता म्हणते, "तू म्हणाला होता की, इतकी चूपचाप राहणारी नदी तू कधी पाहिली नाहीस."[२३] यातून निसर्गातील बारीक बारीक घटनाही आशा बर्गेनी मांडलेल्या आहेत.

उदित्यालाही नेमके हेच आकर्षण दिसून येते. जे एखादयाला उत्कटपणे जाणवते तेच त्याच्या अपत्यात उतरलेले पाहून ब्रिजमोहनला खरा आनंद होतो. पण सुचरिता मात्र उदित्यला त्या वातावरणात पाठवू शकत नाही. यामुळेच ब्रिजमोहन, मुलापासून, पत्नीपासून त्यांच्या जिव्हाळयाच्या गोष्टींपासून आणि माणसांपासून तुटत तुटत जातो. सुचरिता दृढ वृत्ती नाही. पण माणूस म्हणून तिला तिचे हट्ट महत्त्वाचे वाटतात आणि आपण कुटुंबात वाढलो, हा तिचा अभिमान आहे. जो पुढे जन्मरहस्य कळल्यावर चूरचूर होऊन जातो. पण त्यातून ब्रिजमोहन तुटलेपण वाढत जाते. सुचरिताचे वडील दादा हे इतिहास संशोधक होते. त्यांनी तीन पुस्तके प्रकाशित केली. याचा संवाद चालू असताना ब्रिजमोहनचे म्हणतात, "उदितनं तुमचं हे संगळ घ्यायला हवं. तोही तुमच्या वाटेवरनं जावा, अस मला वाटतं. निदान तुम्ही जे लिहून ठेवल आहे ते वाचण्याइतपत तरी."[२४] म्हणून दादा म्हणतात की, तुम्ही उदितला मोकळं वाढू द्या, आजूबाजूचं बघू द्या, त्याच्यावर काही लादू नका, तसं लादल तर तो त्या

गोष्टींचा राग करत जाईल. त्यानं अमुक एका वाटेनं जावं, हे तुम्ही आम्ही ठरवणार तरी कोण? तुम्ही जे सांगत जाल त्यापेक्षा वेगळं आयुष्य तो अनुभवत जाईल. आपण त्याला जन्म दिला म्हणून त्याच आयुष्य असं असं मी म्हणतो, त्याप्रमाणे जायला हवं, या कल्पनेला काहीही अर्थ नाही. म्हणजे माणसाने आपला छोटया-छोटयाशा गोष्टीबद्दलचा अहंकार कमी केला पाहिजे, हे मांडलेले आहे.

दादांच्या माध्यमातून नवनवीन विचार आलेले आहेत. नवं हे जुन्यापेक्षा जास्त तीक्ष्ण आणि तावून सुलाखून आलेलं असतं. कारण नव्याबरोबर आयुष्यही विस्तारित होत जातं आणि त्याबरोबरच लवचिक आणि गुंतागुंत हे समजून घ्यायला नवीन लोक असतील. कदाचित उदितही असेल. दादा उदितकडे त्या दृष्टीने बघतात. अशाच अढीमुळे सुचरिता बबी मावशीजवळ उदितला आणत नाही. पण कादंबरीतील शेवटचा प्रत्यय बबी मावशी ती आणि उदित यांच्यातल्या रक्तांच्या नात्याचा आहे. वास्तविक, ज्या दादांच्या सहवासात ती वाढली ते राग, लोभ, अभिलाषा यापासून दूर आहे. सुचरिताला मात्र ते जमत नाही. सुचरिता दादांना एक प्रश्न विचारते की, दादा तुम्हाला राघवेंद्र मूर्ती आणि ब्रिजमोहन या दोघात कोण जास्त पटला? त्या वेळेस दादा तिला उत्तर देताना म्हणतात, "अग सुचरिता, त्यांचं मूल्यमापन मी कोण करणार? एक माणूस दुसऱ्या माणसाचं कधीही मूल्य ठरवू शकत नाही. काळच सगळी मूल्य जोखत असतो."[२५] सुचरिता मोहन आणि राघव यांच्याबद्दल चिकित्सा करण्याचा प्रयत्न करतात.

ब्रिजमोहनची ढासळलेली प्रकृती, ढासळती अवस्था जन्माला आलेली आहे. या ताणावरच ही कादंबरी केंद्रित झाली आहे. माणसाच्या मनात असले तरच सर्वच मनामनांमध्ये सेतू बांधता येत नाही. कधी बांधण्याचा प्रयत्न करुनही ते ढासळतात. कधी प्रयत्न न करताही निर्माण होतात. कादंबरीच्या शेवटी उदित जेंव्हा वेगळे वागताना दिसतो, ऑफिसमध्ये जात नाही, बॅडमिंटन

खेळत नाही, त्यावेळी सुचरिता अस्वस्थ होते. तेंव्हा मुलगा आईला स्पष्टपणे विचारतो, "ममी, तू म्हणशील तसं, तू म्हणशील तसं मी किती दिवस करत राहायचं? मला वाटतं ते मी केंव्हा करायचं? डॅडीनाही असच बांधून ठेवलस आणि त्याचे हे परिणाम तूच भोगतेस सर्वात जास्ती."[२६] उदितच्या रुपाने तिच्या वागण्याचा अर्थच तिच्यासमोर उलगडत गेलेला आहे. एक प्रकारे सुचरिताच्या अहंकाराने ब्रिजमोहनचा बळी गेला आहे. ब्रिजमोहनचे डॉक्टर तिला म्हणतात, की तुम्ही पत्नी नव्हे, तर आई, प्रेयसी, मैत्रीण हेही व्हायला हवे आहे. असा 'सेतू' सुचरिताला बांधता आला नाही. शेवटी दिसणारा, ब्रिजमोहन हा सरळ उभाही न राहता येणारा असा आहे. त्यावेळेस सुचरिताला वाटते की आपला रिसर्च करताना शरीराच्या मॅकेनिझमचा शोध घेत होतो, पण मनाचा शोध मात्र आपल्याला घेता आला नाही.

'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली कादंबरी आहे. आपल्या बनारसजवळच्या गंगेच्या मनोहरी पाण्याची, गंगेच्या तीरावर असलेल्या स्वतःच्या घराची. परिवाराची अनावर ओढ असलेला ब्रिजमोहन, अमेरिकेतले आधुनिक संपन्न जीवन सोडून जन्मभूमीकडे परततो. इम्युनॉलॉजीसारख्या विषयात पीएच.डी. केलेली आणि आपल्या कामात उत्तमपदी मग्न झालेली ब्रिजमोहनची पत्नी सुचरिता निरुपायाने उदित या लहानग्या मुलाबरोबर साथ देत भारतात येते. सुचरिताची आई एक शिक्षणसंस्था चालवणारी व वडील इतिहासाचे अभ्यासक होते. ब्रिजमोहनचे घर शेती करणारे सुखवस्तूपणाने राहणारे आहे. उभयतांच्या घरच्या भिन्न भिन्न पार्श्वभूमीच्या विरोधाभासात आणि व्यक्तिगत भावनिक द्वंद्वात वेढल्या जाणाऱ्या, नदीसारखी वळणे घेत जाणाऱ्या आयुष्याची कहाणी 'सेतू' मध्ये प्रकटत जाते.

### २.१० 'भूमिका' आणि 'उत्सव' -

आशा बगे यांच्या कादंबऱ्यात नव्या-जुन्या पिढयांतील माणसांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन चितारताना, मानवी नातेसंबंधाची उत्कट रुपे

चित्रित केलेली आहे. ती जीवनाबद्दलच्या खोल चिंतनशील जाणिवेतून 'भूमिका' मधले आजी-आजोबा आपल्या मुलीच्या पाश्चात तिच्या मुलाला आपल्या संस्कारांत वाढवताना, आपल्या सुख-दुःखांचा अन्वयार्थ लावत आपले आयुष्य पुन्हा पुन्हा नव्याने त्या दुःखासह समजून घेतात.

'उत्सव'मध्ये प्रस्तुतीतज्ज्ञ सरु साधी, संसारी पण संवेदनशील मनाची माधवी यांच्या मैत्रिसंबंधाची कथा आहे. दोघींच्या वाटयाला आलेल्या एकटेपणाचे रंग, वेगळेपण, दोघींच्या मैत्रीतला धागा, माणसांना दुभंगून टाकणाऱ्या याच एकटेपणाचा, याच एकटेपणाने आयुष्याकडे समंजसपणे पाहण्याची दाखवलेली प्रगल्भता, स्वयंभू वाट आशा बगेंनी मांडलेली आहे. मानवी जीवनाचे, नातेसंबंधाचे विभ्रम या दोन कादंबऱ्यातून पुरेशा अलिप्तपणे साकारणारी आशा बगे यांनी वाचकांसमोर जिवंतपणे उभी केलेली आहे.

## २.११ 'धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे' -

धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे ही कादंबरी द्रोणाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, महाभाराताच्या आधारे पण वेगवेगळ्या दृष्टिकोनातून वेध घेणारी पौराणिक कादंबरी आहे. 'ब्राह्मण व क्षत्रिय वर्णाखेरीज इतर वर्गांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही, हीन कुलोत्पन्नांना विद्या देऊन समाज रसातळाला नेऊ नकोस' अशी आज्ञा द्रोणाचार्यांनी त्यांचे गुरु परशुराम यांनी केलेली आहे. या संदर्भातला आत्मसंघर्ष आणि गुरुच्या आज्ञेचे ओझे यासह द्रोण-द्रोणाचार्य असा त्यांचा जीवन प्रवास सुरु होतो. गुरुकुलातून बाहेर पडल्यापासून द्रोणाचार्यांच्या गुरुकुलाची समाप्ती होते. तिथवरचा द्रोणाचा हा प्रवास महाभारतकालीन विचारधारणांचे दर्शन घडवण्याचा व त्यातील संगती शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महर्षी व्यासांचा अंतिम उपदेश आणि त्यांनी केलेले विश्लेषण हा तत्कालीन मूल्ये आणि धारणा यांच्यातील विसंगती, त्यातील चुकांमुळे झालेले दुष्परिणाम दाखवून देणारे आहे. आत्मचिंतन, भाष्य, दोन भूमिकांमधील संघर्ष,

प्रतिवाद, संवाद असे या कादंबरीचे काहीसे तत्त्वचर्चेसारखे स्वरुप आहे. महाभारतातील अर्जुन, कर्ण, परशुराम, अश्वत्थामा, एकलव्य ही पात्रे या कादंबरीच्या पटांवर येतात. निवेदन, वातावरण निर्मिती, दोन भूमिकांमधील द्वंद्वे, आत्मसंघर्ष असे तणाव यासंदर्भात ही कादंबरी आहे.

'मुद्रा' ही संपूर्ण कादंबरी नीरुची संगीत क्षेत्रातील तपस्या आणि तिचे समर्पण यांचे चित्रण करणारी आहे. अनेक राग, त्यांचे स्वर, त्यांच्या गायनाच्या वेळा आणि त्यांचे परिणाम यांचे अस्सल वर्णन आणि त्या क्षेत्रातील व्यक्तींची त्या कलेवरची निष्ठा याचे प्रभावी चित्रण या कादंबरीत आहे. संगीत क्षेत्रातील गुरुशिष्यपरंपरेची महतीही या कादंबरीच्या गाभ्यात गुंफलेली आहे. 'मुद्रा'मधील नीरुचे आई-बाबा यांचे घरच्यांना पसंत नसलेले लग्न, त्यांच्यात असणाऱ्या वर्गीय अंतरामुळे निर्माण झालेले ताण, हे त्यांच्या पूर्वायुष्याचा भाग म्हणून येतात. नीरुचे बाबा तिच्या आईपासून दूर का होऊ लागतात, यांची मुले तेथपासूनची आहेत. परंतु देवाशीषच्या आईचे घरातून निघून जाणे, परत येणे, त्यानंतर देवाशीषच्या जन्माचे रहस्य, नंतरचे त्याच्या आईचे जीवन, संगीत साधना व तिचे गुरु हे सर्व प्रकरण रहस्यमय आहे.

### २.१२ आशा बगे यांच्या कादंबरीतील समाजदर्शन -

माणूस स्वभावतःच गोष्टीवेल्हाळ आहे. मग त्या गोष्टी काल्पनिक असोत अथवा सत्यावर आधारित असतात. दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनातील घडामोडी समजून घेण्याची त्याला उत्सुकता असते. त्या घटनांची आपल्या जीवनातील अनुभवांशी तुलना करुन त्यांची वास्तव संगती माणूस लावत असतो. माणसाच्या या स्वभावाची सत्यता आपणाला पटते ती त्यांच्या कथा-कादंबऱ्यांच्या आवडीमधून. बाराव्या शतकाच्या प्रारंभापासून आधुनिक मराठी वाङ्मयात समाजपरिवर्तन व वास्तव जीवनाचे चित्रण करुन, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, समाजाची जागृती करणे आणि समाजातील समस्यांची सोडवणूक करणे हे वाङ्मयाचे कार्य मानले जाते.

सामाजिक बांधिलकीची, मानवी जीवनातील मनोव्यापारांची जातिवंत लेखकांचा माणसांकडे, घटनांकडे व समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाज शास्त्रज्ञाच्या किंवा नीतिशास्त्राच्या दृष्टिकोनाहून भिन्न असतो. समाज आणि मनुष्यस्वभाव यांच्या नातेसंबंधाचा तोल कादंबरीत राखला जातो. सामाजिकतेबाबत बापट व गोडबोले यांच्या मते, "कादंबरीत जीवनाचा जो भाग प्रतिबिंबित होणारा असेल त्याला अनुरुप पार्श्वभूमी जर कादंबरीत लाभली नाही, तर कोंदणातून निखळलेल्या खड्याप्रमाणे तो निष्प्रभ व हीनतेज होऊन त्याच्या परिणामकारकतेत कमीपणा आल्याशिवाय राहणार नाही. सामजिक कादंबरीकारलाही एक तऱ्हेने समाजाचा इतिहासकारच असल्यामुळे त्याच्या कादंबरीतील जीवनाच्या चित्रणाचे किंवा त्यावरील कादंबरीकाराच्या भाष्याचे खरे मर्म प्रकट होऊ शकणार नाही."[२७] आशा बगे यांच्या कादंबऱ्यातूनही समाज घटकाचे दर्शन दिसून येते.

सामाजिक चौकटीतच रहावयाच्या त्याच्या नायिकांना या सामाजिक चौकटीविषयी, त्यातील तथाकथीत मूल्यांविषयी अनेक प्रश्न पडतात. त्यातून त्यांचे आत्मभान जागृत होते, पण तरीसुध्दा शेवटी त्या एका विशिष्ट सामाजिक सामर्थ्य त्यांच्यात निर्माण झालेले नसते. स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार करताना त्या त्या समाजात आपण राहतो, त्याचाही विचार करताना दिसून येतात. म्हणूनच समाजाची ही बंधने त्या एकाकी सोडू शकत नाही. उदा. 'मनस्विनी'तील सौदामिनी, 'झुंबर'मधील वसुमती, 'त्रिदल' मधील शारदा, 'भूमी' मधील मैथीली सर्व नायिका समाजाला दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान देतात.

'सेतू' कादंबरीत सुचरिताचे वडील दादा आणि ब्रिजमोहन यांच्यात जीवन विषयक रमलेला संवाद, दादा म्हणाले, 'आपण समाज हा शब्द वापरतो तो फार मर्यादित अर्थानं. आपल्याला माहिती असलेला समाजच गृहीत धरतो. तो शहराच्या म्हणजे जगण्याच्या मध्यवर्ती असा असतो. सुधारणा होतात त्या याच समाजात. घडत जातो तोही हाच समाज पण यापेक्षाही आत इंटीरियरमध्ये जे जीवन लहान गावात जगलं जातं ते कधीच धरलं जात नाही. ते खरं म्हणजे फार

मोठया प्रमाणावर आहे. असतं. तिथं वर्षानुवर्ष काही घडत नसतं. समाजाची उंची मोजताना हा समाज पूर्णपणे दुर्लक्षिला गेला आहे. तुम्ही बनारसच्या इंटीरियरला राहता. तुम्हाला हे अनुभवता आलं असेल. 'दादा तुम्ही म्हणता तो समाज आजही माझ्या गावात, माझ्याच घरात आहे. अनेक वर्षाच्या साचलेल्या पाण्यासारखं हे जीवन माझ्या स्वतःच्या घरातच आहे.'[२८] म्हणजे समाज जीवन हे स्वतःपासून, कुटुंबापासून ते गावातील प्रत्येक गोष्टींशी त्याचा संबंध येताना दिसतो. दादा समाजाविषयी म्हणतात की, समाज हा देशाचा असतो. त्याची संस्कृती आणि तिचं पुन्हा साऱ्या विश्वाशी संबंध लहान वाटा-वळणांनी जिथून सुरुवात केली, तिथं येऊ शकतो. माणूस आपण जगतो, अनुभवतो ते आयुष्याच एक छोटं अंगच आपण संपूर्ण जग आपण पालथं घातलं असा भास आपण स्वतःच करुन घेतो.

आशा बगे यांनी अनेक व्यक्तिरेखांच्या माध्यमातून विविध मानवी नात्यांचा शोध घेतलेला आहे. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून व्यक्तिजीवनात अनेकविध नाती येतातच. आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ, बहीण, मावशी, आत्या, मित्र, मैत्रीण, प्रियकर, सहकारी, सासू, सासरे, नणंद, दीर, जाऊ, गुरु, शिष्य, पोटचा मुलगा, मुलगी, नातवंडे, शिक्षक, वकील, डॉक्टर, इंजिनियर. अशा गोतावळयात आयुष्य गुंफलेले असते. नात्यातही अनेक रंग मिसळलेले असतात. या नात्यांचे धागे एकमेकांत विणले जातात. ही नाती आणि त्यांचे एकमेकांत गुंतलेले धागे हा आशा बगे यांच्या जिव्हाळयाचा आणि आस्थेचा भाग आहे. व्यक्ती या नात्यांसह जगत असते. ती नाती कधी तिला नकोशी असतात. त्यांचे धागे परस्परांना खेचतात. त्यांच्यातून सुटावेसेही वाटते. ही नाती अवघड व गुंतागुंतीची असतात.

'भूमी'तल्या शंतनूचे बालपण आई दुसऱ्या पुरुषात गुंतल्याने एकाकी होत जाते. तो आपल्या विद्वान, व्यसनी वडिलांचा मुलगा बनण्याऐवजी व्यसनांच्या विळख्यात अडकतो. एक वेगळाच माणूस बनून जातो. मैथिलीशी समरस होऊ

न शकणारा उलट पतीच्या निधनानंतर मॅथ्युज अंकलचा आश्रय आईने घेतलेला दिसूनही मैथिली कडवट होत नाही. आईशी मनाने गुंतून राहते. नात्यांचे गणित सगळीकडे सारखेच नसते. ते माणसामाणसांच्या आंतरिक बळावरही अवलंबून असते. 'त्रिदल' या कादंबरीत शारदा आणि मंजू दोघीही होस्टेलमध्ये राहतात. पण आई नसल्याने, काकू जवळची न वाटल्याने शारदा हट्टी, हेकेखोर होत जाते. मंजूसारखी तिला घराची ओढ वाटत नाही. मंजू आई वडील, भाऊ, दिनूमामा यांच्यात बुडालेली असते. पुढे संसारातही सर्वात मिसळून जाते. 'सेतू' मधल्या ब्रिजचा जीव कुटुंबासाठी तळमळतो, आपले घर सावरावे, दुरुस्त करावे, असे त्याला वाटत राहते. उलट सुचरिताचे कुटुंब दुभंगलेले असते. यात समाजाशी निगडित अनेक घटना मांडलेल्या आहेत.

आई-वडील, भावंडे, आजी, आजोबा हे कुटुंबाचे घटक विशेषतः जेंव्हा कुटुंबे एकत्र असत, त्यामुळे आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये आई आणि वडील महत्त्वाच्या भूमिका बाजावतात. 'मुद्रा' मध्ये आजीच्या हातात सत्ता असते. ती मुलीच्या नवऱ्याला घरातून घालवते. नंतर परत आणते. पण त्याचा अपमान करीत राहते. आजीचे नातीवर (नीरुवर) मात्र फार प्रेम असते. 'मुद्रा'तल्या नीरुला तिचे वडील आणि गुरु बाबा तिच्या जीवनाचा कणाच झालेले असतात. 'त्रिदल'मध्ये मंजूची, 'उत्सव'मध्ये सरुची आई, 'भूमी'मधली मैथिलीची आई, 'सेतू'मधले दादा या साऱ्यांचे या नायिकांच्या जीवनाच्या घडणीत फार महत्त्व आहे.

'मनस्विनी'तील सौदामिनी, 'झुंबर'मधील शारदा या नायिका समाजाला दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान देताना दिसतात. समाजाने मान्य केलेली नाती, लग्न संस्था, विवाहसंस्था या सर्वांनी त्या समाज नियमाप्रमाणेच आपल्या जीवनात स्वीकारतात. बरेचदा त्यांना हे पटतही नाही. प्रश्न पडतात पण शेवटी परंपरेपासून चालत आलेल्या सामाजिक मूल्यांना त्या एकाएकी ताडकन तोडूनही फेकू शकत नाहीत. म्हणूनच आधुनिक जीवनसरणींचा स्वीकार

करुनही ही स्त्री परंपरा व आधुनिकता यांच्यात ताणात कसलेली दिसते. याचे कारण म्हणजे तिने मान्य केलेले समाजतत्त्वच होय.

## २.१३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील जीवनदृष्टी -

कादंबरी वाङ्मय प्रकारात लेखकांची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. या जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर, सखोलपणावर आणि मौलिकतेवर लेखकाची महती अवलंबून असते. ही जीवनदृष्टी बनण्यात लेखकाचे सूक्ष्म जीवन निरीक्षण, माणसाच्या मनोव्यापाराच्या गुंतागुंतीचे त्याचे ज्ञान, जीवन-व्यापाराचे त्याचे आकलन या गोष्टी सक्रिय असतात. लेखकाच्या जन्मजात प्रतिभेची झेप आणि त्यांची अभ्यासूवृत्तीमुळे जीवनदृष्टी समृध्द बनत असते. कादंबरीत काही व्यक्तीच्या निर्मितीत त्यांचे स्वतःचे असे पृथगात्म व्यक्तित्व तर असतेच, पण काहीशी प्रतीकात्मकताही असते. ही पृथगात्मता जितकी भरीव व प्रतीकात्मकता मानवाच्या भावनात्मक व्यापाराचा साचेबंदपणा, सारखेपणा आणि काहिसा एकेरीपणा गृहीत धरलेला असतो. जीवन जाणिवेची प्रगल्भता रसवादी वाङ्मयात काहीशी अनुल्लेखानेच असते. वाचकाच्या हृदयातील सुप्त भावना जागविण्यासाठी सामान्यतः पृथगात्म, आगळा व गुंतागुंतीचा जीवनव्यापार पात्रांच्या द्वारा न दाखवता सामान्य प्रेम, द्वेष, राग, क्रोध, काम, हिंसा यावर आधारलेला जीवन व्यवहार दाखवला जातो. म्हणूनच रसपरिपृष्टीसाठी व्यक्तींच्या वैचित्र्यापेक्षा त्यांच्या सामान्यत्वावर भर दिला जातो.

एखाद्या कलावंताच्या साहित्य निर्मितीचे स्वरुप विशिष्ट प्रकारचे का आहे, याचा शोध घेण्यासाठी त्यामागील प्रवृत्ती आणि प्रेरणांचा शोध घेणे आवश्यक आहे. कलावंताच्या लौकिक जीवनाचा आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतल्यास त्याच्या लेखनामागच्या प्रवृत्ती-प्रेरणा, त्यांची लेखनप्रक्रिया अथवा निर्मितीप्रक्रिया यावर प्रकाश पडू शकतो. कारण त्याच्यातील कलावंत हा त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा एक भाग असतो. दुसरे

म्हणजे मानवी मन हे संवेदना व अनुभव यांचे केंद्र असते. तोच जीवनानुभवांचा स्वीकार करते. आणि त्यांना प्रतिसादही देते. वाङ्मय निर्मितीची प्रक्रिया ही सुध्दा मानवी मनाची एक प्रगल्भ प्रतिक्रिया असते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा गाभा असलेले हे मन समजून घेण्यासाठी कलावंताचे लौकिक जीवन, त्याचे आंतरिक व्यक्तिमत्त्व यांचे आकलन उपयुक्त ठरते. कलावंताची ही जीवनदृष्टी आणि त्यांचे जीवन व निर्मिती यांचा अतूट संबंध असतो. कलांवताने आपल्या अस्तित्वाच्या गाभ्यात ज्या जीवनविषयक जाणिवा व जीवनमूल्ये जतन करुन ठेवलेली असतात त्या त्याच्या निर्मितीला वैशिष्टयपूर्ण आकार व अनन्य रुप प्राप्त करुन देत असतात, म्हणून कलावंताच्या जीवन दृष्टीचे आकलन अपरिहार्य असते.

जीवनदृष्टी हा शब्द मराठी समीक्षेत नेहमी वापरला जातो. जीवनदृष्टी म्हणजे जीवनविषयक तत्त्वज्ञान व जीवनविषयक भूमिका या अर्थाने ही संज्ञा वापरण्यात येते. त्यात जीवनातील आदर्श, ध्येय व जीवनमूल्ये यांचाही समावेश होतो. असे असले तरी तात्त्विक भूमिकेबरोबर आंतरिक व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक भूमिका, सामाजिक जाणीव या घटकांचाही समावेश जीवनदृष्टी या संज्ञेत केला जातो. डॉ. कुल्ली यांच्या मते, "कलांवत मनात अनुभवाचे बीज पडल्यापासून त्याचा कलाकृतीरुप आविष्कार होईपर्यंत ही जीवन दृष्टी जेथे जातो तेथे तू माझा संगाती' प्रमाणे कलावंताची सांगातीची असते. एवढेच नव्हे तर त्या समग्र प्रक्रियेचे ती संचलन करते. जीवनदृष्टी म्हणजे जणू कलावंताच्या व्यक्तित्वाचा गुरुत्वमध्यच असतो. त्याच्या समग्र भावोर्मीची व्यवस्था, रचना, या गुरुत्वमध्याने म्हणजे त्याच्या जीवनदृष्टीनेच साधली जाते. लेखक वाङ्मयकृतीच्या निर्मितीसाठी आपल्या विशिष्ट जीवनदृष्टीनुसार, अनुभवांची निवड करतो. या अनुभवांन तो प्रस्थापित करतो. या विविध अनुभवाचे त्यांच्या संबंधाचे त्याला जे आकलन होते तेही विशिष्ट जीवनदृष्टीनुसार, तसेच या अनुभवांचा स्वतंत्रपणे आणि एकूण जीवनमूल्यांच्या संदर्भात कलांवत जो अन्वय लावतो, तोही विशिष्ट जीवनदृष्टीनुसार!"[२९] कलावंताची जीवनदृष्टी हा

त्याच्या व्यक्तित्वाचा गाभा असतो. आयुष्यातील नानाविध अनुभवांच्या स्वीकार-नकाराचे ते नियंत्रक तत्त्व असते. एवढेच नव्हे तर वाङ्मयकृतीला व्यापणारा, वाङ्मयकृतीच्या घटकांमधून वाहणारा एकार्थ जीवनदृष्टीनेच निर्माण केलेला असतो. कलावंताचा हा जीवनविषयक दृष्टिकोन, त्याची जाणीव त्याच्या स्वभावातच मुरलेली असते.

जीवनदृष्टी विषयक प्रभाकर पाध्ये म्हणतात, "जीवनदृष्टीत वैचारिकता, मूल्यात्मकता व भावनात्मकता हे तीन घटक असतात. जीवनदृष्टी म्हणजे जगाकडे पाहण्याची दृष्टी, आपली मूल्ये, जीवनविषयीचे आपले हिशोब वगैरे जीवनदृष्टी वैचारिक भावनात्मक आधारावर उभी असते. जीवनदृष्टी म्हणजे जीवनाचे नवे तत्त्वज्ञान, जीवनात वागण्याचे नवे संकेत जीवनदृष्टी म्हणजे वैचारिक चौकट, जीवनदृष्टी म्हणजे विश्वाविषयीच्या जाणिवा."[३०] जीवनाच्या मूल्य व्यवस्थेशी कलावंताच्या अनुभवाचे जे नाते असते, जीवनमूल्य व अनुभव यांचा संघर्ष होतो, तिथे त्या कलावंताची जीवनदृष्टी शोधता येते.

जीवनदृष्टीचा संबंध मानवी मनाशी असतो. मानवी मन हे अत्यंत जटिल आणि गूढ असते. त्यामुळेच मानवी मनाशी संबंधित असलेल्या जीवनदृष्टीच्या घडणीची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची आणि गूढ-धुसर असते. वाङ्मयकृतीच्या आकलनासाठी लेखकाच्या जीवनदृष्टीचा शोध घेणे आवश्यक असते. हा शोध दोन मार्गांनी घेता येतो, असे डॉ. कुल्ली स. त्र्यं. म्हणतात, "साहित्यबाहय आत्मपरलेखन, आठवणी, दैनंदिनी, पत्रे, मुलाखती, भाषणे, साहित्यांतर्गत अनुभवांची व पात्राची निवड, पात्र-प्रसंगाचे पर्यावसन, या सर्वांचा लेखकाने लावलेला अर्थ इत्यादीचा समावेश करता येतो."[३१] लेखकांची जीवनदृष्टी ही एक मौलिक कल्पना आहे. कारण त्यांच्या लेखनातून ती सर्वत्र प्रकटपणे किंवा प्रच्छन्नपणे अस्तित्वात असते. त्या जीवनदृष्टीचे घटक, तिची वैशिष्टये व स्वरुप अभ्यासकाला ओळखावे लागते. ना.सी.फडके यांच्या मते, "कादंबरीचा जीवनानुभवाशी संबंध असला तरी ते संसाराचे चित्र नव्हे, बाहयगोचर वास्तव

व कादंबरीचे वास्तव याचा संबंध प्रतिभाशाली लेखकाच्या व्यक्तित्वामुळे परिवर्तित झालेला असतो."[३२] लेखकांची जन्मजात प्रतिभा व त्याला त्याने दिलेली व्युत्पन्नता व अभ्यासाची जोड यामुळे लेखकाची जीवनदृष्टी ही व्यापक बनते.

आशा बगे यांच्या साहित्यात नाटक व संगीत या गोष्टीची जाण आहे. त्याचबरोबर चिंतनशीलता, मूल्यांची जाणीव आणि आत्मशोध घेणारी प्रश्नात्मकता यातून मानवी जाणिवा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कुटुंबाशी आणि आईवडिलांशी व्यक्तीच्या असणाऱ्या नात्याचे सूक्ष्म रंग, धागे, त्यातील जिव्हाळा, सौदार्ह, प्रेम, काळजी टिपणारे शेकडो तपशील कादंबऱ्यांतून दिसून येतो. माणसांचा शोध, मानवी नातेसंबंधाचा शोध, मनाचा शोध लेखिकेने जीवनाच्या आणि अनुभवाच्या बहुपेडीपणातूनच साकारलेला आहे. स्वतः लेखिका ही मध्यमवर्गीय वातावरणात व संस्कारात वाढलेली असल्याने ती संस्कारक्षम जीवनदृष्टी त्यांच्या कादंबऱ्यांतूनही जाणवतेच. म्हणूनच त्यांच्या नायिकांना इतरांपेक्षा आपण कमकुवत आहोत, असे सतत वाटत राहते. त्या परंपरेविरुध्द पूर्णपणे बंड पुकारत नाही. आहे त्या समाजव्यवस्थेतच स्वतःला बसविण्याचा प्रयत्न करतात.

आशा बगे मानवी मनाची अगम्यता वारंवार अधोरेखित करतात. माणसे साधी, सोपी, सरळ, प्रेमळच नसतात. कठोर, आग्रही, तटस्थ, स्वार्थी, मतलबी, हट्टी, कडवट, दुबळी, मत्सरी, पराभूत, कोसळताना स्वतःला सांभाळू न शकणारी, विकल अशीही असू शकतात, याचे भान त्यांनी सतत दिले आहे. 'आकाश' मधला महेश अहंकारापायी उर्मिलापासून दुरावतो. ही नोकरी, ती नोकरी, मग दुबई, अमेरिका असे त्याच्यामागे फरफटणे तिला नको वाटते. 'सेतू' मधल्या सुचरिताला ब्रिजमोहनची तडफड, त्याचे एकटे होत जाणे थांबवता येत नाही. दादा आणि बबी यांचे नाते कळू शकत नाही. 'भूमी'तल्या मिलिंदला आपण काय गमावतो आहोत, हे जाणवत नाही. 'त्रिदल' मधील शारदा स्वतःला कमी लेखत राहते. श्रीनिवास सोबत करु शकत नाहीत.

मैथिलीला शंतनूची ओळख करुन घेता येत नाही. 'भूमी' मधला सुधीरही कच खातो.

आशा बगे यांची 'मनस्विनी' ही पहिलीच कादंबरी. या कादंबरीतील नायिका 'दमयंती'ला संगीताची आवड आहे. कलावंत प्रवृत्तीची संगीतलुब्ध नायिका आणि कादंबरीतील वातावरण याचे एक वेगळेच नाते लेखिका आपल्यापुढे उभे करते. या कादंबरीतील नायिका संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधाराने आपले मन व्यक्त करते आणि तिच्या भोवतालच्या जगाला सामोरे जाण्याकरिता संगीताचा आधार घेत राहते. संगीताचा आणि जीवनाचा अनुबंध जोडणारी लेखिकेची जीवनदृष्टी ही मग संगीतमय भाषेतून संवाद साधतांना दिसतात.

'मनस्विनी' या कादंबरीबाबत डॉ. आशा सावेदकर म्हणतात," लेखिकेला आवडणाऱ्या अनेक संकेतांना ही कादंबरी स्वीकारणे, त्यात नायिका अनेकदा स्नान करते. वेगवेगळे पदार्थ करते पण ती त्यातच अडकलेली नाही, त्याकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन वेगळा आहे. धुऊन-पुसून नवीन अनुभवांना सामोरे जाण्यासाठी ती स्नान करते, फक्त देह सौंदर्याच्या आकर्षणासाठी नव्हे. विशिष्ट साडीचे, पोषाखाचे वर्णन त्यामध्ये येते. पण तेही विशिष्ट नात्यामध्ये अडकलेल्या मनांचे एकमेकांना शोधण्याचे साधन आहे."[३३] लेखिका जीवनातील प्रत्येक अनुभव पारखून बघते. त्या अनुभवांना सामोरे जाताना तिच्या मनाची जी घालमेल होते, त्यातूनच मग त्या आपल्या नायिकांना घडवितात व आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतात.

'भूमिका' आणि 'उत्सव' या कादंबरीत आशा बगे पात्रांच्या माध्यमातून आजी, आजोबा आणि सोहन यांच्या माध्यमातून शाळेतील व समाजातील व्यक्तीचे दर्शन घडविलेले आहे, "आजी आमच्या शाळेत अशी किती मुलं होती, ज्यांना क्लास लावता येत नव्हता; पण तीही पास झाली. काही जण असे आहेत की पुढं शिकता येत नाही; कमावणंच भाग आहे. प्रथम जगता येणं हेच

तर महत्त्वाचं."[३४] या मध्ये आजी-आजोबा आणि सोहन या पात्राद्वारे नव्या-जुन्या पिढयांतील माणसांचा जीवनविषयक दृष्टिकोन मांडलेला आहे "आजी मला खूप हिंडायच आहे. देश बघायचा आहे. लोक कसे किडामुंगीसारखे जगतात, ते समजून घ्यायचं आहे. माझ्या शिक्षणाचा माझ्या आयुष्याशी काही संबंध आहे की नाही हेच कळत नाही. मी सध्या तरी नोकरी करणारच नाही. लग्नाचाही प्रश्न सध्या फार लांबचा आहे. आजी कदाचित ही गोष्ट माझ्याकरता नसेलच. एखादे वेळेस या घराबाहेरच पडावं लागेल. घराच्या चार भिंतीत मला बाहेरचं जग कळणार नाही."[३५] यातून सोहनच्या मनातील जीवनविषयक विविध दृष्टिकोन लेखिकेने मांडलेले आहेत.

मध्यमवर्गीय स्त्री म्हणून जीवन जगतानां स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या सर्व ताणांचे चित्रण लेखिका आपल्या कादंबरीतून रेखाटू बघते, मग प्रेमाचा अनुभव असो की मृत्युचा या सर्व अनुभवाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा आधुनिक जीवनजाणिवेतून निर्माण झालेला आहे. मात्र, लेखिका आधुनिकता व परंपरा या ताणातच अडकून पडेल. मग लेखिकेची संस्कारक्षम विचारधारा तिला एका चौकटीच्या बाहेर पडू देत नाही व केवळ प्रश्नात्मकता व आत्मशोध यातच त्यांच्या कादंबरीचा शेवट होतो. पण लेखिकेने आपल्या कादंबऱ्यातील पात्रांचा घेतेलेला शोध मात्र लेखिकेच्या दृष्टीने फार महत्त्वाचा ठरतो व त्यातून मग त्यांची जीवनदृष्टीही समजून येते. चिंतनशील अशी लेखिकेची दृष्टी मग चिंतनशीलतेतून कितीतरी दु:ख पेलण्याच्या प्रयत्न करते. यातूनच त्यांच्या आत्मभानाचा प्रवास घडविते.

'मनस्विनी' तील सौदामिनीचे मन तिला असेच प्रश्नाच्या आवर्तात फेकून देते. आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करते."असलं काही समजून घेण्याचीही अमरची ताकद नाही, यश आपल्या जातीचा आहे, पण आपल्याला अमर वाटयाला यावेत आणि यशला त्यांच्या पांगळ्या मुलीत बुडालेली त्याची पत्नी, भाईसारख्या कलाकाराला दमयंती! असं का व्हावं?आपल्यालाच का

व्हावं?आपल्याच जातीची, संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाहीत? का?"[३६] समाजातील नातेसंबंधाचा शोध घेताना अपरिहार्यपणे माणसाच्या वाटयाला आलेली नाती सांभाळताना, जपताना होणारी मानवी मनाची गुदमरच व्यक्त करते. पण या नात्यांना भेदून जाण्याची क्षमता, सामर्थ्य लेखिकेच्या नायिकांमध्ये नाही.

'मुद्रा' या कादंबरीत नायिका निरु आणि तिचे वडील यांच्यात जीवनविषयक दिशेने वाटचाल दिसून येते, "तुम्ही तुमच्या आईबद्दल का टाळता? आई तर आपल्याला किती जवळची असते. त्यात तुम्हाला त्या तुमच्या गुरु. निरुने विचारलं, निरु, गुरु म्हणून आदराचं एक विशिष्ट अंतर असतंच ते आई म्हणून मिटतं असतंही, कधी दोन्ही गोष्टी एकत्रच होतात. गुरुपण आणि आईपण. पण आमच्या लग्नातं सगळं वेगळ, विपरीत झालं. दोन्ही घरं विस्कटली, संबंध दुरावले."[३७] आशा बगे यांनी आई-वडील-मुलगी यांच्यातील संवाद मनमोकळेपणाने मांडलेला आहे. तसेच मैत्रिणीचे नाते संबंधही जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. "तू जा नीरु तुला जे आतून वाटतं, ते तुला करायला कोणी कधी अडवू नये, असंच मला आता वाटतं. आयुष्यात आगदी करावच असं वाटणाऱ्या गोष्टी फार दुर्मिळ असतात. आम्ही इतके लांब राहतो. आपापले निर्णय घेतो. तसेच घेताना एकमेकांशी, स्वतःशी भांडतो. तुला तसं तिथे कोण आहे."[३८] बोलताना मन्नूला भरुन येते. यावरुन असे लक्षात येते आशा बगे यांनी  जीवनदृष्टी स्पष्टपणे मांडलेली आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांत मध्यमवर्गीय कुटुंबातील व्यक्ती, त्यांचे जनजीवन व आपल्याच जातीपातीची माणसे व त्यांचे संवाद त्यांच्या नातेसंबंधात अभिप्रेत आहे. त्यांचे वैचारिक प्रश्न कादंबऱ्यांतून मांडलेले आहे. "मग सारं सरळ आखलेल्या रस्त्यानं का गेलं नाही? नको असलेल्या वळणाचा रस्ता का लागला? का भेटला यशोधन आणि भेटायचाच होता तर थोडा आधी का नाही? कदाचित हाच यशोधन आधी भेटला तर मी आजचा म्हणून त्याला

ॲक्सेप्ट केला असता का? जर मी अमरशी बांधले गेले नसते तर? कदाचित तसं होतं तर तो यश मला पटलाही नसता. थोडा आधीच्या वळणार यश भेटला तर कदाचित आजचा होऊन भेटलाही नसता? कुणी सांगाव?"[३९] असे अनेक अतार्किक प्रश्न उपस्थित करुन लेखिका जणू जीवनातील सत्याचा शोधच घेऊ बघते असे वाटते. आशा बगेंच्या कादंबरीचा प्रमुख विशेष म्हणजे त्याच्या कादंबरीतील प्रतिमासृष्टी, जीवनदृष्टी आणि प्रतिमासृष्टी यांचा परस्परसंबंध सांगताना डॉ. कुल्ली स.त्र्यं. म्हणतात, "जीवनदृष्टी ही वाङ्मयकृतीला एकात्मता, समग्रता प्राप्त करुन देते, सुटयाघटकांना एकत्र आणते. जीवनदृष्टी वाङ्मयकृतीचा गाभा आहे. पृष्ठस्तरीय अवयव आहे. प्रतिमारुपी झाडाच्या मुळांना अन्नरस जीवनदृष्टीच्या भूमीतून मिळत असतो."[४०]

'भूमी' मधल्या शंतनू-मैथिलीचे सहजीवन सुरु होण्याच्याही आधिपासून मैथिलीला दोघांमधले अंतर जाणवू लागते. नात्याच्या अपरिहार्य जवळीकीतून तिला दिवस जातात. गर्भपात होतो. त्या दिवशी त्याचे तिला अनोळखी असणे तिला प्रखर जाणवते. पुढे अंशुमनचा जन्म होऊनही त्यांच्यात दुरावा वाढत जातो. ती पुढे जात आहे, तिचे यश विस्तारते आहे, असे शंतनूला वाटते. तिच्या जगण्यात तो उपरा ठरतो असे तिला वाटते, तर ती स्वत:पलीकडे कधी काही पाहत नाही, असे त्याला वाटते. तिच्यासमोर आपण छोटे व असमर्थ आहोत, असे त्याला वाटत राहते. तिला न सांगता, तो मूल न होण्याचे ऑपरेशन करुन घेतो. 'स्वत्वाचं वारं प्यायला तिच्यातला बदल त्याला जाणवत राहतो, शंतनू त्याला भितो, पतिपत्नीमधील दुरावा, अंतर आपल्याला दिसून येतो.

मानवी जीवन हे किती गुंतागुंतीचे आहे याचा प्रत्यय त्यांच्या 'त्रिदल' या कादंबरीतून येतो. आशा बगे यांच्या कादंबरीत महत्त्वाचे असतात ते व्यक्ती व्यक्तीच्या स्वभावाचे विभिन्न पीळ आणि अनुभवाच्या अनेकविध संमिश्र पातळ्या ज्यामधून जीवनाची गुंतागुंत स्पष्ट होत जाते. 'त्रिदल' मध्ये नाते संबंधाचा पीळ आहे. एकाच कुटुंबात वावरणारी माणसे पण या माणसांमध्येही

परस्परविरोधी टोके आहेत. माणसे ही एकसारखी एक नसतात तर त्यांचे अनुभवाला समोरे जाणेही वेगळे आणि अनुभवानंतरचे परिवर्तनही वेगळेच असते. 'त्रिदल' मधील नर्मदा नदी ही नायिका (शारदा) अखंड सोबत करते. लेखिकेला नर्मदा व शारदेचे हे नाते महत्त्वाचे वाटते. शारदेला होणारा ब्रेस्ट कॅन्सर त्यानंतर तिच्यात झालेले परिवर्तन यातून लेखिकेची जीवनदृष्टी जाणवते. "हे कसलं जगणं! जवळचं सगळं हिसकावून घेतल्यावर उगाच दिवस ढकलत राहायचं!"[४१] जे अटळ आहे त्याचा स्वीकार करणे शारदेला जमत नाही. खरे तिचे दु:ख वेगळेच आहे. आपल्यावर ठामपणाने प्रेम करणारा, प्रेम करीत राहिलेला पती जवळ असतांनाही हे सुख घट्ट धरुन ठेवता येत नाही म्हणून शारदा दु:खी आहे.

आशा बगे यांच्या कादंबरीतील स्त्रियांनी निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य एकदम मिळत नाही, तर अनेक अनुभवातून गेल्यावर तिला ते प्राप्त होते. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा असाच अनुभव व अनेक अनुभवातून गेल्यावर येणाऱ्या प्रगल्भ जाणिवेतून माणूस खऱ्या अर्थाने शिकत जातो. दु:खाला पचविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण होते हे सत्य आहे. आयुष्यातले चढ-उतार, खाच-खळग्यांच्या वेदना,अवती-भोवतीच्या माणसांच्या स्वभावाने होणारी घालमेल, वास्तवतेतही नर्मदेच्या पात्रासारखी व्यापकता देऊ लागते आणि म्हणूनच वास्तविकतेला धरुन असणारा शारदेचा प्रवास तिच्या प्रवासाची साक्षी मंजू दैनंदिन जीवनातील एक समरसता बनून जाते व इथेच लेखिकेची जीवनाकडे बघण्याची एक नवीन दृष्टी जाणवते.

'झुंबर' ही कादंबरी एका 'स्त्री' भोवतीच फिरणारी तरीही सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांच्या सहवासात आलेले अनुभव याचं चित्रणही असंच आहे."आपलं पूर्वीच आयुष्य मागेच ठेवून आपण जात आहोत. माथ्यावर लखलखणारी 'झुंबर' आता मालवली आहेत. आपल्याला हवं होतं तसं साधं, सोपं, सरळ आयुष्य कदाचित आता शक्य

आहे."[४२] या वसुमतीच्या संवादातून लेखिकेची जीवनदृष्टीही प्रतीत होते. 'झुंबर' या कादंबरीत लेखिकेला वाटते की, देखावे, शोभेच्या वस्तू, म्हणजे झुंबरे व ही झुंबरे नवा स्वीकार अशक्य बाईचे सुख मिरविणाऱ्या बाह्य गोष्टींना लेखिका झुंबर मानत आहे. आर्थिक सुबत्ता, प्रेम, पत्नी म्हणून विश्वास, आई म्हणून त्याग, सून म्हणून समर्पण, अशी झुंबरे स्त्रीजीवनात खूप टांगलेली आहेत व परंपरेने हे सर्व स्त्रीच्या वाट्याला आले आहे. पण तिच्या जिवाच्या आतल्या सौम्य प्रकाशात तिला वास्तवाचा स्वीकार करावा लागतो हे मानवी जीवनातील वास्तव स्पष्टपणे मांडलेले आहे.

'सेतू' कादंबरीतील पात्रे एकाकी आहेत. ब्रिजमोहनचे त्याच्या खेड्यातल्या माणसांमध्ये गुंतलेले असणे, सुचरिताला समजून घेता येत नाही. त्यांना भेटल्यापासूनच तिने त्यांना मनात शिरुच दिलेले नाही आणि ब्रिज त्यांनाच काय, त्या घराला, त्या गंगेला विसरु शकत नाही. कोलेरॅडो नदीच्या काठावर उभा असताना त्याच्या मनात गंगा असते. "आता या संध्याकाळी गंगेच्या किनाऱ्यावर उभं असताना या सगळ्याची सुरुवात स्पष्ट जाणवते आहे. नक्की कुठून सुरु झालं हे सगळं? कुठून? की सुरुवात आणि शेवट हे आपल्या मनाचेच खेळ आहेत?"[४३] "ते त्यांचं आयुष्य आहे, सुचिता त्यांची जगण्याची एक परी. एवढा मोठा आपला देश. त्यातल्या इतक्या विविध समाजरीती आणि जीवनाचा हा वेग, साधा एक माणूस दुसऱ्या माणसासारखा नसतो. कुणीतरी कुणाला तरी सतत छेद देऊन जाईलच ना? त्याशिवाय नवं काही घडेल तरी कसं? तुझ्यासारखीनं तरी समजून घ्यायला हवं, सुचू!"[४४] लेखिकेनी समाजातील व्यक्तींचे समाजजीवन उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आशा बगे 'सेतू' कादंबरीत नात्यांचा गोफ विणू पाहतात, "मी जेव्हा तुम्हाला आणि मला स्वतःला हे सगळं, तेंव्हा मी एकटाच वाटल्याचा, स्वतःला उभं केल्याचा माझा अहंकार आहे, तो दुखावला जातो. मी पकडलेली वाट ही कदाचित माझ्या आईचीही असू शकते हे लक्षात आलं, की मला ते आवडत

नाही. हे घुंगरु माझ्याशी नातं सांगतात. इतक्या वर्षाचं तुटलेलं, तेंव्हा पराभव झाल्यासारखं वाटतं."[४५] जीवनाच्या तर्कातीततेचा आंतरिक एकटेपणा, दुसऱ्याशी सूक्ष्मपणे बांधलेल्या क्षणाचा आणि तुटतांना विदीर्ण होणाऱ्या अंतःकरणाचा विराट प्रत्यय दिसून येतो. यातून त्यांची जीवनविषयक दृष्टिही कळत-नकळतपणे मांडताना दिसून येते.

'भूमिका' आणि 'उत्सव' कादंबरीत नव्या-जुन्या पिढ्यांतील माणसांचा दृष्टिकोन मांडतात, "आजी, आमच्या शाळेत अशी किती मुलं होती, ज्यांना क्लास लावता येत नव्हता, पण तीही पास झाली. काही जण असे आहेत की ज्यांना पुढं शिकता येत नाही, कमावणंच भाग आहे. प्रथम जगता येणं हेच तर महत्त्वाचं."[४६] सोहनची जीवनविषयक जाणीव व्यक्त केलेली आहे. 'भूमिका' मधले आजी-आजोबा आपल्या मुलीच्या पश्चात तिच्या मुलाला आपल्या संस्कारात वाढवताना, आपल्या सुख-दुःखांचा अन्वयार्थ लावत आपले आयुष्य पुन्हा पुन्हा नव्याने त्या दुःखासह जीवनदृष्टी लेखिकेने व्यक्त केलेली आहे.

## २.१४ समारोप -

कादंबरीमध्ये येणारी पात्रे व त्यांचा विशिष्ट स्वभावधर्म हा कथेतला मुख्य घटक असतो. त्यांच्या स्वभावाचा वा वागण्याच्या पध्दतीवरुन घडणाऱ्या घटना आणि त्यांची विशिष्ट ठेवण असलेली व्यक्तिचित्रणे यांच्या ताणातून जीवनाचे मर्म उलगडत जाते. आशा बगे यांच्या कादंबऱ्याची कथानके वरवर पाहता सरळ पण तरीही आतून गुंतागुंतीची आहेत. नात्यांची एकात एक गुंतलेली मुळे व विस्तारलेल्या फांद्या, असे काहीसे चित्र त्यांनी सतत रेखाटले आहे. 'मनस्विनी' चा नवरा उमरेन्द्र यांच्या वडिलांचे एका दुसऱ्या बाईशी संबंध येतो व त्यापासून त्यांना एक मुलगा होतो. जो चित्रकार असतो असा उल्लेख अमरेंद्रच्या बोलण्यातून येतो.

'भूमिका'मध्ये नंदिनी आणि अविनाश यांचा सोहन हा मुलगा नंदिनीच्या मृत्युनंतर आजी-आजोबा त्याचा प्रतिपाळ करतात. नंदिनी आणि अविनाश

यांचे उल्लेख, पूर्वायुष्याचा एक तुकडा बनून मधून मधून येत राहतात. 'उत्सव' मधील सरुचे वीरेन्द्रशी लग्न झालेले असते, पण अपघातामुळे मातृत्वाची शक्यता नसल्याने ती त्याच्या आयुष्यातून बाजूला होण्याचा निर्णय घेते. तो पुढे विख्यात डॉक्टर बनतो. हे कथानकाचे एक सूत्र आहे, सरु एकटी का आहे याचे हे स्पष्टीकरण आहे.

अलीकडे कथानकापेक्षा मानवी मनाच्या अंतरंगाला स्पर्श करुन लिहिण्याचे आणि स्वभाव वैशिष्टयातून कथानकाचे धागे उलगडत जायचे. त्या अनुषंगाने मग निवेदनाची बाजू असणे याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. 'सेतू'चे कथानक गुंतागुंतीचे तर आहेच पण त्यात रहस्यही आहे. राघवेंन्द्रची आई घरातून निघून गेलेली असते. आणि तिचा नृत्यकलेचा अभ्यास असतो. असा उल्लेख येतो पण त्याचा विस्तार फारसा नाही.

'उत्सव', 'सेतू', 'मुद्रा' या कादंबऱ्यांची कथानके माधवी सुचरिता, नीरु यांच्या जीवनाच्या मध्यावरच्या प्रसंगाने सुरु होतात. आणि पुढे त्यांची पूर्वायुष्ये, कुटुंबे, नाती, घटनाप्रसंगांच्या आठवणीतून, पात्रांच्या संवादातून किंवा आत्मचिंतनातून फ्लॅशबॅक पध्दतीने उलगडत जाते. 'त्रिदल', 'भूमी' आणि 'झुंबर' या कादंबऱ्या कालक्रमबध्द आहेत. 'त्रिदल' आणि 'झुंबर' च्या नायिका होस्टेलमध्ये राहत असतात. तेथून कथानकाला प्रारंभ होतो. तर 'भूमी'मध्ये मैथिलीच्या बालपणापासून काळ जसजसा पुढे जातो, तसे जीवन वेगवेगळ्या घटनाप्रसंगांनी आकार घेत जाते, वेगवेगळी वळणे घेतात याचे चित्रण मांडलेले आहे.

आशा बगे यांच्या साहित्यातील 'स्त्री जीवन' हे वेगळे आहे. सद्‌भावनेच्या सतप्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यावर आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत, वैकल्ये, संगीत, नृत्य कीर्तन, संस्कार व आचार विचार यांच्याशी जवळचे नाते असलेले दिसून येते. मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या आयुष्याच्या शेवटी मूल्यांना जपणे किती महत्त्वाचे

आहे हेच दर्शवितात व हे सर्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमुळे, त्यांच्यावर झालेल्या संस्कारामुळेच घडते, असे दिसून येते.

**२.१५ निष्कर्ष -**

१) आधुनिक जीवनाच्या व धकाधकीच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी स्त्रीयांच्या जीवनातील अनेक व्यथा, संवेदना व संघर्ष यांचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

२) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती व त्यांच्यामध्ये घडणाऱ्या प्रसंगामधून, भावनिक गुंतागुंतीतून व आंतरिक संघर्षातून कथानकाचे यथार्थ चित्रण मांडलेले आहे.

३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील मानवी नाती व्यक्तीला भावनिकदृष्टया संपन्न करीत जाताना दिसतात.

४)'मनस्विनी' या कादंबरीत यशोधन व सौदामिनीच्या रुपाने कलात्मकता व संवेदना लेखिकेने अचूकपणे मांडलेली आहे.

५) आशा बगे यांच्या 'सेतू' व 'त्रिदल' या कादंबऱ्यांतून विविध अनिष्ट रुढी, परंपरा, चालिरीती आणि व्रतवैकल्ये व संस्कृतीचे दर्शन त्यांच्या लेखनातून दिसून आलेले आहे.

६) आपल्या सभोवताली असलेल्या समाजजीवनातील पारंपरिक चौकट व त्यातील स्त्रीची भूमिका लेखिकेने चित्रित केलेली आहे.

७) आशा बगे यांनी कादंबऱ्यांतून जीवनदृष्टी,समाजदर्शन, प्रतिमासृष्टी व कला दृष्टीची जाण, कला व संगीत यांच्या माध्यमातून मांडलेली आहे.

८) लेखिकेने कथानकापेक्षा मानवी मनाच्या अंतरंगाला स्पर्श करुन लिहिण्याचे आणि स्वभाव वैशिष्टयातून कथानकाचे धागे उलगडत जाताना दिसतात.

९) आशा बगे यांनी समाजातील स्त्रीचे स्थान, कुटुंब, विवाह परंपरा यांच्याबद्दलचे मूलभूत प्रश्नांना वाचा फोडलेली आहे.

१०) लेखिकेची लेखणी स्त्रीच्या दु:खाच्या, अगतिकतेच्या कथा रेखाटताना पुरुषांच्या मानसिकतेवरही भर देतात.

११) मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील व्यक्तीचे नातेसंबंध, त्याचे रीतिरिवाज आणि त्यांचे दैनंदिन जीवन याचे सुस्पष्ट प्रतिबिंब त्याच्या लेखनातून प्रत्ययास येतात.

१२) आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेचे जवळचे नाते असलेली असली तरी बदलत्या समाजवास्तवातील, कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीव त्यांच्याजवळ आहे.

१३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून जीवनाचे सखोल दर्शन व मानवी मनाचा तळ शोधू पाहणारी मर्मदृष्टी प्रकट होताना दिसते.

## संदर्भ सूची


१) बापट प्र.वा.,व गोडबोले ना.वा.,'मराठी कादंबरीची वाटचालःतंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, पुणे, १९७३, पृष्ठ - ५.

२) तत्रैव, पृष्ठ - ५.

३) कुलकर्णी मा.श्री.,'मराठी कादंबरी रचना', उन्मेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९५६, पृष्ठ - १५.

४)बापट, प्र.वा. व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरीची वाटचाल : तंत्र आणि विकास', उनि.,पृष्ठ - ३७.

५) तत्रैव, पृष्ठ - ३७.

६) तत्रैव, पृष्ठ - ३७.

७) तत्रैव, पृष्ठ - ८९.

८) पवार गो.मा.व हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८६.

९) हेर्लेकर सुलभा , 'तरुण भारत', दिवाळी अंक,नागपूर, १९८५.

१०)बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा.,'मराठी कादंबरीची वाटचाल : तंत्रे आणि विकास', उनि., पृष्ठ - १३५.

११) देशपांडे मा.का., 'साहित्य साधना', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६१, पृष्ठ - ४६२.

१२) सहस्त्रबुध्दे पु.ग,'स्वभावलेखन',मॉडर्न बुक डेपो,पुणे,१९३८,पृष्ठ-१८४.

१३) वैद्य अरुंधती, 'भूमी : एका आधुनिक मैथिलीचे जीवनयान', युगवाणी, एप्रिल-जून, २००७, पृष्ठ - १५.

१४) बगे आशा, 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७८, पृष्ठ - १५२.

१५) तत्रैव, पृष्ठ - १०६.

१६) तत्रैव, पृष्ठ - १८९.

१७) बगे आशा, 'त्रिदल',मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ - ५५.

१८) तत्रैव, पृष्ठ - ११८.

१९) बगे आशा, 'त्रिदल', उनि., पृष्ठ - २१.

२०) तत्रैव, पृष्ठ - १०३.

२१) तत्रैव, पृष्ठ - १३२.

२२) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - ५१.

२३) तत्रैव, पृष्ठ - ५४.

२४) तत्रैव, पृष्ठ - ७३.

२५) तत्रैव, पृष्ठ - ७७.

२६) तत्रैव, पृष्ठ - १८९.

२७) बापट प्र.वा., व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', उनि., १९७३, पृष्ठ - १३३.

२८) बगे आशा, 'सेतू', मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती तिसरी, २००७, पृष्ठ - ४२-४३.

२९) कुल्ली स.त्र्यं., 'जी.ए.जीवनदृष्टी आणि प्रतिमासृष्टी', विनय प्रकाशन, नागपूर १९९४, पृष्ठ - ३४

३०) पाध्ये प्रभाकर,'सौंदर्यानुभव,मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई १९७९,पृष्ठ - २१५.

३१) कुल्ली स.त्र्यं., 'जी.ए. जीवनदृष्टी आणि प्रतिमा सृष्टी',उनि.,पृष्ठ - ४२.

३२) फडके ना.सी., 'प्रतिभा साधना', साधना प्रकाशन, अकरावी आवृत्ती, पुणे, १९७७, पृष्ठ - ४९.

३३) सावदेकर आशा, 'आशा बगे यांचे कादंबरीविश्व काही शोध निबंध', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००२, पृष्ठ - १२०.

३४) बगे आशा, 'भूमिका आणि उत्सव', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०११, पृष्ठ - २६.

३५) तत्रैव, पृष्ठ - ६४.

३६) बगे आशा , 'मनस्विनी', उनि., पृष्ठ - १५२.

३७) बगे आशा, 'मुद्रा',मौज प्रकाशन,मुंबई, आवृत्ती पहिली, २०१५, पृष्ठ - ४५-४६.

३८) तत्रैव, पृष्ठ - १०१.

३९) बगे आशा, 'मनस्विनी', उनि., पृष्ठ - १५४.

४०) कुल्ली.स.त्र्यं., 'जी.ए. जीवनदृष्टी आणि प्रतिमासृष्टी', विनय प्रकाशन, नागपूर १९९४, पृष्ठ - ४१.

४१) बगे आशा, 'त्रिदल',उनि., पृष्ठ - १०३.

४२) बगे आशा, 'झुंबर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८४, पृष्ठ - १५०.

४३) बगे आशा, 'सेतू' उनि., पृष्ठ - ३.

४४) तत्रैव, पृष्ठ - ३९.

४५) तत्रैव, पृष्ठ - ६.

४६) बगे आशा , 'भूमिका' आणि 'उत्सव', उनि., पृष्ठ - २६.

## प्रकरण तिसरे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे स्त्री दर्शन

३.१ प्रस्तावना

३.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री चित्रण

३.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाचा सामाजिक आढावा.

३.४ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाचे बदलते वास्तव

३.५ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवन

३.६ स्त्री साहित्यकार म्हणून कादंबरी क्षेत्रातील आशा बगे यांचे स्थान

३.७ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील आधुनिक स्त्रीचे वर्तमान वास्तवातील चित्रण

३.८ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील जुने व नवे विचार

३.९ समारोप

३.१० निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

## प्रकरण तिसरे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे स्त्री दर्शन

### ३.१ प्रस्तावना -

कादंबरी या वाङ्मय प्रकाराला मराठी साहित्य विश्वात फार मोठी लोकप्रियता मिळाली आहे. कादंबरी हा सर्वसमावेशक वाङ्मय प्रकार असल्यामुळे त्याची व्यापकता फार मोठी आहे. कादंबरीला मराठीत पूर्वपरंपरा असली तरी कादंबरीचा खरा विकास इंग्रजांच्या राजवटीतच सुरु झाला. १९३८ नंतर पाश्चात्त्य साहित्य शिक्षण आणि पाश्चात्त्य संस्कृती यांच्या परिशीलनाने साहित्यात अनेक स्थित्यंतरे घडून आली. कादंबरीवरही याचा लक्षणीय परिणाम झाला. सामाजिक प्रश्नांचा वेध घेत अनेक वास्तवदर्शी कादंबऱ्यांची निर्मिती झाली. कादंबरी हा जीवनाचा विशालपट मांडणारा वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीतील पात्रे किती कमी किंवा जास्त, यापेक्षा त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोन किती जटिल, व्यामिश्र आहे, हे कादंबरीत महत्त्वाचे असते. कादंबरीत मानवाच्या मूलभूत भावनांचे दर्शन घडते."महायुध्दासारख्या व्यापक ऐतिहासिक घटनेपासून तो व्यक्ती-व्यक्तींमधील नाजूक आतबंधाचा अंतर्भाव करणारे कोणतेही अनुभवविश्व कादंबरीच्या पटावर चित्रित करता येत."[१] असे उषा हस्तक आपल्या लेखनात मांडताना दिसतात.

मानवी समाज स्त्री आणि पुरुष अशा दोन विभागांत विभागला गेला आहे. पण या दोन्ही विभागात समानता मात्र नाही. प्राचीन काळापासून विचार केला, तर स्त्री-पुरुष दोघांमध्ये भेदाच्या भिंती उभारल्या गेल्या आहेत. पुरुषांसाठी सर्व कार्यक्षेत्र खुले आणि स्त्रिया मात्र घरात बंदिस्त, अशी परिस्थिती सर्वत्र दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे कोणत्याही क्षेत्रात वाव मिळणे स्त्रियांना दुरापास्त झाले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे युगानयुगे स्त्रियांवर अन्याय होत आलेले आहेत. वेदकाळ सोडला, तर इतर कालखंडात स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळालेले दिसते. वेदकाळातसुध्दा स्त्रियांना समान

वागणूक होती किंवा नाही, याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. याबद्दल वंदना महाजन, 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद', या कादंबरीत म्हणतात, "वेदकाळात स्त्रियांना स्वातंत्र्य असेलही, पण स्त्री म्हणून या स्वातंत्र्यावर कोठेतरी मर्यादा निश्चित असतील."[२] असे स्पष्टपणे त्यांनी मांडलेले आहे. स्त्री म्हणजे माणूस नसून ती केवळ उपभोग्य वस्तू आहे आणि संपूर्ण घरावर ज्याप्रमाणे पुरुषाचा अधिकार असतो, तसाच स्त्रीवरही असतो. म्हणूनच तिच्यावर अन्याय, अत्याचार करण्याचा, आपली मते तिच्यावर लादण्याचा पुरुषांना पूर्ण अधिकार आहे. याचा पाठपुरावा पुरुषांनीच नव्हे, तर पुरुष विचारवंतांनी देखील केलेला आढळून येतो.

स्त्रियांनाही या पुरुषप्रधान संस्कृतीची इतकी सवय झाली होती, की आपल्यावर अन्याय होतो आहे, व्यक्ती म्हणून जगण्याचा आपला अधिकार हिरावून घेतला जात आहे, याची स्त्रियांना लवकर जाणीवच झाली नाही. एकोणिसाव्या शतकापर्यंत हा अन्याय, अत्याचार स्त्रिया निमूटपणे सहन करत होत्या. स्त्रियांनाही व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य दिले पाहिजे, ही गोष्ट पुरुषप्रधान संस्कृतीने सोयीस्करपणे डावललेली दिसते आणि स्त्रियांना या गोष्टीची जाणीव होऊ नये म्हणून तिला गृहलक्ष्मी, देवता अशी उपाधी दिलेली दिसून येते. एकीकडे स्त्रीचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घ्यायचा, तर दुसरीकडे तिला देवतेची उपमा द्यायची, हा विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे.

परंतु हळूहळू स्त्रियांना एक व्यक्ती म्हणून आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव होऊ लागली. आपल्यालाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार असावा, असे वाटायला लागले. आपल्या हक्कासाठी स्त्रियांनी लढायला सुरुवात केली. आपल्याकडील स्त्रियांच्या तुलनेत इंग्लंड, अमेरिकेतील स्त्रियांची स्थिती अधिक चांगली होती. पण स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सर्वत्र सारखाच होतो. हळूहळू स्त्रियांना आपल्या पराधीन आयुष्याची

जाणीव झाली. व्यक्तिगत जीवनात न बांधल्या गेलेल्या कोणत्याही वास्तवाचे कोणतेही रुप चितारण्याचे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात आहे. म्हणूनच निसर्ग, समाज आणि संस्कृती अशा विविध कोनांमधून व्यक्ती आणि व्यक्तीपल्याडचे जग न्याहाळण्याचे काम कादंबरीकाराला करावे लागते, "पण मराठी कादंबरीकडे व स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांकडे पाहिले की असमाधान पदरी येते, कारण त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ज्या व्यक्तिमनाचा भावानुभव व्यक्त केलेला आहे त्या व्यक्तिमनाची कुवतच बेताची आहे."[३] असे स्त्रियांच्या लेखनाबाबत भालचंद्र फडके म्हणतात. हे विधान सर्वच लेखकांना मात्र लागू पडत नाही. काही लेखकांच्या बाबतीत ते निश्चितच खरे आहे. पण स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबरीची वाटचाल निट तपासली तर विभावरी शिरुरकर, गीता साने, शकुंतला परांजपे, कृष्णाबाई मोटे, कमल देसाई या लेखिकांनी मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्या कादंबऱ्यांतून स्त्रीला माणूस म्हणून समाजात स्थान असले पाहिजे, असे आग्रहाने मांडले. स्त्रीची दुःखे व तिच्या समोर असलेल्या समस्या यांचे भान तत्कालीन कालखंडातील अनेक लेखिकांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मराठी साहित्यात, स्त्रियांचा आत्मसन्मान जपण्यासाठी स्त्रियांमध्ये हक्क, जबाबदारी, कर्तव्य आणि अधिकाराची जाणीव रुजविण्यासाठी तसेच स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वतःशी, परस्पराशी संवाद साधावा, यासाठी गेली ३५-४० वर्षे विद्याताई अथक प्रयत्न करत आहेत. प्रासादिक भाषा आणि सामान्य माणसाच्या शहाणपणावरच्या आणि चांगुलपणावरच्या अटल विश्वासातून त्या हजारो, लाखो स्त्री-पुरुषांशी मनस्पर्शी संवाद अव्याहतपणे साधत आहेत. परिवर्तनासाठी प्रबोधन करताना विद्याताईंच्या कामातील सातत्य आणि चिकाटीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्रीप्रश्न सोडवण्याचा ध्यास घेऊन त्या अविरतपणे काम करत आहेत.

कृतज्ञता व्यक्त करणं हे एक सामाजिक मूल्य आहे. त्यात व्यक्तिपूजेची भावना नसते. उलट एखादी व्यक्ती जेंव्हा वर्षानुवर्ष निरपेक्षपणे सामाजिक काम

करुन ठळकपणे लक्ष वेधून घेते, तेंव्हा त्या व्यक्तीच्या माध्यमातून एखादी महत्त्वाची प्रवृत्तीच प्रकट होत असते. स्त्री-पुरुष समतेच्या ध्येयापोटी चिकाटीने काम करण्याची गरज आहे. व्यक्ती, समाज आणि परिस्थिती यांच्या परस्पर सबंधातून मानवी जीवन आकाराला येते. व्यक्ती हाही एक महत्त्वाचा संदर्भबिंदू जगण्यासाठीच असतो.

स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्वात, वंदना भागवत प्रास्ताविक चिंतनात म्हणतात की, "स्त्रीवाद नावाचे चर्चाविश्व प्रामुख्याने पाश्चात्त्य संस्कृतीचे संदर्भ घेऊन जन्माला आले. स्त्रियांच्या स्वतंत्र विचारक्षमतेची जोरकस मांडणी आणि आग्रह त्यातून व्यक्त झाला. स्त्री-परुष शरीरे वेगळी आहेत. त्यामुळे त्यांचे अनुभव वेगळे आहेत. एवढीच एकसत्वीकरणाची भूमिका त्यात नव्हती, तर स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन पुरुषसत्ताक व्यवस्थेने बदलायला हवा. स्त्री ही अनेकदा पुरुषसत्ताक व्यवस्थेने ठरवलेल्या साच्यात बसवली जात आलेली आहे. त्यातून तिच्यावर प्रचंड अन्याय होत आलेले आहेत. तिला स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा देखील नाकारली गेली आहे. या वेदनांमधून निर्माण होत असलेले स्त्रीवाद नावाचे तत्त्वचिंतन विसाव्या शतकात समर्थपणे समोर आले आहे."[४]

१९७० च्या दशकातील चळवळी वैश्विक संदर्भात कथेत येऊ पाहत होत्या. त्यात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचा पाश्चात्त्य साम्राज्यवादाला नाकारणारा राष्ट्रवाद हे एक विद्रोहाचे साधन म्हणून बघितले गेले आणि पर्यायी ओळखीच्या मांडणीचा प्रयत्न म्हणूनही स्त्रीवादाने अनेक देशातील स्त्रियांचा वापर करत आपण शतखंडित होत जाण्याचा अनुभव घेत आहोत. आणि त्याला प्रतिक्रिया म्हणून काही एक पारंपरिक एकसंध संस्कृतीचे प्रतिमान तयार करण्याची गरज अधोरेखित करत आहोत, ही एकसंधता स्त्रियांच्या प्रतिमांमधून खेळवली जाते आहे. प्रत्यक्षात धर्म, जात, वर्ग, वर्ण यांच्यातून जितके तुकडे होतील तितके आजच्या राजकारणाला हवेच आहेत. पण सात्विक एकसंधतेला

आभास निर्माण करण्याचा तसेच स्त्री आणि पारंपरिक कुटुंबपध्दती यांच्या प्रतिमामधून स्त्रियांनी परत एकदा पुरुषसत्ताक व्यवस्थेचे अंकित करण्याचे काम वेगाने सुरु आहे. त्यात विविध सांस्कृतिक प्रतिमांचा वापर केला जात आहे.

## ३.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री चित्रण -

कथा-कादंबऱ्यांमध्ये येणारी पात्रे व त्यांचा विशिष्ट स्वभावधर्म हा कथेतला मुख्य घटक असतो. त्यांच्या स्वभावाच्या वा वागण्याच्या पध्दतीवरुन घडणाऱ्या घटना आणि त्यांची विशिष्ट ठेवण असलेली व्यक्तिचित्रणे याच्या ताणातूनच जीवनाचे मर्म उलगडत जाते. आशा बगे यांच्या अनेक व्यक्तिचित्रांच्या निमित्ताने त्यांचा मूल्यभाव आणि आयुष्यातील मानवी जीवन यांचे महत्त्व कळते. 'अत्तर'मधल्या रावसाहेबांच्या निमित्ताने दिसणारे व्यक्तिचित्रण किंवा 'मारव्या'तील वडील व मुलगा यांच्या घटकातून कलावंताच्या अंतरंगाविषयी व परंपरेतील अर्थपूर्ण आशय लेखिका व्यक्तींच्या स्वभाव चित्रणातून मांडत जातात.

अलीकडे कथानकापेक्षा मानवी मनाच्या अंतरंगाला स्पर्श करुन लिहिण्याचे आणि स्वभाव वैशिष्टयातून कथानकाचे धागे उलगडत जायचे, त्या अनुषंगाने मग निवेदनाची बाजू असणे याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे कथा किंवा कादंबरीतील स्वभावचित्रण, त्या कथेचे यश किती आहे, ते ठरवू शकते. किंबहुना कथेचे यशापयश ठरवायला, अशी व्यक्तिचित्रे मदत करतात.

मराठी कथेच्या शताब्दी वर्षात मराठी कथेबद्दल स्त्री लेखिकांच्या कथांबद्दल पुनः एकदा नव्याने कथेचा विचार केला गेला. करमणूकपूर्व काळातील गोष्टीरुप कथा हरिभाऊ आपट्यांची गोष्टीवेल्हाळ दीर्घकथा, रत्नाकर, यशवंत या मासिकातून लिहिलेली लघुकथा आणि या काळात दिवाकर कृष्णांचे योगदान मोलाचे ठरते. ना. सी.फडके आणि वि.स. खांडेकर यांची कथाही याचवेळी बहरास आली. तीस सालानंतर विकसित झालेली कथा,

साठ सालाच्या सुमारास बहराला आलेली कथा आणि आजची जीवनाच्या अतर्क्य अशा रेषांना भिडू पहाणारी भरत ससाण्यांची व्यामिश्र आणि आशयधन दीर्घकथा हे मराठी कथेचे ठळक टप्पे पाहिले तरी या प्रवाहातील वैचित्र्य, खोली, अथांगता कधी आलेली विरल खंडित अशी अवस्था आलेला हा प्रदीर्घ प्रवास आहे. या प्रवाहात अनेकवेळा साचलेपणा आला पण त्या त्या वेळी ते साचलेपण काढून तो प्रवाह पुनः वाहता करणारे ताकदीचे कथाकारही समोर आले. गुणवत्ता तंत्रावरची पकड, आशय, विकसित झालेल्या नव्या जाणिवा या बाबतीत कथेला नवीन प्रवाह मिळाले. गाडगीळ, भावे, गोखले नंतर विलास सारंग, कमल देसाई, मिरासदार, शंकर पाटील यांच्या कथांनी मराठी कथेला एक वेगळे परिमाण दिले.

दुसरे असे की, १९७५ ते १९८५ हे स्त्री दशक मानले गेले. त्यामुळे स्त्री हा विषय घेऊन लहान-मोठया स्त्री-पुरुष लेखकांनी स्त्री हा विषय कथेसाठी निवडला. दुःख, हालअपेष्टा, परावलंबित्व घेऊन जन्मास आलेल्या स्त्रीचे त्यांच्या साहित्यात जागोजागी चित्रण होत गेले. 'स्त्री' हा विषय नवा नाही. प्रेमपात्र म्हणून तिचे चित्रण भरपूर झाले. पण नवकथेनंतरच्या पिढीने मात्र तिच्याकडे एका नव्या दृष्टिकोनातून बघितले. लेखिकांची विषयदृष्टी अधिक सुजाण व सहानुभूतीची आहे. स्त्रीचे चित्रण या नव्या जाणिवेच्या संदर्भात केलेच; परंतु पुरुष लेखकांनाही ते करावेसे वाटले. स्त्री मनाकडे ते अधिक खोल आणि सूक्ष्म नजरेने बघू लागले. या नवीन लेखकांची या शंभर वर्षांत मराठी कथा उत्तरोत्तर अधिकाधिक जीवनसन्मुख होत गेलेली जाणवते.

आशा बगे यांच्या कथांतील स्त्रिया या स्त्रीमुक्ती या अर्थाने नसतात, तर विचारांनी मुक्त असतात. इतर लेखिकेच्या तुलनेत आशा बगे यांच्या कथेतील स्त्री जीवन हे सर्वांहून वेगळे असते. सद्‌भावनेच्या सद्‌वृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यांच्यावर आहे. केवळ स्त्रीचेच चित्रण समजून घेण्याचा प्रयत्न असतो असे असले तरी नकळतच त्यांच्या अनेक कथांतून स्त्रिया प्रभावीपणे जाणवतात.

असे सारे स्त्री-पुरुष प्रवाह कथेत मिसळत असतानाच आशा बगे यांची कथा प्रवाहित झाली. विजया राजाध्याक्षांच्या कथेने जो जीवनाचा माणसाचा शोध घेतला आहे, स्त्रीजीवनातील समस्या, स्त्रीचे दुःख तर त्यांनी मांडलेच, पण हे मांडताना त्यांनी एक बुध्दिमान व्यक्ती म्हणून त्या स्त्रिला समजून घेतलेले आहे.

आशा बगे यांनीही आजच्या जगात वावरताना स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या सर्व ताणांचे अत्यंत समर्पक व कलापूर्ण भान राखून चित्रण केले. आजच्या या कथेत एकाचवेळी लघुकथेची सूक्ष्मता आणि प्रदीर्घ कथेची व्यामिश्रताही आहे. आजची दीर्घकथा हा विकासाचा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. गौरी देशपांडे, सानिया, रोहिणी कुलकर्णी, उर्मिला सिरुर, भरत सासणे या सर्व समकालीन लेखकांच्या कथेहून आशा बगे यांची कथा निराळ्या वळणाची आहे. या सर्वच कथाकारांनी माणसाचं समूहातील एकटेपण आपापल्या पध्दतीने टिपले आहे. आयुष्याचे सुटे सुटे तुकडे न जोडता नुसते जवळ जवळ ठेवावे, तशी माणसामाणसांच्या नातेसंबंधाची होणारी परवड आणि वेदनाच या कथाकारांनी बोलती केली आहे.

या पार्श्वभूमीवर आशा बगे यांच्या लेखनामधील स्त्री चित्रण हे अस्सल आहे. व्यवहारात आपण जे जीवन जगतो, न्याहाळतो तेच किंवा त्यावरुन आपली पात्रे लेखक रंगवतात, खरा कलावंत हा आपल्या मनातल्या पात्रांचा कथानकांचा एक कॅमेराच आपल्यासमोर फिरवतो. त्याची कथानिर्मिती ही त्या वास्तवातल्या अनुभवाचे पुनःजन्माचे चित्रणच असते. बगे यांच्या कथेतील माणसं, स्त्रिया त्यांना भेटलेल्या आहेत, पाहिलेल्या आहेत. कुटुंबातल्या माणसांव्यतिरिक्त घरात शिकायला विद्यार्थीही होते. त्यांनी जवळून पाहिलेल्या कुटुंबातील या सगळ्या माणसांवरुनच त्यांच्या कथांमधील अनेक व्यक्तिरेखा साकार झाल्या आहेत. 'महावस्त्र' मधील मोरेश्वर जसा इथलाच, एकूणच बगे यांच्या कथांचे अनुभवविश्व या अर्थाने मर्यादित आहे. त्यामुळे समाजातील इतर

स्त्रिया किंवा विविध घरातली माणसं वगैरे त्यांना दिसत नाहीत. सामाजिक, राजकीय, आर्थिक घटनांना त्या प्रवाहीत करीत नाहीत.

आशा बगे यांच्या लेखनातून निर्माण झालेले विश्व हे मध्यमवर्गीय स्त्री-पुरुषांचे आहे. या मर्यादित भावविश्वातील अनुभव विश्व लहान नसले तरी सांकेतिक नाही. छोटयाशा सीमित वर्तुळातले अनुभव असूनही त्याच्या कक्षा मात्र खूप रुंदावलेल्या आहेत. चिंतनशीलता, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा हे त्यांच्या लेखणीचे बळ आहे. वाङ्:मयातले वास्तव हे जीवन चित्रणाचे एक साधन असते, साध्य नसते, या दृष्टीने त्यांची 'रुक्मिणी' ही कथा केवळ रेणूचे आश्रितपण किंवा कमीपण सांगत नाही. तिची व्यथा ही स्त्री-पुरुष मैत्रीपर्यंत विस्तारली आहे. रेणू धीट आहे. कीर्तनकाराची मुलगी असली तरी स्वाभिमानी आहे. घरचे वातावरण सनातनी पारंपरिक असले तरी या वातावरणाकडे स्वतंत्र बुध्दीने पाहण्यासाठी संवेदनशीलता तिच्याजवळ आहे. तिच्या वडिलांनीही तिची घडण काहीशा वेगळ्या प्रकाराने केली आहे. कीर्तनात ती धीटपणे गाणे म्हणू शकते. तिच्या एकूणच वागण्या बोलण्यात प्रत्येक कृतीत आत्मविश्वास आहे. मात्र, परंपरेत जुन्या विचारसरणीच्या घरात वाढूनही आपण इनामदारांचे आश्रित आहोत, याची बोच तिच्या अंतर्मनात आहे. परंपरेकडे पाहण्याची तिची दृष्टी कुटुंबातील इतर व्यक्तींपेक्षा वेगळी आहे. परंपरा व संस्कृती व संचिताबद्दलच तिच्या मनात सारखे प्रश्न उभे असतात. रेणू आणि तिची आजी यांच्यातील संवादातून हे प्रश्न पुढे येतात.

आशा बगे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामान्य मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण केलेले आहे. या सामान्य मध्यमवर्गीय जीवनातील व्यक्तींचे चित्रण करताना त्या व्यक्तीतील असामान्यपणा शोधण्याचा त्या प्रयत्न करतात. तर कधी कधी असामान्य व्यक्तीमधील सामान्यपणाचा व त्याच्या नातेसंबंधाची गुंतागुंत यांचा वेध घेताना त्या दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-पुरुष सुशिक्षित, सुसंस्कारीत आहेत. आर्थिकदृष्टया त्यांच्या वाटयाला चांगली

परिस्थिती आलेली आहे. पण पोशाख, खाण्यापाण्याची पध्दती, वागण्याची पध्दती, बोलण्याची भाषा या सर्व गोष्टी मात्र मध्यमवर्गीय जीवनपध्दतीला साजेशा अशाच आहेत. सण, उत्सव, व्रतवैकल्ये, परंपरा या सर्व गोष्टींना आपल्या जीवनात महत्त्व देणारी लेखिका आहे. तसेच संगीत साहित्य, अभिनय यांचेही दर्शन त्यांनी घडविलेले आहे. जीवन जाणिवांचा नवीन आकलनाच्या दृष्टीने एक प्रकारे शोध घेतलेला आहे.

'झुंबर' व 'मनस्विनी'तील स्त्रिया या परपुरुषाच्या प्रेमात पडूनही तिथेही दृष्टी जपलेली आहे. रेणूमध्ये आणि 'बेईमान'मधील माधवीमध्ये बरेच साम्य आहे. कुणीतरी बाईच मरणं आणि तिचं प्रेत पाण्यात फुगून वर आलेलं बघून माधवीला जे वाटतं ते इतरांना वाटत नाही. अनेक प्रश्नांच्या आवर्तात सापडून भोवळ येईपर्यंत गरगरा फिरणारे प्रश्न, माधवीला अस्वस्थ करतात, तर इतर सारे ते दृश्य बघूनही रविवारची सुट्टी मनवण्याच्या गोष्टी करतात. बघ्यांची भूमिका नवऱ्याचीही आहे हे बघून तिला वाटतं माणसामाणसांतलं नातं इतकं बेहिशेबी कच्चं कसं? आपला आपल्या मुलांवर व नवऱ्यावर थोडासुध्दा हक्क नाही हे सत्य पचवताना माधवीचे हळवेपण, त्या स्त्रीच्या आत्महत्येचं, रेंगाळलेलं, स्त्रीचं ते लफडं अस कसं पुरुष ठरवू शकतो? या प्रश्नाभोवती ती हतबल होते. शेवटी दुसऱ्या दिवशी कालचे सारे पुसून स्वच्छ, कालचे कुठलेच कढ नसलेली अशी एकदम स्वतःशीच बेईमान झालेली स्त्री बगे रंगवतात, तेंव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर फक्त तडजोड स्वीकारत जागणारी स्त्री असते.

'घरटं'मधली मृदुलाही निरागस, स्वतःतल्या दरवळाची जाणीव नसलेली, स्वतःच्या संसारात तल्लीन होऊन जगणारी ही मृदुला राजीवला विचार करायला लावते. चिमणीच्या पिल्लांसाठी जीव टाकणारी मृदुला, हे मात्र एक नितांत सुंदर रुप वाटतं. 'जन्म'मधील सोफेस्टिकेटेड स्त्रिया, बाईलाच प्रसुतीचा अनुभवता येणारा अनुभव, किंवा 'नातं'मधल्या गीताबाई पोळ्यावाल्या या सर्वच बायका समाजातील या संस्कृतीशी झगडलेल्या स्त्रिया आहेत. 'पांगळी'

मधील कल्याणी अप्पासाहेबांसारख्या मान्यवर लेखकांसाठी जीव टाकून लेखन करणारी अप्पासाहेबांनाही हे सुखावह वाटतं. एका विलक्षण ताकदीच्या मुलीनं आपल्यावर एवढं अवलंबून असावं यात अथांग सुख होतं, आत्मगौरव होता. स्वतःचं हळवेपण वेगळेपण घेऊन कल्याणी कथाक्षेत्रात चमकू लागते. त्यांना वाटतं हिने हा आधार सोडावा, पांगळेपण सोडावं आणि तिला खरंच तिचा प्रियकर मिळाल्यानंतर त्यांनाच पांगळेपण जाणवते. कल्याणीचे निरागस रुप, तिची लिहिण्याची जिद्द, एका तरुणीचे अलगद हृदयस्पर्शी चित्रण लेखिकेने केले आहे. इथे ती कल्याणीच्या रुपाने स्वतःतली लेखिकाच जणू बघते. स्वतंत्रपणे स्त्रीने लिहिले तर ती किती फुलू शकते हेच कल्याणीच्या रुपाने व्यक्त झालेले आहे.

'रंग'मधली मानसीही स्वतःच्याच वाटेने जाणारी, अपघात झालेल्या नवऱ्याला सांभाळून पण छोट्या-छोट्या वळणाशी स्त्री किती जमवून घेते तसे पुरुष नाही, हे संगीत स्वरातून समजून घेणारी, छोटया छोटया गोष्टीत आनंद घेणारी, पण अपघातानंतर त्याच्यातल्या बदलात कोमेजणारी अशी स्त्री भेटते. 'डोळे', 'वर्तुळ', 'मैत्रीण' यातील स्त्रियाही या सामान्य कुटुंबातल्या आयुष्याच्या शेवटी एक उपचारच असे मानणाऱ्या आहेत.

स्त्री ही मानवी समाजामध्ये सर्वकाळी परतंत्र दिसून येते. त्यामुळे समाजरचनेमध्ये क्रांतिकारी परिवर्तन करण्यासाठी धडपडणाऱ्या व्यक्तींनाही स्त्रीचे पारतंत्र्य अस्वाभाविक वाटत नाही. अनेकदा स्त्री जीवनाची असहय्यता युगानुयुगे होणारे त्यांचे शोषण, बौध्दिक आणि नैतिक गुलामगिरीच्या बसलेल्या बेड्या आणि या सर्व क्लेशांमुळे होणारा त्यांचा आक्रोश, या सर्वांचे साहित्यातील स्थान कितपत आहे, याचा बदलत्या कालप्रवाहात स्त्री मनाचा शोध घेऊ लागते. कपाळी क्लेश यावेत ही स्त्री जीवनाची शोकांतिका तर होतीच, पण त्याची गंभीर जाणीवही सामाजिक आणि वैचारिक पातळीवर कुणाला नसावी. या सर्व परिस्थितीमुळे विसाव्या शतकात स्त्रीबुध्दीला

सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक उभारणीचा पुनर्विचार करावासा वाटतो.

जगात कमी-अधिक प्रमाणात जीवनामध्ये स्त्रीचे स्थान सतत दुय्यम समजले गेल्याने आणि तिचे अस्तित्वच मुळी पुरुषाच्या विविध अवतारांच्या पूर्तीसाठी साधनभूत मानले गेल्याने जीवनाप्रमाणेच साहित्यात आणि साहित्य समीक्षेत स्त्रीवादी दृष्टिकोनाला विशेष स्थान नव्हते. कित्येक शतके पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषप्रधान साहित्य आणि पुरुषप्रधान समीक्षाच प्रतिष्ठित झाल्या. आजवर 'शाकुंतलपासून' तर 'एकच प्याला' पर्यंत सर्व लिखाण आणि त्यांचे समीक्षण पुरुषी दृष्टीतून झाले आहे. स्त्रियांनी थोडीफार समीक्षा सादर केली असेल, तर तीही बहुधा पुरुषवादी समीक्षेचे चष्मे लावूनच पण गेल्या काही दशकांत व्यवहार आणि विचार क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत गेले. त्यानुसार दबलेल्या स्त्रीत्वाचा आवाज जसजसा मुक्त होऊ लागला तसतसा तो स्वतंत्र शक्ती म्हणून पुढे येऊ लागला. स्त्री मुक्ती चळवळ या बदलत्या स्थित्यंतरामागील मोठी शक्ती होती. या चळवळीचे प्रतिध्वनी साहित्य जगात उमटले. गेल्या काही वर्षात स्त्रियांनी आपल्या दृष्टीतून साहित्याचे मूल्यमापन करण्यास आणि साहित्य स्वरुपाविषयी आपली मते मांडण्यास प्रारंभ करुन एक नवीन दिशेने वाटचाल सुरु केली आणि साहित्यक्षेत्रात भूमिकेचा समर्थ असा पुरस्कार केला.

आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी व परंपरेशी जवळचे नाते असलेली असली तरी बदलत्या समाज वास्तवातील, कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान, मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीवही त्याच्याजवळ आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबरीतील स्त्रिया व्यक्तित्वसंपन्न आहेत. त्यांना स्वतःची अशी वेगळी जाणीव आहे. विचार करण्याची क्षमता आहे. ही जाणीव जपण्यासाठी, आपले अस्तित्व आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्रीला स्त्री म्हणून असणारी स्वतःच्या अस्तित्वाची वेगळी

शारीरिक व मानसिक पातळीवरची जाणीव, पुरुषसत्ताक समाजात स्त्रीला करावी लागणारी कामे आणि मिळणारी दुय्यम भूमिका व एक उपभोगाची वस्तू म्हणून तिच्यावर लादलेल्या सौंदर्य कमनीयतेच्या कल्पना, तसेच स्त्रीने लहानपणापासून बघितलेली स्वप्ने व स्वप्नांची प्रत्यक्ष स्त्री-पुरुष संबंधात पूर्तता न झाल्यामुळे संबंध जीवनातील असमाधान, तसेच विवाहामुळे मिळणारे लैंगिक तृप्तीचे एक कायदेशीर हक्काचे स्थान व ते झुगारुन देऊन विवाहबंधनात न अडकता समाधान करुन घेण्याचा प्रयत्न केला, तर होणारी मानसिक, नैतिक व सामाजिक प्रतिक्रिया, एकटे राहण्यामुळे सुख-दुखे आपल्या जीवनात पुरुषाला स्थान नाही, असा पवित्रा घेतला, तर उरणारे पर्याय मातृत्व नाकारण्यातील, धिटाई, मातृत्वातील आनंद त्यांच्या लेखनातून मांडलेला दिसून येतो.

'अत्तर'मधील कथांमध्ये स्त्री जीवनाचा एक सखोल ठसा उमटला आहे. इथे लेखिका शाश्वत प्रश्नाला नेमकेपणाने मांडते. जीवनातील स्त्रीची परवड खुळ्या निष्ठा, यांना जपणाऱ्या स्त्रिया इथे आहेत. सुशिक्षित असलेल्या आणि सुशिक्षित नसलेल्या स्त्रियांचेही दुःख एकच आहे. शिकल्यामुळे नवऱ्याविषयी, जोडीदाराविषयी तिच्या काही कल्पना आहे. 'बंदिशाळा'मधील अनू समोरच्या घरातील शिल्पा आणि अनूची बालविधवा आत्या, वेणू या तिघीही भिन्न परिस्थितीतल्या, पण त्यांचा कोंडमारा एकाच जातीचा आहे. तो 'स्त्री' असण्याचा! शेवटी परिस्थितीनुरुप सवय करणे परिस्थितीला शरण जाणे हेच या स्त्रिया करतात. आशा बगे यांच्या कथेतील मध्यमवर्गीय स्त्रिया या सतत तडजोड करताना दिसतात. त्यांच्या स्त्रीचित्रांची एक प्रकारे ही मर्यादाच आहे. बांध फोडून स्वातंत्र्य उपभोगणे किंवा मोकळेपणी जगायला जणू त्यांची तयारीच नसते. पारंपरिकता आणि आधुनिकता, यामुळे त्यांची स्त्री सतत काठावरच उभी आहे.

स्त्रीच्या नानाविध उर्मी 'अत्तर' मधल्या कथांतून पहायला मिळतात. 'नर्सिंग होम'मधील डॉ. सुचरिता लग्न न झालेली आहे. नर्सिंग होममध्ये

तपासायला येणाऱ्या बायकांच्या संवादातून स्त्रीच्या दुःखाच्या आलेखाचे इथे चित्रण आहे. मुलगा झालाच पाहिजे आणि मुलगी झाली, तर ॲबॉर्शन करुन घ्यायला हवेय' अशी स्त्री जेंव्हा डॉक्टरकडे येते तेंव्हा लग्न झालेली व लग्न न झालेली अशा स्त्रियांमधले सुचरिता अंतर उलगडते. लग्न न झालेल्या सुपर्णाला स्त्रीने इतकं हीन-दीन, अगतिक होऊ नये वाटते; पण परिस्थिती तशी नसते, हे तिला लग्नाचा अनुभव नसल्याने कळत नाही. विज्ञानाच्या संदर्भातून स्वतःचे दुःख नष्ट करु पाहणारी स्त्री इथे भेटते. मुलगा की मुलगी हे वैद्यकीय परीक्षणामुळे आगावू माहीत झाल्यावर मुलगी असेल तर नकोच, पुढे तिच्या भाळी येणारा छळही नको. अशी अगतिक स्त्री या कथेत भेटते.

'निवडूंग' कथेत तर स्त्रीच्या मनातील पुरुषाबद्दलच्या आकर्षणाची ममत्व भावना चटकन कळते, जी निवडुंगासारखी कुठल्याही जमिनीवर वाढते. कुठल्याही परिस्थितीत जन्म घेऊ शकते, हे या कथेची नायिका गायत्रीने सांगितलेले तत्त्वज्ञान असते. मुळात गायत्री निराश्रित झालेली व आश्रयाला आलेली तडफदार तरुण, पण दुदैवी स्त्री! विश्वास हा गायत्रीने आधार घेतलेल्या घरातला मुलगा, कमल ही त्याची बायको, त्याच्या अमर्याद मद्यपानाने दुरावलेली आणि या एकाकीपणात विश्वासला वाटणारे, गायत्रीबद्दलच्या दुःखाची किनार असलेले प्रेम, खरं तर ते प्रेम नव्हेच, वासनाही नव्हे, सहभाव असेल अशा या गायत्री व विश्वासमधले संबंध किती वेगळे आहेत यामागे सत्य, मानवता, माणसाचे अस्तित्व, स्त्रीचे ममत्व अशा पातळ्यावर चित्रण केलेले आहे.

आशा बगे आपल्या कादंबऱ्यांतही कथेप्रमाणेच संगीत, साहित्य व अभिनय यांची आवड जोपासतांना दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-पुरुष चिंतनशील आहेत. नवीन जीवन, जाणिवा स्वीकारणारी त्यांची पात्रे आत्मशोध घेणारी आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रश्नात्मकता वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेच त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून घेतलेला मानवी मनाचा शोध महत्त्वाचा ठरतो.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील मानसिक आंदोलने हा त्याच्या लेखनाचा विशेष आहे. यासंदर्भात आशा बगे म्हणतात, "मला माझ्या लेखनाच्या संदर्भात माणूस महत्त्वाचा वाटतो. माणसाच्या मनात डोकावून बघतांना मला थक्क व्हायला होतं."[५] आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री ही 'स्त्री मुक्ती' या अर्थाने मुक्त नाही. पण विचारांनी मात्र मुक्त आहे. स्वच्छंदता, स्वैराचार याचा स्वीकार त्या करीत नाही.अविचारी भोगापासून अलिप्त राहण्याची वृत्तीच त्याच्या ठिकाणी अधिक आहे. स्त्री-पुरुषांचे मानसिक विश्व तसेच स्त्रीच्या अंतर्विश्वातील भावभावनाच्या आंदोलनाचा वेध त्यांनी आपल्या कादंबरीतून घेतला आहे.

आशा बगे यांच्या कथा संग्रहातून ज्या स्त्रिया आपल्याला दिसतात त्याहून निराळ्या अशा त्यांच्या कादंबरीत नाहीत, पण कादंबरीतील नायिका या कथेतील स्त्रीपेक्षा पुरोगामी विचाराच्या वाटतात. मात्र निर्णय घेताना संस्काराच्या आणि संस्कृतीच्या वलयात स्वतःला गुरफटून घेतात.

आधुनिक बदलत्या काळातील स्त्री, तिचे तिच्या पतीबरोबर, मुलांबरोबर असलेले नाते, तिचे तिच्या मित्र-मैत्रिणीसोबत असलेले संबंध, तिची मानसिकता, स्त्री-पुरुष संबंधाकडे एका वेगळेपणाने पाहण्याची दृष्टी स्त्रीच्या बदलत्या जीवनाचे चित्रण व त्याचे व्यापक असे अनुभवविश्व याचे दर्शन आशा बगे यांच्या कादंबऱ्यातून घडते.

लेखिकेची लेखणी स्त्रीच्या दुःखाच्या, आगतिकतेच्या कथा रेखाटता रेखाटता पुरुषांच्या मानसिकतेवरही भर देते. कथा वाचून झाल्यावर ही कथा स्त्रीने लिहिली की पुरुषाने असा प्रश्न पडतो, इतकी तटस्थता बगे यांच्याजवळ आहे. आणि 'पूजा'तील कथांचे स्वरुप तसेच आहे.

स्त्री-पुरुषांचे चित्रण करतानाही बगे कथेच्या अंतरंगाला विसरत नाहीत. नवकथेने साचलेलं पाणी बाजूला करुन कथा अधिकाधिक सूक्ष्म केली. पुढे तर ती जास्तच सूक्ष्मतर होत गेली. हा अटळ बदल काही तिच्या बाहयवेषाचा

नव्हता तर तो अंतरंगाचा होता. फडके-खांडेकरांच्या काळातल्या नायिका सौंदर्यसंपन्न असत. तिच्या अंतरंगापेक्षा बाह्यवेषावर, तिच्या दिसण्यावर,तिच्या बाह्य हालचालींवर कथा उभी राहत असे. घटना अगदी छोटीशी पण तिच्या अंतरंगातल्या विविधरंगी वृत्ती, पैलूंचे दर्शन आणि त्या योगे घटना उजळून निघणे यावर आता जोर जास्त आहे. समाजाच्या अधोगतीचा परिणाम हा त्या त्या काळाच्या साहित्यावरही होत असतो. सगळ्या सर्वमान्य कल्पनांचाच ऱ्हास होत चालला आहे.

स्वतः लेखिका १९९१ मध्ये झालेल्या वैदर्भीय लेखिका संमेलनांच्या अध्यक्षपदीय भाषणात म्हणते की, 'आजच्या कथाकारांसंबंधी असं बोललं जातं की या कथाकारांचा जुन्या परंपरांशी असलेला भावनात्मक संबंध फार अनोळखी झाला. नवे अनुभव घेताना आवश्यक ती नेटच नसल्याने कथा वाङ्मयीन भावविश्वाच्या संकेतात फिरत राहते व निःशक्त होते. असे होणे ही देखील मी या काळाचीच देण समजेन. स्वतः लेखिकेला ही जी देण वाटली, त्याचेच पडसाद 'पूजा'यातील कथांवर कमी-अधिक प्रमाणात उमटलेले आहेत. आपली भूमी ही संतांची आहे. या भूमीत भोगाला प्राधान्य नाही. भोग हा मुळी तिच्या रक्तातच नाही. स्त्रीला निसर्गाने पुरुषाहून भिन्न बनविले असल्याने पुरुषासारखे बेछूट, स्वतंत्र जीवन ती जगू शकत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली आपल्या कौटुंबिक व सामाजिक उत्तरदायित्वाकडे पाठ फिरविणाऱ्यांची लेखिकेच्या नायिकांनाही चीड आहे. सुख, दुःख हे तिच्या स्वभावाचे द्योतक आहे आणि नेमकेपणानी हेच सांगताना ही स्त्रीपात्रे कुठेही आदर्शवादी बनत नाहीत किंवा वेगवेगळ्या मार्गांनी सुखी होण्याचा प्रयत्न करीत नाहीत. स्वतःच्या परिस्थितीचा शोध घेताना माणसामाणसांतील नाते शोधाच्या प्रवृत्तीचाच त्या वेध घेतात .

'चित्तारओळ'मधले वातावरण, मूर्तीला, त्यातून आलेली सामाजिकता, श्रीमंत व गरीब, त्या त्या काळात जाऊन लेखिका या सर्वांचा वेध घेते.

प्रादेशिकतेलाही विसरत नाही. उन्हाळा या प्रदेशातला भाजून काढणारा ऋतू. त्या पार्श्वभूमीवर सरोजसारखी मूर्तिकलेच्या वंशातील तरुणी श्रीमंत लहान पणापासूनच्या मित्राबरोबर मोकळेपणी स्वतःचे मनही व्यक्त करु शकत नाही. संस्कारांनी बांधलेली स्त्री बगे यांच्या कथेत सततच भेटते. 'अरण्य' मधल्या गणोरकर काकू, मध्यमवर्गीय परिस्थितीत सरांना रघुनाथला ठेऊन घ्यावेसे वाटले तरी काकूंना नको वाटले. रघुनाथ सामान घेऊन गावाकडे निघतो तेंव्हा मात्र याच काकू अवघडलेपण टाकून त्याचेशी मोकळेपणी वागतात. स्त्रीबद्दलची निरीक्षणशक्ती स्त्री असूनही फार बारकाईने व रोखठोक चित्रित केली आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये मानवी मूल्यांची जपवणूक करणाऱ्या आहेत. आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन वेगळे आहे. सद्‌भावनेच्या, सत्प्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यांच्यावर आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत वैकल्ये, कीर्तन, संस्कार आचार यांच्याशी जवळचे नाते असलेले जीवन मांडलेले आहे. स्त्रीच्या अंतर्विश्वातील भावभावनांवर, आंदोलनावर, स्पंदनावर आपली कथाच रेखाटत नाही, तर पुरुषांच्या मानसिकतेवरही त्या भर देतात.

आशा बगे यांच्या कथांमधून गर्भधारणा, प्रसूतिवेदना, वात्सल्य इत्यादी पण त्या रमत नाही. स्त्रीत्वाची रेषा पार करुन पुरुषकेंद्री मानसिकतेकडेही ती वळते आणि केवळ स्त्रीत्वाच्या नात्यात अडकून न पडता माणसांमधल्या वैश्विक संबंधाकडे येत नाही. पण सर्वस्वी नवीन व स्वतःच्या परिपूर्ण आत्मशोधातून निर्माण झालेल्या त्यांच्या लघुकथा, दीर्घकथा कादंबऱ्या लेखनाने साहित्याचे दालन समृध्द केलेले आहे हे निश्चित. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील वेगळेपण शोधताना प्रामुख्याने जाणवते, तो त्यांच्या पात्रांना जीवन जाणिवेच्या नवीन आकलनाच्या दृष्टीने घडलेला आत्मशोध, जो अनुभवांच्या बहुपेडीपणातूनच साकारलेला आहे.

मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील व्यक्तीचे नातेसंबंध, त्यांचे रीतीरिवाज आणि त्यांचे दैनंदिन जीवन यांचे सुस्पष्ट प्रतिबिंब याचे तिन्ही संग्रहात विशेषतः 'पूजा' या संग्रहातून प्रत्ययास येते. यात कुटुंबातील वृध्द माणसे, तरुण-तरुणी मुले, कोणी विद्यार्थी, गायक, कोणी आश्रित, कुणी दृष्टिहीन या सर्वांच्या दैनंदिन जीवनातल्या घटनांचे चित्रीकरण तर आहेच शिवाय अगदी अल्पाक्षरी वर्णनांमधून त्यांची व्यक्तिचित्रणे डोळ्यासमोर उभी करण्याची ताकदही आहे. "नव्या पिढीची अग्रगण्य लेखिका म्हणून बगे लिहीत असल्या तरी स्त्रीबद्दल त्यांचे विचार त्यांच्या आवडत्या कथाकारांप्रमाणेच आहेत. स्त्रीने स्त्रीच रहावे, स्त्रीच्या सर्व गुण विशेषांना तिने जपावे."[६] असे बगेंनाही वाटले. त्यांच्या कथातील स्त्रिया दुःख भोगतात, भोगताना मनाने मोडून पडतात पण बंडाची भाषा कधीच बोलत नाहीत. 'रुक्मिणी'मधली रेणू तशी बंडखोरच पण ही बंडखोरीही समंजस पातळीवरची आहे. पण तरीही वाटतं की बगे यांच्या लेखणीला स्त्री सरळपणे अपयश पत्करते किंवा तिचा पराभाव होतो, हे शोभत नाही. लेखणीची बंडखोरी स्त्री चित्रणामध्ये कमीच उतरली आहे, असे वाटत राहते. त्या मानाने पुरुष पात्रच नेहमी उठाव घेऊन घेतात.

'नवस' या कथेतही 'नवस' बोलल्यानंतरही काही वर्षे उलटून जातात. मध्ये खूप नवीन घडून जातं पण तो नवस फेडला नाही याची सतत नायिकेला रेवतीला बोच राहते. कथेची नायिका रेवती आजाणतेपणी नवस बोलते व जाणतेपणी तो फेडायला जाते. स्वतः लेखिका म्हणते, "विठ्ठलाशी असलेले माझे सनातन नाते कुठे होते? आणि मी म्हणजे मीच नव्हे तर माझ्यासारखी, स्वतःच्या लहानसहान जाणिवेबद्दल जागरुक असलेली स्त्री होती. 'नवस' या कल्पनेलाच तर या नव्या जगात थारा नव्हता. मुळात मुंजच अनावश्यक होऊन बसलेली पण माझ्यासारखी स्त्री हे सगळे बरोबर घेऊनच या नव्या जगात जगू पाहते."[७] येथे लेखिकेने पारंपारिक रुढी परंपरांना स्थान दिलेले आहे.

'पूजा' मधील ब्राह्मण कुटुंबाच्या या कथेतही स्त्री-पुरुषातली सूक्ष्म स्पंदने माणुसकीच्या धाग्याने जोडणे. पूजेला ब्राह्मण ठेवणे, ही प्रथा आता जुनी झाली

तरी थोड्या ठिकाणी टिकून आहे. या जुन्या अवशेषांना नवीन पिढीतील 'ललिता' हीच डोळसपणे स्वीकार करते, हे ललिताच्या प्रत्ययकारी चित्रणातून स्पष्ट होते. अप्पांच्या समांतर चालणारी ही ललिता पुनः नव्या जुन्या पिढीमध्ये अंतर, बाह्यपरिस्थितीमध्ये तसेच अंतर्मनातले, ललिताच्या रुपातून एक सात्विक, समंजस व जुन्यातले चांगले घेऊन नव्याचा स्वीकार करणारी माणसाला समजून घेणारी स्त्री इथे भेटते.

**३.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री जीवनाचा सामाजिक आढावा -**

भारतीय स्त्री जीवनाची अधोगती, समाजातील तिचे दुय्यम स्थान, अनेक लेखिकांनी अनुभवलेले व बघितलेले आहे. आयुष्यभर कष्ट उपसून पुरुषाच्या बरोबरीने संसाराचा गाडा ओढणाऱ्या स्त्रियांच्या नशिबी शेवटी समाजाची उपेक्षाच येते. स्त्रियांची ही दुर्गामी त्यांना बघवत नव्हती. स्त्री जीवनाचा विचार करता अन्यायाच्या गडद काळोखात गडद झालेली स्त्री जीवन शिक्षणामुळे काहीशी आशादायी मार्गक्रमण करताना दिसते. या काळात स्त्री जीवनात काही सुधारणा झाल्याचे दिसते. काही स्त्री साहित्यिक या काळात पुढे आल्या आणि पुरुषांच्या बरोबरीचे स्थान त्यांना त्या काळातील पुरुष संतांनी बहाल केल्याचे दिसते. पंढरपूरची वारी करण्यासाठी पुरुषासोबत स्त्रियाही एकत्र पंढरीला जात, समर्थ रामदासांचे काही आश्रम स्त्रिया चालविताना दिसतात. पुण्यासारख्या ठिकाणी स्त्रिया कीर्तन करायच्या पण अपवाद म्हणून असे काही प्रसंग सोडले, तर वास्तव दैनंदिन जीवनातील स्त्रीची परिस्थिती अगदीच निराशाजनक अशी दिसते. या परिस्थितीचे विश्लेषण करताना साने गुरुजी म्हणतात, "बाहेरच्या व्यापक जीवनाचा त्यांना स्पर्श नसे. पुरुषाप्रमाणेच स्त्रीला बुध्दी आहे, भावना आहेत, तिला आत्मा आहे, तिच्या जीवनाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा, ही भावना नव्हती."[८] एकूणच स्त्रीबाबत जी काही थोडीफार दाखविली जायची वा स्त्रीला शक्ती मानून तिची पूजा केली जायची, ती साने गुरुजींना तकलादू वाटते. आशा बगे यांनी परंपरा नाटय आणि संगीत यांचे प्रेम व त्यातून स्त्रीच्या

अनुभवाला एक वेगळे जटिलतेचे परिमाण दिले. सांस्कृतिक भावनांचा स्पर्श मराठी कथेला जाण्याचे श्रेय आशा बगे यांच्या कथेला जाते.

'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनीच्या जीवनाचा प्रवास लेखिकेने दाखविला आहे. प्रेमाचा त्रिकोण साकार करणारी ही कादंबरी असली तरी वेगवेगळ्या वाटेवरची आहे. या कादंबरीतील नायिका संगीतप्रेमी आहे. म्हणूनच ती संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधाराने आपले मन व्यक्त करते आणि पुढची वाट धरण्यासाठी संगीताचाच आधार घेते.

'मनस्विनी' कादंबरीतील सौदामिनी प्रत्येक अनुभव पारखू बघते. तिला कलात्मक संगीतमय संवाद हवा आहे व म्हणूनच ती संगीतवेड्या यशोधनशी संवाद साधते. त्याच्याशी होणारा संवाद तिला हलवून सोडतो व तिला अनेक प्रश्नांच्या आवर्तात घेऊन जातो, आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतो. "असलं काही समजून घेण्याचीही अमरची ताकद नाही. यश आपल्या जातीचा आहे. पण आपल्याला अमर वाट्याला यावेत आणि यशला त्याच्या पांगळ्या मुलीत बुडालेली त्याची पत्नी आणि भाईसारख्या कलाकाराला दमयंती अस का व्हावं? आपल्याच जातीची संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाहीत? का?"[१] आत्मशोधाच्या या प्रक्रियेत असा प्रश्न तिला पडतो.

अमरेन्द्रशी ती लग्नगाठीने बांधल्या गेली आहे. पण तिच्या मनाच्या तळात व शरीरात संवादाचं साधन नाही. दोघांमध्ये प्रचंड दरी असल्याचे तिला जाणवते, काही किनारे जवळ आल्यासारखे तिला वाटतात पण जुळत नाहीत. यशोधनपर्यंत संगीताच्या आकर्षणाने ती पोहचते. पण पारंपरिक व संस्कारबध्द मन यशोधनशी अधिक संबंध ठेवायला तयार होत नाही, अशा या वाटेवर तिला अनेक प्रश्न छळतात. ती स्वतःला विचारत राहते, यशोधनच्या प्रेमात आपण गुंतलो खरे पण हे सुखद क्षण आपल्याला काय मागणार? कोणती आहुती मागणार? आणि मग ती त्या सगळ्या क्षणांना नकार देण्याचे ठरविते. तिच्या मनाची होणारी ही उलथापालथ आणि स्त्री म्हणून परपुरुषाशी संबंध

ठेवण्याबाबत आलेले बंधन हे सौदामिनीच्या रुपाने आशाताईंनी आपल्या कादंबरीतून साकारले. या संदर्भात सुलभा हेर्लेकर म्हणतात, "स्वतःच्या मनाशी असलेली सौदामिनीची ही ओढ म्हणजे अपूर्णतेची पूर्णतेकडे असणारी ओढच त्यांनी या ठिकाणी दर्शविली आहे."[१०] ज्या बिंदूपासून सौदामिनीचा प्रवास सुरु होतो त्याच बिंदूकडे ती पुन्हा वळते. आपले दुबळेपण तिने स्वीकारले आहे. यशोधनला वगळून जगणे तिला शक्य नाही पण समाजाच्या चौकटीही तिला तोडायच्या नाहीत म्हणून तिची धडपड, तगमग, आवेग या सर्वांचा आलेख या कादंबरीतून लेखिका दर्शविते.

'झुंबर' ही दुसरी कादंबरी एका स्त्री भोवतीच फिरणारी तरीही सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांच्या सहवासात आलेले अनुभव यांचे चित्रण प्रत्येक वेळेला लेखिका स्त्री-पुरुषांचे असे समांतर चित्रण करते. 'झुंबर' ही कादंबरीही याला अपवाद नाही. 'झुंबर' ची नायिका ही धाडसी पण करुणेत शेवट होणारी कादंबरी आणि वसुमती दोन्ही शोकात्म पातळीवर पण काळावरच थांबल्या आहेत. ही कलाकृती शोकांतिका झालेली नाही. जरी अनुभवाचे पदर त्याला त्या पध्दतीने वेढलेले होते. कुठल्या तरी किनाऱ्यावर आणून प्रश्न निर्माण करणे हेच सर्वच नायिका करीत आल्या आहेत. आशा बगे, प्रश्नांची उत्तरे किंवा स्त्री कशी असावी, तिचा आदर्श, वगैरे सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत. तिथे अंतःर्विश्व कसे घडले आहे, त्यात ती कोणत्या यातना सहन करीत आहे व संस्कृतीचे पालन करणाऱ्या विचारातच गुरफटलेली आहे.

'मनस्विनी' प्रमाणेच 'झुंबर' या कादंबरीत फारश्या घटना नाहीतच. डॉ. ऋषिकेश अधिकारी हयांच्याशी त्यांचीच विद्यार्थिनी वसुमती हिचे अट्टाहासी प्रेमलग्न ही एक मूळ घटना आणि कादंबरीच्या उत्तरार्धात डॉ. अधिकारी आजारी पडल्यानंतर त्यांच्या समोरच डॉ. राघव हाही डॉ. अधिकारींचाच विद्यार्थी आणि वसुमतीवर सुरुवातीपासूनच प्रेम करणारा एक निर्लेप सज्जन

सात्विक मनाचा तरुण डॉ. राघव याच्याशी वसुमतीचे लग्न लावून देणे, या दोन घटनांना जोडणारी तिसरी घटना म्हणजे डॉ. ऋषिकेशांचा मृत्यु! या मृत्युमुळे व्यथित झालेली वसुमती अग्रलेखातही डॉ. अधिकारींच्या सर्जनतेच्या स्वभावाच्या अनेक उल्लेखात केवळ आपला 'पत्नी' म्हणूनही उल्लेख नाही, हे बघताच तिच्या मनाची झालेली तडफड, आतल्या आत रडत असलेले मन लेखिकेने पारदर्शी चित्रणाने उभे केले आहे.

'झुंबर'ची नायिका वसुमती धाडसी आहे पण संस्कृतीचे पालन करणाऱ्या विचारातच गुरफटलेली आहे. स्वतंत्र वृत्तीची वसुमती हट्टी आततायी स्वभावामुळे डॉ. अधिकारींशी लग्न करते. डॉ. राघव निरंजन हाही डॉ. अधिकारींशीच लग्न करण्याचे ठरविते. 'झुंबर'मध्ये या तिघांच्याही नातेसंबंधाची गुंतागुंत आहे. कादंबरीची सुरुवात होते ते डॉ. ऋषिकेश अधिकारी यांच्या मृत्युनंतर वृत्तपत्रातील बातमीने. अस्वस्थ झालेल्या वसुमतीपासून या बातमीत तिच्या नावाचा उल्लेखही नसतो. पत्नी म्हणून आपले अस्तित्व नाकारले गेल्याने ती अस्वस्थ होते. पण तिच्या लक्षात येते की आपण कधीच खऱ्या अर्थाने डॉ. अधिकारींच्या पत्नी, प्रेयसी नव्हतो. त्यांच्यातल्या शिक्षकानेच या साऱ्यावर मात केली होती. शेवटी त्यांच्याच आग्रहाखातर आपण डॉ. राघवशी पुनर्विवाह केला.

डॉ. ऋषिकेश हे फार निराळे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना लग्न, संसार या गोष्टीत बिलकूल रस नसतो. त्यांचे विश्वच वेगळे आहे. त्यांच्या हातून एक केस बिघडते ती गोष्टी ते फार मनाला लावून घेतात व त्याच हळव्या व दुबळ्या क्षणी फक्त वसुमतीचा आधार ते घेतात. अपयशाच्या या अनावर क्षणीच हा ताठ माणूस तिला जवळ ओढतो. हा मनुष्य ताठ असतांना आपल्याला सापडला नाही हे ओळखूनही पराभवाचा सल दडवून ती स्वतःला त्याच्या स्वाधीन करते. पण लग्नानंतर वसुमती मात्र कधीच सखा-प्रियकर-जवळचा मित्र म्हणून त्याच्या जवळ जाऊ शकत नाही. मग तिला प्रश्न पडतात,"रात्रीच्या एकांतातले

ऋषिकेशचे स्पर्श कुठल्या नात्यानं होतात. फक्त पती म्हणून? की अटळ शारीरिक गरज म्हणून?"[१२] आत्मशोधामधली ही प्रश्नात्मकता तिला अत्यंत एकाकीपणाकडे घेऊन जाते. तिचा आत्मशोध सुरु होतो. ती डॉ. अधिकारी सोबत असूनही त्याच्यात मिसळू शकत नाही. "तिला एकदम फार एकटं वाटलं. वाटलं की माथ्यावर झुंबर लखलखतं आहे आणि त्याखाली खोटी रंगरंगोटी करावी तसं स्वतःचे आयुष्य आतून उसळून येणारे स्त्रोत. आपण नाकारुन बसलो आहोत ती झुंबर मालवावीत आणि भोवती शांत, संयमित प्रकाश असावा."[१३] या शब्दात लेखिका तिच्या मनोवस्थेचे चित्रण करते.

'झुंबर' या कादंबरीतील वसुमती ही स्वतंत्र वृत्तीची, हवा तो निर्णय घेऊन आपल्या आयुष्याची निवड करु शकणारी स्त्री आहे. एक प्रकारे आशा बगे यांची ही नायिका स्वतःला शरण जाऊन वास्तवाचा स्वीकार करते. स्वतःतले सामान्यपण तिला कळून आलेले असते. पारंपरिकतेला छेद देणारी ही नायिका दिसत असली तरी मात्र तो तिचा स्वतःचा निर्णय नसतो, तर डॉ. अधिकारींच्याच आग्रहाखातर तिला हे पाऊल उचलावे लागते व त्याक्षणी तिच्या मनाचा जो गोंधळ उडतो, तिला जे काही प्रश्न पडतात, ते सर्व फार महत्त्वाचे ठरतात. वसुमतीच्या आंतरिक वास्तवाला लेखिका या ठिकाणी फार महत्त्व देते.

काही क्षणिक कालापुरते आपल्यालाही राघवची गरज आहे असे वसुमतीला वाटते आणि 'गरज' या शब्दापाशीच ती विलक्षण दचकते. आपले शिक्षण, आपले मुक्त व्यक्तित्त्व आपल्या भावना यांना सांभाळून तिला जीवनावश्यक गोष्टीकडे उघड्या डोळ्यांनी पाहता येत नाही, तर दुसरीकडे आपल्या मनालाही तिला आवरता येत नाही. मोकळे सोडून देता येत नाही आणि पूर्णपणे मनाच्या आधीन होऊन जगणेही कठीण वाटते. डॉ. अधिकारींचे आजारपण व त्यांचे वसुमतीच्या आवाक्याबाहेरचे जगणे, तसेच स्वतःच्या विषयात रमलेला हा माणूस आपल्याबरोबर कधीच रमू शकणार नाही, याची

तिला झालेली जाणीव, यामुळे ती राघवशी आपले नवीन नाते प्रस्थापित करते. राघवने, 'तुझा निःसंदिग्ध होकारच मला हवा आहे' या उद्‌गारलेल्या वाक्यावरुन तिला पुन्हा काही प्रश्न छळतात. "निःसंदिग्ध असं काही श्रेय माणसाला आयुष्यात मिळतं तरी का? आपण सगळी ढकलली तर जात आहोत! गरज, आधार, प्रेम, सहानुभूती, शब्द अनेक आहेत. पण रुप एकच."[१४] आशा बगे यांनी स्पष्ट शब्दात नातेसंबंध मांडले दिसून येतात.

'स्वतःच्या बंगल्यात हॉस्पिटल उघडून आता हा संसार सुखाचा होईल असे निर्धास्तपण वाचकांना येताक्षणीच डॉ. अधिकारी आजारी पडतात. छोट्या मोठ्या देण्या-घेण्याचा आनंदही वसुमतीला ऋषिकेशच्या सहवासात मिळत नाही. तेंव्हा तिला वाटतं, दोघांमध्ये एक अस्पष्ट रेषा आहे आणि तिच्या दोन्ही बाजूला दोघे उभे आहेत. तिच्याबाहेर जाणं दोघांनाही जमत नाही. पण हे बाहेरच्या वर्तुळात जाणे ऋषिकेशच्या तीव्र आजारपणानी साध्य होतं. ज्या एका क्षणी ऋषिकेशने वसुमतीला जवळ केलं असतं. त्याच क्षणावर त्यांनी तिच्यापासून दूर राहण्याचा निर्णयही घेतला असतो. बंगल्यातून वसुमती, दादा, आदित्यापासून दूर पुनः मेडिकल कॉलेज क्वार्टरवर राहायला जातात आणि भूतकाळातल्या एकटेपणात रममाण होताना, ते जीवन जगता जगताच वसुमतीला दुसऱ्या लग्नाचा आदेशही सूचकतेने देतात. डॉ. राघवचे तिच्याविषयीचे प्रेम जाणून, त्याच्याशी बोलून डॉ.अधिकारी वसुमतीला पूर्णपणे मोकळे करतात. हा मोकळेपणा, हे स्वातंत्र्य तिला देताना त्या किंचितही ते भावनावेगात गुरफटत नाहीत. नव्हे तो त्यांचा पिंडच नसतो. वसुमतीला या दुसऱ्या जीवनाची ओढ असते. तशी ती धीट वगैरे असूनही सामान्य सुखाच्या तिच्या कल्पना असतातही.

पूर्वायुष्यात गमावलेले सुख तिला मिळणार असते. पण तिच्यातली संस्कार रेषा हे स्वीकारायला तयार नसते. डॉ. अधिकारींच्या इच्छेखातर ती डॉ. राघवशी लग्न करतेही पण तिचे तिला कळत नाही की, डॉ. अधिकारी असताना

आपण डॉ. राघवशी लग्न करतो? सुरवातीपासून जरा जिद्दीने वेगळी वाट स्वीकारणारी ही वसुमती एकदमच दुबळी वाटते, पराभूत हाते. तरीही एक सुरेल कवितेचे जीवन आता जगता येईल ही जाणीव ती घेऊन जाते. पण जेंव्हा डॉ. अधिकारींच्या मृत्युवरील अग्रलेखात तिचा उल्लेखही नसतो तेंव्हा पत्नी म्हणून ती कासावीस होते आणि इथेच तिच्या मनस्वी स्वतंत्र वृत्तीचा पराभव झालेला असतो. वास्तविक, अधिकारींशी तिचा संबंध राहिलेला नसताना केवळ नावासाठी तिने मनाला लावून घ्यावे हे पटण्यासारखे वाटत नाहीच. पण डॉ. राघवच्या आधी ती या असामान्य डॉ. अधिकारींची पत्नी असते, आणि डॉ. राघवची बायको म्हणून नावाजण्यापेक्षा डॉ. अधिकारींची मी पत्नी होते हा सार्थ अभिमान त्या क्षणी तिला वाटून गेला असणार. शेवटी एखाद्या लखलखत्या झुंबराचा अनुभवच तिला होऊन जातो. झुंबर विझायचं असतं हे जाणून डॉ. अधिकारी व डॉ. राघव या दोघांबरोबरचा तिचा प्रवासही यशोधन व अमरेंद्र सारखा समांतरच असतो.

वसुमतीच्या मनातले डॉ.अधिकारींबद्दलचे लग्नाचे विचार व त्यानंतरच्या दिवसातली वसुमती, उत्तरार्धात डॉ. राघवशी प्रेम व जीवन यांच्याबद्दल सैध्दांतिक बनून चर्चा करणारी वसुमती, यांच्यात एक पुरुषसानिध्य असूनही दूर अस्तित्वात असलेल्या स्त्रीचे दर्शनच लेखिकेने घडविले आहे. आशा बगे यांच्या स्त्री चित्रणाची एक विशिष्ट कला आहे. वसुमतीने केलेला डॉ. राघवचा स्वीकार, तिच्यामध्ये होणारा सद्सदविवेक बुध्दीचा संघर्ष व शेवटी राघवकडे जाताना आदित्यला मी सोबत नेऊ का म्हणून सासऱ्यांना विचारणारी वसुमती शेवटी मात्र आदित्यही ऋषिकेशच बनणार, त्यामध्ये आपला रंग अवशेष म्हणूनही उरणार नाही, या वास्तवाची तिला होणारी जाण हे सारे डॉ. च्या दुरापास्त होणाऱ्या ओढीतूनच प्रकट झाले आहे. इतर कथाकार हे स्त्री पुरुष संबंध रंगविताना त्यात नैतिकतेला वाव देत नाहीत तर या उलट आशा बगे आपले स्त्री पात्र विशिष्ट नैतिकतेच्या भक्कम पायावर उभारुन त्या चित्रणाला एक बहुमान मिळवून देतात. स्त्रीची ही स्वतःच्या वृत्तीशी चालणारी झुंज

लेखिका विशिष्ट शैलीतून प्रकट करते. सुरुवातीची वसुमती स्वतंत्र, स्वतःचा रस्ता शोधणारी, स्वतःपुरतीच हरवणारी, धीट, शेवटी पारंपरिक स्त्रीप्रमाणेच त्यांच्याकडून अपेक्षा करीत राहते. इतकेच नव्हे तर डॉ. अधिकारी आजारी असताना एकटे राहत असतानाही त्यांच्यासाठी म्हणून डॉ. राघवशी लग्न करते आणि स्वतःचा स्वाभिमान हरवून केवळ आपले नाव म्हणून पारंपारिक स्वरुपाने अपमानित व पराभूत होते. या कादंबरीतील नायिकेमध्ये धाडसी व माघार यांचे मिश्रण दिसून येते.

'त्रिदल'मधील शारदा आणि मंजू या दोघी मैत्रिणी. दोघींचाही स्वभाव वेगळा. दोघींच्याही घरातील वातावरण वेगळे. शारदा एकत्र कुटुंबातली पण तिला आई नाही. कुणी भाऊ-बहीण नाही. तिची फक्त समोर वाहणारी नर्मदा आणि होस्टेलमधली मिस ल्यूक शारदेचे एकटेपण तिला समूहापासून दूर नेत राहते. तर मंजू मात्र आधुनिक, मैत्रिणीच्या घोळक्यात वावरणारी, कॉलेजच्या गॅदरींगपासून सगळ्यात रस घेणारी, तर शारदेला आईच्या आठवणीतून जपलेली परंपरेची वाट ठाऊक आहे. नर्मदास्त्रोत्र म्हणणारी ही नायिका मोठे कुंकू लावते. कारण तिची आईही तसेच कुंकू लावायची. पिक्चरला जाणे, हॉटेलमध्ये खाणे, मुक्त हिंडणे-फिरणे तिला आवडत नाही. मंजू ही शारदेच्या अगदी उलट स्वभावाची तरी शारदा मंजूसोबत मैत्री करते व एकमेकांच्या सानिध्यात त्यांची मैत्री फुलून येते व प्रेमाचे विश्व आकाराला येते.

मंजूच्या माध्यमातून श्रीच्या जवळ जाणारी शारदा एकदिवस तिच्या भावाशी विवाहबध्द होते. पण मंजूला मात्र शारदा व श्री यांची जोडी आवडत नाही. कारण शारदेला मंजू ओळखून आहे. श्रीला प्रेमात करकचून बांधून घेणारी शारदा तिला पटत नाही. एक मैत्रीण म्हणून ती तिचा स्वीकार करते पण भावजय म्हणून ती शारदेचा स्वीकार करु शकत नाही. शारदेला स्वयंपाक घरकाम करणे आवडते. एक सून म्हणून ती त्या घरासाठी सतत कष्ट घेण्याच्या तयारीत असते. आपल्याला एक आदर्शवादी सून म्हणून या कुटुंबातील

लोकांनी आपले कौतुक करावे, अशी सर्वसामान्य स्त्रीसारखी तिची अपेक्षा आहे. शारदेला फक्त नर्मदा नदीची सोबत आहे. तिच्या मनातील नर्मदा तिला कधीच सोडत नाही. तीच तिची जिवलग आहे, तिचा विसावा आहे. लग्नानंतरही ही नर्मदा तिला सतत सोबत करते.

लग्नानंतर प्रत्येक गोष्टीसाठी हट्टाला पेटणारी शारदा, सतत श्रीशी वाद घालते. आईवेगळ्या वाढलेल्या शारदेला श्रीनिवासचे प्रेम, त्याच्या आईचा जिव्हाळा कळू शकत नाही, तर श्रीनिवासला ती आपल्याच कोषात ओढण्याचा सतत प्रयत्न करते. श्री फक्त आपलाच आहे व तो आपलाच राहिला पाहिजे हा तिचा अट्टाहास. कधी कधी मधूनच तिचे मन तिला धास्तावते. तिला वाटते, आपण श्रीनिवासला शोभत नाही. त्याच्या माणसांमध्ये आपण सामावत नाही ही सल तिला सतत बोचत राहते. कारण ती ज्या वातावरणातून आलेली असते, ते वातावरण श्रीच्या घरातील वातावरणापेक्षा फार निराळे असते व म्हणून ही उणीव तिच्या मनात सतत घर करुन राहते. त्याच्या घरातील माणसांना ती आपले मानूच शकत नाही.

आशा बगे यांनी 'त्रिदल' कादंबरीमध्ये रुढी, परंपरा आणि रीतिरिवाज मांडलेले आहे. मंजूचा लग्नाचा सोहळा व त्या संदर्भातील लगबग अचूकपणे चित्रित केलेली आहे. "तुझ्या घरची आली आहेत, त्यांची तैनात फक्त सांभाळ, तब्बेतीला जप, जास्त दगदग करु नको."[१५] मंजूची आई शारदेला जिव्हाळ्यानं म्हणाली. "त्यांची कसली तैनात! अगदी साधीच माणसं आहेत आमच्या घरची पाहुणी थोडीच आहेत?"[१६] मंजूची आई व शारदा यांच्यातील नातेसंबंध चित्रित केलेले आहे.

शारदेचा प्रवास व त्या प्रवासात तिला होणारी नर्मदेची सोबत, तिच्या संपूर्ण आयुष्याशी बांधली गेलेली ही नर्मदा, नर्मदेचे व शारदेचे असलेले हे अतूट नाते हळूहळू मंजूलाही जाणवू लागते व ती म्हणते, "प्रत्येक माणूस हा वेगळा असतो व प्रत्येकापर्यंत पोहचण्याचे रस्तेही वेगळे असतात."[१७] प्रेमातूनच

प्रेमाकोशापलीकडच्या अथांग प्रेमाकडे जाण्याचे बळ शारदेला प्राप्त होते व या ठिकाणीच शारदेच्या असामान्यत्वापर्यंतचा हा प्रवास आशा बगे यांनी शारदेच्या रुपाने आपल्यासमोर ठेवलेला आहे. 'नाही ग श्रीचं असं नाही न पाहिला नं देखलेला प्रियकर पण आता म्हणालीस नं, तर रेणुकेची, जगदंबेची मूर्ती डोळ्यांपुढे येते आहे. नर्मदेचं संध्याकाळचं सावळं पात्रही आठवत आहे नं! हे सगळं त्या शब्दात असेल की, आपल्या मनाचेचं खेळ असतील गं? वेगवेगळे संदर्भ देऊन स्त्री चित्रण लेखिकेने साकारलेले आहे.

आपल्या स्त्रीत्वाच्या साक्षात्कारातूनच आशा बगे यांनी बंडखोरी करता न येणारी पण केली तरी निर्वेधपणे न जगता येणारी, सामान्य असूनही असामान्य माणसाला जपण्यासाठी जीवनाचा कोट करणारी, पार्थिवाला शरण जाणारी, छोटयाछोटया दुःखानी कोलमडणारी, जगता जगता सामान्य विश्वापल्याड जगू पाहणारी आणि असामान्य होऊ पाहणारी, अशा कितीतरी स्त्रीमनांचा उत्कट वेध त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून घेतलेला आहे.

आशा बगे यांच्या 'त्रिदल' या कादंबरीमध्ये दोन मैत्रिणींमधील नातेसंबंधाचा शोध त्यांनी घेतलेला दिसतो. मंजू आणि शारदा या दोघी होस्टेलमध्ये राहणाऱ्या मैत्रिणी, मंजूचा भाऊ श्रीनिवास याच्याबरोबर शारदेचा विवाह होतो व मग दोन मैत्रिणींचे नाते नणंद-भावजय या नात्यात रुपांतरित होते. मैत्रीच्या नात्यातला मोकळेपणा संपतो आणि नातेसंबंध बदलतात. परंपरेचा धागा न सोडता सनातन नात्यातले नवेपण शोधणे हे आशा बगे यांच्या लेखनाचे वैशिष्टय याही कादंबरीत जाणवते.

मंजू-शारदा-श्रीनिवास यांच्या भावबंधाचे सूक्ष्म चित्रण आशा बगे या कादंबरीतून करतात. कादंबरीमध्ये भोवतालच्या इतर पात्रांबरोबर नर्मदाही महत्त्वाची आहे. ही नर्मदा शारदेला शेवटपर्यंत सोबत करते. तिच्या मनातील नर्मदा ही तिची जिवलग आहे. तिचा विसावा आहे. लग्नानंतर मात्र ती कधीच नर्मदेला भेटत नाही तरी नर्मदा कायम तिच्या मनात घर करुन राहते. "आमच्या

इथल्या नर्मदेची मला भीती वाटली नाही. उलट सगळे सांगतात. माझी आई गेली तेंव्हा मी सारखी रडायची, कुणी नर्मदेवर घेऊन गेले की शांत व्हायची, ही नर्मदा तर कुणास ठाऊक, आईचं नसणं मी कसं सहन केले असतं."[१९] स्त्री जीवनाच्या जगण्यातला संघर्ष जन्मापासून ते मृत्युपर्यंत मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हळूहळू अनेक अनुभवातून गेल्यानंतर तिला स्वतःच संताप बटबटीत वाटतो. जीवन जगण्यातील आंतरिक अर्थ तिला आता कळला आहे व नर्मदेशी त्याच्या विशाल गहिऱ्या पात्रांशी असलेले तिचे नाते तिला आठवू लागते. जीवनातील भोगाला ती सहजतेने स्वीकारते. खूप काही गमावले तरी आयुष्य जगण्यासारखे असते. सुंदर आणि देखणे असू शकते हे तिला कळून चुकते. अनुभवातून ती उद्गारते, 'आपण आपल्याभोवती उभं केलं आपलं आयुष्य हे मन लावून मांडणे, सजवणे आपल्या हाती आहे, असे आपल्याला वाटते, पण तसे घडत नाही.' यातून लक्षात येते की शारदा जगण्यातून पलीकडे गेली आहे. साक्षीभूत उरली आहे. नर्मदेचा काठ आपण कधी पाहिला नाही, असे म्हणणाऱ्या शारदेला पलीकडचा काठ दिसू शकतो. प्रेमातूनच तिला प्रेमाकोशापलीकडच्या अथांग प्रेमाकडे जाण्याचे बळ प्राप्त होते व या ठिकाणी शारदेच्या असामान्यत्वाचा प्रत्यय येतो. सामान्य भासणाऱ्या स्त्रीचा असामान्यपर्यंतचा हा प्रवासच आशा बगे शारदेच्या रुपाने आपल्यासमोर ठेवतात.

आशा बगे यांची स्त्रीप्रश्नांची जाण, त्यांच्या साहित्यातून स्त्रीवर्गाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी हळूहळू बदलू लागली आणि त्याचबरोबर स्त्रियांचीही स्वतःकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागली. आपण विचारक्षम आणि मनुष्य म्हणून पुरुषाइतकेच सक्षम असूनही निव्वळ चुकीच्या रुढी, विवेकहीन धार्मिक, कर्मकांडे व अनिष्ट सामाजिक प्रथांमुळे समाजात आपल्या वाटयाला दुय्यमत्व मिळाले याविषयीचे भान स्त्रियांमध्ये जागे झालेले आहे.

मंजूला श्री आणि शारदा या दोघांचेही भिन्न पिंडधर्म जाणवत असतात म्हणून ती शारदेला भावजय या नात्याने स्वीकारु शकत नाही, पण मैत्रीण म्हणून शारदा मंजूला हवी असते व मग यातूनच कादंबरीत ताण-तणाव निर्माण होतो. शारदेचे वाद घालणे, हट्ट करणे, श्रीच्या घरातील वातावरण स्वतःला कनिष्ठ लेखणे व यातून तिचा स्वभाव चिडचिडा होत जातो व श्रीला घट्ट पकडून ठेवण्याचा ती प्रयत्न करते. कारण आपण श्रीनिवासला शोभत नाही, त्याच्या माणसांमध्ये सामावत नाही हा सल तिने खूप खोलवर जपलेला आहे. त्याच्यासाठी त्याच्या माणसांनाही ती दुखावते. आत्मपरीक्षण करणे हा तिचा स्वभावच नाही. तिच्या या अहंकेंद्री स्वभावामुळे एकमेकांना समजून घेण्याचे सारेच मार्ग बंद झाल्यासारखे मंजूला वाटते व यातच शारदेला ब्रेस्ट कँसर होतो व मग ती अधिकच दुखावली जाते. या प्रसंगी मंजू तिला मदत करु इच्छिते पण तिला ते जमत नाही. ती म्हणते, "हे कसलं जगणं! जवळचं सगळं हिसकावून घेतल्यावर उगाच दिवस ढकलतं राहायचं!"[२०] असा वैताग ती सतत व्यक्त करते. जे अटळ आहे त्याचा स्वीकार करणे शारदेला जमत नाही. तिचे दुःख वेगळेच आहे. आपल्यावर ठामपणे प्रेम करणारा, प्रेम करीत राहणारा पती जवळ असतांनाही हे सुख घट्ट धरुन ठेवता येत नाही म्हणून ती दुःखी आहे.

'सेतू' कादंबरीमध्ये परंपरेचा व संस्कृतीचा नवा वेध घेतलेला आहे. जीवनाच्या तर्कातीलतेचा, आंतरिक एकटेपणाचा, दुसऱ्याशी सूक्ष्मपणाने बांधलेल्या क्षणांचा आणि तुटतांना विदीर्ण घेणाऱ्या अंतःकरणाचा विराट प्रत्यय या कादंबरीत आहे, तर 'भूमी' मध्ये प्रज्ञावंत, प्रतिभाशाली सामंजस्य स्त्रीचा जीवन प्रवास रेखाटताना आशा बगे पुन्हा एकदा आधुनिक आणि पारंपरिक विचारसरणीमध्ये समन्वय साधणाऱ्या प्रगल्भतेचा प्रत्यय घडवून देतात. पुराणकालीन मैथिलीच्या नावाशी न जुळणारे व्यक्त रुप घेऊन कादंबरीची नायिका स्वतःमधल्या सर्जनशील शक्तीला साद घालते आणि स्वत्व जागे ठेवून आत्मसामर्थ्याच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करते. आधुनिक असूनही पारंपरिक स्त्री जीवनाचा प्रवास मैथिलीच्या रुपाने मांडलेला आहे.

माणसाचे परस्परविरुध्द स्वभावधर्म समजून घेण्याचे भान यात आहे. अनुभवाला सामोरे जाणे, अनुभवानंतरचे विकासणे-कोमेजणे यातही माणसाचे माणूसपण आहे. लढत, झगडतच बळ मिळवावे लागते ते सहजप्राप्त नसते, हे भान 'त्रिदल'मधल्या तीन कोनांच्या तीन प्रकारात आहे व आशा बगे यांनी आपल्या सामर्थ्यशील लेखणीने या माणसांची खोली मापण्याचे काम केले आहे. 'सेतू' ही एक अंतर्मुख करणारी कादंबरी आहे. ही कादंबरी माणसांमधल्या नात्यांचा सूक्ष्म वेध घेते. लहान मोठया व्यक्तिरेखांचा शोध घेताना पती-पत्नी, सासू-सून, नणंद-भावजय, आई-मुलगा, वडील-मुलगी, मावशी-भाची असे विविध नातेसंबंध मनात घर करतात.

'सेतू' कादंबरीत परस्परांशी असलेले संबंध महत्त्वाचे आहेत. त्या माणसांना जे दिसते ते लेखिकेला महत्त्वाचे वाटते. म्हणून कादंबरीतील डॉ. नियोगी म्हणजे दादा, एकदा सुचरिताला म्हणतात, "अग सुचरिता, त्याचं मूल्यमापन मी कोण करणार?' एक माणूस दुसऱ्या माणसाचे मूल्य ठरवू शकत नाही, तर काळच सर्व मूल्य जोखत असतो."[२१] दादांचे व्यक्तिमत्त्व 'सेतू' कादंबरीतून प्रकटपणे दिसून येते. 'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी आहे. आशा बगे यांच्या साहित्यात जुन्या, मागच्या काळात मूलभूत आचार-विचारांची एक चौकट वहिवाट म्हणून पडत गेलेली असते. त्या चौकटीचा आधार म्हणून काही मूल्य त्यांच्या लेखनातून दिसून येतात.

दादासाहेब इतिहासाचे संशोधक असून मूलभूत मूल्ये जपताना ते म्हणतात, "ज्यांनी अखेर समाज पुढे सरकले आणि सगळ्या पडझडीतून शिल्लक उरतात ती मूल्ये."[२२] ब्रिजमोहन, सुचरिता व राघवेंद्र या तीन व्यक्तींच्या भोवतीच कथानक फिरताना दिसते. ब्रिजमोहनचे घराणे व त्यांच्या जुन्या रुढी, परंपरा व सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण यामुळे, ब्रिजमोहन, व सुचरिता यांच्यात होणारे तणाव दिसून येतात. "ते त्यांचे आयुष्य आहे, सुचरिता, त्यांची जगण्याची एक परी. एवढा मोठा आपला देश. त्यातल्या

इतक्या विविध समाजरीती आणि जीवनाचा हा वेग. साधा एक माणूस दुसऱ्या माणसासारखा नसतो. कुणी तरी कुणाला तरी सतत छेद देऊन जाईलच ना? त्याशिवाय नवं काही घडेल तरी कसं? तुझ्यासारखीनं तरी समजून घ्यायला हवं, सुचू!"[२३] आशा बगे यांनी नायक आणि नायिका यांच्यामार्फत समाजजीवन मांडलेले आहे.

स्त्रीला स्त्री म्हणून असणारी स्वतःची अस्तित्वाची वेगळी शारीरिक व मानसिक पातळीवरची जाणीव, पुरुषसत्ताक समाजात स्त्रीला करावी लागणारी कामे आणि मिळणारी दुय्यम भूमिका, एक उपभोगाची वस्तू म्हणून तिच्यावर लादलेल्या सौंदर्यकमनीयतेच्या कल्पना, तसेच स्त्रीने लहानपणापासून बघितलेली स्वप्ने प्रत्यक्ष जीवनात लेखिका मांडताना दिसते. "स्त्री स्वतःला बघते अखेर ती एक स्त्री म्हणूनच, व्यक्ती म्हणून नाही. या चक्रातून सुटण्यापेक्षा त्यात गुरफटून जाणं किंवा सामावून जाणं हेच तिला अधिक मानवतं, पण आई अशी नव्हती. आणि बबीमावशी! लग्न न करता दादांसारख्या माणसांचा संसार तिनं केला, पण तीही अशी फरफटत गेली नाही. त्यांना संधी मिळाली आणि यांना नाही, हाच फरक आहे का फक्त?"[२४] ग्रामीण भागातील समाजजीवन व एकत्रित कुटुंबपध्दती यांचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

"स्त्री-पुरुष ही दोन्ही एका निसर्गाचीच निर्मिती आहे, स्त्री-पुरुषांमधील आकर्षण हेही तितकेच स्वाभाविक आहे आणि निर्मितीमध्ये दोघांचाही सारखाच वाटा असल्याने ही जोडी परस्परांना पूरक आहे. परस्परांच्या विरोधी नाही, तिचं चारुदत्तावर प्रेम आहे. पण ती व्यवसायानं गणिका-श्रीमंत गणिका आहे. तिच्या प्रेमाची फार मोठी किंमत नाही. त्या वेश्येच्या आतलं स्त्रीमन चारुदत्ताकडे ओढ घेतं. तिच्यामागं शकार लागतो. पण शेवटी राज्यक्रांती होते. शूद्रकानं ही राज्यक्रांती काही वेगळं म्हणून जोडलेली नाही. या क्रांतीचा स्पर्श वसंतसेनेच्या नियतीला अटळपणे होतो. ती वेश्या आहे, स्त्री आणि त्यातही वेश्या म्हणून तिचं ते ठरलेलं भागधेयही शूद्रक या राज्यक्रांतीनं बदलवू पाहते. तिच्या प्रेमाचा

तो सन्मान करतो. ही शूद्रकाची नवता आहे. ती त्या काळात त्यानं पाहिली, ती नवता स्त्रीच्या संदर्भात महत्त्वाची वाटते. खरे म्हणजे शूद्रकाच्या या नाटकातल्या राज्यक्रांतीचं स्वरुप जास्ती करुन सामाजिकच ठरतं. ते फक्त राजकीय उरतच नाही."[२५] मृच्छकटिक नाटकाच्या प्रयोगातील संवादातून एका स्त्रीची कथा अचूकपणे लेखिकेने रेखाटलेली आहे.

'सेतू' कादंबरीत लेखिका म्हणतात, 'आपल्याच नायिकेच्या प्रेमात न पडता माणूसपणाचा शोध घेणारी ही कादंबरी आहे. उदित, अर्पिता व सुमंगल हे नव्या माणुसपणाचे कोवळे अंकुर आहेत. ब्रिजमोहनची आई, नीरजा, भाभी या प्रवाहपतित अशा गतानुगतिक स्त्रिया, सुचरिताची आई आणि ती स्वतः या व्यापक भूमिकांतून स्त्रियांचे नवे व जुने ताणतणाव दिसून येतात. "कमाल आहे! मी तुला बांधून ठेवलं? माझ्या मनात नसतांना आपलं सर्व सोडून मी तुझ्यामागं इथं आले आहे मोहन."[२६]

'सेतू'मधील सुचरिता ही इम्युनॉलॉजीमध्ये डॉक्टरेट, ब्रिजमोहन दिल्लीला मनोरुग्णालयात व मुलगा पिलानीला लेक्चरर आहे. जीवनात सर्व काही असूनही ब्रिजमोहन एकटा पडलेला दिसून येतो. तो त्याचा तोल तोलू शकला नाही. याला कारणीभूत सुचिता आहे असे ब्रिजमोहन म्हणतो. दीर्घ अशा एकत्र आयुष्यात खूप मिळते पण खूपसे निसटून जाते, हे सुचरिताला कळते आहे ते का आणि कसे निसटते, याचा शोध घेत ती स्वतःच्या तळापर्यंत जाते. ब्रिजमोहनला खूप छोटयाछोटया गोष्टी हव्या होत्या, पण आपणच त्या नाकारल्या, त्याची माणसेही नाकारली. आपल्या आंतरिक सेतुबंधनाच्या प्रवासात ब्रिजमोहनची हीच भूक आपण नाकारली, हे तिच्या लक्षात येते. "अंशतः माझ्यामुळं असू शकेल, पण डॉक्टर, सगळ्या परिस्थितीत आपला एकटयाचा सहभाग असतो तरी का? त्यांचे आपल्या बहिणीवर प्रेम होतं ही बहीण लग्न होऊन आमच्या घरी परतली. हे काही माझ्यामुळं नाही झालेलं! माझा मुलगा चांगला इंजिनियर झालेला आहे. मॅकॅनिकल इंजिनिअर! पण

त्यालाही कशात अर्थ वाटेनासा झाला आहे. या सगळ्याला काही मी जबाबदार नाही."[२७] यामध्ये स्त्री जीवन संघर्षाची घालमेल झालेली दिसून येते. माणसांच्या पल्याड जाणारे जीवन आणि त्यातील व्यथा, वेदना यांचे अनोखे दर्शन म्हणजे 'सेतू' होय.

'सेतू' कादंबरीत ब्रिजमोहन, बाबूजी, मॉ, दोन बहिणी अर्पिता आणि नंदिनीचा मोठा भाऊ नंदकिशोर, भाभी आणि मुलगा सुमंगल असे कुटुंबातील प्रदीर्घ प्रवास बनारसच्या गंगा नदीच्या काठावर वाढलेले कुटुंब आहे. ब्रिजमोहन व सुचरिता काशीविश्वेश्वराचं दर्शन घेऊन दोघं दशाश्वमेध घाटावर आली. ब्रिजमोहन लहानपणी तासनंतास गंगा नदीत पोहायचा, संपूर्ण जीवनच गंगा नदीच्या सोबती गेलेले आहे. या गंगेनं अनेक रुपं तटस्थपणे पाहिली. त्या गंगेच्या पाण्यावर वाढलेली माणसं तशीच का झाली नाही? आज त्यांची माणस पोकळ वाटली नाही, ते त्यांचे जगणं होतं सुचरिता ती माणसंच नाकारत गेली. स्वतःच स्वतंत्र राज्य स्थापू पाहिलं. शेवटी अर्थ काय या सगळ्या स्वातंत्र्याचा?उदित आपला मुलगाच असून म्हणाला, की तू मला बांधून ठेवलसं, तस बाबांनाही तू बांधून घातलस, म्हणून हे बाबा असे. जीवनातील संघर्ष व निसर्गवर्णन यातून स्त्री जीवनाचा आलेख दिसून येतो."आता या संध्याकाळी गंगेच्या किनाऱ्यावर उभं असताना या सगळ्याची सुरुवात स्पष्ट जाणवते आहे. नक्की कुठून सुरु झालं हे सगळं? कुठुन? की सुरुवात आणि शेवट हे आपल्या मनाचेच खेळ आहेत?"[२८] 'सेतू' कादंबरीमधून मानवी मनाचे एक वेगळेच दर्शन त्यांनी वाचकाला घडविले आहे.

ब्रिजमोहनचे घराणे, यांच्यातील सुचरिताचे व सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण व त्यामुळे निर्माण होणारे तणाव यात दिसतात. अमेरिकेतील संपन्न जीवन मानमान्यता, स्थैर्य नाकारुन भारतात परतण्याची ब्रिजमोहनला असणारी ओढ आणि सुचरिताला अमेरिकेतच राहण्याची व मुलगा उदित याला

अमेरिकेतच वाढविण्याची इच्छा यांच्यातील संघर्षाने या तणावाला एक वेगळेच वळण लागलेले दिसते .

सुचरिताचा आत्मशोधही महत्त्वाचा आहे. तिला प्रश्न पडतो आपण इतकं जवळ असतानाही ब्रिजमोहन एकटा का पडला? आपण त्याचे एकटेपण का तोलू शकलो नाही? का? या प्रश्नांच्या भोवऱ्यात तिचे मन गरगरते, दीर्घ एकत्र आयुष्यात खूप मिळते. पण खूपसे निसटून जाते हे तिला कळले आहे. ते का आणि कसे निसटले याचा शोध घेत ती स्वतःच्या मुळापर्यंत जाते. या प्रवासातच तिला कळते की, ब्रिजमोहनला खूप छोटया छोटया गोष्टी हव्या होत्या. पण आपणच त्या नाकारल्या. त्याची माणसेही नाकारली, आपल्या आंतरिक सेतूबंधनाच्या प्रवासात ब्रिजमोहनची हीच भूक आपण नाकारली हे तिच्या लक्षात येते. गंगा नदीच्या अंगाखांदयावर वाढलेला ब्रिजमोहन गंगेपासून आपल्यामुळेच तुटला असल्याची जाणीव तिला होते. मुलगा उदितही स्वतंत्रपणे जगू इच्छितो. त्याला सुचरिताच्या चौकटी मान्य नाही. भोवतालच्या वास्तवाचाच एक भाग होऊन जगणे त्याला मंजूर आहे. सुचरिताच्या या आत्मशोधात तिला जाणवते. इतकं वरवरचं काही नसतं याची सुरुवातही खूप आधीपासून केंव्हातरी झालेली असणार. माणसांना एकमेकांशी जोडून ठेवणारे एकमेकांपर्यंत पोचता येणारे पूल हळूहळू केंव्हातरी जोडून पडले. तिचा हा आत्मशोधही 'सेतू'चा गाभा आहे.

स्त्री कशी घडवावी यामध्ये संस्कृतीचा म्हणजे प्रस्थापित सामाजिकतेचा मोठाच हात असतो आणि ती घडणही हेतुतः विशिष्ट प्रकारची केली जाते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीत्वाची घडण पुरुषप्रधानतेला जुळवून घेणारी, पक्की करणारी आणि वाढविणारी असते. स्त्रीच्या आर्थिक आणि राजकीय शोषणाच्या सोईसाठी साहित्य, कला आणि मिथके यांच्यामधून विशिष्ट प्रतिमा उभी केली जाते आणि त्यानुसार तिचे सांस्कृतिक स्थान व भूमिका ठरते. एका बाजूला स्त्रीसौंदर्याचा लैंगिक उत्तेजनासाठी सरळपणे मनमानी उपयोग केला जातो तर

दुसऱ्या बाजूस हे अधिक धोकादायक, कारण स्त्रीमनाला ते अधिक मोहक वाटणारे आहे. स्त्री म्हणजे कविता, स्त्री म्हणजे प्रेम, स्त्री म्हणजे स्वर्ग अशा उद्‌गारात तिची अस्मिता, तिचे व्यक्तित्व लोपविले जाते. सारांश, स्त्री सर्व काही आहे. फक्त ती स्त्री नाही, या साऱ्या पाचकळ प्रयोगातून स्त्रीला सोनेरी शृंखलांनी जखडण्याचाच उद्योग असतो. स्त्रीला नखशिखान्त बुरख्यात झाकून ठेवणे किंवा तिला अर्धवस्त्रावस्थेत सार्वजनिकपणे नाचविणे किंवा पारमार्थिकांच्या पध्दतीने तिला सर्व संकटांचे मूळ म्हणून धिक्कारणे किंवा तिला देवता मानून सोज्वळपणाच्या आणि मांगल्याच्या पिंजऱ्यात बांधून ठेववे हे स्त्रीचे शोषण आहे, असे म्हणता येईल.

## ३.४ आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री जीवनाचे बदलते वास्तव -

आशा बगे यांनी मराठी कथा-कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार लेखन करुन स्वतंत्र वाट चोखाळली आहे. 'झुंबर', 'सेतू' या कादंबऱ्यांनी त्यांनी आपले वेगळेपण सिध्द केले आहे. 'भूमी' या त्यांच्या कादंबरीमधून स्त्रीजीवनाच्या कर्तृत्वाचा आलेख चित्रित होतो. तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास उत्तरोत्तर होत जातो. त्याचवेळी तिच्या कुटुंबाशी चाललेला अंत:संघर्ष ही तितकाच प्रभावीपणे व्यक्त होतो. ती ज्या कुटुंबात जगत असते, तिथे मात्र तिच्या जगण्याला मर्यादा पडतात. तिच्या भावना समजून घेणारा जोडीदार तिला मिळत नाही. त्यामुळे भावनिकदृष्टया ती एकाकी पडत जाते. तरीही ती कुटुंब उभे करण्यासाठी जिवाचा आटापिटा करते. तिच्या भावनांची कदर केली जात नाही. बुध्दीच्या, जिद्दीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर ती यशाची शिखरे गाठत जाते. लेखनाने स्वत:चे नाव कमावते. या सगळ्या मुळे तिच्याकडे असामान्य कर्तृत्व असणारी स्त्री म्हणून कुटुंबातले सर्वजण तिच्याकडे पाहतात. तिच्या मनाची एकाकी अवस्था होते. तरीही ती जीवनाच्या सर्व आघाड्यावर यशस्वीपणे लढत राहते. स्वत:च्या मनाचा कुठेही तोल जाऊ देत नाही.

आजच्या आधुनिक जगात स्त्री ही स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येते आहे. मात्र स्त्री म्हणून तिने घरच्या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. घरकाम आणि नोकरी करुन ती कुटुंबाला सांभाळत असते. तिच्या पात्रतेचा जोडीदार मिळाला नाही तर दोघांच्यामध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. छोटया छोटया गोष्टींवरुन त्यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. नवरा बायकोमध्ये जो विश्वासाचा पाया असतो तोच नाहीसा होता. त्यामुळे विसंवाद वाढतो. तसाच संघर्ष शंतनू व मैथिली यांच्यामध्ये आहे. मैथिली यशाच्या शिखरावर पोहचूनही तिचा मानसिक कोंडमारा होतो. पारंपरिक जीवनाशी नाळ जोडून आधुनिक जीवनाच्या धकाधकीच्या स्पर्धेत यशस्वी होणारी स्त्री ही कुटुंबात मात्र एकाकी पडते. त्याचे चित्र आशा बगे यांनी 'भूमी' कादंबरीत प्रभावीपणे मांडले आहे.

## ३.५ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवन -

मैथिली ही या कादंबरीची नायिका आहे. मैथिलीचे बालपण कडलूर या गावी जाते. तिची आई हॉस्पिटलमध्ये नर्स असते. तिचे वडील विश्राम हुशार न्यूरोसर्जन डॉक्टर असतात. त्यांचा मृत्यु तिला कळण्याआधीच होतो. ती रोज संध्याकाळी समुद्र किनाऱ्यावर फिरायला जाते. तिला हा परिसर अतिशय आवडतो. स्वामीनाथनचा मुलगा पुट्टूही फिरायला येतो. तिचा तो लहानपणीचा मित्र असतो. परंतु पुट्टूची आई त्याच्याबरोबर तिला मोकळेपणाने बोलू देत नाही. त्याचे कारण मॅथ्यूज अंकल आणि तिच्या आईचे अनैतिक संबंध असतात. ते तिच्या शाळेतील शिक्षक असतात. तिच्या घरी रोज संध्याकाळी येतात. त्यामुळे तिला बऱ्याच उशिरापर्यंत समुद्र किनाऱ्यावर थांबावे लागते. तिला त्यांचे घरी येणे आवडत नाही. चित्तरंजन हा तिच्या वडिलांचा मित्र असतो. ते आल्यावर तिच्याबरोबर समुद्र किनाऱ्यावर फिरायला येतात. ती आपले वडील कसे होते? म्हणून प्रश्न त्यांना विचारते. ते चांगले हुशार होते, असं त्यांनी सांगितल्यावर तिला आनंद होतो. तसेच चित्तरंजन अंकलही तिला आवडतात.

मैथिलीची आई आजारी पडते. तिचा आजार वाढत जातो. तिला चांगल्या दवाखान्यात दाखविण्यासाठी मॅथ्यूज अंकल मद्रासला घेऊन जातात. तेथून आणल्यावर तिला गावातल्या दवाखान्यात ॲडमिट केले जाते. लहान वयात एकदम तिच्या जीवनाला कलाटणी मिळते. तिचे दररोज संध्याकाळचे समुद्रकिनाऱ्यावचे फिरणे बंद होते. घर, शाळा आणि पुन्हा हॉस्पिटल असा तिच्या जीवनाचा क्रम सुरु होतो. सुरुवातीला जानकी आंटी जेवण देत असते. ते तिच्या आईने बंद केले. तिलाच करायला लावले. घर झाडणे, जेवण करणे ही कामे तिला करावी लागत होती. एक दिवस तिच्या आईचा मृत्यु होतो. ती पूर्ण एकटी पडते. आईबद्दलच्या अनेक आठवणी तिच्या मनात दाटून येतात. तिची आत्या तिला मुंबईकडे शिक्षणासाठी घेऊन जाते. आत्याच्या घरात सुरुवातीला तिला एकटं एकटं वाटतं. हळूहळू मुंबईच्या वातावरणात ती स्वतःला सावरायला लागते. नियतीने तिचे जगण्याची सवय करावी लागली. एक आत्या सोडली तर तिच्या जवळचे असे कोणीच नव्हते. आत्याकडेही ती पहिल्यांदाच आलेली होती.

मैथिलीची आत्या आईच्या मायेने तिला वाढविते. तिच्या शिक्षणाची काळजी घेते. तुझ्यात तुझे वडील विश्रामची बुध्दी आहे. तू मनापासून प्रयत्न कर म्हणजे तुला नक्की यश मिळेल. ती नापास झाली तरी तिच्या मनाला खटकेल असे बोलत नाही. मैथिलीमधील शिक्षणाबद्दलचा आत्मविश्वास ती हळूहळू वाढविते. ती तिच्यावर मनापासून प्रेम करते. तिला शिक्षणाने अधिक परिपक्व बनविण्याचा प्रयत्न करते. जीवनात शिक्षणानेच तिला स्थैर्य निर्माण करता येईल याची काळजी घेते. तिला आपल्या घरात परकेपणाची आजिबात वागणूक देत नाही. जर कोणी घरात तिला बोलत असेल तर त्याला बोलू देत नाही. तिची ती पाठराखण करते. मैथिलीच्या मनात आत्याबद्दल अत्यंत आदर असतो. तिला ती निसर्गसौंदर्य आणि विविध स्थळे पाहण्यासाठी घेऊन जाते. तिच्या मृत्युने ती हवालदिल होते. तिच्या अत्यंत जवळचे आणि जिव्हाळयाचे माणूस कायमचे गेले, याचे तिला दुःख होते.

स्त्री जीवनाचे प्रतीक भासणारे भूमीचे विविध पोत दर्शविणारे चंद्रमोहन कुलकर्णींचे मुखपृष्ठ आशयपूर्ण वाटते. एकंदरीत 'भूमी' हे लेखिकेच्या कादंबरीतील अतिशय महत्त्वाचे पाऊल ठरते. पण परत लेखिका शेवटी मात्र आपल्याच वर्तुळात परत येण्याचा प्रयत्न करतांना दिसते. नेहमीप्रमाणेच मग त्यांच्या कादंबरीचा शेवट पूर्णविरामाने होत नाही, तर अनेक प्रश्न मनात निर्माण करते. पण तरीसुध्दा आशा बगे यांच्या इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत त्यांची 'भूमी' ही जास्त सकस व ताकदवर कादंबरी आहे, असे मला वाटते.

मैथिली अस्वस्थ होऊन जाते. रोहिणी मायदेवच्या नवऱ्याच्या ऑपरेशनसाठी मैथिली आपल्या आई-वडिलांनी ठेवलेल्या पैशातील तीन हजार रुपये देते. रोहिणी पुढे बऱ्याच वर्षांनी तिचे पैसे पाठवून देते. ऑपरेशन नंतर तिचा नवरा पंधरा वर्ष जगला. अडचणीच्या काळात तिला पैसे उपयोगी पडले, याचा आनंद मैथिलीला होतो. मैथिली एम.ए. विद्यापीठात मित्रासरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करते. मित्रा सरांची ती आवडती विद्यार्थिनी असते. तिच्या हुशारीवर मित्रा सर खूष होतात. एम.ए. ला मैथिली विद्यापीठात पहिली आली. त्याचा तिला आनंद झाला. आपला निकाल तिने आत्याला सांगितला. तिलाही आनंद झला. त्यावेळी देवस्थळीबाईंचा मृत्यु झाल्याचे तिला समजते. तिचा तऱ्हेवाईक स्वभाव, तिचे दांडेकरांशी असलेले अनैतिक संबंध या आठवणी तिच्या मनात जाग्या होतात. त्यांनी तिला प्राध्यापकांची दिलेली पुस्तके तिच्यापाशी असतात. जसजसा त्यांचा स्वभाव बदलत गेला. तसतसा त्यामध्ये तिला वात्सल्याचा अनुभव आला. देवस्थळीबाई बेफिकीरपणे आयुष्य जगली. तिच्या मृत्युनंतर आता फक्त मैथिलीच्या मनात तिच्याबद्दलच्या आठवणी जाग्या झाल्या.

देवस्थळीबाईंच्या मृत्युनंतर काही दिवसांनी दांडेकर मैथिलीसाठी शंतनूचे स्थळ घेऊन येतात. त्याबद्दल ती विचार करुन तुम्हास सांगते, असे सांगून वेळ मारुन नेते. पुन्हा दांडेकर येतात. शंतनूची भेट घडवून देतात. त्यानंतर ती

रात्रभर विचार करते. त्यानंतर लग्नाला तयार होते. आत्या तिला समजून सांगते. असा घाईघाईने एकदम निर्णय घेऊ नकोस. अजून चांगली स्थळं तुला येतील, त्यासाठी तू शांतपणे निर्णय घे. तिला प्रेमाचा एकदा वाईट अनुभव आल्यामुळे तिला नव्याने अनुभव घ्यायचा नसतो. लग्नाला तयार असल्याचे ती आत्याला सांगते. वैदिक पध्दतीने अगदी साध्या स्वरुपात तिचे लग्न होते. लग्नाला दोन्हीकडची अगदी मोजकीच मंडळी असतात. शंतनूशी मद्रासला जाऊन नव्या उमेदीने संसाराला सुरुवात करते.

मैथिली बेंगलोरच्या बालसाहित्य संमेलनाला जाते. त्याठिकाणी चर्चासत्रात भाग घेते. अनेक साहित्यिकांशी तिच्या भेटीगाठी होतात. आनंदाने भारलेल्या मनाने ती घरी येते. मात्र, घरी आल्यावर यासंदर्भात शंतनू काहीच बोलत नाही. तिची चौकशीही करीत नाही. अंशुमनसुध्दा याविषयी बोलत नाही. त्यामुळे तिला वाईट वाटते. शंतनू आणि मैथिली या दोघांमधले अंतर हे वाढतच जाते. मैथिलीच्या प्रयत्नानेच अरुणाचलमच्या फॅक्टरीत शंतनूला नोकरी लागते. शंतनूला त्याबद्दल काहीच वाटत नाही. तिच्याशी वागण्यामध्ये तो बदल करीत नाही. दांडेकर मध्येच मुंबईला येतात. शंतनूचे मुंबईचे घर विकायचे असते. ते विकण्याचा व्यवहार दांडेकर करणार असतात. दांडेकर हा माणूस लबाड आहे, हे मैथिलीला माहीत असते. तो व्यवहारात शंतनूला फसवील असे तिला वाटते. ती यासंदर्भात शंतनूला सांगण्याचा प्रयत्न करते, परंतु शंतनू तिचे ऐकून घेत नाही. शंतनूला त्या माणसांशी चर्चाच नको असते. तो त्या माणसाला घरी आल्यापासून टाळत असतो. रात्री उशिरा येतो. सकाळी लवकर जातो. त्याच्याबरोबर जेवणाला थांबत नाही. त्याची सर्व जबाबदारी तो मैथिलीवर सोडून देतो. तो त्याला पाठवायलासुध्दा जात नाही. त्याच्या आईशी दांडेकरांचे अनैतिक संबंध होते. त्यामुळे त्याचे पूर्ण आयुष्य उदध्वस्त होते. दांडेकरांशी तो कसलीही चर्चा करीत नाही. मैथिलीशी लग्न करुन दांडेकरांनी फसवले, अशी पत्रे शंतनू दांडेकरांना पाठवितो.

कावेरी ही मैथिलीची मैत्रीण मद्रास विद्यापीठात असते. दोघींचा एकमेकीवर जीव असतो. एकमेकीच्या सुख,दुःखाच्या प्रसंगांवर त्या चर्चा करीत असतात. विद्यापीठात जाताना, येताना तसेच विद्यापीठात व इतर वेळी एकत्र जात असतात. त्यांचे नाते अतिशय जिव्हाळ्याचे आणि घट्ट असते. कावेरीला शंतनू चारचौघात ड्रिंक्स घेताना केदार आणि गणेशजवळ मैथिलीमुळे आपले जीवन उद्ध्वस्त झाल्याचे बोललेले समजते. कावेरी हे मैथिलीला सांगते. चारचौघात जाहीरपणे आपल्या बायकोवर बोलणे हे कावेरीला आवडत नाही. याची जाणीव ती मैथिलीला करुन देते. त्यावर काहीच करता येत नाही, असे मैथिली कावेरीला सांगते.

कथासंग्रहातून ज्या स्त्रिया आपल्याला भेटतात त्याहून निरनिराळ्या अशा काही कादंबरीत नाही; पण कादंबरीच्या नायिका या थोड्या पुरोगामी विचारांच्या वाटतात. पण प्रत्येक स्त्री वेळ येताच मात्र संस्काराच्या आणि संस्कृतीच्या भानात शिरते. बगे यांची 'मनस्विनी' ही कादंबरी तशी कथासंग्रहाच्या अगोदरची पण रुक्मिणीने जशी वाचकांची मने जिंकली, समीक्षकांना जसे त्याबाबत बोलावेसे वाटले तसे या कादंबरीविषयी वाटले नाही. खरं तर कादंबरीही लेखिकेच्या लेखणीची ताकद आहे. इथे रेणूसारखी मनस्वी स्वाभिमानी सौदामिनी आहे. पण तरीही शेवटी कादंबरीत पुरुषपात्रंच भाव घेऊन जातात. मूग गिळून सर्व सहन करीत बसणे अशी दुबळी स्त्रीही बगे यांना पसंत नाही. पण या नायिकेची या कादंबरीतली बहीण मात्र विलक्षण सामर्थ्यवान आणि शांत! सौदामिनीच्या उलट! "काही माणसंच अशी त्यांचा कुठला अट्टाहास नसतो. मागणं नसतं. पाण्यानं मिसळून दुसऱ्या कुणाचाही रंग चटकन घ्यावा तसे समोर वाढून येईल, त्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे घेत राहतात. तरीही ती माणसं वगळली जाऊ शकत नाहीत. आपला तोल पुनःपहिल्यापासून तपासून पहायला लावतात ही माणसं,अशी ही दमयंती."[२९] खरं म्हणजे कुठलाही कादंबरीकार आपला प्रवृत्तीधर्म आणि जीवनानुभव यांच्या अनुषंगाने कादंबरी लेखन करीत असतो.

आशा बगे यांच्या 'मनस्विनी' कादंबरीत ही त्यांच्या काव्यात्म पिंड व संगीततृष्णा यांचा मिलाफ आहे. एक असामान्य चिकित्सक आणि काव्यात्मक उकल ही सर्व संवेदना सकट इथे कादंबरीत सौदामिनी व यशोधनच्या रुपाने व्यक्त झाली आहे. कादंबरीत तशा घटना फार नाहीतच. सौदामिनीचे लग्न हीच ती घटना! आईविना वाढलेली अत्यंत हुशार व संवेदनाक्षम मनाची ही मनस्विनी नायिका. दमयंती व भाई यांचेशी तिचे रक्ताचे नाते, पण त्याहून अधिक आईपणाचे! भाईच्या गाण्याच्या विश्वात रमलेली ही सौदामिनी! एका क्षणी अमरेंद्रसारख्या देखण्या, बिझनेस करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी विवाहबध्द होते. कुठेही त्याला नाकारण्याचे कारण दिसत नाही. म्हणून सतत दौऱ्यावर लांब असलेल्या अमरेंद्रच्या मनाची खोली तिच्या लक्षातच येत नाही. आपल्या निर्लेप, निर्लोभ अगम्य वृत्तीने अमरच्या संसारात ती विलीन व्हायला निघते. पण एकटेपणा भोगताभोगता संगीताच्या आवडीने यशोधन तिच्या जीवनात येतो, ही या कादंबरीतली दुसरी घटना. यशोधनची मैत्री हवी असतानाच, आकर्षण वाढत असतानाच, दुसरे मन अमरेंद्रसाठी जवळीक निर्माण व्हावी म्हणून तडफडत असते. ही मनाची उलघाल, उसवलेपण आणि स्त्री म्हणून परपुरुषाशी संबंध ठेवण्याबाबत आलेले बंधन हे सौदामिनीच्या रुपाने आलेले आहे.

सौदामिनीची स्वतःच्या मनाशी असलेली ओढ म्हणजे अपूर्णची पूर्णाकडे असणारी ओढच आहे. अमरेंद्रशी ती लग्नगाठीने बांधलेली आहे. पण तिच्या मनाच्या तळात व शरीरात संवादच साधत नाही. दोघांमध्ये प्रचंड दरी ! काही किनारे जवळ आल्यासारखे वाटतात पण जुळत नाहीत. यशोधनपर्यंत संगीताच्या आकर्षणाने ती पोहचते. तिथून परतण्यासाठी तिची तगमग होते. कारण पारंपरिक व संस्कारबध्द मन यशोधनशी पुढचे संबंध ठेवायला तयार होत नाही. मग या प्रवासातून परत अमरेंद्रकडे फिरायचे असते. यासाठी तिला तिच्या बहिणीची दमयंतीची मदत घ्यावी लागते.

यशोधनच्या सहवासात फुलणारे तिचे मन, मग त्या मनाचे विश्लेषण, शोध घेणे दमयंती तिला एके ठिकाणी म्हणते, "पुरे बाई तुमची तर्कट, साधं उमलेलं फुल तुम्हाला आनंद नाही देऊ शकत. फुलाची, फुलण्याची ॲनाटॉमीच कळायला हवी तुम्हाला, माणसाच्या मनाच्या मूलभूत प्रतिक्रिया त्या आपण सहजपणे का स्वीकारीत नाही?"[३०] दमयंतीचे सहज जगणे आणि हिचे मन पिंजत जगणे, दोघीही स्त्रियाच, पण यांचे जगणे निराळेच असते. सौदामिनीला यशोधनचेही शब्द आठवतात. "तुम्ही बायका असं आयुष्य कप्पे पाडल्यासारखं का आखता? कुणी काही म्हणत नाही. आपलेच आपल्यावर पहारे; ताठ सक्त."[३१] दमयंतीसारखी आपल्याला अमरेंद्रची वाट पहाणं जमतच नाही. भाई यायचे असले तर रात्री बरोबर पावसाचे थेंब मोजत खिडकीतून ती हलली नसती. असं विसरणं, स्वतःचं अस्तित्व कोमेजून टाकणं आपल्याला अमरेंद्रच्या बाबतीत का जमलं नाही? आपल्याच पतीच्या बाबतीत? सौदामिनीचा प्रश्न हा नवीन पिढीतल्या विचारसरणीतून आलेला आहे.

नवऱ्याशी न जुळणारे हजारो संसार चालतात. पण सौदामिनीला ते जुळणे मनातून हवे आहे. नुसत्या शरीराचे नको आहे. आणि असे धागे यशोधनशी जुळतात पण संस्कार आडवे येतात. यशोधनही या मोहापासून दूर जाण्यासाठी बदली करवून घेतो. दरम्यान, अमरेंद्रला सर्व कळलेले असते आणि सौदामिनी ज्या बिंदूपासून प्रवास करते तिकडेच पुनः वळते. सौदामिनीचे व्यक्तिमत्त्व, त्यातील चढ-उतार रंगवताना लेखिकेच्या लेखणीचे टोक कुठेही भडकपणा धारण करीत नाही. खरं म्हणजे सौदामिनीला यशोधन हा कलासक्त तरी पूर्ण पुरुष म्हणून आवडतो. त्याच्या शब्दातली जरब तिच्यावर अधिकार, तिच्यावरचा राग आणि अनिवार प्रेम असलेला यशोधन तिला मनोमन रुचतो.

खरं म्हणजे पुरुषत्वाच्या संदर्भात अमरेंद्रमध्ये कुठेही कमी नसताना सौदामिनी फुलत नाही, हा कादंबरीतला मूक अनाकलनीय प्रश्न! क्षणाक्षणाला फुलत्या क्षणाची वाट पाहणारी सौदामिनी आपल्या बाबतीत थंड आहे हे

अमरेंद्रला कळले नसेल का? पण त्याचे मनच मोठे! भाईचेही मन मोठे, आणि यशोधनचेही मन मोठेच (मोहापासून दूर जाणे) या तिन्ही पुरुषांच्या सहवासात वावरताना सौदामिनीचे मन मोठे वाटते, अन् मग वाटतं की लेखिकेला असं तर म्हणायचं नाही की, पुरुषाच्या मनाचा दिलदारपणा, स्त्रियात नसतोच. पण लगेच लेखिकेने दमयंतीच्या संदर्भात याचे उत्तर देऊन टाकले आहे, पतीला सर्व नात्यापेक्षा आईच्या ममतेची अधिक गरज आहे हे ओळखून वावरणारी दमयंती कादंबरीकार आपला पाठलाग करते, असे परस्परविरोधी स्त्री चित्रण आशा बगे करतात. तरीही यशोधनची बदली होणे ही मुद्दाम केलेली कृत्रिम घटना वाटते. आणि अमरेंद्रच्या अतिउदात्ततेमुळे कादंबरीचा तोल सरकतो. बंडखोर तरीही संस्कारबध्द स्त्रीचे चित्रण लेखिकेने इथे केलेले आहे.

'झुंबर' ही कादंबरी खऱ्या अर्थाने प्रेमाच्या त्रिकोणाचीच कादंबरी आहे. पण इथे प्रत्येक कोन एकेकटा नाही. तो सापेक्ष आहे. यातही तिघांच्या नातेसंबंधाची गुंतागुंत आहे. या कादंबरीत महत्त्व आहे ते व्यक्तींच्या आंतरिक वास्तवाला, परस्परसंबंधाला समकालीन वातावरण फक्त आवरणापुरते उरते. महत्त्व उरते माणसे व त्यांच्या परस्परसंबंध यांनाच. 'झुंबर' या कादंबरीतील नायिका वसुमती आत्मपरीक्षणात स्त्री म्हणूनही चिंतन करताना दिसते.आपले प्रेम, पत्नीपण आणि आईपण विसरुन जाणे सोपे नाही असे तिला वाटते. "कदाचित आपण आज एका निश्चित रेषेशी येऊन थांबलो आहोत का? रात्री बंड करुन उठणारं शरीर, टाळता न आलेली स्वतःच्या संरक्षणाची भावना, सगळ्यांची स्वतःपुढे मांडलेली समर्थनं, हे संगळं पार करुन या दोन महिन्यात आपण एका ठिकाणी येऊन पोहचलो आहोत का? ऋषिकेश म्हणाले होते. ते स्वतःलाच तोंड देणं जमलं आहे का ते आपल्याला? राहायला हवा तसा निःसंदिग्ध होकार आपल्याजवळ नाहीच, पण राघव, आयुष्यात इतकं मुरुन गेल्यावर कोरं करकरीत असं काहीच नसतंच ते तुला समजेल नं?"[३२] या कादंबरीत वसुमतीचे स्त्री जीवन आपल्या संवादातून साधलेले आहे असे वाटते. कुठलाही निर्णय घेताना मध्यमवर्गीय स्त्रीच्या मनाची होणारी उलघालच

लेखिका आपल्यापुढे ठेवते व जीवनात इतकं मुरुन गेल्यावर कोरं करकरीत काही नसतंच हाच त्याच्या दृष्टीने घेतलेल्या जीवनाचा वेध आहे.

सुचरिता आपल्या जीवनसाथीबद्दल गप्पा मारताना प्रश्न करते की, तुम्हाला ब्रिजमोहन आणि राघवेंद्र मूर्ती या दोघांत कोण जास्त पटला? त्यावेळेस दादा तिला उत्तर देतात. "एक माणूस कधी दुसऱ्यासारखा नसतो. प्रत्येक माणसाची त्याची म्हणून एक वेगळी गोष्टी असते."[३३] तरी पण या दोघांचं मूल्यमापन करणं शक्य नाही. ते दादांनी स्पष्टपणे बोलून दाखवलं नाही. मुख्य म्हणजे दादांनी ब्रिजमोहनला ओळखले आहे. "हे मी म्हणणार नाही. मी अशी तुलना करत नाही. पण ब्रिजमोहन फार हळवा आहे, उत्कृष्ट वृत्तीचा माणूस आहे."[३४] लेखिकेने अशा कठीण माणसांचे जीवनही चित्रित केलेले आहे.

बनारसमधील निसर्गवर्णन, स्थलवर्णन व व्यक्तिवर्णन लेखिकेने अचूकपणे केले आहे. समोर गंगा तीच, तेच जुनं दृश्य, सकाळची वेळ, घाटावरलं ऊन, घाटाच्या पायऱ्या किनाऱ्याशी निर्माल्य साचलेलं, उघड्या अंगानं मंत्र पुटपुटत लोक ऊन खात उभे, सर्वत्र घाण, तरीही गंगेच पाणी ओंजळीत घेताना काही तरी वाटलंच, नावाडी नाव विचारत होते. त्यातली एक घेऊन तो जरा स्वच्छ किनाऱ्याशी गेला. घाटापासून जरा दूर मध्यावर तीच पहाडावरली दुकानं, डोंगर चढणारी मुलं-शिक्षण सोडून दिलेली, एखादी वेळी आपणही असेच असतो त्या मुलांसारखे, असे लेखिकेने प्रत्येक टप्प्यांवरील समाज जीवन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ३.६ स्त्री साहित्यकार म्हणून कादंबरी क्षेत्रातील आशा बगे यांचे स्थान -

१९६० नंतरच्या काळात सामाजिक वास्तवाचे भान जागे झाले. नवीन नीतीकल्पना पुढे आल्या, भाषिक प्रयोग झाले. नवनवीन साहित्य जन्माला आले. १९७५ साली झालेली स्त्री-मुक्ती चळवळ, स्त्रीवादी साहित्य, दलित चळवळ या सर्व गोष्टींचा परिणाम आशा बगे यांच्या साहित्यातूनही दिसून येतो. स्त्री साहित्याचा विचार करताना केवळ मंगला वरखेडेंच्या मते,"आजपर्यंत

इतिहासलेख व इतिहासाचा अभ्यास हा बहुतांशी पुरुष इतिहासकारांकडून झालेला असल्याने पुरुषप्रधान दृष्टिकोनातूनच संस्कृतीचा इतिहास मांडण्यात आला आहे. स्वतंत्रपणे स्त्रीच्या सांस्कृतिक विश्वाचा इतिहास पाहण्याचा प्रयत्न कधीच झालेला नाही. त्यामुळे 'स्त्री संस्कृती' या शब्दांचा अर्थ अजूनही लावला गेलेला नाही. स्त्रीवादी समीक्षेपुढे हे एक मोठे आव्हान क्षेत्र उभे आहे."[३५] आशा बगे यांच्या कथांमधील परिस्थितीशरण स्त्रियांची नोंद घेऊन सुलभा हेर्लेकर म्हणतात की, काळ बदलला किंवा परिस्थिती बदलली तरी स्त्रीच्या दुःखाला पर्याय नाही, असाच भाव त्यांच्या कथांमधून व्यक्त होत राहतो. स्त्री मनाचा कोंडमारा चित्रित करताना परिस्थितीनुरुप सवय करणे' सवय होणे असा एक मध्यमवर्गीय स्त्री जीवनाचा आलेख आशा बगे मांडतात."सवयीने सारे जमणे,तडजोड स्वीकारणे,असा वारंवार उल्लेख त्यांच्या कथांमधून येतो."[३६] असे असले तरी आधुनिक जीवन जाणिवांचा स्पर्श होत असतानाच बदलता समाज, वातावरणातील, कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भाव बदलत्या मूल्यांची जाणीवही त्याच्या स्त्री पात्राजवळ दिसून येतो.

आशा बगेंनी स्त्री दर्शनाचा विचार करताना त्यांच्या लेखनात स्त्री दर्शनाचा आलेख मांडलेला आहे. 'समाज आणि स्त्री समस्या' याचा विचार करताना खांडेकर, फडके आणि माडखोलकर यांच्या विविध स्त्री नायिका वेगवेगळ्या रुपात बघावयास मिळतात. या चित्रणातून स्त्री जीवनाच्या व्यथा आणि तिचे सामाजिक स्थान यावर विशेष पडताना दिसत नाही. काही प्रसंगी माडखोलकर यांच्या जवळ जाताना दिसतात. या दृष्टीने हरिभाऊ आणि वरेरकरांच्या स्त्रिया स्पृहनीय वाटतात. शिक्षण, डॉक्टर, वकील, व्यावसायिक हिरिरिने भाग घेऊन पुरुषांना टक्कर देऊ बघणाऱ्या वरेरकरांच्या नायिका पुरुषी प्रधान प्रस्थाला एक प्रकारे आव्हान देताना दिसतात.

आशा बगे यांनी स्त्री जीवनाचे व त्यांच्या आगतिकतेचे चित्रण त्याच्या कादंबऱ्यांतून मांडलेले दिसते. 'झुंबर'ची नायिका वसुमती व तिचे पती

ऋषिकेश व त्यांचाच विद्यार्थी व वसुमतीचा मित्र राघव हे तिघेही व्यवसायाने डॉक्टर, त्यामुळे कादंबरीचा कथा विषय हा तिघाच्या समोर एकमेकांच्या संबंधामुळे निर्माण होणाऱ्या भावनिक अडचणींचा समावेश केलेला आहे. 'मनस्विनी' कादंबरीत सौदामिनी व यशोधन दोन पात्रांच्या मनाच्या गुंतागुंतीचे चित्रण उत्कृष्टरीतीने केले आहे. संगीताची लेखिकेला असलेली आवड व त्यांचा काव्यात्मपिंड या दोन्ही गोष्टी या कादंबरीतून स्पष्ट दिसून येतात. तर 'झुंबर' या कादंबरीचा विषयही थोडा फार 'मनस्विनी' सारखाच आहे. 'सेतू' मध्ये माणसा माणसांमधल्या नात्यांचा सूक्ष्म वेध घेते. पती-पत्नी, सासू-सून, नणंद-भावजय, आई-मुलगा, वडील-मुलगी, मावशी-भाची असे विविध नातेसंबंध त्यांनी या कादंबरीतून रेखाटले आहे. तर 'त्रिदल'मध्ये दोन मैत्रिणींमधील नातेसंबंधाचा शोध घेतलेला आहे.

'मनस्विनी'मध्ये संगीताचा वापर, 'झुंबर'मध्ये सौम्य शांत प्रकाश, 'त्रिदल'मध्ये नर्मदा तर 'सेतू' मध्ये गंगा या सर्व गोष्टींचे आकर्षण लेखिकेलाही आहे. त्यामुळेच या सर्व प्रतिमांचा त्यांनी आपल्या कादंबरीत योग्य तो वापर केला आहे. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून सामाजिक-कौटुंबिक जीवनातील आधुनिकता व पारंपरिक मूल्यांच्या संघर्षात घुसमटलेली पात्रे आढळतात. अशाच पात्रांच्या विस्तृत जीवनपटांचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून अविस्मरणीय स्वरुपात प्रकट झाले आहे. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून पारंपरिक भारतीय स्त्री नवरुपात प्रत्ययाला येते. स्त्री मनाच्या हळव्या भावना, संस्कृती, परंपरा जपताना मानवी संबंध तसेच दोन पिढीतील अंतर, त्यातून निर्माण होणारा संघर्ष या सर्व लेखन वैशिष्टयांमुळे त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीविश्वात मोलाची भर घातली आहे.

आजच्या स्त्रीची मानसिक भावस्पंदने व बदलत गेलेली कौटुंबिक परिस्थिती याचा सूक्ष्म वेध त्या आपल्या कादंबरीतून घेत असतात. त्यांच्या 'मनस्विनी' व 'झुंबर' या दोन्ही कादंबऱ्यांचा विषय एकच आहे. दोन्हीमध्ये

प्रेमाचा त्रिकोणच, पण दोन्ही कादंबऱ्या या वेगळया वाटेवरुन जाणाऱ्या आहेत. व्यक्तीच्या आंतरिक वास्तवाला परस्परसंबंधाला दोन्ही कादंबऱ्यांत महत्त्वाचे स्थान आहे. परंपरेचा धागा न तोडता सनातन नात्यात नवेपण शोधणे हेच त्यांच्या कादंबरीलेखनाचे वैशिष्टय आहे. आशा बगे यांच्या कादंबरीचा विषय मग तो कुठलाही असो. पण त्यांच्या कादंबरी विश्वात कादंबरीच्या अनुषंगाने संगीत, साहित्य व अभिनय या सर्व गोष्टी सातत्याने येतात. त्याबरोबरच चिंतनशीलता आणि आत्मशोध घेणारी प्रश्नात्मकता यातून त्यांची कादंबरी साकारते.

१९७५ हे वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. या आंतरराष्ट्रीय वर्षात स्त्रीचे समाजातील स्थान परंपरागत विचार, त्यातून निर्माण झालेली मूल्य कल्पना या प्रश्नांची घुसळण होऊ लागली. स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्याचे नवे भाव, नवी दृष्टी, नवी मूल्यकल्पना समाजात हळूहळू विकसित होऊ लागली. त्यातून स्त्रीवादी चळवळीचे काम उभे राहिले. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द स्त्रीने संघटित उभे केले. त्यातून विद्रोहाचे सूर उमटू लागले. त्यामध्ये स्त्री जीवनावरील प्रश्न, स्त्रीचे बदलते रुप, बदलणारे नातेसंबंध, स्त्रीच्या मनावरील परंपरागत विविध ताण, तिच्यापुढील नवीन आव्हाने, याविषयी लेखन सुरु झाले. त्यामध्ये दर्जेदार लेखन करणाऱ्या आशा बगे या महत्त्वाच्या लेखिका आहेत.

"तुम्ही तर मर्माचं बोलताहेत. आम्ही वेगळे जगतो आहोत. खरं आहे. तुम्ही लोक पतिपत्नी म्हणून जगत आलात. आम्ही स्त्री-पुरुष म्हणून जास्त जगतो. पण तुम्ही एकमेकांशी बांधले जात होता. एका घरातली तर होताच पण वेगवेगळीही लोक एकमेकांशी जोडून होता. आम्ही हे सगळं गमावून बसलो आहोत. तुम्ही म्हणता, त्या वेगात जाताना आम्हाला कुणाला बरोबर घेता येत नाही. आमची ही ट्रॅजिडीच आहे."[३७] मैथिली आणि शंतनू यांच्या जीवनात आनंदाचा क्षण रंगविताना अनेक गोष्टीचे वर्णन मांडलेले आहे. "पहाटे

कुणाच्या जन्माची वेळ असते. ती या मुलीच्या मरणाची होती. डोळे मिटूनच तिनं बाहेरचा प्रकाश क्षणमात्र अनुभवला. थोडा वेळ धुगधुगी होती बस्स. अपुऱ्या दिवसांचा जन्म. बेबीच वजन म्हणजे जास्त होतं, ते म्हणे मैथिलीच्या गर्भाशयाला पेललं नाही. आईच गर्भ पेलू शकली नाही! मैथिलीच्या डोळ्यांत पाणी आलं."[३८] मैथिलीच्या रुपाने लेखिकेने पुनर्जीवनाचे दर्शन घडविलेले आहे. मैथिली ही ताठ, अभिमानी, तिचा अहंकार-मैथिलीचंच का? आई ही अशीच तर होती! स्त्रीचं हेच रुप तर त्याला ओळखत होतं आणि आता हे काय! तिच्या जवळ यावं असं त्याला वाटलं, मैथिली आणि शंतनू यांच्यातील संवाद व्यामिश्र वाटतात.

## ३.७ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील आधुनिक स्त्रीचे वर्तमान वास्तवाचे चित्रण -

आजच्या आधुनिक बदलत्या काळातील स्त्री व तिचे समाजातील व्यक्तींशी असलेले नाते, आपल्या कुटुंबातील लोकांशी असलेले नाते, मित्र-मैत्रीण संबंध, तिची मानसिकता, स्त्री-पुरुष संबंधाकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहण्याची तिची ताकद इ. अनेक कादंबऱ्यांतून मांडलेली दिसते. आशा बगे यांनी 'भूमी' कादंबरीत मैथिली या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत स्वतःचे जीवन आणि कुटुंब उभे करणाऱ्या स्त्रीची प्रतिमा उभी केली आहे. स्त्रीच्या ठिकाणी प्रचंड ऊर्जाशक्ती असते, ती प्रतिकूल परिस्थितीतही तिच्यातून बाहेर पडते. तेव्हा ती सर्वसाधारण स्त्रीपेक्षा असामान्य ठरते. मैथिली स्वतःचे वेगळे अस्तित्व सिध्द करते. मात्र, शंतनूसारख्या मर्यादित कुवत असलेल्या पुरुषाशी तिचे लग्न होते. त्याच्याकडे कुठलीही महत्त्वाकांक्षा नसते. आशा माणसांशी संसार करताना तिचा भावनिकदृष्ट्या कोंडमारा होतो. तरीही मैथिली अखेरपर्यंत त्या माणसालाच साथ देते. अंशुमन लग्न झाल्यावर तो आपली पत्नी नीरजाला घेऊन मुंबईला जातो. मैथिली पुन्हा शंतनूला सांभाळण्यासाठी बेंगलोरच्या नोकरीचा राजीनामा देऊन मद्रासला येते.

पुरोगामी विचारात वाढलेली मैथिली परंपरागत कुटुंबव्यवस्थेला सांभाळण्याचा कसोशीने प्रयत्न करते.

नवविचाराच्या वातावरणात यशस्वी स्त्री म्हणून तिने लौकिक मिळविलेला असतो. तरीही ती स्वतःचा तोल ढळू देत नाही. स्वतःच्या भावनांचा कोंडमारा झाला तरी त्याबद्दल ती तक्रार करीत नाही. शंतनूबद्दलच नंतर तिला सहानुभूती वाटते. मैथिलीच्या त्यागावर तिचे कुटुंब उभे राहते. शंतनूला म्हातारपणातही सांभाळण्यासाठी त्याच्या जवळ येते. बेंगलोरमधील नोकरी सोडून देते. तिची दमछाक झाली तरी ती स्वतःच सोसते. आजच्या आधुनिक युगातील नोकरी करुन घर सांभाळणाऱ्या अनेक स्त्रियांची व्यथा मैथिलीच्या रुपाने आशा बगे यांनी 'भूमी' कादंबरीत मांडलेले आहे. त्यामुळे या कादंबरीला वेगळे रुप प्राप्त होते.

आजच्या वर्तमान काळात ठसठसणारी स्त्रीची वेदना या कादंबरीत व्यक्त होते. 'भूमी', 'सेतू' कादंबरीच्या माध्यमातून संभोगातील बरोबरीचे नाते पुढे आणले. स्त्रियांच्या शरीर भावना स्पष्ट शब्दात व्यक्त केल्या. पुरुष मित्राचे स्पर्श वेगवेगळ्या संवेदना निर्माण करतात. अशी स्पष्ट कबुली देणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या नैसर्गिक गरजांना न्याय देणाऱ्याच आहे. पण त्यांच्या कादंबऱ्यांतून स्वैराचार आढळत नाही. जिथे आस्था आहे. प्रेम आहे. तिथेच स्पर्श करुन पाहण्याची उत्कट इच्छा आहे. स्पर्श भावना त्यांनी श्रेष्ठ मानली आहे. निसर्गाला नकार न देता स्वातंत्र्याचा स्वीकार करणे या महत्त्वाच्या गोष्टी स्त्रियांच्या बाबतीत लेखिकेने पुढे आणल्या."पाण्याच्या आत खोलवर, शेवाळाचं एक निसरड जाळं असतं. पट्टीचे पोहणारे यात फसतात, अडकतात, खाली, खोलवर खेचले जातात. निखळ, निर्मळ प्रवाहाच्या तळाला हे चिलं आड येतं."[३९] निसर्गाला अनेक अचूक बारकावे स्त्री जीवन रंगविताना दिसून येतात.

'सेतू' कादंबरीत एकत्र कुटुंब पध्दत व समाजातील चाली-रीती, रुढी-

परंपरा त्याच बरोबर घरातल्या माणसाबद्दल बोलताना, "ब्रिजमोहनचा आवाज हळुवार झाला. त्यांच्या माणसांनी भरलेल्या घराचं चित्र त्याच्यासमोर उभं राहिलं. मोडकळीला आलेलं लाकडाच्या छिमाटयांच्या कंपाऊंड तो भला मोठा पिंपळ, मागच्या अंगणातला कडुनिंब अंगणभर विखुरलेली निंबाची पानं. पूर्वीच्या अंगणात खूप झाडं होती. घरापर्यंतच मोकळं आवार. पिंपळाखालच्या गायी, दर्शनी पडवीत पलंगडीवर बाबूजींच्या पानाचा बस्ता आणि खोल्यांतून भरदिवसाही जाणवणारा उजेडाचा अभाव."[४०] ग्रामीण भागातील प्रत्येक गोष्टीला किती महत्त्व आहे हे त्यांच्या लेखनातून दिसून येते.

'भूमी' कादंबरीमध्ये आशा बगे यांनी मैथिली या नायिकेच्या माध्यमातून प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत स्वतःचे जीवन आणि कुटुंब उभे करणाऱ्या स्त्रीची प्रतिमा उभी केली आहे. स्त्रीच्या ठिकाणी प्रचंड उर्जाशक्ती असते. ती प्रतिकूल परिस्थितीतूनही बाहेर पडते. तेंव्हा ती सर्वसाधारण स्त्रीपेक्षा असामान्य ठरते. मैथिली स्वतःचे वेगळे अस्तित्व सिध्द करते. नवविचाराच्या वातावरणात यशस्वी स्त्री म्हणून तिने लौकिक मिळविलेला असतो. तरीही ती स्वतःचा तोल ढळू देत नाही. स्वतःच्या भावनांचा कोंडमारा झाला तरीही ती त्याबद्दल तक्रार करीत नाही. शंतनूबद्दल नंतर तिला सहानुभूती वाटते. मैथिलीच्या त्यागावर तिचे कुटुंब उभे राहते. शंतनूला म्हातारपणातही सांभाळण्यासाठी ती त्याच्या जवळ येते. बेंगलोरमधील नोकरी सोडून देते. तिची दमछाक झाली तरी ती स्वतःच सोसते. आजच्या आधुनिक युगातील नोकरी करुन घर सांभाळणाऱ्या अनेक स्त्रियांची व्यथा मैथिलीच्या रुपाने आशा बगे यांनी 'भूमी' कादंबरीत मांडलेली आहे. "कधी कुणाला याचना करु नकोस, कुणापुढं हात पसरु नकोस."[४१] आधुनिक स्त्री जीवनाचे वास्तव मैथिलीच्या रुपाने पुढे आलेले आहे.

'चक्रवर्ती' ही चरित्रात्मक कादंबरी आणि 'धर्मक्षेत्रे' ही महाभारतातील द्रोणाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊ पाहणारी पौराणिक कादंबरी कृती वगळता आशा बगे यांच्या इतर सर्व कादंबऱ्यांमध्ये स्त्रीपात्रे केंद्रस्थानी आहेत.

सौदामिनी (मनस्विनी) उर्मिला (आकाश), झुंबर(शारदा आणि मंजू), त्रिदल सुरु आणि माधवी, (उत्सव), सुचरिता, मैथिली (भूमी) नीरु (मुद्रा) या स्त्रियांची जीवने आणि त्यातली आव्हाने हर्षविमर्श गुंतागुंती यांचा वेध हा या कादंबऱ्यांचा गाभा आहे. 'भूमिका' मधील आजी सोडल्या तर इतर स्त्रिया आधुनिक काळातल्या बुध्दिमान उच्चशिक्षित आहेत. वसुमती, सरु यांनी डॉक्टरेट मिळवली आहे. तर मैथिली इंग्रजी वाङ्मयात डॉक्टरेट मिळवून सुचरिता प्रमाणेच तिच्या क्षेत्रात लौकिक मिळवून आहे. सौदामिनी आणि नीरु या गायिका आहेत. आपापल्या कार्यक्षेत्रात उच्च पदावर पोचलेल्या, यशस्वी, समर्थ, दृढ व्यक्तिमत्त्वाच्या आणि रुढ चाकोरीतले जीवन नको असणाऱ्या या स्त्रिया त्या स्वतंत्र वृत्तीच्या आहेत. जीवनविषयक त्यांच्या स्वतंत्र जाणिवा व मते आहेत. तरी त्यांचे विचार स्वातंत्र्याच्या त्यांच्या कल्पना अलीकडच्या तीस-चाळीस वर्षात रुजलेल्या स्त्रीवादी भूमिकेतून आलेल्या नाहीत. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला वा पुरुषसत्तेला नकार देणे, स्त्रीचे महत्त्व व सामर्थ्य अधोरेखित करणे, परंपरेला नकार देणे वा बंडखोरी करणे, अशा स्त्रीवादी विचारसरणीचा प्रभाव या स्त्रीपात्रावर दिसत नाही.

आशा बगे आपल्या कादंबऱ्यांतील स्त्रीला अत्यंत सन्मानाने जगताना दाखविते. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री प्रामाणिक आहे. तसेच संवेदनक्षम व अर्थपूर्ण जीवन जगण्याची इच्छा बाळगणारी असल्यामुळेच पारंपरिकतेला धक्का देते, स्वतःचे निर्णय स्वतः घेते व त्यामुळे येणारे सुख-दुःखही स्वीकारते. व्यक्ती म्हणून स्त्री जगली पाहिजे हा ध्यास त्यांनी घेतला आहे. आणि म्हणूनच तिने तिचे व्यक्तीपण नाकारले जाते, तिथे ती बंड करते.

आशा बगे यांच्या साहित्यात अनेक प्रकारची स्त्री विविध नात्यांतून दिसून येते. 'मनस्विनी' आणि 'झुंबर' या कादंबऱ्यांमध्ये नाती कमीच आहेत. सौदामिनीची बहीण आणि तिचे पती, भाई, वसुमतीचे आई-वडील आणि ऋषिकेशचे वडील एवढीच नाती आहेत. आणि ती तशी सरळ, आत्मीय आहेत.

पती, पत्नी आणि नायिकेच्या जीवनातले 'दुसरे' पुरुष असे त्रिकोण तयार होतात. परंतु तेही सहज सुटतात. त्यांच्यावरुन वैवाहिक जीवनात ताण तयार होत नाहीत.

'त्रिदल' मध्ये मंजू व शारदा या होस्टेलमध्ये एकत्र राहणाऱ्या मैत्रिणी आणि शारदेच्या प्रेमात पडून तिच्याशी लग्न करणारा मंजूचा भाऊ श्रीनिवास यांच्यासह दोघींच्या कुटुंबीयांच्या नात्याचा रंगीबेरंगी गोफ लेखिकेने गुंफला आहे. दोन मैत्रिणींचे नाते नणंद-भावजयचे बनते. लग्नानंतर दोघींनाही सासू सासरे मिळतात. मंजूचा पदोपदी होणारा अपेक्षाभंग काही प्रसंगी किंचित ताण तयार करतो. पण तरीही नाती मधुरच राहतात. संकटाची चाहूल लागल्यावर परस्परांविषयी ही माणसे अधिक तत्पर, अधिक समंजस होतात.

'भूमिका'मध्ये आजी-आजोबा आपल्या मुलीच्या मृत्युनंतर नातवाचा सांभाळ करतात. जावयाचा त्यात हस्तक्षेप नसतो. ताण तयार होतात ते जुनी पिढी आणि नवी पिढी यांच्यातल्या विचार करण्यातल्या फरकामुळे, पण शेवटी ही आतड्यांची नाती, ती तुटणारी नसतातच. लेखिकेच्या वेगळेपणाविषयी बोलताना डॉ. प्रभा गणोरकर म्हणतात, "काही पुरुष लेखकांनी अलीकडच्या काळात संभोगाची वर्णने मोठ्या धिटाईने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण त्यातूनही स्त्रीवरील पुरुष वर्चस्वाची प्रणयक्रीडेत परपुरुषानेच घेतलेल्या पुढाकाराची सूक्ष्म भावना संभोगाशी निगडित असलेली उपभोग्य आणि उपभोक्ता ही भावना स्पष्ट प्रतिबिंबित होते. स्त्रियांच्या लेखनात जेंव्हा अशी वर्णने येतात, तेंव्हा आपण एकतर पुरुष लेखकांहून मागे नाही असा पवित्रा असतो, नाहीतर स्त्रीचे समर्पण असते."[४२] स्त्रियांच्या अंतर्मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्या आपल्या लेखनातून करतात.

'भूमी' कादंबरीमधील मैथिलीचे जीवन संघर्षाने भरलेले आहे. तो संघर्ष एकट्या मैथिलीचा नसून आजच्या परिवर्तनाच्या काळामध्ये स्त्रियांना कोणकोणत्या गोष्टींशी संघर्ष करावा लागतो हेच मांडले आहे. या कादंबरीत

एका पोरक्या पण मनस्वी आणि जीवनाच्या प्रवासात दृष्टी व हुशार अशा मैथिलीचे जीवन लेखिकेने मांडलेले आहे.

मैथिलीचे जीवन संघर्षाने भरलेले आहे. तिचे लहानपण कडलूर या गावी गेले. तिला समज येण्यापूर्वीच तिचे वडील वारले. तिची आई दवाखान्यात नर्स होती. मैथिलीला लहानपणापासूनच संघर्ष करावा लागला, याचे दर्शन घडते. ते या वाक्यातून स्पष्ट होते. "अंधेरे में किनारे पे घूमती हो, नर्स अम्मा की नाइट डयुटी है क्या?"[४३] यातून तिला लोकांच्या उपहासात्मक बोलण्याला तोंड दयावे लागते. तिच्या आईच्या आजारपणामुळे घरी एकटेच राहावे लागत असल्यामुळे ती धाडसी व आत्मनिर्भय दिसते. तिच्या आईच्या मृत्युनंतर तिच्या जीवनाने नवे वळण घेतले. तिची आत्या तिला मुंबईला घेऊन जाते. लहान वयापासूनच तिला परिस्थितीशी संघर्ष करावा लागतो. तिची आत्या मात्र ठामपणे तिच्या पाठीशी उभी राहते. तिच्या मनात शिक्षणाबद्दलची आवड निर्माण करते.

कधी कधी वाचनालयात तर कधी देवस्थळी बाईंच्याकडे फावल्या वेळात काम करुन ती थोडे पैसे उभे करण्याचा प्रयत्न करते. आपल्या खर्चाचा पूर्ण भार आत्यावर पडू नये असे तिला वाटते. दहावीपासून प्रत्येक परीक्षेत यशाची चढती कमान हा तिच्या शैक्षणिक विकासाचा चढता आलेख आहे. हे यश मिळविताना परिस्थितीशी संघर्ष करुन त्यावर ती मात करते.

मिलिंदवर तिचे प्रेम आहे पण मिलिंदशी लग्न जमविताना आलेला संघर्ष दिसतो. "मिलिंद, तुझ्या आईचा विरोध मुळात माझ्यावरच्या संस्कारांना, माझ्या धर्माला आहे, माझ्या बाबांशी लग्न करताना आईनं स्वतःचा धर्म बदलला नव्हता हेच त्यांना नको आहे."[४४] म्हणजे आजही दुसऱ्या जाती धर्मांमध्ये लग्न करण्याला विरोध आहे हे यातून दिसून येते.

ज्याप्रमाणे समाजात आई-वडिलांविना वाढलेल्या मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. अशा मुलांना जगताना या गोष्टीची समाजाकडून वेगवेगळी जाणीव करुन दिली जात असते. हे पुढील विधानावरुन लक्षात येते.

"भांडू शकतो तो एक बीना सोडली तर बाकी सर्वांची तुझ्याकडे बघण्याची दृष्टी वेगळीच आहे. तसा कुठलाही जवळचा संबंध नसताना आपल्याकडे आसऱ्याला आलेली मुलगी असंच पाहतात हे लोक तुला."[४५] यातून लेखिकेने आश्रित आणि आश्रयदाता असे द्वंद्व मांडलेले संघर्षातून दिसून येतात.

मैथिलीचा म्हणजे स्त्रीचा जीवनसंघर्ष हा आज दिसत असला तरी त्याचे बीज हे फार जुने आहे. ते रामायण महाभारत काळापासूनचे दिसते. जसे स्त्रियांचे तसेच पुरुषांचेही, "पांडवांना नाही का त्यांची पांडव म्हणून असलेली सगळी वस्त्रे शमीच्या झाडावर बांधून ठेवावी लागली. पांडवांची ती अवस्था काही काळच होती. माझी मात्र."[४६] यातून पांडवांनासुध्दा या संघर्षाला व दुःखाला जीवनामध्ये सामोरे जावे लागले होते हे दिसते. त्यामुळे हा संघर्ष फार काळापासून असल्याचे लेखिकेने येथे मांडले आहे.

मिलिंदवर तिचे प्रेम असते; परंतु त्याच्याशी लग्न होऊ शकत नाही. ती शंतनूशी लग्न करते. त्याचा स्वभाव आणि तिचा स्वभाव जुळत नाही. शंतनूला तिला मिळणारे यश सहन होत नाही. तो तिच्यापासून फटकून वागतो. मैथिलीचा संघर्ष कधी कधी वेगवेगळ्या पातळ्यांवरचा वाटतो. "माझ्या घरी राहण्याची तू काही काळजी करु नको, मला सवय झाली आहे. तू घरी असली म्हणजे आजकाल एक दडपण येतं माझ्यावर, नसली की मला जरा मोकळं वाटतं."[४७] यातूनच पुरुषमनाची होणारी घुसमट व्यक्त होते. स्त्री-पुरुषामधील संसारिक ताणतणांवामुळे तसेच विचारसरणीमुळे स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आलेली दिसते. येथे पुरुषांच्या मनातील संघर्षाचे अचूक वर्णन लेखिकेने मांडलेले दिसते.

शंतनूचे विश्व मर्यादित असते. त्याच्या पत्नीकडे त्याला जाता येत नाही. मैथिली संसार करीत असताना सतत सुप्त संघर्षाला तोंड द्यावे लागते. तिच्या माघारी तिची टिंगल करतो. तिच्यामुळे माझे नुकसान झाले असे म्हणतो. प्रत्यक्षात मात्र त्याला तिची भीती वाटते. दोघांच्यामध्ये अंतर पडते. त्यांच्यामध्ये

अबोला असतो. शेवटी ती बेंगलोर विद्यापीठात जाते. तरीही संघर्ष संपत नाही. अंशुमनही तिला समजून घेत नाही. तिच्या मनावर या दोघांचा सतत ताण असतो. अशा संघर्षशील वातावरणात ती लिहीत असते. अंशुमनच्या लग्नानंतर ती पुन्हा मद्रासला येते. ती पुरोगामी विचाराची आहे. मात्र, ती आपल्या संसाराची नाळ कायमची तोडत नाही. आयुष्यभर प्रपंचात तिला संघर्ष करीत एकाकी प्रवास करावा लागतो.

'उत्सव' ही कादंबरी प्रसूतीतज्ज्ञ सरु आणि संसारी पण संवेदनशील मनाची माधवी याच्या मैत्रिसंबंधाची कथा 'उत्सव' मध्ये येते. दोघींच्या वाटयाला आलेल्या एकटेपणाचे रंग वेगवेगळे, पण त्या मनाने नात्यांची गुंतागुंत आणि त्यामुळे व्यक्तीच्या आयुष्यातील ताण दाखवण्यावर अधिक भर देते. डॉक्टर सरस्वती आणि तिची बालपणापासूनची मैत्रीण माधवी या दोघींची ही कथा आहे. दोघींची व्यक्तिमत्त्वे निराळी परंतु सौदार्ह, प्रेम माया स्निग्धता हे या मैत्रीचे मूलद्रव्ये शेवटपर्यंत कायम राहतात. माधवीच्या लग्नाच्या वेळीच वर्णन करताना लेखिका म्हणते, "नंतर साऱ्या दिवसभर माधवी लग्नाचे विधी, जेवणावळी, साड्या, दागिने, सनई आणि ढीगभर नातेवाईक यांच्यात पूर्णपणे लपूनच गेली आता काय कराव ते सरुला कळेना."[४८] लग्नविधीच्या वेळी रुढी, परंपरा व संस्कृतीचे मिलाफ झालेला दिसून येतो.

माधवी आणि सरस्वती या दोघींच्या जीवनातील पुरुष त्यांच्याशी वेगवेगळया नात्यांनी वाढलेले आहे. त्यांच्या आयुष्याला परिपूर्णही करतात आणि अधुरेपणही देतात. ही नाती साधी सोपी नेहमीची नाहीत. त्यांनी या दोघांच्याही आयुष्याला पीळ भरले आहेत. लेखिकेने जीवनातील संघर्ष रंगवित असताना निसर्गातील प्राणी व पक्षांनाही स्थान दिलेले आहे."मध्यंतरी मी, आत्याबाईंबरोबर अमरकंटकला जाऊन आले. ट्रॅव्हल्सटूर बरोबर, आत्याबाईंची इच्छा होती. त्या रस्त्यावर खूप मोर दिसले. जोडीनं पिसारा फुलवून समोरुन उडत गेले. मी भान हरपून बघत राहिले. तुझ्या घराच्या मागच्या पार्कमध्येही

असेच मोर येतात ते आठवलं. घरी येऊन मी बाळासाहेबांना मोराबद्दल खूप सांगितले."[४९] लेखिकेने भौगोलिक ठिकाणाबरोबर निसर्गातील प्राणी व पक्षी यांचे वर्णनही अचूकपणे मांडलेले दिसते.

विजय आणि सरु मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःचा अट्टाहास धडपड दिसून येते. मेडिकलला प्रवेश मिळण्यापासून विजयला संघर्ष कसा करावा लागला. आपल्या सामान्य मुलाला स्वतःच्या पायरीवर आणून बसवताना करावा लागलेला संघर्ष, विजयनं करुन घेतलेला मनस्ताप सरुला आठवतो. "स्वतःच्या आयुष्यभर इतका अधिकार सांगता येत नाही विजय कधी."[५०] सरुच्या आईने तिचे आयुष्य पदराखाली दिव्याची ज्योत सांभाळावी तसे जपले आहे. लग्नानंतर अपघाताने मातृत्वाची आशा कायमची नष्ट झाल्यामुळे सरु स्वतःहून काही दिवसांनी पतीपासून वेगळी होते. एकाकी आयुष्य पत्करते. तिचे एकलेपण तिची आई पोरक्या मुलासारखे जपते. स्वतःचे जगणे सरुत गुंतवते. विजयशी असणारे तिचे बंध, जुन्या पिढीची असूनही आई समजून घेते.

सरु विजयचे नाते, विजयची पत्नी नंदिनी हिनेही समजून घेतले आहे. तुमच्यापासून मला धोका नाही हे न कळण्याइतकी मी अडाणी नव्हते, ती सरुजवळ एकदा अशी कबुली देते. नंदिनीला सारे मिळाले आहे. हुशार यशस्वी नवरा,मुले, वैभव, प्रतिष्ठा पण सरुला तिचा हेवा वाटत नाही. विजयकडून तिला जो स्नेह मिळतो तो तिला पुरेसा आहे. ही नाती कडवट होत नाहीत. अपवाद विजय, नंदिनीच्या मुलाचा समीरचा. एवढेच नाहीतर निर्मलच्या पत्नीला सरु वाचवू शकत नाही, त्यामुळे सरुला हॉस्पिटल सोडावे लागते. तो निर्मलही ती घटना मागे सारतो. तिच्या नव्या हॉस्पिटलच्या रिसेप्शनला नव्या पत्नी मुलासह हजर राहतो. यातही माणसांमध्ये स्वीकारशील वृत्ती परिपक्वता, प्रगल्भ जीवन जाणीव लागते. ती साऱ्यामध्ये आहे असे हे चित्रण आहे.

'भूमी' कादंबरीमध्ये मैथिलीच्या जीवनाची सुरुवात मद्रास जवळच्या कडलूर या छोट्याशा गावापासून होते. त्या गावचे संस्कार, निसर्ग, समुद्रकाठ व

परिसराबद्दलची माहिती दिसून येते. या गावाला लाभलेला समुद्रकिनारा हा विलोभनीय आहे. त्याचा प्रभाव हा लहानग्या मैथिलीच्या मनावर होतो. निसर्ग सुंदर असलेले हे गाव तिच्या मनात आयुष्यभर घर करुन राहते. तिच्या आईच्या मृत्युनतर तिची आत्या तिला शिक्षणासाठी मुंबईला घेऊन जाते. मुंबईत तिच्या आत्याच्या तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीतल्या अडगळीच्या जागेत थांबून ती अभ्यास करते. मुंबईत सुरुवातीला वावरताना तिला अडचण वाटते. नंतर मात्र मुंबईत सहज वावरते. हायस्कूलला मित्र मिळविते. कॉलेजमध्ये नाटकात भाग घेते. उत्तम अभिनय करते. चेतन, मिलिंद, कीर्ती हा एक नाटकाचा ग्रुप तयार होतो. याद्वारे महाविद्यालयाचा परिसर तेथील सांस्कृतिक वातावरण दिसून येते. मुंबईमधील लोकलच्या प्रवासाचा अनुभव लेखिकेने मांडलेला आहे. मैथिली लग्नानंतर मद्रास शहरात जाते. मद्रास शहरातील विद्यापीठाचा परिसर या ठिकाणचा तिचा मित्र परिवार तसेच तिच्या कुटुंबाचे चित्रण व्यक्त होते. तेथून ती बेंगलोर विद्यापीठात जाते. त्या ठिकाणचा परिसर आणि तिने आपल्या भोवती निर्माण केलेला मित्र परिवार मांडलेला आहे.

'आकाश' ही कादंबरी महेश, अशोक व उर्मिला यांच्याभोवती फिरणारी आहे. या कादंबरीत उर्मिलेभोवती विणलेली आहे ती स्वाभिमानी, जागण्याला सरळ तोंड देणारी, तर महेश खोटया अहंकाराखाली स्वतःचा दुबळेपणा झाकणारा. या दोघा पती-पत्नीमध्ये ताण आहेत. ते जीवनाच्या विरुध्द धोरणांमुळे, त्यांना मूल आहे. अभि-पण अशोक-अंजलीला ते नाही. साधारण पाच-सहा पात्रांच्या बदलत गेलेल्या आयुष्यावरची कहाणी या कादंबरीत गुंफलेली आहे. "कुणाला काय वाटतं हे काही महत्त्वाचं आहे, की या वेळी आपल्याला काय वाटतं हे महत्त्वाचं आहे?"[५१] उर्मिला या स्त्रीपात्रातून सडेतोड व्यक्तिमत्त्वाचे दर्शन आशा बगे यांनी घडविलेले आहे.

उर्मिलेची आई ही रुढी परंपरा व सामाजिक चालीरीतींना मानणारी आहे. उर्मिलेच्या दादांना साधी नोकरी होती. त्यामुळे संपूर्ण जीवन भाड्याच्या खोलीत

जीवन जगलेली स्त्री आहे. दागदागिन्यांची आवड व सतत वेगवेगळ्या मंगळसूत्रांची आवड तिने मंगळसूत्रातूनच निभावून नेली. आईला आपल्या सवाष्ण पणाचाही केवढा गौरव वाटायचा! जस तेच एक आयुष्यचं सार होतं. सवाष्ण जाण हीच जणू आयुष्यातील मोठी कमाई आहे. याबद्दल जुन्या चालीरीती लेखिकेने मांडलेल्या दिसून येतात. त्या म्हणतात, "सवाष्ण असणं, सवाष्ण जाणं ही गोष्ट आपल्या कमाईची असू शकत नाही. कारण ती आपल्या हाती नाही. आपली कमाई हे आपल्या यशाचं तसंच अपयशाचही फलित असतं."[५२] यातून आधुनिक स्त्री जीवनाचे चित्रण 'झुंबर' या कादंबरीत घडणाऱ्या घटनांवरुन काळाप्रमाणे मानवालाही स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणावे लागते हेच सुचविले आहे.

डॉ. ऋषिकेश अधिकारी यांना स्पायनल कार्डचा टयूमर होतो व ते वसुमतीला डॉ. राघवशी लग्न करण्यास सुचवितात. तेंव्हा वसुमतीच्या मनाची होणारी घालमेल व हळूहळू जसजसा काळ लोटत जातो, तसतसा तिच्यात होणारा बदल या ठिकाणी महत्त्वाचा ठरतो. जसजशी परिस्थिती बदलते, काही कालावधी लोटतो व व्यक्ती त्या परिस्थितीत, कालावधीत विविध अनुभवातून जाते. अशा या अनुभवातून गेल्यानंतर त्याला स्वतःची ओळख पटते व या ठिकाणी तो उभा असताना तो भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्याकडेही बघू शकतो. अशा या काळ संकल्पनेविषयी बोलताना प्रकाश देशपांडे म्हणतात, "भविष्यातून वर्तमानाकडे पाहणे हा अतिमानवी दृष्टिकोन आहे, असे अवलोकन प्रतिभावंतालाच शक्य आहे. अशा अवलोकनामुळे वर्तमानाने संकुचित झालेली कृत्रिम कालकल्पना ढासळून जाते व त्यामुळे वेगवेगळ्या पातळीवरुन वर्तमानाकडे पाहता येते. भोवतालच्या परिस्थितीचे मूल्यमापन करण्याची ही कादंबरीतील खास रीत आहे."[५२]

वसुमतीला काळाची ही जाणीव एक नवे बळ प्राप्त करुन देते. आपलं पूर्वीचं आयुष्य मागेच ठेवून आपण जात आहोत. माथ्यावर लखलखणारी झुंबरं

आता मालवली आहेत. आपल्याला हवं होते, तस साधं, सोप, सरळ आयुष्य कदाचित आता शक्य आहे. धावपळीत पुष्कळ गोष्टी निसटून गेल्या होत्या. आपली कविता, राघवची बासरी आता कदाचित आपल्या पावलात नव बळ येईल प्रत्येक क्षण नवा म्हणूनच जगता येतो माणसाला म्हणूनच कदाचित आयुष्य सोपी जात असतील वसुमतीच्या जीवनात घडलेल्या घडामोडी व त्यातून या टप्प्यापर्यांत पोहचलेले तिच्या मनाचे सामर्थ्य यासाठी जावा लागणारा काळ, या सर्व गोष्टी कादंबरीत महत्त्वाच्या आहेत.

## ३.८ आशा बगे यांच्या कादंबरीतील जुने व नवे विचार -

आशा बगे यांच्या कादंबरीमधून नव्या आणि जुन्या पिढीतील विचारांच्या व्यक्ती त्यांनी रेखाटल्या आहेत. लेखिका पारंपरिकता आणि आधुनिकता यांच्या मध्यावर उभी असल्यासारखी वाटते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यामध्ये जुन्या आणि नव्या विचारांची माणसे दिसून येतात. ही माणसे एकमेकांना समजावूनही घेतात. उदा. आत्या, मैथिली इत्यादी तर कधी ती संघर्ष निर्माण करतात. 'मारवा'मधील रघुनाथ व आबा देशपांडे अशा दोन टोकाच्या विचारांची माणसे कादंबरीमध्ये दिसून येतात. तसेच दुःखाच्या आघाताने आशा बगे यांच्या कादंबरीमधील पात्रे कधी खचतात पण कधी कधी अंतर्मुख होत अत्यंत तर्कशुध्द विचार करतात. तसेच पारंपरिक धारणा, श्रध्दा, संस्कार यातून बंडाचे विचार न करताही त्यांची स्त्री परंपरेचा विरोध करीत जाऊ शकते. विवाहसंस्था, स्त्री-पुरुषसंबंध, मातृत्व, सासरची नाती गोती यातून परंपरेसोबतच नवीनता दिसते. संस्कृतीची बंधने न तोडता तर कधी 'झुंबर' च्या नायिकासारखी तोडूनही ती स्त्री वाटचाल करते.

स्त्री ही सगळ्या समाजरचनेच्या तळाशी आहे. ही आधुनिक जाण तिथे आहे. पण तळातले बुडबुडे वर येऊ शकतात. थोडा काळच का असेना आपले अस्तित्व सिध्द करु शकतात. याचे जोरकस भान आहे. त्या सगळ्या माणसाचे नाते त्याच्या संस्कृतीच्या मातीशी बीजासारखे आहे. त्यांना रुजवायचे आहे.

जशी जागा मिळेल तसे वाढवायचे आहे. त्यांना डेरेदार होऊन तापलेल्यांना सावलीही द्यायची आहे. म्हणूनच लेखिकेचे 'भूमी' मधील जुने व नवे विचार आपणास पहावयास मिळतात.

यामध्ये लेखिकेने मैथिलीला आधुनिक विचारसणीची नायिका बनविली आहे. दुसऱ्याचे बोलणे सहन न करणारी अशा स्वभावाची मैथिली येथे दिसते, ज्या वेळेस ती देवस्थळीबाईकडे दांडेकरांच्या सांगण्यावरुन जाते, त्यावेळेस देवस्थळीबाई व तिच्या स्वभावात सारखेपणाच असतो. त्याही तितक्याच तोऱ्यात राहणाऱ्या समोरच्या माणासाला कमी लेखणाऱ्या तर मैथिली स्वाभिमानी स्वभावाची, दुसऱ्याचे ऐकून न घेणारी परंतु या वेळेस ती म्हणते "पण मी का सहन करायचं?"[५३] यातून लेखिकेचे विचार व ठामपणा स्पष्ट होतो. परंतु येथेच दांडेकरही तिच्याशी मिळते जुळते घेताना दिसतात व आपले विचार तिला सांगतात की, "आता या वयात त्या बाईमध्ये काय बदल होणार! झाला तर तो तुमच्यातच होईल. तुम्हा नवीन लोकांना माणसं सहन करता आली पाहिजेत. पण स्वतःचा कशाशीच संबंध नाही, असं तुम्ही लोकांनीच वागायचं ठरवलं तर ते कसं हे तुम्हीच केल पाहिजे असं नाही. पण तुम्हीही का करु नये? "[५४] येथे जुने विचार व नवे विचारांमध्ये सांगड घालण्याचे काम केलेले दिसते. जणू तरुणांनीच जुन्या विचाराच्या माणसांना समजून घेण्याचा प्रयत्न करावा जे काही बदल होतात ते तरुणांमध्येच होतात, असे यातून व्यक्त होते.

कादंबरीमध्ये मैथिलीच्या लग्नासंबंधीचे विचार आणि तिच्या आत्याचे विचार यामध्ये फरक दिसून येतो. मैथिलीच्या लग्नासंबंधी आत्या तिला म्हणते की, "मुलगी लहान असली की शेवटपर्यंत यांच्या सेवेला बरी, असे हिशोब असतील! बायोलॉजीकल अस काही नाही."[५५] येथे लेखिकेने मुलगी व मुलगा यांच्यातील लग्नाच्या वयाचा फरक किती असावा हेच जणू सांगितले आहे. पूर्वी तो फरक जास्त होता, तो आता कमी कमी होत चाललेला दिसतो.

कादंबरीमध्ये मैथिली आणि शंतनू यांच्या तणावपूर्ण वातावरणामध्ये अंशुमन हा मोठा होता. तो शरीराने तसाच बुध्दीनेही प्रगल्भ होत जातो. आपल्या विचारांनी तो आई आणि वडिलांमध्ये नेहमी समन्वयकाची भूमिका घेतो. परंतु शंतनूच्या बाजने जास्त झुकलेला असतो. तो समजतो की, आई कोठेही काहीही करु शकते. स्वत:ला व्यक्त करु शकतो. परंतु वडील मात्र काहीही करु शकत नाहीत. जणू जीवनामध्ये त्यांनी हारच पत्कारली आहे येथे अंशुमन हा नवीन पिढीतील उच्चशिक्षित व समंजस असा आहे. तो आपल्या आईला म्हणतो की, "तुला त्यांना (शंतनू) बरोबर घेता आलं नाही, अम्मा!"[५६] हे विचार जणू त्याच्यामध्ये आधुनिक विचारसरणीमुळे आलेले दिसतात. संपूर्ण कादंबरीमध्ये लेखिकेने नवे विचार व जुने विचार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यात नवीन विचार करणारे मैथिली व अंशुमन यांचे विचार तसेच आत्या, डॉ. सुधीर, निरंजनची आई, मिलिंदची आई, वडील, आजी, मिसेस धर्मराजन हे सर्वजण जुन्या पिढीचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. परंतु असे असले तरीही त्यांचे विचार हे पारंपरिकतेतून नवीन विचार वाचकांच्या मनावर परिणाम करुन जाताना दिसतात.

आधुनिक कालखंडातील त्यांच्या कादंबऱ्या असल्या तरी केवळ स्त्रीवादी भूमिका धारण न करता आधुनिक आणि परंपरागत जीवनधारेत वाढलेल्या स्त्रीला मुळापासून समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून केला आहे. मध्यमवर्गीय स्त्रीचे हे विश्व असल्यामुळे आधुनिक काळातील मध्यमवर्गीय स्त्रीला भेडसावणारे सर्व प्रश्न त्यांच्या कादंबऱ्यांतून उमटलेले आहेत.

'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनीच्या मनाचा प्रवास दाखविताना काळाचा एक विशिष्ट टप्पाही ओलांडला गेला आहे व त्यामुळेच ती अंतर्मुख होत जाऊन एक प्रकारची प्रगल्भता तिच्यामध्ये आली आहे. मनाला पेलणारे सामर्थ्य तिच्यात निर्माण झाले आहे. पण त्यासाठी तिला निश्चितच काही काळ

घालवावा लागला. या कादंबरीतील सौदामिनीच्या वाक्यावरुनही या काळाचा अंदाज येतो. "या साऱ्या उमलत गेलेल्या पाकळ्या, त्यांचा दरवळ इथे येऊन पोचलाय, पुन्हा आज. किती काळानं कुणास ठाऊक! सारा प्रवास त्या निरनिराळ्या रेघेजवळच येऊन थांबतोय का?"[५७]

'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी असून त्यात बनारसजवळच्या गंगेच्या काठावर असणाऱ्या खेड्यातील राहणारे ब्रिजमोहन, बाबूजी, मॉ, बहिणी, भाऊ, पुतण्या हे एकमेकांशी नात्याने गुंतलेले आहे. सुचरिता त्याच्याशी लग्न करते पण त्याच्या माणसांशी तिचे नाते जुळूच शकत नाही. आपल्या मायेच्या माणसांपासून स्वतःचे दूर जाणे ब्रिजमोहनला सहन होऊ शकत नाही. त्याचे मानसिक संतुलन ढळत जाते. सुचरिताने कुंठित, हाताश व्हावे अशी परिस्थिती निर्माण होते. "गंगेच दर्शन घ्यायचं, नंतर विश्वेश्वराचं, ते उपाशी पोटी घ्यायचं, थोडी मिठाई खाऊ हवी तर!"[५८] ब्रिजमोहन सुचरिताला तिच्या गंगेबद्दल जीवन जाणीवच अर्थपूर्ण बघणं म्हणजे दर्शन होय. पण हे सारं आयुष्यात सुचरिता मानत नाही. "कमाल आहे! मी तुला बांधून ठेवलं? माझ्या मनात नसताना आपलं सर्व सोडून मी तुझ्यामागं इथे आले आहे मोहन!"[५९] ब्रिजमोहन आजारी असताना सुचरिता, अर्पिता, आणि उदित हे तिघही बसलेले असतात. त्यावेळी ब्रिजला लहानपणी झोपवताना मॉ गाण म्हणायची तुला तसं येतं का, "त्या गाण्यात रामाची गोष्ट आहे. राम पौर्णिमेच्या चंद्राच्या चेंडू समजून हट्ट धरतो आणि आरशातून चंद्र दाखवून रामाची समजूत घालतात. ती मला ज्या ज्या गोष्टी आवडतात त्या तिच्या गाण्यातील कौशल्या रामाला देऊ करायची मॉ ते स्वतःच जोडायची."[६०] यातून लेखिकेने जुने व नवे विचार यांचा मिलाफ घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राघवेंद्र मूर्ती आणि अर्पिता यांच्याविषयी बोलताना सुचिता म्हणते बाईंच आयुष्य वाया जातं आहे. आपल्या जगण्याचं लहानसं श्रेय असतं ते पूर्ण आयुष्याला व्यापून नसतचं कधी ते हिरवळीसारखं लहानसा एखादा कोपरा

धरुन ठेवते. "राघव, असं श्रेय आपल्या मुठीत बंद करुन संपूर्ण आयुष्य जगणं कठीण आहे. मूळ जळून जाईल!"[६१] लेखिकेने आपल्या जगण्याचं सूत्रच येथे मांडलेले दिसते. 'तुमचं जगणं आणि तुम्ही पाहिलेलं श्रेय एकच आहे असं मी समजत होतो."[६२] दादा आणि डॉक्टर नियोगी यांच्यातील जुने व नवे विचार स्पष्टपणे मांडलेले आहे.

आधुनिक स्त्रियांच्या चित्रणांबरोबर परंपरेची नवी दृष्टी, संस्कृतीचा नवा वेध घेते. त्यांच्या 'मनस्विनी', 'झुंबर', 'त्रिदल' या कादंबरीच्या प्रवासात संगीतप्रीतीच्या वाङ्मयप्रेमाच्या खुणा आढळतात. त्याबरोबरच दिसतात. आंतरिक वास्तवाच्या सूक्ष्म खुणा! स्त्रीजीवनाचे आंतरिक धागे, जगण्यातल्या चौकटी परंपराधरणता आणि पार्थिवता यातूनच त्यांचे कादंबरी लेखन फुलताना दिसते. 'सेतू' मध्ये त्यांनी थोडे वेगळे वळण घेतले आहे व भूमी हा जणू लेखिकेच्या प्रगल्भतेचाच प्रवास वाटतो.

आधुनिक स्त्रीचे चित्रण, तिचे बदलत चाललेले व्यक्तिमत्त्व, तिच्या आयुष्यात निर्माण झालेले विविध प्रश्न, तिची मानसिकता, वेगवेगळ्या नातेसंबंधात तिचे असलेले रुप, तयार झालेली नवी प्रतिमा इ. अनेक गोष्टीचे दर्शन घडविले आहे. असेच दर्शन घडविणाऱ्या व आपल्याला जे अनुभव आले त्याचे मोकळेपणाने चित्रण करणाऱ्या स्त्री कादंबरीकारांमध्ये आशा बगे यांचे स्थान महत्त्वाचे आहे. पारंपरिकता व आधुनिकता यातील ताण स्वीकारणारी पारंपरिक पण स्वतःच्या अस्मितेची जाणीव झालेली स्त्री आशा बगे यांच्या कादंबरीतून आपल्यापुढे येते. त्यांच्या लेखणीला एक वेगळेच बळ प्राप्त झालेले आहे.

आधुनिकता, उत्सुकता निर्माण करणाऱ्या छोट्याप्रसंग मालिकेतून अनुभवाच्या आकृतिबंध काढण्याचा छंद आशा बगे यांच्या साहित्यातून दिसून येतो. 'रुक्मिणी', 'नवस', 'बंदिशाळा', 'अत्तर', 'मारवा' इत्यादी कथांत हा आकृतिबंध दिसतो. प्रत्येक प्रसंगात नव्या भावनांची गर्भित ठेऊन जाते असे

दुहेरी कार्य साधले आहे. चिंतनशीलता आणि त्या चिंतनशीलतेतून दु:ख पेलण्याचे येणारे सामर्थ्य तिच्या आत्मभानाच्या प्रवासात दिसून येते. 'मनस्विनी' कादंबरीबाबत आशा सावदेकर म्हणतात, "एक पारंपरिक स्त्री म्हणून लेखिका इथे थांबत नाही हा त्यांच्या कादंबरीचा पूर्णविराम नाही, तर अनेक प्रश्न मनात घोळत राहतात. सौदामिनीच्या मनाची तडफड संपली नाही, पण तिला मात्र हे सगळे संपवण्याचे एक बळ प्राप्त झाले आहे. ज्या संगीताच्या आधारे ती यात अडकते. त्या संगीताच्या माध्यमातूनच तिला हे बळ प्राप्त होते व ती परत आपल्या परतीच्या प्रवासाकडे वळते; पण यात महत्त्वाचा आहे तो सौदामिनीच्या आत्मभानाचा प्रवास आणि त्या प्रवासात तिच्या मनाला पडणारे प्रश्न, तिला होणारी स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव महत्त्वपूर्ण ठरते."[६३]

आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्रीपात्रे कुटुंब उभे करण्यासाठी जीवनाचा आटापिटा करतात. तिच्या भावनांची कदर केली जात नाही. बुध्दीच्या, जिद्दीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावरती यशाची शिखरे कधी गाठत जाते. असामान्य कर्तृत्व असणारी स्त्री म्हणून कुटुंबातले सर्वजण तिच्याकडे कसे पाहतात. मनाची एकाकी अवस्था कशी होते, तरीही त्या जीवनाच्या सर्व आघाड्यावर यशस्वीपणे कशा लढतात हे त्याच्या लेखनातून मानसशास्त्रीय दृष्टया मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मैथिलीचे जीवन संघर्षाने भरलेले आहे. तिचे लहानपण कडलूर गावी गेले. तिला समज येण्यापूर्वीच तिचे वडील वारले. तिची आई दवाखान्यात नर्स होती.ती व्यवस्थित होती तोपर्यंत मैथिलीचे जीवन सुरक्षित होते. तिच्या आईच्या मृत्युनंतर तिच्या जीवनाने नवे वळण घेतले. तिची आत्या तिला मुंबईला घेऊन जाते. लहान वयापासूनच तिला परिस्थितीशी सतत संघर्ष करावा लागतो. तिची आत्या मात्र ठामपणे तिच्या पाठीशी उभी राहते. तिच्या मनात शिक्षणाबद्दलची आवड निर्माण करते. कधी वाचनालयात तर कधी देवस्थळीबाईंच्याकडे फावल्या वेळात काम करुन ती थोडे पैसे उभे करण्याचा प्रयत्न करते. आपल्या

खर्चाचा पूर्ण भार आत्यावर पडू नये, असे तिला वाटते. वाचनाचा झपाटा ती वाढविते. दहावीपासून प्रत्येक परीक्षेत यशाची चढती कमान हा तिच्या शैक्षणिक विकासाचा चढता आलेख आहे. हे यश मिळविताना परिस्थितीशी संघर्ष करुन त्यावर ती मात करते.

मिलिंदवर तिचे प्रेम असते. परंतु त्याच्याशी लग्न होऊ शकत नाही. ती शंतनूशी लग्न करते. त्याचा स्वभाव आणि तिचा स्वभाव जुळत नाही. शंतनूला तिला मिळणारे यश सहन होत नाही. तिच्यापासून तो फटकून वागतो. तिचा सतत द्वेष करीत राहतो. त्याचे स्वतःचे एक मर्यादित विश्व असते. त्याच्या पलीकडे त्याला जाता येत नाही. मैथिलीला त्याच्याशी संसार करीत असताना सतत सुप्त संघर्षाला तोंड द्यावे लागते. तिच्या माघारी तो तिची टिंगल करतो. तिच्यामुळे माझे नुकसान झाले असे म्हणतो. प्रत्यक्षात मात्र त्याला तिची भीती वाटते. दोघांच्यामध्ये अंतर पडते. त्यांच्यामध्ये अबोला असतो. शेवटी ती बेंगलोर विद्यापीठात जाते. तरीही दोघांच्यातला संघर्ष संपत नाही. अंशुमनही तिला समजून घेत नाही. तिच्या मनावर या दोघांचा ताण सतत असतो. अशा संघर्षशील वातावरणाचे वर्णन स्पष्टपणे केलेले दिसून येते.

आशा बगे यांच्या साहित्यातून मानवीमूल्यांची पायमल्ली समाजात रुजविण्यासाठी सहाजिकच मानवाच्या अतर्क्य आणि अंतर्मुख अशा स्वभावाकडे येते. यातूनच नवनवीन नीतीकल्पना पुढे आल्या. भाषिक प्रयोग झाले. आधुनिक युगातील स्त्री ही घराबाहेर पडली. सुशिक्षित, नोकरी करणारी, बुध्दिमान, प्रतिभाशाली, कणखर, अशी स्त्री साहित्यातून दिसू लागलेली आहे. कालच्या स्त्रीपेक्षा आजची स्त्री निश्चितपणे आत्मनिर्भर स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची व सामंजस्याने जीवन जगणारी पण लढाऊ वृत्तीची आहे. असे स्पष्टपणे दिसून येते.

## ३.९ समारोप -

आशा बगे यांनी परंपरा, साहित्य, नाट्य, आणि संगीत यांच्या प्रेमातून स्त्रीच्या अनुभवाला एका वेगळ्या जटिलतेचे परिमाण दिले आहेत. मुळातच माणूस समजून घेण्याच्या भूमिकेतून त्यांच्या कथा साकार होतात. त्यात व्यक्तीपेक्षा त्यातील जाणीव जास्त सरस व महत्त्वाच्या ठरतात. आधुनिक जीवनाचे त्यातील बदलत्या नात्यांचे ताण सोसताना नव्या विचारप्रवाहांना सामोरे जाताना परंपराच मांडण्याची गरज लेखिकेला वाटत नाही. तर आपली परंपरा व आपल्या संस्कृतीतील शाश्वत जीवन मूल्यांशी नाते कायम ठेवून काहीशा सक्षमपणे आणि पुरेशी गांभीर्याने वास्तवातील जीवनानुभवाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य तसेच श्रध्देचे बोट धरुन माणसाला त्याच्या खऱ्या स्वरुपापर्यंत जाता येऊ शकते हा विश्वास त्यांच्या साहित्यातून दिसून येतो.

आशा बगे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामान्य मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण केलेले आहे. या सामान्य मध्यमवर्गीय जीवनातील व्यक्तीचे चित्रण करताना त्या व्यक्तीतील असामान्यपण शोधण्याचा त्या प्रयत्न करतात. तर कधी कधी असामान्य व्यक्तीतील सामान्यपणाचा व त्यांच्या नातेसंबंधाची गुंतागुंत यांचा वेध घेताना त्या दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-पुरुष सुशिक्षित, सुसंस्कारीत आहेत. आर्थिकदृष्टयासुध्दा त्यांना चांगली परिस्थिती वाटयाला आलेली आहे. पण पोशाख, खाण्यापिण्याच्या पध्दती, वागण्याची पध्दती, बोलण्याची भाषा या सर्व गोष्टी मात्र मध्यमवर्गीय जीवनपध्दतीत साजेशा अशाच आहेत. सण, उत्सव, व्रतवैकल्ये, परंपरा या सर्व गोष्टींना आपल्या जीवनात महत्त्व देणारी लेखिका आपल्या कादंबऱ्यांतून संगीत, साहित्य, अभिनय यांचे ही दर्शन घडविते. जीवन जाणिवांचा नवीन आकलनाच्या दृष्टीने एक प्रकारे शोध घेते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये मूल्यांची जपवणूक करणाऱ्या आहेत. मानवी आयुष्यात शेवटी मूल्यांना जपणे किती महत्त्वाचे आहे हेच दर्शवितात व

हे सर्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमुळे त्यांच्यावर झालेल्या संस्कारामुळे घडते, असे वाचकालाही जाणवते. आशा बगे यांच्या साहित्यात परंपरेचा ठसा आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत, वैकल्ये, कीर्तन, संस्कार, आचार-विचार यांच्याशी जवळचे नाते असलेले त्यांचे हे विश्व आहे. स्त्रीच्या अंतर्विश्वातील भावभावनांवर, आंदोलनावर, स्पंदनावर आपली दृष्टी स्थिरावणाऱ्या आशा बगे केवळ स्त्रीच्या दुःखाच्या, अगतिकतेच्या कथाच रेखाटत नाही, तर पुरुषांच्या मानसिकतेवरही त्या भर देताना दिसून येतात.

### ३.१० निष्कर्ष -

१) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाचा आलेख मांडलेला दिसून येतो.

२) आशा बगे यांनी स्त्री जीवनातील अनेकविध व्यथा व संवेदना यथोचीतपणे चित्रित केलेल्या आहेत.

३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील नायिका स्वतःचे निर्णय स्वतः घेऊन त्यामागून येणाऱ्या जबाबदाऱ्या त्या आनंदाने स्वीकारतात.

४) 'मनस्विनी' कादंबरीतील सौदामिनी ही नायिका स्वतंत्रपणे रस्ता शोधणारी, स्वतः मध्येच हरवणारी धीट, शेवटी पारंपरिक स्त्रीप्रमाणेच त्यांच्याकडून अपेक्षा करीत राहताना दिसते.

५) 'झुंबर' कादंबरी ही 'स्त्री' भोवतीच फिरणारी, सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांचा सहवासात आलेले अनुभव याचं चित्रण केलेले आहे.

६) स्त्री मनाची सूक्ष्म द्वंद्वे त्या आधुनिक जीवन दृष्टिकोनातून व नवीन जाणिवेतून वाचकांसमोर ठेवतात.

७) स्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव व बदलत्या मूल्यांचे भान असूनही शेवटही आशा बगे यांची स्त्री संस्कृतीशी व परंपरेशी असलेले आपले जवळचे नाते सांगताना दिसतात.

८) स्त्रियांच्या विकसनशील जगण्याचे व त्यातील स्थितीगतीचे दर्शन आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येते.

९) आशा बगे यांनी आधुनिक काळ व बदलणारा समाज केंद्रस्थानी ठेवलेला आहे.

१०) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री प्रतिमा या संगीत, अभिनय, कला व साहित्याची आवड जोपासणाऱ्या आहेत.

११) आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते असलेली व बदलत्या समाज वास्तवातील कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान व मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीव त्यांच्या लेखनामधून दिसून येते.

१२) आजच्या स्त्रियांची मानसिक भावस्पंदने व बदलत गेलेली कौटुंबिक परिस्थिती याचा सूक्ष्म वेध त्या कादंबऱ्यांतून घेताना दिसतात.

१३) आधुनिक स्त्रीचे चित्रण, तिचे बदलत चाललेले व्यक्तिमत्त्व, तिच्या आयुष्यात निर्माण झालेले विविध प्रश्न, तिची मानसिकता, वेगवेगळ्या नातेसंबंधात तिचे असलेले रुप व तयार झालेली नवी प्रतिमा या गोष्टींचे दर्शन लेखिकेने कादंबऱ्यांतून घडविलेले आहे.

## संदर्भ सूची


१) हस्तक उषा, 'कादंबरी, साहित्य अध्यापन आणि प्रकार' संपा. श्री.पु.भागवत., सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७, पृष्ठ - २६४.

२) महाजन वंदना, 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१०, पृष्ठ - ११.

३) फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८०, पृष्ठ - १५.

४) भागवत वंदना, अनिल सपकाळ, गीताली वि.भ, 'संदर्भासहित स्त्रीवाद, 'स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व', संपा. शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१४, पृष्ठ - १३.

५) बगे आशा, 'माझे कथा लेखन', ललित मासिक, जुलै ,१९८८.

६) भावे पु.भा., 'शत्रू करण्याची कला' ललित दिवाळी, १९७२, पृष्ठ - ४८.

७) म.सा. पत्रिका, नवसाची जन्मकथा, दिवाळी अंक, १९९१ पृष्ठ - ६२.

८) साने गुरुजी, 'भारतीय नारी', साधना प्रकाशन पुणे, आवृत्ती नववी २००३, पृष्ठ - १९.

९) बगे आशा, 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, १९७८, पृष्ठ - १५२.

१०) हेर्लेकर सुलभा, 'आशा बगे एक नवे अस्तित्व', युगवाणी ऑ.नो.डि. १९८९ पृष्ठ - ५३.

११) तत्रैव, पृष्ठ - ५३.

१२) बगे आशा,'झुंबर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ - ५५.

१३) तत्रैव, पृष्ठ - ७५.

१४) तत्रैव, पृष्ठ - ५५.

१५) तत्रैव, पृष्ठ - १२७.

१६) बगे आशा,'त्रिदल',मौज प्रकाशन,मुंबई, दुसरी आवृत्ती,२००७,पृष्ठ- ७५.

१७) तत्रैव, पृष्ठ १२९.

१८) तत्रैव, पृष्ठ - १२८.

१९) तत्रैव, पृष्ठ - ५०.

२०) तत्रैव, पृष्ठ - १०३.

२१) बगे आशा,'सेतू',मौज प्रकाशन,मुंबई,तिसरी आवृत्ती,२००७,पृष्ठ - ७७.

२२) तत्रैव, पृष्ठ - ४४.

२३) तत्रैव, पृष्ठ - ३९.

२४) तत्रैव, पृष्ठ - ३४.

२५) तत्रैव, पृष्ठ - १३०.

२६) तत्रैव, पृष्ठ - १५४.

२७) तत्रैव, पृष्ठ - १९९.

२८) तत्रैव, पृष्ठ - ३.

२९) बगे आशा, 'मनस्विनी', उनि.,पृष्ठ - १०६.

३०) तत्रैव, पृष्ठ - ७१.

३१) तत्रैव, पृष्ठ -७३.

३२) बगे आशा, 'झुंबर', उनि., पृष्ठ - १३४.

३३) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - ७७.

३४) तत्रैव, पृष्ठ - ७८.

३५) वरखेडे मंगला, 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलासराणा प्रकाशन, नाशिक, १९९६, पृष्ठ - २१.

३६) अनुभवाच्या रंग-रस-गंध कला स्वीकारणाऱ्या कथांचा संग्रह, 'अत्तर', तरुण भारत, नागपूर, २ जून १९८६.

३७) बगे आशा,'भूमी',मौज प्रकाशन,मुंबई,दुसरी आवृत्ती,२००६,पृष्ठ -१३८.

३८) तत्रैव, पृष्ठ - १२५.

३९) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - १७९.

४०) तत्रैव, पृष्ठ - २७.

४१) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - १७८.

४२) सावदेकर आशा, 'काही शोध-निबंध', 'आशा बगे यांचे कादंबरी विश्व', पृष्ठ - १२५.

४३) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - २.

४४) तत्रैव, पृष्ठ - ८२.

४५) तत्रैव, पृष्ठ - ४५.

४६) तत्रैव, पृष्ठ - ९९.

४७) तत्रैव, पृष्ठ - १५७.

४८) बगे आशा, 'भूमिका आणि उत्सव', मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०११, पृष्ठ - ७६.

४९) तत्रैव, पृष्ठ - ८८.

५०) तत्रैव, पृष्ठ - ९१.

५१) बगे आशा,'आकाश',मौज प्रकाशन,मुंबई,प्रथम आवृत्ती,२०११,पृष्ठ -८५.

५२) देशपांडे प्रकाश, 'आलोचना' मासिक, मुंबई, ऑगस्ट - १९९०.

५३) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ५३.

५४) तत्रैव, पृष्ठ - ५३.

५५) तत्रैव, पृष्ठ - ५३.

५६) तत्रैव, पृष्ठ - ११ .

५७) तत्रैव, पृष्ठ - १४७.

५८) बगे आशा, 'मनस्विनी' उनि., पृष्ठ - २३२.

५९) बगे आशा, 'सेतू' , उनि., पृष्ठ - २३.

६०) तत्रैव, पृष्ठ - १५४.

६१) तत्रैव, पृष्ठ - १५७.

६२) तत्रैव, पृष्ठ - १८५.

६३) बगे आशा, 'काही शोधनिबंध',आशा बगे यांचे कादंबरी विश्व',पृष्ठ-११४

# प्रकरण चौथे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा


४.१ प्रस्तावना

४.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा

४.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील मूल्यात्मकता व संस्कृतीचे दर्शन

४.४ समारोप

४.५ निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

## प्रकरण चौथे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा

### ४.१ प्रस्तावना -

कादंबरी हा ललित साहित्याचा गद्य वाङ्मय प्रकार असून, तो मानवी जीवनाचे समर्थ व सर्वसमावेशक दर्शन घडवू शकतो. मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे कादंबरीतूनही अपरिहार्यपणे व्यक्तीसमवेत समाजाचेही दर्शन घडत असते. मानवाचे आंतरिक जीवन व बाह्य जीवन यांच्यात चालणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांतून अनेक घटना निर्माण होतात. ज्या कादंबरीतील घटक निर्मितीला पोषक असतात. विविध घटनांपैकी काही मोजक्याच घटना निवडून कादंबरीकार कादंबरीची योजना करतो. विविध घटना, प्रसंग व व्यक्ती यांच्या क्रिया-प्रतिक्रियातून कादंबरीकार कथानकाची रचना करतो. कथानकाला गती देण्यासाठी कादंबरीकार काही पात्रांची निर्मिती करतो.

कथानकाला पुढे घेऊन जाण्यासाठी व पात्रांचा विकास घडविण्यासाठी कादंबरीकार विशिष्ट अशा 'निवेदन' पध्दतीचा स्वीकार करतो. कादंबरीतील सर्व घटना, प्रसंग व पात्रे एका विशिष्ट स्थलकालाशी निगडित असतात. ज्यामधून लेखक कादंबरीची 'वातावरण निर्मिती सिध्द करतो या सर्वांना घडविण्यासाठी लेखक माध्यम म्हणून 'भाषा' उपयोगात आणतो. वरील सर्वांना कादंबरीचे घटक म्हणून संबोधले जाते. ज्याला कादंबरीत कमी-अधिक प्रमाणात स्थान असते. कादंबरीत 'कथानक' व 'पात्रे' हे प्रमुख घटक असून 'निवेदन', 'वातावरण','भाषा' हे कादंबरीचा आविष्कार करणारे, सौंदर्य वाढविणारे पूरक घटक ठरतात. तरी सुध्दा कादंबरीच्या संरचनेच्या दृष्टीने सर्वच घटकांना महत्त्व प्राप्त होते, ज्याचा येथे स्थूलपणे विचार करता येईल.

कादंबरी हा साहित्यप्रकार समाज जीवनाबरोबर वाढत राहणारा असल्यामुळे समाज जीवनातील व्यवहार, माणसा-माणसांतील परस्परसंबंध, राग, लोभ, हर्ष, खेद व भावना यांच्या केंद्रस्थानी 'माणूसच' असतो. व्यक्ती

व्यक्तींच्या संबंधाच्या जाळ्यांनीच समाज घडतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तींच्या विविध कृती-उक्ती व्यावहारिक तसेच मानसिक असतात. लेखक काही विशिष्ट हेतू ठेवून पात्रनिर्मिती करतो. त्यामुळे काही नैसर्गिक तसेच मानसिकदृष्ट्या खूप समृध्द असतात.

कादंबरीच्या कथानकातील घटना, प्रसंगांना अनुसरुन कादंबरीत मानवी जीवनातील विविध गुंतागुंतीच्या अनुभवांची मांडणी लेखक करीत असतो. तेव्हा अनुभव वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृतींच्या व्यक्तीच्या भोवती अंतरविरोधी प्रकट करणारे असतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा काल्पनिक असल्या तरी वास्तवातील घटना प्रसंगाशी साम्य दर्शविणाऱ्या असाव्या लागतात. कारण कादंबरीकार आपल्या दैनंदिन व्यवहारातील अनेक विविध व्यक्तींच्या सहवासात असतो. त्यामुळे सभोवतालच्या परिस्थितीतून तो या व्यक्तिरेखांची बीजे शोधत असतो. त्याचे प्रतिबिंब पात्रांवर पडलेले आढळून येते. भीमराव कुलकर्णी म्हणतात की, "ही व्यक्तिचित्रणे वास्तवावर आधारलेली असली तरी, वास्तवातील व्यक्तींची जशीची तशी प्रतिबिंबे नसतात. तर लेखकाच्या प्रतिभासामर्थ्याने अधिक आकर्षक, अधिक कलात्मक आणि परिणामकारक बनलेली ती लेखकाची मानसचित्रे असतात."[१] मनुष्याच्या सर्व जिज्ञासेच्या अती आवडता विषय मनुष्यच होय, कारण मनुष्य स्वभावातील निरनिराळ्या गुणधर्माशी तो पुष्कळदा स्वतःच्या स्वभावाची तुलना करीत असतो.

जगातील कितीतरी व्यवहार मानवी कृतीच्या परस्पर क्रिया-प्रतिक्रियारुप असतात. तेव्हा या क्रिया-प्रतिक्रियाच्या मागे कोणत्या मनोप्रवृत्ती, भावनासंगती वा विचारपंरपरा प्रेरक होत असतात, हे जाणण्याचे त्याला अगत्य असते. मनुष्य स्वभावाचे कोडे काल्पनिक उदाहरण देऊन का होईना कोणी उलगडून देईल, तर लोक त्याला धन्यवादच देतील. स्वतःच्या स्वभावाची प्रकृतीची जेथे पुष्कळशी पारख नसते तिथे केवळ बाहय स्वरुपावरुन सभोवताली नित्य वावरणाऱ्या लोकांची परीक्षा ती काय होणार? बाहय सृष्टीतील विविध वस्तूंच्या

दर्शनापेक्षा मानव अंतःकरणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्यांचे दर्शन वाचकास घडले, तर त्यास अधिक आल्हाददायक कथा कादंबऱ्याच्या चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शन ज्या कादंबरीतून घडत असेल ती कादंबरी श्रेष्ठ होय.

काव्य, कथा, कादंबरी व नाटक अशा साहित्य प्रकारामध्ये व्यक्तिरेखांचे अस्तित्व आढळते. व्यक्तिरेखाविषयी गंगाधर पाटील म्हणतात की, "कथा-कादंबरीतील पात्राला स्वतःचे विशिष्ट असे भावविश्व, व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. पात्रांच्या विशिष्ट प्रकारच्या मानसिक प्रेरणा, प्रवृत्ती, भावना विचार, कृती, उक्ती व जीवनदृष्टी इत्यादी व्यापारातून पात्रांचा स्वभाव किंवा 'स्व' रुप साकार होत असते."[२] यावरुन असे म्हणता येईल की, लेखक आपल्या अवतीभोवतीच्या समाजाचे, व्यक्तींचे निरीक्षण करतो. यातूनच तो काही व्यक्तींची निवड करतो, गुंफण करतो. अवतीभोवतीच्या व्यक्तीमधून निवडलेल्या काही व्यक्ती कलाकृतीत आणतो. त्यांचे वर्णन करुन कथानकाशी बांधतो. अशा व्यक्तींना व्यक्तिरेखा असे म्हणतात. व्यक्तिरेखांच्या परस्परसंबंधातून कथानक निर्माण होत असते. साहित्यिक विविध पध्दतींनी, विविध प्रकारांत, विविध भावानुभवांचे ज्या व्यक्तींवर आरोपण केले जाते, त्या व्यक्तींना व्यक्तिरेखा असे म्हणतात.

कादंबरीतील व्यक्तिरेखांना वास्तवातील माणसांप्रमाणे शारीरिक, मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात. ती लक्षात घेऊन कादंबरीतील पात्रे निर्माण करावी लागतात. व्यक्तिरेखांना जिवंत रुप देत असताना त्यांच्या वर्तणुकीच्या हालचाली, लकबी, बोलण्याच्या पध्दती याद्वारे तो पात्रांचे सौंदर्य वाढवीत असतो. कादंबरीच्या आकलनासाठी व्यक्तिचित्रण हा घटक खूप महत्त्वाचा मानला जातो. स्वभावचित्रणात अनेक बाजूंचा वापर करण्यात लेखिकेचे कौशल्ये दिसून येते. त्यांच्या स्वभावरेखाटन वैशिष्टयांचा शोध त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रांच्या आधारे घेता येईल.

कादंबरीमध्ये सर्वाधिक महत्त्वाचा घटक म्हणून पात्रांकडे पाहिले जाते. कादंबरीकार कल्पनेच्या साहाय्याने पात्रांची नवनिर्मिती करतात आणि प्रतिभेच्या बळावर पात्रांचे अंतःकरण उघडे करुन दाखवितात. पात्रांच्या बाहयदर्शनापेक्षा अंतःदर्शनाला कादंबरीकाराचा खरा कस लागतो. पात्रांच्या निर्मितीमागे अनेक वेळा लेखकाचा विशिष्ट हेतू असतो. वास्तवातील व्यक्तींचे अवलोकन करुन लेखक अनेक वेळा स्वतःची प्रतिसृष्टी-पात्रनिर्मिती करत असतो. त्यामुळे कादंबरीतील पात्रसृष्टी अनेक वेळा वास्तव व कल्पना यांचे संमिश्रण असलेली आढळते. जी लेखकाच्या प्रतिभेची निर्मिती असते. ती वास्तवाची प्रतिकृती नसते. कादंबरीत पात्रांना लेखकाने त्यांचा असा एक 'स्वभाव' द्यावा. त्यानुसार त्यांना वागू द्यावे. अन्यथा पात्रे ठोकळेबाज, निर्जीव बनतात. कादंबरीत घटना, प्रसंग हे पात्रांच्या ठायी घडत असतात. पात्रांच्या कृती-उक्तीतून निर्माण झालेली परिस्थिती, नियतीनिर्मित घटना वा निसर्गनिर्मित घटना यांचा पात्र स्वभावावर होणारा परिणाम यांची सरमिसळ कथानकात होते. यावरुन कथानक पात्रे परस्परसंबंधी असल्याचे दिसते. पात्रांच्या कृती-उक्तीजन्य वाटचालीतून लेखकाची नैतिक भूमिका समोर येते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतलेले आहे. मनुष्य स्वभावाची वाचकांना विलक्षण उत्कंठा असते. मनुष्य स्वभावाशी वाचक पुन्हा पुन्हा समरस होऊ शकतो. व्यक्ती चित्रण कौशल्याने व प्रभावी रीतीने केले, तर ते वाचकांचे अवधान निरंतर आकृष्ट करुन घेते. पण केवळ गुंतागुंतीने कथानक असलेली एखादी चटकदार कादंबरी स्वभाव लेखनातून दिसून येते. स्वभाव दर्शन घडविताना व्यक्तीची मानवता व तिचे स्वतंत्र वैशिष्टय या दोन्ही गोष्टी दिसून आल्या की, ते स्वभावदर्शन यशस्वी होते, असे चित्रण आशा बगे यांच्या कादंबऱ्यामधून परिणामकारक पात्र चित्रण आढळून येते.

अलीकडे कादंबरीच्या तंत्रात झालेल्या अनेक बदलामुळे कथानकापेक्षा मानवी मनाच्या अंतरंगाला स्पर्श करुन लिहिण्याचे आणि स्वभाव वैशिष्टयातून

कथानकाचे धागे उलगडत जायचे व त्या अनुषंगाने मग निवेदनाची बाजू मांडणे याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच कादंबरीचे यश त्या पात्राच्या स्वभाव चित्रणावरुन ठरविता येते. अर्थातच, त्या कादंबरीचे यशापयश ठरवायला अशी व्यक्तिचित्रणे मदत करतात. या पार्श्वभूमीवर विचार करता आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणे प्रभावी ठरतात.

**४.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा -**

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री ही पुरोगामी विचारांची असूनही वेळप्रसंगी मात्र ती संस्काराच्या आणि संस्कृतीच्या विश्वात रममाण होते. पण तिचा आत्मशोध हा मात्र कादंबरी महत्त्वाची वाटते. 'भूमी' कादंबरीतील 'मैथिली' ही या कादंबरीची नायिका आहे. मैथिली ही 'भूमी' या कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्यामुळे तिच्याभोवतीच कादंबरीचे सर्व कथानाक फिरताना दिसते. रंजनप्रधान कादंबऱ्यामधून वाचकांना त्यातील नायक, नायिकेचे जे रुप आकर्षून घेत असते, तेच रुप या कादंबरीतील नायिकेला म्हणजे मैथिलीला लाभलेले आहे. या कादंबरीत एका पोरक्या मुलीचा जीवनप्रवास आहे. पोरकी असली तरीसुध्दा ती बुध्दिमान व धाडसी आहे. समज आल्यानंतर स्वतःचे निर्णय स्वतः घेणारी व ते पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करणारी एक स्वाभिमानी, मनस्वी, सुंदर, सुसंस्कृत, परंपरा व आधुनिकता यांचा मेळ साधणारी, त्यांचे जतन करणारी व स्वतःचा मार्ग स्वतः शोधून त्यावर मार्गक्रमण करणारी अशी मैथिलीची व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये लेखिकेने सशक्तपणे साकारलेली आहे.

मैथिली या नावामागे काहीतरी पुराणकालीन संदर्भ दिसून येतो. रामायणातील रामची पत्नी सीता हिचे 'मैथिली' हे नाव असल्याचे दिसते. वाल्मिकी ऋषींच्या पुरुषी दृष्टिकोनातून सीतेच्या वाटयाला आलेल्या शारीरिक तसेच मानसिक वेदनांमुळे पुराणकाळापासून हे नाव स्त्री जातीच्या वाटयाला येणाऱ्या अनेक समस्यांचे, अन्यायाचे, अगतिकतेचे आणि असाहाय्यतेचे प्रतीक बनले आहे व त्यांना न्याय देण्यासाठी जणू लेखिकेने हा पौराणिक विषय घेऊन

तिला पुरुषी वर्चस्वातून कसे रेखाटले गेले आहे, हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.

मैथिली ही आपल्या 'स्व' सामर्थ्यावर स्वतःसाठी स्वतःची भूमी निर्माण करणारी स्त्री आहे. खरे पाहता, रामायणातील रामपत्नी असलेल्या मैथिलीशी म्हणजे सीतेशी या मैथिलीचा काहीही संबंध दिसत नाही. या कादंबरीमध्ये मैथिली तमिळ असल्याचे दर्शविले आहे आणि तिचे वडील मात्र मराठी असल्याचे दाखविल्याने ती धड ना इकडची ना धड तिकडची अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे तिचे पोरकेपण अधिकच गडद होत गेलेले दिसते.

"हॉस्पिटलमध्ये सगळे मैथिलीकडे पाहत होते, सिस्टर, नर्स, वार्डबॉय मैथिलीला पाहून रडायला लागले, जानकीआंटीनं तिला जवळ घेतलं, तरीही ती रडली नाही. घराशेजारच्या कोणीतरी टिपेतला सूर लावला तरीही ती शांत राहिली."[३] यामधून तिची मानसिकता व धाडसी वृत्ती दिसून येते. आई तमिळ असल्याने आणि तिची मानसिकता आईशी न जुळल्याने तिने न पाहिलेल्या वडिलांबद्दल इतरांकडून जे ऐकले त्यातून तिची वडिलांविषयीची उत्सुकता वाढत जाते.

मैथिली आईच्या मृत्युनंतर आत्याकडे शिक्षणासाठी मुंबईला आली. शिक्षण घेत असताना मैथिलीला वाचनाची आवड लागली. त्याविषयी लेखिका म्हणते की, "या दोन महिन्यात मैथिली जणू एकदम प्रगल्भ झाली. जे वाचलं त्यावर लिहावं, मग आणखी काही सुचत राहायचंच पण हे सुचणं मात्र वेगळं, तो प्रकाश जिथून येत होता तो ते सगळं नवं होतं तिला."[४] "मला तर वाटतं कीर्ती, आपण सगळे त्यावेळी घाबरट, भ्याड होतो. स्वतःला हवं होत ते केलं नाही. कुठली रिस्क नाही. एकटा चेतनच."[५] मैथिलीच्या वाचनातून प्रगल्भ होत जाणारा विचार आणि त्यातून काही नवीन सुचणे व तेच लिहिणे त्यालाच वेगळे वळण देताना दिसते. यातूनच मैथिलीला आपल्या कमीपणाची जाणीव होते.

आयुष्यात जगताना कोणत्या गोष्टींना मुकावे लागते याची खंत ती मैत्रिणीजवळ व्यक्त करते.

स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येणाऱ्या मैथिलीच्या जीवनात तिच्या वाटयाला कुटुंबात दुःखच दुःख आलेले दिसते व ते दुःख पचवून ती नव्या उमेदीने जगते. आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी स्वतःच्या भावनांचा त्याग करते. परंपरेने चालत आलेली कुटुंबव्यवस्था सांभाळताना दिसते. कादंबरीच्या शेवटी मैथिली ही शंतनूकडे जाते व कादंबरी संपते. परंतु ती नवऱ्याकडे जाते असे दर्शविले असले तरी ती स्वतःसाठीच परतते. तिला शंतनूलाही सोडायचे नाही आणि घरही करायचे नाही, म्हणजे लग्नही करायचे नाही. येथे एका सुसंस्कृत व संयमी स्त्रीचे वर्णन यथार्थपणे केलेले दिसते.

'भूमी' कादंबरीमध्ये 'अम्मा' ही मैथिलीची आई असून ती मूळची तमिळ ख्रिश्चन आहे. मैथिलीचे वडील हिंदू आहे. परंतु तिने लग्नानंतर धर्म बदलला नव्हता. ती मद्रासमधील ख्रिश्चन हॉस्पिटलमध्ये नर्स होती. तिने धर्म बदललेला नसल्यामुळे ती कधीही मंदिरात गेली नाही किंवा देवदर्शनही केले नाही. परंतु चर्चमध्ये मात्र नेहमी कॅण्डल लावत असे. हॉस्पिटलमध्ये असताना अम्मा व मॅथ्युजटीचर यांचे संबंध जुळलेले असतात. त्यांचे दररोज घरी येणे, यामधून मैथिलीच्या बालमनावर त्याचा परिणाम झालेला दिसतो. लेखिकेने कादंबरीमध्ये हे व्यक्तिचित्रण अतिशय विचारपूर्वक रेखाटलेले दिसते. कारण कादंबरीत या व्यक्तिचित्रणात धर्म वेगळा असल्यामुळे निर्माण होणारे अनेक प्रश्न यातून उभे राहताना दिसतात.

'भूमी' कादंबरीमध्ये 'आत्या' ही व्यक्तिरेखा एक महत्त्वाची आहे. कारण मैथिलीच्या वडिलांची बहीण या नात्याने मैथिलीच्या आईच्या मृत्यूनंतर तिला सांभाळणारी व तिला जीवनात यशस्वी होण्यासाठी अतोनात कष्ट सोसून तिला शिकवणारी एक स्वावलंबी स्त्री बनविणारी व मैथिलीच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका आत्याची व्यक्तिरेखा वैशिष्टयपूर्ण आहे. मैथिलीला एक सबला स्त्री

बनविण्यात आत्याचा मोलाचा वाटा आहे. या कादंबरीमध्ये आत्याची भूमिका ही एका सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रीची जशी असावी तशी आहे. आपण स्वतः त्रास सोसून इतरांत आपले सुख पाहणारी अशी वैचारिक परंपरेची तसेच पतिव्रत्याचे पालन करणारी अशी व्यक्तिरेखा आहे. बालपणापासून शेवटपर्यंत दुसऱ्यासाठी जगणारी आत्या मैथिलीचा जास्त विचार करते. तिचे सुख जणू आपलेच सुख मानत हा जिव्हाळा तिच्या रक्ताच्या नातेसंबंधातून निर्माण झालेला दिसतो. मैथिलीची आई गेल्यापासून कधीही पोरकेपणाची जाणीव होऊ दिली नाही. आईच्या मायेने तिने मैथिलीला सांभाळले तिचा आधार म्हणून ती मैथिलीच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. ते घरातील माणसाचा विरोध पत्कारुनच. या व्यक्तिरेखाबद्दल अरुंधती वैद्य म्हणतात की, "आयुष्याच्या उताराला लागलेल्या खूप सोसलेल्या स्त्रियांचे प्रातिनिधीक रुप या व्यक्तिरेखेचे लाभले आहे त्यामुळे व्यक्तिरेखा वाचकांच्या मनावर काही काळ तरी रेंगाळताना दिसते."[६]

'भूमी' कादंबरीमधील बीना ही व्यक्तिरेखा मैथिलीच्या आत्याची मुलगी आहे. ती मैथिलीला शक्य तेथे मदत करताना दिसते. जणू तिच्याजवळ असलेल्या परस्पर सहकार्याच्या भावनेतूनच तिला मदत करत असते. हा वारसा जणू तिच्या आईकडूनच आलेला दिसतो. संसारिक जबाबदारी सांभाळून नोकरी करणारी बीना ही एक आत्मविश्वासू स्त्री आहे. हे सर्व करत असतानाच मैथिलीला येणाऱ्या अडचणीतून ती मार्ग काढते. यातच त्यांचे स्वभाव एकमकांशी जुळतात व दोघींमध्ये मैत्रीची व्यक्तिरेखा प्रभावीपण रेखाटलेली आहे.

कीर्ती जोशी ही मैथिलीची कॉलेजमधील मैत्रीण. या दोघींनी मिळून शेक्सपिअरच्या हॅम्लेट' या नाटकाचा प्रयोग केला होता व यातूनच त्यांची मैत्री दृढ होत गेली. त्यांच्या नाटकाचा ग्रुपही मोठा होता. त्यांच्या नाटकाच्या तालमी चेतनच्या घरी चालत असत. या दरम्यान कीर्तीचे लग्न होते व काही वर्षांनी

नवरा-बायकोमध्ये मतभेद निर्माण होतात. त्यामुळे ती आई-वडिलांच्या घरी येते व आपले अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभी राहते.

आजच्या तरुण पिढीची प्रतिनिधी असलेली कीर्ती पुढे जाऊन असेही म्हणते की, "अजून आमचे लीगल सेपरेशन झालं नाही. त्यांना हवं असेल तर देईन मी!"[७] यातून एका आधुनिक स्त्रीचे स्वतःचे निर्णय स्वतः घेणाऱ्या व स्वतः नोकरी करुन आपले जीवन स्वतंत्रपणे जगण्याचे आत्मभान प्राप्त झालेल्या स्त्रीची व्यक्तिरेखा लेखिकेने रेखाटली आहे.

'भूमी' कादंबरीमधील 'वसुधा' ही प्रो. देवस्थळींची पत्नी आहे. प्रो. देवस्थळींचे निधन झाल्यामुळे त्या एकटया पडलेल्या दिसतात. मुलगा नोकरीसाठी बाहेरगावी असतो. त्यामुळे घरामध्ये एकटेपणामुळे थकवा जाणवत असल्याने घरकामासाठी त्या एका बाईच्या शोधात असतात. देवस्थळीबाईंचा जीवनामध्ये एकटेपणामुळे निराशा, त्यांचा स्वभाव चिडका होत जातो व मनावरील ताणही वाढत जातो. त्या मन रमविण्यासाठी ड्रिंकही घेतात. ही निराशा त्यांना जवळचे असे कोणी नसल्यामुळे येत असते. अशा परिस्थितीत मैथिली त्यांना जवळची वाटते व त्या आपल्या मनातील दांडेकरसाहेबांबरोबर असलेल्या संबंधाविषयी सांगतात, "दांडेकरसाहेब आणि मी आम्ही या सगळ्यांतून जाताना फार जवळ आलो. साधं जवळचे, स्नेहाचं नातं बदलून वेगळ्या तऱ्हेनं जवळ आलो. दांडेकर साधा नव्हता. त्यांनी सगळी किंमत पुरेपूर वसूलही केली. मैथिली, तू तर लहान आहेस. तुला कळणार नाही पण आपल्या काही गरजेनं जेव्हा आपण एखाद्या पुरुषाला जवळ करतो नं, तेव्हा आपल्याला त्याची विपरीतच किंमत मोजावी लागते."[८] यातून स्त्रीमनाचे सूक्ष्म चित्रण केलेले दिसते. एका तापट स्वभावाच्या आपले जीवन मुक्तपणे जगणाऱ्या दुसऱ्याबद्दल जराही कणव नसलेल्या, संसारामध्ये रस नसलेल्या अशा एका मनस्वी व स्वाभिमानी स्त्रीचे चित्रण लेखिकेने या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून केलेले आहे.

सुभद्रा जोशी ही बेंगलोर विद्यापीठामध्ये इंग्रजी विषयाची प्राध्यापिका आहे. मैथिलीची मुलाखत तिनेच घेतली. तेव्हापासून दोघींची मैत्री जमली होती व पुढे जास्त दृढ होत जाताना दिसते. तिचे व मैथिलीचे निकटचे नाते निर्माण होते. आपल्या मनातील गोष्टी त्या एकमेकींना सांगतात. ती मैथिलीला डॉ. सुधीर निरंजनविषयी सांगते. मी त्या लग्नाला कशा प्रकारे तयार झाले होते. आमच्यामध्ये किती जवळीक निर्माण झाली होती. एकमेकांना होणारे स्पर्श, चुकून, जाणूनबुजून पण त्यातही एक तुटलेपणा हे सर्व होत असताना आम्ही कसे दूर झालो हे सर्व तिने मैथिलीला सांगितले. नंतर त्यांनीच लग्नाचा घेतलेला निर्णय कसा रद्द केला यातून तिने आपले अंतर्मनच उलगडून दाखविले एकमेकांबद्दल असलेली सहानुभूती दाखविणाऱ्या वेळप्रसंगी मदतीसाठी धावून जाणाऱ्या व आधार देणाऱ्या अशा एका स्त्रीचे वर्णन कांदबरीमध्ये केलेले आहे.

'भूमी' कादंबरीमध्ये 'लली' या व्यक्तिरेखेचे वर्णन लेखिकेने थोडक्यात केलेले आहे. "दार उघडलं. समोर बारा-तेरा वर्षाची मुलगी. ती सुरेखच होती, पण प्रथम रुप नजरेला येऊच नये, अशी कारण ते मोठाले काळे डोळे विलक्षण रिते होते. त्यात समज नव्हती पण वडील आल्याचं तिला कळलं, त्याचा आनंद मात्र त्या रित्या डोळ्यांत उमटला. तिच्या हातापायाच्या तश्या काड्याच होत्या. त्यामनानं डोकं बेडब मोठं होतं. मान अशी हनुवटीला चिकटलेली होती. ती कमालीची अशक्त होती."[९] यातून ललीचे चित्र वाचकांपुढे हुबेहूबपणे उभे करण्याचा लेखिकेने प्रयत्न केलेला आहे.

डॉ. सुधीर निरंजन यांची लली ही अपंग मुलगी आहे. तिच्या देखभालीसाठी एक बाई ठेवली आहे. ललीचे हदय कमजोर होते, परंतु तिच्यावर कोणताच उपचार केला नव्हता. तिला गाणी ऐकण्याची, विशेषतः पावसाची, मुलांची, विविध रंगांची पुस्तके पाहण्याची आवड होती. मैथिलीला तिच्याविषयी जिव्हाळा वाटत असे, तिला जवळ घेऊन गोष्टी सांगणे, तिच्या आवडीचे चित्र

दाखविणे, गच्चीवरुन सूर्य दाखविणे, रात्रीच्या चांदण्या दाखविणे, यातून दोघींमधील जवळीक वाढत गेली. ललीच्या मृत्युसमयी दर्शनाला मुलगा होतो. येथे कोणचे जाणे दाखविले तर कुणाचे येणे. जणू एकाच्या मृत्युतून दुसऱ्याचा जन्मच होत आहे, असे लेखिकेने ललीचे रेखचित्रण रेखाटलेले आहे.

कादंबरीतील डॉ. सुधीर निरंजनची आई 'भूमी' व्यक्तिरेखा एक घरंदाज स्त्री म्हणून वाचकांपुढे येते. एकत्र कुटुंबपध्दतीमध्ये एक मोठा आधार असलेली ही स्त्री आहे. सर्वांची आवडनिवड जपणारी, सर्वांचे स्वभाव समजून घेणारी व कुणावरही न रागवता त्यांच्यासाठी सतत कार्यमग्न असलेली एक स्त्री येथे प्रत्ययास येते. "टणक शरीर! लोखंडाच्या कांबीसारखं! नखात रोग नाही. नजर लख्ख, चष्मासुध्दा आता लागला. बहुतेक काळेच केस, एखादा दुसरा पांढरा पट्टा. आयुष्याशी टक्कर देता देता जगणं एका व्रतासारखं झालेलं."[१०] डॉ सुधीर निरंजनच्या आईला पाहिल्यावर आत्याने त्यांच्याकडे येणाऱ्या बँकेतील एका बाईविषयी सांगितले होते, तीच बाई मैथिलीला आठवली.

सण, उत्सव, लग्नकार्य या सर्व गोष्टी परंपरेने करणारी व त्यांचे जतन करणारी, मंदिरात जाऊन पूजा करणारी, अशी एक स्त्री येथे साकारलेली दिसते आयुष्यभर आईला मुलांची काळजी असते. ती आपल्या जीवात जीव असेपर्यंत फक्त त्यांचा विचार करते. या कादंबरीमध्ये डॉ. सुधीर निरंजन यांना सुखी ठेवण्यासाठी ती कष्ट करत असलेली दिसते. येथे जणू ती मैथिलीला आपली सून म्हणूनच माहीत असते. मैथिलीविषयी त्यांना जिव्हाळा वाटत असतो. अशा प्रकारे एका घरंदाज स्त्रीचे व्यक्तिचित्रण या कादंबरीत रेखाटलेले दिसते.

मिसेस धर्मराजन ही शंतनू व मैथिली यांची मद्रासमधील घरमालकीण आहे. लेखिकेने या व्यक्तिरेखेच्या रुपाचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे की, "त्यांनी गजरा माळला होता. गळ्यात सोन्याची चैन होती, काठपदराची साडी आणि ब्लाऊज. घरातही त्या नीटनेटकं नटूनथटून होत्या. कानांत कुड्या, हातात बांगड्या अशी पूर्ण सौभाग्यलंकारांनी नटलेली ठसठशीत स्त्री मैथिलीनं इथंच

प्रथम पाहिली आणि त्याचं सगळं अस्तित्वच त्यांच्या या सौभाग्यखुणांशी जोडलेलं होते. या खुणाचे स्वामी होते त्यांचे पती धर्मराजन."[११] अशा स्त्रीचे चित्र लेखिकेने या कादंबरीमध्ये साकारले आहे. मिसेस धर्मराजन यांनी सर्व आयुष्य संसारासाठी आणि पती धर्मराजनसाठी वाहिलेले दिसते. एका जबाबदार स्त्रीची, संसाराविषयी आपुलकी असणारी व सर्व नितीनियमांचे पालन करुन पतिव्रत्य सांभाळणारी एक स्त्री ही व्यक्तिरेखा उठून दिसते. त्यामुळेच या व्यक्तिरेखेला कादंबरीमध्ये एक वेगळं स्थान निर्माण झालेले दिसते.

वासुकी ही एक पूर्णतः संसारामध्ये गुंतलेली स्त्री आहे. तिने जणू आपले सर्वस्वच त्यात वाहून घेतलेले दिसते. अगदी स्वयंपाकापासून ते घरातील व बाहेरील सर्व कामामध्ये ती समरस होऊन जाताना दिसते. तिचा स्वभाव भाबडा असलेला असतो. वासुकीकडे पाहून मैथिलीच्या मनामध्ये विचार आला की, शंतनूला जर अशी संसारात रमणारी मुलगी मिळाली असती तर? हा प्रश्न तिच्या मनात चमकून जातो. कादंबरीमध्ये वासुकीची ओळख लेखिकेने मोजक्या शब्दात करुन दिलेली आहे." घरमालकीण वासुकी म्हणून एक तमिळ बाई होती. बाई कसली, मुलगीच! तिचा नवरा दुबईला होता. मुलांना आणि सासूला घेऊन ती इथं राहत होती. वासुकी हे पुराण काळातल्या नागजमातीतीलच  होती हे ही तिला सांगून टाकण्याइतपत ओळख मग मैथिलीनच वाढविली."[१२] अशा वासुकीला मैथिली ही तमिळ असल्याने जवळची वाटली. वासुकी शेजारधर्म चांगला पाळताना दिसते.

वासुकीची व्यक्तिरेखा खूप विचारी आहे. हे तिच्या बोलण्यातून स्पष्ट होते मला तर दोन्ही  ही नाही यातून तिचे माहेर व सासरविषयीचे तिच्या मनातील विचार व्यक्त होतात. कारण तिला दोन्हीही गोष्टी नसतात. याचे कारण तिच सांगते, "कधी वाटतं, नसते पळून गेले तर शिक्षण पुरं होतं. हे शहर असं सुटलं नसतं "[१३] यातून तिची शिक्षणाविषयीची व आपल्या घराविषयीची ओढ दिसून येते.

'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनी ही नायिका आहे. आशा बगे यांनी सौदामिनीची व्यक्तिरेखा ही पारंपरिक व आधुनिक नाही, तर ती दोन्ही ताणांच्यामध्ये ती अडकलेली आहे. या ताणातून बाहेर पडतांना होणाऱ्या मानसिक संघर्षातून सौदामिनीची व्यक्तिरेखा तावून सलाखून निर्णयापर्यंत पोहचते. या क्षणापर्यंत पोहचण्यासाठी तिची होणारी धडपड, तगमग या सर्वांतून जाणाऱ्या सौदामिनीचे दर्शन आशा बगे यांनी घडविलेले आहे. व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने संगीतनिष्ठ संवाद लेखिका रेखाटताना, "मालकस तिच्या मनाच्या पाकळी पाकळीवर शिंपला जातो तर सुरेख षड्ज गात्रागात्रात पेरला जातो."[१४] असे वर्णन करुन ते पात्रच नव्हे, तर वातावरणनिर्मितीही करतात. आपल्या मनाचे खेचणारे लगाम ती फक्त मैफिलीत रंगलेल्या समर्थ सुरांच्याच हाती सोपवू शकते. मधुरमिलनाच्या कल्पनेतही तिला गळाभर सुरांचे पांघरुन घ्यावेसे वाटते. अशा संगीतनिष्ठ भाषेच्या माध्यमातून सौदामिनीचे व्यक्तिचित्रण भावपूर्ण घडविलेले आहे.

आशा बगे यांनी केवळ स्त्रीच्या दु:खाच्या अगतिकतेचेच चित्रण केले नाही, तर पुरुषांच्या मानसिकतेवरही भर देऊन पुरुष पात्रचित्रणही तेवढयाच तटस्थपणे उभे केले आहे. 'मनस्विनी' मध्ये येणारे यशोधन, भाई व अमरेन्द्र ही पात्रे व त्यांचे चित्रणही तेवढेच महत्त्वाचे आहे. मुख्य पात्रांबरोबर इतर पात्रांनाही त्यांनी दिलेले महत्त्व हेच आशा बगे यांच्या पात्रचित्रणाचे वैशिष्टय आहे. त्या संदर्भात सुलभा हेर्लेकर म्हणतात की,' त्यांच्या कादंबरीतील पात्रे ही जीवनानुभवाच्या कॅनव्हासवर एक व्यमिश्र चित्र उमटवून जातात."[१५]

'झुंबर' कादंबरीतील वसुमती ही स्त्री नायिका आहे. वसुमतीच्या व्यक्तिचित्रणात स्त्री म्हणूनही ती उत्कृष्ट चिंतन करताना दिसते. आपले प्रेम, पत्नीपण आणि आईपण विसरुन जाणे सोपे नाही. तिला वाटते,"कदाचित आपण आज एका निश्चित रेषेशी येऊन थांबलो आहेत का? रात्री बंड करुन उठणारं शरीर, टाळता न आलेली स्वतः च्या संरक्षणाची भावना, सगळ्यांची

स्वतःपुढे मांडलेली समर्थनं हे सगळे पार करुन या दोन महिन्यांत आपण एका ठिकाणी येऊन पोचलो आहेत का? ऋषिकेश म्हणाले होते. ते स्वतः लाच तोंड देणं जमलं आहे का ते आपल्याला? राघवाला हवा तसा निःसंदिगध होकार आपल्याजवळ नाहीच. पण राघव, आयुष्यात इतकं मुरुन गेल्यावर कोर करकरीत असं काही नसतंच. ते तुला समजेल?"[१६] आशा बगे यांनी वसुमतीच्या रुपाने आधुनिक स्त्रीचे चित्रण रेखाटलेले आहे आपल्याला या परिस्थितीत सर्वांनी समजून घ्यावे, असे वसुमतीला वाटते. तिला सतत वाटत राहते की, ही सगळी भोवतालची माणसे आपल्या आयुष्याशी इमान राखून आहेत, पण आपल्याला मात्र आयुष्यात हे कधीच समजले नाही, याची खंत या नायिकेला आहे.

आई म्हणून विचार करताना या स्त्रीच्या मनात अनेक हलक्या भावना निर्माण होतात.स्वतःच्या चिमुकल्या मुलाकडे बघून तिला विचार पडतो. आपल्या या घरातून असे जाण्याचा याच्यावर काही विपरीत परिणाम तर होणार नाही ना? स्वतःला कौटुंबिक जबाबदारीत बांधून घेणारी व त्यातून मोकळे होताना तिला होणाऱ्या त्रासाचे चित्र रेखाटून एक वेगळी स्त्री आशा बगे त्यांच्या लेखनांतून वाचकांसमोर मांडतात.

'झुंबर' या कादंबरीत वसुमतीची जीवनदृष्टी साकारताना त्या म्हणतात, "आपलं पूर्वीचं आयुष्य मागेच ठेवून आपण जात आहोत. आपल्याला हवं होतं तसं, साध सोपं, सरळ, आयुष्य कदाचित आता शक्य आहे,"[१७] लेखिकेला वाटते की, देखावे, शोभेच्या वस्तू म्हणजे झुंबरे व ही झुंबरे विझल्याशिवाय नवा स्वीकार अशक्य. बाईचे सुख मिरविणाऱ्या बाह्य गोष्टींना लेखिका झुंबर मानते आहे. आई म्हणून त्याग, सून म्हणून समर्पण अशी झुंबरे स्त्री जीवनात खूप टांगलेली आहेत व परंपरेने हे सर्व स्त्रीच्या वाटयाला आले आहे. हे मानवी जीवनातील स्त्री वास्तव लेखिकेने वाचकांपुढे मांडलेले आहे.

आशा बगे यांच्या स्त्री चित्रणाची एक विशिष्ट कला आहे व ती या कादंबरीतही दिसून येते. वसुमतीने केलेला डॉ. राघवचा स्वीकार, तिच्यामध्ये होणारा सद्विवेकबुध्दीचा संघर्ष व शेवटी राघवकडे जातांना आदित्यला मी सोबत नेऊ का म्हणून सासऱ्यांना विचारणारी वसुमती, शेवटी मात्र आदित्यही ऋषिकेशच होणार. त्याच्यामध्ये आपला रंग अवशेष म्हणूनही उरणार नाही. या वास्तवाची तिला होणारी जाण व हे सारे डॉ. अधिकारी व वसुमती यांचे तुटत गेलेल्या संबंधाचे दर्शनच घडविते व यातूनच पुढे राघवकडे जाण्याचा निर्णय व डॉ. अधिकारींचा मृत्यु हे सर्व आशा बगे अतिशय कौशल्याने हाताळतात. आशा बगेंच्या स्त्री पात्रांविषयी बोलतांना डॉ. श्रीनिवास सिरास म्हणतात, इतर कादंबरीकार  हे स्त्री व पुरुष यांच्यामधले संबंध रंगवितांना त्यात नैतिकतेला विशेष वाव देत नाहीत, तर या उलट आशा बगे आपले स्त्री पात्र विशिष्ट नैतिकतेच्या भक्कम पायावर उभारुन त्या स्त्री चित्रणाला एक बहुमान मिळवून देतात. स्त्रीची ही स्वतःच्या (Superego) वृत्तीशी चालणारी झुंज आपोआपच पुरुष पात्र परिणामकारक करुन जाते व यासाठी त्यांना कुठेही तांत्रिक मार्ग अवलंबावे लागत नाही.

सुरुवातीची वसुमती ही स्वतंत्र वृत्तीची स्वतःचा मार्ग स्वतः शोधणारी, स्वतःपुरती विचार करणारी हट्टी, धीट अशी असूनही नंतर मात्र ती पारंपरिक स्त्रीप्रमाणे डॉ. अधिकारीकडूनही अपेक्षा करते. डॉ. अधिकारींच्या आजारपणात पारंपरिक पत्नीप्रमाणे त्यांना जपते, सांभाळते व शेवटी त्यांच्याच शब्दाला मान देऊन डॉ. राघवशी पुनर्विवाहही करते व डॉ. अधिकारींच्या मृत्युनंतर त्याच्यावर छापलेल्या अग्रलेखात आपला पुसटसा उल्लेखही नाही, पत्नी म्हणून तर नाहीच पण विद्यार्थिनी म्हणूनही आपले स्थान त्याच्या जीवनात नव्हतेच, याची जाणीव तिला त्या क्षणी होते व तिचा स्वाभिमान दुखावला जातो.

आशा सावदेकर या दोन्ही कादंबऱ्यांतील नायिकाविषयी म्हणतात, "दोन्ही कहाण्या या स्त्रीच्या तगमगीच्या-तडफडीच्या असून 'मनस्विनी' मध्ये

चौकट तोडायची नाही तरीही जगत राहायचे म्हणून तडफड तर 'झुंबर' मध्ये हवे ते लाभूनही देहभोगाला शरण जाऊन मनाविरुध्द होणारी वाटचाल म्हणून तडफड, दोहोंत सूक्ष्म फरक, पती आहे म्हणून प्रेम न स्वीकारणे आणि पती असूनही त्याच्यांच इच्छेखातर मनात नसतांना कुठेतरी दूर जावे लागणे, अशा या दोन तऱ्हा दोन्हीमध्ये घडामोड, तोडमोड, अटळ आणि न सोसवणारी, सांगताही येऊ नये अशी हळुवार आणि सांगितली तर कळू नये इतकी तरल!"[१८] आशा बगेंनी स्त्रियांच्या विविधांगी जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या अनेक प्रश्नांच्या वाटा शोधणारी त्यांची दृष्टी ही खरी महत्त्वाची ठरते. स्त्री जीवनातील अनेकविध व्यथा व संवेदना त्यांनी मांडलेल्या आहेत.

'सेतू'मधील सुचरिता ही इम्युनॉलॉजीमध्ये डॉक्टरेट झालेली आहे. ब्रिजमोहनशी ती प्रेमविवाह करते. पण सुचरिताचे घराणे व ब्रिजमोहनचे घराणे यांच्यातील सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण व त्यातून निर्माण होणारे ताणतणाव, ब्रिजमोहनची भारतात परतण्याची ओढ व सुचरिताला अमेरिकेतच राहण्याची तीव्र इच्छा, यातून दोघांमधले संबध अजूनच ताणले जातात. सुचरिताच्या आत्मकेंद्रित स्वभावामुळे ती ब्रिजमोहनला समजून घेऊ शकत नाही. या मानसिक संघर्षातूनच कादंबरीतील सुचरिताची व्यक्तिरेखा लेखिकेने साकारली आहे.

कादंबरीच्या सुरुवातीला भेटणारी नायिका सुचरिता ही प्रौढा आहे. दुःखभोग भोगून, अमेरिकेतील संपन्न जीवन आणि संशोधनाच्या वाटा न्याहाळून सासरच्या गावी येतांना तिला अनेक प्रश्न पडताहेत. मुलगा पिलानीला लेक्चरर तर नवरा ब्रिजमोहन दिल्लीला मनोरुग्णालयात आहे. आपण इतके जवळ असतानाही ब्रिजमोहन एकटा का पडला? आपण त्याचे एकटेपण तोलू शकलो नाही का? दीर्घ अशा एकत्र आयुष्यात खूप मिळते पण खूपसे निसटून जाते, हे सुचरिताला कळते आहे, ते का आणि कसे निसटते याचा शोध घेत ती स्वतःच्या मुळापर्यंत जाते. या प्रवासातच तिला कळते की ब्रिजमोहनला खूप

छोट्या छोट्या गोष्टी हव्या होत्या. पण आपणच त्या नाकारल्या, त्याची माणसेही नाकारली, त्यामुळे ब्रिजमोहन आणि सुचरिता यांच्यातील एकएकटेपणा वाढत गेलेला दिसून येतो.

'त्रिदल' या कादंबरीत शारदा आणि मंजू दोघीही होस्टेलमध्ये राहतात. पण आई नसल्याने, काकू जवळची न वाटल्याने शारदा हट्टी , हेकेखोर होत जाते. मंजूसारखी तिला घराची ओढ वाटत नाही. मंजू, आईवडील, भाऊ व दिनूमामा यांच्यात बुडालेली असते. पुढे संसारातही सर्वात मिसळून जाते. 'सेतू' मधल्या ब्रिजमोहनचा जीव कुटुंबासाठी तळमळतो, आपले घर सावरावं, दुरुस्त करावे, असे त्याला वाटते. सुचरिताचे कुटुंब दुभंगलेले असते. वडील इतिहासाच्या अभ्यासात, विश्लेषणात बडून असतात. आई, दूरच्या गावी राहून शाळेला वाहून घेते. त्यांच्यातल्या अदृश्य दुराव्याचा, वडिलांच्या अलिप्ततेचा परिणाम सुचरिताच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला दिसतो. तीही कोरडी अलिप्त स्वतःच्या विषयाला महत्त्व देणारी आहे.

'भूमी' मधल्या मैथिलीला कुटुंबच नसते. ती आत्याकडे वाढते पण आत्याचे कुटुंब तिला आपले वाटत नाही. तिथे ती उपरीच असते. शंतनूचेही कुटुंब विखुरलेले आणि आई-वडील परस्परांपासून मनाने दूर. त्यालाही मग पुढे मैथिलीशी जिव्हाळ्याचे नाते तयार करता येत नाही. त्याचा संसार त्यामुळे सुकत जातो. मैथिली, शंतनू, अंशुमन यांचे कुटुंब तयार होऊ शकत नाही. याउलट सुधीरला आई-वडील आजी, बहीण, भाची, मुलगी असा गोतावळा असतो. त्या कुटुंबातल्या एकमेकांविषयीचा जिव्हाळा मैथिली जवळून पाहते.

'सेतू' कादंबरीतील सुचरिता ही ब्रिजमोहनची पत्नी आहे. ब्रिजमोहन हा ग्रामीण भागातील असल्यामुळे सुचरिता कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीशी जुळवून घेत नाही. "मावशी, माझ्या खाण्यापिण्याची काळजी करतेस, त्यापेक्षा माझ्या मनाची काळजी वाहिली असतीस तर..."[१९] सुचरिताला तिची मावशी जबाबदारीची जाणीव करुन देते. "तेवढं सामर्थ्य नाही माझं, तेवढी कुवत नाही,

आणि ती कुमुदमध्येही नव्हती."[२०] सुचरिताला आईची आठवण करुन जीवनातील लहान-मोठया गोष्टीची जाणीव करुन दिली जाते. सुचरिताला त्यामुळे एकदम आईचे डोके आठवले. त्यात सतत एक अस्वस्थता, एक शोध होता. काहीतरी करण्याची धडपड होती. ती आयुष्यात कधी पाच मिनिटे स्वतःसाठी विचार करत बसली नाही. त्यांची दृष्टी फक्त स्वतःच्या मार्गावर केद्रिंत, त्या मार्गाच्या यशापयशावर नाही, हे स्पष्टपणे लेखिकेने मांडलेले आहे.

सुचरिताचे वडील लग्नासाठी राघवेंद्र मूर्तीबद्दल विचारताना पण सुचरिता स्वतः निवडलेल्या ब्रिजमोहनशी ती लग्न करते. उदित हा त्यांचा मुलगा त्यांच्याबरोबर असतो. सुचरिता तिचे विचार त्यांच्यावर रुजविण्याचा प्रयत्न करते, पण उदित मनाने ब्रिजमोहनची जवळीक साधतो. "तुला आठवतो का, मोहन? इथं सुरुवातीला आलो तेव्हा तू होमसिक झालास की आपण इथं येऊन बसत होतो.!"[२१] या संवादातून निसर्गाशी असलेले जवळीचे नाते लेखिकेन मांडलेले आहे."मला तो इथं कायम राहयला नको. माझा उदित, त्याला मला मोठं करायचं आहे. मला सुमंगलची भीती वाटते. त्याचा बेबंदपणा मानवत नाही. त्याच्या डोक्यातच एक आग आहे. ते सगळे माझ्या मुलाच्या वाट्याला यायला नको आहे मोहन."[२२] मुलाबद्दल बेदरकारपणे वागणे येथे चित्रित केलेले आहे. सुचरिताला नृत्याची आवड आहे. हा गुण तिच्याकडे तिच्या आईकडून आलेला आहे.

कादंबरी हा वाङ्मयप्रकारच विशाल आणि सखोल जीवनपटाची मागणी करणारा आहे, पात्रे कमी किंवा जास्त यापेक्षा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती व्यमिश्र आहे, हे कादंबरीत महत्त्वाचे असते. त्यात अनुभवाचे फक्त यथातथ्य रुप असते तर त्या अनुभवरुपाला अनेक परिमाणे असू शकतात. महाकाव्यासारखा विस्तीर्ण जाणारा हा वाङ्मयप्रकार असून निसर्ग, काळ, समाज आणि संस्कृती अशामधून व्यक्ती आणि व्यक्तीपलीकडचे जग न्याहाळीत असतो. त्यामुळे बहुविधतेकडे जाण्याची मुभा कादंबरीकाराला

असते. व्यक्तिगत जीवनाशी न बांधल्या गेलेल्या कोणत्याही वास्तवाचे कोणतेही रुप चितारण्याचे सामर्थ्य त्या वाङ्मय प्रकारात उपजत असते. कादंबरीच्या स्वरुपाविषयी उषा हस्तक म्हणतात, " कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रुप आहे. तिला किमान लांबी तरी हवीच. त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. यात कथनकाला किंवा निवेदनाला महत्त्व असते. कादंबरीने व्यापलेल्या विषयांची वर्गवारी निश्चित करता येत नाही. तिला मानवी जीवनव्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरुपात घडविता येते. घटना, व्यक्ती वातावरण इ. घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय व्यमिश्र रुपांचे दर्शन तिला घडविता येते."[२३]

अर्पिता ही ब्रिजमोहनची बहीण आहे. कथानकाला साजेशी अशी भूमिका लेखिकेने मांडलेली आहे. अर्पिताचा विवाह झालेला असून, तिला शिक्षणाची आवड आहे. ती पुढे शिक्षण चालूच ठेवते. "मला नं भैय्या, भाभीचा प्रबंध वाचायचा होता. तिचा विषय मला इंटरेस्टिंग वाटतो! तिनं तिकडेही या संदर्भात खूप काम केलं नं? पण भाभी तेंव्हा आपल्या घराला बुजलीच खूप. मात्र, तू तिला तिकडून इकडे आणायला नको होतं."[२४] अर्पिता ब्रिजला आपल्या वहिणीबद्दल बोलत होती. कारण सुचरिताचा आपल्या घरावरचा राग अजून गेलेला दिसत नव्हता. भाभीचा खूप राग आहे नं आपल्या घरावर! राग करण्याइतकी ती आपल्या घराचा माणसांचा विचार करत नाही.तिनं त्यांना मनातून पार काढून टाकलं आहे. अर्पिताचा काहीही संवाद नसता तिला समजून घेऊ पाहते. ब्रिजभैय्याला अर्पिता म्हणते, जीजाजींनी दुसर लग्न केलं आहे. अर्पिता घर सोडून ब्रिजमोहनकडे दिल्लीला येते. भाभीच्या मदतीने ती बी.एड्. करते व अर्पिता स्वतःच्या पायावर उभी राहण्याचा प्रयत्न करते.

"काय बोलायचं होतं, भाभी? तू बोलत होतीस ते मला पटत होतं, मला नं आमचं बनारसचं घर गाडीच्या डब्यासारखं वाटायचं. ओळीनं तीन खोल्या

होत्या म्हणून, तर प्रवासात लोकांचा जितका एकमेकांशी सहवास आणि संवाद असतो तितकाच घरातल्या लोकांचा होता म्हणून. आज मात्र आपण सगळीच गाडीच्या कंपार्टमेटमध्ये राहतो आहेत. अस वाटंत गाडी मोठी म्हणून कंपार्टमेंटही मोठं, एवढाच फरक असेल. ब्रिजभैय्याची ही अवस्था त्यातूनच तर नेमकं?"[२५] लेखिकेने कुटुंबातील एकमेकांविषयी असलेला जिव्हाळा मांडलेला आहे. सौंदर्याचे दर्शन घडवून जीवननिष्ठा वाढीस लावणे आणि असुंदराचे दर्शन घडवून मानवाचे अपूर्णत्व दृष्टीस आणणे हेच कलेचे एकमेव कार्य आशा बगे यांच्या लेखनातून दिसून येते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीला केंद्रस्थानी कल्पून तिच्या प्रीतीच्या सफलतेची वा विफलतेची किंवा विवाहबाहय संबंधाची कहाणी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून रंगविलेली. वस्तूतून स्त्रीला देह आहे, तसे तिला मनही आहे, ती माणूस आहे, या नवीन जाणिवेतून आपल्याला जिवंत अनुभवांचे दर्शन लेखिकेने केलेले आहे. आजच्या स्त्रीवादी कादंबऱ्यांत लेखक व लेखिका आपल्या अवती भोवती जे घडते आहे, ते त्या आपल्या गुंतागुंतीच्या समस्या वाटतात. त्यांचे भान स्त्रीनं तसे चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून केले पाहिजे, स्त्रीला समाजात विकासाची संधी मिळाली असली तरी आजही ती असुरक्षित आहे. माणस म्हणून नाकारलेले हक्क मिळण्यासाठी तिचा लढा चालू आहे पण चूल आणि मूल, अर्धाजन इत्यादी अनेक जबाबदाऱ्यांनी तिचा कोंडमाराच वाढला आहे. या परिस्थितीची जाणीव आजच्या स्त्री कादंबरीकाराने ठेवणे आवश्यक आहे. आपल्या जगण्यातला अर्थ शोधण्यासाठी स्त्रियांनी कादंबरी लेखन करुन नवीन आशयाच्या कादंबऱ्या निर्माण करुन मरगळलेल्या मराठी कादंबरीला आशयाची नवी दिशा देण्याची गरज निर्माण झाली आहे.

'सेतू' कादंबरीतील अर्पिता ही सर्वांना समजून घेऊन प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रसंगी समजावून घेते इतकं वरवरचं काही नसतं याची सुरुवातही खूप आधीपासून केव्हा तरी झालेली असणार, माणसांना एकमेकांशी जोडून ठेवणारे एकमेकांपर्यंत पोचता येणारे पूल हळूहळू केंव्हातरी मोडून पडले.

सुचरिताचा आत्मशोध हाच 'सेतू' चा गाभा आहे. याच कादंबरीतील अर्पिता ही ब्रिजमोहनची बहीण म्हणजे नव्या माणूसपणाचे कोवळे अंकुर म्हणून या कादंबरीत वावरते. तिच्या विचाराला एक प्रकारच्या क्रांतीची झालर आहे.

'मृच्छकटिका'त अर्पिताला वेश्येच्या प्रेमाचा सन्मान ही सामाजिक क्रांती दिसते. तर या कादंबरीतील ब्रिजची आई, भाभी नीरजा या प्रवाहपतित अशा गतानुगतिक स्त्रिया आहेत. सुचरिताची आई आणि ती स्वतःच्या व्यापक भूमिकांमधील बुध्दिजीवी पण अहंकारची टोळे न तुटलेल्या स्त्रिया आहेत व असे दर्शन फक्त नवेजुने ताण दर्शवित नाही तर नवे उभारण्याची हिम्मत देते. अर्पिता या पात्राविषयी बोलतांना डॉ. आशा सावदेकर म्हणतात," अर्पिता ही किलकिल्या दारातून पाहत स्वयंभू होणाऱ्या ज्ञानलालसेची मूर्ती आहे. सुमंगल आणि अर्पिता या अंधाऱ्या चंगळवादी पैशामागे धावणाऱ्या जगातील आत्मशोधाच्या वाटा आहेत. त्यांच्या मनात धगधगता जाळ आहे, अर्पिताही सगळे जुने टाकून नव्या वाटेवर धैर्याने पावले टाकते."[२६]

प्राचीन काळापासून स्त्रियांच्या वेदना मराठी साहित्यातून व्यक्त होत आहेत. लोकगीते, लोककथा, ओव्या, म्हणी, उखाणे, लोककला यातूनही व्यक्त होताना दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांची पूजा मानली, पण तिच्या जिवंत जाणिवा समजून घेतल्या नाहीत. कुटुंबातील तिचे दुय्यम स्थान राहिले. कुलशीलाच्या मर्यादांनी ती अधिकच मूक झाली. गृहदेवता, अनंत काळाची माता, अशा विशेषांनानी ती बांधली गेली. ही निसर्गतःच नाजूक, गोड, लाजरी मर्यादाशील असते, असे मानले गेले. स्त्रियांनीही हेच वैशिष्टय गृहीत धरुन स्वतःचा स्वभाव बनविला, खरेतर शरीर आणि गुणांशी संबंध नाही. यातूनच स्त्रीची वागण्याची, बोलण्याची पध्दत जन्माला आली, तिच्या मुखातून येणारी भाषा, गीते हे सारे वैशिष्टयपूर्ण घडत गेलेले दिसते.

आशा बगे यांच्या लेखनात स्त्रियांच्या नव्हे, तर एकंदरीत स्त्रियांच्या आत्मपर लेखनात उजवे ठरावे असे समाज आणि साहित्य या दोन्ही स्तरावर ते

वरच्या पायरींवर जाते. एखादी जिद्दी स्त्री आपल्या वाटयाला आलेल्या प्रत्यक्षकारी व संघर्षमय जीवनातून शिक्षणाच्या साहय्याने स्वतःआवर्ताबाहेर पडता पडता आपल्या समाजावर ही किती चांगल्या पध्दतीने संस्कार करु शकते, याचे हे लक्षणीय उदाहरण आहे."आज सोमवार आहे. तुला माहीतच आहे, सोमवारी मी न्हात नाही."[२७] कधी यामधून शारदा आणि मंजू या रुढी, परंपराच कथा जपत आहे याचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

पारंपरिक स्त्री बरोबरच आधुनिक स्त्रीची मनोवस्था आशा बगे यांनी आपल्या लेखन कौशल्याने अतिशय उत्कृष्ट रीतीने साकारलेली आहे. आशा बगे यांची 'स्त्री' सुध्दा 'व्यक्ती' म्हणून जगण्याचा प्रयत्न करते. पण असे जगतांना वाटयाला येणाऱ्या संघर्षाला सामोरे जातांना तिचे मनःसामर्थ्य जागृत होऊन ती आत्मशोधाला सन्मुख होते. त्यामुळे त्यांची ही नायिका संस्कृतीच्या भानातच रमलेली आहे, असे वाटते. असे असले तरी आपल्या स्त्रीत्वाच्या साक्षात्कारातूनच आशा बगे यांनी आपले वेगळेपण उमगू न शकणारी, बंडखोरी करता न येणारी, केली तरी निर्वेधपणे न जगता येणारी, सामान्य असूनही असामान्य माणसाला जण्यासाठी जिवाचा कोट करणारी, पार्थिवाला शरण जाणारी, छोटया छोटया दुःखाने कोलमडणारी, जगता जगता सामान्य व असामान्य होऊ पाहणारी स्त्री व त्यांची व्यक्तिरेखा त्यांच्या कादंबऱ्यांतून जाणवते.

स्वतः बरोबरच प्रत्यक्ष जीवनाच्या प्रांगणातच घेऊन जाते. वाचकांना जीवनदर्शन घडविताना सुखः दुःखांचा स्थायी भाव आपल्या वाटयाला कसे येत राहतात व त्यांच्या मनात स्वतःच्या अवस्थेविषयी, समाज परिस्थितीविषयी, स्वबंधाविषयी प्रश्न उभे राहतात. सारे समजून उमजूनही या प्रश्नांची अवघड उत्तरे त्यांना सांगता येत नाहीत आणि मनाची तगमग वाढतच राहते आणि यातूनच आत्माविष्काराच्या प्रकटीकरणासाठी लेखन करीत असतात.

आशा बगे यांच्या कादंबरीतील स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते

सांगणारी असली तरी बदलत्या समाज वास्तवातील, कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान, मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीवही त्यांच्याजवळ दिसते. म्हणूनच त्यांच्या स्त्री प्रतिमा या व्यक्तित्वसंपन्न आहेत. त्यांना स्वतःची अशी वेगळी जाणीव आहे. त्यांच्याकडे आचार विचारांची क्षमता आहे. ही जाणीव जपण्यासाठी, आपले अस्तित्व जपण्यासाठी बंडखोरी जरी त्या करीत नसल्या तरी रुढी नीति नियमांच्या परंपरेच्या विरोधी जाण्याचीही त्यांची तयारी आहे. अशा स्त्रीयांचे चित्रण आशा बगे आपल्या कादंबरीतून घडविताना दिसतात.

'झुंबर' या कादंबरीतील वसुमती हट्टी आहे. पण आत्मभानाने तिचे मार्ग उजळलेले आहेत. तिची स्वतःच्या वृत्तीशी चालणारी झुंज लेखिका एका विशिष्ट शैलीतून व्यक्त करते. आशा बगे यांच्या स्त्री पात्र चित्रणाची एक विशिष्ट कला आहे. 'झुंबर' मध्ये वसुमतीने केलेला डॉ. राघवचा स्वीकार, तिच्यामध्ये होणारा सद्सद्विवेक बुध्दीचा संघर्ष व शेवटी राघवकडे जाताना आदित्यला मी सोबत नेऊ का? म्हणून सासऱ्यांना विचारणारी वसुमती व शेवटी मात्र आदित्यही ऋषिकेशच बनणार, त्यामध्ये आपला रंग अवशेष म्हणूनही उरणार नाही, या वास्तवाची तिला होणारी जाण हे सारे तिला डॉ. अधिकारीच्या ओढीतूनच प्रकट होते.

आशा बगे यांनी आपल्या कादंबरीतून स्त्री-पुरुष संबंध रंगविताना आपले स्त्री पात्र हे विशिष्ट नैतिकतेच्या भक्कम पायावर उभारुन त्या पात्राला एक विशिष्ट रुप मिळवून देतात. हे त्यांचे पात्रचित्रणातील वेगळेपण आशा बगे यांनी मांडलेले आहे. वसुमती, डॉ अधिकारी व राघवेंद्र मूर्ती यांच्या वर्णनातूनही पात्रचित्रण करताना ती पात्रे जणूकाही आपल्या डोळ्यासमोर उभी आहेत असा आभास त्या निर्माण करतात. डॉ. अधिकारींचे वर्णन करताना लेखिका लिहिते,"कलावंतासारख्या निमुळत्या बोटाचे, गोरेपान, उंच काहीसे धिप्पाड वाटणारे पिंगट तपकिरी डोळ्यांचे धारदार नाकाचे, चेहऱ्यावर बुध्दीचे विलक्षण

तेज असलेले डॉ. अधिकारी म्हणजे आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्वच जणू."[२८] यातून डॉ. अधिकारी जणू काही आपल्या बघण्यातील कुणी व्यक्ती असावी, असा समज वाचकाचा होतो. हेच आशा बगेंच्या व्यक्तिचित्रणाचे वैशिष्टय आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रणाच्या संदर्भात डॉ. उषा देशमुख म्हणतात, "आशा बगे यांची आपल्या लेखनाकडे बघण्याची दृष्टी ही श्रेष्ठ कलावंताची असल्यामुळे निवेदनापेक्षा हळुवार चित्रणाला आणि भव्यदिव्यतेपेक्षा उत्कट भावपूर्ण प्रसंगातून व्यक्तिरेखा जिवंत करण्यात आशा बगे यांची किमया आहे."[२९]

कोणत्याही साहित्यात विशेषत कथात्मक साहित्यात व्यक्तिचित्रणाला फार महत्त्व असते कारण शेवटी कोणतीही कथा ही व्यक्तिगत कथा असते. व्यक्तीशिवाय कथा निर्माण होऊ शकत नाही. कादंबरीत व्यक्तीची अथवा व्यक्तींची कथा गुंफलेली असते. व त्यामुळे व्यक्तिचित्रणाला कादंबरीत फार मोठे स्थान आहे. डॉ. पु.ग सहस्त्रबुध्दे व्यक्तीचित्रणाबद्दल म्हणतात, "सामान्य अनुवंश, परिस्थिती संस्कार आणि विचार हे मनुष्य स्वभावाचे घटक आहे, अशा स्वभावाचे चित्रण करणे म्हणजेच व्यक्तिदर्शन होय."[३०]

'भूमी' कादंबरीमध्ये लेखिकेने शंतनूचे व्यक्तिचित्रण अतिशय थोडक्या शब्दांत उभे केले आहे. शंतनू हा मैथिलीचा पती आहे. "उंच पण जरा स्थूलही, सावळा रंग प्रोफेसरांचा पण फीचर्स बाईचेच कदाचित. डोळ्यांत एक पिंगट झाक आणि बराचसा निर्विकार चेहरा, आता डोक्याला थोडं टक्कल, समोरुन सगळे केस मागंच जमा झालेले."[३१] येथे या व्यक्तिचित्रणाचे वर्णन लेखिकेने अतिशय समर्पकपणे केलेले आहे. एक स्त्री असूनही पुरुषांची संवेदनशीलता त्यांचे आचार-विचार तसेच त्यांचे अनुभव माहीत करुन त्यातून नवे अनुभवविश्व निर्माण करण्यात लेखिकेने कसब पणाला लावलेली दिसते. याचे प्रत्यंतर कादंबरी वाचताना येते. तसेच दुसरे उदाहरण म्हणजे, "कामाच्या नवीन पध्दती तडफ, जिद्द, महत्त्वकांक्षा वगैरे गोष्टी शंतनूकरिता खूप दूरच्या होऊन

गेलेल्या. कंपनीचा जुना ढाचाच शंतनूला ठीक होता. येणारा बदल त्याला पचणारा नव्हता. हे नवं जग त्या जगात स्वतःला फिट बसवतील असं त्याचं होतं. शंतनूला त्यात आता जागा नव्हती."[३२] शंतनू आधुनिक रुपात नवीन काम स्वीकारताना दिसत नाही.

"तू कॉलेजमध्ये शिकवतेस, गोष्टी लिहितेस, त्याचे अनुवाद प्रसिध्द करतेस. तुला जे जे हवं आहे ते ते तू करु शकतेस. तुला मित्र-मैत्रिणी आहेत. प्रोफेसर आहेत. मी हे सगळं काहीही करु शकत नाही. मला जे सांगायचं आहे ते मी अंशुमनला सांगू शकतो. ते आज त्याला समजत नाही, पण उद्या समजेलही."[३३] लेखिका एक स्त्री असूनही पुरुषांची संवेदनशीलता त्यांची विचारसरणी व अनुभवसरणी आपलीशी करुन, त्यातून नवे अनुभवविश्व साकार करण्याचे लेखिकेचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

लेखिकेने एका अतिसामान्य पुरुषाच्या वाट्याला मैथिलीसारखी तडफदार, बुध्दिमान, निर्भय, मनस्वी आणि स्वयंसिध्द स्त्री म्हणून आली की, पुरुष म्हणून त्याच्या अहंभावाचा होणारा कोंडमारा, त्याची ईर्षा तसेच जीवनाच्या गतीबरोबर मेळ साधता न आल्याने त्याची होणारी दमछाक दिसून येते. "माझ्या घरी राहण्याची तू काळजी करु नकोस, मला सवय झाली आहे. तू घरी असली म्हणजेच आजकाल एक दडपण येतं माझ्यावर, नसलीस की मला जरा मोकळं वाटतं."[३४] मनाचे अनेक पैलू त्यांच्यावर कुठेही अन्याय न होऊ देता शब्दांच्या साहाय्याने प्रकाशात आणण्याचे आव्हान लेखिकेने समर्थपणे पेललेले दिसून येते. लेखिकेची लेखणी स्त्रीच्या दुःखाच्या, अगतिकतेच्या पात्राबरोबरच पुरुषांच्या मानसिकतेवरही भर देताना दिसून येते.

कादंबरीमधील हे व्यक्तिचित्रण वेगळ्या प्रवृत्तीचे दाखविले आहे. कारण यामुळे कादंबरीत नायिकेच्या जीवनात अनेक अडथळे येतात. मैथिलीच्या शाळेमध्ये ते गणित विषय शिकवत असत. त्यांचे आणि मैथिलीच्या अम्माचे घरोब्याचे संबंध दिसून येतात. "टिचर येऊ देत, मी दुसऱ्या खोलीत बसेन,

समुद्रावर खूप एकटं वाटतं, सगळी मुलं परततात. मला येताही येत नाही. तुमचं दार बंद असतं."[३५] यातून अम्मा आणि टीचर अंकल यांच्यातील असणारे संबंध जास्तच पक्के होताना दिसतात. तसेच मैथिलीला त्यांच्याविषयी असणारा तिरस्कार जास्तच वाढत जातो, हे दिसून येते.

'मनस्विनी' या कादंबरीतील दमयंती ही अशीच विलक्षण सामर्थ्यवान आणि शांत आहे. तिचे वर्णन करतांना निवेदिका लिहिते, काही माणसचं अशी असतात की त्यांचा कुठलाच अट्टहास नसतो. मागणं नसतं, पाण्यानं मिसळून दुसऱ्याचाही रंग चटकन घ्यावा तसे समोर वाढून येईल. त्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे घेत राहतात. तरीही ती माणसं वगळली जाऊ शकत नाहीत. आपला तोल पुनः पहिल्यापासून तपासून पाहायला लावतात ही माणसं, अशी ही दमयंती'. दमयंती ही नायिकेची मोठी बहीण, पण ती साधी सरळ व व्यवहारी बाई आहे. सौदामिनी अगदी तिच्या उलट. पण दमयंतीत असलेले वेगळेच अबोल मूक सामर्थ्यही लेखिकेला या ठिकाणी महत्त्वाचे वाटते. पत्नी, प्रेयसी, मैत्रीण या नात्यांपेक्षा तिला आईचे नाते जपावेसे वाटते आणि तिला त्यातूनच तिच्या जीवनाची वेगळी वाट गवसते.

'मनस्विनी' कादंबरीतील सौदामिनी ही आईविना वाढलेली. अत्यंत हुशार व संवेदनाक्षम मनाची ही मनस्विनी नायिका दमयंती व भाई यांचेशी तिचे रक्ताचे नाते, पण त्याहून अधिक आईपणाचं! भाईच्या गाण्याच्या विश्वात रमलेली ही सौदामिनी ! एका क्षणी अमरेंद्रसारख्या देखण्या, बिझनेस करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी विवाहबध्द होते. त्याला नाकारण्याचं कुठलेच कारण तिला दिसत नाही. पण हळूहळू सतत दौऱ्यावर लांब राहणाऱ्या अमरेंद्रच्या मनाची खोली तिच्या लक्षातच येत नाही. एकटेपणा वाटयाला आल्यामुळे संगीताच्या आवडीमुळे यशोधन तिच्या जीवनात प्रवेशतो व येथूनच या नायिकेच्या मनाची तडफड सुरु होते. कारण यशोधनची मैत्री हवी असतानाच, त्याच्याविषयी आकर्षण वाढत असतानाच, दुसरे मन अमरविषयी तडफडत असते. ही मनाची

उलघाल, असवलेपण आणि स्त्री म्हणून परपुरुषांशी संबंध ठेवण्याबाबत आलेले बंधन हे सौदामिनीच्या रुपाने आशा बगेंनी रेखाटले आहे.

व्यक्ति दर्शनाच्या दृष्टीनेही लेखिकेला संगीतनिष्ठ भाषा महत्त्वाची वाटते. सुरामधले बुडलेपण, भिजलेपण, अनावरपणे झेलणारी ही सौदामिनी मालकंस तिच्या मनाच्या पाकळी पाकळीवर शिंपला जातो, तर सुरेख षड्ज गात्रागात्रात पेरला जातो. आपल्या मनाचे खेचणारे लगाम ती फक्त 'मैफिलीत रंगलेल्या समर्थ सुरांच्याच हाती' सोपवू शकते. मधुर मिलनाच्या कल्पनेतही 'सुरांचं बुडलेपण' तिला 'गळाभर पांघरुन' घ्यावसं वाटते. पण तसे घडत नाही.

काही ठिकाणी तर संगीताचीच भाषा स्वीकारुन अनुभव मांडला जातो. उदा. "भाई गातायत या पहाटे तर स्वतःलाच एक स्थिर षड्ज लाभल्यागत वाटतयं.'[३६] आशा बगे यांना संगीतविषयक असलेली आवड त्यांच्या लेखनातील पात्रचित्रणतून दिसून येते. "पाकळीन पाकळी मिटायला लागली. त्या रसील्या मारुबिहागाचे ते सूर कुठे तरी घरंगळत गेलं.. एक न रंगलेली मैफिल दडवून ठेऊन सौदामिनीचा दिवस उभा होत होता."[३७] संगीताचा वापर करुनच त्या सौदामिनीची कासाविशी स्पष्ट करतात. कादंबरीच्या शेवटीपर्यंत या संगीताचा दरवळ जाणवतो.

आशा बगे आपल्या कादंबरीचा शेवट पूर्णविरामात्मक करीत नाहीत तसा तो त्यांच्या कुठल्याच कादंबरीचा नाही. केवळ पारंपरिक स्त्री म्हणून लेखिका इथे थांबत नाही. पारंपरिकतेपाशी सौदामिनीचे बळ ओसरत नाही. ज्या संगीतलुब्ध मनामुळे ती या अनावर धारेत सापडते. त्याच अनावर धारेने तिला हे शेवटचे बळ दिलेले आहे. पण तिची तडफड संपली नाही, संपणारही नाही.

आशा बगे यांच्या चित्रकलेतील पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीतील वातावरणाचे कार्य आहे. चित्रातील पार्श्वभूमीने त्या चित्रातील देखाव्यात, निसर्गवर्णन,स्थलवर्णन,पात्रांचे स्वभाव रेखाटन, मनोविश्लेषण नात्यानात्यातील संघर्ष, सामाजिक जाणीव व विविध प्रतिमा यांना एक प्रकारचा उठावच मिळतो.

इतकेच नव्हे तर त्या चित्रातील विशिष्ट प्रसंगाचे खरे मर्म कळण्यात जशी मदत होते, तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यात फार मदत करते. सृष्टीतील एखादा सुंदर देखावा चित्रित करीत असताना त्या देखाव्याची निसर्गातील पार्श्वभूमी ही त्या चित्राचाच विषय घेऊन चित्रामध्ये पृष्ठभूमीच्या ठिकाणी यावी त्याप्रमाणे ऐतिहासिक किंवा कित्येकदा सामाजिक कादंबऱ्यांत कथानकाइतकेच महत्त्व प्राप्त होते. "असं कसं?' पॉदेचरीचा समुद्र अरविंदाश्रमासारखाच संथ, शांत होता. आश्रमात आणि समुद्राच्या काठी अतिशय शांत वाटलं. आणि लगेच दुसऱ्या दिवशी महाबलिपूरमचा समुद्र पाहिला. तो अतिशय भयाण वाटला."[३८] "उगाच उभी होते, तुमच्याकडे वारं काय सुरेख येतं! कानाशी नुसतं घोंघावतं आहे. मघा मी गच्चीवर गेले होते, तर वाऱ्यानं अक्षरशः मागं फेकली जात होते. झाड सुध्दा नुसती अंगात आल्यासारखी सळसळत होती. इथली सकाळ फारच आवडली हं मला!"[३९] निसर्ग व व्यक्ती यांचा असणारा जिव्हाळा येथे व्यक्त केला आहे. 'सेतू' कादंबरीत बनारसजवळच्या गंगा नदीचे वर्णन, "बघा, एका बाजूला किनारा, किनाऱ्यावर घर, पहाडावर उंच घर आणि एका बाजूला गंगाजी, बनारसइतकी, गंगाजी गावाला लगटून कुठचं नाही. पाहण्याची गंगा बघ. विस्तीर्ण पलिकडचा तीर प्रयासानचं दिसतो."[४०] निसर्गाचे वर्णन लेखिकेने मार्मिकपणे केलेले दिसून येते.

'त्रिदल' या कादंबरीत मंजू, शारदा, श्रीनिवास या पात्रांबरोबर नर्मदा नदी ही सुध्दा या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे. कादंबरीत या नर्मदा नदीने वातावरणनिर्मिती करुन जणू काही तो परिसरच आपल्या डोळ्यापुढे उभा केला आहे. शारदेच्या काकू शारदेला लग्नानंतर"आंदणात घेऊन जा नर्मदेला"असे थट्टेने म्हणतात. शारदा आणि नर्मदा नदी यांचा असलेला अतुट संबंध यातून दिसून येतो. कादंबरीत योग्य ते वातावरण निर्माण करण्यावर लेखकांना भर द्यावा लागतो. यावर कादंबरीकाराचे यश अवलंबून असते. कादंबरीतील स्थळविषयक किंवा भौगोलिक वातावरणाकडे वळते, याचा सर्वात परिचित

प्रकार म्हणजे भौगोलिक व प्राकृतिक वर्णन हा होय. मानवी भावभावनांची द्वंद्वे व समरप्रसंग चालली असताना संवादी किंवा विशिष्ट पार्श्वभूमी म्हणून निसर्गाची वर्णने देण्याचा ग्रंथकाचा परिचय असतो. यामुळे त्या मानवी चित्रणाला फार चांगला उठाव मिळतो. प्रसंगानुरुप प्राकृतिक वर्णन करुन त्या प्रदेशातील स्थळाचे असे हुबेहूब वर्णन करण्याची ही किमया लेखिकेच्या कादंबऱ्यांत वाचल्यानंतर दिसून येते.

'भूमी' कादंबरीमध्ये मिलिंद जोशी यांची व्यक्तिरेखा तो मैथिलीच्या मैत्रिणीचा कीर्तीचा भाऊ आहे. कीर्ती, मैथिली, चेतन या सर्वांचा नाटकाचा ग्रुप असतो व त्यांच्या तालमीही होत असतात. त्यातून नाटकाबद्दल असलेले वेडेपण समजते. मिलिंद ही उच्चशिक्षित असून तो टाटा युनिव्हर्सिटीमध्ये नोकरी करत असतो. मैथिली व कीर्तीचे नाटक पाहिल्यावर त्याला मैथिली आवडते. यातूनच त्यांचे प्रेमसंबंध जुळू लागतात. परंतु त्याच्या घरच्यांच्या विचारामुळे, म्हणजे मैथिलीचा धर्म वेगळा असल्याने त्याच्या घरचे तिला नाकारतात. "रायगडाचा राजा आज तुझ्याशी पुन्हा लग्न करीत आहे. मस्तकावरुन सुटणाऱ्या या थेबांची बिनसरांची मुडांवळ तुझ्या कपाळी शोभते आहे. समोर संध्याकाळचा होम पेटला आहे. तुफान दरियात मरणाचा नेम नसल्यामुळे काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या काळात आहे. त्यातील लगीनमाळ करुन डोंगरलाटेच्या बोहल्यावर रायगडाचा राजा मनाच्या मुक्या मंत्राने तुलसी तुझ्याशी लग्न लावीत आहे."[४१] या संवादातून लेखिकेने प्रतीकात्मक पध्दतीनेच लग्नासंबंधी विचार मांडलेला दिसतो. या व्यक्तिचित्रणातून आजच्या मध्यमवर्गीय समाजामध्ये जाती-धर्मांना अजूनही किती स्थान आहे व त्याची पाळेमुळे समाजामध्ये किती खोलवर गेलेली आहेत, याचे चित्रण अचूकपणे लेखिकेने केलेले दिसते.

'भूमी' कादंबरीमधील चेतन राजवंशी नाटयवेडे असे व्यक्तिचित्रण लेखिकेने रेखाटले आहे. त्याने आपले जीवनच जणू नाटकासाठी वाहून घेतलेले

दिसते. मैथिली व कीर्तीचे 'हॅम्लेट' या नाटकाचे प्रयोग पाहून त्यालाही वाटते की, मैथिलीला घेऊन आपणही हॅम्लेट मराठीमध्ये आणावे व त्यासाठी तो प्रयत्नही करतो. परंतु काही कारणांमुळे तिच्यासोबत नाटकाचे प्रयोग होत नाहीत. पण त्याच्या जिद्दी स्वभावामुळे सर्वजण बाजूला गेले तरी आपले नाटकाचे काम तो चालूच ठेवतो आणि एके दिवशी एका चित्रपटाचा निर्माता व दिग्दर्शक होतो. मैथिलीने 'हॅम्लेट' नाटकाचे सादरीकरण केल्यानंतर चेतन म्हणतो, तुमचे इंग्रजी उच्चार एकदम परफेक्ट! ते शेक्सपियरिन जुनं इंग्रजी आणि हे 'कॉश्चूम्स' या काळाचा मस्त फील आला! असे चेतन म्हणाला. या व्यक्तिचित्रणातून लेखिकेची नाटकाविषयी जाणीव दिसून येते.

'भूमी' कादंबरीतील अंशुमन ही व्यक्तिरेखा म्हणजे मैथिली आणि शंतनू यांचा मुलगा आहे. दिसायला डोळ्यामध्ये जरासा मैथिलीसारखा, सुदृढ बांध्याचा व उंच अशी ही व्यक्तिरेखा आहे. अंशुमन म्हणजे सूर्य म्हणूनच मैथिलीने हे नाव ठेवले. असा हा अंशुमन आई-वडिलांमध्ये असलेल्या ताणतणावाच्या वातावरणात हळूहळू मोठा होत जातो. त्यातून त्याला समंजसपणा आलेला दिसतो. "पण त्याला त्यांना बरोबर घेता आलं नाही, अम्मा!"[४२] यातून त्याच्यामध्ये असलेला कमालीचा शहाणपणा दिसून येतो. प्रत्येक पिढीमध्ये निर्माण होणारे बदल व त्यातून येणारे विचार जणू या व्यक्तिरेखेमार्फतच लेखिकेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'भूमी' कादंबरीमध्ये दांडेकरसाहेब हे व्यक्तिचित्रण एका बँकेमधील अधिकाऱ्याचे आहे. दांडेकर व प्रो. देवस्थळींची स्नेहाची मैत्री होती व त्यातून त्यांच्यात घरोब्याचे संबंध कसे निर्माण झाले. ते यावरुन देवस्थळीबाईंच्या या विधानावरुन समजते,"दांडेकर साधा माणूस नव्हता. त्यांनी त्यांची सगळी किंमत पुरेपूर वसूलही केली. मैथिली तू फार लहान आहेस. तुला कळणार नाही. पण आपल्या काही गरजेनं जेव्हा आपण एखादया पुरुषाला जवळ करतो न, तेव्हा आपल्याला त्याची विपरीतच किंमत मोजावी लागते."[४३] यावरुन

दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. लेखिकेने या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून समाजातील अशा प्रवृत्तीच्या लोकांचे चित्रण अत्यंत मार्मिकपणे रेखाटले आहे.

आशा बगे स्त्री व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून विविध मानवी नात्यांचा शोध घेतात. ही नाती स्त्री-पुरुषसंबंधापुरती मर्यादित नाहीत. स्त्री-पुरुषसंबंध त्यांना महत्त्वाचे वाटतात. परंतु केवळ तेवढाच एकेरी धागा त्यांनी हातात घेतलेला नाही. स्त्री-पुरुषसंबंध जीवनाच्या एका टप्प्यावर कुठेतरी सुरु होतात. पण त्या व्यतिरिक्त जीवनात अनेकविध नातीही येतातच. आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ, बहीण, मामा, मावशी, आत्या, मित्र, मैत्रीण, प्रियकर, सहकारी, सासू, सासरे, नणंद, दीर, जाऊ, पुतणे, गुरु, शिष्य, मुलगा, मुलगी आणि नातवंडे अशा गोतावळ्यात आयुष्ये गुंफलेली असतात.

पती-पत्नीच्या नात्यातही अनेक रंग मिसळलेले असतात. या नात्यांचे धागे एकमेकांत विणले जातात. ही नाती आणि त्यांचे एकमेकांत गुंतलेले धागे हा आशा बगे यांच्या जिव्हाळ्याचा आणि आस्थेचा भाग आहे. व्यक्ती या नात्यासह जगत असते. ती नाती कधी तिला नकोही असतात. त्यांचे धागे परस्परांना खेचतात. त्यांच्यातून सुटावेसेही वाटते. ही नाती अवघड, गुंतागुंतीची असू शकतात. ती व्यक्तीला धीर देतात. मानवी नाती व्यक्तीला भावनिक दृष्टया संपन्न करीत जातात. हे भान या सर्व लेखनाची खोली तर दाखवून देतेच; पण लेखिकेची समज आणि प्रगल्भता यांचेही ते निदर्शक आहे.

'भूमी'तल्या शंतनूचे बालपण आई दुसऱ्या पुरुषात गुंतल्याने एकाकी होत जाते. तो आपल्या विद्वान, व्यासंगी वडिलांचा मुलगा बनण्याऐवजी व्यसनांच्या विळख्यात अडकतो. एक वेगळाच माणूस बनून जातो. मैथिलीशी समरस न होऊ शकणारा. उलट पतीच्या निधनानंतर मॅथ्युज अंकलचा आश्रय आईने घेतलेला दिसूनही मैथिली कडवट होत नाही. आईशी मनाने गुंतून राहते. नात्यांचे गणित सगळीकडे सारखेच नसते. ते माणसामाणसांच्या आंतरिक बळावरही अवलंबून असते.

'सेतू' या कादंबरीत 'दादा' म्हणजे डॉ. नियोगी यांचे व्यक्तिमत्त्व हा या कादंबरीचा गाभा आहे, नव्हे ती लेखिकेची दृष्टी आहे. आयुष्य पुष्कळदा गुंतागुंतीचं असतं, होत जातं. तो गुंता आपण सोडवायचा कशाला? तो अनुभवायचा दादांना हेच खरे आयुष्याचे समृध्दपण वाटते. म्हणूनच ते म्हणतात,"नाही, एक माणूस कधी दुसऱ्यासारखा नसतो. प्रत्येक माणसाची त्यांची म्हणून एक वेगळी गोष्ट असते.एक माणूस दुसऱ्या माणसाचं मूल्य कधीही ठरवू शकत नाही. काळच सगळी मूल्य जोखत असतो."[४४]

सुचरिताची आई एक संस्था चालवत होती. ती गेल्यावर तिचा पारंपरिक पध्दतीने चौदावा केला नाही. ते तिचं सारं जगणं तिच्या शाळेतच तिच्या घरात, तिच्या गावात ठेवूनच. तिच्या पाहण्याचा अर्थ समजून ते म्हणाले, "बबीची इच्छा होती, या सगळ्या गोष्टींवर तिची श्रध्दा होती म्हणून.' तिला वाटलं, 'बबीची इच्छा. श्रध्दा' हे असे शब्द दादांच्या तोंडी शोभत नाहीत, दादा बदलत चालले का? आणि तेही बबीमावशीसारख्या सामान्य स्त्रीमुळं? की सतत पडणाऱ्या बारीकशा धारेनं पहाडही खचतो, त्यांचे चिरे निखळतात तसं."[४५]

आशा बगे 'भूमी' कादंबरीत नात्यांचा एक गोफ विणू पाहतात."आयुष्यात काही योग जुळून येतात, काही निसटतात. पण आपलं आयुष्य घडत जातं, ते मात्र निसटलेल्या गोष्टींनीच..."[४६] आत्मशोध हाच या कादंबरीचा गाभा आहे. जीवनाच्या तर्कातीततेचा, आंतरिक एकटेपणाचा, दुसऱ्याशी सूक्ष्मपणाने बांधलेल्या क्षणाचा आणि तुटतांना विदीर्ण होणाऱ्या अंतःकरणाचा विराट प्रत्यय आशा बगे यांनी 'भूमी' या कादंबरीतून घेतलेला आहे.

स्त्री असूनही पुरुषांना समजून घेण्याची लेखिकेची जाण कौतुकास्पदच आहे. पुरुषांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन निकोप आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासात अडसर आणणारे त्यांचे पुरुष पात्र नाही. असामान्य असे त्यांचे पुरुष स्त्रीला सर्व पातळीवर समजून घ्यायचा प्रयत्न करतानाच दिसतात. त्यांच्या स्त्रीची तडफड ही पुरुषांपासून मुक्तीची नाही. कुठलीही स्त्रीवादी भूमिका न

स्वीकारता तिच्या स्वभावाच्या प्रत्येक पैलूला निरखून, आधुनिक आणि परंपरागत जीवनधारेत वाढलेल्या स्त्रीला मुळापासून समजून घेण्याचा, तिच्या मनाला सर्वांगाने न्याहळण्याचा प्रयत्न कलावंत या नात्याने आशा बगे करतात.

ब्रिजमोहनचे बनारसमधील गंगानदीशी असलेले नाते आपणास पहावयास मिळते. "समोर गंगा तीच, तेच जुनं दृश्य, सकाळची वेळ, घाटावरलं उन, घाटाच्या पायऱ्या, किनाऱ्याशी साचलेलं, उघड्या अंगाने मंत्र पुटपुटत लोक उन खात उभे, सर्वत्र घाण, तरीही गंगेचं पाणी ओंजळीत घेताना काही तरी वाटलंच. नावाडी नाव विचारत होते. त्यातली एक घेऊन तो जरा स्वच्छ किनाऱ्याशी गेला. घाटापासून जरा दूर, मध्यावर तीच पहाडावरली दुकानं, डोंगर चढणारी मुलं-शिक्षण सोडून दिलेली. एखादी वेळी आपणही असेच असतो या मुलांसारखे."[४७] नेमके हेच आकर्षण उदितमध्ये आलेले दिसते ते उत्कटपणे जाणवते. तेच त्याच्या अपत्यात उतरलेले पाहून त्याला खरा आनंद होत असतो. पण सुचरिता मात्र उदितला त्या वातावरणात वाढवू शकत नाही. यामुळे ब्रिजमोहन पत्नीपासून व मुलापासून व कुटुंबापासून दूर दूर जातो. आणि त्यातूनच ब्रिजमोहनचे तुटलेपण वाढत वाढत जाते. सुचरिताचे वडील ब्रिजमोहनशी बोलताना म्हणतात, "फार लहान लहानं गोष्टीत माणसांचा अहंकार असतो."[४८] यात सुचरिताचा अहंकार जागा केला जातो. माणसाने लवचिक व्हायला पाहिजे, असे ते मानतात. तेच सुचरिताला जमलेले नाही. दादा उदितकडे त्या दृष्टीने बघतात. अशाच जुन्या नात्याकडे बबीमावशीजवळ उदितला सुचरिता आणत नाही. पण कादंबरीतील शेवटचा प्रत्यय बबीमावशी ती आणि उदित यांच्यातल्या रक्ताच्या नात्याचा आहे.

आशा बगे यांच्या साहित्यात आई-वडील, भावंडे, आजी, आजोबा, हे कुटुंबाचे घटक आहेत. जेंव्हा एकत्र कुटुंबे असतात. तेंव्हाचे, लेखिकेच्या कादंबऱ्यांमध्ये आई किंवा वडील महत्त्वाच्या भूमिका बजावतात. 'मुद्रा'मध्ये आजीच्या हातात सत्ता असते. ती मुलीच्या नवऱ्याला घरातून घालवते. नंतर

परत आणते. पण त्याचा अपमान करीत राहते. आजीचे नातीवर मात्र फार प्रेम असते. 'मुद्रा'तल्या नीरुला तिचे वडील आणि गुरु बाबा तिच्या जीवनाचा कणाच झालेले असतात. 'त्रिदल' मध्ये मंजूची, 'उत्सव'मध्ये सरुची आई, 'भूमी'मधली मैथिलीची आई आणि तिच्या मृत्युनंतर आत्या, 'सेतू'मधले दादा या साऱ्यांचे या नायिकांच्या जीवनाच्या घडणीत फार महत्त्व आहे. 'भूमी' मधला शंतनू पती म्हणून अपयशी ठरतो, पण त्याच्या मुलाचा बाप म्हणून त्याचे जीवन सार्थकी लागते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांत पात्र विरुध्द पात्र असा संघर्ष नसतो. म्हणजेच कोणत्याही एका पात्राचा दुसऱ्या पात्रांशी झगडा नसून त्याचा संघर्ष हा त्याच्या मनाशी त्याच्या स्वतःशी असतो. 'त्रिदल'मध्ये सुध्दा शारदाचा संघर्ष हा तिच्या मनाशी, तिच्या आयुष्याशी आहे. त्यांच्या कादंबरीतून व्यक्ती व्यक्तीचे भिन्न स्वभाव दिसून येतात.

डॉ. राघव निरंजनशी तिचे असलेले मैत्रीचे, स्नेहाचे नाते व त्या नात्याचे विवाहात होणारे रुपांतर, वसुमतीला पेलवत नाही. पण आपल्यालाही राघवची गरज आहे, असे तिला कुठेतरी वाटले. आपल्या मनाला तिला आवरता येत नाही. मोकळे सोडून देता येत नाही आणि पूर्णपणे मनाच्या अधीन होऊन जगणेही कठीण वाटते. डॉ.श्रीनिवास सिरास म्हणतात, "झुंबर मध्ये एक यातना आहे. ही यातना स्त्रीच्या प्रेमाला मिळणारी पुरुषांची प्रतिसाद शून्यता व त्याबद्दल स्त्रीची आपला हक्क न मागण्याची सवय जपणे यामधून जन्म घेते. वसुमती आपल्या प्रेमसंबंधाविषयी स्वतःशी विचार करते. शेवटी सर्व अनुभव, मग तो प्रेमाचा का असेना, ऋषिकेशसारख्या पुरुषप्रमाणे तो अनुभव लखलखत्या झुंबराचा अनुभव ठरतो आणि शेवटी तरी ही झुंबर विझायचीच असतात, हे वसुमंती ओळखते. वसुमतीच्या मनाला होणारी ही जाणीव शोकात्मतेच्या काळापर्यंतच येते, ती शोकात्म होत नाही. मात्र, ही जाणीव अतिशय महत्त्वाची आहे."[४९] "झुंबर' या कादंबरीत महत्त्व आहे व्यक्तीच्या

आंतरिक वास्तवाला, परस्परसंबंधाला त्यामुळे महत्त्व उरते माणसे व त्यांचे परस्परसंबंध आणि भावबंध यांनाच. डॉक्टर म्हणून असणारे ऋषिकेश आणि माणूस म्हणून असणारे ऋषिकेश हे दोघेही ताठ आहेत. पण या ताठ माणसाला एक दिवस स्पायनल कार्डचा टयूमर होतो व पती -पत्नीचे सहजीवन संपुष्टात येते. डॉ. अधिकारी स्वत:भोवती एक वेगळेच वलय निर्माण करात. वसुमतीला वाटते. हा माणूस आपल्या आवाक्यात नाही. शेवटी तर डॉ. अधिकारी तिला म्हणतात, "वसु माणसाला कठीण जातं, ते स्वत:लाच सामोर जाणं बाकी सगळ फार सोप असतं स्वत:चं वेगळे जग उभं कर  माझ्याशिवाय मी नसलेलं वसुमती, तू लग्न कर. एरवी हे तुला फार कठीण जाईल."[५०]

डॉ.अधिकारी वसुमतीला राघवशी विवाह करण्यास सांगतात. वसुमतीचा राघवशी विवाह झाल्यानंतर तिला वाटते, "आतापर्यंत राघवचं नि आपलं एक सुंदर नातं अकस्मित संपलं या नव्या अनोळखी नात्यानं झालेला राघवचा स्पर्श परका वाटला. राघवनं पूर्वी बोलून दाखविलेल्या त्याच्या भावनेचा आपण अव्हेर केला. तेंव्हासुध्दा असा तो परका वाटला नव्हता. आता राघवच्या नि तिच्या नवीन नात्याचा एक पडदा समोर उभा राहिला. वाटलं, आपलं सावलीचं एक दुर्मिळ निवांत ठिकाण आता उरलं नाही."[५१] तसेच "नि:संदिग्ध असं काही श्रेय माणसाला आयुष्यात मिळतं तरी का? आपण सगळी ढकललीच तर जातं आहोत! गरज आधार प्रेम सहानुभूती शब्द अनेक आहेत पण रुप एकत्र."[५२] यामधून वसुमतीचे रुप एकच असून ती आत्मपरीक्षण करताना दिसते.

'भूमी' कादंबरीमधील डॉ. सुधीर निरंजन हे अमेरिकेत स्टॅनफोर्ड विद्यापीठात मानसशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करत व ते काही कारणामुळे बेंगलोर विद्यापीठामध्ये रुजू झाले. त्यांच्या व्याख्यानातून जी गोष्ट चांगली आवडलेली असा वारंवार मन उच्चार करत असतं, ती गोष्ट पुष्कळदा त्याच्यावर लादली गेलेली असते. जी गोष्ट नको नको म्हणून दूर सारलेली असते. मुद्दाम हट्टानं ती मनाच्या एखादया कोपऱ्यात रुतूनच बसते. हे विचार

त्यांनी मांडले. हा विषय आजच्या भारतीय समाजाच्या मानसिकतेतून त्यांनी मांडला आहे. एका सैध्दांतिक स्वरुपात त्यांनी घरात एकत्र कुटुंब पध्दतीत आई, वडील, आजी, मुलगी, भाची  इत्यादी सर्व असतात. त्यांचा स्वभावही शांत व मनमिळावू आहे. त्यांची पत्नी अर्ध्या आयुष्यातच त्यांची साथ सोडून गेलेली असते. त्यामुळे त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला असतो. तो काहीसा कमी करण्यासाठी ते कुटुंबामध्ये वेळ घालवत असतात. मैथिली मित्रत्वाच्या नात्याने त्यांना लग्न करण्याचे सुचवते, परंतु ते त्यास नकार देतात व पुन्हा अमेरिकेस निघून जातात. डॉ. सुधीर निरंजनला मानसशास्त्रीय ज्ञान असलेले दिसून येते.

कुटुंबाशी आणि आईवडिलांशी व्यक्तीच्या असणाऱ्या नात्याचे सूक्ष्म रंग, धागे त्यातील जिव्हाळा, प्रेम, काळजी टिपणारे शेकडो तपशील लेखिका तिच्या कादंबऱ्यांतून भरत जाते. त्यातून त्या नात्यांचे घट्ट पोत कळून येत राहतात. हे तपशील दैनंदिन जीवनातल्या जेवण खाण्याचे, आवडी निवडीचे, मूडस टिपण्याचे असतात. सरु-माधवी या मैत्रिणी, मंजू-श्रीनिवास ही भावंडे, नीरु नि तिच्या अप्पी आणि मन्नू या बहिणी, ही नाती परस्परांवरील प्रेमाचे सूक्ष्म धागे किती घट्ट असतात, किती आधार देणारी असतात ते दाखवतात. कित्येकदा हे प्रेम काळजी, कुटुंबात किंवा नात्यात असणाऱ्या, नसणाऱ्या व्यक्तींकडूनही दिले जाते. ब्रिजमोहन सुचरिताला, राघवेंद्रकडून मैथिलीला सुभद्रेकडून तिच्या प्रोफेसरांकडून असे सौहार्द लाभते. 'मुद्रा'तल्या नीरुला घर मालकिणीकडून व गुरु ललिताकडून आधार मिळतो.

'मनस्विनी' कादंबरीत नात्यांची गुंतागुंत आशा बगे आपल्या समोर मांडतात. त्यात वसुमतीचे सासरे, मुलगा आदित्य, अंजू, राघव हे सगळे तिला स्वत:पेक्षा ताठ वाटतात व आपल्याला मात्र असे ताठपण कधी जमलेच नाही, याची खंत वसुमतीला आहे. आशा बगे यांच्या 'मनस्विनी' आणि 'झुंबर' या दोन्ही कादंबऱ्यांचा प्रवास सारखाच वाटतो. या कादंबऱ्यांविषयी डॉ. आशा सावदेकर म्हणतात, ''पहिलीमध्ये विवाहोत्तर प्रेमाची कहाणी तर दुसरीत

मनासारखा विवाह लाभूनही दुसरी वाट धरण्याची वेळ येते. दोन्ही कहाण्या स्त्रीच्या तगमगीच्या, तडफडीच्या. 'मनस्विनी' मध्ये चौकट तोडायची नाही. तरीही जगत राहायचे म्हणून तडफड, तर 'झुंबर' मध्ये हवे ते लाभूनही देहभोगाला शरण जाऊन मनाविरुध्द होणारी वाटचाल म्हणून तडफड, दोन्हीत सूक्ष्म फरक आहे. पती आहे म्हणून प्रेम न स्वीकारणे आणि पती असूनही त्याच्याच इच्छेखातर मनात नसतांना कुठेतरी दूर जावे लागणे, अशा या दोन तऱ्हा, दोन्हीमध्ये घडमोड, तोडमोड अटळ आणि न सोसावणारी! सांगताही येऊ नये, अशी हळुवार आणि सांगितली तर कळू नये इतकी तरल!"[५३] आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा अंतस्वर आहे तो मानवी एकाकीपणाचा, त्यांच्या पहिल्या कादंबरीत हा एकाकीपणा नाही. किंबहुना त्याची जाणीवही नाही. 'झुंबर'मध्ये तो अंशतः जाणवतो एका बाजूला वसुमती, तर दुसऱ्या बाजूला ऋषिकेश, दोघे एकत्र येऊनही एकाकीच राहतात. आपापल्या विश्वात बुडवून घेतात.

'झुंबर'मधील वसुमती केवळ नैतिकता झुगारण्यासाठी तसे वागत नाही तर तिच्या आत्मपरीक्षणाची वाट कठोर आहे. रात्री बंड करुन उठणारं शरीर तिला नाकारता येत नाही, शोभेच्या वस्तू, झुंबरे विझवल्याशिवाय नवा स्वीकार अशक्य हे तिला कळते. आर्थिक सुबत्ता, प्रेम, त्याग, समर्पण, विश्वास अशा झुंबरापेक्षा तिला आत्मप्रचिती मोलाची वाटते.

'त्रिदल'मधला श्रीनिवास क्रमशः हळूहळू एकटा होत गेला आहे. शारदेला मृत्यु समोर दिसू लागल्यावर ते एकाकीपण जाणवू लागते. आतापर्यंत त्या नात्यांची फारशी पर्वा केली नव्हती. त्यांचे मर्म कळू लागते. या एकाकीपणाची तीक्ष्ण धार जाणवते ती 'सेतू' कादंबरीतील प्रत्येक पात्र एकाकी आहे. ब्रिजमोहनचे त्याच्या खेड्यातल्या माणसांमध्ये गुंतलेले असणे, सुचरिताला समजून घेता येत नाही. त्यांना भेटल्यापासूनच तिने त्यांना मनात शिरुच दिलेले नाही आणि ब्रिज त्यांनाच काय, त्या घराला, त्या गंगेला विसरु शकत नाही.

कोलेरॅडी नदीच्या काठावर उभा असताना त्याच्या मनात गंगा असते. आईच्या हातची तिखट पुरणपोळी, उडदाची कचोरी, तो विसरु शकत नाही, कडव्या सुचरिताने संवेदनक्षम, हळव्या ब्रिजला साथ दिली नाही. एकमेकांत आयुष्य मिसळून देत असतानाही स्वतःला ते नाही म्हणण्याचा अधिकार ती आयुष्यभर गाजवीत राहते. "कमाल आहे! मी तुला बांधून ठेवलं? माझ्या मनात नसताना आपलं सर्व सोडून मी तुझ्यामागं इथं आले आहे, मोहन."[५४] दगडावरच्या रेघेसारखे तिचे हट्ट असतात, ब्रिज तिच्यापासून दुरावतो. याच कादंबरीतली अर्पिता, आपल्या कोणी जवळ नाही आणि कोणाला जवळ नाही अशी आपल्या एकाकीपणाची सोबत घेऊन जगत राहतो. बबी मावशीही एकाकीच आहे. एका मोहाच्या क्षणाने ती साऱ्यांपासून दूर फेकली गेली, आणि सुचरिता जिला आई मानत होती, ती कुमुदही एकाकीच जगली कारण ती शाळा आणि घर यापलीकडे तिने कोणाचाही विचार केलेला दिसत नाही.

'भूमी' कादंबरीत मैथिली ही नायिका एकाकीपणाची व्यक्तिरेखा आहे. तिची आई आणि बहीण मॅथ्युज अंकल दारे बंद करुन सतत घरात असत, तेंव्हा संध्याकाळी ती समुद्रावर बसून वेळ घालवीत असे. तेंव्हाचं पुढे ती आत्याकडे राहते. शंतनूशी लग्नही करते, तरी काळ संपतो पण आपल्याला आपली मनातील माणसे भेटत नाहीत. हा प्रत्यय जसा तिच्या आत्याचा तसाच तिचाही असतो. ती सोबत शोधीत जाते. कालांतराने त्याच्या जीवनात देखील आपले स्थान नाही हे कळल्यावर बाहेर पडते. पुन्हा दुसरे गाव, दुसरी जागा, शेवटी अंशुमन म्हणतो म्हणून ती शंतनूच्या घरी परतते खरी, पण या सबंध प्रवासात आणि आता शेवटी देखील ती एकाकीच आहे.

आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री-पुरुषांचे नाते हा विषय कुतूहलाचा आहे आणि त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमध्ये या नात्यांच्या अनेकविध तऱ्हा दिसून येतात. 'मनस्विनी' मध्ये या नात्याचे जे रुप आहे ते अगदी रोमॅन्टिक आहे. संगीताचा ध्यास असणारी रसिक सौदामिनी लग्नानंतर पदोपदी नाराज होते.

तिच्या संवेदनक्षम मनाला नवऱ्याचे वागणे खटकते, यशोधन, त्याचे सतारवादन, त्याचे हळुवार वागणे, तिच्या मनाला स्पर्श करते, त्याचे व्यक्तिमत्त्व तिला झपाटून टाकते. 'मनस्विनी'त तिच्या मनाची आंदोलने सतत दाखवली आहेत. यशोधन आणि सौदामिनी दोघेही मोह दूर सारतात. अशा चित्रणातून कादंबरी संस्कार करु इच्छिते. सहचराने दोघेही एकमेकांना समजून घेताना दिसतात.

'त्रिदल'मध्ये शारदेला श्रीनिवासच्या रुपाने आपल्याला काय मिळाले ते उमगू शकलेले नाही. श्रीनिवासला मिटवून टाकणारे, त्याचा विरस करणारे असेच तिचे वागणे, बोलणे असते. त्याला अपेक्षित प्रतिसाद कधीही देत नाही. 'सेतू'मधील स्त्री-पुरुष संबंध इतके सरळ नाहीत. केवळ विसंवादच तेथे नाही. त्याहून अधिक खोल चरे आहेत. किंबहुना आई,दादा बबीमावशी, ड्रायव्हर, ब्रिज, सुचरिता, राघवेंद्र, अर्पिता ही सर्वच समीकरणे गूढ आणि अर्तक्य आहेत. सुचरिता करडी, अश्रध्दा आहे. ती आत्मकेंद्रीत महत्त्वाकांक्षी आहे.

'मुद्रा'मधील नीरुलाही आईपेक्षा बाबा जवळचे आहेत. तिचा अधू पाय नीट होण्यासाठी ते प्रयत्न करतात. तिचा गळा हेच तिचे सामर्थ्य आहे. याची जाणीव करुन देतात. तिला संगीताचे उत्तम शिक्षण देतात. घरातून पळून गेलेल्या आपल्या आईवर, तिच्या गुरुवर अपार श्रध्दा ठेवणारे बाबा नीरुच्या मनातही तीच श्रध्दा रुजवतात. ते आपल्या पत्नीलाही कमी लेखत नाही. त्यामुळे नीरुही तिच्या बहिणीप्रमाणेच आईवर प्रेम करते. त्या दोघांना स्वतंत्र वृत्तीने समजून घेते.

'भूमी' मधल्या शंतनू-मैथिलीचे सहजीवन सुरु होण्याच्या आधीपासून मैथिलीला दोघांमधले अंतर जाणवू लागते. नात्याच्या अपरिहार्य जवळीकीतून तिला दिवस जातात. गर्भपात होतो. त्या दिवशी त्याचे तिला अनोळखी असणे तिला प्रखरपणे जाणवते. पुढे अंशुमनचा जन्म होऊनही त्यांच्यात दुरावा वाढत जातो. ती पुढे जात आहे, तिचे यश विस्तारते आहे, असे त्याला वाटते. तिच्या

जगण्यात तो उपरा ठरतो, असे तिला वाटते. तर ती स्वतःच्या पलीकडे कधी काही पाहत नाही, असे त्याला वाटते. तिला न सांगता तो मूल न होण्याचे ऑपरेशन करुन घेतो, 'स्वात्वाचं वार तिच्यातला बदल' त्याला जाणवत राहतो. शंतनू त्यालाच भितो. पती-पत्नीमधला दुरावा, अंतर 'मनस्विनी', 'त्रिदल', 'भूमी', 'सेतू', 'मुद्रा' या सर्व कादंबऱ्यांत आढळते.

आशा बगे यांच्या 'भूमी' व 'मनस्विनी' या कादंबऱ्यांच्या नायिका सौदामिनी व मैथिली यांच्या आयुष्यात दुसरा पुरुष आहे. सुचरिताकडे राघवेंद्र पहिल्या भेटीतच आकर्षित होतो, पण ती अलिप्तच राहते. सरुच्या एकाकी जीवनात विजयाचा आधार असतो. त्यांचे नाते लेखिकेने तसे संदिग्ध ठेवलेले आहे. क्वचित शारीरिक जवळीक व्यक्त होत असली तरी ते स्नेही अधिक आहेत. मैथिलीला संसार, नवरा, मुले आहेत पण आपले आयुष्य आपण केवळ त्यांचा संसार करीत घालवले, स्वतःपासून आपण फार दूर आलो, असे तिला वाटते. त्यांच्या मागणीसाठी स्वतःचे शरीर देण्याचाही तिला उद्वेग येतो. मनात दुसरे पुरुष असले तरी सौदामिनी, मैथिली, सरु त्यांचे शरीर मानसिक ओढीत स्वतःला वाहवू देत नाहीत, असे चित्रण येते. नीरुच्या आयुष्यातला राजेशच्या सहवासातला धुंद क्षण सोडल्यास उत्कट शरीरसंबंधांचे वर्णन त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये नाही. स्त्री-पुरुषामध्ये असणाऱ्या मनाच्या नात्याला त्या अधिक महत्त्व देतात. यशोधन, राघवेंद्र, राघव, विजय, सुधीर, महेंद्र यांनी त्यांच्यावर आपले प्रेम आहे, त्यांनी या स्त्रियांचा आदर केलेला आहे.

मानवी जीवनाच्या आणि संस्कृतीच्या निर्मितीत, संवर्धनात आणि संक्रमणात स्त्री आणि पुरुष यांची समसमान भागीदारी आहे. सर्वच पुरुषप्रधान संस्कृतीत 'स्त्री'ला स्थान दिले असले तरी संस्कृतीच्या निर्मितीतील आणि विकासातील तिचे स्थान नाकारता येणार नाही. सचिव सखी इत्यादी विशेषणांनी ती मांडली गेली आहे. एका बाजूला स्त्रीचा गौरव करीत असतानाच प्रत्येक संस्कृतीने स्त्रीकडे पाहण्याचा एक विवक्षित दृष्टिकोन स्वीकारला आहे.

या दृष्टिकोनामुळे समाजातील तिचे स्थान निश्चित झाले आहे. या कालसापेक्ष, सांस्कृतिक दृष्टिकोनातून विशिष्ट प्रकारचे स्त्री जीवन त्या त्या वेळी साकार होत असते.

पुरुषांच्या बरोबरीने समाजाचा एक घटक म्हणून स्त्री वावरते. पत्नी-माता-भगिनी, भावजय-नणंद, मैत्रिणी आणि समाजाच्या दृष्टीने एक उपभोग्य वस्तू या विविध स्तरावर स्त्री जीवन जगत असते. या विविध स्तरांवर स्त्रीकडून समाज काही आदर्श वर्तनाची अपेक्षा बाळगतो. या अपेक्षांच्या दडपणाखाली तिला जीवन जगावे लागते. काही वेळा अपेक्षापूर्ती होते, तर कधी अपेक्षाभंग! आशा बगेंच्या कादंबऱ्यांमध्ये वैवाहिक संबंध सुखाचे, तृप्तीचे, समाधानी आहेत. असे क्वचितच आढळते. पती-पत्नीचे स्वभाव अगदी परस्परविरुध्द असणे, त्याचे दृष्टिकोन, जगण्याकडे पाहण्याची नजरच वेगळी असणे आणि तरीही 'संसार' धर्म, सुरु ठेवणे अशी चित्रणे येतात.

'आकाश' मधली उर्मिला आणि अंजली यांचे महेश-अशोक बरोबरचे संसार या तडजोडीचे आहे. वसुमती आणि देवकी यांनी घरच्यांचा काहीसा विरोध पत्करुन लग्न केले आहेत, परंतु एकच क्षेत्र असूनही 'झुंबर' मधले ऋषिकेश आणि वसुमती  समरस होऊ शकत नाही. देवकी आणि देवाशिष यांचे स्वभाव वेगवेगळे आहेत. ती निष्णात वकील होती. तो ख्यातिप्राप्त गायक, पण दुरावा एवढा वाढतो की, देवाशीष वेगळा राहू लागतो.या कादंबऱ्यांमध्ये प्रपंचाचा मुले हा अपरिहार्य घटक आहे. 'मनस्विनी' मध्ये सौदामिनी गर्भवती असते. 'झुंबर' मध्ये आदित्य, 'उत्सव' मध्ये माधवीची ऋचा-आशीष, 'त्रिदल' मध्ये अभिजित सोहन, 'सेतू'त उदित, 'भूमी'त अंशुमन, 'मुद्रा'मध्ये नीरु व अम्मी अशी अपत्ये आहेत. शारदा, मैथिली यांना आणखी एक मुलगी हवी आहे. पत्नी म्हणून तोकड्या ठरल्या तरी आईपण त्यांना परिपूर्ण करणारे वाटते. 'लली'ही सुधीरची आणि आपली मुलगी आहे, असे मैथिलीला वाटते. विजयच्या आणि आपल्या मुलाची कल्पना सरुच्या मनात तरळून जाते.

'आकाश'मध्ये अभिव्यक्तिरिक्त उर्मिलेला मुलगी हवी असते आणि अंजली मुलासाठी तडफडत असते.

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असल्याने समाजातील स्त्री जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडणे अपरिहार्य आहे. तत्कालीन साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या स्त्री जीवनाचे दर्शन आपणास द्यावयाचे आहे. समाजाने स्वीकारलेले आदर्श आणि सामाजिक वास्तव या दोन्ही स्तरांवरुन या स्त्री जीवनाचा विचार साहित्यातून दिसून येतो.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्री केंद्रस्थानी असली तरी तिच्या जीवनातल्या पुरुषाचे स्थान दुय्यम वा डावे नाही. भाई, अमरेंन्द्र, यशोधन, ऋषिकेश, राघव, श्रीनिवास, दादा, विजय, राघवेंद्र, चेतन, शंतनू, सुधीर, बाबा, शास्त्रीजी, महेंद्र अशा पात्रांना स्त्रियांच्या बरोबरीने महत्त्व आहे. कारण त्या स्त्रियांच्या जीवनातच त्यांचे महत्त्व आहे. या सर्व पुरुषांनी स्त्रियांच्या आयुष्यात वेगवेगळ्या भूमिका निभावलेल्या आहेत.

या सर्व पुरुष व्यक्तिरेखा आणि त्यांच्यासमोर स्त्री व्यक्तिरेखा यांच्यातले मानसिक, भावनिक ताणतणाव आशा बगे यांनी ताकदीने रंगवलेले आहेत. किंबहुना हे ताण या कादंबरी विश्वातल्या आशयपटातील महत्त्वाचे सूत्र आहे. मानवी मनाच्या गुंतागुंती, स्वभावातील आतर्क्यता, त्यामुळे इतरांची आयुष्य प्रभावित होणे आणि त्यातूनही माणसांनी स्वतःचे मार्ग शोधीत जाणे असा व्यापक जीवनाशय या कादंबऱ्यात उलगडत जातो. स्त्री-पुरुष संबंधात पती-पत्नी हे नाते महत्त्वाचे आहे. या नात्याबाबतच्या कल्पनामुळे स्त्री जीवनाला विशिष्ट स्वरुप लाभते. या स्त्री-पुरुष संबंधातील घटक लक्षात येतात. स्त्रीच्या चारित्र्यात पतिव्रत्य हा अत्यंत महत्त्वाचा निकष पतीला सर्वस्व मानून समर्पण भावाने जीवन जगणारी स्त्री आदर्श होय.

आशा बगे यांच्या साहित्यातून जुनी पिढीच नव्हे, सौदामिनीला ज्याच्याविषयी कमालीचे भावनिक, शारीरिक आकर्षण आहे, तो यशोधन तिला

सावरतो. शरीराच्या ओढीने तिचा पाय घसरु देत नाही. राघवेंद्र ब्रिजमोहनला मैत्रीचा हात देतो. 'उत्सव'मधला विजय नेहमी एक रेघ अलीकडे सतत स्वतःला थांबणाराच असतो. सरु ही त्याला मोहात पाडणारी नाही. असा विश्वास त्याच्या पत्नीला आहे. या स्त्रियांमध्ये असणाऱ्या नैतिक सामर्थ्याच हे पुरुष आदर्श करतात. त्याला पूरक असे वर्णन करतात. मूल्यसंस्कार करण्याची एक वेगळी पध्दती आढळते. देवस्थळी आणि दांडेकरांच्या नात्यांचा शंतनूवर विपरीत परिणाम झाला, हे अप्रत्यक्षपणे दाखवले आहे. हेही मूल्यांचे महत्त्व प्रतिपादन करणे होय. ही नैतिकता केवळ स्त्री-पुरुष संबंधाच्या संदर्भातलीच आहे असे नव्हे. ऋषिकेशने पत्नीला घटस्फोट देऊन तिच्या दुसऱ्या लग्नाचा मार्ग सुचविणे, सौदामिनीच्या संस्कारांवर आपला विश्वास होता, असे सांगत अमरेंन्द्र तिला ॲक्सेप्ट करणे, रतनच्या मृत्युची नैतिक जबाबदारी स्वीकारत डॉक्टर सरुने राजीनामा देणे, माधवीने सर्वस्वाचा त्याग करुन उत्तरायुष्य विवेकानंद केंद्रात व्यतीत करण्याचा निर्णय घेणे, शंतनूकडे परतणे, अशी अनेक उदाहरणे दाखवता येतील. त्यातून काही मानवी मूल्यांचा ठसा उमटत जाताना दिसतो.

## ४.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमधील मूल्यात्मकता व संस्कृतीचे दर्शन -

स्त्री संस्कृतीचा विचार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस उदयाला आला. तंत्रज्ञानाच्या भरभराटीने बाजूला पडत गेलेल्या मानव्य विचारांच्या एकाकीपणातून निर्माण झाला. तंत्रज्ञानाचा विचार विज्ञानातून पोसल्या जाणाऱ्या विस्मय कुतूहल, कल्पनाशक्ती यांना ताब्यात घेऊन सत्तेचे हिंस्त्र आविष्कार रचण्यात जसजसा होऊ लागला, तसतसे ओसाड होत चाललेले मानवी अंतर्मन मानवी अनुभवानांच साक्षी ठेवत त्यांच्याकडे बघू लागले. हे बकालतेचे अनुभव समृध्द मानवतेशी जोडायचे प्रयत्न करणे म्हणजे संस्कृतीला केंद्रस्थानी आणणे, असे आधुनिकता वादाने सांगितले. संस्कृती म्हणजे सभ्यता, सहकार, परस्पर देवाण घेवाणीतून मानवता वृध्दिंगत करण्याचे प्रयत्न,

कल्पनाशक्तीने मुक्त करणे, आविष्कार सौंदर्यबध्द करणे, नैतिकता आणि अस्मिक मूल्यांचं परिपोष होण्याचे अथक प्रयत्न करणे, एकूणच जगण्याचा पोत समृध्द करणे आणि त्यासाठी अनुभवांची व्यापकता आपली मानते म्हणूनच संस्कृती अनेकविधता जपणारी असते.

कोणत्याही प्रकारचा आदर भाव न बाळगणारी, हिशोबी, उथळ, बुध्दिनिष्ठता, विश्वासाचे वातावरण निर्माण करु शकणारी नाही, ही बुध्दिमत्ता नव्हे, त्यातूनच मग अविकसित, सांस्कृतिक पारुपांचा प्रादुर्भाव वाढतो. संस्कृती अधिकाधिक बालिश आणि अप्रगल्भ होत आहे. खरे तर स्वायत्तता, वैश्विकता, बुध्दी, निष्ठा, चिंतन, जाणिवांचा विकास, न्याय आणि समतेची प्रस्थापना हे सगळे संस्कृतीतून समोर येणाऱ्या अनुभवांचे सार आहे. संस्कृती म्हणजे जगण्याचे अनुभव होय.

आशा बगे यांच्या साहित्यात भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन होऊन कसे अवतरु शकते, याची प्रचिती त्यांच्या कथांमधून येते. भारतीय जीवनातलं कर्मकांड, व्रतवैकल्ये, सण, उत्सव, कीर्तन इत्यादी गोष्टींचे भरपूर ज्ञान त्यांना वारसाने लाभलेले आहे. मानवी मूल्यांवर अधिष्ठित अशी चिरंतन मूल्ये घेऊन आलेल्या कथेत दिसून येते. 'मारवा' कथासंग्रहात असलेल्या कथा या मानवी मूल्यांच्या पण प्रत्येकाच्या आतल्या सूक्ष्म नात्याची, आतल्या आत असलेल्या रक्ताच्या ओढीची आणि माणसांच्या एकमेकांत गुंतलेल्या अतुट बंधनांची बंदिषी होऊन आलेल्या आहेत. भावात्मकतेने माणसाचे मन आपल्यापुढे उलगडत, जुन्या परंपरेशी नाते सांगत, शुचिर्भूत आणि मांगल्याला जपणाऱ्या, स्त्रीच्या मूल्यविषयांवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

आशा बगे यांच्या साहित्यामध्ये नायिकांचा एक खास विशेष म्हणजे त्या इतर कादंबरीकारांच्या तुलनेत स्त्री-पुरुष संबंध रंगवीत असताना त्यामध्ये नैतिकतेला वाव देताना दिसतात. त्यातील स्त्री-पात्रे ही भौतिकतेच्या पायावर उभी राहून त्या चित्रणाला बहुमान मिळवून देतात. संस्कारांनी बांधलेली स्त्री

त्यांच्या कादंबऱ्यांमधून नेहमीच भेटते. त्यातून त्यातील पात्रे नकळत का होईना वाचकांवर मूल्यसंस्कार करत असतात.

'भूमी' कादंबरीमध्ये मैथिलीच्या रुपाने कादंबरीस निगर्वीपणाने आपले आत्मभान जपणारी, त्यासाठी समाजाची पर्वा न करणारी मैथिली कादंबरीच्या शेवटी शंतनूकडे जाते असे, दर्शविले असले तरी ती स्वतः साठीच परतते. तिला शंतनूलाही सोडायचे नाही आणि दुसरे घरही करायचे नाही, असेच दिसते. अशी मैथिली परंपरा आणि आधुनिकता या दोन्हींचा विचार करणारी आहे. येथे ती नितिमूल्यांचे पालन करताना दिसते.

भारतीय संस्कृतीचे दर्शन 'भूमी' तून लेखिकेने मांडलेले दिसते. "घर अंधारात ठेवू नये. लवकर जा! एखादया खोलीत तरी लाईट असावा."[५५] तसेच कादंबरीत आलेले व्रत वैकल्ये, सण-उत्सव, कीर्तन-भजन , यांचे चित्रण दिसून येते ,"उपासाचं खातो तेव्हा 'खाल्ल' म्हणू नये. पोट भरलंही म्हणू नये."[५६] "सांगू? तुम्ही फक्त आमच्यात यावं. आमच्या उत्सवात सामील व्हावं. बस्स!"[५७] म्हणजे भारतीय संस्कृती दिसून येते. भजन कीर्तनाच्या संदर्भात" आजी त्यागराजाची भजनं म्हणत होत्या. सुधीरचे वडील गीतेचा पंधरावा अध्याय म्हणायला लागले."[५८] यातून संस्कृतीची बंधने दिसून येतात. व्रत-वैकल्याविषयी लिहितात की, "पद्मभानच्या बायकोच पौर्णिमेचं कसलं तरी व्रत होतं. संध्याकाळी पूजा, नंतर जेवण असा बेत."[५९] या सर्वांमधून भारतीय संस्कृतीचे जतन होताना दिसते.

आशा बगे यांच्या 'सेतू' कादंबरीत दादा, ब्रिजमोहन, आणि सुचिता या व्यक्तिरेखांबरोबर कथानक पुढेपुढे जात राहते. दादासाहेब हे इतिहास संशोधक आहेत, "ज्यांनी अखेर समाज पुढ सरकतो आणि सगळ्या पडझडीतून शिल्लक उरतो ती मूल्य."[६०] यातून मानवी मूल्यांचे जतन केलेले दिसून येते. "एक माणूस कधी दुसऱ्यासारखा नसतो. प्रत्येक माणसाची त्याची म्हणून एक वेगळी गोष्ट असते."[६१] यातून समाजातील प्रत्येक व्यक्तींचे विचार हे प्रत्येक

घटकांमध्ये वेगवेगळे आहे त्यांची संस्कृती वेगवेगळी आहे यावरुन असे लक्षात येते की समाजातील सांस्कृतीक गोष्टीचे दर्शन लेखिकेने घडविले आहे.

"सुचरिता, वयानं नाही आणि कुणा एकाच व्यक्तीमुळंही नाही, एका विशिष्ट प्रसंगा-घटनांमुळंही नाहीच, त्याची सगळी कारण माणसाच्या आत कुठतरी तळातच असतात. त्यांच्या त्यांच्या वेळा असतात. जागा असतात, वर भासतं, दिसतं की या माणसांनं, याच्यामुळं, या घटनेमुळं पण इतकं सर्व सोपं, साध नसतं."[६२] या कादंबरीमधून माणसाच्या तळागळापर्यंत पोहचविण्यासाठी एक जाळंच निर्माण केलेलं आहे.

'भूमिका आणि उत्सव' या कादंबरीमध्ये आजी-आजोबा, सोहन यांच्यातील नव्या व जुन्या पिढीतील माणसांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन मांडतात. मानवी नातेसबंधाची उत्कट रुपे दिसून येतात, "आजी, आमच्या शाळेतच अशी किती मुलं होती, ज्यांना क्लास लावता येत नव्हता, पण तीही पास झाली, काहीजण असे आहेत की ज्यांना पुढे शिकता येत नाही. कमावणंच भाग आहे. प्रथम जगता येण हेच तर महत्त्वाचं!"[६३] कुटुंबातील नैतिकता व मानवी जीवनमूल्ये या कादंबरीतून दिसून येतात.

'त्रिदल' कादंबरीमध्ये मंजू, शारदा, श्रीनिवास, मिस ल्युक व कॉलेज जीवन व कौटुंबिक जीवन यात मांडलेले आहे. मंजू आणि शारदा कॉलेजच्या प्रोग्रॅममध्ये अनेक कार्यक्रम असतात त्या संदर्भात, "नाचात बघण्यासारख्या इतक्या गोष्टी असताना तुला त्या तंगड्याच दिसतात! तो कोरकू डान्स आहे, शारदा, ते लोक असचं, राहतात, नाचतात!"[६४] या कादंबरीमध्ये भारतीय संस्कृतीचे मौलिक दर्शन त्यांच्या साहित्यातून दिसून येते. "मंजू, तू आहेस तोपर्यंत तुझ आणि शारदेचं डोहाळजेवण उरकून घेईन म्हणते."[६५] भारतीय स्त्री आयुष्यातील रुढी परंपरेला व चालीरीतींना महत्त्व देताना दिसून येते.

### ४.४ समारोप -

आशा बगे यांच्या कादंबरीमध्ये व्यक्तिरेखाच्या कर्तृत्वाचा आलेख कथानकाला पूरक आहे. व्यक्तिमत्त्वाचा विकास उत्तरोत्तर कसा होत जातो. व त्याचवेळी तिच्या कुटुंबाशी चाललेला संघर्षही तितकाच प्रभावीपणे व्यक्त होतो. मैथिली ज्या कुटुंबात जगत असते, तिथे मात्र तिच्या जगण्याला मर्यादा पडताना दिसतात. तिच्या भावना समजून घेणारा जोडीदार तिला मिळत नाही. त्यामुळे भावनिकदृष्टया ती एकाकी पडत जाताना दिसते. तरीही ती कुटुंब उभे करण्यासाठी जीवाचा आटापिटा करते. बुध्दीच्या, जिद्दीच्या आण कर्तृत्वाच्या जोरावर ती यशाची शिखरे गाठत जाते. कुटुंबातील सर्वजण तिच्याकडे असामान्य कर्तृत्ववान असणारी स्त्री म्हणून पाहतात. तिच्या मनाची एकाकी अवस्था होते. तरीही ती जीवनाच्या सर्व आघाड्यावर यशस्वीपण लढत राहते. स्वतःच्या मनाचा कुठेही तोल जाऊ देत नाही.

आशा बगे यांनी मध्यमवर्गीय कुटुंबातील वेगवेगळ्या वयोगटातील, वेगवेगळ्या स्तरांतील, वेगवेगळ्या व्यवसायातील व वेगवेगळ्या मनोवृत्तीच्या पात्रांची कादंबरीमध्ये सरमिसळ केलेली दिसते. मैथिली ही कादंबरीची नायिका असल्यामुळे कादंबरीला एक प्रवाहीपणा असलेला दिसतो. कादंबरीमध्ये पात्रांची निवेदने, परिणामकारक शब्दयोजना, पात्रांचे संवाद, भाषाशैली, नातेसंबंध, यासारख्या विविध घटकांचा वापर करुन लेखिकेने व्यक्तिचित्रणे जिवंत केली आहेत. तसेच व्यक्तिरेखाटणाचे कौशल्य कादंबरी वाचतांना वाचकांना दिसून येतात.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांत भाषेचा प्रवाहीपणा हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. त्यांच्या कादंबऱ्यांची भाषा ही सहजपणे मनाला भिडणारी आहे. संवेदनशीलता आणि काव्यात्मकता हे विशेषही त्याच्या लेखनातून व्यक्त होताना दिसतात. काही व्यक्तींच्या वाट्याला आयुष्यात नेहमी दुःखच येते आणि

त्याची कोणतीही कारणपरंपरा लावता येत नाही. अशा स्त्री व्यक्ती बगे यांच्या विश्वात भेटतात.

आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेचे जवळचे नाते असलेली असली, तरी बदलत्या समाज वास्तवातील कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीवही त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच त्यांच्या कथेतील स्त्रिया वैविध्यपूर्ण आहेत. त्यांना स्वतःची अशी वेगळी जाणीव आहे, विचार करण्याची क्षमता आहे. ही जाणीव जपण्यासाठी, आपले अस्तित्व जपण्यासाठी बंडखोरी जरी नाही तरी रुढ नीतिनियमांच्या परंपरेच्या विरोधी काही एका सीमेपर्यंत जाण्याची त्यांची तयारी आहे.

आशा बगे यांचे सामर्थ्य केवळ व्यक्ति चित्रणापुरतेच मर्यादित नाही, तर व्यक्तीच्या जीवन दर्शनाकडून अनंत अशा प्रश्नांच्या वाटा शोधणारी त्यांची दृष्टीच खरी महत्त्वाची आहे. म्हणून चांगलं काय नी वाईट काय हा प्रश्न त्यांच्या प्रत्येक स्त्री चित्रणात आलेला आहे. आशा बगे यांनी स्त्री जीवनातील अनेकविध व्यथा, संवेदना व आंतरिक संघर्ष चित्रित करण्यात यशस्वी झाल्या आहेत. कारण यात लेखिकेच्या आवडीनिवडी, तिची मते आपोआपच प्रकट झालेली आहेत.

**४.५ निष्कर्ष -**

१) आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील नायिका स्वाभिमानी, जिद्दी, कर्तृत्ववान, तडफदार व आधुनिक असली तरी जुन्या परंपरेच्या मानवी मूल्यांतून बाहेर पडताना दिसत नाही. ती परंपरा शरण अशी स्त्री आहे.

२) आशा बगे यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा वाचकाला व्यावहारिक जीवनात भेटलेल्या किंबहुना ओळखीच्या वाटतात.

३) आशा बगे यांनी पुरुषहिताच्या विरोधात न जाता त्याला पूरक राहून स्त्रियांच्या परिस्थितीत कशी सुधारणा करता येईल व त्या प्रमाणात तिचे स्वातंत्र्य कसे जोपासता येईल, यासाठी त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

४) आशा बगे यांच्या 'मनस्विनी' या कादंबरीत नायक-नायिकेच्या मानसिकतेचे व ती मानसिकता बदलण्याचा अतिशय हळुवारपणे प्रवास चित्रित केलेला आहे.

५) आशा बगे यांनी व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने संगीतनिष्ठा भाषेच्या माध्यमातून सौदामिनीचे व्यक्तिचित्रण भावपूर्ण घडविलेले आहे.

६) आशा बगे यांचे लेखन पारंपरिक विचार, व संस्कृतीशी नाळ ठेवून आधुनिक विचारधारणेला एक प्रगल्भ समजुतीनं सामोर जाणार त्याचं लेखन वाचकांना अंतर्मुख करतात.

७) आशा बगे यांच्या लेखनात पारंपरिक श्रध्दा, धारणा, संस्कार, स्त्री-पुरुष संबंध, मातृत्त्व व सासरची नाती यातून परंपरेसोबतच नवता त्यांच्या लिखाणातून आलेली आहे.

८) आशा बगे यांच्या साहित्यातील पात्रे कधी कधी खचतात, पण कधी कधी अंतर्मुख होऊन तर्कशुध्द विचार करताना दिसतात.

९) स्त्रियांची दुःखे पुरुषांपेक्षा वेगळी असण्याची, स्त्रियांनाही मन असण्याची जाणीव आशा बगे यांनी कादंबऱ्यांतून करुन दिलेली आहे.

१०) आशा बगे यांनी पारंपरिक स्त्रीबरोबरच आधुनिक स्त्रीची मनोवस्था लेखिकेने आपल्या लेखन कौशल्याने अतिशय उत्कृष्ट रीतीने साकारलेली आहे.

११) आशा बगे यांच्या साहित्यातून संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते सांगणारी पात्रे असली तरी बदलत्या समाज वास्तवाचे चित्रण त्यांनी केलेले आहे.

१२) आशा बगे यांनी अनेक व्यक्तिरेखांच्या माध्यमातून विविध मानवी नात्यांचा शोध घेतलेला आहे.

१३) व्यक्तीच्या जीवनातील गुंतागुंत, आंतरिक संघर्ष आणि विविध घटना चित्रणावर त्यांचा भर आहे.

१४) लेखिकेची पात्रांशी, कादंबरीच्या गाभ्याशी व आशयसूत्रांच्या एकसंधतेशी असणारी तल्लीनता, वाचकांच्या प्रत्ययाला येते.

## संदर्भ सूची

१) कुलकर्णी भीमराव, 'मराठी कादंबरीची वाटचाल, मेनका प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, पृष्ठ - १४७-१५०.

२) पाटील गंगाधर,'कथनमीमांसा',अनुष्टम,दिवाळी अंक,१९९१,पृष्ठ- १०७.

३) बगे आशा, 'भूमी', मौज प्रकाशन, मुंबई,दुसरी आवृत्ती,२००६,पृष्ठ- २३.

४) तत्रैव, पृष्ठ - ४२.

५) तत्रैव, पृष्ठ - १४६.

६) वैद्य अरुंधती, 'भूमी एका आधुनिक मैथिलीचे जीवनयान', युगवाणी, एप्रिल-जून, २००७, पृष्ठ - १५.

७) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - १६३.

८) तत्रैव, पृष्ठ - ६५.

९) तत्रैव, पृष्ठ - १९६.

१०) तत्रैव, पृष्ठ - १९५.

११) तत्रैव, पृष्ठ - १९९.

१२) तत्रैव, पृष्ठ - १८३.

१३) तत्रैव, पृष्ठ - १९२.

१४) बगे आशा, 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे, १९७८, पृष्ठ - ०७.

१५) सुलभा हेर्लेकर, 'आशा बगे एक नवे अस्तित्व', कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९९६, पृष्ठ - ५५.

१६) बगे आशा, 'झुंबर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ - १३०.

१७) तत्रैव, पृष्ठ - १५०.

१८) आशा सावदेकर, 'आशा बगे यांचे कादंबरी विश्व', काही शोधनिबंध ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००२, पृष्ठ - १२०.

१९) बगे आशा,'सेतू',मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००७,पृष्ठ -०८.

२०) तत्रैव, पृष्ठ - ९.

२१) तत्रैव, पृष्ठ - ५४.

२२) तत्रैव, पृष्ठ - ६५.

२३) हस्तक उषा, 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', संपा.श्री.पु.भागवत सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, अंजली कीर्तने शिल्पा तेंदुलकर,पृष्ठ -२५३.

२४) बगे आशा, 'सेतू' , उनि., पृष्ठ - ८२.

२५) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - १९९.

२६) सावदेकर आशा , 'मानुषतेया आश्वासक बंधाचा शोध', 'सेतू' तरुण भारत, दैनिक नागपूर, २००२.

२७) बगे आशा, 'त्रिदल' , उनि., पृष्ठ - ६०.

२८) बगे आशा, 'झुंबर' , उनि., पृष्ठ - १३.

२९) उषा देशमुख, 'वैदर्भीय लेखिका' काल आणि आज वसंत विशेषांक, मुंबई मे १९८९, पृष्ठ - १३२.

३०) फडके ना.सी., 'स्वभावलेखन, मॅाडर्न बुक डेपो, पुणे, १९३८,पृष्ठ - १४.

३१) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - १०१.

३२) तत्रैव, पृष्ठ - १३२.

३३) तत्रैव, पृष्ठ - १४८.

३४) तत्रैव, पृष्ठ - १५७.

३५) तत्रैव, पृष्ठ - ८.

३६) बगे आशा, 'मनस्विनी', उनि., पृष्ठ - १८०.

३७) तत्रैव, पृष्ठ - २२.

३८) बगे आशा,'त्रिदल',उनि., पृष्ठ ३९.

३९) तत्रैव, पृष्ठ - ३३.

४०) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - २५.

४१) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ७५.

४२) तत्रैव, पृष्ठ - १७३.

४३) तत्रैव, पृष्ठ - ६५.

४४) तत्रैव, पृष्ठ - ७७.

४५) तत्रैव, पृष्ठ - १०४-१०५.

४६) तत्रैव, पृष्ठ - १७८.

४७) तत्रैव, पृष्ठ - ७८.

४८) तत्रैव, पृष्ठ - ७३.

४९) सिरस श्रीनिवास रामचंद्र, 'आशा बगे एक नवे अस्तित्व', युगवाणी, मासिक, ऑक्टो, नोव्हें, डिसें. १९८९, नागपूर, पृष्ठ - ६५.

५०) बगे आशा, 'झुंबर', उनि., पृष्ठ - ११८.

५१) बगे आशा, 'झुंबर', उनि., पृष्ठ - १२७.

५२) तत्रैव, पृष्ठ - १२९.

५३) सावदेकर आशा, 'काही शोध निबंध', उनि., पृष्ठ - १२०.

५४) बगे आशा, 'सेतू' , उनि., पृष्ठ - १५४.

५५) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - १७.

५६) तत्रैव, पृष्ठ - १९५.

५७) तत्रैव, पृष्ठ - २१४.

५८) तत्रैव, पृष्ठ - २५३.

५९) तत्रैव, पृष्ठ - १५२.

६०) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - ४४.

६१) तत्रैव, पृष्ठ - ७७.

६२) तत्रैव, पृष्ठ - १७८-१७९.

६३) बगे आशा, 'भूमिका आणि उत्सव', मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २०११, तत्रैव, पृष्ठ - २६.

६४) बगे आशा, 'त्रिदल', उनि., पृष्ठ  - १९.

६५) तत्रैव, पृष्ठ - ८३.

## प्रकरण पाचवे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास

५.१ प्रस्तावना

५.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील भाषाशैली

५.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील आशय सूत्र

५.४ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निवेदन पध्दती

५.५ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नातेसंबंध

५.६ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निसर्गातील प्रतिमा आणि प्रतीके

५.७ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्थल वर्णन

५.८ समारोप

५.९ निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

# प्रकरण पाचवे

## आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास

### ५.१ प्रस्तावना -

कादंबरीचा एक वैशिष्टयपूर्ण घटक म्हणजे भाषा. मानवी जीवन व्यवहारात विचार, विकार, भावभावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून भाषेचा उपयोग केला जातो. कादंबरीची भाषा कशा स्वरुपाची असावी, असा कोणताही निश्चित नियम नाही. कारण कादंबरी हा स्वैर व व्यापक वाङ्मय प्रकार असल्यामुळे त्याला कोणत्याही निश्चित नियमात बसवता येत नाही. कादंबरीतून वापरल्या जाणाऱ्या भाषेतून आवश्यक तो अर्थ ध्वनित व्हावा, असेच मानले जाते. भाषा ही बहुरुपांनी बनलेली असते. सामाजिक व्यवहार, ललित साहित्य, ललितेतर साहित्य या प्रत्येक क्षेत्रात भाषेने आपले अस्तित्व सिध्द केले आहे.

कादंबरी हा ललित साहित्याचा गद्य प्रकार आहे. कादंबरीचे रुप गद्यभाषेतून अभिव्यक्त होत असते.आशय-विषयाच्या दृष्टीने कादंबरी अतिशय विस्तीर्ण असल्यामुळे निश्चित अशी भाषा रुढ होऊ शकली नाही. पण विशिष्ट अशा कादंबरीकाराची भाषा रुढ होऊ शकते. तरीही कादंबरीकाराची ही विशिष्ट भाषा त्यांच्या प्रत्येक कादंबरीत सारख्याच प्रमाणात प्रकट होईल असेही नाही. कादंबरीला स्वतःची अशी स्वतंत्र भाषा अस्तित्वात नसली तरी कादंबरीत वापरल्या जाणाऱ्या भाषेचे काही ठळक वैशिष्टये संभवू शकतात. साधारणतः प्रारंभीच्या काळातील कादंबरीची भाषा कृत्रिम, अलंकारिक, अतिरंजित, लयबध्द व सामाजिक अशा अनेक वैशिष्टयाने युक्त होती, आधुनिक कादंबरीतील भाषा मात्र वास्तवोन्मुख , सृजनशील, जीवनसन्मुख बनली आहे. कथाशयाला व पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रियांना योग्य न्याय देणारी अशीच भाषा आजच्या कादंबरीत प्रकटते. कादंबरीतील भाषेसंबंधी थोडक्यात सांगायचे म्हणजे कादंबरीची भाषा वास्तवोन्मुख, विषयानुरुप, रसाळ, वेधक, साधी,

सरळ व सुटसुटीत असावी. वाचकांच्या समोर कथानक व पात्रे उठावदारपणे उभी राहतील, अशी कसदार व जोरकस भाषा वापरावी.

कादंबरी हा जीवनाशी समांतर जाणारा वाङ्मय प्रकार आहे. जीवनातल्या लयीप्रमाणे हा वाङ्मयप्रकारही लयबध्द होतो. जीवनातील लयीत हेलकावे देखील असतात, त्यांचेही प्रतिबिंब या वाङ्मय प्रकारात पडलेले दिसून येते. कादंबरीच्या सरंचनेत विविध घटक असतात. उदा. भाषाशैली, निवेदनपध्दती व भाषाविचार इत्यादी. कादंबरीची शब्दार्थमय संसारकहाणी कादंबरीतल्या निवेदक पात्राकडून सांगितली जाते. या निवेदक पात्राची एक जीवनदृष्टी असते व कथा हेतूही असतो. पण निवेदकाच्या जीवनसृष्टीमागे व कथा हेतूमागे लेखकाची व्यापक भूमिका असते. लेखकाचा दृष्टिकोन हा कादंबरीच्या कलात्मकतेशी अधिक निगडित असतो. या सर्वांचा विचार येथे करावयाचा आहे.

एखादया साहित्यकृतीतून व्यक्त होणारा आशय हा त्या साहित्यकृतीचे स्वरुप ठरवित असतो आणि त्या साहित्यकृतीची कलात्मकता ठरवीत असतात. या भाषाशैलीला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते, म्हणजे भाषा व साहित्यातील शैली त्या साहित्यकृतीतील लेखकाचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट होताना दिसते. त्या साहित्यकृतीतील प्रामाणिकताही स्पष्टपणे दिसून येते.

### ५.२ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील भाषाशैली -

कोणत्याही वाङ्मयकृतीचा जन्म भाषेच्या माध्यमातूनच होत असतो. भाषा हे मानवाचे विचार व्यक्त करण्याचे मुख्य साधन मानले गेले आहे. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती आणि समाज यांच्यातील व्यवहार भाषेमुळेच शक्य होतो. साहित्य कृतीतूनही लेखक आणि समाज यांच्यातील संबंध भाषेच्या माध्यमातूनच साकार होत असतात. तेंव्हा ती भाषा लिखित स्वरुपाची असते. कथा, कादंबरी, कविता या वाङ्मय प्रकारात भाषेचे स्वरुप वेगवेगळे असते. या मुद्दयावरुनच कोणी कादंबरी भाषाशैलीला स्वतंत्र स्थान आहे काय? असा प्रश्न

उपस्थितत करतात. तेंव्हा येथे भाषेला दिलेले विशिष्ट वळण म्हणजे शैली, असा अर्थ अभ्यासकांना अपेक्षित असावा.

भाषेतून विशिष्ट प्रदेशातील जीवनाचा परिचय होत असतो. भाषेच्या प्रदेश वैशिष्टयांबरोबरच तेथील लोकजीवन संस्कृती, रुढी-परंपरा, चालीरीती यांचे दर्शनही भाषेतून घडते. म्हणून कादंबरी लेखनात भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. एकानुबंधी व्यवहारात मनुष्य आपले विचार विकारांचे प्रकटीकरण एकटयापुरते व्यवहार करीत असतो, तर अनेकानुबंधी असेल तर मनुष्य आपल्या विचार विकारांचे प्रकटीकरण करुन व भोवतालच्या मंडळींना निवेदन करुन व्यवहारपूर्ती करील, यातूनच,"आत्मप्रकटीकरण व आत्मनिवेदन या दोन गोष्टी भाषेच्या मुळाशी असतात."[१] असे कृ.पा.कुलकर्णी म्हणतात. या दोहोंपैकी आत्मनिवेदन हे आत्मप्रकटीकरणापेक्षा महत्त्वाचे आहे. आत्मनिवेदनात त्याचा अनेकांशी संवाद साधला जातो. व्यवहार साधण्यासाठी आत्मप्रकटीकरण महत्त्वाचे ठरते. तर आत्मनिवेदनातून साहित्यकृतीवर परिणाम झालेला दिसून येतो. लेखकाच्या मनातील भाव भावना वाचकांपर्यंत जशाच्या तसे पोहचविण्यात भाषेचे खरे सामर्थ्य पणाला लागत असते. संत ज्ञानेश्वर याला 'ये हृदयीचे घालणे' म्हणतात, लेखकाचे मत वाचकाला समजण्यासाठी ती भाषा प्रवाही असली पाहिजे, असे जे म्हणतात ते यासाठीच.आनंद यादव भाषिक शैलीविषयक म्हणतात, "साहित्याची भाषा ही बहुतेक वेळा प्रमाण भाषा असते. आजपर्यंत साहित्यनिर्मिती, आस्वाद व समीक्षा हे कार्य प्रमाण भाषेतच चालत आले आहे. ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागल्यानंतर प्रमाण भाषा आणि ग्रामीण बोली यांचे मिश्रण संवाद लेखनात वापरले जाऊ लागले. ग्रामीण भाषा म्हणजे भाषाच असते. मराठीच्या प्रादेशिक भेदावरुन खान्देशी, कोकणी, वऱ्हाडी या बोली निर्माण झाल्या आहेत. पण या बोलीतूनच प्रमाण भाषा समृध्द होत जाते. कारण मराठी भाषा म्हणजे नुसती प्रमाण भाषा नव्हे, तर मराठीच्या ज्या अनेक बोली आहेत, त्या सर्व मिळून भाषेचे जे एक काल्पनिक रुप सिध्द होते, ती मराठी भाषा होय."[२]

कुठल्याही साहित्यकृतीचा विचार करताना त्या कादंबरीची भाषा काय असते, त्या विषयी प्र.वा.बापट व ना.वा. गोडबोले म्हणतात, "विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य होत."[३] कादंबरीतील हे जे विचार असतात ते कसे मांडायचे हे प्रत्येक लेखकाच्या लेखन शैलीवर अवलंबून असते. या संदर्भात आशा बगे एका मुलाखतीत म्हणतात की, "शैली म्हणजे पात्रांची भाषा नाही. शैली म्हणजे लेखकाच्या अनुभवाचा अंतर्गत स्त्रोत आहे."[४] म्हणजेच त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्वही समजून घेतले पाहिजे.

व्यक्तित्वाचे संपूर्ण प्रतिबिंब म्हणजे भाषा होय. याचा अर्थ लेखकाच्या मनाचे संपूर्ण दर्शन त्याच्या भाषाशैलीत घडते, असा नाही "माणसाची भाषा व त्याची कृती यांच्याद्वारे त्या माणसाच्या व्यक्तित्वाची जी कल्पना आपल्याला मिळते तिला मर्यादा आहे."[५]

भाषाशैलीत लेखकाच्या मनोरचनेचे सर्व रहस्य प्रकट झालेले असते, असे म्हणणे अतिशयोक्तीचे आहे. त्याच्या भाषेवरुन त्याच्या मनोरचनेची बरीचशी कल्पना बांधता येते, एवढेच म्हणता येईल. भाषा म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा स्पष्ट आरसा असे म्हणता येणार नाही. मानवी मनाची रहस्यमयता ध्यानात घेतली तर भाषेवरुन व्यक्तित्वाची काटेकोर माहिती कळू शकते, असे म्हणता येणार नाही. पण सत्य व सौंदर्य यांचा उपासक असलेला लेखक जर प्रतिभासंपन्न असेल, तर तो शब्दांची अचूक निवड करुन आपले मनोगत प्रकट करतो.

'मनस्विनी' ही आशा बगे यांची पहिली कादंबरी आहे. या कादंबरीत प्रेमाचा त्रिकोणच साकार करणारी असली तरी वेगळ्या वाटेवरची आहे. कादंबरीत छोट्या छोट्या प्रसंगामधून सौदामिनीचे आंतरिक वास्तव आणि तिच्यातील व यशोधनमधील अलवार नाते पिंजत राहते. यशोधनच्या प्रेमात आपण गुंतलो आहोत हे कळताच आडवाटेला भेटलेल्या या क्षणाला साथ ठेवून सौदामिनी स्वतःला विचारत राहते, हे आपल्याला काय मागणार?

अनावरपणाने ती सगळ्या हळव्या अनावर क्षणांना नकार देण्याचे ठरविते, सगळी दारे अटीतटीने बंद करीत राहते. ते तिला जमत नाही. मग दुबळेपण पत्कारुन ती त्या क्षणांपासून दूर पळून जाण्याचा प्रयत्न करते. भाई आणि दमयंती यांच्या मायेच्या कोशात आश्रय घेण्याचा प्रयत्न करते. पण तिला कळून चुकते हे फक्त आकर्षण नाही, मोह नाही, ताण रस्सीखेच थकवा, पराभव. पण यापलीकडे आहे. आपले मन, तेही तर वेळीअवेळी उगीचच भरुन येणारे. त्यातूनही काही उत्कट प्रश्नांचाच जन्म होतो. असले प्रश्न तिला आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतात.

"असलं काही समजून घेण्याचीही अमरची ताकद नाही. यश आपल्या जातीचा आहे.पण आपल्याला अमर वाटयाला यावेत आणि यशला त्याच्या पांगळ्या मुलीस बुडालेली त्याची पत्नी, भाईसारख्या कलाकाराला दमयंती! अस का व्हावं? आपल्याच जातीची, संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाहीत? का?"[६] आशा बगे यांच्या लेखनातून सण, उत्सव, व्रत-वैकल्ये यांच्याशी जवळचे नाते आहे. त्यांच्या कादंबरीत नायिकांना सत्वाची जाणीव आहे. त्यांना स्वतःच्या अस्मितेचीही जाणीव आहे. त्या बुध्दिमान, मनस्वी, कलेची आवड असणाऱ्या रसिक सुजाण आहेत. पण तरीही संस्काराची, संस्कृतीची चौकट त्या सहजासहजी तोडण्यास धजत नाही. तर परिस्थितीपुढे मान झुकवून त्याचा स्वीकार करतात. पण त्या विशिष्ट परिस्थितीत त्यांच्या मनाची जी अवस्था असते, जे चिंतन होते, जे प्रश्न त्यांना पडतात, ते मात्र निश्चितच आधुनिक आहे.

"मग सारं सरळ आखलेल्या रस्त्यानं का गेलं नाही? नको असलेल्या वळणाचा रस्ता का लागला, का भेटला, यशोधन? आणि भेटायचाच होता तर थोडा आधी का नाही? कदाचित हाच यशोधन आधी भेटला तर मी आजचा म्हणून त्याला ॲक्सेप्ट केला असता का? जर मी अमरशी बांधले गेले नसते तर! कदाचित तसं होतं तर तो यश मला पटलाही नसता थोडा आधीच्या

वळणावर यश भेटला तर कदाचित आजचा घेऊन भेटलाही नसता? कुणी सांगावं?"[७] ही प्रश्नात्मक शैलीच आशा बगे यांच्या कादंबरीचे खरे मर्म आहे. या ठिकाणी लेखिकेची चिंतनशीलता जाणवते. मनाच्या व्यामिश्र गुंतागुंतीचे हे चित्रण लेखिका वेगळ्या पातळीवर जाऊन करते हेच जाणवते. भाषाशैली संबंधी स.शि. भावे लिहितात, "भाषेच्या वेगळेपणात अथवा शैलीत लेखकाच्या कलानुभवाची तीव्रता म्हणजे वेगळेपण व्यक्त झालेले असते लेखकाच्या मनातील अमूर्त शैलीत मूर्त झालेले असते."[८]

प्रा.रा.ग. जाधव भाषाशैली विषयक म्हणतात की, "शैलीचा विचार हा लेखक कवीच्या दृष्टिकोनाच्या संदर्भात जसा करता येतो तसाच तो साहित्यकृतीमधील शब्दकलेच्या आधारेही करता येतो."[९] यावरुन असे स्पष्ट होते की, लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची शैली यांचा अतुट संबंध आहे. कारण मनातील विचार लेखक त्याने ठरवून घेतलेल्या दृष्टिकोनातून व्यक्त करीत असतो. आणि त्याच्या मांडणीतील शैलीच्या आधारे त्याच्या कलाकृतीतील आशय व अभिव्यक्ती या दोघांचाही अंतर्भाव असतो.

आशा बगे यांच्या कादंबरीतील भाषाशैलीचा विचार करता 'भूमी' मधील भाषाशैली ही साधीसुधी वाटणारी, आकर्षक व काव्यात्मक आहे. तसेच कादंबरीमधून मध्यमवर्गीय समाजाच्या जाणिवांचे आणि संस्कारांचे अनेक रंग भाषेमध्ये मिसळलेले दिसतात. तसेच एक स्त्री असूनही पुरुषी मानसिकता, संवेदनशीलता, विचारसरणी व अनुभव त्या आपलेसे करुन घेतात. यामधूनच एक नवे अनुभवविश्व साकार करण्याचे लेखिकेचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. लेखिकेने जुनी व नवीन मूल्ये, परंपरा, श्रध्दा यांच्या विचारातून मानवी मनात निर्माण होणारे संघर्ष नेमक्या शब्दांत मांडलेले आहे.

'भूमी' कादंबरीतील नायिकेचे (मैथिलीचे) बालपण कडलूर सारख्या छोट्या खेड्यात मैथिलीचे बालपण गेले आहे. तिच्या मनावर तमिळ भाषेचे संस्कार झाले आहेत. तेथील ग्रामीण माणसांची भाषा तिने अवगत केली आहे.

कादंबरीच्या सुरुवातीला खेडेगावातील वातावरण सहजपणे आशा बगे यांनी निर्माण केले. भाषेचा प्रवाहीपणा हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. मुंबई, मद्रास, बेंगलोर या ठिकाणच्या मैथिलीच्या वास्तव्यात त्या त्या ठिकाणी बोलली जाणारी भाषा सहजपणे पात्रांच्या संवादातून व्यक्त होते. प्रत्येक अनुभव, प्रसंगाला सहज संथपणे चित्रित करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे. भूमीतील भाषा ही सहजपणे मनाला भिडणारी आहे. या भाषेतून स्त्री मनाची स्पंदने व्यक्त होतात. तरल संवेदनशीलता आणि काव्यात्मकता हे विशेषही त्यांच्या भाषेतून प्रकर्षाने जाणवतात. प्रखर सामाजिक वास्तवही तितक्याच ताकदीने या कादंबरीतून व्यक्त होते.

आशा बगे यांची 'भूमी' ही कादंबरी म्हणजे त्यांच्या कादंबरी लेखनाचा पुढील प्रवासच होय. या कादंबरीत लेखिकेने प्रज्ञावंत, प्रतिभाशाली, समंजस स्त्रीचा जीवनप्रवास रेखाटला आहे. पुराणकालीन मैथिलीच्या नावाशी न जुळणारे व्यक्त रुप घेऊन येणाऱ्या कादंबरीची नायिका स्वतःमधल्या सर्जनशक्तीला साद घालते, आणि स्वत्व जागे ठेवून आत्मसामर्थ्याच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीशी लढा देते.आत्याचा सावत्र मुलगा उदय, आतेभाऊ संजू तिचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. पण मैथिली मात्र त्यांना दाद देत नाही. महाविद्यालयामधील मित्र-मैत्रिणीच्या सहवासात तिचे लेखन, अभिनय गुण जागे होतात आणि एक जिद्दी, खंबीर व्यक्तिमत्त्व घडू लागते. नोकरीच्या निमित्ताने संबंध आलेल्या देवस्थळीबाईच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलाशी-शंतनूशी दांडेकरांच्या पुढाकाराने मैथिलीचे लग्न  जुळते, पण शंतनूची आई व दांडेकर यांच्या संबंधामुळे मनस्थिती बिघडलेल्या शंतनूशी मैथिलीच्या मनाची तार कधीच जुळत नाही.

"तुम्ही तर मर्माचं बोलताहात, आम्ही वेगळं जगतो आहोत, खरं आहे. तुम्ही लोक पती-पत्नी म्हणूनच जगत आलात. आम्ही स्त्री-पुरुष म्हणून जास्त जगतो. पण तुम्ही एकमेकांशी बांधले जात होता. एका घरातली तर होताचं पण

वेगवेगळी लोक एकमेकांशी जोडून होता. आम्ही हे सगळ गमावून बसलो आहोत. तुम्ही तुम्हाला त्या वेगानं जाताना आम्हाला कुणाला बरोबर घेता येत नाही. आमची ही ट्रॅजिडीच आहे!"[१०] लहान वयात म्हणजेच बालपणात मैथिलीची अम्मा व मॅथ्यूज या शिक्षकाच्या संबंधाची जाण येऊनही आत्मभान जागृत ठेवणाऱ्या मैथिलीचे वेगळेपण वाचकांच्या मनावर ठसवण्यात लेखिका यशस्वी झाल्या आहेत, असेच मला वाटते. मैथिलीचा मुलगा अंशुमन याच्या जन्मानंतर बाप-लेकात आपण अलग पडतोय, याची जाणीव होऊन मैथिली घर सोडून बेंगलोरला नोकरी करते. त्याठिकाणी विधुर असलेल्या डॉ. सुधीर यांची मतिमंद मुलगी, त्यांचे एकत्र समाधानी कुटुंब यात ती रमत जाते, पण त्यांचा लग्नाचा प्रस्ताव नाकारते आणि अखेर शंतनूकडे परत येते. याठिकाणी मैथिलीच्या आधुनिक आणि पारंपरिक विचारसरणीमध्ये समन्वय साधणारी प्रगल्भता प्रत्ययाला येते.

व्यक्तींच्या वाट्याला आयुष्यात नेहमी दुःखच येते कारण परंपरा लावता येत नाही. अशा स्त्रीयांचे चित्रण आशा बगे आपल्या कादंबऱ्यातून घडवितात. आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री जीवन परंपरेचा व संस्कृतीचा त्यांच्यावर असलेला पगडा दिसून येतो. पारंपरिक भारतीय स्त्रीचे असे एक विलक्षण सामर्थ्य आहे. अशा सगळ्यांना सांभाळून घेणे करारीपणा, मनस्वीपणा अपार सोशिकता हे सगळे गुण आशा बगेंच्या स्त्रीपात्रांमध्ये आहेत. त्यांच्या कादंबरीतील नायिका या पुरोगामी विचाराच्या वाटत असल्या तरी त्यातील बहुतेक स्त्रिया या वेळ येताच संस्काराच्या आणि संस्कृतीच्या भानात शिरताना दिसतात.

'आमचा जन्म भिण्यातच गेला' असे म्हणणारी आत्या स्त्रीच्या मागच्या पिढीचे प्रतिनिधित्व करते, तर मनात येईल ते निर्धाराने पार पाडणारी बंडखोर - तडफदार मैथिली जबर आत्मतेज-आत्मविश्वास असणाऱ्या सध्याच्या पिढीचे प्रतिनिधित्व करते. मात्र, संवेदनशील, मनस्वी मैथिलीला कुठल्याच बाबतीत

शंतनू योग्य नसतानाही परिस्थितीवशात त्याच्याशी लग्नाचा निर्णय घेणे भाग पडते. तेंव्हापासून वाचक नकळत अस्वस्थ होतो आणि कादंबरी संपेपर्यंत मैथिलीच्या बरोबरीने व्याकूळ होतो.

"कावेरी परतली तेव्हा संध्याकाळ झाली होती, विलक्षण उकडत होतं. समुद्राकडूनही वारं येतं नव्हतं, झाडाची पानंही निःस्तब्ध होती, मैथिली फाटकाशी उभी होती."[११] आयुष्यातील प्रत्येक घटना समुद्रकिनाऱ्याशी मैथिलीचे जुळलेले नाते व तिचे एकटेपण दिसून येते. समुद्राशी निगडित येताना दिसते. ज्या 'भूमी' मध्ये मैथिली जन्माला आली ती भूमी तिला गवसली नाही. आई-वडिलांपासून ती सतत दूरच राहिली. आपल्या भूमीचा शोध घेणे म्हणजेच आपल्या अस्तित्वाचा शोध व आत्मशोध घेणे असाच अर्थ लेखिकेला अभिप्रेत असावा असे वाटते.

झाड ज्याप्रमाणे एका ठिकाणी रुजते, तसे मात्र स्त्रीचे होत नाही. स्त्री ही एका ठिकाणी जन्म घेते, दुसऱ्या भूमीत रुजते, तिची भूमी बदलते या दोन भूमीमध्ये जर तफावत असेल, तर तिचे ते रुजणे महत्त्वाचे ठरत नाही. स्त्री जीवनाचे रुजणे, उखडणे, पुन्हा रुजणे याही अर्थाने लेखिकेने कादंबरीचे शीर्षक 'भूमी' योजले असावे असे वाटते.

'मनस्विनी' कादंबरीत सौदामिनीचा जीवनप्रवास व जीवनातील अनेक प्रश्न येत राहतात. तिचे बाह्य मन पुन्हा पुन्हा यशोधनला नकार देत राहते व मन स्वाधीन नसले तरी शरीर आपणहून अमरच्या स्वाधीन करीत राहते. पण तिला साक्षात्कार होतो व ती दमयंतीला सारे सांगायचे ठरविते. "दमयंतीला काय सांगायचं? अमर आवडत नाहीत हे? असं कुठंय? पण कधी त्यांची मिठी गोठवून टाकते हे सांगायचं दमयंतीला. अमर कधी खूप सामान्य वाटतात. एका सुसज्ज फ्रेममधला संसार. पण निर्जीव त्याचे काठ काचतात. आपल्याला हे सांगायचं?"[१२] यशोधनच्या सहवासात फुलणारे सौदामिनीचे मन मग त्या मनाचे सगळे कंगोरे तपासून बघते.

दमयंतीचे सहज जगणे आणि सौदामिनीचे प्रत्येक ठिकाणी मन पिंजत जगणे, दोघीही स्त्रियाच, पण त्या दोघींचीही जीवन जगण्याची पध्दत निराळी. दोघींच्या स्वभावातील जी तफावत आशा बगे या ठिकाणी कुशलतेने मांडतात. दमयंतीप्रमाणे आपल्याला अमरेंद्रची वाट पाहणं जमतच नाही हे तिला माहीत आहे. "पुरे बाई तुमची तर्कट, साधं उमललेलं फुल तुम्हाला आनंद नाही देऊ शकत. फुलाची, फुलण्याची ॲनाटॉमीच कळायला हवी तुम्हाला. माणसाच्या मनाच्या मूलभूत प्रतिक्रिया त्या आपण सहजपणे का स्वीकारीत नाही?"[१३] या प्रश्नाचा ती स्वतः शोध घेते. आपल्याच पतीच्या बाबतीत सौदामिनीला पडलेले हे प्रश्न निश्चितच नवीन पिढीतल्या विचारसरणीतून आलेले आहे. पण तिच्या दृष्टीने यशोधन हा फक्त वळणापुरता आधार नाही, पण त्याला वगळून जगणेही तिला शक्य नाही. अशा चौकटी सोडायच्या नाहीत म्हणूनच तिची धडपड चाललेली आहे. या धडपडीतून ती जीवन प्रवास करते. अशा संस्कारबध्द स्त्रियांचे चित्रणच आशा बगे यांनी 'मनस्विनी' या कादंबरीतून ओघवत्या शैलीतून घडवून आणले आहे.

स्त्री चित्रणाच्या संदर्भात आशा बगे यांनी सामान्य स्त्रीपासून परिपूर्ण संस्कारी स्त्रीपर्यंत स्त्रीची विविध रुपे, आंतरिक ताणाबरोबर करियर म्हणून स्वीकारलेल्या दिसून येतात. स्त्रियांच्या संदर्भात डॉ. आशा सावदेकर म्हणतात, "असामान्य असूनही आपले वेगळेपण उमगू न शकलेली मनस्विनी, असामान्यपण जपत बंडखोरी करुनही सरळपणे जगता न येणारी आणि सामान्यपण पत्करुन पार्थिवाला शरण जात जगणे स्वीकारणारी वसुमती, सामान्य असूनही असामान्यता सावरण्याचे सामर्थ्य बाळगणारी दमयंती, सामान्य असल्यामुळे मुलीच्या पांगळेपणात मोडून पडलेली यशोधनची पत्नी वसुंधरा, सामान्यपण पत्कारुन जगण्याला अवघ्या अंगाने भिडू पाहणारी मंजू, आई वेगळेपणातून खऱ्या जगण्याला पारखी झालेली, पण जगता जगता झिरपत झिरपत लाभलेल्या पार्थिव सामर्थ्यातून त्यापल्याड झेपावू शकणारी,

सामान्याकडून असामान्याकडे पोहचणारी शारदा असे आगळे वेगळे स्त्री विश्व आशा बगे यांनी आपल्या कादंबरीतून साकारले आहे."[१५]

आशा बगे यांनी आपल्या कथांतून कुठलेही प्रयोग केल्याचे दिसून येत नाही. कथेच्या कुठल्याही वाहत्या प्रकारात त्यांची कथा रुप घेत नाही. तिच्या भाषेला अलंकारपणाचा सोस नाही. स्वतः लेखिका म्हणजे "विदर्भाच्या मातीचे ऋण हे माझ्या धमनीतल्या रक्तासारखे माझ्यात भिनले आहे. या मातीनेच मला माझ्या कथेतली माणसे दिली. त्यांच्या प्रेमाच्या, रागा लोभाच्या अनेक तऱ्हा दिल्या. त्या बघण्याची दृष्टी कदाचित माझ्यातल्या लेखिकेने मला दिली असेल. या माणसातील प्रचंड विसंगतीतूनही एक सुसंगती, खोटेपणातूनही एक सच्चेपणा मला जाणवला. त्यानुसार मी माणसामाणसांच्या नातेसंबंधाचा शोध घेतला. जीवनाचा अन्वय लावून पाहिला."[१६] हा शोध घेताना पात्रांच्या मनोविश्वाचा, त्या हळुवारपणे कुशलपणे वेध घेतात. हे चित्रण करतानाही त्यांच्यातली गुंतागुंत त्या सहज शैलीतून व्यक्त करतात.

एका मनस्वी मनाच्या स्पर्श कोवळीकतेतून उमटलेली भावविश्वे उलगडून दाखवणारी त्यांची पहिलीच कादंबरी 'मनस्विनी' पाहिली, तर तंत्रावरील पकड कुठेही सुटलेली दिसत नाही. शारीरिक पातळीवरील परमोच्च बिंदूचे आकर्षण असणाऱ्या मिटता मिटतांच फुलणाऱ्या आणि फुलताच मिटणाऱ्या नायिकेचे मनोविश्व भावनिक आणि तार्किक पध्दतीने नेटकेपणाने बगे मांडतात. खरं म्हणजे कादंबरीकार आपला प्रकृतीधर्म आणि जीवितानुभव यांच्या अनुषंगाने लेखक करतो. संगीतकलेवर प्रेम करणाऱ्या नायिकेचे मन या लेखिकेला गवसले आहे.

मैफिलीतल्या क्षणांचे सौंदर्य उलगडून दाखवता आले आहे. आभाळ, पाणी, समुद्र, संध्याकाळ या साऱ्या गोष्टीचे लेखिकेचे वेड इथे कळते. सर्वच प्रतिमाने तरल अशी होऊन येतात. कित्येकदा काव्यात्म शैलीमुळे ती पेलवतात नाहीतर हा दोष कादंबरीला रसभंग करणाराच ठरला असता. पण प्रतिमांची,

प्रतीकांची, संगीताची बंदिशी त्यांची भाषा अलगद साधून घेते. "पहिले बिहाग. बिहाग हा रागच गोड, हळूवार, त्याच्या प्रत्येक सुरावटीत काही वेगळं चित्र उभ करण्याचं अलौकिक सामर्थ्य आहे. मिटलेली पाकळी न पाकळी कुणी हळुवार उलगडावी असे ते सूर! हे सारे आपल्याच भावनांचे आपण त्या सूरावर केलेले आरोप. तरी ते खरं करुन दाखवण्याचं कसब त्या सूरातच होतं. सतारीवर यशोधन बिहाग वाजवत होते आणि सौदामिनीला आठवून गेली जसराजची ती चीज बिहागातली"लट उलझी सुलझारे बालमा हातोमें मेंदी लगी "[१७]

आशा बगे यांच्या साहित्यात माणसामाणसांतील नातेसंबंधाचा शोध हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हा शोध घेताना पात्रांच्या मनोविश्वाचा हळूवारपणे वेध घेतात. व त्याचे चित्रण करताना त्यांच्यातील गुंतागुंत त्या सहजशैलीतून व्यक्त करतात. एका मनस्वी मनाच्या स्पर्शातून उमटलेली भावविश्वे उलगडून दाखविणारी कादंबरी आहे. यातून आशा बगे यांच्या शैलीचे वेगळेपण जाणवते. आशा बगे यांच्या शैलीविषयी सुलभा हेर्लेकर लिहितात, "बगे यांच्या शैली शैलीत लय आहे, भावनाचे उसवलेपण आहे. उफाळणेपणही आहे पण ते शांत रसातले आहे."[१८] जीवनाकडे एका वेगळ्याच पातळीवरुन बघणाऱ्या आशा बगे यांच्या लेखनातही चिंतनशीलता आणि काव्यात्मकता आढळते.

'मनस्विनी' कादंबरीत निसर्ग प्रतिमातून त्या नायक नायिकांच्या सुख-दुःखाचे वर्णन करतात. पात्रांच्या विचाराच्या, घटनेच्या संदर्भातही निसर्ग येतो तो त्याला पार्श्वभूमी म्हणून, पण तो त्या घटनेत मिसळून जातो. "सूर्याचा लालभडक गोळा अर्धा आभाळात रुतलेला, अर्धा उरलेला, पुरा बुडतांना कुठं कुठं जखमा करणारा हा?"[१९] माणसांच्या जीवनातील विविध प्रवाह त्यांच्या लेखनातून आढळतात.

'मारवा'मध्येही आपल्या वडिलांचं, तात्यांचं गीत गाताना, "आपल्या वडिलांचं तात्यांचं हे पद रघुनाथ गाळतो की काय, म्हणून आबा जरा साशंकच होते. हे पद आबा तात्यांसारखं मूलागतीत घ्यायचे. रघुनाथने ते 'मारव्यात'

घेतले. सूर्य आभाळात रुतत चालला असता ही चाल आबांना फार गोड वाटली. रघुनाथ आणि नाना हेडाऊ यांचा स्वर, टाळ, पेटी, पदांचे शब्द, त्यांचा अर्थ आणि माणसांनी फुललेले गोपाळकृष्णाचं हे मंदिर सार एकजीव झालं होतं. एका मयसभेत बुडालं होतं."[२०] किंवा 'रंग' मध्ये रियाज करताना देवेंद्र अनेकदा म्हणायचा, ते तिला आठवलं. मला नेहमी वाटतं की, या साऱ्या रागांना काही रंग असावेत. सारंगाचा फिकट निळा, पुरिया धनश्रीचा हिरवा, मारव्याचा केशरी, भैरवीचा शुभ्र पांढरा.आणि यमुनाचा या साऱ्यांच्या मिश्रणाचा रंग'. ही सारी उदाहरणं बगे यांचा संगीतावरील अभ्यास तर दर्शवितोच पण कथेतल्या प्रवाहात ते संगीत कुठेही उपरे, कृत्रिम होत नाही. एकजीव होते आणि बगे यांच्या शैलीचे व भाषेचे इथेच वेगळेपण जाणवते.

निसर्गाची प्रतिमानं, प्रतीकं तर कथावस्तूत मिसळून गेली आहेत. त्यांच्या निसर्गप्रतिमांन नायक-नायिकांचे सुख-दुःखाचे हुंकार उमटले आहेत. एखाद्या विचाराच्या, घटनेच्या संदर्भातही निसर्ग येतो तो त्याला पार्श्वभूमी म्हणून, पण तो निर्मळपणे त्या घटनेत मिसळून जातो. एक गुलमोहराचे, सूर्याचे संध्याकाळचे लेखिकेला अतोनात वेड आहे.

"रुक्मिणी' यात रेणूवर खोलीत गेली. गॅलरीतून गुलमोहर पूर्ण दिसत होता. गुलमोहरावरलं आभाळ केशरी होत चाललं होतं. त्यावर लक्ष्मी नारायणाचा कळस सुरेख उमटून आला होता. गुलमोहराचे लाल तुरे तर अगदी आभाळाला भिडले तसे वाटले. पंतांच्या त्या अभंगाच्या केशरपिवळ्या ओळी देवळातल्या घंटेसारख्या मनात किणकिणल्या आणि अगदी एकट्या, अलग, त्या ओळींशी पंतांची मंदिराची कुठलीही हळवी आठवण जोडलेली नव्हती."[२१] आशा बगे यांच्या शैलीत लय आहे. भावनांचे उसवलेपण आहे. पण ते शांत रसातले आहे. बगे यांच्या कथेन जीवनातील माणसामाणसांच्या नात्याचे दर्शन घडवून जीवनाच्या गाभ्याजवळच कथा पोहोचवली. प्रयोगशीलतेतून जुनी बंधने

तोडली तरी जुन्याशी साधणारी नवी बंधने नवी मूल्येही असू शकतात हे प्रथम लेखिकांमध्ये आशा बगे यांनीच दर्शविले आहे.

जीवनाशयाकडे एक वेगळ्याच पातळीवरुन थोडेसे भय, थोडा धीटपणा, स्त्री म्हणून मर्यादाशीलता, जुनी परंपरा, नव्याने पुनः वर्तुळात घेणे, आणि कलेच्या संदर्भात तर एका-पिढीकडून आलेला वारसा दुसरी पिढी घेते, तेव्हा तो टिकवला पाहिजे, या धारणेने एका वेगळ्याच वैशिष्ट्याने आशा बगे यांचे कथाविश्व फुलले आहे.

'सेतू' कादंबरी ही ताणावरच आधारित केंद्रित झालेली आहे. माणसाच्या मनात असले तरी सर्वच मनामनांमध्ये सेतू बांधता येत नाही. कधी बांधण्याचा प्रयत्न करुनही ते ढासळतात. कधी प्रयत्न न करताही ते निर्माण होतात. या कादंबरीत ब्रिजमोहनचे अबोलेपण व त्यांची ढासळलेली प्रकृती सगळेच स्पष्ट होत जाते आणि त्यातूनच त्याची ढासळती अवस्था जन्माला आलेली दिसते. ब्रिजमोहन लहान मुलासारखा घामानं थबथबला होता. सुचिताचा पदर घट्ट ओढून तो झोपला. लहान मूल आईच्या पदराआड झोपावं तसा. "माणसांचा इतरांबरोबरच स्वतःवरचाही विश्वास उडतो. अमुक अमुक म्हणून असलेली त्यांची स्वतःचीच ओळख हरवते. मग एक आभासात्मक जग तो स्वीकारतो. त्यातच रमतो. माणूस प्रथम वास्तव स्वीकारत नाही आणि नंतर त्यापासून तो दूर फेकला जातो मला भीती वाटते, की ब्रिजमोहनची ही अवस्था दूर नाही."[२२]

'सेतू' कादंबरीच्या शेवटी ब्रिजमोहन व सुचरिता यांचा मुलगा उदित जेंव्हा वेगळे वागताना दिसतो. ऑफिसमध्ये जात नाही. बॅडमिंटन खेळत नाही, त्यावेळी सुचरिता अस्वस्थ होते, तेंव्हा मुलगा आईला स्पष्टपणे विचारतो, "मम्मी, तू म्हणतेस तसं, तू म्हणशील तसं मी किती दिवस करत राहायचं? मला वाटतं ते मी केंव्हा करायचं? डॅडीनाही असचं बांधून ठेवलंस आणि त्याचे हे परिणाम तूच भोगतेस सर्वात जास्ती' उदित!' मम्मी, मला असं गुळगुळीत जगता येणार नाही तुमच्यासारखं, सगळं रान पेटत असताना त्याचा एक भाग

होऊन राहणंच मला मानवेलं."[२३] उदितच्या रुपाने तिच्या वागण्याचा अर्थच तिच्या समोर उलगडत जातो. एक प्रकारे सुचरिताच्या अहंकाराने ब्रिजमोहनचा बळी गेला आहे.

ब्रिजमोहन व सुचरिता यांच्यातल्या संवादातून, "उदित म्हणतो, की तू माझ्यावर काही लादू नकोस. तू डॅडीना बांधून ठेवतेस. ब्रिजमोहनचे डॉक्टर म्हणाले की, तुम्ही ब्रिजमोहनची फक्त पत्नीच नाही तर आई, प्रेयसी, मैत्रीण सर्व व्हायला हवं म्हणजे कुठल्याही एका नात्याच्या करकचून खुणा उमटायला नकोत, अस एक निरपेक्ष नातं हवं आहे ते कुणाला जमेल? दादांनी ते जमवून दाखवलं का? आणि आपल्याला ते जमलं नाही म्हणून म्हणून सगळ असं झालं?"[२४] आशा बगे यांनी प्रश्नार्थक शैलीने मांडणी केलेली आहे. "आपल्याला लहानपणी वाटलेलं आहे. इतके वेळा ट्रेनचा प्रवास केला, पण आता ते सगळं विसरलो का? माणूस असा असा का असतो? तसा तसा का नसतो? हे फक्त अस कुणी एका दुसऱ्यावर किंवा त्याच्या स्वतःवरही कधी असतं का? इतक वरवरचं काही नसतंच ना. एकमेकांशी जोडून ठेवणारे एकमेकांपर्यंत पोचता येणारे पूल हळूहळू केंव्हातरी मोडून पडले."[२५] आयुष्य हे माणसाच्या हातात नसतेच. काय खरं काय आणि खोटं काय, प्रत्येकाची वेगळी ओळख असते का? काही माणसे आभासातच रमतात.

एखादा कसदार चांगला अनुभव त्याचे ताकदीने सादर करण्याची अभिजात कलात्मक जाणीव तेवढी ती बाळगते आणि उत्तम कलाकृती निर्माण करते. सुप्रसिध्द समीक्षक कै. प्रभाकर पाध्ये म्हणतात, "उत्तम कलाकृतीचे एक गमक असे की ती सादर करीत असलेला अनुभव कसदार असायला हवा. म्हणजे त्याच्या आस्वादाने आपल्या चित्तवृत्ती खडबडून जाग्या व्हायला हव्यात. आपल्या शरीरात उर्जा असते. तिचेच रुपांतर संज्ञाशक्तीच्या रुपाने झालेले आहे. साधारणपणे ती सौम्य स्वरुपात वावरते. काही विशेष अनुभव आला म्हणजे ती जागृत होते. पुष्कळदा या अनुभवात पलीकडे जातो. पुष्कळदा त्याचे

विसर्जन करतो पण कलात्मक अनुभवात आपण त्याच्या कला चाखण्यासाठीच रंगतो. अनुभवात असे रंगण्यामुळेच त्याला एक जिवंत स्वरुप प्राप्त होते. आता हा अनुभव फिका असला अगर नेहमीचा सामान्य असला, तर त्यात आपण रंगणारच नाही. तो कसदार असा थोडा वेगळा असला तरच आपल्या चित्तवृत्ती त्यात रंगतील आणि रंगता रंगता उत्तेजित होतील."[२६] आशा बगे यांच्या कथा अशा कसदार अनुभव मांडणाऱ्या कथा आहेत. तिथे त्यांना कसल्याही युक्त्या कराव्या लागल्या नाही.

एखादे नाटक, एखादा सुंदर आळवलेला राग, एखाद्या रेणूसारखीचे बालपण, तर एखाद्या छोट्याला आपल्या घरात पुराचं पाणी यावं, असं वाटणारं अशा घटनांचे अनुभव त्यांना आवाहन करतात. त्यांचे नुस्ते विषय पाहिले तरी ही गोष्ट लक्षात येते. एखादा बोललेला नवस, एखाद्या गायकाला झालेला अपघात, रुक्मिणीतील आश्रित, आश्रयदाते, चितारओळीतली पिढीजात कला, 'मारव्या'तले दोन पिढीतले गाण्याच्या बंदिशीतले अंतर, अनाथ गायत्रीचे अनाथपण निवडूंगमधले किंवा एखाद्या मृत्युने बेचैन होणारी वसुधा, असे कितीतरी विषय बगे यांची लेखणी हाताळते.

"झुंबर' या कादंबरीतील शैली ही अशीच आहे. ज्यासाठी आपण आयुष्यावर धडपडतो, तो हा साडेतीन हाताचा देह म्हणजे खरचं काय असतं? ते मला यावेळी कळलं. दोन वेळा मिस्टर पंडित मृत्युच्या अगदी जवळ जाऊन मागे फिरले.मला वाटतं मानवी प्रयत्न जिथे संपतात तिथे एक वेगळीच सरहद्द लागते. तिथे फक्त आपली श्रध्दा निष्ठाच आपल्याला बळ देऊन जाते. सगळ्याच गोष्टी तर्काच्या हद्दीत बसत नाहीत. तर्काने गोठलेली शेवटची पायरीही इथे माणसाला सोडावी लागते. आधी झालेल्या प्रवासातला अहंकार अजिबात जमेस धरता येत नाही. अशी ही चमत्कारिक वेळ"[२८] बगे यांच्या शैलीतली शब्दयोजना, शब्दकळा ही किती तोलून मापून आणि वेचक असते त्याची ग्वाही देण्यास एवढी उदाहरणे पुरेशी आहेत. ही शैली इतकी अर्थपरिपूर्ण

आणि चित्ररम्य आहे की तिचे ताकदीचे विषय तितक्याच ताकदीच्या व्यक्ती आणि प्रसंग यांची सुंदर बंदिष ती बांधू शकली. 'झुंबर' या कादंबरीतील हॉस्पिटलचा परिसर, वातावरणनिर्मिती, ऑपरेशन्स या सर्वांचा जवळून अनुभव घेतलेली, स्वभाव रेखनातील हेलकावे ही शैली सूक्ष्म रीतीने लेखिका टिपते. साहित्याची मूळ प्रेरणा जी सौंदर्य सृजनता तिचा आणि लेखिकेच्या आत्मिक पातळीवरील असणारी वास्तवता यांचा सहज सुंदर मिलाप त्यांच्या लिखाणावर आढळून येतो.

मोजक्या शब्दात एखादी घटना, प्रसंग वाचकांच्या डोळ्यांसमोर अगदी जसाच्या तसा उभा करण्याची त्यांची हातोटी जणू काही वाचकच त्या अनुभूतीतून जात आहे, असा आभास निर्माण करणारी त्यांची शैली, कसदार अनुभव ताकदीने सादर करण्याची कलात्मक जाणीव आशा बगेच्या कादंबऱ्यांत जाणवते.

आशा बगे एखादे विशिष्ट अनुभवविश्व समोर आणतात तेव्हा ते अनुभव वाचकाला साधारण वाटतील, असे नेहमीच्या परिचयातले व घरगुती असेच असतात. तरीपण लेखिकेला त्यात काहीतरी सांगायचे असते. जे वाचकाला नेहमीच्या परिचयामुळे जाणवलेच नसते, मग तो 'महावस्त्र'मधील मोरेश्वरमध्ये वा पाव्हुणामधील नरसय्या मजूर, किंवा 'मनस्विनी'मधील अमर, यशोधन, नाहीतर 'झुंबर'मधील डॉ. अधिकारी असो, ही सर्वच पात्रे निराळ्या, ठळक व परिणामकारी रेषा घेऊन चित्रकाराच्या चित्रकृतीसारख्या समोर येऊन साकार होतात. लेखिकेची ही प्रतिभावान सर्जनशीलता फार थोड्यांच्या वाटयाला येते. कथाक्षेत्रातील व्यक्तिरेखाटनाला एक नवे अस्तित्व बगे यांनी दिले आहे. काव्यात्म शैली आणि व्यक्तिचित्रणं ही दोन वैशिष्टये त्यांच्या कथालेखनाचे कळस बिंदू आहेत असं म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही.

आशा बगे यांच्या कादंबऱ्या या कुठल्याही चौकटीत अडकत नाहीत. त्यांचे शेवटही खुले असतात. तर 'मनस्विनी' मध्ये मनासारखे जगणे म्हणजे

काय? याची विलक्षण समजच पायरीपायरीने साकारते. त्यात पतिव्रत्याच्या कल्पनांची झापडे नाहीत. 'झुंबर'मध्ये पती जिवंत असतानाच नव्याने जगण्याचा प्रयत्न करीत जीवनप्रेमाला सामोरी जाणारी स्त्री चितारुन एक वेगळी तगमग आशा बगे मांडतात.

अधिकाधिक उत्सुकता निर्माण करणाऱ्या छोट्याप्रसंग मालिकातून अनुभवाचा आकृतिबंध काढण्याचा छंद बगे यांना आहे. 'रुक्मिणी', 'नवस', 'बंदिशाळा', 'अत्तर', 'पूर', 'रंग', 'मारवा' इत्यादी कथांत हा आकृतिबंध विशेष खुलला आहे. प्रत्येक प्रसंगात नव्या भावनांचा वापर योजून अनुभवरुप 'मी' समृध्द करणे व त्या अनुभवात भावनांची गर्भिते ठेऊन जाणे, असे दुहेरी कार्य साधले आहे. कथांमधली नायिका 'मी' असली तरी ती अनेक अंगांनी बोलून एकत्वाला पोहचते. मग कथा अधिक अर्थगर्भ होते, आकृतिबंधही त्यातल्या रचना बंधासकट सूचक होती, तर कधी सलग घटनांचा ठसा बगे जाणीवपूर्वक उमटू देतात. उदा. 'मारवा' कथासंग्रहातील 'डोळे' या कथेत का जातात? प्रत्येकजण, सुटा स्वतंत्र संदर्भहीन का नसतो?इतकी कशी दुसऱ्यावर रेलून चिकटून आयुष्यं काढावी लागतात नको असताना? एका सुंदर काळ्याभोर पापणीच्या डोळ्याशेजारी दुसरा बटबटीत डोळा, विसविशीत, उसवलेली नजर हे केवळ शब्दविवरण नाही. उलट डोळ्यांच्या अथांग अनुभवाचा हा आलेखच आहे. सुटा जगू शकत नाही म्हणजे पारतंत्र्याची भावना आहे. रखरखीत आयुष्य आहे. शब्दांच्या गाभ्यातून कितीतरी अर्थपदर पाकळ्यासारखे दिसतात.

आशा बगे यांच्या कथांतील पात्रे पुढे जीवनानुभवाच्या कॅनव्हासवर आभाळभर पसरतात. आपण त्यांच्या कथाघरातून सहजपणे वावरत असतो. पण ती जेव्हा असे काही व्यामिश्र अनुभव निर्माण करतात की, आपल्याला त्यांच्या मूल्यांवरच थांबणे भाग पडते. त्यांच्या नायिकांचा त्रास हा भोग असतो. भोगांना नि त्यागालाही मग मर्यादा नसते. सारेच अनाकलनीय वाटते. कधी कधी वरवर समजलेलं पण उमजल्यावर काहीच न कळलेलं. सुखाच्या,

स्वातंत्र्याच्या शोधात फिरणारी ही सत्य एका प्रसंगाची सत्य दुसऱ्याला, दुसऱ्याची तिसऱ्याला, यातूनच निरीक्षणाची अरण्ये आपल्या सभोवती चक्रव्यूहासारखी उभी ठाकतात. कधी अवाक होऊन कथा अवस्था बाहेरची होते.

'झुंबर' या कादंबरीतील वसुमती ही हट्टी आहे, पण आत्मभानाने तिचे मार्ग उजळलेले आहेत. तिची स्वतः वृत्तीशी चालणारी झुंज लेखिका एका विशिष्ट शैलीतून व्यक्त करते. आशा बगे यांच्या स्त्री पात्रचित्रणाची एक विशिष्ट कला आहे. तसेच 'मनस्विनी' व 'झुंबर' या दोन्ही कादंबऱ्यांतून पुरुषपात्रे ही स्त्रीला पूर्णपणे समजून घेणारी आहेत. तिची तगमग त्यांच्याही लक्षात येते. स्त्रीचा कुठल्याही प्रकारे अपमान ते करीत नाहीत, तर 'व्यक्ती' म्हणूनच तिचा विचार करताना दिसतात. कदाचित त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीच या असामान्य अशा पुरुषांना समजून घेण्यास कमी पडते की काय, असे प्रश्नही या आपल्या कादंबऱ्यांतून उपस्थित करतात.

आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन हे या सर्वांहून वेगळे. सद्भावनेच्या सत्प्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यावर आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत, वैकल्ये, कीर्तन, संस्कार, आचार यांच्याशी जवळचे नाते असलेले त्याचे हे विश्व आहे. स्त्रीच्या अंतविश्वातील भावभावनांवर आंदोलने स्पंदनावर आपली दृष्टी स्थिरावणाऱ्या आशा बगे केवळ स्त्रीच्या दु:खाच्या आगतिकतेच्या कथाच रेखाटत नाहीत तर पुरुषांच्या मानसिकतेवरही त्या भर देतात. त्यांच्या कादंबऱ्या वाचल्यानंतर त्या स्त्रीने लिहिल्या की पुरुषाने असा प्रश्न पडण्याइतके आशा बगे यांचे लेखन तटस्थ आहे.

'त्रिदल' मध्ये मंजू आणि शारदाची मैत्री, नंतर मंजूचा भाऊ श्रीनिवास आणि शारदा यांच्यात निर्माण झालेले प्रेम, त्यामुळे मंजू-शारदा-श्रीनिवास यांच्यात भावसंबंधाचे बदलत जाणारे सूक्ष्म रंगतरंग यांना या कादंबरीत महत्त्व

आहे. कादंबरीला रुढ अर्थाने नायिका नाही. मंजूच्या बाजूने पण निवेदन मंजूकडून होत नाही. निवेदक परका आहे. मंजूला दिसलेली शारदा, मंजूला जाणवलेला श्रीनिवास आणि मंजूचे मीपण यातून त्रिदल घडते.

"दहा होत आले तरी थंडीचा दिवस अद्याप मिटूनच बसला होता. आभाळ गच्च भरल्यासारखं वाटलं. खिडकीतून गार वारं आलं आणि वाऱ्याबरोबरच शिंपडल्यासारखे पावसाचे एकदोन थेंबही शारदेला खिडकीशी उभंही राहवेना आणि आतही वळावसं वाटेना."[२९] निसर्गातील घटनेचं वर्णन आशा बगे यांनी अचूक शैलीत केलेले आहे. 'सेतू' कादंबरीत जुन्या रुढीपरंपरांना महत्त्व दिलेले आहे. उदा. "पण कावळा ओरडण्याचा नि कुणी येण्याचा अर्थाअर्थी संबंधच काय?"[३०] शारदेला मंजू म्हणते, तुझ्यासारखी कशानं ग? तू काय एकटी आहेस? आई नसली तरी तुझे बाबा आहेत, काका-काकू आहेत. आम्ही आहोत. झालंच तर तुझी नर्मदाही आहे. निसर्गातील व मानवी संबंधातील नाती येथे चित्रित केलेले दिसून येते.

श्रीनिवास आणि शारदा यांच्यातील मैत्रीचे नाते येथे जपलेले आहे. श्रीनिवास तिच्या घराबद्दल, घरच्या माणसांबद्दल विचारलं, सगळ्यांबद्दल ती सांगते, "मघा तुम्ही निवांत, म्हणाला नं, आमच्या नर्मदेच्या काठी कुठल्याही वेळी तसं वाटतं, गर्दीतही एकान्त असतो. आणि तरीही आपण एकटं असं नसतो. नर्मदेची सोबत असते. पण ती आपल्याला एकटंही सोडते आणि सोबतही करते. तुम्ही पाहिली आमची मंडल्याची नर्मदा?"[३१]

'सेतू' कादंबरीत नायिकांना पडणारे प्रश्न त्यांना आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील चिंतनशीलता, काव्यात्मकता, प्रतिमा प्रतीकांची संगीताच्या सहाय्याने साधलेली बंदिशी, त्यांच्या निवेदनात महत्त्वाची ठरते. कारण चिंतनशीलतेतून त्यांच्या नायिकांच्या किती तरी दुःख पेलण्याच्या छटा व्यक्त होत राहतात. 'सेतू' या कादंबरीत त्यांनी वापरलेली नर्मदेची प्रतिमा खऱ्या अर्थाने तिच्या आयुष्याशी बांधली गेलेली आहे. "नर्मदा मी भेडा घाटला

पाहिली आहे बाई. धुवांधार बघायला गेलो होतो. बोटिंग करताना तर मला भीतीच वाटली."[३२] नर्मदा नदी ही जीवन प्रत्येक क्षणा क्षणाला आठवण करुन देते.

संगीत, प्रेम, साहित्यप्रेम, चिंतनशीलता, निसर्गप्रेम आणि काव्यात्मक वृत्ती अशा विविध रंगांनी त्यांचे कादंबरीविश्व रंगलेले आहे. "तुमच्याकडे वारं काय सुरेख येतं! कानाशी नुसतं घोंघावत आहे. मघा मी गच्चीवर गेले होते, तर वाऱ्यानं अक्षरशः मागं फेकली जात होते. झाडं सुध्दा नुसती अंगात आल्यासारखी सळसळत होती. इथली सकाळ फारच आवडली हं मला."[३३] तसेच या कादंबरीत साधी माणसं व एकमेकांविषयीचा जिव्हाळा चित्रित केलेला आहे. शारदा आजारी पडल्यानंतर तिला जीवन हे नकोसे वाटते. "हे कसलं जगणं! जवळचं हिसकावून घेतल्यावर उगाच दिवस ढकलत राहायच!"[३४] श्रीनिवास शारदेला सगळ्या गोष्टींकडे तू वेगळ्या तऱ्हेनं बघू शकतेस, अशा शैलीत आशा बगे यांनी मांडलेले आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यात स्त्रीवादी विचारधारेची चाकोरी बाजूला ठेवून स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळ्या पातळ्यांवर शोध घेते. पुरुषप्रधान व्यवस्था किंवा पुरुषसत्ता यांपेक्षा वेगळी आव्हाने या स्त्रियांसमोर उभी राहतात. आणि त्यांना तोंड देताना यश किंवा अपयश, जय किंवा पराजय या सर्वसामान्य संकेतांच्या पलीकडचे श्रेय त्यांना सापडते. 'आकाश' या कादंबरीत पात्रे कमी आहेत. महेश, अशोक हे मित्र, उर्मिला-अंजली या त्यांच्या धर्मपत्नी आहेत. कादंबरी उर्मिले भोवती विणलेली आहे. ती स्वाभिमानी, जगण्याला सरळ तोंड देणारी, तर नवरा महेश खोट्या अहंकाराखाली, स्वतःच्या दुबळेपणात झाकणाऱ्या दोघा पती-पत्नींमध्ये ताण आहेत, "स्वतःच काम नसताना तालमीत लक्ष दिलतं, तर आपल्या भूमिकेतले सगळे निसटलेले बारकावे कळत जातात आणि आनंद देतात."[३५] या कादंबरीत आशा बगेंनी नाटक या वाङ्मय प्रकारालाही चालना दिलेली दिसते.

"कुणाला काय वाटतं, हे काही महत्त्वाचं आहे, की यावेळी आपल्याला काय वाटतं, हे महत्त्वाचं आहे?"[३६] यातून लेखिकेची प्रश्नार्थक शैली दिसून येते. आशा बगेंनी निसर्ग व समुद्र यांचे वर्णन अचूकपणे मांडलेले आहे. "मला हे आभाळच आता समुद्रासारखं आहेसं वाटतं. समुद्र दूर आणि आभाळ जवळ इथं खिडकीशी!"[३७] व्यक्तीव्यक्तीमधल्या नात्यांचे विविध आकृतिबंध त्यांच्या कादंबऱ्यांत आढळतात. सौहार्द, प्रेम, जिव्हाळा, संवाद याबरोबरच दुरावा, विसंवाद किंवा संवादच न संभवू शकण्याची स्थिती, यातून व्यक्तींच्या जीवनाचे आकार बदलतात. सभोवतालची झाडं, आभाळ, ढग, त्यांचे आकार यांत गुरुटलेलं अवकाश, स्वतःच्या जगण्यातल्या अंधार प्रकाशाचे सारे तोल, या वेळी सारं आतूनच खोलवर जाणवत गेलं. आयुष्याच्या पोटात एक रहस्य दडलेलं आहे. अशा कित्येक वेळा ते गुपित देऊ करत होतं आणि आपण आपले हात बांधून ठेवले. ओंजळ पुढ केलीच नाही. हात पुढं झालेच नाहीत. अशा वेळा वारंवार येत नसतात. ती वेळ पकडून ठेवता आली नाही. आपल्याला, कसल्या तरी अदृश्य, अनामिक भितीनं आपण बध्द होतो. आशा बगे यांनी मानवी जीवन व नैसर्गिक प्रतिमांचा यांचा मिलाफ घातलेला आहे.

'मुद्रा' या कादंबरीत निरंजनची व निरुची कथा आहे. या कथेत निरंजन पायाने आधू आहे. या कादंबरीत भौगोलिक घटनांना स्थान दिलेले आहे. 'मुद्रा' मध्ये दिल्ली शहर, त्यातील मुलींवरच्या अत्याचाराची व लहान मुलांची शाळेची बस पळवून नेल्याची घटना, तसेच नीरुच्या घरात चोरी होणे, ललिता पाराशटांच्या संगीत विद्यालयाला समाजकंटकांनी आग लावून देणे, अशा घटनाही येतात. "वास्तूच जळून खाक झाली. तिच्यातला वास्तुपुरुषही जळून गेला."[३८] बाईंचे शब्द खोल विहिरीतून जणू त्यांचे शब्द आले असे वाटले. वास्तुपुरुष तर तुम्हीच आहात बाई! तुम्ही तुमचे गुरु असे निरु म्हणाली.

'मुद्रा' या कादंबरीत संगीत व गायन यावर भर दिलेला आहे. अनेक कार्यक्रम व संमेलनातलं रेकॉर्डिंग, मोरेश्वर शास्त्री यांचाही संवाद आलेला

आहे. "गाण्याचे हे वळण तर तुझ्यात असणारच आहे. कधी ना कधी तुला ते समजून घ्यायचे आहेत ते तुला एकत्र होता कठीण नाही. पण गाण्यात एक वेळ अशी येते, जेथे सारे प्रवाह एकत्र होतात. तिथे पोहचण्याचा प्रयत्न कर."[३९] कोणतीही गोष्ट शिकताना परिश्रम व जिद्द व चिकाटी लेखिकेने मांडलेली दिसून येते. त्यामुळे कादंबरीत काही नाट्यमय, अनपेक्षित प्रसंग दाखल होतात, व्यक्ती या प्रसंगांना किती धीराने सामोरे जातात ते कळते; पण येथेही काही आशय सूत्रांमध्ये काही नवे पीळ निर्माण होतात असे नाही. तथापि, या सर्व कादंबऱ्यांमध्ये जी मूल्ये, जे आदर्श संस्कृती आणि परंपरा यांच्यातील सत्वांच लेखिका दाखवते, "प्रभाते मनी राम चिंतीत जावा, पुढे वैखरी राम आधी वदावा."[४०] रामाचं मनातलं चिंतन वाणीनं उच्चार होईल, राम या नावाचा, तो पुढे आधी तो उच्चार मनातच उमटेल. सकाळी अशा शुचिर्भूत वेळेला रामदासांचा हा श्लोक निरुच्या मनात येत राहातो, हे स्पष्टपणे मांडलेले आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांत मध्यमवर्गीय, सुशिक्षित, सुसंस्कारित ब्राह्मण पात्रांच्या चित्रणांतून व त्याच्या भोवतीच्या वातावरणातून समाजाचे अप्रत्यक्ष दर्शन घडत जाते. त्याचबरोबर हा वर्ग भोवतीच्या सामाजिक बदलापासून किती अलग होता हेही स्पष्टपणे दिसून येते. मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटंबाची खाद्यसंस्कृती, देवाची नवरात्र, त्यातले अखंड टाळ, संक्रांत, माघी पौर्णिमा देव देवक, वास्तुशांत अशा उल्लेखांनी व त्या संबंधातल्या शेकडो तपशिलांनी ही संस्कृती अधोरेखित केली जाते.

'त्रिदल' ही संपूर्ण कादंबरी मराठी ब्राह्मण कुटुंबातील नाती, संस्कृती, श्रध्दा, सणवार, संकेतांसंबंधीच्या समजुती, धार्मिक विधी, मंगळगौर, डोहाळे जेवण, पूजाअर्चा, अशा तपशिलांतून त्यासंबंधीच्या संवादातून आकार घेत जाते. कुलदैवत असलेली माहूरची रेणुका, तिचे नवरात्र, अष्टमीचा उपवास, दुसरे दिवशी पारणे, अष्टमी-नवमीला अखंड टाळ, देवघर, देवीची तसबीर, देवीची स्तोत्रे, तेवणारे नीरांजन, देवीची आरती असे सर्व तपशील

बारकाव्यांनिशी येतात. श्रीनिवासची खोली, ज्ञानेश्वरांची तसबीर समोर अंथरलेले हरिणाजीन असे वातावरण येते. शारदेला सर्पाचे युगुल दिसते तेंव्हा ते अशुभ मानले आहे. अशी जोडी पाहिली तर आपल्या जोडीपैकी एक फुटतो, अशी आपली जणू समजूत आहे, हे दिनूमामाचे सांगणे पुढे खरे ठरते. ते शारदेचा मृत्यू समोर दिसतो. तेंव्हा, यातून जुन्या चालीरीती, रुढी परंपरा व अंधविश्वास त्यांच्या लेखनातून आलेला दिसून येतो.

## ५.३ आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील आशयसूत्र -

कादंबरीचे कथानक व पात्रे एका विशिष्ट स्थलकालाच्या पार्श्वभूमीवर आकार धारण करते. कादंबरीतील घटना-प्रसंगाला वास्तवता, अस्सलता प्रदान करुन त्यांचे रहस्य उलगडण्याचे कार्य वातावरणाला करावे लागते. कादंबरीतील घटना विशिष्ट स्थळी घडत असते. त्यातून स्थलनिष्ठ वातावरण निर्माण होते. स्थलवाचक भू-प्रदेश, निसर्ग व भौगोलिक परिस्थिती यांचा स्थलनिष्ठ वातावरणात समावेश होतो. हा भू-प्रदेश प्रत्यक्षात अस्तित्वात असू शकतो किंवा वास्तवाशी नाते ठेवत लेखक कल्पित भू-प्रदेशाचीही निर्मिती करु शकतो. कादंबरीत कालनिष्ठ वातावरणालाही विशेष महत्त्व मिळते. मग हा काळ 'भूत-वर्तमान-भविष्य' पैकी कोणताही असो, तो स्वतःच्या अंगभूत गुणधर्मांनी प्रकटला असेल, तर त्याला कादंबरीत महत्त्व मिळते. या बरोबरच कादंबरीत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक घटकांनाही वातावरणाचे स्वरुप पात्रातून दिसून येते.

कादंबरी ही विशिष्ट अशा वातावरणात घडत असते. तेथे काही माणसे वावरत असतात. कादंबरीमध्ये पात्रांच्या जीवनातील घटनाप्रसंग कादंबरीकाराने निवडलेला असतो. स्थल, काल आणि व्यक्ती एकत्र आले की, घटना घडू लागतात. अशा घटनांची गुंफण कादंबरीमध्ये स्पष्ट होते. कादंबरीच्या आशयसूत्रांविषयी भालसिंग म्हणतात की, "कादंबरीतील घटना ज्या सूत्रांत बांधल्या जातात, त्यांना आपण आशय सूत्र म्हणतो."[४०] ही आशय सूत्रे व

त्यांच्याशी संबंधित घटना जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रामधून निवडलेल्या असतात. त्यातून लेखिकेचे जीवनातील अवलोकन व चिंतन स्पष्ट होते. 'भूमी' कादंबरीचा विवेचक अभ्यास केला असता कादंबरीच्या कथानकातून विविध धाग्यांची गुंफण येथे आलेली आहे.

कादंबरीमध्ये वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती विशिष्ट प्रसंगात सापडल्यामुळेच प्रसंग-घटना निर्माण होत असतात. अशा घटना प्रसंगांच्या चतुराईच्या गुंफणीतूनच कथानकाची बांधणी आकार घेत असते. हे लक्षात घेऊन या कादंबरीकडे पाहिल्यास तिची मांडणी लक्षात येते. मुख्य कथानकात हे वेगवेगळे सुटेसुटे भाग अत्यंत चतुराईने एकत्र आणून लेखिकेने मांडले आहेत. डॉ. अरुंधती वैद्य यांनी घेतलेल्या मुलाखतीत लेखिका म्हणते, "मद्रासजवळच्या गावात समुद्रकिनाऱ्यावर गुडघ्यात मान घालून बसलेल्या एका मुलीची कथा आहे."[४१] त्या पोरक्या मुलीच्या आयुष्याचा आणि तिच्या जडणघडणीचा वेध घेणे ही कादंबरीची प्रेरणा आहे. तिच्या आयुष्याचा शोध घेताना लेखिकेच्या वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती यामध्ये येत गेल्या आणि त्यांच्यामध्ये घडणाऱ्या अनेक घटना, प्रसंगामधून, भावनिक गुंतागुंतीतून आंतरिक संघर्षातून कथानक साकारत गेले आहे.

"पद्मनाभनने आत जाऊन विड्याची पाने, केळी, नारळ, तिला दिला. बायकोनं सांगितलं म्हणून."[४२] आपल्या संस्कृतीमध्ये मुलगी सासरी जायला निघते त्या वेळेस आई तिची ओटी भरते. यामध्ये तिच्या मनात असणारी श्रध्दा ही संस्कृतीमुळे वर्षानुवर्ष टिकून आलेली दिसते, तर भारतीय संस्कृतीमध्ये सणांना महत्त्व आहे. यामध्ये बैलपोळा (बेंदूर) या सणाला पुरणपोळीचा स्वयंपाक केला जातो. त्याचप्रमाणे अधिकमासामध्ये धोंड्याचे जेवण केले जाते. यातून प्रत्येक सणांचे वेगवेगळेपण दिसून येते.

भारतीय संस्कृतीमध्ये गुरु-शिष्य परंपरा ऋग्वेदकाळापासून प्रचलित आहे व ती आजही चालूच आहे. यांचा प्रत्यय डॉ. भारद्वजांच्या पुढील विधानावरुन

येतो."शिक्षणाच्या संदर्भात जुन्या गुरुकुलपध्दतीचाच अवलंब करावा, या मताचे ते होते."[४३] यातून शिक्षणाबाबत लेखिकेला असणारी तळमळ व्यक्त होते.

'भूमी' कादंबरीमध्ये लेखिकेने मानवी नीतिमूल्ये व भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंपरेशी जवळचा संबंध ठेवणारे, ब्राह्मणी मध्यमवर्गीय संस्कृतीशी सण, उत्सव, संस्काराशी जवळचे नाते असलेले विश्व आहे. म्हणूनच त्यांच्या कथातील स्त्रिया थोड्या बंडखोर असल्या तरी सद्प्रवृत्तीच्या, सुसंस्कृतपणाचा एक ठसा त्यांच्यावर आहे. येथील बहुतेक स्त्रियांची जडणघडण ही जुन्या पध्दतीनुसार आज लोप पावत चाललेल्या संस्कृतीच्या सद्भावनेच्या, नैतिक मूल्यांच्या स्पर्धातून झालेली आहे.

'सेतू' ही कादंबरी आशयसूत्राचे न्याहाळणारे भान आणि समग्रतेची जाणीव या बाबतीत स्वतःच्या कामगिरीत उच्चांक स्थापन करणारी त्यांची कादंबरी आहे. या कादंबरीत माणसे महत्त्वाची नाहीत, त्यांचे परस्परसंबंध एवढेच महत्त्वाचे नाही, तर त्या माणसांना जे दिसते ते मोलाचे आहे. आत्मशोधी वाटांवरचे मानवी मनाच्या गरगरत्या भोवऱ्याचे काळेभारे केंद्र जिथे जाणवते आहे. 'सेतू' कादंबरीतील नायिका सुचरिता ही शिकलेली असूनही गंगेचे वाहतेपण तिला पत्करता येत नाही. एक प्रकारचा साचलेपणा तिच्या विचारात दिसून येतो. "माणसांचा इतरांबरोबरच स्वतःवरचाही विश्वास उडतो. अमुक अमुक म्हणून असलेली त्याची स्वतःचीच ओळख हरवते. मग एक आभासात्मक जग तो स्वीकारतो. त्यातच रमतो. माणूस प्रथम वास्तवत स्वीकारत नाही आणि नंतर त्यापासून तो दूर फेकला जातो मला भीती वाटते, की ब्रिजमोहनलाच नाहीतर सर्वांना लागू पडतं. कुठं आहे प्रत्येकाची स्वतःशी अशी वेगळी ओळख. कुठलं जग खरं, कुठलं आभासाचं ?"[४४] हे आशा बगेंनी सविस्तरपणे मांडलेले आहे.

ब्रिजमोहन आयुष्यच गंगानदीच्या सोबती गेलेलं आहे. "एका बाजूला किनारा, किनाऱ्यावर घर, पहाडावर उंच घर आणि एका बाजूला गंगाजी, बनारस इतकी गंगाजी गावाला उगटून कुठंच नाही. पाठवण्याची गंगा बघ. विस्तीर्ण पलिकडचा तीर प्रयासानंच दिसतो."[४५] 'सेतू'मध्ये गंगा हे प्रतिमेचे रुप धारण करते. गंगा नदीच्या अंगाखांद्यावर वाढलेला ब्रिजमोहन गंगोपासून सुचरितामुळे तुटतो. ब्रिजमोहनला प्रेमाचा उच्चारही गंगेत विहार करताना करावासा वाटतो. पण सुचरिताला हे कळत नाही. ब्रिजमोहनला स्वतःचा मुलगा हा गंगेच्या पाण्यावर हळूहळू वर येणारा सूर्य आहे, असे वाटते.

ब्रिजमोहन हे कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. पण त्याचबरोबर व्यक्तिरेखाही महत्त्वाची आहे. सुचरिताही लहान गावात वाढलेली असून, तिला ब्रिजमोहनचे लहानसे खेडेगाव आवडत नाही. यातून लेखिकेने आपल्या मुलाशी कायम राहणे सुचवायचे असेल, असे वाटते. पण कादंबरीच्या अखेरीला ही मुळेच उघडी पडतात आणि आपण ज्यांना आई-बाप समजतो, त्यांचा अंश आपल्यात नाही, हे तिला कळते आणि सुचरिताच्या आयुष्यात गुंतागुंत निर्माण होते. सुचरिताचे आई-वडील परस्परांपासून दूर राहिले आहे. तरीही समृध्द जीवन जगले आहे, तेच संस्कार नायिकेच्या मनात असतात.

### ५.४ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील निवेदन पध्दती -

निवेदन हा कादंबरीच्या संरचनेत अंतर्भूत असणारा महत्त्वाचा घटक होय. निवेदन किंवा कथन म्हणजे 'सांगणे' होय. लेखकाला जे काही सांगायचे आहे, ते तो कोणत्या तरी स्थानावरुन व कोणत्या तरी निवेदन पध्दतीतून मांडत असतो. कथानक व पात्र यांच्या जडणघडणीसाठी लेखक निवेदनपध्दतीचा स्वीकार करत असतो. लेखकाच्या सांगण्याच्या पध्दतीचा तंत्रविषयक नियम करण्याशी निकटवर्ती व आंतरिक संबंध असतो. लेखक किंवा कादंबरीतील एखादे पात्र निवेदकाची भूमिका पार पाडते. कथन, संवाद, भाष्य, वर्णन या चार घटकांद्वारे निवेदन साकारत जाते. कथानकातील क्रिया-प्रतिक्रिया, घटना-प्रसंग,

पात्रांची कृती-उक्ती, पात्रांचे व्यक्तित्व, त्यांची मनःस्थिती निवेदन संवादातून साकार होत असते. निवेदकाने कादंबरीची संहिता कथन करताना ती कशी सांगावी, याचा निर्णय घ्यायचा असतो. एकच घटना विविध निवेदनपध्दतीतून कथन करता येते. कथानक, पात्र, वातावरण व भाषा यांची परिणामकारकता, कलात्मकता व आवश्यकता लक्षात घेऊन विशिष्ट कथनपध्दती निवेदकाला लेखक प्रदान करतो.

'प्रथम पुरुषी' निवेदकाबाबत बोलताना 'गंगाधर पाटील' म्हणतात, "साहित्य कृतीतील वक्ता अथवा निवेदक पात्र तिचा एक अंगभूत घटक असतो. त्यांच्या मते, साहित्यकृतीतील निवेदक पात्राला, स्वतःची दृष्टी, स्वतःचे असे आत्मनिष्ठ भावविश्वही असते. त्यामुळेच त्या पात्राला खास स्वतःची अशी आत्मनिष्ठा प्राप्त झालेली असते. परंतु या निवेदक पात्राची अथवा कवितागत 'मी' ची ही आत्मनिष्ठा साहित्यकृतीचा एक वस्तुनिष्ठ असा अंगभूत घटक बनून राहते. या पात्राला साहित्य कृतीबाहेर वेगळे अस्तित्वच नसते."[४६] गंगाधर पाटील' यांचे हे मत लक्षात घेता, असे म्हणता येते की सानिया यांच्या कादंबरीतील निवेदकाचे स्वतःचे असे आत्मनिष्ठ भावविश्व निश्चितपणे पुढे येते. तर 'आत्मनिवेदनाचे वैशिष्टयाविषयी सांगताना डॉ. किशोर सानप म्हणतात, "साहित्यक्रमातील नायक हा स्वतः निवेदक असतो. त्यामुळे तो प्रत्येक गोष्टींकडे स्वतःच्या चष्म्यातून बघतो. ज्याला जे जाणवते आणि दिसते, त्याचा स्वतः अन्वयार्थ लावून तो भाषिक निवेदन करतो. त्यामुळे आत्मनिवेदनपर कादंबरीतील लेखक-नायक निवेदक यांच्यात कलात्मक सामंजस्य प्रस्थापित होते. आत्मनिवेदनपर कादंबरीतील नायक हा लेखकाच्या निर्मितीच कौशल्य असते. नायकालाच निवेदकाची आणि लेखकाच्या जीवन जाणिवेची अभिव्यक्ती करावी लागते."[४७] आशा बगे यांची 'त्रिदल' ही कादंबरी विशिष्ट तत्रांचा वापर करते आहे, याची कोणतीही जाणीव त्यांच्या कादंबऱ्यांतून येते प्रत्येक पात्र, प्रसंग, अनुभव त्या निवेदन शैलीतून येतो.

शारदा कधीच स्वतःचे आत्मपरीक्षण करुन बघत नाही, नव्हे तो तिचा स्वभावच नाही व त्यामुळे तिचे वागणे अहंकेन्द्री वाटते. त्यामुळे कुटुंबात एकप्रकारचा ताण जाणवतो. मंजूला मात्र शारदेचे असे वागणे फार दुखावते व दोघींच्या मैत्रीचे नाते संपुष्टात येते. शारदेच्या स्वभावातले दुहेरीपण मंजूला कळत नाही व एकमेकींना समजून घ्यायचे मार्ग बंद झाल्यासारखे मंजूला वाटते.

शारदेचे वर्णन निवेदिकेने एकंदरीत परंपरावादी स्त्रीचे म्हणूनच केले आहे. शुभ-अशुभ मानणारी, सोमवार असला की डोके न धुणारी, स्वतःला अनेक बंधनात बांधून घेणारी ही शारदा पारंपरिक स्त्रीचेच प्रतिनिधित्व करते. स्वतःला एका वेगवेगळ्याच वातावरणात तयार करते व कुणाची मदतही मग तिला नको असते. दुसऱ्यांना समजून घ्यायची क्षमताही तिच्यात दिसत नाही. लग्नानंतर काही वर्षाने तिला ब्रेस्ट कॅन्सर होतो. त्यावेळेस तो भाग काढून टाकण्यात येतो. ते दुखणे तिला पेलवत नाही. श्रीनिवास, त्याची आई, मंजू तिच्या दुःखात सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. तिला मदत करु इच्छितात, पण तिच्या मनात वेगळेच काहीतरी चालले असते. कुणाची सहानुभूती, मदत तिला नकोच वाटते. ती म्हणते,"हे कसलं जगणं! सगळंच सगळं हिसकावून घेतल्यावर उगाच दिवस ढकलत राहायचं!"[४८] नर्मदेचा काठ मी कधीही बघितला नाही. म्हणणाऱ्या शारदेला मामा आजा, असा वैतागली व्यक्त करीत राहते जे अटळ आहे. त्याचा स्वीकार करणे शारदेला जमत नाहीत. तिची जगण्याची जिद्द आतून संपली आहे. मंजूनं आपली बोट शारदेच्या कृश, पांढऱ्याफटक बोटांत गुंफली आणि श्रीनिवासनं शारदेचा तो हात हातात घेतला. मंजू पाहत होती, "एकात एक गुंफलेले तीन हात, तिला आठवलं ते बेलाचं पान, त्याची तीन पानं, मधला देठ, वाटलं, शारदेच्यात आपण आणि श्रीही अशीच मिसळून गेलो आहोत. आज, आता? की यापूर्वीच? आपल्या लक्षातही न येता."[४९]

आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात ती मंजूजवळ स्वतःच्या मनातील खंत बोलून दाखविते. "मंजू, मला माझं नि श्रीचं घर हवं होत; पण माझ्या मनासारखं मला ते कधी उभं करताच आल नाही ग! म्हणजे ते घर कसं हवे आहे हेच मुळी नजरेसमोर कधी स्पष्ट येत नव्हतं, आणि आता मला माझं आमचं घर अगदी स्पष्ट दिसतं आहे. मला जसं हव होत तसं अगदी. माझ्या पुढच्या घराला कुठलाच आकार नाही. भींतीच नाहीत, चौकटी नाहीत. तरी ते माझं -आमचं घर आहे. घराचे कुठलेही संदर्भ नसलेलं घर."[५०] लेखिकेला शारदेने केलेला हा स्वीकारही महत्त्वाचा वाटतो.

आशा बगे यांची ही स्त्री विविध अनुभवातून जातांना कधी घाबरते, कधी संघर्षही करते, तर कधी सर्व काही सहनही करते. परंपरेच्या चौकटीत राहणारी ही स्त्री असूनही तिच्या मनाचा जो प्रवास आहे तो लेखिकेला महत्त्वाचा वाटतो. शारदेची व श्रीची आत्मिक एकरुपता शेवटी निवेदिकेला महत्त्वाची वाटते. जीवन जगण्यातला आंतरिक अर्थ शेवटी शारदेच्याही लक्षात येतो व नर्मदेच्या विशाल गहऱ्या पात्रांशी बांधलेले तिच्या अनुभवाच्या गाभ्याचे रुपही तिला कळून चुकले आहे. मंजूच्या मैत्रीतून, भेटीतून तिला एक वेगळाच अनुभव येतो. जे सल आजपर्यंत तिने स्वतःच्या मनाशी जपले व तिला जे खूप मोठे वाटले ते आता तिला फार छोटे वाटतात. अनेक गोष्टींचा स्वीकार करणारी ही शारदा शेवटी स्वतःच्या शरीराच्या करुपतेचाही स्वीकार सहज करते. त्याची पुसटशी जाणीवही ती उरु देत नाही. त्याशिवायही जगता येते हे तिला कळून येते. स्वतःचा एकटेपणाही तिने स्वीकारला आहे.

निवेदन हे कथानकातील सर्व घटनाप्रसंग यांना धरुन येते. म्हणून त्यात वर्णन असते. पात्रापात्रांत संभाषण असते. कधी कधी एकाच पात्राच्या मनातील संभाषण असते. निवेदनात घटनाप्रसंगाची भाष्येही असतात. निवेदनाची विविध माध्यमे असतात. निवेदन करण्यासाठी कधी प्रथमपुरुषी, तर कधी तृतीयपुरुषी निवेदक असतो. सर्व घटना प्रसंगांच्या वेळी जणू काही तो उपस्थित असतो.

पात्रांच्या अंतःस्थ हालचालीही त्याला कळत असतात. प्रथमपुरुषी निवेदनात निवेदकाच्या चिंतनाला व अंतर्मुखतेला अधिक वाव असतो.

निवेदनाच्या संदर्भात रंगनाथ पठारे म्हणतात, "निवेदनाचा एक दृष्टिकोन असतो. आशयाची एक मागणी असते. या दोन्हींच्या मिलाफातून निवेदनशैली वगैरे ठरते. लेखक म्हणून जाणीवपूर्वक त्यासाठी काहीही करावे लागत नाही."[५१] अनेक पात्रांची गुंतागुंत मुख्य कथानकासाठी व उपकथानकाची निरगाठ मनोविश्लेषणाचा भाग भाषाशैलीतून म्हणजेच निवेदनातून कथानक साकारत जाताना दिसते.

'भूमी' कादंबरीमधील निवेदनशैली विलक्षण लवचिक आहे. 'भूमी' कादंबरीमध्ये लेखिकेने निवेदनासाठी सर्वसाक्षी, लेखिकाश्रयी निवेदनाची निवड केल्यामुळे पात्रचित्रणात व कथारचनेत तिला भरपूर स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळेच नायिकेच्या बालपणापासूनचा कालखंड कथानकात गुंफता आला. सर्वसाक्षी निवेदनांतर्गत येणाऱ्या सर्व निवेदनप्रकारांचा अत्यंत कुशलतेने वापर करुन लेखिकेने रसोत्कर्ष साधला आहे. त्यांना अपेक्षित तो आशय नेमकेपणाने वाचकांकडे संक्रमित करण्याचे कार्य या निवेदनपध्दतीच्या उपयोजनाने सहज शक्य झाले आहे.

लेखिकेनं मध्यमवर्गी जाणिवांचे तसेच संस्कारांचे रंग या भाषेमध्ये मिसळले आहेत. अगदी नेहमीच्या व्यवहारातील, वाचकांच्या मनाशी जवळीक साधणाऱ्या प्रतिमांचा आणि अलंकारांचा वार केल्यामुळे भाषेला सहजता व सरलता लाभली आहे. कोणत्याही प्रसंगाच्या निवेदनात भडकपणा, शब्दांची उधळण येत नाही. तसेच संवादाला या कादंबरीत विशेष स्थान आहे. संवाद आणि निवेदनात विलक्षण एकजिवित्य आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्या निवेदनात्मक आहे. तरीही उत्कट भावनेतून जीवनाला भिडणाऱ्या माणसाभोवती त्या फिरतात. आशा बगे यांनी आपल्या कादंबरीला आपण विस्तृत कॅनव्हासवर न्याहाळू बघतो, असे स्वतःविषयी

म्हटलेले आहे. तर डॉ. आशा सावदेकर त्यांच्या कादंबरी लेखना विषयी म्हणतात, "मला त्यांचे सामर्थ्य काळाच्या लांबीत दडलेले नसून आशयाच्या आणि माणसाच्या खोलीत दडलेले आहे असे वाटते. त्यांना आपल्या कादंबरीतून आंतरिक वास्तवाचा वेध घ्यावासा वाटतो व त्याला सपूर्त करण्यासाठी त्याची धडपड चाललेली असते. इतर बाहय प्रयोगशीलतेच्या खुणा मिटविण्यात त्यांनी धन्यता मानलेली नाही. आत्मप्रतिमांचा शोध घेत त्यांना विस्तारित रुपात मांडत राहणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वैशिष्टयपूर्ण आविष्कार करतात."[५२]

'मनस्विनी' कादंबरीत यशोधन आणि सौदामिनीचे जीवन संघर्षमय कसे होते व त्यातून त्यांनी कसा मार्ग काढलेला आहे, हे लेखिकेच्या लेखणातून दिसून येते. यशोधनच्या सहवासात फुलणारे सौदामिनीचे मन मग त्या मनाचे सगळे कंगोर तपासून बघते. यशवरील आपल्या प्रेमाची वेगळी जात तिला कळली आहे व ते प्रेम संगीताच्या प्रेमातून आलेलं, काहीही न मागणारे. पण असे प्रेम आपल्याला अमरवर का करता आले नाही, याचे दुःखही तिच्या मनात खोलवर आहे. पण तिला मात्र काहीही संपवायचे नाही. आलेल्या मार्गावरुन फक्त मागे वळायचे आहे. या मार्गावरुन मागे फिरताना तिला दमयंतीचे शब्द आठवतात,"पुरे बाई तुमची तर्कटं, साधं उमललेलं फूल तुम्हाला आनंद नाही देऊ शकत. फुलाची, फुलण्याची ॲनाटॉमीच कळायला हवी तुम्हाला. माणसाच्या मनाच्या मूलभूत प्रतिक्रिया त्या आपण सहजपणे का स्वीकारीत नाही?"[५३]

दमयंतीचे सहज जगणे आणि सौदामिनीचे प्रत्येक ठिकाणी मन पिंजत जगणे, दोघीही स्त्रियाच, पण दोघींचीही जीवन जगण्याची पध्दत निराळी. दोघींच्या स्वभावातील ही तफावत अशा बगे या ठिकाणी कुशलतेने दाखवितात. आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्रिया स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकणारी आहे. स्वतःच्या पायावर उभी आहे. पण स्वतंत्र असूनही संस्काराच्या,

समाजाच्या नीतिनियमांनी ती बांधल्या गेली आहे आणि म्हणूनच कुठलाही निर्णय घेताना ती कासाविस होते. परंपरेच्या भानात शिरते. त्याला तडकाफडकी छेद देऊन नवीन स्वीकारण्याचे मनोधैर्य, सामर्थ्य तिच्यात दिसून येत नाही. हे बळ मिळविण्यासाठी तिला कुणाचा तरी आधार लागतो. फक्त स्वतःचा स्वतंत्र असा विचार ही स्त्री करु शकत नाही व जीवनातील सर्व नैसर्गिक गोष्टींना महत्त्व देऊन पुन्हा सामान्यपणाचे जीवनच ती पत्करते. पण हा प्रवास करताना तिला जे उत्कट, अनिवार प्रश्न पडतात ते लेखिकेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. नायिकेचा आत्मशोध व त्यातून तिने निवडलेली वाट हीच आशा बगेंच्या कादंबरीतील स्त्री चित्रणाचे फार मोठे वैशिष्टय आहे. स्त्रीची स्वतःच्या वृत्तीशीच चाललेली झुंज लेखिका विशिष्ट शैलीतून प्रकट करते.

'झुंबर' या कादंबरीतून लेखिकेने वसुमतीचा शोध घेतला आहे. नवऱ्याकडून पूर्णपणे स्वतंत्र, मोकळेपणा मिळूनही स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या यातना काहीशा वेगळ्या असतात हे लेखिका या ठिकाणी सांगू इच्छिते. श्रीनिवास सिरास म्हणतात, त्याप्रमाणे, "ही यातना म्हणजे स्त्रीच्या प्रेमाला मिळणारी पुरुषाची प्रतिसाद शून्यता व त्याबद्दल स्त्रीची आपला हक्क न मागण्याची सवय जगणे यातून जन्म घेते."[५४] 'झुंबर' या कादंबरीतील वसुमतीचा स्वभाव व ते प्रेमाचा का असेना तो अनुभव तिला लखलखत्या झुंबराचा वाटतो. आणि शेवटी तरी ही झुंबरं विझायचीच असतात हे वसुमती ओळखते. ती म्हणते, "आपलं पूर्वीचं आयुष्य मागेच ठेवून आपण जात आहोत. माथ्यावर लखलखणारी झुंबर आता मालवली आहेत. आपल्याला हवं होत, तसं साधं सोप सरळ आयुष्य कादाचित शक्य आहे."[५५] नायिकेच्या मनाला होणारी ही जाणीव लेखिकेने वसुमतीच्या स्त्रीपात्रातून मांडलेली आहे.

आशा बगे आपल्या कादंबऱ्यांतून 'मनस्विनी', 'झुंबर', 'त्रिदल', 'सेतू', या सर्व कादंबऱ्यांतून निवेदनात्मक शैलीचा वापर केलेला आहे. या संदर्भात डॉ. आशा सावदेकर म्हणतात, "त्यांच्या कादंबऱ्या या निवेदनात्मक असल्या तरीही

उत्कट भावनेतून जीवनाला भिडणाऱ्या माणसांभोवती फिरतात."[५६] आशा बगे यांच्या कादंबरीमधील नायिकांना पडणारे प्रश्न व त्यांच्या कादंबरीतील चिंतनशील व काव्यात्मकता त्यांच्या निवेदनात महत्त्वाची ठरते.

### ५.५ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नातेसंबंध -

मानव हा सामाजिक प्राणी आहे. त्याचे मूळ वृत्ती परिसराचा एक भाग होऊन राहण्याची असावी. आदिकाळापासून त्याच्या हया वृत्तीचे दर्शन व दाखले उपलब्ध आहेत. प्रतिमासृष्टी निर्माण करण्यासंदर्भातील मानवाची वस्तुस्थिती याचीच साक्ष देते. स्वतःला आलेल्या अनुभूती इतरांमध्ये वाढून देण्याघेण्याच्या मानव प्राण्याच्या प्रेरणा तीव्र स्वरुपाच्या आहेत.

मानवी जीवन विविध प्रकारच्या नातेसंबंधांनी युक्त असते. वास्तविक हे नातेसंबंध मानवानेच अस्तित्वात आणलेले आहेत. विविध प्रकारच्या नात्यांनी युक्त असते. वास्तविक हे नातेसंबंध परिसरातील घटकांशी स्वतःला घर-दार व त्याच्याशी निगडित भावविश्व, त्याच्याबरोबर त्याच्या परिसरातील निसर्ग घटक झाडे, पशु, पक्षी, नदी नाले, डोंगर, माती, समुद्र, आकाश इ. प्रामुख्याने माणसांची नातीगोती आणि व्यवहार यांचा जो घनिष्ठ संबंध असतो.

सांस्कृतिकतेच्या नियोजनातून प्रामुख्याने स्त्री-पुरुष मनाचे, व्यक्तिमत्त्वाचे अस्तित्व निर्माण करण्याचे कार्य साध्य करण्याचे प्रयत्न अव्याहतपणे चालतात. त्यानुसार समाज ही वस्तू आकार प्राप्त करुन आहे. पारंपरिक दृष्टिकोनातून व्यक्तीचा विचार रुढी, सांस्कृतिकतेनुसार समाजिक अंगाने केला जातो.

'त्रिदल' कादंबरीमध्ये श्रीनिवास व शारदा याचं नर्मदेशी असलेलं नातं, "श्रीनिवासनं तिला तिच्या घराबद्दल, घरच्या माणसांबद्दल सगळ्यांबद्दल ती सांगायला लागली. तसं सांगता सांगता ती नर्मदेच्या तीराशी आली."[५७] नर्मदा व नर्मदा नदीचा काठ अगदी स्पष्टपणे मांडलेला आहे. आयुष्याची सुरुवात आणि

शेवट एकमेकांत मिसळत असल्याची जाणीव तिला झाली आहे. श्रीचे व शारदेचे नाते मंजूलाही शेवटी कळून येते. तिला वाटते मंजू खिळल्यासारखी उभी, तिला वाटलं आता रेणुकेचं हे गाण म्हटलं तर आपल्या मनात जागले ते गाण्याचे फक्त सूरच, ती चाल फक्त भिडून गेली. स्त्री व पुरुष जीवनाबरोबर सुरांचा तळ गाठलेला आहे. "त्या दोघांपुढे उभी राहिली. रेणुकेची मूर्ती आपल्याला नाही बघता आली! जाता जाता शारदा अशी श्रीनिवासशीच एकरुप होतेय असं नाही, तर संपूर्ण आयुष्याचाच तळ बघावा अशी एकरुप अलिप्तही अगदी हुबेहूब श्रीसारखी! आपल्याला कळू नाही शकलं कदाचित श्री शारदेलाही नसेल कळलं. पण त्या दोघींना जोडणारे असे काही आंतरिक धागे असलेच पाहिजेत. पण ते समजण्याकरता इतकी उलथापालथ व्हायला हवी होती? इतकी?"[५८] जीवनातील नातेसंबंधाची ही गुंतागुत उकलताना संपूर्ण जीवनच त्यातून तावून-सुलाखून निघते, हेच लेखिकेला याठिकाणी मांडायचे असेल असे वाटून जाते. म्हणूनच या कादंबरीत दिनूमामांनी घातलेले कोडे लेखिकेला महत्त्वाचे वाटते. माणूस विकत घेऊ शकतो पण स्वत: मात्र वावरु शकत नाही, अशी गोष्ट कोणती? या दिनूमामांनी घातलेल्या कोड्याला शारदा सुरुवातीला 'कफन' असे उत्तर देते. पण त्याच कोड्याचा अर्थ शारदेला जीवनातील अनेक वर्ष घालवल्यानंतर विविध अनुभवातून गेल्यानंतर कळते. ती त्याचे उत्तर देतांना दिनूमामांना म्हणते,"आपण आपल्याभेवती उभं केलेलं आपलं आयुष्य."[५९] हेच त्याचे खरे उत्तर आहे.

आशा बगे यांच्या साहित्याचा विचार करत असताना त्यांच्या कादंबरीमधील जो भाग त्याचा आशय समजला जातो. तो म्हणजे स्त्री-पुरुषांमधील नातेसंबंध होय. त्यांच्या अंतर्मनाचा शोध घेणे हे जणू लेखिकेच्या लेखनाचे प्रयोजन मानले जाते. लेखिकेने नात्यातील अनुभवाला सूक्ष्मातिसूक्ष्म, अशी अनेक परिमाणे असू शकतात. हे ओळखून मानवी मनाचे सूक्ष्म आव्हान प्राप्त करण्याची शक्ती आशा बगे या लेखिकेने प्राप्त करुन घेतलेली आहे. तो एक साक्षात्कार नाही ती तिची तपश्चर्या आहे. मानवी नात्यांची उंची, रुंदी

आणि खोली अजमावत असताना त्यातील संगीत, अभिनय आणि साहित्य प्रेम यांचे उघडत जातात आणि त्यातील प्रकाशाची तिरीप त्याच नातेसंबंधांवर वेगवेगळ्या प्रकारे प्रकाश टाकत राहते. छोटया छोटया प्रसंगामधून माणसाची आंतरिक वास्तव आणि मानवी संबंधाचे हळूवारपणे जपत लेखिकेने मानवी वेदना आणि कासाविस करणारी दुःखाची तऱ्हा फार धारधारपणे टिपलेली आहे.

'भूमी' कादंबरीमध्ये नातेसंबंधामधील पारंपरिकता, आधुनिकता, आश्रयदाता, आक्षिते अशा विरुध्द टोकाच्या जोड्या असतात तर व्यक्तिचित्रणात मैथिली-शंतनू, आत्या-गोपाळराव, वासुकी तिचा नवरा, प्रो.देवस्थळी-मिसेस देवस्थळीबाई अशा जोड्या आढळतात. काही ठिकाणी एकमेकांना समजून घेणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या जोड्या रेखाटल्या आहेत. डॉ. भारद्वाज-रेवती, धर्मराजन पती-पत्नी, डॉ.पद्मनाभन पती-पत्नी, डॉ. मिश्रा-प्रणिता इत्यादी व्यक्तिरेखामधून त्यांच्यात असणाऱ्या नात्यांचा समन्वय साधला आहे.

भूमीतील मैथिली-लली व सुधीर-मैथिली यांसारख्या आजच्या युगात नातेसंबंध निर्माण होत जाणारं अंतर, एकपाकरचं तुटलेपण यांच्या पार्श्वभूमीवर मानवी नात्याबद्दल एका मुलाखतीत म्हटले की, "माझा नातेसंबंधावर विश्वास आहे. मला जाणवतं, आजची कुटुंब छोटी होत आहेत. नव्या पिढीला नात्याचं महत्त्व उरलेले नाही. नात्याचा प्रभाव त्याच्यावर पडत नाही. नात्यातील ही अंतर, तुटलेपणा मलाही जाणवतो कारण माझं तीन चतुर्थांश आयुष्य नात्यांच्या गराड्यात गेलं आहे. माणसांचे माणसावर होणारे चांगले-वाईट परिणाम मी पाहिलेले आहेत. ते अनुभवही त्यात तरीही एक सुरक्षितात असते, असं मला वाटतं. या नात्याबाहेरच्या परिघात उभ राहून मी अशा पोरक्या नातेसंबंधाकडे पाहते. तेव्हा काय अनुभवाला येईल याची मी कल्पना करु शकते. त्याचच

प्रतिबिंब. पोरकेपण मला भूमीतल्या मैथिलीत आणता आलं."[६०] लेखिका अगदी अचूकपणे परंपरेशी नात्यांतला समन्वय साधताना दिसतात.

आत्या जेव्हा मैथिलीला मद्रासहून मुंबईला आणते, तेंव्हापासून दोघींमध्ये आपलेपणाची जाणीव निर्माण होते. ज्या वेळेस गोपाळरावांच्या पहिल्या बायकोचा मुलगा उदय मैथिलीसाठी आत्याकडे लग्नाची मागणी घालतो, त्या वेळेस आत्या म्हणते की, "तिला काही कळत नाही आणि उदया माझ्या भावाची मुलगी काही वाटेवर पडलेली नाही."[६१] या विधानावरुन मैथिली आणि आत्या यांच्यातील नातेसंबंध किती खोलवर रुजलेले आहे हे कळते. जणू हे रक्ताचेच नातं असल्याचे दिसते. आत्या व बीना सोडून घरामध्ये कोणीही मैथिलीची काळजी करीत नाही. ती एक आश्रित आहे, या दृष्टिकोनातून तिच्याकडे ते पहातात व तिलाही त्याची जाणीव करुन देतात. त्यामुळे त्यांच्यात असणारे संबंध नेहमी ताण-तणावाचे राहिलेले दिसतात.

कादंबरीमध्ये मैथिली आणि शंतनू यांचे नातेसंबंध हे जोडण्याऐवजी दुरावले जातात. शंतनू आणि अंशुमन यांच्यात नवे नाते निर्माण होते ते या मुद्यावरुन अधिक स्पष्ट होते. "बाप-लेकांमध्ये एक नवं दोस्तीचं नातं रुजत गेलेलं तिनंही अनुभवलं होतं."[६२] यामुळे बाप-लेकांमधील हे मैत्रीचे नवे नातेसंबंध दृढ होत जाताना दिसते. तसेच दुसरे उदाहरण म्हणजे आत्या म्हणाली होती की, "नेमका तिचाच अशा अंशुमनमध्ये आला आणि विश्रामचा तिच्या डॅडीचा तिच्यात."[६३] ही आनुवंशिकता आपल्या अगोदरच्या पिढीकडून काही प्रमाणात दुसऱ्या पिढीत अंशरुपाने येते.

कादंबरीमध्ये सर्वात जिव्हाळ्याचे नातेसंबंध कुठे निर्माण झाले असतील तर ते कीर्ती-मिलिंद, चेतन, मधू सबनीस इत्यादी मित्रांच्या सोबत असताना त्यांच्या सहवासात जेव्हां मैथिली गेली, तेव्हा तिला एक आपलेपणाचे नाते निर्माण झाल्यासारखे वाटते. तसेच कादंबरीमध्ये या व्यतिरिक्तही अनेक नातेसंबंध एकमेकांत गुंफलेले आहेत. जसे डॉ. भारद्वाज-रेवती, बीना-सुभाष,

कावेरी, वासुकी, डॉ.अरुणाचलम, डॉ.मिश्रा प्रणिता, डॉ. पद्मनाभन, सावित्री, इत्यादी यातही काही गुरु-शिष्य, तर काहींमध्ये मैत्रीचे नाते निर्माण होते. लेखिकेने कादंबरीमध्ये माणसा-माणसांमधील नातेसंबंधाचा वेध घेत असताना त्या स्त्रियांच्या चित्रणाबरोबरच पुरुषांचेही चित्रण तितक्याच संवेदनशीलतेनं करताना दिसतात.

आशा बगे या आनंद-दुःख, भावना, राग, लोभ, मत्सरात असणारे माणसामाणसातल्या सूक्ष्म नातेसंबंध यांच्याविषयी एका मुलाखतीत म्हणतात की, "चहूबाजूंनी अविश्वास, अतंक, हिंसा, तुटलेपण, एकटेपणा असताना तर अशा काही दूरस्थ स्थिरतेचा बिंदू मला सतत हाकारत असतो. 'वॉर अ‍ॅण्ड पीस' मध्ये टॉलस्टॉयनं 'पीस'चा अर्थ प्रेम असाच केला आहे. वेगवेगळ्या स्थळी आणि वेगवेगळ्या काळात निर्माण केलेल्या कार्याचे प्रणेते महात्मा गांधी व संत ज्ञानेश्वर यांची अहिंसेची व्याख्या एकच असणे स्वाभाविक. पण वेगवेगळ्या देशात मातीत जन्मलेल्या टॉलस्टॉयनेही पीसचा अर्थ प्रेम हा करावा. तो महाराष्ट्रातील संतपरंपरेने केलेल्या प्रेमाच्या अर्थाजवळ जाऊन उभा राहतो. लेखनातून फक्त समकालीन वास्तव मांडतो. लेखिका त्या पलीकडे जाऊ पाहते."[६४] अशा प्रकारे माणसामाणसातल्या सूक्ष्म नातेसंबंधाचे विश्लेषण स्नेहा अवसरीकर यांनी घेतलेल्या मुलाखतीतून दिसून येते.

### ५.६ आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील निसर्गातील प्रतिमा, प्रतीके -

आशा बगे यांनीही आपल्या कादंबरीतून माणसा-माणसांतील संबंधाचा, नात्यांचा शोध घेतला आहे. हाच त्यांच्या कादंबरी लेखनाचा विशेष होय. संगीताच्या वारशाने आणि अभ्यासाने आशा बगे यांच्या लेखनाला एक लयदार शैली प्राप्त झाली आहे आणि काव्यप्रेमाने काव्यात्मकता! मनातील विविध आंदोलने त्यांच्या कादंबरीतून शब्दांकित झालेली असतात. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये फारशा घटना असत नाहीत. ज्या काही घटना घडतात त्यातूनच त्या अधिकाअधिक संमिश्र आणि सखोल आशय अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न

करतात. 'झुंबर' मध्ये वसुमती, डॉ. ऋषिकेश अधिकारीशी लग्न करते ही मूळ घटना व नंतर कादंबरीच्या उत्तरार्धात डॉ. अधिकारी आजारी झाल्यानंतर डॉ.राघवशी तिचे लग्न होणे. या दोन घटनांना जोडणारी तिसरी घटना म्हणजे डॉ. अधिकारांचा मृत्यु व या मृत्युमुळे व्यथित झालेली वसुमती 'पत्नी' म्हणूनही आपला उल्लेख नाही, हे बघताच तिच्या मनाची झालेली तडफड, या सर्व गोष्टी लेखिकेने पारदर्शी चित्रणाने उभ्या केल्या आहे.

'सेतू' कादंबरी ही गुंतागुतीची आहे तर रहस्यही आहे. राघवेंद्रची आई घरातून निघून गेलेली असते. आणि तिचा नृत्यकलेचा अभ्यासही असतो. असा उल्लेख येतो पण त्याचा विस्तार फारसा नाही. सुचरिता ही बबीमावशीची मुलगी असते, हे रहस्य अगदी शेवटी दादांकडून तिला कळते. दादा, आई, बबीमावशी यांची नातीही कूट राहतात. 'भूमी'तल्या मैथिलीची तमिळ, ख्रिश्चन आई आणि तिचे डॉक्टर वडील विश्राम यांच्या आयुष्याचे पुसटते उल्लेख आईच्या आणि आत्याच्या बोलण्यात येतात. वास्तविक, मैथिलीचे पोरकी होणे, ख्रिश्चन असणे, तिची आई नर्स असणे, त्यांचे जीवन व मैथिलीचे बालपण यांच्यासंदर्भात पुष्कळ प्रश्न वाचकांना पडतात. पण हे सूत्रही काही घटनांचा किंचित उल्लेख रहस्यासारखेच सोडून दिले आहे. आई आणि मॅथ्यूज अंकल यांचे नाते, सुधीर आणि सुभद्रा यांचे पूर्वी ठरलेले लग्न, यांच्याविषयीचा उल्लेख येतात. तेही प्रश्न निर्माण करणारे असतात. शंतनूची आई नि दांडेकर यांचे प्रकरण, शंतनूच्या व्यक्तिमत्त्वाची घडण तशी का, त्यांचे अप्रत्यक्ष स्पष्टीकरण म्हणून येते. पात्रांच्या बोलण्यातील विचार ही सूत्रे मांडलेली असतात.

आशा बगे यांच्या कादंबरीतील कथानकही घट्ट विणीचे आहेत. मात्र, ते एकदम वेगवान गतीने पुढे जात नाही, तर एकदम संथही नाही. त्यातील हळूवारपण व कुशलपण आपल्या पात्रांच्या मनोविश्वाचा वेध घेतात. पात्रांच्या मनोविश्वातील गुंतागुंत त्या सहज शैलीतून व्यक्त करतात. एका मनाच्या स्पर्श कोवळीकीतून उमटलेली भावविश्वे उलगडून दाखविणारी त्यांची पहिलीच

कादंबरी 'मनस्विनी' या कादंबरीत त्यांनी आपली तंत्रवरील पकड कुठेही सुटू दिली नाही. संगीतकलेवर प्रेम करणाऱ्या या नायिकेचे मन लेखिकेला कळले आहे. त्यामुळेच मैफिलीतल्या क्षणांचे सौंदर्य त्यांना उलगडून दाखविता आले आहे. आभाळ, पाणी, समुद्र, संध्याकाळ ही सारी प्रतिमासृष्टी तरल होऊन त्यांच्या कादंबरीत प्रवेशते व त्यांच्या काव्यात्म शैलीने त्या सर्व प्रतिमा आशयाशी एकजीव झाल्यासारख्या वाटतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रतिमांची, प्रतीकांची व संगीताची बंदिशी त्यांची भाषा अलगद साधून घेते.

'मुद्रा' या कादंबरीत निसर्गातील प्रतीकांची उदाहरणे दिलेली आहेत. "या वृक्षाचे लाकूड ते महत्त्वाचे आहे. त्याच्या खोडाचा, फांद्यांचा उपयोग घेऊ शकतो."[६५] 'मुद्रा' मधील नीरुचे आई-बाबा यांचे घरच्यांना पसंत नसलेले लग्न, त्यांच्यात असणाऱ्या वर्गीय अंतरामुळे निर्माण झालेले ताण, हे त्यांच्या पूर्वायुष्याचा भाग म्हणून येतात, नीरुचे बाबा तिच्या आईपासून दूर का होऊ लागतात, याची मुळे तेथपासूनच आहेत, परंतु देवाशीषच्या आईचे घरातून निघून जाणे, परत येणे, त्यानंतर देवाशीषच्या जन्माचे रहस्य, नंतरचे त्याच्या आईचे जीवन, संगीतसाधना तिचे गुरु हे सर्व प्रकरण रहस्यमयच आहे.

'सेतू' कादंबरीत जीवनाशी संबंधित असलेले नाते स्पष्ट करताना ब्रिजमोहनशी बोलताना दादा म्हणतात, "जे जे उत्तम ते सर्व आम्ही तिला दिले, पण त्यामुळेच तिला खरे जीवन कळले नाही व त्यातूनच तिच्या स्वभावाचे वर्णन स्पष्ट झालेले आहे. व्यक्ती म्हणून ती स्वतःचे लागेबांधे जशी जाते, त्याचे नाते मान्य करते तसे तिला ब्रिजमोहनबाबत करावेसे वाटत नाही. ब्रिजमोहन मात्र स्वतःच्या अनुभवाशी इतका प्रामाणिक आहे की, तो परदेशात जाताना दादा त्याला जवळ घेतात आणि तो अर्पिता, सुमंगलला जवळ घेतो. त्या स्पर्शाने त्याच्या मनात जे विश्व जागे होते, त्यात गंगेची प्रतिमा वापरली आहे. एका हातानं अर्पिताला आणि एका हातानं सुमंगलला त्यानं जवळ घेतलं, घट्ट अगदी जवळ त्यांचा अगदी निकट स्पर्श जणू पिऊन घेतला. गंगेच पात्र समोर

आणि तिच्या पाण्याचा स्पर्श पावलांना झालासा वाटलां."[६६] ब्रिजमोहनचे गंगेशी असलेले नाते या ठिकाणी स्पष्ट होते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी मध्यमवर्गीय असल्यामुळे मध्यमवर्गीय जाणीवच त्यातून व्यक्त होते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना काही मर्यादा पडलेल्या आहे. त्या समाजातील विविध घटक, त्यांचे परस्परसंबंध, त्यातील ताण-तणाव, त्यांच्या समस्या यांना स्पर्श करीत नाही. समाजातील विविध थरातील, वर्गातील, जातीधर्मातील माणसे त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येत नाहीत.सामाजिक, आर्थिक, राजकीय घटनाप्रवाहांचे दर्शनही त्यातून घडत नाही, तर त्यांच्या कादंबऱ्यांतील वातावरण हे मध्यमवर्गीय कुटुंब, त्या कुटुंबाची वास्तू, त्या सभोवतीचा परिसर यातूनच जाणवते. या सगळ्या मर्यादा मान्य करुनही ज्या मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण त्यांनी केलेलं आहे ते मनाच्या तळापर्यंत जाऊन पोहचणारे असेच आहे.

'आकाश' मधील अशोकला दुसऱ्या स्त्रीपासून एक मुलगा असतो, फार उशिरा तो हे उर्मिलेला सांगतो. रहस्याचे हे धागे कथानकात मधूनच येतात. पण मुख्य कथानके सरु, ब्रिजमोहन, मैथिली, शंतनू, नीरुचे जीवन यांच्यावर केंद्रित असल्याने या धाग्यांनी वीण सुसंगतपणे गुंफली जात नाही, सारे निट स्पष्ट होत नाही, अशी तक्रार करीत नाहीत.

'उत्सव', 'सेतू', 'मुद्रा' या कादंबऱ्यांतील कथानके माधवी, सुचरिता, नीरु यांच्या जीवनाच्या मध्यावरच्या प्रसंगाने सुरु होतात आणि पुढे त्यांची पूर्वायुष्ये, कुटुंब, नाती, घटना प्रसंगांच्या आठवणीतून पात्रांच्या, संवादातून किंवा आत्मचिंतनातून उलगडत जाते. निसर्गाची प्रतिमा, प्रतीके ही त्यांच्या कथावस्तूत मिसळून आशयाशी एकजीव होतात. अनेकदा त्या निसर्ग प्रतिमातून आपल्या नायक-नायिकांच्या सुख-दुःखाचे हुंकार उमटवतात. तर कधी एखादे ठिकाणी विचाराच्या, घटनेच्या संदर्भातही निसर्ग येतो व तो त्या

घटनेत मिसळून जातो. आशा बगेच्या सर्वच कादंबऱ्यांचे निवेदन सर्वसाधी आहेत.

### ५.७ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्थलवर्णन -

मैथिलीच्या जीवनाची सुरुवात कडलूर या छोटयाशा गावापासून होते. या गावाला लाभलेला समुद्रकिनारा हा विलोभनीय आहे. त्याचा प्रभाव हा लहानग्या मैथिलीच्या मनावर होतो. निसर्गसुंदर असलेले हे गाव तिच्या मनात आयुष्यभर घर करुन राहते. तिच्या आईच्या मृत्यूनंतर तिची आत्या तिला शिक्षणासाठी मुंबईला घेऊन येते. मुंबईत तिच्या आत्याच्या तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीतल्या अडगळीच्या जागेत थांबून ती अभ्यास करते. मुंबईत सुरुवातीला वावरताना तिला अडचण वाटते. नंतर मात्र मुंबईत सहज वावरते. हायस्कूलला मित्र मिळविते. कॉलेजमध्ये नाटकात भाग घेते. उत्तम अभिनय करते. चेतन, मिलिंद, कीर्ती हा एक नाटकाचा ग्रुप तयार होतो. याद्वारे महाविद्यालयाचा परिसर, तेथील सांस्कृतिक वातावरण चित्रित केले आहे. मुंबईमधील लोकलच्या प्रवासाचा अनुभव तिने मांडला आहे. मैथिली लग्नानंतर मद्रास शहरात जाते. मद्रास शहर, तेथील विद्यापीठाचा परिसर, या ठिकाणचा तिचा मित्र परिवार तसेच तिच्या कुटुंबाचे चित्रण व्यक्त होते. तेथून ती बेंगलोर विद्यापीठात जाते. त्या ठिकाणचा परिसर आणि तिने आपल्या भोवती निर्माण केलेला मित्रपरिवार मांडला आहे. तिचे संशोधक, साहित्यिक व्यक्तिमत्त्वही भूमीमध्ये आशा बगे यांनी मांडले आहे. मैथिलीच्या निमित्ताने मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण या कादंबरीत व्यक्त होते.

'भूमी' कादंबरीच्या कथानकामध्ये अनेक ठिकाणचा समावेश येताना दिसतो. कादंबरीचे कथानक हे प्रवाही स्वरुपाचे आहे. त्यामुळे वेगवेगळ्या स्थळांचे वर्णन यातून आलेले दिसते. "लोखंडी पट्टीवरची चादर अजून तारेवरच वाळत होती. त्या दीडखणी खोलीकडे नाराजीनं बघत त्या थोडावेळ उभ्या राहिल्या. मग मैथिलीनं 'बसा' म्हटल्यावर कोचात बसल्या. जुना, पॉलिश

उडालेला कोच, साध्याच धुवट खोल्या, किचनच्या दारात एकच फिकट पडदा. गॅलरीतील सामान वाळत घातलेल कपडे."[६७] यातून लेखिकेने सर्वसामान्य मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या कुटुंबाच्या घराचे वर्णन केलेल दिसते. म्हणजे वाचकांना शहरामधील परिस्थितीचीही जाणीव नक्कीच होताना दिसते.

"फाटकापलीकडे तर सरळ रस्ताच दिसला. तोही दोन घरांच्या ओळीमध्ये ठेवून दिलेला असा नव्हता. वेगळा, स्वतंत्र, मेनरोडही नाही असा पायवाटही नाही असा. रस्त्यापलीकडे एक छोटा पार्क. त्यापलीकडे मेनरोड. तो पूर्ण संपतो. तिथच तिचं विद्यापीठ वेळ असला तर पायीही जाता येण्यासारखं नाहीतर दोन बसस्टॉपच अंतर."[६८] यातून एका शहरी संस्कृतीचे वर्णन आलेलं दिसते. यावरुन असे लक्षात येते की, यावरुन असे लक्षात येते की लेखिका ज्या ज्या शहरामध्ये राहिलेली दिसते, तेथील दररोजचे जीवन लेखिकेने अनुभवले व तेच आपल्या साहित्यातून मांडलेले दिसते. उदा. "पूर्वी इथ वस्ती नव्हती फार. मग इथं हे मंदिर झालं. राघवेंद्र टेंपल, हळूहळू वस्ती वाढली. शेवटी आपण लोक कशाच्या तरी आधारानचं वस्ती वाढवत नेतो."[६९] याचा प्रत्यय कादंबरीतील स्थळवर्णनातून अनेक गोष्टीचे वर्णन दिसते.

आशा बगे या मानवी मनाची अगम्यता वारंवार अधोरेखित करतात. माणसे साधी, सोपी, प्रेमळच नसतात. कठोर, आग्रही, तटस्थ, स्वार्थी, मतलबी, हट्टी, मोहवश होणारी, दुबळी, पराभूत कोसळताना स्वतःला संभाळू न शकणारी विकल अशी ही असू शकतात याचे भान त्यांनी सतत दिलेले आहे. 'आकाश'मधला महेश अहंकारापायी उर्मिलापासून दुरावतो. ही नोकरी ती नोकरी, मग दुबई, अमेरिका असे त्याच्यामागे तडफड, त्याचे एकटे होत जाणे थांबवता येत नाही. दादा आणि बबी यांचे नाते कळू शकत नाही. 'भूमी'तल्या मिलिंदला आपण काय गमावतो आहोत हे जाणवत नाही. 'त्रिदल'मधली शारदा स्वतःला कमी लेखत राहते. श्रीनिवासला सोबत करु शकत नाही. मैथिलीला

शंतनूची ओळख करुन घेता नाही. 'भूमी' मधला सुधीरही कच खातो याचे चित्रण आशा बगेंनी केलेले आहे.

'सेतू' कादंबरीत ब्रिजमोहन आणि सुचरिता जेंव्हा सात वर्षांनी पुन्हा बनारस स्टेशनवर उतरतात तेच पारंपरिक दृश्य, गुळाला माशा चिकटाव्यात तसे धावणारे, चिकटणारे लोक, गिऱ्हाईक हेरणारे, शिकारी आणि भक्ष्य या दोनच जाती मानणारे लोक यांचे चित्रण स्थलाबरोबर मांडलेले आहे. "समोर गंगा तीच, तेच जुनं दृश्य, सकाळची वेळ, घाटावरल ऊन, घाटाच्या पायऱ्या, किनाऱ्याशी निर्माल्य साचलेलं, उघड्या अंगानं मंत्र पुटपुटत लोक ऊन खात उभे. सर्वत्र घाण, तरीही गंगेच पाणी ओंजळीत घेताना काही तरी वाटलंच, नावाडी नाव विचारत होते, त्यातली एक घेऊन तो जरा स्वच्छ किनाऱ्याशी गेला. घाटापासून जरा दूर, मध्यावर, तीच पहाडावरली दुकानं, डोंगर चढणारी मुलं शिक्षण सोडून दिलेली."[७०] 'सेतू' कादंबरीत कथानकाबरोबरच स्थलांचेही वर्णन मार्मिकपणे लेखिकेने मांडलेले आहे.

'त्रिदल' या कादंबरीत मंजू, शारदा व मंजूचा भाऊ श्रीनिवास यांच्या भोवतीच कादंबरीचा घट्ट पोत आहे. विमेन्स कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मंजू आणि शारदा या दोघी मैत्रिणी आहेत. "सेमिनार हिल्सवर धुलं पसरलं होतं, वर चढावाकडे निमूळता होत गेल्यासारखा वाटणारा मेन रोड, विमेन्स कॉलेज, मुलींच्या होस्टेलची इमारत आणि हिलवरचं मोकळ आभाळ सगळं धुक्यात गुरफटून गेलं होतं. आभाळ तर खालच्या धुक्याला येऊन टेकलस वाटत होतं."[७१] नागपूर शहरातील परिसराची जाणीव लेखिकेनं करुन दिलेली वाटते. "पाण्याकरता? मला सवय आहे मंजू, थंड पाण्याची आमच्या मंडल्याला गेले, की मी थंडच पाण्यानं आंघोळ करते. नर्मदेतच, नर्मदेच्या काठीच आमचं घर आहे ना!"[७२] ग्रामीण भागातील मंडल्याची नदी यांचाही उल्लेख केलेला आहे.

कादंबरीतील व्यक्तिचित्रण रेखाटण्यासाठी 'संवाद' हे महत्त्वाचे आहेत. कादंबरीतील संवादासंदर्भात उषा हस्तक लिहितात, "मानवी जीवनसृष्टी हाच

कादंबरीचा विषय असल्यामुळे मानवी जीवनाचे संवाद हे अंग कादंबरीत आपल्या वैशिष्टयांसह यावे हे सहाजिकच असते."[७३] म्हणजेच संवादातून पात्रे प्रसंग हे बोलके होतात. यातून त्यांचे जीवन उभे करता येते. त्यांचा स्वभाव हा त्यांच्या बोलण्यामधून व्यक्त होत असतो. संवाद आणि निवेदने यांच्यामध्ये एकजीवित्व दिसून येते. यातून लेखिकेने तरुण पिढीच्या वेगवेगळया अवस्थांचा वेध घेताना संवांदाचा उपयोग केला आहे.

"मॅथ्यूज म्हणाले, की तुला मॅथ्समध्ये मार्क कमी आहेत. जेवताना अम्मा मध्येच म्हणाली, हा मॅथ्यूज इतकं खोट बोलतो!मैथिलीला वाटलं यापूर्वी मिळाले आहेत, पूर्ण मार्क्स नाही सांगतं."[७४] "तुला कुठं इतक स्वातंत्र्य जानकी? साधं तू घरी झोपायलाही नव्हती येऊ शकत."[७५] या संवादातून स्त्रीला आजच्या जमान्यामध्येही पूर्ण स्वातंत्र्य नाही. स्वतःचे निर्णय ती स्वतः जणू घेऊच शकत नाही. तिच्यावर बंधने असल्याचे दिसते.

"ते चालतं हो, आम्ही आमच्याकडून काळजी घेतो. शेवटी माणसाला जगवणं हाच पर्याय आहे."[७६] यातून असे दिसते की, आजही जगामध्ये माणुसकी हरवलेली नाही. ती अशा प्रसंगामधून दिसून येते.

आत्या आणि मैथिली यांच्यातील लग्नासंबंधीचा संवाद लेखिकेने समर्पितपणे चित्रित केलेला दिसतो. "आम्हांला नव्हतीच निवड. स्वतःकरता स्वतःच्या बाजूनं आम्ही नाहीच पाहिलं कधी. तुमचं तसं नाही. तुमच्या वेळेपासून आमच्या वेळेपर्यंत पाहिलं नं आत्या, तर काही खूप फरक नसेल. थोड्या फार फरकानं तू, मी आणि मधल्या इतर सगळ्या जणी सारख्याच असू. आपल्या मनात काही उर्मीच उसळू नयेत. असाच पुरा बंदोबस्त! कारण कुठलीही आंतरिक उर्मी, प्रथम फक्त मुक्तीचीच असू शकते. तू काळजी करु नको. स्वतःचा सन्मान मी जपीन. मी आता खूप शहाणी झाले आहे."[७७] अशा प्रकारे 'भूमी' कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखा ठसठशीतपणे संवादातून स्पष्ट होताना दिसतात.

'सेतू' कादंबरीतील ब्रिजमोहन आणि सुचरिता यांच्या संवादातून जीवनातील घटनाक्रम मांडलेला दिसून येतो. "मी आणि तू? तुझं मला माहीत नाही. पण मी तो केलेला होता. तू मला बांधून ठेवलं नसतंस तर मग.' कमला आहे! मी तुला बांधून ठेवलं? माझ्या मनात नसताना आपलं सर्व सोडून मी तुझ्यामागं इथं आले आहे, मोहन"[७८] हे असे कितीतरी संवाद उदितला आठवतात.

"नाही, सुचरिता, वयानं नाही आणि कुणा एकाच व्यक्तीमुळंही नाही एका विशिष्ट प्रसंगा-घटनांमुळंही नाहीच. त्याच्या वेळा असतात. जागा असतात. वर भासतं, दिसतं, की या माणसानं यांच्यामुळं या कारणानं, या घटनेमुळं पण इतक सर्व सोपं, साध नसतं, ब्रिजमोहनच्या मेटल डिप्रेशनची नेमकी कोणती कारणं देशील बोट ठेवून? माणसाच्या तळापर्यंत कोणाला पोचता येईल? स्वतः त्याचं त्याला तरी पोचता येईल? अनेक विसंगतीचं एक जाळं आहे. यातून कोणता सुसंगत अर्थ सापडेल कुणाला?"[७९]

आशा बगे यांची 'मनस्विनी' ही कादंबरी सांगीतिक प्रतिमांनी सिध्द झालेली आहे. संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधारानेच यातील नायिका आपले मन व्यक्त करते. चिंतनात्मक पातळीवरही लेखिका संगीताचा उपयोग करते. विवाहानंतरच्या अनुभवाला सामोरे जाताना आलेले चिंतन व संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधारानेच व्यक्त करते.

"एक अनोळखी प्रदेश. स्पर्शाचा अन् शब्दांचा पण तितकीच परकी रात्र, तेवढाच दूरचा वाटणारा अंधार, आणि सर्वस्वी अपरिचित असं निजलेलं गाव. कुठल कुणास ठाऊक?.. गाडी अशा परक्या ठिकाणी येऊन बिघडावी हे काही शुभ नाही वाटलं! सुरुवातीलाच सूर लागू नये तसं. अजून उभी मैफिल समोर आहे."[८०] आत्मनिवेदन करतांना सौदामिनीला येणारे अनुभव तिला संगीतमय भाषेतच व्यक्त करवेसे वाटतात. "एखादया सुंदर जागेला, हरकतीला, सुरांचा पखरणीला दाद दयावी तशी सकाळ दाद मागतेय का?"[८१] कलावंत प्रवृत्तीची

संगीतलुब्ध अशी ही नायिका संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधारानेच आपले मन व्यक्त करते आणि भोवतालच्या जगाला सामोरं जाण्याकरिता सतत संगीताचा आधार घेत राहते. पण अमरेंद्र मात्र तिच्या या संगीताला समजून घेऊ शकत नाही, याची खंत तिच्या मनात सतत असते. कलावंताबरोबर दडलेली तिच्यातील स्त्री तिला सतत आवाज देत राहते. अशा प्रकारे सौदामिनी प्रत्येक अनुभव पारखणारी आहे. पण तिला हवा आहे विलक्षण कलात्मक संगीतमय संवाद. जो तिच्या आत्म्याशी नाते सांगू शकेल व यातूनच मग ती यशोधनशी बांधली जाते व तिच्या उत्कट प्रश्नांची सुरुवात होते व तिचा आत्मशोध सुरु होताना दिसतो.

"असलं काही समजून घेण्याची अमरची ताकदही नाही. यश आपल्या जातीचा आहे. पण आपल्याला अमर वाटयाला यावेत व यशला त्याच्या पांगळ्या मुली, बुडालेली पत्नी. भाईसारख्या कलाकाराला दमयंती!असं का व्हावं?आपल्याच जातीची, संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाहीत?का?"[८२] स्वतःला प्रश्नांच्या आवर्तनात ओवून देण्याची त्यांची ही नायिका यशोधनाच्या प्रेमात आपण गुंतलो आहोत हे कळताच आडवाटेला भेटलेल्या या क्षणाला साथ ठेवून स्वतःला विचारात राहते.

'झुंबर' मध्ये येणाऱ्या प्रतिमा या वसुमतीच्या प्रवासात तिला सोबत करतात. ज्यावेळेस डॉ. अधिकारी वसुमतीला म्हणतात, "वसू, माणसाला कठीण जातं, ते स्वतःलाच सामोर जाणं बाकी सगळं फार सोपं असतं. स्वतःचं वेगळं जग उभं कर माझ्याशिवाय, मी नसलेलं वसुमती, तू लग्न कर. एरवी हे तुला फार कठीण जाईल."[८३] हे वास्तव पेलून वसुमती बाहेर येते, तेव्हा अंगणाचे ओकेबोकेपण तिला प्रकर्षाने जाणवते. डॉ. अधिकारींच्या प्रथम भेटीत अंगणात गुलाब फुललेले असतात. आता अंगणात गवतही नाही. जिवंतपणाचा स्पर्श नसलेली नुसती बरड जमीन जणू भावनेपासून दूर गेलेल्या ऋषिकेश सारखी. असा अनुभव वसुमतीला येतो. या ठिकाणी आशा बगे लसलसते

स्त्रीत्वाचे अंकुर हे प्रतिमांच्या रुपाने व्यक्त करतात.वसुमतीची घुसमट सुचविण्यासाठी नागपूरची उष्णता, उकाडा, हवेचा गरम झोत, गेलेली वीज, आत न बसवणे आणि बाहेरही जाता न येणे असे प्रतिमेचे रुप धारण करणारे वातावरण आशा बगे यांनी चितारलेले आहे.

'त्रिदल' कादंबरीमध्ये भोवतालच्या इतर पात्रांबरोबर नर्मदाही महत्त्वाची आहे. ही नर्मदा शारदेला तिच्या सुख-दुःखात सतत सोबत करते. शारदा आणि नर्मदा यांची रुपे वेगळी असूनही त्या एकत्र येतात. नर्मदेचे खळाळतेपण, भोवतालच्या परिसराला आपल्यात सामावून घेण्याची तिची धडपड शारदेत नाही. पण हट्टीपणाने धडका देऊन तट फोडायला निघालेल्या बेफाम बेलगाम नर्मदेशी तिचे साम्य आहे. खरे तर जीवनदायी नर्मदेतच असलेले जीवघेणेपण आणि बेलगाम नर्मदेत असणारे नितळपण लेखिकेला महत्त्वाचे वाटले आहे. माणसांमध्येही अशी परस्परविरोधी टोके असतात. माणसे एकासारखी एक नसतातच. हाच आशय घेऊन लेखिकेने ही 'त्रिदल' कादंबरीतील स्थलवर्णने मांडलेली आहेत.

नर्मदा ही प्रतिमा खऱ्या अर्थाने व्यापकतेने शारदेच्या आयुष्याशी बांधली गेलेली आहे. शारदेचा हा प्रवास कसा घडला असेल, असा प्रश्न मंजूला पडतो. तिला वाटते, "आपल्याला कळू नाही शकलं कदाचित श्री-शारदेलाही नसेल कळलं, पण त्या दोघांना जोडणारे असे काही आंतरिक धागे असलेच पाहिजेत."[८४] जाईच्या वेलाखालची उमललेली फुले चिमून गेली. या प्रत्ययापाशीच कादंबरी संपते.

### ५.८ आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमधील निसर्गवर्णने -

आशा बगे यांनी 'भूमी' या कादंबरीमधील निसर्गवर्णने अत्यंत प्रभावीपणे चित्रित केलेली आहेत. ही निसर्गचित्रे लेखिकेने अगदी योग्य वेळी पात्रांच्या म्हणजेच नायिका-नायिकांचे सुखःदुःखाचे क्षण दाखविताना, एखादया विचाराचा, घटनेचा संदर्भ देताना रेखाटली आहेत. त्याचबरोबर काळ, वेळ,

कल्पना व पार्श्वभूमी घटनेशी पूर्णपणे समरस होऊन जाताना दिसते. उदा. तो कधी पावसाच्या रुपाने येतो. तर कधी संध्याकाळच्या, मावळतीच्या समुद्र किनाऱ्यावरील क्षणांच्या वर्णनाच्या रुपाने येतो. कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखिकेने सूर्याच्या मावळतीच्या रंगांचे, समुद्रकिनाऱ्यावरचे दृश्य जणू बोलके केले आहे.

"समुद्राच्या पाण्यावर अंधाराच्या सावल्या आल्या. ते पाणी रंग बदलत गेलं. क्षितिजाचाही रंग बदलत काळवंडला. आतापर्यंत स्वतःभोवती मस्तीत झुलणारी मागंपुढं वाकणारी नारळाची झाडंही स्तब्ध झालीत, हलायची झुलायची थांबली."[८५] या निसर्गवर्णनातून लेखिकेने संध्याकाळचे समुद्र किनाऱ्यावरील दृश्य उभे केले आहे. येथे निसर्ग हा मैथिलीच्या एकटेपणाची पार्श्वभूमी म्हणून आलेला दिसतो.

लेखिकेच्या कादंबऱ्यांमधून अशा प्रकारचे निसर्गवर्णन नेहमीच पहावयास मिळते. निसर्गवर्णनामुळे कादंबरीला, त्यातील व्यक्तिचित्रणांना तसेच प्रसंगांना उठावदारपणा येतो व तो कादंबरीत जागोजागी प्रत्ययास आलेला दिसतो. दोघं वाळूत उभीच होती. वाळू तापलेली होती. समुद्र उन्हानं चकाकत होता. बीच अस्वच्छ होता. दाट गडद नारळाच्या झाडांऐवजी उंच इमारतीवरच उतरायला पाहत होतं. वाळूच्या त्या पट्टयात ती दोघं. यामध्ये येणाऱ्या निसर्गाने एखादया वेळेस एकटेपणाचे चित्र अधिकच घट्ट होत जाते. तर कधी तो दोघांची सोबत घेऊन येते.

"प्रत्यक्षात कावेरीनं सांगितलं, त्यापेक्षाही जागा सुंदर होती. पिऊन घ्यावीशी वाटणारी शांतता. वाळूच्या शेवटी जरा दूरवर गर्द झाडीत जरा आडव्यातिडव्या हुलकावणी देत जाणाऱ्या पायऱ्यांवर एक देऊळ, हनीमून कॉटेजसारख्या झोपड्या, एका टिनशेडमध्ये एक हॉटेल, टाकलेलं गरम दोसा, सांबर, चटणी मिळत होतं. एक हॉटेलही होतं बरंस; पण या टिनशेडलाच गर्दी होती जास्त. इथं आल्यावर सर्वानांच वारा प्यायल्यासारख झालं."[८६]'भूमी'

कादंबरीमध्ये अचूकपणे निसर्ग वर्णने केलेली दिसून येतात.एकूणच निसर्ग वर्णनातून लेखिकेने त्या-त्या प्रसंगाचे, तेथील घटनांचे वर्णन केलेले दिसते. कादंबरीत लेखिकेने पावसाचे व मावळतीच्या सूर्याची रोमहर्षक अशी निसर्ग वर्णने केलेली आहेत.

आशा बगे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून नावीन्यपूर्ण आविष्कार करणारी आहे. कथानक, भाषा शैली, पात्रनिर्मीती या सर्वच बाबतीत त्यांनी नवीन दृष्टिकोन समोर ठेवलेला आहे. त्यातील संवाद, वर्णने, निवेदन अशा विविध पध्दतीचा वापर आपल्या कादंबरी रचनेत केला आहे. हाडामासाची पात्रे निर्माण करुन चिंतनशील, नवविचारांची प्रेरणाही निर्माण केलेली आहे. आशा बगे यांनी कादंबरी रचनेत सांगीतिक अंगाने मनाच्या उलघालीचे व्यामिश्र चित्र रेखाटू बघते. हीच प्रयोगशीलता आहे. संगीत, साहित्य, कला, अभिनय यांचे त्यांना असलेले आकर्षण तसेच प्रश्नात्मकता, तटस्थपणे दु:खाचा वेध घेण्याची त्यांची किमया त्यांच्या कादंबऱ्यांत वातावरणनिर्मिती करुन जाते.

'झुंबर' कादंबरीत घरात एक पाखरु पंख्यामुळे जखमी होऊन मरते. शंकर म्हणतो, "गुलाबाखाली पुरले तर झाडे तरारतील, खत होईल."[८७] ही प्रतिमाही कादंबरीत सहज विस्तारत जाते. वसुमतीसुध्दा एकीकडे डॉ. अधिकारी सोबतचे नाते संपवून पुन्हा रुजण्याचा प्रयत्न करते. राघवने स्वतः केलेले पेंटिंग हेही विस्तारणाऱ्या प्रतिमेच्या संदर्भात उभे राहते. घराकडे निघालेली, थकलेली, संथ पावले तरीही त्या पावलांमधली अनिवार्य ओढ. माणसाच्या विचट जिजीवेषेचे रुपच जणू लेखिका या प्रतिमासृष्टीतून आपल्या पुढे उभे करते. एकदा वसुमतीला माळी म्हणतो, "तुळस काय बाई, पडेल तिथे रुजते."[८८] यातून स्त्री जीवनाचे तिच्या सोशिकतेचे प्रत्यंतरच लेखिका तुळशीच्या प्रतिमेतून घडविते व त्यासाठी स्वतःची विशिष्ट अशी शैली तयार करते.

## ५.९ समारोप -

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील संवादाची व पात्रांच्या तोंडची भाषा पात्रांच्या स्वभावानुसार कळते. कौटुंबिक त्यांची निवेदनशैली, संथ, तपशिलांचे मनपूर्वक भरतकाम करणारी आहे. त्यामुळे कादंबरी भरगच्च वाटते. त्यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणही त्यांना आव्हान देणारी गोष्ट वाटते. त्यातूनच संथ निवेदन गरजेचे होऊन बसते. संध्याकाळ, रात्र, झाडे, पाऊस, नदी, समुद्र पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या रुपांत या कादंबऱ्यांमध्ये येतात. पात्रांच्या मनोवस्थांचे प्रतिबिंब निसर्गात उमटते. पात्रांचे स्वभाव वा मूडस त्यांच्या प्रतीकांतून दिसतात. 'त्रिदल' मधील नर्मदा, शारदेच्या स्वभावासारखी दिसते. 'सेतू'तील गंगा ही ब्रिजमोहनच्या भावविश्वाचा एक मनस्थितीचे प्रतीक म्हणून तर कधी कर्तृत्वाचा अवकाश म्हणून पुन्हा-पुन्हा येत राहते. 'भूमी'मध्ये समुद्र हा मैथिलीचा सोबतीच आहे. आत्याच्या घरातून दिसणारा किंवा मिलिंद-मैथिलीच्या उत्कट प्रेमाचा साथी असणारा पाऊसही मैथिलीला जवळचा वाटतो.

आशा बगे यांच्या साहित्याचा विचार करताना असे लक्षात येते की, त्यांनी वीस-पंचवीस वर्षात त्यांनी आपली स्वतंत्र मुद्रा मराठी वाङ्मयावर उमटवली आहे. त्यांचे अनुभवविश्व चांगल्या अर्थाने भारतीय परंपरेला समर्पित झालेल्या स्त्रीचे समृध्द अनुभवविश्व आहे. भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन कसे अवतरु शकते, याची प्रचिती आशा बगे यांच्या साहित्यकृतीतून प्राप्त झालेली आहे. आशा बगे यांच्या साहित्यामध्ये विदर्भ, महाराष्ट्र व बेंगलोर, बनारस, दिल्ली, अमेरिका, मांडलामधील बोलीभाषांचा उल्लेख आल्याचे जाणवते. त्यांच्या कादंबऱ्यांतील भाषेत प्रवाहीपणा जाणवतो. मानवाच्या बाहय व्यवस्थेबरोबरच त्यांच्या साहित्यातील भाषा मनातील आंतरिक व्यवहार पार पडताना दिसून येतात. भाषा ही व्यक्ती व्यक्तीनुसार भौगोलिक प्रदेशानुसार लेखिकेने त्याचा कादंबऱ्यांतून लहान लहान चटकदार आणि धार्मिक संवादातून आणि निवेदनातून एकजीव झालेली दिसून येते.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांत पात्र विरुध्द पात्र असा संघर्ष नसतो, तर त्याचां संघर्ष हा त्यांच्या मनाशी, त्यांच्या स्वत:शी असलेला हा झगडा असतो. 'त्रिदल'मध्ये सुध्दा शारदेचा संघर्ष हा तिच्या मनाशी व आयुष्याशीच आहे. आशा बगे स्त्रीवादी भूमिका न घेताही स्त्रीच्या अस्फूट, हळूवार आणि मानसिक दु:खाचा उद्गार आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त करतात. आशा बगे यांची स्त्री सुध्दा व्यक्ती म्हणून बघते. पारंपरिक स्त्रीबरोबरच आधुनिक स्त्रीची मनोव्यवस्था आशा बगे यांनी आपल्या लेखन कौशल्याने साकारतात. व्यक्ती म्हणून जगताना वाटयाला येणाऱ्या संघर्षाला सामोरे जाताना तिचे मन व सामर्थ्य जागृत होऊन आत्मशोधाला सन्मुख होते. पण तरीही त्यांची ही स्त्री प्रतिमा संस्कृतीच्या भानातच रमलेली आहे असे वाटते.

**५.९ निष्कर्ष -**

१) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये वातावरण निर्मिती, संवाद, भाषाशैली, व्यक्तिचित्रण व घटनामधील विविधता ही वैशिष्टये दिसून येतात.

२) आशा बगे यांनी कादंबऱ्यातून अनेक पदरी आशय आणि त्यांची कलात्मकता व अभिव्यक्तींचे यर्थाथपणे चित्रण केलेले आहे.

३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये संवादाला विशेष स्थान आहे. संवादातून बोलणाऱ्या माणसांच्या मनाचे तसेच त्यांच्यातील परस्परसंबंधाचे दर्शन सहजपणे घडवलेले आहे.

४) आशा बगे यांना निसर्ग प्रतिमांचे असलेले आकर्षण व त्याचे वर्णन करताना त्यांची शैली काव्यमय होताना दिसते.

५) आशा बगे यांच्या कादंबरीतील पात्रांचे मनोविश्व व त्यांच्यातील गुंतागुंत त्या सहज शैलीतून व्यक्त करतात.

६) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये छोटया छोटया प्रसंगामधून माणसांच्या आंतरिक वास्तवाचे ,मानवी संबंधाचे,मानवी वेदना आणि कासाविस करणाऱ्यां दु:खाची तऱ्हा फार धारदारपणे टिपलेली आहे.

७) आशा बगे यांची जीवनदृष्टी, प्रतिमासृष्टी साकारताना दिसतात.

८) आशा बगे यांच्या साहित्यातील निसर्गाची प्रतीके, व नायक नायिकांचे सुख-दुःखाचे हुंकार उमटले आहेत.

९) आशा बगे यांच्या शैलीत लय आहे. भावनांचे उसवलेपण आहे पण ते शांत रसातले आहे.

१०) भाषेचा प्रवाहीपणा हे लेखिकेचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

११) आशा बगे यांचे अनुभवविश्व चांगल्या अर्थाने समर्पित झालेल्या स्त्रीचे समृध्द अनुभवविश्व आहे

१२) भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन होऊन कसे अवतरु शकते. याची प्रचिती त्यांच्या लिखाणातून दिसून येते.

## संदर्भ सूची


१) कुलकर्णी, कृ.पा., 'मराठी भाषा उद्‌भव व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती, १९७३, पृष्ठ - २.

२) यादव आनंद, 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८५, पृष्ठ - ५२.

३) बापट प्र.वा. व गोडबोले वा.ना., 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३, पृष्ठ - १३७.

४) अवसरीकर स्नेहा, 'आशा बगे यांची घेतलेली मुलाखत, आशय', दिवाळी अंक, नोव्हेंबर २००८, पृष्ठ - ८२.

५) देशपांडे मा.का., साहित्य साधना, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, प्रथम आवृत्ती, १९६१, पृष्ठ - ४६२.

६) बगे आशा, 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे, १९७८, पृष्ठ - १५२.

७) बगे आशा, तत्रैव, पृष्ठ - १५४.

८) जाधव रा.ग., 'वाङ्मयीन निबंधलेखन', पुणे १९७७, पृष्ठ - ९४.

९) तत्रैव, पृष्ठ - ९४.

१०) बगे आशा,'भूमी',मौज प्रकाशन,मुंबई, दुसरी आवृत्ती, २००६, पृष्ठ १३८.

११) तत्रैव, पृष्ठ - १७२.

१२) बगे आशा, 'मनस्विनी',उनि., पृष्ठ - १८९-१९०.

१३) तत्रैव, पृष्ठ - ७१.

१४) तत्रैव, पृष्ठ - ५५.

१५) सावदेकर आशा, 'काही शोध निबंध', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००२, पृष्ठ - १२५.

१६) बगे आशा, 'अध्यक्षीय भाषण' विदर्भ साहित्य, संघ, लेखिका संमेलन, ६ ऑक्टोबर, १९९१.

१७) बगे आशा, 'मनस्विनी',उनि., पृष्ठ - ९२.

१८) हेर्लेकर सुलभा , 'आशा बगे एक नवे अस्तित्व' कस्तुभा प्रकाशन, नागपूर, १९९६, पृष्ठ - ६३.
१९) बगे आशा, 'मनस्विनी', उनि., पृष्ठ - २९.
२०) बगे आशा, 'मारवा' कथासंग्रह, मारवा कथा, उनि., पृष्ठ - १५.
२१) बगे आशा, 'मारवा कथासंग्रह, रुक्मिणी कथा, उनि., पृष्ठ - १८४.
२२) बगे आशा, 'सेतू', मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, २००७, पृष्ठ - २०३.
२३) तत्रैव, पृष्ठ - १८९.
२४) तत्रैव, पृष्ठ - १९५.
२५) तत्रैव, पृष्ठ - १९९.
२६) पाध्ये प्रभाकर, 'आस्वाद, आदिम प्रतिभा, मॅजेस्टिक प्रकाशन,पृष्ठ -५८.
२७) बगे आशा, 'झुंबर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ - ६८.
२८) तत्रैव, पृष्ठ - ६८.
२९) बगे आशा,'त्रिदल',मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती,२००७,पृष्ठ ०५.
३०) तत्रैव, पृष्ठ - ६.
३१) तत्रैव, पृष्ठ - २१.
३२) तत्रैव, पृष्ठ - ५४.
३३) तत्रैव, पृष्ठ - ३३.
३४) तत्रैव, पृष्ठ - १०३.
३५) बगे आशा, 'आकाश', विजय प्रकाशन, तृतीय आवृत्ती, २००७,पृष्ठ-८१.
३६) तत्रैव, पृष्ठ - ८५.
३७) तत्रैव, पृष्ठ - १०७.
३८) बगे आशा, 'मुद्रा',मौज प्रकाशन,मुंबई, प्रथम आवृत्ती,२०१५,पृष्ठ - १६६.
३९) बगे आशा, तत्रैव, पृष्ठ - २१०.
४०) वैद्य अरंधती, 'भूमी' एका आधुनिक मैथिलीचे जीवनयान, युगवानी, एप्रिल -जून २००७, पृष्ठ - १५.

४१) तत्रैव, पृष्ठ - १५.

४२) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - १८२.

४३) तत्रैव, पृष्ठ - १७४.

४४) बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - २०३.

४५) तत्रैव, पृष्ठ - २५.

४६) पाटील गंगाधर, 'समीक्षेची नवी रुपे : मुंबई, १९८३, पृष्ठ - ७५.

४७) सानप किशोरः नेमाडे भालचंद्र, यांची कादंबरी एक चिकित्सा, विजय प्रकाशन, औरंगाबाद, १९९६, पृष्ठ - ९५.

४८) बगे आशा, 'त्रिदल', उनि., पृष्ठ - १०३.

४९) तत्रैव, पृष्ठ - १३२.

५०) तत्रैव, पृष्ठ - १२६.

५१) पठारे रंगनाथ, 'सत्वाची भाषा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९७७, पृष्ठ २९९.

५२) सावदेकर आशा, 'काही शोध निबंध', उनि., आशा बगे यांचे कादंबरी विश्व, पृष्ठ - १२५.

५३) बगे आशा, 'मनस्विनी', उनि., पृष्ठ - ७१.

५४) सिरास श्रीनिवास, 'युगवानी', मासिक नागपूर, ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८९, पृष्ठ - ६५.

५५) बगे आशा, 'झुंबर' उनि., पृष्ठ - १५६.

५६) सावदेकर आशा , 'काही शोध निबंध', उनि., आशा बगे यांचे कादंबरी विश्व, पृष्ठ - १२०.

५७) बगे आशा, 'त्रिदल', उनि., पृष्ठ - २१.

५८) तत्रैव, पृष्ठ - १३३-१३४.

५९) तत्रैव, पृष्ठ - १३०.

६०) गजेंद्रगडकर मोनिका, दैनिक लोकसत्ता, लोकरंग पुणे, ०७ जानेवारी, २००७.

६१)  बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ३९.

६२)  तत्रैव, पृष्ठ - १५८.

६३)  तत्रैव, पृष्ठ - २०८.

६४)  अवसरीकर स्नेहा, 'आशा बगे यांची मुलाखत, आशय', दिवाळी अंक, मुद्रा प्रकाशन, सोलापूर, २००८, पृष्ठ - ८३.

६५)  बगे आशा, 'मुद्रा', मौज प्रकाशन,मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१५, पृष्ठ - ४.

६६)  बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - ५१.

६७)  बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ८०.

६८)  तत्रैव, पृष्ठ - १८३.

६९)  तत्रैव, पृष्ठ - १९७.

७०)  बगे आशा, 'सेतू',उनि., पृष्ठ - ७८.

७१)  बगे आशा, 'त्रिदल',उनि., पृष्ठ - ०१.

७२)  तत्रैव, पृष्ठ - ०१.

७३)  वैद्य अरुंधती, 'भूमी', एका आधुनिक मैथिलीचे जीवनयान युगवाणी, 'एप्रिल-जून २००७, पृष्ठ - १५.

७४)  बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ३.

७५)  तत्रैव, पृष्ठ - २२.

७६)  तत्रैव, पृष्ठ - ९७.

७७)  तत्रैव, पृष्ठ - ११३.

७८)  बगे आशा, 'सेतू', उनि., पृष्ठ - १५४.

७९)  तत्रैव, पृष्ठ - १७८-१७९.

८०)  बगे आशा, 'मनस्विनी',उनि., पृष्ठ - ०१.

८१)  तत्रैव, पृष्ठ - ९१.

८२)  तत्रैव, पृष्ठ - १५२.

८३)  बगे आशा, 'झुंबर', उनि., पृष्ठ - ११८.

८४)  बगे आशा, 'त्रिदल', उनि., पृष्ठ - ९५

८५) बगे आशा, 'भूमी', उनि., पृष्ठ - ०१.

८६) तत्रैव, पृष्ठ - १४३.

८७) बगे आशा, 'झुंबर', उनि., पृष्ठ - ५८.

८८) तत्रैव, पृष्ठ - १२९.

**प्रकरण सहावे**

**उपसंहार**


६.१ प्रास्ताविक व निष्कर्ष

६.२ आशा बगे यांचा परिचय व छायाचित्रे

६.३ आशा बगे यांच्या साहित्यकृतीची मुखपृष्ठे

६.४ संदर्भ ग्रंथ सूची

६.५ आधारभूत ग्रंथ सूची

६.६ नियतकालिके व वर्तमानपत्रे

६.७ व्यक्तिनाम सूची

६.८ ग्रामनाम सूची

## प्रकरण सहावे

## उपसंहार

### ६.१ प्रस्ताविक -

१९६० नंतरच्या कालखंडामध्ये कादंबऱ्यांचे युग सुरु झाले. या कालखंडात आपला जीवनानुभव आणि सामाजिक वास्तवतेचे चित्रण हे अनेक लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडलेले दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्री जीवनात अनेक परिवर्तने घडून आली. ती म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ, दलित साहित्य चळवळ इत्यादी होय. या सर्वांचा परिणाम स्त्री जीवनावर झालेला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी घुसमट स्त्रियांच्या लक्षात आली व तिने आपल्या स्वतःच्या अधिकारासाठी संघर्ष करण्यास सुरुवात केली. आजही तिचा हा संघर्ष चालूच आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा तिचा प्रयत्न निरंतर सुरुच आहे. याच विषयावर मुख्यत्वे लेखकांनी लिखाण केलेले आहे.

**पहिल्या प्रकरणामध्ये कथा कादंबरीकार आशा बगे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन कार्याचा** आढावा घेतलेला आहे. आशा बगे यांची जडणघडण ही घरातील एकत्र कुटुंब पध्दती, सरंजामशाही थाटाचे वातावरण व गावचे देशमुख म्हणून नावाजलेला मोठा वाडा, ब्राम्हणी पध्दतीचे वातावरण, सुशिक्षित असे कुटुंब, यामुळे त्यांचे बालपण खेळीमेळीचे, आनंदाचे व सुसंस्कृत अशा घराण्यामध्ये गेलेले दिसून येते. कीर्तन, संगीत आणि साहित्य या घटकांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो. त्यांची निष्ठा कला, साहित्य व अध्यात्म अशा त्रिवेणी संगमातून घडलेली आहे. त्यांच्या लेखनातून स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी असलेले जवळचे नाते दिसून येते. तरी बदलत्या समाजवास्तवाचे, कुटुंब व्यवस्थेतील स्त्रियांच्या अस्तित्वाचे भान, मध्यमवर्गीय व बदलत्या मूल्यांची जाणीव त्यांच्याजवळ आहे. म्हणून त्यांच्या कादंबऱ्यातील स्त्रिया वैविध्यपूर्ण आहेत.

आशा बगे यांनी कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार

लेखन करुन स्वतंत्र वाट चोखाळलेली आहे. त्यांच्या लेखनामध्ये संयमित शैली, कौटुंबिक प्रतिमाविश्व आणि अनुभवांची उत्कृष्टता ही त्यांची खास वैशिष्टये आहेत. तसेच चिंतनशीलता, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा हे त्यांच्या लेखणीचे बळ आहे. आजच्या दैनंदिन जीवनातील माणसाच्या मनाचा तळ शोधणाऱ्या आणि वाचकांची अभिरुची गृहीत धरुन तरल संवेदनाच्या एका वेगवेगळयाच उंचीवर वाचकाला घेऊन जाणाऱ्या सिध्दहस्त लेखिका म्हणून आशा बगेंची ओळख आहे.

आशा बगे यांनी १९७५ नंतर मराठी वाङ्मय लेखनास सुरुवात केलेली दिसते. 'मारवा', 'अत्तर', 'पूजा', 'मांडव', 'चंदन', 'अनंत', 'दर्पण', 'निसटलेले', 'ऋतुवेगळे', 'माझी कथा माझी निवड', 'श्रावण सरी', 'पाणी', 'प्रतिद्वंदी', पाऊलवाटेवरले गाव' इत्यादी कथासंग्रह त्यांचे प्रसिध्द झालेले आहेत. त्याबरोबर 'मनस्विनी', 'झुंबर', 'सेतू','त्रिदल', 'कुरुक्षेत्रे व धर्मक्षेत्रे', 'भूमी', 'भूमिका आणि उत्सव', 'मुद्रा', चक्रवर्ती. इत्यादी साहित्य प्रकाशित झालेले आहे. याचा आढावा पहिल्या प्रकरणात घेतलेला आहे.

**दुसऱ्या प्रकरणामध्ये आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे कथानक व जीवन दर्शन** यांचा आढावा घेतलेला आहे. 'भूमी' कादंबरीमध्ये आजच्या आधुनिक जगात स्त्री ही स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे येत आहे. बुध्दीच्या, जिद्दीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर ती यशाची शिखरे गाठत आहे. लेखनाने स्वतःचे नाव कमावते. या सगळयामुळे तिच्याकडे असामान्य एकाकी कर्तृत्व असणारी स्त्री म्हणून कुटुंबातले सर्वजण तिच्याकडे पाहतात. तिच्या मनाची एकाकी अवस्था होते. ती 'भूमी' या कादंबरीत एका पोरक्या पण मनस्विनी आणि जीवनाच्या प्रवासात स्वयंसिध्द ठरलेल्या मुलीची (मैथिलीची) कहाणी आहे.

'मनस्विनी' या कादंबरीतील कथानकही घट्ट विणीचे आहे. मात्र, ते एकदम वेगवान गतीने पुढे जात नाही, तर एकदम संथही नाही. त्या हळुवारपणे

व कुशलतेने आपल्या पात्रांच्या मनोविश्वाचा वेध घेतात. पात्रांच्या मनोविश्वातील गुंतागुंत त्या सहजपणे मांडतात. एका मनस्वी मनाच्या स्पर्श कोवळीकीतून उमटलेली कादंबरी आहे. संगीत कलेवर प्रेम करणाऱ्या सौदामिनीचे मन लेखिकेने मांडलेले आहे. त्यामुळेच मैफिलीतल्या क्षणांचे सौंदर्य त्यांनी उलगडून दाखविलेले आहे. आभाळ, समुद्र, पाणी, संध्याकाळ निसर्ग ही सारी सृष्टी त्यांच्या कादंबरीत मांडलेली आहे. सौदामिनी ही आईविना वाढलेली आणि संवेदनक्षम मनाची मनस्विनी आहे. या कादंबरीत कलात्मकता व संवेदना इथे सौदामिनी व यशोधनाच्या रुपाने व्यक्त केलेली आहे.

'झुंबर'ची नायिका वसुमती, तिचा पती ऋषिकेश व त्यांचा विद्यार्थी वसुमतीचा मित्र राघव हे तिघेही व्यवसायाने डॉक्टर. त्यामुळे कादंबरीचा कथाविषय हा तिघांच्या समोर एकमेकांच्या संबंधामुळे निर्माण होणाऱ्या भावनिक अडचणींचा आहे. 'झुंबर' ही कादंबरी स्त्रीभोवतीच फिरणारी. तरीही सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांच्या सहवासात आलेले अनुभव यांचे चित्रण या कादंबरीच्या कथानकातून दिसून येते. 'झुंबर' कादंबरीची नायिका वसुमती धाडसी आहे, पण संस्कृतीचे पालन करणाऱ्या विचारातच ती गुरफटलेली आहे. ते त्यांनी त्यांच्या लेखनातून स्पष्टपणे मांडलेले आहे.

'सेतू' कादंबरी मध्ये लेखिकेने माणसामाणसांमधल्या नात्यांचा सूक्ष्म वेध घेतलेला आहे. त्यात पती-पत्नी, सासू-सून, नणंद-भावजय, आई-मुलगा, वडील-मुलगी, मावशी-भाची, असे विविध नातेसंबंध 'सेतू' या कादंबरीतून आलेले आहेत. तसेच सामाजिक जीवनातील आधुनिकता व पारंपरिक मूल्यांच्या संघर्षात घुसमटलेली पात्रे आढळतात. अशाच पात्रांच्या विस्तृत जीवन परंपरांतून कथानक गुंतागुंतीचे बनत गेलेले दिसते. मानवी मनाच्या गरगरत्या भोवऱ्याचे काळेभोर केंद्र तिथे जाणवते आहे. 'सेतू' ही गुंतागुंतीच्या नात्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतूनही मानवी समाज घटकाचे दर्शन दिसून येते. सामाजिक चौकटीतच राहणाऱ्या त्यांच्या नायिका या समाजाविषयी त्यातील तथाकथित मूल्यांविषयी अनेक प्रश्न पडतात. त्यातून त्यांचे आत्मभान जागृत होते पण तरीसुध्दा शेवटी त्या एका विशिष्ट सामाजिक चौकटीतच राहणे पसंत करतात. कारण त्यांना भेदून जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण झालेले नसते. स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार करताना आपण ज्या समाजात राहतो,त्याचाही विचार लेखिकेने केलेला आहे. समाजाची बंधने त्या एकाएकी तोडू शकत नाही. 'मनस्विनी'तील सौदामिनी, 'झुंबर'मधील वसुमती, 'त्रिदल'मधील शारदा, 'भूमी' मधील मैथिली या सर्व नायिका समाजाला दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान देताना दिसतात.

**तिसऱ्या प्रकरणात आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे स्त्री दर्शन** याचा आढावा घेतलेला आहे. स्त्री जीवनाचा सामाजिक आढावा, स्त्री जीवनाचे बदलते वास्तव, तसेच त्यांच्या कादंबऱ्यांतील जुने व नवे विचार यांचा आढावा घेतलेला आहे. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून येणारी पात्रे व त्याचा विशिष्ट स्वभावधर्म व त्यांच्या वागण्याच्या पध्दतीवरुन घडणाऱ्या घटना आणि त्यांची विशिष्ट ठेवण असलेली व्यक्तिचित्रण, यांच्या ताणातूनच जीवनाचे मर्म उलगडत जाते. आशा बगे याच्या अनेक व्यक्तिचित्रांच्या निमित्ताने त्यांचा मूल्यभाव आणि आयुष्यातील घटनाक्रमांना महत्त्व देताना दिसतात. आशा बगे यांनी कादंबऱ्यांतून सामान्य मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण मांडलेले आहे.

आधुनिक बदलत्या काळातील स्त्री, तिचे तिच्या पतीबरोबर, मुलांबरोबर असलेले नाते, तिचे तिच्या मित्र-मैत्रिणीसोबत असलेले संबंध, तिची मानसिकता, स्त्री-पुरुष संबंधाकडे एका वेगळेपणाने पाहण्याची दृष्टी स्त्रीच्या बदलत्या जीवनाचे चित्रण व त्याचे व्यापक असे अनुभवविश्व याचे दर्शन आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतून घडते.

आशा बगे यांची स्त्री प्रश्नांची जाण, त्यांच्या साहित्यातून स्त्री वर्गाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी हळूहळू बदलू लागली आणि त्याचबरोबर स्त्रियांचीही स्वतःकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागली. आपण विचारक्षम आणि मनुष्य म्हणून पुरुषाइतकेच सक्षम असूनही निव्वळ चुकीच्या रुढी, विवेकहीन धार्मिक, कर्मकांडे व अनिष्ट सामाजिक प्रथांमुळे समाजात आपल्या वाटयाला दुय्यमत्व मिळाले याविषयीचे भान स्त्रियांमध्ये जागे झालेले दिसून येते.

भारतीय स्त्री जीवनाची अधोगती, समाजातील तिचे दुय्यम स्थान लेखिकेने स्वतः अनुभवलेले आहे. आयुष्यभर कष्ट उपसून पुरुषांच्या बरोबरीने संसाराचा गाडा ओढणाऱ्या स्त्रियांच्या नशिबी शेवटी समाजाची उपेक्षाच येते. 'मनस्विनी' या कादंबरीत सौदामिनीच्या जीवनाचा प्रवास लेखिकेने मांडलेला आहे. प्रेमाचे चित्रण करणारी ही कादंबरी असली तरी वेगळ्या वाटेवरची आहे. या कादंबरीतील नायिका संगीतप्रेमी आहे. म्हणूनच ती संगीतनिष्ठा प्रतिमांच्या आधाराने आपले मन व्यक्त करत आणि पुढची वाट धरण्यासाठी संगीताचाच आधार घेतलेला आहे.

आपल्या स्त्रीत्वाच्या साक्षात्कारातून आशा बगे यांनी आपले वेगळेपण उमगू न शकणारी, बंडखोरी करता न येणारी, केली तरी निर्वेधपणाने न जगता येणारी, सामान्य असूनही माणसाला जपण्यासाठी जिवाचा कोट करणारी, परंपरेला शरण जाणारी, छोटया छोटया दुःखांनी कोलमडणारी, जगता जगता सामान्य विश्वापल्याड जाऊ पाहणारी आणि असामान्य होऊ पाहणारी, अशा कितीतरी स्त्रिमनाच्या रुपांचा उत्कट वेध कादंबऱ्यांतून घेतलेला आहे.

आशा बगे यांच्या कादंबऱ्या मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या आहेत. लेखिकेच्या साहित्यातील स्त्री जीवन हे सर्वांहून वेगळे आहे. सद्‌भावनेच्या, सत्प्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यांच्यावर आहे. मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रतवैकल्ये, कीर्तन, संस्कार, आचार-विचार यांच्याशी जवळचे नाते असलेले जीवन मांडलेले आहे.

आजच्या स्त्रीची मानसिक भावस्पंदने व बदलत गेलेली कौटुंबिक परिस्थिती याचा सूक्ष्म वेध त्या आपल्या कादंबऱ्यांतून घेत असतात. त्यांच्या 'मनस्विनी' व 'झुंबर' या दोन्ही कादंबऱ्यांचा विषय एकच आहे. दोन्हीमध्ये प्रेमाचा त्रिकोणच, पण दोन्ही कादंबऱ्या या वेगवेगळया वाटेवरुन जाणाऱ्या आहेत. व्यक्तीच्या आंतरिक वास्तवात परस्परसंबंधाला दोन्ही कादंबऱ्यांत महत्त्वाचे स्थान आहे. परंपरेचा धागा न तोडता सनातन नात्यात नवेपण शोधणे हेच त्यांच्या कादंबरी लेखनाचे वैशिष्टय आहे.

**चौथ्या प्रकरणात आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखांचा** आढावा घेतलेला आहे. या व्यक्तिरेखा समाज जीवनाबरोबर वाढत राहणाऱ्या असल्यामुळे समाजातील व्यवहार, माणसामाणसांतील परस्परसंबंध, राग, लोभ, हर्ष, खेद व भावना यांच्या केंद्रस्थानी माणूसच असतो. व्यक्ती व्यक्तींच्या संबंधाच्या जाळयांनीच समाज घडतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तीच्या विविध कृती उक्तींद्वाराच घडते. या कृती-उक्ती व्यावहारिक तसेच मानसिकतेवर लेखिकेने भर दिलेला आहे.

आशा बगे यांनी मध्यवर्गीय कुटुंबातील वेगवेगळया वयोगटातील, वेगवेगळया स्तरांतील व वेगवेगळया व्यवसायातील वेगवेगळया मनोवृत्तीच्या पात्रांची कादंबरीमध्ये सरमिसळ केलेली दिसते. मैथिली ही कादंबरीची नायिका असल्यामुळे कादंबरीला एक प्रवाहीपणा असलेला दिसतो. कादंबरीमध्ये पात्रांची निवेदने, परिणामकारक शब्दयोजना, पात्रांचे संवाद, भाषाशैली, नातेसंबंध यासारख्या विविध घटकांचा वापर करुन लेखिकेने व्यक्तिचित्रणे जिवंत केली आहेत. तसेच व्यक्तिरेखाटनाचे कौशल्य कादंबरी वाचताना वाचकांना दिसून येते.

स्त्री व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून आशा बगे मुख्यतः विविध मानवी नात्यांचा शोध घेतात. ही नाती केवळ स्त्री-पुरुष सबंधांपुरती मर्यादित नाहीत. स्त्री-पुरुष संबंध त्यांना महत्त्वाचे वाटतात. परंतु केवळ तेवढाच एकेरी धागा

त्यांनी हातात घेतलेला नाही. स्त्री-पुरुष संबंध एका टप्प्यावर कुठेतरी सुरु होतात. पण त्या व्यतिरिक्त जीवनात अनेकविध नातीही येतात.

आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांत भाषेचा प्रवाहीपण हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. त्यांच्या कादंबऱ्यांची भाषा ही सहजपणे मनाला भिडणारी आहे. संवेदनशीलता आणि काव्यात्मकता हे विशेषही त्याच्या लेखनातून व्यक्त होताना दिसतात. काही व्यक्तींच्या वाटयाला आयुष्यात नेहमी दुःखच येते आणि त्याची कोणतीही कारणपरंपरा लावता येत नाही. अशा स्त्री व्यक्ती बगे यांच्या विश्वात भेटतात. परंपरेचा व संस्कृतीचा सार्थ अभिमान म्हणून किंवा त्यांची जवळीक म्हणून आशा बगे यांच्या नायिका संघर्ष टाळताना दिसतात.

आशा बगेंच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेचे जवळचे नाते असलेली असली, तरी बदलत्या समाज वास्तवातील कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीवही त्यांच्याजवळ आहे म्हणूनच त्यांच्या कथेतील स्त्रिया वैविध्यपूर्ण आहेत. त्यांना स्वतःची अशी वेगळी जाणीव आहे, विचार करण्याची क्षमता आहे. ही जाणीव जपण्यासाठी, आपले अस्तित्व जपण्यासाठी बंडखोरी जरी नाही तरी रुढ नीतिनियमांच्या परंपरेच्या विरोधी काही एका सीमेपर्यंत जाण्याची त्यांची तयारी आहे.

**पाचव्या प्रकरणात आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास** केलेला आहे. यात भाषाशैली, निवेदनपध्दती, नातेसंबंध, स्थलवर्णन, संवाद आणि निसर्गवर्णने, वातावरणनिर्मिती, मनोविश्लेषण यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील संवादाची व पात्रांच्या तोंडाची भाषा पात्रांच्या स्वभावानुसार बदलते. कौटुंबिक, त्यांची निवेदनशैली, हृदयस्पर्शी आहे. संध्याकाळ, रात्र, झाडे, पाऊस, नदी, समुद्र पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या रुपांत या कादंबऱ्यांमध्ये येतात. पात्रांच्या मनोवस्थांचे प्रतिबिंब निसर्गात उमटते. पात्रांचे स्वभाव वा मूडस त्यांच्या प्रतीकांतून दिसतात. 'त्रिदल'

मधील नर्मदा शारदेच्या स्वभावासारखी दिसते. 'सेतू'तील गंगा ही ब्रिजमोहनच्या भावविश्वाच्या मनस्थितीचे प्रतीक म्हणून तर कधी कर्तृत्वाचा अवकाश म्हणून पुन्हा-पुन्हा येत राहते.

आशा बगे यांच्या शैलीतली शब्दयोजना, शब्दकळा ही किती तोलून मापून आणि वेचक असते, त्याची ग्वाही देण्यास एवढी उदाहरणे पुरेशी आहेत. ही शैली इतकी अर्थपरिपूर्ण आणि चित्रमय आहे की, तिचे ताकदीचे विषय तितक्याच ताकदीच्या व्यक्ती आणि प्रसंग यांची सुंदर बांधणी ती बांधू शकली. 'झुंबर' या कादंबरीतील हॉस्पिटलचा परिसर, वातावरणनिर्मिती, ऑपरेशन्स या सर्वांचा जवळून घेतलेला अनुभव, स्वभाव रेखनातील हेलकावे ही शैली सूक्ष्म रीतीने लेखिका टिपते. तसेच स्त्रियांच्या अस्तित्वाची जाणीव व बदलत्या मूल्यांचे भान असूनही शेवटी आशा बगे या स्त्री संस्कृतीशी व परंपरेशी असलेले आपले जवळचे नाते सांगताना दिसतात.

**६.१.२ निष्कर्ष -**

१) एखादी सूक्ष्म घटना, त्यातील माणसाचं अडकणं किंवा बाहेर निघणं, सुटणं किंवा गुंतून पडणं किंवा दोन्ही गोष्टींचं मिश्रण आशा बगे यांच्या कथा कादंबऱ्यांतून आलेले आहे.

२) आशा बगे यांच्या कथा-कादंबऱ्यांतून परंपरेची बंधने आणि आधुनिकतेचा स्वीकार यात माणसाची जी फरफट होते त्याचा शोध घेतलेला आहे.

३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये केवळ अट्टाहासी स्त्रीवादी भूमिका न घेता आधुनिक स्त्रीची मनोभूमिका मांडलेली आहे.

४) आशा बगे यांच्या कादंबऱ्यात संयमित शैली, कौटुंबिक प्रतिमाविश्व आणि अनुभवांची उत्कटता ही त्यांच्या कथांची वैशिष्टये आहेत.

५) आजच्या जगात वावरताना स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या दुःखाच्या विविध तऱ्हा, पुरुषप्रधान संस्कृतीत तिची होणारी कुचंबना, सौम्य स्वरुपातील

परंपरेविरुध्दची तिची बंडखोरी, तिचे जागृत होणारे आत्मभान या सर्वांचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

६) आशा बगे यांच्या कादंबरी लेखनामधून भारतीय जीवनातील कर्मकांड, व्रतवैकल्ये, सण, उत्सव, रुढी, परंपरा, कीर्तन व संगीत इत्यादी विषयाचे ज्ञान दिसून येते.

७) आशा बगे यांच्या लेखनामधून माणसाच्या अंतरंगाचा शोध, त्यांच्या मनातील पारदर्शक नजर शोधून तळ गाठण्याचा व माणसाच्या गूढ स्वभावाचे दर्शन आलेले आहे.

८) आशा बगे यांच्या वाङ्मयलेखनात वास्तव जीवनाचे एक साधन म्हणून त्यांनी सातत्याने लेखन केले, त्यांच्या लेखनातून चिंतनशीलता, मूल्यनिष्ठा आणि अपार श्रध्दा व्यक्त झालेली दिसते.

९) आधुनिक जीवनाच्या व धकाधकीच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी जीवनातील अनेक व्यथा, संवेदना व संघर्ष याचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

१०) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती व त्यांच्यामध्ये घडणाऱ्या प्रसंगामधून भावनिक गुंतागुंतीतून व आंतरिक संघर्षातून कथानकाचे यथार्थ चित्रण मांडलेले आहे.

११) 'मनस्विनी' या कादंबरीत यशोधन व सौदामिनीच्या रुपाने कलात्मकता व संवेदना लेखिकेने अचूकपणे मांडलेली आहे.

१२) सामाजिक व पारंपरिक नीतिकल्पनांना धुडकावणारी व स्वतंत्र बाण्याची स्त्री कादंबऱ्यांतून लेखिकेने चित्रित केलेली आहे.

१३) आशा बगे यांच्या 'सेतू' व 'त्रिदल' या कादंबऱ्यांतून विविध अनिष्ट रुढी, परंपरा, चालिरीती आणि व्रतवैकल्ये यांच्यात भारतीय स्त्रिया इतक्या जखडलेल्या होत्या की, त्या स्वतंत्रपणे विचार करुन त्या सर्व गोष्टीतून बाहेर निघणे स्त्रियांना अशक्यप्रायच होते, ते त्यांच्या लेखनातून आलेले आहे.

१४) लेखिकेने कथानकापेक्षा मानवी मनाच्या अंतरंगाला स्पर्श करुन लिहिण्याचे आणि स्वभाव वैशिष्टयातून कथानकाचे धागे उलगडत जाताना दिसतात.

१५) आशा बगे यांनी समाजातील स्त्रीचे स्थान, कुटुंब, विवाह परंपरा यांच्याबद्दलच्या मूलभूत प्रश्नांना त्यांनी वाचा फोडलेली आहे.

१६) आशा बगे यांच्या कादंबऱ्यातून जीवनाचे सखोल दर्शन व मानवी मनाचा तळ शोधू पाहणारी मर्मदृष्टी प्रकट होताना दिसते.

१७) 'मनस्विनी' कादंबरीतील सौदामिनी ही नायिका स्वतंत्र स्वतःचा रस्ता शोधणारी, स्वतःपुरतीच हरवणारी धीट, शेवटी पारंपरिक स्त्रीप्रमाणेच त्यांच्याकडून अपेक्षा करीत राहताना दिसते.

१८) 'झुंबर' कादंबरी ही 'स्त्री' भोवतीच फिरणारी, सतत मनाच्या आत पोखरुन काढणारी घालमेल आणि दोन पुरुषांचा सहवासात आलेले अनुभवाचे चित्रण केलेले आहे.

१९) स्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव व बदलत्या मूल्यांचे भान असून शेवटही आशा बगे यांची स्त्री संस्कृतीशी व परंपरेशी असलेले आपले जवळचे नाते सांगतात.

२०) आशा बगे यांनी आधुनिक काळ व बदलणारा समाज केंद्रस्थानी ठेवलेला आहे.

२१) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री प्रतिमा या संगीत, अभिनय, कला व साहित्याची आवड जोपासणाऱ्या आहेत.

२२) आशा बगे यांच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते असलेली व बदलत्या समाज वास्तवातील कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीच्या अस्तित्वाचे भान मध्यमवर्गातील बदलत्या मूल्यांची जाणीव त्यांच्या लेखनामधून दिसून येते.

२३) आजच्या स्त्रियांची मानसिक भावस्पंदने व बदलत गेलेली कौटुंबिक परिस्थिती याचा सूक्ष्म वेध त्या आपल्या कादंबऱ्यांतून घेताना दिसतात.

२४) आशा बगे यांनी आधुनिक स्त्रियांचे चित्रण, तिचे बदलत चाललेले व्यक्तिमत्त्व, तिच्या आयुष्यात निर्माण झालेले विविध प्रश्न, तिची मानसिकता, वेगवेगळ्या नातेसंबंधात तिचे असलेले रुप व तयार झ ाालेली नवी प्रतिमा या गोष्टींचे दर्शन लेखिकेने कादंबऱ्यांतून घडविलेले आहे.

२५) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नायिका स्वाभिमानी, जिद्दी, कर्तृत्ववान, तडफदार व आधुनिक असली तरी जुन्या परंपरेच्या मानवी मूल्यांतून बाहेर पडताना दिसत नाही. ती परंपरा शरण अशी स्त्री आहे.

२६) आशा बगे यांचे लेखन पारंपरिक विचार व संस्कृतीशी नाळ ठेवून आधुनिक विचारधारणेला एक प्रगल्भ समजुतीनं सामोर जाणार त्याचं लेखन वाचकांना अंतर्मुख करतात .

२७) 'झुंबर' कादंबरीतील नायिका कौटुंबिक जबाबदारीत बांधून घेणारी व त्यातून मोकळे होताना, तिला होणाऱ्या त्रासाचे चित्रण आशा बगेंनी वसुमतीच्या रुपाने एक वेगळी स्त्री त्यांच्या लेखनातून वाचकांसमोर मांडलेली आहे.

२८) आशा बगे यांच्या लेखनात पारंपरिक श्रध्दा, धारणा, संस्कार, स्त्री-पुरुष संबंध, मातृत्व व सासरची नाती यातून परंपरेसोबतच नवता त्यांच्या लिखाणातून आलेले आहे.

२९) आशा बगे यांच्या साहित्यामध्ये वातावरणनिर्मिती, संवाद, भाषाशैली, व्यक्तिचित्रण व घटनामधील विविधता ही त्यांची वैशिष्टये दिसून येतात.

३०) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये संवादाला विशेष स्थान आहे. संवादातून बोलणाऱ्या माणसांच्या मनाचे तसेच त्यांच्यातील परस्परसंबंधाचे दर्शन सहजपणे घडवले आहे.

३१) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्ती म्हणून जगण्यासाठी सतत धडपडताना दिसते.

३२) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नायिका स्वतःच स्वतःशी, परिस्थितीशी संघर्ष करतात आणि आत्मसन्मानासाठी सतत धडपडताना दिसतात.

३३) आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमध्ये छोटया छोटया प्रसंगामधून माणसांच्या आंतरिक वास्तवाचे, मानवी संबंधाचे,मानवी वेदना आणि कासाविस करणाऱ्यां दुःखाची तऱ्हा फार धारदारपणे टिपलेली आहे.

सदर शोधप्रबंधात 'आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास' याचा आढावा घेतलेला आहे. गेल्या दोन तीन दशकांत भारतीय स्त्री जीवनाचा कायापालट झाला आहे. पण जरा नीट बारकाईने पाहिले, तर दिसेल की स्त्री जीवनात एवढे बदल झाले खरे पण ते वरवरचे आहेत.त्या स्त्रियांच्या जीवनाचा गाभा जुनाच आहे. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन अजुनही बदललेला नाही. आजही स्त्रीला कोणी पालक असावा,ती पुरूषांच्या आधीन असावी,अशीच समाजभावना आहे. आजच्या काळातील स्त्रीने मूल्याधिष्ठित संस्कृतीचे जतन व संवर्धन केले पाहिजे. हा आशय या प्रबंधातून व्यक्त झालेला आहे. परंपरा आणि नवता यांची सांगड घालून जीवन जगले पाहिजे. जीवन खूप सुंदर आहे. चांगूलपणाचा स्वीकार करून जीवन जगले पाहिजे . पुढील संशोधनासाठी स्त्री आणि पुरूष हे समतेचे प्रतिक असले पाहिजेत,चांगल्या मूल्यांचा स्वीकार करून आधुनिक समाज प्रगत झाला पाहिजे. तसेच भारतीय स्त्री जीवनाची सुखःदुखे, पारंपरिक व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान, स्त्री जीवनातील विविध समस्या , स्त्रियांच्या जाणीवा व स्त्रीयांचे प्रश्न हे मानवी अधिकाराच्या दृष्टिकोनातून अत्यंत चिंतेचे आणि गंभीर प्रश्न आहे.हे प्रश्न केवळ एखादया भागात नाही तर प्रत्येक ठिकाणी आपल्याला पहावयास मिळतात.तसेच स्त्री स्त्रियांना मिळणारी वागणूक व त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा आज देखील चिंतेचा विषय आहे. आधुनिक स्त्रियांची एक नवीन प्रतिमा आणि स्त्रियांचे समाजातील योगदान स्पष्ट करण्यासाठी हा शोधप्रबंध उपयोगी व दिशादर्शक ठरेल.

आजच्या आधुनिक जगात स्त्री बुध्दीच्या, जिद्दीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर ती यशाची शिखरे गाठत जाते. सगळ्यामुळे तिच्याकडे असामान्य कर्तृत्व असणारी स्त्री म्हणून कुटुंबातले सर्वजण तिच्याकडे पाहतात. तिच्या मनाची एकाकी अवस्था होते. ते एका आत्ममग्न स्त्रीचे, तिच्यापरीने तिच्या अस्तित्वासाठी संघर्षरहीत असणारे एक जीवनयान आहे, स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाचा आलेख व आत्मभान असलेल्या, आपल्या मूल्यांवर ठाम आहेत. भारतीय परंपरेचे निकोप रुप ताजे व नूतन होऊन कसे येते याची प्रचिती दिसून येते.आजच्या काळातील स्त्रियांचे योगदान व प्रतिकूल परिस्थितील संघर्ष करीत स्वतःचे जीवन आणि कुटुंब उभे करणाऱ्या स्त्रियांसाठी उपयोगी ठरेल.

स्त्री कशी घडवावी यामध्ये संस्कृतीचा म्हणजे प्रस्थापित सामाजिकतेचा मोठाच हातभार असतो आणि ती घडण ही विशिष्ट प्रकारची केली जाते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीत्वाची घडण पुरुषप्रधानतेला जुळवून घेणारी, पक्की करणारी आणि वाढविणारी असते. स्त्रीच्या आर्थिक आणि राजकीय शोषणाच्या सोईसाठी साहित्य, कला आणि मिथके यांच्यामधून विशिष्ट प्रतिमा उभी केली जाते आणि त्यानुसार तिचे सांस्कृतिक स्थान व भूमिका ठरते. मानवी जीवनाच्या आणि संस्कृतीच्या निर्मितीत, संवर्धनात आणि संक्रमणात स्त्री आणि पुरुष यांची समसमान भागीदारी आहे. सर्वच पुरुषप्रधान संस्कृतीत 'स्त्री'ला स्थान दिले असले तरी संस्कृतीच्या निर्मितीतील आणि विकासातील तिचे स्थान नाकारता येणार नाही. सचिव सखी इत्यादी विश्लेषांनी ती मांडली गेली आहे. एका बाजूला स्त्रीचा गौरव करीत असतानाच प्रत्येक संस्कृतीने स्त्रीकडे पाहण्याचा एक विवक्षित दृष्टिकोन स्वीकारला आहे. या दृष्टिकोनामुळे समाजातील तिचे स्थान निश्चित झाले आहे. हा कालसापेक्ष, सांस्कृतिक दृष्टिकोन जपण्यासाठी उपयोगी ठरेल. सदर शोधप्रबंध विद्यार्थी, संशोधक व मराठी भाषा विषय शिक्षक यांना उपयोगी व दिशादर्शक ठरेल.

## ६.२ आशा बगे यांचा परिचय व छायाचित्र



**नाव :** आशा बगे

**जन्म :** २८ जुलै १९३९

**शिक्षण :** एम.ए. (संगीत, मराठी) खैरागड विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ,

**लेखन : कथासंग्रह -** मारवा, अत्तर, पूजा, मांडव, चंदन, अनंत, दर्पण, निसटलेले, ऋतूवेगळे, माझी कथा माझी निवड, श्रावणसरी, पाणी, प्रतिद्वंदी, पाऊलवाटेवरले गाव इ.

**कादंबरी -** मनस्विनी, झुंबर, त्रिदल, भूमी, धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे, सेतू, भूमिका आणि उत्सव, मुद्रा व चक्रवर्ती याखेरीज जलसाघर, हे ललित गद्य, वाटा आणि मुक्काम, या ललित संशोधनात्मक पुस्तकाचे सह लेखन.

**पुरस्कार :**

१. १९८८ - 'मारवा' कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, तसेच मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा दि.बा. मोकाशी पुरस्कार.

२. १९९१ - मराठी कथेच्या शतकोत्सवानिमित्त आयोजित विदर्भ लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद.

३. १९९२ - दिल्लीच्या कथा संस्थेचा पुरस्कार 'तुफान' कथेस पुरस्कार. आणि १९९६- 'पंख' या कथेस पुरस्कार.

४. १९९४ - 'त्रिदल' कादंबरीस विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार.

५. १९९७ - 'पत्र' कथेस शांताराम कथा पुरस्कार.

६. २००० - 'दर्पण' संग्रहास महाराष्ट्र सेवा संघ, मुलूंड यांचा सु.ल.गद्रे मातोश्री पुरस्कार आणि कोणवळे पुरस्कार.

७. २००० - 'सेतू' कादंबरीस मृण्मयी पुरस्कार आणि आपटे वाचन मंदिर इचलकरंजी यांचा पुरस्कार.

८. २००१ - साहित्यातील योगदानासाठी मेहता पब्लिकेशन हाऊस तर्फे कमलाबाई ओगले पुरस्कार.

९. २००६ - 'भूमी' कादंबरीस साहित्य अकादमी पुरस्कार.

**अन्य :**'भूमी' कादंबरीचा गुजराती आणि हिंदी अनुवाद प्रसिध्द.

## ६.४ संदर्भग्रंथ सूची

१) अवसरीकर प्र.ना., 'सामाजिक कादंबरी : स्वरुप आणि समीक्षा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१.

२) कर्वे स्वाती,'स्त्री विकासाचे नवे क्षितिज',प्रतिमा प्रकाशन,पुणे ,२००८.

३) करकरे कुमुद, 'स्त्रीमुक्ती चळवळ', समाजवादी महिला सभा, पुणे, डिसेंबर, १९७८.

४) काळे शंकुतला,'ग्रामीण कादंबरीतील स्त्री',शब्दाई प्रकाशन, पुणे, २०१२.

५) कुल्ली स.त्र्यं., 'जी.ए. जीवनदृष्टी आणि प्रतिमा सृष्टी', विजय प्रकाशन, नागपूर १९९४.

६) केळकर मीना, 'भारतीय स्त्री संकल्पना आणि प्रतिमा', नितिन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९९०.

७) कुलकर्णी मा.श्री., 'मराठी कादंबरी रचना', उन्मेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९५६.

८) गणोरकर प्रभा, (संपा) व इतर, 'वाड्मयीन संज्ञा कोश', ग.रा. भटकर फाउंडेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००१.

९) ढेरे अरुणा, 'स्त्री लिखित मराठी कादंबरी (१९५०-२०१०)' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१३.

१०) देशपांडे कुसुमवती, 'मराठी कादंबरी पहिले शतक, १९५०-१९५०, व्हीनस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, मुंबई १९७५.

११) देशपांडे मा.का., 'साहित्य साधना', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६१.

१२) धोंगडे अश्विनी, 'संदर्भ स्त्री-पुरुष', दिलिपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, प्रथम आवृत्ती, २००३.

१३) पवार गो.मा. व हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८६.

१४) पठारे रंगनाथ, 'सत्वाची भाषा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९७७.

१५) पाटील लीला, 'भारतीय स्त्री जीवन', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती, १९९०.

१६) पांडे विजया,'महिला सक्षमीकरणाच्या नव्या दिशा', हिमालय प्रकाशन, नागपूर, २००२.

१७) फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८०.

१८) बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरीची वाटचाल तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती तिसरी, पुणे, १९७३.

१९) बेडेकर मालती, 'भारतीय स्त्री' हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९६७.

२०) बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास (१९२०-१९४७)', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९६.

२१) भागवत विद्युत, 'स्त्री जीवनाची गुंतागुंत : विकास', अध्ययन केंद्र, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४.

२२) भागवत विद्युत,' स्त्री मनाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.

२३) भागवत वंदना, अनिल सपकाळ,गीताली वि.भ, संदर्भासहित स्त्रीवाद, 'स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व', संपा. शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१४.

२४) महाजन वंदना, 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१०.

२५) यादव आनंद, 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८५.

२६) रानडे प्रतिभा,'स्त्री प्रश्नाची चर्चा १९ वे शतक',पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२.

२७) लिमये अनुसया, 'स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका', समाजवादी महिला सभा, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७६.

२८) वरखेडे मंगला, 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलासराणा प्रकाशन नाशिक, १९९६.

२९) शरयु आनंदराव, 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७.

३०) शेवडे इंदुमती, 'मराठी कथा उगम आणि विकास', सोमय्या पब्लिकेशन, मुंबई, १९७३.

३१) सहस्त्रबुध्दे पु.ग, 'स्वभावलेखन', मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९३८.

३२) साने गुरुजी, 'भारतीय नारी', साधना प्रकाशन पुणे, आवृत्ती नववी २००३.

३३) साने गीता, 'भारतीय स्त्रीजीवन' मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८६.

३४) सानप किशोर : भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी एक चिकित्सा, औरंगाबाद, १९९६.

३५) सावदेकर आशा, 'काही शोध निबंध', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००२.

३६) संत दु.का., 'मराठी स्त्री' प्रकाशक दा.ना. मोघे प्रकाशन, कोल्हार, प्रथम आवृत्ती, एप्रिल १९५७.

३७) हस्तक उषा, 'कादंबरी, साहित्य अध्यापन आणि प्रकार' संपा. श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७.

३८) हेर्लेकर सुलभा, 'आशा बगे एक नवे अस्तित्व' कस्तुभा प्रकाशन, नागपूर, १९९६.

## ६.५ नियतकालिके /मासिके /वर्तमानपत्रे -


१) अवसरीकर स्नेहा , 'आशा बगे यांची मुलाखत', आशय दिवाळी अंक, मुद्रा प्रकाशन, सोलापूर, २००८.

२) देशमुख उषा, 'वैदर्भीय लेखिका' काल आणि आज वसंत विशेषांक, मुंबई, मे १९८९.

३) देशपांडे प्रकाश, 'आलोचना' मासिक, मुंबई, ऑगस्ट - १९९०.

४) पाटील गंगाधर, कथनमीमांसा, अनुष्टम, दिवाळी अंक, १९९१.

५) बगे आशा, 'माझे कथा लेखन', ललित मासिक जुलै १९८८.

६) बगे आशा, 'अध्यक्षीय भाषण' विदर्भ साहित्य, संघ, लेखिका संमेलन, ६ ऑक्टोबर, १९९१.

७) भावे पु.भा., 'शत्रू करण्याची कला' ललित दिवाळी, १९७२.

८) वैद्य अरुंधती, 'भूमी : एका आधुनिक मैथिलीचे जीवनयान', युगवाणी, एप्रिल-जून २००७.

९) सहस्त्रबुध्दे अविनाश, 'दशकातील साहित्यिक', ललित, सप्टेंबर १९८९.

१०) सावदेकर आशा, 'आशा बगे यांचे कादंबरीविश्व काही शोध निबंध', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, २००२.

११) 'ललित अंक' वर्ष - २६, ९ मुंबई, १९९९.

१२) सिरस श्रीनिवास, 'आशा बगे एक नवे अस्तित्व', युगवाणी, मासिक, नागपूर, ऑक्टो, नोव्हें, डिसें. १९८९.

**१३)** हेर्लेकर सुलभा , 'तरुण भारत',दिवाळी अंक, नागपूर, १९८५.


**वर्तमानपत्रे**


१) दैनिक तरुण भारत, नागपूर, २००२.

२) दैनिक लोकमत, अहमदनगर, डिसेंबर २००६.

३) दैनिक लोकसत्ता, अहमदनगर, २४ डिसेंबर २००६.

४)दैनिक लोकसत्ता, लोकरंग, पुणे, ०७ जानेवारी, २००७.

## ६.६ आधारभूत ग्रंथ सूची -

१) 'मनस्विनी', मेनका प्रकाशन, पुणे, १९७८.

२) 'झुंबर', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९९४.

३) 'त्रिदल', मौज प्रकाशन, मुंबई, १९९४.

४) 'कुरक्षेत्रे' व 'धर्मक्षेत्रे', विजय प्रकाशन, नागपूर, १९९६.

५) 'सेतू', मौज प्रकाशन, मुंबई, २००२.

६) 'भूमी', मौज प्रकाशन, मुंबई, २००६.

७) 'भूमिका', आणि 'उत्सव', मौज प्रकाशन, मुंबई, २०११.

८) 'मुद्रा', मौज प्रकाशन, मुंबई, २०१५.

## ६.७ व्यक्तिनाम सूची

**अ.क्र.** **व्यक्तिंचे नाव**


१. आपटे हरिभाऊ, पृष्ठ -५८.

२. कुल्ली स.त्र्यं, पृष्ठ - १६,९५,९६,१०१.

३. कुलकर्णी भीमराव, पृष्ठ - ६०,१८७.

४. कुलकर्णी कृ.पा, पृष्ठ - २४२.

५. कुलकर्णी वा.ल, पृष्ठ -५९.

६. कुलकर्णी श्री. मा. पृष्ठ - ६०.

७. गणोरकर प्रभा, पृष्ठ -१६४.

८. गाडगीळ गंगाधर, पृष्ठ - १२.

९. गोडबोले ना.वा, पृष्ठ -६०,६४,९१, २४२.

१०. चेकॉव्ह, पृष्ठ - १५.

११. जाधव रा.ग, पृष्ठ - २४५.

१२. देशमुख उषा, पृष्ठ - २०९.

१३. देशपांडे प्रकाश, पृष्ठ - १७०.

१४. देशपांडे कुसुमावती, पृष्ठ - १६.

१५. देशपांडे धो.वि, पृष्ठ - १८.

१६. पठारे रंगनाथ, पृष्ठ -२७०.

१७. पद्मनजी बाबा, पृष्ठ - ५८.

१८. पाध्ये प्रभाकर, पृष्ठ - ९६,२५४.

१९. पाटील भालसिंग, पृष्ठ -२६३.

२०. पाटील गंगाधर, पृष्ठ - १८८,२६७.

२१. प्रिस्टले जे.बी, पृष्ठ - ६१.

२२. पो. पृष्ठ- १५.

२३. फडके भालचंद्र, पृष्ठ - ९७,११५.

२४. फडके ना.सी, पृष्ठ - ९७,११७.

२५. बगे आशा, पृष्ठ - ११,१२,१२६,१२७,१५७,२४३.

२६. बापट प्र.वा, पृष्ठ - ६०,६४,९१,२४२,२४३.

२७. बेकर अर्नेष्ट, पृष्ठ -६०.

२८. बेडेकर विश्राम, पृष्ठ -६६.

२९. भवाळकर तारा, पृष्ठ -२४.

३०. भावे पु.भा, पृष्ठ - ११.

३१. भागवत वंदना, पृष्ठ - ११६.

३२. भालचंद्र नेमाडे, पृष्ठ -६५,६६.

३३. महाजन वंदना, पृष्ठ - ११३.

३४. मोकाशी दि.बा, पृष्ठ -१२.

३५. यादव आनंद, पृष्ठ -२४२.

३६. राजवाडे वि.का, पृष्ठ -५८.

३७. राजाध्यक्ष विजया, पृष्ठ - १२.

३८. लिव्हर कॅथरिन, पृष्ठ -६०.

३९. वरखेडे मंगला, पृष्ठ - १४,१५६.

४०. वेल्स एच.जी, पृष्ठ - १५.

४१. वेब्स्टर, पृष्ठ - ६१.

४२. वैद्य अरुंधती, पृष्ठ -७१,२६४.

४३. सहस्त्रबुध्दे अविनाश, पृष्ठ - १७,२०९.

४४. साने गुरुजी, पृष्ठ - १३०.

४५. सानप किशोर, पृष्ठ - २६७.

४६. सावदेकर आशा, पृष्ठ - ९८,१७६,२००,२०६,२२२,२४९,२७१.

४७. हस्तक उषा, पृष्ठ - ११३,२०४.

४८. सिरास श्रीनिवास ,पृष्ठ - २१९.

४९. हेर्लेकर सुलभा, पृष्ठ - १४,३८,६६,१३२,१९८,२५१.

५०. हॅडफील्ड जॉन, पृष्ठ - १५.

## ६.८ ग्रामनाम सूची

**अ.क्र.** **गावाचे नाव**

१. अकोला, पृष्ठ - ८.

२. अमेरिका, पृष्ठ - ८८,११४,२०१,२९०.

३. आशिया, पृष्ठ -१६.

४. इंग्लड -११३.

५. कडलूर, पृष्ठ - १४८,१६५,१६८,१७६,२४५.

६. खैरागड, पृष्ठ - ७.

७. छत्तीसगड, पृष्ठ -७.

८. दिल्ली, पृष्ठ - ४९,२९०.

९. नागपूर, पृष्ठ -७,९,१६७,२८३,२८७.

१०. बनारस, पृष्ठ - ८५,१७४,२१८,२८१,२९०.

११. बेंगलोर, पृष्ठ - १५१,१६०,१६७,१९५,२४६,२८१.

१२. मद्रास, पृष्ठ - ४७,७२,७४,१४९,१६०,१६९,२४६,२६४,२८१.

१३. महाराष्ट्र, पृष्ठ -३५,६०.

१४. मुंबई, पृष्ठ - ४७,७२,१४९,१६०,१६९,१९१,२४६,२४१.

१५. रॉचेंस्टर -४६.

१६. लंडन -४१.

१७. विदर्भ, पृष्ठ -८,१२.

१८. हिंगणघाट-८.

१९. हिस्लॉप - ७.